महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ द्वारा पुरस्कृत

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला क्रमांक २९

शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख

लेखक

महामहोपाध्याय वासुदेव विष्णु मिराशी,

एम्. ए., डी. लिट्.

माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर, आणि विदर्भ महाविद्यालय, अमरावती;
संस्कृत आणि प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति यांचे माजी प्राध्यापक, नागपूर विद्यापीठ;
सन्मान्य फेलो, भारतीय साहित्य अकादमी;
सन्मान्य सल्लागार, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, इ०

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

१९७४

किंमत ३५ रुपये

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ द्वारा पुरस्कृत

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला क्रमांक २९

शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख

लेखक

महामहोपाध्याय वासुदेव विष्णु मिराशी,
एम्. ए., डी. लिट्.
माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर, आणि विदर्भ महाविद्यालय, अमरावती;
संस्कृत आणि प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति यांचे माजी प्राध्यापक, नागपूर विद्यापीठ;
सन्मान्य फेलो, भारतीय साहित्य अकादमी;
सन्मान्य सल्लागार, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, इ०

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर
१९७४

प्रकाशक :

डॉ. मु. बा. देवपुजारी
कार्यवाह,
विदर्भ संशोधन मंडळ,
पश्चिम हायकोर्ट मार्ग,
नागपूर–१.

प्रथमावृत्ति : जून १९७४

मुद्रक :

श्या. श्री. बनहट्टी,
श्रीनिवास मुद्रणालय,
सुविचार प्रकाशन इमारत,
धनतोली, नागपूर १२.

माझे विद्यागुरु

कै. डॉ. श्रीपाद कृष्ण बेलवलकर

संस्कृतचे प्राध्यापक, डेक्कन कॉलेज

यांच्या स्मृतीस

सादर अर्पण

अनुक्रमणिका

खण्ड पहिला

शिलाहार राजवंशाचा इतिहास

खण्ड दुसरा

शिलाहार राजवंशाचे कोरीव लेख

विभाग १ : उत्तर कोकणच्या शिलाहारांचे लेख

विभाग २ : दक्षिण कोकणच्या शिलाहारांचे कोरीव लेख

विभाग ३ : कोल्हापूरच्या शिलाहारांचे कोरीव लेख

प्रथम परिशिष्ट

शिलाहारांचे आणखी कांही कोरीव लेख

दुसरे परिशिष्ट

नकाशे

प्लेटींची सूची

भूमिमानचित्रे (Ground-plans)

संदर्भ ग्रंथ व त्यांचे संक्षेप

इंग्रजी ग्रंथ

1. Antiquities of Dabhoi by Burgess and Cousens.
2. Bombay Gazetteer (*Bomb. Gaz.*) (old ed.) Vol. I, part ii.
3. Bulletin of the Prince of Wales Museum of Western India.
4. The Chaulukyas of Gujarat by A. K. Majumdar.
5. The Cholas by K. Nilakanta Sastri.
6. Collected Works of R. G. Bhandarkar.
7. Classical Accounts of India by R. C. Majumdar.
8. Corpus Inscriptionum Indicarum (*C. I. I.*), Vols. IV and V by V. V. Mirashi.
10. Dynasties of the Kanarese Districts by Fleet (*Dyn. Kan. Dist.*)
11. Early History of the Deccan by G. Yazdani.
12. Economic Life of Northern India, A. D. 700–1200 by Lallanji Gopal.
13. Epigraphia Carnatica (*Ep. Carn.*)
14. Epigraphia Indica (*Ep. Ind.*)
15. Festgabe Herman Jacobi.
16. A Guide to Elephanta by Hiranand Sastri.
17. History of Dharmaśāstra (*H. D.*) by P. V. Kane.
18. History and Culture of the Indian People (*H. C. I. P.*), edited by Majumdar and Pusalkar.
19. A History of Karnataka by P. B. Desai.

20. Important Inscriptions from the Baroda State, edited by A. S. Gadre.
21. Indian Architecture by Percy Brown.
22. Inscriptions from the Cave-Temples of Western India (*I. C. T. W I.*) by Burgess and Bhagwanlal Indraji.
23. Inscriptions from Northern Karnataka and the Kolhapur State (*I. N. K. K. S.*) by K. G. Kundangar.
24. Inscriptions of Northern India by D. R. Bhandarkar.
25. Inscriptions of Southern India by by Kielhorn.
26. Kane Felicitation Volume ed. by Katre aud Gode.
27. Kolaba District Gazetteer (old ed.).
28. Local Self-Government in Mediaeval Karnataka by G. S. Dikshit.
29. Mediaeval Temples of the Deccan by Cousens.
30. Report on the Excavations at Ter by S. N. Chapekar.
31. The Rāshṭrakūṭas and Their Times by A. S. Altekar.
32. Socio-Economic History of Northern India, (11th and 12th cen.) by B. P. Mazumdar.
33. A statistical Account of the Principality of Kolhapur (*Kolhapur*) by Graham.
34. Studies in Indology (*S. I.*), Vols. I to IV by V. V. Mirashi.
35. Transactions of the Literary Society of Bombay.

Periodicals

36. Annals of the Bhandarkar Oriental Research Institute (*A. B. O. R. I.*)
37. Annual Report of Indian Epigraphy (*An. Rep. Ind. Ep.*)
38. Indian Antiquary (*Ind. Ant.*)
39. Indian Culture (*Ind. Cult.*)
40. Indian Historical Quarterly (*Ind. Hist. Quart.*).
41. Indica (Indian Historical Research Institute Silver Jubilee Commemoration Volume).
42. Journal of the Asiatic Society of Bombay (*J. A. S. Bom.*)
43. Journal of the Bihar Research Society (*J. Bihar R. S.*)
44. Journal of the Bombay University (*J. Bom. Univ.*)
45. Journal of Indian History (*J. I. H.*)
46. Journal of the Oriental Institute (*J. O. I.*).
47. Journal of the Numismatic Society of India (*J. N. S. I.*).
48. Journal of the Royal Asiatic Society (*J. R. A. S.*).

49. Journal of the Bombay Branch of the Royal Asiatic Society (*J. B. B. R. A. S.*).
50. Proceedings of the Indian History Congress (*P. I. H. C.*)
51. Progresss Report of the Archaeological Survey of Western India, Western Circle (*P. R. A. S. W. I.*).
52. Zeitschrift der Deutschen Morganlandischen Gasellschaft (*Z. D. M. G.*)

संस्कृत ग्रंथ

५३. उदयसुंदरीकथा (गायकवाड ओरिएंटल सीरीज)
५४. कथासरित्सागर (सोमदेवकृत)
५५. काशिका
५६. कुमारपालचरित (हेमचन्द्रकृत)
५७. कीर्तिकौमुदी (सोमेश्वरकृत)
५८. प्रबन्धचिन्तामणि (मेरुतुंगकृत)
५९. प्रभावकचरित (प्रभाचन्द्रकृत)
६०. बृहत्कथाकोश (हरिषेणकृत)
६१. बृहत्कथामंजरी (क्षेमेन्द्रकृत)
६२. बृहत्संहिता (वराहमिहिरकृत)
६३. याज्ञवल्क्यस्मृति (अपरार्कटीकासहित)
६४. याज्ञवल्क्यस्मृति (मिताक्षरासहित)
६५. राघवपाण्डवीय (धनञ्जयकृत)
६६. राजतरङ्गिणी (कल्हणकृत)
६७. वसन्तविलास (बालचन्द्रकृत)
६८. विक्रमांकदेवचरित (बिल्हणकृत)
६९. शब्दार्णवचंद्रिका (सोमदेवमुनिकृत)
७०. श्रीवाडेश्वरमहाकाव्य (सं. अ. द. पुसाळकर)

मराठी ग्रंथ

७१. दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने (खंड १ ते ३), (सं. ग. ह. खरे)
७२. महाराष्ट्रातील कांही ताम्रपट व शिलालेख, सं. मो. गं. दीक्षित.
७३. प्राचीन मराठी कोरीव लेख (प्रा. म. को. ले.) (सं. शं. गो. तुळपुळे)
७४. लीळाचरित्र (सं. शं. गो. तुळपुळे)
७५. संशोधनमुक्तावलि : सर १–६ (वा. वि. मिराशीकृत)

मराठी नियतकालिके

७६. प्रभात (धुळे).
७७. भारत इतिहास संशोधक मंडळाचा वार्षिक अहवाल.
७८. भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक.
७९. मराठी संशोधन पत्रिका.
८०. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक.

इतर ग्रंथ

८१. नेमिनाथ पुराण (कर्णपार्यकृत) (कन्नड).
८२. भारतीय संस्कृति में जैनधर्म का योगदान (हीरालाल जैन) (हिन्दी).

लेखकाचे हृद्‌गत

सुमारे दोनशे वर्षांपूर्वीपर्यंत प्राचीन भारताच्या इतर अनेक राजवंशांप्रमाणे शिलाहार राजवंशहि पूर्णपणे अज्ञात होता. कोकणात आणि कोल्हापूरच्या परिसरात शिलाहारांचे अनेक शिलालेख विखुरले होते, पण त्यांकडे कोणाचेहि लक्ष नव्हते. सन १७८४ मध्ये कलकत्त्यास वॉरन हेस्टिंग्ज्च्या अध्यक्षतेखाली एशियाटिक सोसायटीची स्थापना झाली. नंतर चार वर्षांनी, सन १७७८ मध्ये, तिचे नियतकालिक 'एशियाटिक रीसर्चेस्' याचा पहिला व्हॉल्यूम प्रसिद्ध झाला. त्यात शिलाहार नृपति अरिकेसरी याचा शक संवत् ९३९ (सन १०१७) चा ठाणे ताम्रपट इंग्रजी अनुवादरूपाने प्रसिद्ध झाला. तो अनुवाद कलकत्त्याच्या रामलोचन पंडित याच्या साहाय्याने जनरल कार्‌नॅक याने संस्कृत समासातील शब्दांनाहि तसेच इंग्रजी शब्द ठेवून तयार केला होता. या संशोधनपर पहिल्या नियतकालिकाचे इतके कौतुकाने स्वागत झाले की त्याच्या या पहिल्या व्हॉल्यूमःच्या निदान पाच आवृत्त्या इंग्लंडमध्ये प्रसिद्ध झालेल्या माहीत आहेत. त्यांपैकी एका आवृत्तीत त्या ताम्रपटाच्या पहिल्या पत्र्याचा छाप व दुसरीत त्याचे वाचन प्रसिद्ध झाले होते. हा ताम्रपट आता उपलब्ध नाही. पण शिलाहारांच्या इतर ताम्रपटांच्या व जनरल कार्‌नॅकच्या अनुवादाच्या साहाय्याने जुळविलेले त्याचे संस्कृत मूळ प्रस्तुत ग्रंथात दिले आहे. (क्र. ८ पाहा.)

यानंतर शिलाहारांचे अनेक कोरीव लेख इंडियन अँटिक्वरी, एपिग्राफिया इंडिया, इंडियन हिस्टॉरिकल क्वॉर्टर्ली, रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेचे जर्नल इत्यादि नियतकालिकांत प्रसिद्ध झाले आहेत. कोरीव लेख हे आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासाच्या ज्ञानाचे प्रमुख साधन आहे. पण हे लेख सापडतात तसे अनेक नियतकालिकांत मधून मधून विद्वानांकडून संपादिले जातात. या विखुरलेल्या साधनसंपत्तीचे एकत्रीकरण करून व तिचा चिकित्सक वृत्तीने अभ्यास करून सर्व उपलब्ध कोरीव लेख प्राचीन राजवंशांच्या नामानुसार एका ग्रंथमालेत प्रकाशित करावे अशी सूचना विख्यात प्राचीन भारतीय लिपिशास्त्रज्ञ जेम्स् प्रिन्सेप याने सन १८३७ मध्ये केली आणि त्या ग्रंथमालेला 'कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्' (भारतीय – उत्कीर्ण – लेखसंग्रह) असे लॅटिन नावहि त्याने सुचविले. त्यानंतरच्या गेल्या सवाशे वर्षांत त्या ग्रंथमालेचे फक्त पांच ग्रंथ आतापर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. ते असे – ग्रंथ पहिला – अशोकाचे कोरीव लेख (प्रथमावृत्ति १८७७), संपादक जनरल अलेक्झांडर कनिंगह्याम्, द्वितीयावृत्ति – सं. हुल्श). ग्रंथ दुसरा – पहिला भाग – खरोष्ठी कोरीव लेख – सं. स्टेन कोनो. दुसरा भाग – भरहूत येथील कोरीव लेख – सं. ल्यूडर्स्, वॉल्डश्मिट व मेहेंदळे (१९६३).

ग्रंथ तिसरा – पूर्वकालीन गुप्त नृपति व त्यांचे उत्तराधिकारी यांचे कोरीव लेख— सं. डॉ. फ्लीट (१८८८). (याची द्वितीयावृत्ति कै. डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांनी १९५० मध्ये तयार केलेली अद्यापि अप्रकाशित आहे.) ग्रंथ चौथा – कलचुरि–चेदि संवताचे कोरीव लेख – सं. डॉ. वा. वि. मिराशी, सन १९५५ मध्ये प्रकाशित. ग्रंथ पांचवा – वाकाटकांचे कोरीव लेख – सं. डॉ. वा. वि. मिराशी, सन १९६३ मध्ये प्रकाशित.

प्राचीन काळीं भारताच्या विविध प्रदेशांत चालुक्य, राष्ट्रकूट, प्रतीहार, पाल, सेन, चौलुक्य, गाहडवाल, पल्लव, चोल, पांड्य, यादव, होयसळ वगैरे अनेक राजवंश राज्य करीत होते. त्यांचे शेकडो कोरीव लेख भारताच्या विविध भागांत सापडले आहेत. या राजवंशांचे सर्व उपलब्ध कोरीव लेख एकत्र करून ते कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम् (भारतीय – उत्कीर्ण – लेखसंग्रह) या ग्रंथमालेच्या एकवीस भागांत प्रकाशित करण्याची व्यापक योजना भारताच्या पुरातत्त्व विभागाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लौकरच, सन १९५३ मध्ये, जाहीर करून त्या भागांचे संपादकत्व विद्वानांमध्ये वाटून दिले होते. ती यादी नंतर १९५७ मध्ये सुधारून प्रसिद्ध केली होती. पण त्यानंतर माझे 'कलचुरि–चेदि संवताचे कोरीव लेख' आणि 'वाकाटकांचे कोरीव लेख' हे पूर्वोक्त दोन ग्रंथ आणि डॉ. ल्यूडर्स्‌चा 'भरहूत कोरीव लेख' या तीन ग्रंथांखेरीज अद्यापि त्या ग्रंथमालेचा एकहि नवीन ग्रंथ प्रसिद्ध झाला नाही. याचे कारण या कामाला बुद्धिमत्तेप्रमाणे दीर्घ परिश्रमाची आवश्यकता असते, हे असावे.

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी माझे लक्ष प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासाकडे वळले आणि मी मिळतील ते प्राचीन कोरीव लेख संपादू लागलो. सन १९३५ मध्ये भारत शासनाच्या पुरातत्त्व विभागाने कलचुरि–चेदि संवताचे सर्व उपलब्ध लेख जमवून संपादण्याचे अत्यंत जोखमीचे व दीर्घ परिश्रमाचे काम माझ्यावर सोपविले. दहा वर्षांच्या अखंड परिश्रमानंतर तो ग्रंथ तयार करून मी पुरातत्त्व विभागाकडे पाठविला. तो पुढे दहा वर्षांनंतर सन १९५५ मध्ये प्रकाशित झाला. त्यात माझे निवासस्थान असलेल्या तत्कालीन मध्यप्रान्त–वऱ्हाड या प्रदेशाच्या हिंदी–भाषी विभागाच्या एका राजवंशाचा सर्वंकष प्राचीन इतिहास आला आहे. या कालात मी त्या प्रांताच्या मराठीभाषी नागपूर–वऱ्हाड या विभागाच्या प्राचीन कोरीव लेखांचाहि अभ्यास व संपादन करण्यात गुंतलो होतो. त्या प्रदेशाच्या वाकाटक नृपतींच्या कोरीव लेखांचा माझा ग्रंथ तयार आहे हे समजताच पुरातत्त्व विभागाच्या संचालकांनी तो कॉ. इ. इं. या ग्रंथमालेत प्रसिद्ध करण्याची इच्छा दर्शविली. तदनुसार तो 'वाकाटकांचे कोरीव लेख' या नावाने त्या ग्रंथमालेचा पाचवा भाग म्हणून १९६३ मध्ये प्रसिद्ध झाला आहे.

याप्रमाणे माझ्या निवासस्थानाच्या हिंदीभाषी व मराठीभाषी विभागांच्या प्राचीन इतिहासाच्या प्रकाशनाचे कार्य संपविल्यावर माझे लक्ष सुमारे दहा वर्षांपूर्वी शिलाहारांच्या

इतिहासाकडे आकृष्ट झाले. कारण त्या राजवंशाची एक शाखा माझे जन्मस्थान कोकण यावर प्राचीन काळी राज्य करीत होती, आणि दुसरीची सत्ता मी जेथे प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेण्यात वयाची अठरा वर्षे घालविली त्या कोल्हापूर प्रदेशावर होती. शिलाहारांच्या एकूण सहा शाखा कोरीव लेखांवरून ज्ञात झाल्या आहेत. त्यांपैकी तीन उत्तर कोकण, दक्षिण कोकण व कोल्हापूर सभोवारचा दक्षिण महाराष्ट्र या प्रदेशांवर राज्य करीत होत्या. त्यांचाच इतिहास प्रस्तुत ग्रंथात आला आहे. इतर तीन शाखा फारशा प्रसिद्ध नाहीत.

शिलाहारांचे सर्व उपलब्ध लेख संपादण्याचे काम हाती घेतल्यावर अनेक अडचणी उपस्थित झाल्या. कांही लेखांचे छाप प्रसिद्ध झाले नाहीत. इतर कांही लेख आता नष्ट झाले असल्यामुळे ते पुनः वाचणे, त्यांच्या छापांच्या अभावी, अशक्य झाले आहे. कांही नवीन सापडलेले लेख अद्यापि प्रकाशित झाले नाहीत. कांही कन्नड भाषेत आहेत, आणि मला तर त्या भाषेचे मुळीच ज्ञान नाही. या अडचणी दुर्लंघ्य वाटल्या. पण माझे मित्र मुख्य एपिग्राफिस्ट (लेखशास्त्रज्ञ) डॉ. जी. एस्. गै यांच्या साहाय्याने मी त्या अडचणी दूर करू शकलो. त्यांनी अनेक लेखांचे छाप आपल्या सहाय्यक ऑफिसरांकडून काढवून पाठविले. तसेच त्यांनी चार–पाच कन्नड भाषेतील कोरीव लेखांचे वाचन व इंग्रजी भाषांतर पाठविले. शिवाय कोरीव लेखांच्या छापांचे व नाण्यांचे फोटो घेऊन मला दिले आणि विविध प्रकारे अन्य साहाय्य केले. माझे दुसरे स्नेही सेवानिवृत्त गव्हर्नमेंट एपिग्राफिस्ट श्री. लक्ष्मीनारायण राव यांचेहि मला अनेक प्रकारे साहाय्य झाले आहे. म्हणून मी हे दुर्घट कार्य करू शकलो. त्या दोघांचाहि मी अत्यंत आभारी आहे.

शिलाहारांचा राजकीय इतिहास लिहिण्याचा पहिला प्रयत्न रेव्हरंड अलेक्झांडर किड नैर्न याने केला. त्याने मुंबई गॅझेटीयर, व्हॉ. १, भाग २ मध्ये उत्तर कोकणच्या शिलाहारांचा इतिहास त्या काळी उपलब्ध असलेल्या लेखांवरून लिहिला. त्यानंतर डॉ. फ्लीट व डॉ. रा. गो. भांडारकर यांनी कोल्हापूर शाखेचा इतिहास लिहिला. पुढे कै. डॉ. अ. स. अळतेकर यांनी इंडियन कल्चर, व्हॉ. २१ (पृ. ३९३–४३४) मध्ये तीन्ही शाखांचा संक्षिप्त राजकीय इतिहास प्रसिद्ध केला. भारतीय विद्या भवनाने अलीकडे प्रसिद्ध केलेल्या 'भारतीयांचा इतिहास व संस्कृति' या दशग्रंथात्मक मालेत शिलाहारांच्या राजकीय इतिहासाला फक्त एक पृष्ठ दिले आहे. अलीकडे प्रसिद्ध होत असलेल्या मुंबई गॅझेटीयरच्या महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासविषयक विभागाकरिता मीहि शिलाहारांचा इतिहास सन १९६७ मध्ये लिहिला. त्याचे मराठीत रूपांतर माझ्या संशोधन मुक्तावलि, सर ५ (पृ. १७९–२२६) मध्ये दिले आहे. कै. डॉ. मो. गं. दीक्षित यांचाहि शिलाहारांचा इतिहास लिहिण्याचा मानस होता. त्यांनी शिलाहारांचे अनेक कोरीव लेख व तत्कालीन मूर्ति यांवर आपले लेख प्रकाशित करून बरेच कार्य केले होते. पण त्यांच्या अकाली निधनाने त्यांचे कार्य पूर्ण झाले नाही हे खेदजनक आहे.

सुमारे दहा वर्षांच्या परिश्रमानंतर शिलाहारांचे सर्व उपलब्ध लेख जमवून, त्यांचे काटेकोरपणे वाचन व चिकित्सक अध्ययन करून, त्यांचे इंग्रजी अनुवादासह संपादन, तसेच शिलाहार राजवंशाचा केवळ राजकीय इतिहासच नव्हे तर त्याचे राज्यशासन, तत्कालीन धार्मिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिति आणि साहित्य, स्थापत्य व शिल्पकला या विषयांचे साधार विवेचन असलेला इंग्रजी ग्रंथ कॉ. इ. इं. या ग्रंथमालेत प्रकाशित करावा म्हणून मी दोन वर्षांपूर्वी पुरातत्त्व विभागाचे संचालक श्री. एम्. एन्. देशपांडे यांच्याकडे पाठविला होता. तो त्यांनी त्या ग्रंथमालेकरिता स्वीकारला आहे. पण अनेक कारणांमुळे त्याच्या मुद्रणाला अद्यापि आरंभ झाला नाही.

आपले प्राच्यविद्याविषयक संशोधन इंग्रजीत बंदिस्त न राहता सामान्य वाचकांना अवगत व्हावे म्हणून मी त्यांतील महत्त्वाचा भाग मराठीत (क्वचित् हिंदीतहि) प्रकाशित करीत असतो. माझे संस्कृत व प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृति या विषयांवरचे संशोधनपर लेख माझ्या 'संशोधनमुक्तावलि' सर १ ते ६ मध्ये विदर्भ संशोधन मंडळाने प्रसिद्ध केले आहेत. माझे 'कालिदास' व 'भवभूति' हे ग्रंथ आणि कलचुरि व वाकाटक राजवंशांचे इतिहास हे इंग्रजीतल्याप्रमाणे मराठी व हिंदी भाषांतहि प्रसिद्ध झाले आहेत. तदनुसार शिलाहारविषयक ग्रंथाचेहि मराठी रूपान्तर प्रसिद्ध करावे अशी साहजिकच कल्पना, इंग्रजी ग्रंथ पुरातत्त्वविभागाकडे पाठविल्यावर, माझ्या मनात आली. त्याच वेळी हे काम करावयाचे असेल तर ते लौकर उरकले पाहिजे अशीहि जाणीव झाली. कारण आता माझे ८२ व्या वर्षांत पदार्पण झाले असून वयोमानाप्रमाणे सर्व शक्ति क्षीण होत आहेत. तशात गेली चार वर्षे मी एका दुर्धर व्याधीने ग्रस्त झालो आहे. बरोबरचे संसारातील सखेसोयरे पुढे गेले आहेत, आपली पाळी केव्हा येईल माहीत नाही. तेव्हा करावयाचे असेल तर हे काम त्वरित केल पाहिजे असे वाटले. एका सुभाषितात म्हटले आहे—

> श्वःकार्यमद्य कुर्वीत पुर्वाह्णे चापराह्णिकम् ।
> न हि प्रतीक्षते मृत्युः कृतमस्य न वा कृतम् ॥

(उद्याचे काम आज, आणि दिवसाच्या उत्तरार्धातील काम पूर्वार्धात करावे. कारण याचे काम संपले आहे किंवा नाही याचा विचार मृत्यु करीत नाही.)

म्हणून शिलाहारविषयक इंग्रजी ग्रंथ प्रकाशनार्थ पाठविल्यानंतर मी त्याचा संक्षिप्त अनुवाद करण्याचे काम हाती घेतले. प्रस्तुत ग्रंथात शिलाहारांचे सर्व उपलब्ध कोरीव लेख संगृहीत केले आहेत. त्यांचे छाप इंग्रजी ग्रंथातल्याप्रमाणे छापणे अत्यंत खर्चाचे असल्यामुळे ते करणे शक्य नव्हते. म्हणून लेखांच्या प्रस्तावनांत लिपीविषयक चर्चा केली नाही. लेखनपद्धतिविषयक चर्चाहि अनावश्यक म्हणून गाळली आहे. इतर बाबींची चर्चा संक्षेपाने केली आहे. स्थलाभावास्तव लेखांचा मराठी अनुवाद दिला नाही; कारण

संस्कृताचे सामान्य ज्ञान असलेल्यास हे लेख समजण्यास अडचण पडणार नाही. कन्नड भाषेतील लेखांचे मात्र मराठी भाषांतर दिले आहे. सर्वत्र मूळ ग्रंथांचे संदर्भ दिले असल्यामुळे जिज्ञासु अभ्यासकांस तत्तद्विषयक जास्त ज्ञान मिळविण्यास कठीण जाणार नाही. शिलाहारांचा केवळ राजकीय इतिहासच नव्हे तर तत्कालीन धार्मिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिति, तसेच साहित्य, स्थापत्य व शिल्पकला या विषयांचे विवेचन इंग्रजी ग्रंथातल्याप्रमाणेच येथेही साधार व सविस्तर दिले आहे. 'नामूलं लिख्यते किञ्चिन्नानपेक्षितमुच्यते ।' हा दण्डक तंतोतंत पाळला आहे.

प्रस्तुत ग्रंथात उत्तर व दक्षिण कोकण आणि दक्षिण महाराष्ट्र या प्रदेशांत राज्य करणाऱ्या तीन शिलाहार शाखांचे ६० कोरीव लेख मुळांवरून किंवा छापांवरून काळजीपूर्वक वाचून संपादिले आहेत. त्यांच्या प्रस्तावनांत त्यांचा विषय, उद्देश, कालनिर्णय, स्थलनिश्चय इत्यादिकांविषयी माहिती दिली आहे. एका परिशिष्टात उत्तर कोकणच्या शिलाहारांचे आणखी दोन लेख – ज्यांचे छाप उपलब्ध झाले नाहीत ते – दिले आहेत. त्यांपैकी पहिला, भोइघरच्या एका जुन्या पद्धतीच्या पढिक विद्वानाने स्मरणाने पाठ म्हणून दाखविला होता तो, इतर लेखांच्या साहाय्याने जुळवून व पूर्ण करून दिला आहे. दुसऱ्याचे वाचन कै. वि. का. राजवाडे यांनी प्रसिद्ध केले होते तसे देऊन त्याची चर्चा केली आहे. दुसऱ्या परिशिष्टातील शेवटचा क्र. ६३ चा लेख शिलाहारांचा नसून कोल्हापूरच्या शिलाहारांचा उच्छेद करणाऱ्या यादव नृपति सिंघणाचा आहे. त्याच्या योगे त्या शिलाहारांच्या एका उत्कृष्ट स्थापत्यकृतीवर महत्त्वाचा प्रकाश पडतो म्हणून तो येथे दिला आहे.

शिलाहारांच्या कोरीव लेखांप्रमाणे तत्कालीन साहित्याचाही परामर्श प्रस्तुत ग्रंथात घेतला आहे. त्यापैकी एक ग्रंथ–कर्णपार्य याचे 'नेमिनाथपुराण' हा – जुन्या कन्नड भाषेत आहे. त्याविषयी माहिती माझे मित्र डॉ. आ. ने. उपाध्ये यांनी पुरविली, याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

कोल्हापुरास मी आपल्या आयुष्याची पहिली अठरा वर्षे घालविली. पण त्या कालात शिलाहारांचे नावही कर्णपथावर आले नव्हते. संशोधनाने खुद्द कोल्हापुरातच असलेल्या शिलाहारकालीन दोन जैन मंदिरांची माहिती झाली ती प्रस्तुत ग्रंथात दिली आहे. कोल्हापूरपासून सुमारे ३५ मैलांवर शिलाहारकालीन कोप्पेश्वर नामक सुंदर शिवमंदिर आहे, याची खुद्द कोल्हापुरातील थोड्याच लोकांना माहिती असेल. त्या मंदिराचीहि सविस्तर माहिती मी ते स्वतः पाहून येथे दिली आहे. त्या मंदिराचे आणि तेथील अनेक शिल्पाकृतींचे फोटो माझे मित्र पं. वसन्तराव गाडगीळ यांच्या साहाय्याने पुण्याच्या 'सकाळ' या लोकप्रिय दैनिकाचे कार्यकारी संपादक श्रीयुत श्री. ग. मुणगेकर आणि फोटोग्राफर श्री. आप्पासाहेब थत्ते यांच्या कृपेने मला मिळाले. त्यांतील कांही मी प्रस्तुत ग्रंथात दिले आहेत. त्यांबद्दल मी या सर्व सुहृदांचे मनःपूर्वक आभार मानतो. पूर्वोक्त

तीन्ही मंदिरांची भूमिमानचित्रे (ground-plans) येथे प्रथमच प्रसिद्ध होत आहेत. त्यांबद्दल कोल्हापुरच्या पॉलिटेक्निक संस्थेतील प्राध्यापक श्री. व्ही. एन्. राजगुरु यांचा मी ऋणी आहे. त्यांनी अत्यंत कष्ट सोसून स्वतः खिद्रापुरला जाऊन तेथील देवालयाचे भूमिमानचित्र तयार केले, याबद्दलची कृतज्ञता शब्दांनी व्यक्त करता येत नाही.

प्रस्तुत ग्रंथासारखा विपुल संदर्भांनी भरलेला ग्रंथ तयार करण्यास सुसमृद्ध असे ग्रंथालय हाताशी असावे लागते. माझ्या कलचुरि आणि वाकाटक राजवंशांच्या कोरीव लेखांच्या संपादनास व त्यांच्या इतिहासाच्या लेखनास अशा संशोधनग्रंथांनी व संशोधनपर नियतकालिकांनी परिपूर्ण असलेल्या ग्रंथालयाची नितान्त आवश्यकता असल्याने नागपूर विद्यापीठाच्या संस्कृतविभागाचा वीस वर्षे प्रमुख असताना मी त्याच्या ग्रंथालयाकरिता इंग्लंड, अमेरिका, जर्मनी व भारताचे विविध प्रदेश यांत प्रसिद्ध झालेले ग्रंथ व नियतकालिके जमवून ते ग्रंथालय संशोधनास उपयुक्त केले होते. प्रस्तुत ग्रंथ लिहिताना मला त्याचा उपयोग झाला आहे. त्याबद्दल मी त्या विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचा अत्यंत आभारी आहे. पण गेल्या दोन वर्षांत त्या ग्रंथालयातील सर्व प्राच्यविद्याविषयक नियतकालिके नागपूर विद्यापीठाच्या एका विभागप्रमुखाने ग्रंथालयातून आपल्या विभागात नेल्यामुळे आणि ती कोणालाहि घरी नेण्यास परवानगी नसल्यामुळे माझ्यासारख्या संशोधकांची मोठी कुचंबणा झाली आहे. अनेक अर्ज–विनंत्या केल्यावर विद्यापीठाच्या ग्रंथालय – समितीने मला एका वेळी दोन व्हॉल्यूम नेण्याची खास परवानगी दिली. तिच्याबद्दल मी त्या समितीचा आभारी आहे. पण तेवढ्याने माझे काम भागण्यासारखे नव्हते. म्हणून नागपुरातील पुरातत्त्व विभागाचे ग्रंथालय, सेंट्रल म्यूझियम्चे ग्रंथालय, दिल्लीचे पुरातत्त्व विभागाचे ग्रंथालय, कलकत्त्याचे राष्ट्रीय ग्रंथालय, पुण्याच्या भांडारकर संशोधन संस्थेचे ग्रंथालय इत्यादिकांकडून जरूर ते ग्रंथ मागवून मला माझे काम पुरे करावे लागले. वास्तविक प्राच्यविद्याविषयक संशोधन नियतकालिके एका विभागात न ठेवता ती विद्यापीठाच्या सर्वसामान्य ग्रंथालयात (जनरल लायब्ररीत) ठेवली पाहिजेत. म्हणजे ती सर्व प्राच्यविद्यासंशोधकांस सहज उपलब्ध होऊ शकतील. पण हे विद्यापीठाच्या ग्रंथालय–समितीला पटेल तेव्हा खरे !

प्रस्तुत ग्रंथनिर्मितीत मला अनेकांचे साहाय्य झाले आहे. त्यांपैकी थोड्यांच्याच उपकारांचा निर्देश मागे आला आहे. त्यांशिवाय अनेकांनी मला उपकृत केले आहे. प्रस्तुत ग्रंथातील अनेक कोरीव लेख ज्यांनी प्रथम संपादिले त्यांचे आभार अगोदर मानले पाहिजेत. त्यांच्या कार्याचा पाया असल्यामुळे मी त्यावर ही लहानशी ग्रन्थ–कुटी उभारू शकलो. भारत शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे संचालक श्री. एम्. एन्. देशपांडे यांनी माझा इंग्रजी ग्रंथ कॉ. इ. इं. या विख्यात ग्रंथमालेकरिता स्वीकारला आणि त्याचे मराठी रूपांतर प्रकाशित करण्यास मला परवानगी दिली, याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. त्या विभागाने अंबरनाथ व खिद्रापूर येथील देवालयांचे फोटो पुरवून त्यांतून आवश्यक ते

प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली. तसेच साहाय्य मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स् म्यूझियम्चे विश्वस्त यांनीहि आपल्या बुलेटिन क्र. ९ मधील तीन आकृत्यांच्या बाबतीत केले. याबद्दल मी उभयतांचा आभारी आहे.

प्रस्तुत ग्रंथातील शुद्धलेखन मराठी महामंडळाने मान्य केलेल्या नियमांनुसार आहे. फक्त संस्कृत तत्सम शब्दांच्या शेवटचे ह्रस्व स्वर दीर्घ केले नाहीत. काही थोडे इंग्रजी शब्द, योग्य त्या मराठी शब्दांच्या अभावी, योजिले आहेत.

शेवटी, विदर्भ संशोधन मंडळाने हा ग्रन्थ आपल्या ग्रन्थमालेत समाविष्ट केला याबद्दल त्याचा मी अत्यंत आभारी आहे. एवढा विस्तृत ग्रंथ प्रसिद्ध करणे ज्याच्या उदार अनुदानाने त्या मंडळास शक्य झाले त्या महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाचे हार्दिक आभार मानले पाहिजेत. त्या मंडळाने आपल्या स्थापनेपासून विदर्भ संशोधन मंडळावर अशी कृपा सतत केली आहे. म्हणून त्या मंडळाला आतापर्यंत विविध विषयांवर जवळ जवळ तीस ग्रंथ प्रकाशित करता आले आहेत.

प्रस्तुत ग्रंथातील सुबक नकाशे श्री. प्र. भा. ओक यांनी काढून दिले, याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. माझ्या सध्याच्या अवस्थेमुळे हा ग्रंथ माझ्या हयातीत प्रसिद्ध होईल काय, याबद्दल माझे मन साशंक होते. पण श्रीनिवास मुद्रणालयाचे मालक श्री. श्या. श्री. बनहट्टी यांनी मोठ्या त्वरेने मुद्रणाचे काम करून तो अल्पावकाशात छापून दिला याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. अनवधानाने, दृष्टिमांद्याने व छपाईच्या घाईमुळे काही अशुद्धे राहिली आहेत. त्यांबद्दल वाचकांची क्षमा मागितली पाहिजे. ती अशुद्धे शुद्धिपत्रात दुरुस्त केली आहेत.

सरस्वतीच्या चरणी हा माझा बहुधा शेवटचाच ग्रंथपुष्पोपहार ठरेल, असे वाटते. मला दीर्घायुष्य व आरोग्य देऊन ज्याने माझ्या हातून झाली ती ग्रंथनिर्मिति करविली त्या जगन्नियंत्याला मनोभावे वंदन करून मी हे हृद्गत संपवितो.

नागपूर,
१ जून १९७४

वा. वि. मिराशी

खण्ड १

शिलाहार राजवंशाचा इतिहास

राजकीय इतिहास

प्रास्ताविक

कोरीव लेखांवरून शिलाहार वंशाच्या सहा शाखा होत्या आणि त्या महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशांच्या विविध भागांवर राज्य करीत होत्या, असे कळते.[१] त्यांपैकी तीन प्रमुख शाखांचा इतिहास प्रस्तुत ग्रंथात दिला आहे. त्या सर्व महाराष्ट्रात राज्य करीत होत्या. त्यांपैकी एकीच्या अमलाखाली ठाणे आणि कुलाबा जिल्ह्यांचा उत्तर कोकण हा प्रदेश होता. या प्रदेशात तत्कालीन रूढ समजुतीप्रमाणे १४०० गावांचा अंतर्भाव होत होता, असा निर्देश आढळतो.[२] प्रारंभी या प्रदेशाची राजधानी पुरी येथे होती. तिच्यावरून त्याला 'पुरीकोंकण' असे नाव पडले होते.[३] पुरीचा स्थलनिश्चय अद्यापि सर्वसंमत झाला नाही. कांहींच्या मते ही पुरी म्हणजे घारापुरी किंवा एलेफण्टा बेट होय.[४] तेथील शैव लेणीं सुप्रसिद्ध आहेत. पण या मताला उपोद्बलक असा कोरीव लेखांचा पुरावा अद्यापि मिळाला नाही.[५] शिवाय पुरी ही प्राचीन काळी मौर्य राजवंशाची राजधानी होती.[६] मौर्यांचे राज्य बरेच विस्तृत होते. त्यांची राजधानी होण्यास आवश्यक

---

१ ए. इं., व्हॉ. २७, पृ. ७०.

२ उदाहरणार्थ, भादान दानपत्र, क्र. ७, ओळ ५६; खारेपाटण ताम्रपट क्र. १९, ओ. ६४–६५ इत्यादि पाहा. त्यापूर्वीच्या भोगशक्तीच्या अंजनेरी ताम्रपटात उत्तर कोकणांतील गावांची संख्या चौदा हजार उल्लेखिली आहे. (कॉ. इ. इं., व्हॉ. ४, पृ. १४९ व १५७.)

३ शिलाहारांच्या अनेक लेखांत उत्तर कोकणाला 'पुरीकोंकण' किंवा 'पुरीप्रभृतिकोंकण' म्हटले आहे. उदाहरणार्थ, क्र. १, ओ. २; क्र. ९, ओ. २०–२१ इ. पाहा.

४ हीरानंद शास्त्रींचे *A Guide to Elephanta*, पृ. ८ इ. पाहा.

५ घारापुरी येथील मुख्य लेण्यातील टाक्यात सापडलेल्या एका तांब्याच्या घागरीवर संवत् ११४३ चा लेख आहे. तो हीरानंद शास्त्रींनी 'श्रीपुरीविन-(ष)येत्र' असा वाचला होता. त्यावरून घारापुरीचे नाव श्रीपुरी होते असे अनुमान त्यांनी केले होते, पण त्या लेखाचे खरे वाचन 'श्रीपुरीविन-(नि)र्गत्त(र्गत)' असे दिसते. त्यावरून निराळेच अनुमान निघते.

६ द्वितीय पुलकेशीच्या ऐहोळे शिलालेखात पुरीचे 'पश्चिम समुद्राची ऐश्वर्यसंपन्न नगरी' आणि 'मौर्यांची राजधानी' असे वर्णन आले आहे. ए. इं., व्हॉ ६, पृ. १ इ.

असा विस्तार घारापुरीचा नाही. शिवाय, घारापुरी ही मुंबईच्या पश्चिमेस सुमारे सात मैल अंतरावर समुद्रवेष्टित आहे. कोणत्याही राजधानीला सार्वकालिक आणि सहज उपलब्ध होणाऱ्या दळणवळणाची आवश्यकता असते. तसे दळणवळण घारापुरी येथे शक्य नाही. दुसरे मत पुरी ही पूर्वीच्या जंजिरा संस्थानातील राजपुरी होय, असे आहे.[१] हे ठिकाण कुलाबा जिल्ह्यात पश्चिम किनाऱ्यावरील एका मोठ्या खाडीच्या तोंडाशी आहे. तेथे शिलाहारांचे दोन ताम्रपट सापडले आहेत. पण मौर्यांचे राज्य उत्तर कोकणच्या ठाणे व कुलाबा जिल्ह्यांवर होते. राजपुरी ही त्यांची राजधानी होती, असे मानल्यास ती त्यांच्या राज्याच्या मध्यभागी नसून त्याच्या अगदी दक्षिण टोकाजवळ होती असे मानावे लागेल. कोणत्याहि प्रदेशाची राजधानी राज्यकारभाराच्या सोईकरिता सामान्यत: मध्यभागी असते. राजपुरीचे उत्तर कोकणातील स्थान तसे नाही. मौर्यांच्या पूर्वी उत्तर कोकणची राजधानी शूर्पारक (सध्याचे ठाणे जिल्ह्यातील सोपारा) येथे होती. तेथे अशोकाचे कांही प्रस्तर लेख सापडले आहेत.[२] सोपाऱ्याचे स्थान उत्तर कोकणच्या राजधानीला योग्य असे आहे. पुढे स्थानक (ठाणे) हे शिलाहारांच्या राजधानीचे स्थान बनले. तेहि तसेच मध्यवर्ती आहे. तेव्हा पुरीहि ठाणे जिल्ह्यातच असावी असा तर्क होतो. मौर्यांचा आतापर्यंत ज्ञात असलेला एकच एक शिलालेख ठाणे जिल्ह्यातच वाडे येथे सापडला आहे.[३] त्यावरूनहि वरील अनुमानाला पुष्टि मिळते. पुरातत्त्ववेत्ता कझेन्स याच्या मताप्रमाणे ठाणे जिल्ह्याच्या साष्टी भागातील मारोळ हे गाव पुरी असावे.[४] ऐहोळे शिलालेखात पुरीचे वर्णन द्वीप (बेट) रूपाने आले आहे.[५] मारोळ गाव समुद्रवेष्टित आहे, पण त्याचा उत्तरेचा आणि ईशान्येचा भाग पश्चिम किनाऱ्यालगत आहे म्हणून तेथे दळणवळणाची अडचण पडत नाही. मारोळ येथे अनेक देवळांचे अवशेष अद्यापि दृष्टीस पडतात. तथापि त्या प्रदेशाला 'पुरी' असे नाव होते, याविषयी पुरावा अद्यापि मिळाला नाही. म्हणून पुरीचा स्थलनिश्चय भावी संशोधनावर सोपविणे भाग आहे मौर्यांच्या कारकीर्दीनंतर पुरीचे राजकीय महत्त्व नष्ट झाले. उत्तर कोकणच्या शिलाहारांनी स्थानक येथे आपली राजधानी स्थापन केली. त्याचे उल्लेख अनेक कोरीव लेखांत व वाङ्मयात येतात. स्थानक म्हणजे ठाणे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण ठाणे हे होय.

---

१ *P. I. H. C.* (1940), pp. 86 f.

२ *C. I. I.*, Vol. I पाहा.

३ *Bom. Gaz.* (Old. Ed.), Vol. XIV, pp. 372–73.

४ Cousens, *Mediaeval Temples of the Deccan*, p. 81.

५ *Ep. Ind.*, Vol. VI, pp. 1 f.

शिलाहारांची दुसरी शाखा दक्षिण कोकणावर राज्य करीत होती. त्या प्रदेशात ७०० गावांचा अन्तर्भाव होता अशी परंपरागत समजूत होती.[१] त्याला सप्तकोंकण असेहि नाव होते.[२] त्यात गोवा प्रदेश आणि पूर्वीचे सावंतवाडी संस्थान आणि रत्नागिरी जिल्हा मिळून झालेला इरिडिगे प्रदेश अंतर्भूत होता. या शाखेच्या लेखात ती सिंहल प्रदेशावर राज्य करीत होती, असे वर्णन आढळते.[३] सिंहल याचा 'श्रीलंका' असा अर्थ कीलहॉर्नने केला होता; पण ही शाखा कधी काळी श्रीलंकेवर राज्य करीत होती यावर त्याचा विश्वास बसेना.[४] पण सिंहल हे गोव्याचे प्राचीन नाव होते. दगांवे येथील कोरीव लेखात म्हटले आहे की कदंब नृपति जयकेशीने लंकेश्वराचा पराभव केला होता.[५] याचा अर्थ त्याने गोव्याच्या राजाचा पाडाव केला, असा आहे. उत्तर कोकणच्या कांही शिलाहार राजांनी 'निःशंकलंकेश्वर' असे बिरुद धारण केले होते.[६] त्यातहि असाच अर्थ अभिप्रेत होता. उत्तर कोकण व कोल्हापूर येथील शिलाहार नृपति स्वतःचा 'तगरपुरपरमेश्वर' किंवा 'तगरपुरवराधीश्वर' असा निर्देश करून आपण मूळचे तगरचे (ओस्मानाबाद जिल्ह्यातील तेरचे), असे दर्शवीत असत. तसा निर्देश दक्षिण कोकणातील शिलाहार शाखेच्या लेखांत आढळत नाही. तथापि तेहि मूळचे तगरचेच असावे.

मागे सांगितल्याप्रमाणे ही शाखा प्रारंभी गोवा प्रदेशात उदयास आली. त्यावेळी तिची राजधानी गोवा प्रदेशातील चंद्रपूर (सध्याचे चांदोर) येथे होती.[७] नंतर तिने रत्नागिरी जिल्हा जिंकून बलिपत्तन येथे आपली राजधानी केली.[८]

---

१ Fleet, *Dyn. Kan. Dist.*, p. 282, n. 5 and p. 436.

२ *Ep. Ind.*, Vol. XIV, p. 254.

३ खारेपाटण ताम्रपट (क्र. ४१), ओ. २२–२३.

४ *Ep. Ind.*, Vol. VII, p. 294.

५ *J. B. B. R. A. S.*, Vol. IX, p. 266.

६ दिवेआगर ताम्रपट (क्र. १६), ओ. ४–५.

७ या वंशातील नंतरच्या ऐयप राजाने गोवा प्रदेश जिंकून घेतल्यावर स्वतःस चंद्रपुर येथे नारळाच्या पाण्याने अभिषेक करून घेतला होता. क्र. ४१, ओ. २६.

८ क्र. ४०, ओ. २९–३० यामध्ये त्याला बलिनगर असे म्हटले आहे. इतरत्र त्याचे बलिपत्तन असे नाव आढळते. क्र. ४०, ओ. १७; क्र. ४१, ओ. २५; क्र. ४२, ओ. १३ पाहा. या सर्व लेखांत सर्वत्र 'ब' बद्दल 'व' योजिला आहे. म्हणून त्या स्थानाचे नाव वलिपत्तन (किंवा वलिनगर) नसून बलिपत्तन (किंवा बलिनगर) होते, असे दिसते.

वराहमिहिराच्या बृहत्संहितेत या नगराचा 'बलदेवपत्तन' असा उल्लेख आहे.[१] टॉलेमी[२] व पेरिप्लस[३] यांमध्येहि याचा उल्लेख आढळतो. हे बलिपत्तन सध्याच्या रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण असावे. बार्नेटने ते मलबार जिल्ह्याच्या चित्रकळ तालुक्यातील बलिपत्तन असावे असे अनुमान केले आहे.[४] पण ते बरोबर वाटत नाही. तो प्रदेश दक्षिण कोकणच्या शिलाहारांच्या राज्यात कधीकाळी अंतर्भूत होत होता, याला पुरावा नाही. याच्या उलट खारेपाटण येथे त्या शाखेचा एक ताम्रपट सापडला आहे[५] आणि त्यात उल्लेखिलेली कांही गावे त्याजवळच्या प्रदेशात अद्यापि ओळखता येतात. म्हणून खारेपाटण ही दक्षिण कोकणच्या शिलाहारांची राजधानी असावी.

शिलाहारांची तिसरी शाखा दक्षिण महाराष्ट्राच्या कोल्हापूर, सातारा, सांगली व बेळगाव या जिल्ह्यांवर राज्य करीत होती. तिचे अनेक ताम्रपट वळयवाड,[६] वल्लवाड[७] किंवा वळवाड[८] येथील राजशिबिरातून दिले होते, असा त्यांत निर्देश आढळतो तेव्हा ती त्या शाखेची तत्कालीन राजधानी दिसते. तिच्या स्थलनिश्चयाविषयी अनेकांनी अनेक मते प्रदर्शित केली आहेत. कांहींच्या मते ती सातारा जिल्ह्यातील वाळवे,[९] तर इतर कांहींच्या मते ती कोल्हापूरच्या नैर्ऋत्येस सोळा मैलांवरचे वळवडे असावी.[१०] पण या शाखेचे बहुतेक लेख कोल्हापूर येथे व त्याच्या आसमंतात सापडले आहेत. तेव्हा कोल्हापूर (प्राचीन क्षुल्लकपुर[११]) येथे त्यांची राजधानी होती असे दिसते. वळवाड हे राजधानी जवळचे तत्कालीन

---

१ बृहत्संहिता, १४, १६.

२ टॉलेमी या नगराचे बलिपट्न असे नाव देऊन ते अरिआका (अपरान्त–कोकण) प्रदेशात सेमुल्ल (कुलाबा जिल्ह्यातील चौल) याप्रमाणे अन्तर्भूत होते, असे सांगतो. *Classical Accounts of India*, p. 365.

३ पेरिप्लस मध्ये याला 'पलइपटमअए' असे म्हटले असून त्याचा सेमिल्ल (चौल) बरोबर उल्लेख केला आहे.

४ *Ep. Ind.*, Vol. XIX, p. 32.

५ क्र. ४१.

६ क्र. ४६, ओ. ४३–४४.

७ क्र. ४८, ओ. २२.

८ क्र. ५३ ओ. १५.

९ *Ind. Cult.*, Vol. II, p. 418.

१० पूर्वोक्त.

११ क्र. ५४, ओ. २५. क्र. ४८, ओ. २५ मध्ये त्याला 'कोल्लापुर' म्हटले आहे.

राजांचे निवासस्थान असावे. कांहींच्या मते ते कोल्हापूरच्या नैर्ऋत्येस २७ मैलांवरचे वळवडे (ज्याला सध्या राधानगरी असे नाव प्राप्त झाले आहे ते) असावे.[१] पण हे ठिकाण कोल्हापूर पासून बरेच दूर आहे. कोल्हापूरच्या पूर्वेस वळिवडे नावाचे खेडे अद्यापि विद्यमान आहे ते राजशिबिराचे स्थान असण्याची जास्त शक्यता आहे. त्या ठिकाणी प्राचीन अवशेष नाहीत, असा आक्षेप या अनुमानाविरुद्ध कांहींनी घेतला आहे[२], पण त्यात तथ्य नाही. सर्वच राजधान्यांच्या ठिकाणी असे अवशेष आता आढळत नाहीत. शिवाय 'वळवाड येथे तत्कालीन राजे सुखसंवादात आपले मन रमवीत असता त्यांनी ती ती दाने दिली होती', असे अनेक ताम्रपटांत वर्णन आढळते. त्यावरून वळवाड येथे राजधानीजवळचे राजशिबिर होते असे दिसते. तेथे मोठाल्या इमारती बांधल्या नसाव्या. कांही कोरीव लेखांत तत्कालीन राजांचा मुक्काम खिळिगिळ[3], प्रनालक[४] किंवा पद्मनाल[५] या गिरिदुर्गावर असल्याचा उल्लेख आढळतो. हा गिरिदुर्ग (किल्ला) कोल्हापूरच्या वायव्येस बारा मैलांवरचा सध्याचा पन्हाळगड होय. डॉ. अ. स. अळतेकरांनी म्हटल्याप्रमाणे, पन्हाळा ही या शाखेची उन्हाळ्यातील, कोल्हापूर ही पावसाळ्यातील आणि वळवाड ही हिवाळ्यातील राजधानी असावी. बिल्हणाच्या 'विक्रमांकदेवचरिता'त करहाट (कऱ्हाड) ही तत्कालीन शिलाहार नृपतीची राजधानी होती व तेथे त्याची कन्या चन्द्रलेखा हिने चालुक्य सम्राट् षष्ठ विक्रमादित्य याला स्वयंवरात माळ घातली, असे वर्णन आले आहे[६]. त्यावरून कऱ्हाड ही या शाखेची राजधानी होती, असे अनुमान डॉ. फ्लीटने केले होते.[७] पण कऱ्हाड येथे शिलाहारांचे कोरीव लेख अद्यापि सापडले नाहीत. कऱ्हाड ही या शिलाहार शाखेची आरंभीची राजधानी असणे शक्य आहे. पण पुढे लौकरच ती उत्तर चालुक्यांच्या ताब्यात गेली आणि शिलाहारांना आपली राजधानी दक्षिणेस कोल्हापुरास हलवावी लागली, असे दिसते.

या तीनहि शाखा आपण विद्याधर नृपति जीमूतकेतु याचा पुत्र जीमूतवाहन— ज्याने गरुडाच्या तावडीत सापडलेल्या नागकुमार शंखचूडाला त्याच्या बदली स्वतःचा बलि देऊन मुक्त केले — त्याच्या वंशात उत्पन्न झालो, असा आपल्या

---

१ *Ep. Ind*, Vol. XXIII, p. 30
२ *Ibid.*, Vol. XXVII, p. 179
३ क्र. ४३, ओ. ३१–३२.
४ क्र. ५९, ओ. १.
५ क्र. ६०, ओ. ३१.
६ बिल्हणकृत 'विक्रमांकदेवचरित,' सर्ग ८, श्लो. २.
७ *Bomb. Gaz.* (old ed,), Vol. II, part ii. p. 546.

लेखात अभिमानाने उल्लेख करतात.[१] या प्रसंगामुळे या वंशाला शिलाहार '(गरुडाकरिता) शिलेवरील आहार' असे नाव पडले, अशी या राजवंशनामाची व्युत्पत्ति त्या लेखांत विवक्षित दिसते. शिलाहार छद्वैदेवाच्या सर्वात प्राचीन ताम्रपटात मात्र या वंशनामाची निराळीच व्युत्पत्ति दिली आहे. त्यात म्हटले आहे की परशुरामाच्या बाणाने त्रस्त झालेल्या पश्चिम समुद्राचे रक्षण सीलार नामक वीराने केले. म्हणून त्याच्या वंशजांना 'सीलार' असे नाव पडले.[२] पण ही आख्यायिका इतरत्र आढळत नाही. या राजवंशाचे नाव सीलार[३], शीलार[४], सियळार[५], शैलाहार[६] असे अनेक प्रकारे कोरीव लेखांत आढळते. त्याला 'शिलाहार' असे संस्कृत रूप दिल्यावर त्या वंशाच्या मूळ पुरुषाने शिलेवर बसून गरुडाला आत्मार्पण केल्याची कथा प्रचलित झालेली दिसते. मध्ययुगीन भारतीय लेखांत अनेक राजवंशांची उत्पत्ति प्राचीन काळच्या विख्यात वंशापासून (उ. कौरव, पांडव यांच्यापासून) किंवा व्यक्तीपासून (उ. लक्ष्मण, कर्ण इत्यादिकांपासून) झाली होती, असे वर्णन आढळते. तसाच हा प्रकार होय.

---

१ याची कथा पुढीलप्रमाणे आहे : गरुडाने वासुकीला आपल्या प्रजेतून एक एक सर्प देण्यास भाग पाडले. एके दिवशी शंखचूड नामक सर्पाची पाळी आली. त्याने एका शिलेवर बसून गरुडाच्या हल्ल्याची वाट पाहावयाची होती. जीमूतवाहन विद्याधर कुमाराला ते पाहून फार वाईट वाटले. त्याने शंखचूड गोकर्ण येथे भगवान् शिवाच्या दर्शनाला गेला असता त्याची जागा घेतली. तितक्यात गरुडाने तेथे येऊन त्याला भक्षणार्थ नेले. त्याला अर्धामुर्धा खाल्ल्यावर गरुडाला आपली चूक कळून आली. तेव्हा जीमूतवाहनाच्या पत्नीच्या प्रार्थनेवरून पार्वतीने त्याला जिवंत केले. गरुडाने तेव्हापासून सर्पांना न खाण्याचे ठरविले आणि त्यापूर्वी मारलेल्यांना जिवंत केले.

जीमूतवाहनाची कथा मूळच्या पैशाची भाषेतील 'बृहत्कथे'त होती. तो ग्रंथ आता उपलब्ध नाही. तथापि त्याची संस्कृत रूपांतरे – सोमदेवाचे 'कथासरित्सागर' (२२, १६–२५७; आणि ४०, ३–२०१) आणि 'बृहत्कथामञ्जरी' (४, ५०–१०८ आणि ९, ७६६–९३०) दोन ठिकाणी आली आहे. हे दोन्ही ग्रंथकार काश्मीरात अकराव्या शतकात होऊन गेले.

२ क्र. ४, ओ. २८–२९.

३ क्र. ९, ओ. ५.

४ क्र. ७, ओ. २१–२२.

५ क्र. ४३, ओ २–३.

६ क्र. ४५, ओ. २.

उत्तर कोकण आणि दक्षिण महाराष्ट्र या प्रदेशांत राज्य करणारे शिलाहार नृपति आपापल्या लेखात 'तगरपुरपरमेश्वर'[१] किंवा 'तगरपुरवराधीश्वर'[२] यासारख्या बिरुदाचा मोठ्या अभिमानाने उल्लेख करतात. यासारखी अन्य-नगरविषयक बिरुदे (उदाहरणार्थ, 'उज्जयिनीपुरवरेश्वर,' 'माहिष्मती-पुरवराधीश्वर') इतर राजवंशांच्या (उदा० गुप्त, कलचुरि यांच्या) कोरीव लेखांत आढळतात.[३] त्यांचा अर्थ, ते राजवंश त्या काळी त्या त्या नगरात राज्य करीत होते, असा करावयाचा नसून ते मूळचे त्या नगरांचे होत, एवढाच अर्थ विवक्षित असतो. तदनुसार हे शिलाहार राजे पूर्वी तगर नगरात राज्य करीत होते, असे दिसते. तगर नगराचा स्थलनिश्चय अनेकांनी अनेक प्रकारे केला होता. शिलाहारांच्या सर्वप्रथम प्रसिद्ध झालेल्या ताम्रपटाचे संपादक विल्फर्ड यांनी तगर म्हणजे देवगिरि किंवा दौलताबाद असावे, असे अनुमान केले होते. इतर कांहींनी पुढील समीकरणे सुचविली होती. पुणे जिल्ह्यातील जुन्नर (पं. भगवानलाल इंद्रजी),[४] बीड जिल्ह्यातील दारूर (रा. गो. भांडारकर),[५] पूर्वीच्या हैदराबाद संस्थानातील कनकगिरीच्या उत्तरेस असलेले तवंगीर (वि. का. राजवाडे),[६] आणि करवीर (डॉ. फ्लीट).[७] नंतर डॉ. फ्लीटने आपले मत बदलून तगर हे सध्याच्या मराठवाडा विभागाच्या ओस्मानाबाद जिल्ह्यातील तेर गाव होय, असे सप्रमाण सिद्ध केले.[८] दक्षिण भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील नागार्जुनकोंड, विणुकोंड, वेंगी यांसारख्या नगरांपासून पश्चिमेस भडोच (प्राचीन बॅरिगाझा) आणि

---

१ हे बिरुद उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या लेखांत येते.

२ हे बिरुद सामान्यतः कोल्हापुर, विजापुर आणि अक्कलकोट येथील शिलाहारांच्या लेखांत येते. इतर शाखांची बिरुदे किंचित् भिन्न आहेत. उदाहरणार्थ, 'तगरनगराधीश्वर (एलमेल शाखा), तगरपुरवरेश्वर (कर्नूल शाखा). *Ep. Ind.*, Vol. XXVII, p. 70, n. 9.

३ 'उज्जयिनीपुरवरेश्वर' हे दक्षिणेतल्या गुप्तांच्या आणि 'कालञ्जरपुरवराधीश्वर' हे कलचुरींच्या लेखांत आढळते.

४ *Ep. Ind.*, Vol. V, p. 24; *J. B. B. R. A. S*, Vol. XIII (Old Series), p. 9.

५ *Bom. Gaz.*, Vol. I, part ii (old ed.), p. 174.

६ इतिहास आणि ऐतिहासिक, व्हॉ. २, अंक ४, पृ. २५७.

७ *Bom. Gaz.*, Vol. I, pt. ii, (old ed.), p. 540, n. तगर आणि करवीर ही दोन्ही एकाच फुलाची नावे आहेत आणि करवीर कोल्हापूरचे सध्या प्रचलित असलेले दुसरे नाव आहे, यावर डॉ. फ्लीटचे हे समीकरण आधारलेले होते.

८ *J. R. A. S.* (1901), pp. 539 f.

उत्तरेस उज्जयिनी यांना जोडणाऱ्या मार्गांवरील तगर ही, प्रतिष्ठान (पैठण) आणि नाशिक यांप्रमाणे, एक प्रमुख बाजारपेठ होती. टॉलेमी आणि पेरिप्लस यांमध्ये तगरचा उल्लेख आहे. पण त्यांनी निर्दिष्ट केलेल्या दिशा व अंतरे चुकली आहेत. टॉलेमीने तगर हे बॅरिगाझा (भडोच) च्या ईशान्येस आहे, असे म्हटले आहे[१] तर पेरिप्लस-मध्ये ते पैठणपासून दहा दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावर आहे, असा निर्देश आहे.[२] पैठणपासून तेरचे अंतर ९६ मैलांचे आहे. पूर्वनिर्दिष्ट ग्रीक प्रवाश्यांनी भडोच व पैठणपासून तगरची दिशा सांगताना चुका केल्या आहेत. तगर हे सध्याचे तेर होय, हे आता सर्वमान्य झाले आहे. तेर येथील जुनी देवालये व कोरीव लेख, तसेच तेथे अलीकडे केलेले उत्खनन[३] यांमुळे त्या मताचे निर्विवाद समर्थन झाले आहे. तेर येथे सध्या अर्धवर्तुलाकृति पृष्ठभागाचे (apsidal) त्रिविक्रम-मंदिर विद्यमान आहे, ते मूळचे ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकातले बौद्ध चैत्य असावे, असा तर्क आहे. दुसरे एक उत्तरेश्वराचे मंदिर, गर्भगृह, मंडप आणि अर्धमंडप यांनी युक्त असे, तेथे आहे. ते ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकाइतके प्राचीन असावे. तेर येथे संस्कृत, कन्नड आणि मराठी भाषेतील ख्रिस्तोत्तर अकरा ते चौदा, या शतकांतील लेख सापडले आहेत. तेथे केलेल्या उत्खननात ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकापर्यंतच्या कालातील मातीच्या भांड्यांचे तुकडे, मृण्मयमूर्ति आणि नाणी मिळाली आहेत.[४] अलीकडे तर मराठवाडा विभागात ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकाच्या ब्राह्मी लिपीत 'तगर' हा लेख असलेले अगदी लहान आकाराचे तांब्याचे नाणे सापडले आहे.[५] या सर्व पुराव्यावरून टॉलेमी व पेरिप्लस यांच्या काळी तेर हे अत्यंत भरभराटीत असलेले नगर होते आणि तेच प्राचीन तगर होय, याविषयी संशय राहत नाही.

वर दाखविल्याप्रमाणे ही शिलाहार घराणी प्रस्तुत ग्रंथातील कोरीव लेखांत आपण मूळचे तगर येथील, असे सांगतात. याला वाङ्मयाचाहि पुरावा आहे. ख्रिस्तोत्तर दहाव्या शतकातील हरिषेणाचा 'बृहत्कथाकोश'[६] हा संस्कृत ग्रंथ आणि अकराव्या शतकातील 'करकंडचरिउ' हे अपभ्रंश भाषेतील काव्य[७] यांमध्ये अंग देशचा राजा करकंड याच्याविषयी पुढील कथा आली आहे.

---

१ R. C. Majumdar, *Classical Accounts of India*, p. 365.
२ *Ibid.*, p. 304.
३ S. N. Chapekar, *Report of the Excavations at Ter, p. 54.*
४ पूर्वोक्त.
५ *J. N. S. I.*, Vol. XXXIII, pp. 37 f. प्लेट, पृ. १ पाहा.
६ बृहत्कथाकोश, ५६, श्लो. ३४० इ.
७ करकंडचरिउ, परिच्छेद, ४ व ५.

उत्तरेतील आपले राज्य सुप्रतिष्ठित केल्यावर करकण्डने दक्षिण दिग्विजयाकरिता प्रयाण केले. देश जिंकता जिंकता तो तेरपुर किंवा तेरापुर येथे आला. तेव्हा त्याला जवळच्या टेकडीत एक आश्चर्यजनक लेणे असल्याची माहिती मिळाली. तेथे गेल्यावर त्या लेण्यात त्याला पार्श्वनाथ तीर्थंकराची मूर्ति दिसली. टेकडीच्या माथ्यावर वारुळात त्याच तीर्थंकराची आणखी एक मूर्ति त्याला आढळली.[1] ती त्याने खालच्या लेण्यात आणून ठेवली. तिच्याविषयी चौकशी करिता त्यास समजले की हिमालयातील प्रदेशातून नील आणि महानील या विद्याधरांना त्यांच्या शत्रूंनी हद्दपार केल्यावर ते तेरपुर येथे आले होते. तेथे एका जैन मुनीने त्यांना जैनधर्माची दीक्षा दिली. तेथील पर्वतावरील लेणे त्यांनी खोदवून त्यांत पार्श्वनाथाच्या मूर्तीची प्रतिष्ठा केली. नंतर करकंडाने स्वतः दोन[2] (किंवा तीन)[3] लेणी त्याच टेकडीवर आपण स्वतः, आपली राणी आणि पुत्र, यांच्या नावांनी खोदविली.

करकंडविषयक या कथेला ऐतिहासिक आधार असावा. हरिषेण आणि कनकामर यांनी वर्णिलेली लेणी तेरच्या नैर्ऋत्येस बारा मैलांवरच्या धाराशिव (सध्याच्या ओस्मानाबाद) गावाजवळ आहेत. तेथील टेकडीवर आता सहा जैन लेणी आहेत – त्यांपैकी चार एका दिशेस आणि दोन त्यांच्या विरुद्ध दिशेस आहेत. त्यांपैकी क्र. २ चे लेणे महत्त्वाचे, पण सध्या बरेचसे जीर्णावस्थेत आहे. त्याची रचना अजंटा येथील क्र. १६ व १७ या लेण्यांसारखी आहे. समोरचा व्हरांडा ७८ फूट लांब व १० फूट ४ इंच रुंद होता. त्याचे छप्पर आता नष्ट झाले आहे. तथापि अवशिष्ट असलेल्या अर्धस्तंभांवरून ते चौकोनी खांबांवर आधारले होते आणि त्यांच्या ब्रॅकेट्स्वर आणि वरील पट्टीवर उत्कृष्ट खोदकाम केले होते, असे दिसते. त्यांत जैन तीर्थंकरांच्या मूर्ति व चैत्य गवाक्षे कोरली होती. आतील मंडप (हॉल) ८२ फूट लांब व ७९ ते ८५ फूट रुंद असून त्यात बत्तीस खांब आहेत. त्यांपैकी २० खांबांनी बाहेरचा आणि १२ खांबांनी आतील चौक झाला आहे. गर्भगृहाच्या समोरचे चार खांब वाटोळे असून त्यांचे शीर्षभाग चपटचा गिरद्यांच्या आकाराचे आहेत. हॉलच्या दोन्ही बाजूंच्या व मागल्या भिंतींत मुनींकरिता २२ खोल्या खोदल्या आहेत. पाठीमागच्या गर्भगृहात सिंहासनावर पार्श्वनाथाची मूर्ति ध्यानमुद्रेत कोरली असून त्याच्या डोक्यावर सात फणांचा नाग आहे. प्रत्येक फणेवर लहानसा किरीट आहे. सिंहासनाच्या पुढील भागावर सध्या भग्न झालेले, कडेवर उभे असलेले चक्र

---

१ ही पार्श्वनाथाची मोकळी मूर्ति सध्या क्र. २ च्या लेण्यातील टांके असलेल्या खोलीत आहे.

२ करकंडचरिउ, ५, १३.

३ बृहत्कथाकोश, ५६, ४१४.

आणि त्याच्या दोन्ही बाजूंस दोन दोन हरिण कोरले आहेत. सिंहासनाच्या दोन्ही बाजूंस एक एक शार्दूल, चामरधारी सेवक व मालाधारी विद्याधर दिसतात. [१]

क्रमांक ३ च्या लेण्यामध्येहि यासारख्याच पार्श्वनाथ तीर्थंकराच्या सिंहासनावर धर्मचक्र कोरले आहे. बर्जेसच्या मताप्रमाणे ही लेणी जैन धर्माची असून त्यांचा काल सातव्या शतकाचा मध्य हा असावा. [२] पूर्वोक्त जैन ग्रंथकारांनी तेरापूर-जवळची म्हणून जी लेणी वर्णिली आहेत ती हीच होत, यात संशय नाही.

पूर्वोक्त जैन ग्रंथांत दिलेले सांप्रदायिक वर्णन सर्वच्या सर्व खरे मानले नाही तरी क्र. २ चे लेणे विद्याधरांनी कोरविले होते, या विधानाला ऐतिहासिक आधार असावा. शिलाहार नृपति आपण विद्याधर जीमूतवाहन याच्या वंशात जन्मलो, असे मानीत असत. तेव्हा त्यांनी ख्रिस्तोत्तर सातव्या शतकात पूर्वकालीन चालुक्यांचे मांडलिक म्हणून तगर येथे राज्य करीत असता ही लेणी खोदविली असावी. या बाबतीत लक्षणीय गोष्ट ही की उत्तर कोकणच्या शिलाहारांचा मांडलिक चामुंड-राज स्वतःचे ' तगरपुरपरमेश्वर ' असे वर्णन करून ' त्रिभुवननील ' या बिरुदाचा उल्लेख आपल्या ताम्रपटात मोठ्या अभिमानाने करतो. त्याच ताम्रपटात त्याच्या पित्याच्या ' आहवनील ' या बिरुदाचा उल्लेख आला आहे. [३] या बिरुदांत तगर येथे प्राचीन काळी नील आणि महानील या विद्याधर नृपतींनी राज्य केले, या परंपरागत समजुतीचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

---

१ प्लेट, पृ. १ पाहा. डॉ. म. क्रु. ढवळीकर यांनी अलीकडे क्र. २ चे लेणे बौद्ध-धर्माचे होते असे प्रतिपादिले आहे. त्यांतील विशाल मूर्ति बुद्धाची आहे असे ते मानतात व त्याचे प्रमाण म्हणून त्या मूर्तीच्या सिंहासनावरील धर्मचक्र व दोन्ही बाजूंच्या हरिणांचा निर्देश करतात. त्या मूर्तीच्या डोकीवर नागाच्या फणा आहेत खऱ्या, पण तशा फणा नागार्जुनकोंड येथील अनेक बुद्ध मूर्तींवर आहेत, असे ते सांगतात. या लेण्याचे अजंटा येथील क्र. १६ व १७ या महायान लेण्यांशी साम्य लक्षात घेता ते लेणे ख्रिस्तोत्तर पांचव्या शतकातील असावे असे त्यांचे अनुमान आहे (*J. A. S. Bom.* (New Series) Vol. XIX-XX, pp. 183 and *J. I. H.*, Vol. XCVI, pp. 403 f.). पण त्यांची प्रमाणे सयुक्तिक वाटत नाहीत. जैन तीर्थंकरांच्या आसनांवर अनेक ठिकाणी धर्मचक्र आढळते. नाग हे पार्श्वनाथाचे विशिष्ट लांछन आहे. मुचलिंदाच्या कथेच्या अनुषंगाने मात्र नागाच्या फणा बुद्धमूर्तीवर आढळतात. याविषयी सविस्तर विवेचनाकरिता विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिक १९७१ मधील आमचा लेख (पृ. ३७–५२) पाहा.

२ *A. S. W. I.*, Vol. III, p. 11.

३ क्र. १२, ओ. ९ आणि ३०.

पूर्वकालीन चालुक्यांच्या पतनानंतर कांही महत्त्वाकांक्षी शिलाहार कुमारांनी पश्चिमेस आणि दक्षिणेस जाऊन राष्ट्रकूटांच्या आधिपत्याखाली आपापली राज्ये स्थापिली, असे दिसते. दक्षिण कोकणातील शिलाहार राज्याचा संस्थापक सणफुल्ल याला कृष्ण राजाच्या कृपेने राज्य मिळाले, असा उल्लेख त्या शिलाहारांच्या ताम्र-पटांत आला आहे.[१] हा कृष्ण म्हणजे राष्ट्रकूटवंशी प्रथम कृष्ण (सु. ७५८–७७३) होय. त्यानंतर थोडचा काळाने उत्तर कोकणच्या शिलाहार शाखेचा संस्थापक प्रथम कपर्दी हा राष्ट्रकूट सम्राट् तृतीय गोविंद (सन ७९३–८१४) याच्या कृपेने उदयास आला असावा.[२] त्यानंतर तगरच्या राज्याचे काय झाले ते माहीत नाही. बहुधा राष्ट्रकूटांनी ते खालसा केले असावे.

कोल्हापूरचे शिलाहार त्यानंतर बऱ्याच काळाने उदयास आलेले दिसतात. त्या शाखेचा मूळ पुरुष गोमन्थ या गिरिदुर्गाचा अधिपति आणि गंग सामंत पेर्मांडी याचा मामा होता असे त्यांच्या एका ताम्रपटात म्हटले आहे.[३] हा गोमंथ पर्वत कर्नाटक राज्याच्या शिमोगा जिल्ह्यात आहे. कोल्हापूरच्या शिलाहारांचे पूर्वज तगर नगराहून निघाल्यावर कांही काळ कर्नाटक राज्याच्या शिमोगा जिल्ह्यात राज्य करीत होते, असे दिसते. नंतर गंग सामंत पेर्मांडी ऊर्फ मारसिंह याच्या किंवा त्याच्या वंशजांच्या साहाय्याने त्यांनी सातारा – कोल्हापुर या प्रदेशात आपले राज्य स्थापले असावे.

शिलाहार कन्नडभाषी होते. त्यांचे मूलस्थान तगर हे प्राचीन काळी कन्नड प्रदेशात अंतर्भूत होत होते. तगरची (तेरची) भाषा गेल्या सात आठशे वर्षांत मराठी झाली असून सध्या त्याचा अंतर्भाव मराठवाडचात झाला आहे. तथापि शिलाहार हे कन्नडभाषी होते हे त्यांच्या मंत्र्यांची व अधिकाऱ्यांची नावे ' ऐय '– पदान्त आढळतात[४] यावरूनच नव्हे तर त्यांच्या स्वतःच्या कन्नड बिरुदांवरूनहि स्पष्ट दिसते. उदाहरणार्थ, शिलाहारांची पुढील बिरुदे पाहा – ' मलगलगण्ड ', ' गण्डरगण्ड ', ' गण्डवङ्कर ', ' नन्निसमुद्र ', ' विल्लविडेङ्ग ', ' मरुवक्कसर्प ', ' इडुवरादित्य ', ' अय्यनसिंग '[५] इत्यादि. ही बिरुदे अरिकेसरीच्या (ख्रिस्तोत्तर

---

१ क्र. ४१, ओ. २४.

२ प्रथम कपर्दीचा पुत्र पुल्लशक्ति याचा कान्हेरी येथील लेण्यातील लेख शक संवत् ७६५ (इ. स. ८४३–४४) चा आहे. त्यावरून तो कपर्दी तृतीय गोविंदाच्या कारकीर्दीअखेर उदयास आला असावा.

३ क्र. ४६, ओ. ७.

४ क्र. ८ (पृ. ६०) मधील ' वासपैय ' आणि ' वाधियपैय ' आणि क्र. ९ (ओ. २२) मधील ' नागणैय ' व ' सीहपैय ' ही नावे पाहा.

५ क्र. ५, ओ. ४९–५०; क्र. ७, ओ. ४४–४५ इत्यादि.

१०२५) कारकीर्दीपर्यंत उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या कोरीव लेखांत आढळतात.[१] त्या प्रदेशातील जनसामान्यांची भाषा मराठी होती. पहिला मराठी कोरीव लेख (दिवे आगर ताम्रपट) हा शक संवत् ९८२ (इ. स. १०६०) इतका प्राचीन असला तरी शक संवत् १०७० (सन ११४८) च्या रांजली लेखापर्यंत[२] कोरीव लेखात मराठी शब्द सामान्यतः आढळत नाहीत. त्यानंतर मात्र कोरीव लेखांचा सांचा संस्कृतातल्या सारखा चालू असला तरी त्यांत मराठी शब्द व वाक्ये मधून मधून दृष्टीस पडतात,[३] तथापि शिलाहारांच्या लेखांत मराठीचे विकसित रूप दिसत नाही.

कोल्हापूर प्रदेशातील सामान्य लोकांची भाषा कन्नड होती, हे तत्कालीन शिलाहार नृपतींच्या बिरुदांवरूनच नव्हे तर त्या भाषेत आरंभापासून अखेरपर्यंत लिहिलेल्या अनेक लहान[४] मोठ्या[५] कोरीव लेखांवरून स्पष्ट दिसते.

दक्षिण कोकणच्या शिलाहारांचीहि भाषा कन्नडच असावी, तथापि त्यांचे फारच थोडे लेख सांपडले आहेत आणि ते सर्व संस्कृतमध्ये आहेत. म्हणून त्यांत त्यांची कन्नड बिरुदे आढळत नाहीत. तथापि त्यांतहि 'हडप' सारखे कन्नड शब्द क्वचित् दिसतात.

उत्तर कोकणात सेंद्रक,[६] चालुक्य[७] यांसारख्या कन्नडभाषी अधिपतींचा अंमल दीर्घ काळ चालू असल्यामुळे तेथे अनेक कन्नड संज्ञा प्रचलित झाल्या असाव्या.[८] त्यांतील 'हंजमन', 'नगर' यांसारख्या कांही शिलाहारांच्या लेखांत आढळतात. त्यांनी विद्वानांना दीर्घ काळ चकविले होते.[९] अगदी अलीकडे त्यांचे कन्नड स्वरूप ज्ञात झाल्यावर त्यांचा खरा अर्थ लागला आहे.[१०]

---

१ ती अरिकेसरीच्या (क्र. ८ च्या) ठाणे ताम्रपटानंतर आढळत नाहीत.
२ "रांजलीचा आरामु" (क्र. २४, ओ. ९) पाहा.
३ 'ब्राह्मणां गृहदेणे न गेहावें' (क्र. २६, ओ. ७) पाहा.
४ खिद्रापुर लेख (क्र. ५७) पाहा. ५ क्र. ४९, ५०, ५२ इ.
६ *C. I. I.*, Vol. IV, pp. 110 f. ७ *Ibid.*, Vol. IV, pp. 123 f.
८ उदाहरणार्थ, अरब मांडलिक सुगतिप याच्या चिंचणी ताम्रपटातील 'हंयमन' (*Ep. Ind.*, Vol. XXXII, p. 53) हा शब्द पाहा.
९ फ्लीटला कन्नड भाषेचे चांगले ज्ञान होते. पण त्यानेहि इतरांप्रमाणे 'हंजमान' हे संजानचे दुसरे नाव आणि 'नगर' हे 'शहर' असे मानले होते. *Ep. Ind.*, Vol XII, pp. 258 f.
१० *Ibid.*, Vol. XXXIV, p. 292.

उत्तर कोकणचे शिलाहार

उत्तर कोकणचे शिलाहार राष्ट्रकूटांचे मांडलिक म्हणून उदयास आले. त्यांच्यापूर्वी उत्तर कोकणांत बदामीच्या चालुक्यांचे राज्य होते. ऐहोळे शिलालेखात वर्णिले आहे की द्वितीय पुलकेशीने मौर्यांची राजधानी आणि पश्चिम समुद्राची जणू राजलक्ष्मी अशी जी पुरी नगरी तिला आपल्या शेकडो जहाजांनी वेढा घालून ती काबीज केली. त्यापूर्वी तेथे माहिष्मतीच्या कलचुरींचे मांडलिक म्हणून मौर्यांचा अंमल होता. त्यांचा एकच कोरीव लेख ठाणे जिल्ह्यातील वाडे येथे सापडला आहे.[१] तो मौर्य नृपति सुकेतुवर्मन् याच्या कारकीर्दीतील असून त्यात कुमारदत्ताचा पुत्र सिंहदत्त याने कोटीश्वर नामक शिवालय बांधल्याचा उल्लेख आहे.

उत्तर कोकण जिंकल्यावर पुलकेशीने ते आपल्या राज्यास जोडलेले दिसते. ते बहुधा त्याच्या साक्षात् अमलाखाली होते. त्याची मुख्य राजधानी विजापुर जिल्ह्यात बदामी (प्राचीन वातापिपुरी) येथे होती, पण त्याचे साम्राज्य उत्तरेस पसरल्याने त्याने नाशिक येथे आपली दुसरी राजधानी केलेली दिसते. त्याच्या कारकीर्दीत आलेला चिनी यात्रेकरू ह्यूएनत्संग त्याला 'महाराष्ट्राचा राजा' म्हणतो. त्याने त्याची भेट बहुधा नाशिक येथे घेतली असावी. त्याने त्याच्या राजधानीच्या स्थानाचे जे वर्णन लिहून ठेवले आहे ते नाशिकला जुळते, असे डॉ. फ्लीटने दाखविले आहे.

पुलकेशीचा पुत्र प्रथम विक्रमादित्य याने आपला धाकटा भाऊ जयसिंह धराश्रय यास नाशिक जिल्ह्याचा अधिपति केले. त्याचा कलचुरि संवत् ४०४ (इ. स. ६६३)चा ताम्रपट त्या जिल्ह्यात सापडला आहे[२]. पुलकेशीने सेंद्रक नामक आपल्या मांडलिकांना दक्षिण गुजराथचे अधिपति केले होते. सेंद्रकांच्या तीन पिढ्यांनी – भानुशक्ति ऊर्फ निकुम्भ, त्याचा पुत्र आदित्यशक्ति आणि त्याचा पुत्र अल्लशक्ति यांनी – दक्षिण गुजराथमध्ये राज्य केले.[३] अल्लशक्तीच्या कारकीर्दीत सौराष्ट्रातील वलभीचा मैत्रक नृपति वज्रट (तृतीय शीलादित्य) याने उत्तर गुजराथवर स्वारी केली[४]. तेव्हा त्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या चालुक्यांच्या

---

१ *Bom. Gaz.* (old ed.), Vol. XIV, (Ṯhāṇā District), pp. 372 - 373.

२ *C. I. I.*, Vol. IV, pp. 127 f.

३ *Ibid.*, Vol. IV, pp. 110 - 122.

४ *Ibid.*, Introd., pp. ix, f.

मांडलिकाने साहाय्याकरिता चालुक्य सम्राट् प्रथम विक्रमादित्याची प्रार्थना केली. तेव्हा त्याने नाशिक येथे राज्य करणाऱ्या जयसिंहाला त्याच्या साहाय्यार्थ जाण्याची आज्ञा केली. जयसिंहाने आक्रमकांचा पाडाव करून मोठा विजय मिळविला. त्याचा उल्लेख चालुक्यांचा एक अद्वितीय विजय म्हणून त्यांचे प्रतिस्पर्धी आणि उत्तराधिकारी राष्ट्रकूट यांच्याहि ताम्रपटांत येतो[१]. या विजयानंतर विक्रमादित्याने सेंद्रकांची दक्षिण गुजराथ मधून उचलबांगडी करून तो प्रदेश जयसिंहाच्या ताब्यात दिला. त्याने त्यावर आपला ज्येष्ठ पुत्र श्र्याश्रय शीलादित्य याची नेमणूक केली. त्याचे सन ६७१ व ६९२ चे दोन ताम्रपट दक्षिण गुजराथ मध्ये सापडले आहेत त्यांत त्याने केलेल्या त्या प्रदेशांतील ग्रामदानांचा उल्लेख आहे[२].

विक्रमादित्याने हरिश्चन्द्रवंशी स्वामिचन्द्र याच्यावर प्रेम करून त्याला उत्तर कोकणचा अधिपति नेमले होते. त्याच्या वंशजाच्या ताम्रपटांत त्याला १४००० गांवे असलेल्या समग्र पुरी–कोंकण प्रदेशाचा अधिपति म्हटले आहे[३]. जयसिंह धराश्रयाच्या मृत्यूनंतर स्वामिचन्द्राचा नातू भोगशक्ति याला उत्तर कोकणाप्रमाणे नाशिक व अहमदनगर हे जिल्हेहि मिळालेले दिसतात. अहमदनगर जिल्ह्यातील जुनी लेणी असलेल्या पर्वताला हरिश्चन्द्रगड असे नाव पडले आहे ते या वंशांतील राजांवरूनच पडले असावे; कारण ते राजे आपण हरिश्चन्द्राच्या वंशांत जन्मलो, असे आपल्या ताम्रपटांत सांगतात. भोगशक्तीचा अंजनेरी (नाशिक जिल्हा) ताम्रपट कलचुरि संवत् ४६१ (इ. स. ७१०) चा आहे. त्यात कुलाबा जिल्ह्याच्या कांही गांवातील लोकांवर अंजनेरीजवळच्या गावातील देवाच्या अर्चनेकरिता कर लावल्याचा उल्लेख आहे[४].

जयसिंहाचा धाकटा मुलगा मंगलरस हा उत्तर कोकणातील ठाणे जिल्ह्यात राज्य करीत होता. त्याचे तीन ताम्रपट सापडले आहेत. त्यांपैकी आरंभीचा शक संवत् ६१३ (इ. स. ६९१)चा ठाणे जिल्ह्यातील मानोर येथे सापडला असून त्यांत पालघर तालुक्यातील मानपुर (सध्याचे मानोर) येथील सूर्यमंदिराला दिलेल्या दानाचा उल्लेख आहे.[५] दुसरा ताम्रपट दक्षिण गुजराथच्या सुरत जिल्ह्यातील बलसड येथे सापडला असला तरी तो शक संवत् ६५३ (इ स. ७३१–३२) मध्ये दिला होता[६] म्हणून तो उत्तर कोकणातीलच

१ See e. g. *Ep. Ind.*, Vol. XXIII, p. 14.
२ *C. I. I.*, Vol. IV, pp. 123 f.
३ *Ibid.*, Vol. IV, p. 149.
४ पूर्वोक्त.
५ *Ep. Ind.*, Vol. XXVIII, pp. 17 f.
६ *J. B. B. R. A. S.*, Vol. XVI, pp. 5 f.

असावा. कारण गुजराथेत त्या काळी कलचुरि संवत् प्रचलित होता. तिसरा ताम्रपट दूरवर कच्छमध्ये सापडला असला[१] तरी तो मूळचा उत्तर कोकणातील, यात संशय नाही. कारण तोहि शक संवताच्याच ६५३ (इ. स. ७३१) या वर्षी दिला होता. त्यात मंगलरसाने श्रीपुर (मानोरच्या पश्चिमेचे सध्याचे शिरगाव) येथून दिलेल्या दानाचा निर्देश आहे. मंगलरसाने आपल्या नावाने मंगलपुरी नामक नगर स्थापून तेथे आपली राजधानी स्थापिली होती. हे ठिकाण ठाणे जिल्ह्याच्या वाडे तालुक्यातील मागोठाण (मंगलस्थान) असावे.

मंगलरसाने आपला कच्छ ताम्रपट सन ७३१ मध्ये दिल्यानंतर थोड्याच काळाने राष्ट्रकूटसाम्राज्यसंस्थापक दंतिदुर्ग याने उत्तर कोंकण जिंकले असावे. शक संवत् ६७१ (इ. स. ७४९) च्या त्याच्या मानोर ताम्रपटात[२] श्रीपुर (पूर्वोक्त शिरगाव) येथील देवालयाला त्याने तंबसाहिका (मानोरजवळचे तमसाही) गाव दिल्याचा निर्देश आहे. त्या काळात उत्तर कोकण दन्तिदुर्गाच्या स्वतःच्या अमलाखाली होते असे दिसते. त्याने तेथील कारभार पाहण्याकरिता अनिरुद्ध नामक अधिकाऱ्याची नेमणूक केली होती.

यानंतर उत्तर कोकण शिलाहार मांडलिक प्रथम कपर्दी याच्या अमलाखाली आले[3]. त्याने राष्ट्रकूट नृपति तृतीय गोविंद याला उत्तर कोकणातल्या राज्यविस्तारात मदत केली असावी. तिच्या मोबदल्यात त्याला हा प्रदेश मिळालेला दिसतो. त्याच्या काळचा कोरीव लेख अद्यापि सापडला नाही, पण तो या शिलाहार शाखेचा संस्थापक होता हे उत्तर कोकणाला 'कपर्दिद्वीप' किंवा 'कवडीद्वीप' असे नाव पडले[४], यावरून स्पष्ट दिसते.

या शाखेची राजधानी स्थानक (ठाणे) येथे होती. कांही विद्वानांच्या मतें पुरी ही या शिलाहारांची दुसरी राजधानी असावी; कारण या शाखेतील दुसरा राजा पुल्लशक्ति याला कान्हेरी लेखात 'पुरीप्रभृति समग्र कोकणाचा अधिपति' म्हटले आहे. याला उपोद्बलक असें दुसरेहि प्रमाण देण्यात येते की उत्तरकालीन

---

१ *J. O. I.*, Vol. IX, pp. 141 f.

२ *Studies in Indology*, Vol. II, pp. 10. f.

३ प्रथम कपर्दी याच्या काळचा लेख सापडला नाही, पण त्याचा पुत्र व उत्तराधिकारी पुल्लशक्ति याचा कान्हेरी लेण्यातील लेख (क्र. १) शक संवत् ७६५ (सन ८४३) चा आहे. त्यावरून हा कपर्दी सु. सन ८०० – ८२५ या काळात होऊन गेला असावा.

४ *Ep. Ind.*, Vol. XIII, p. 298.

चालुक्य अधिपति सत्याश्रय याने स्थानक (ठाणे) राजधानीवर आक्रमण केले त्यावेळी शिलाहार राजा अपराजित हा तेथून निसटून पुरी येथे आश्रय घेता झाला, असे रण्णाच्या 'गदायुद्धा'त म्हटले आहे.[१] पण पुरी ही उत्तर कोकणच्या शिलाहारांची दुसरी राजधानी होती हे सिद्ध करण्यास ही कारणे समर्थ नाहीत. उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या कोणत्याहि लेखात पुरीचा तत्कालीन राजाचे निवासस्थान म्हणून उल्लेख नाही. याच्या उलट स्थानकाचा (ठाण्याचा) असा उल्लेख अनेक ठिकाणी येतो.[२] 'पुरी–कोंकण' किंवा 'पुरीप्रभृतिकोंकण' या संज्ञेने उत्तर कोकणचा निर्देश करण्याची पद्धत होती. दक्षिण कोकणला 'सप्तकोंकण' अशी संज्ञा होती. रण्णाने सत्याश्रयाच्या उत्तर कोकणवरील स्वारीत एवढेच म्हटले आहे की त्या प्रसंगी अपराजित आपल्या राजधानीतून पळून समुद्रात आश्रय घेता झाला. रण्णाने वर्णन केले आहे की एका बाजूस समुद्र आणि दुसऱ्या बाजूस सत्याश्रयाचा सेनासागर यांच्या कैचीत सापडलेल्या अपराजिताची अवस्था जिची दोन्ही टोके जळत आहेत अशा काठीवरच्या कीटकासारखी झाली. या वर्णनात अपराजिताने पुरी येथे आश्रय घेतल्याचा उल्लेख नाही. शिलाहारांच्या दानपत्रांत पुरीचा क्वचित उल्लेख येतो खरा, पण तो दान दिलेल्या ब्राह्मणांच्या निवासस्थानाच्या अनुषंगाने.[३] पुरी ही पूर्वी मौर्यांची राजधानी होती, पण त्यानंतर उत्तर कोकणच्या कोणत्याहि चालुक्य किंवा शिलाहार राजाने तेथून राज्य केल्याचा उल्लेख नाही. गोव्याचे कदंब नृपति या शिलाहारांचा उल्लेख 'ठाणेयाचे राजे' असाच करतात. त्यांना कोठेहि 'पुरीचे राजे' म्हणत नाहीत. यावरूनहि त्यांची राजधानी आरंभापासून अखेरपर्यंत ठाण्यासच होती, यात संशय नाही.

या शाखेच्या राजांची वंशावळ (संभाव्य कारकीर्दीसह व ज्ञात ख्रिस्तोत्तर वर्षांसह) खाली दिली आहे.

प्रथम कपर्दी (सु. सन ८००–८२५)
|
पुल्लशक्ति (सु. ८२५–८५०) (ज्ञात वर्ष सन ८४३)
|
द्वितीय कपर्दी (सु. ८५०–८८०) (ज्ञात वर्षे ८५१, ८७७)
|
वप्पुवन्न (सु. ८८०–९१०)

---

१ *Ind. Cult.*, Vol. XI, p. 61.
२ उदाहरणार्थ, क्र. ६, ओ. ५९; क्र. ७, ओ. ५५ इत्यादि पाहा.
३ उदाहरणार्थ, क्र. १४, ओ. १५२.

वप्पुवन्न (सु. ८८०–९१०)

झंझ (सु. ९१०–९३०)

गोग्गि (सु. ९३०–९४५)

प्रथम वज्जड (सु. ९४५–९६५)

छद्वैदेव (सु. ९६५–९७५)

अपराजित (सु. ९७५–१०१०) (ज्ञात वर्षे ९९३ व ९९७)

द्वितीय वज्जड (सु. १०१०–१०१५)

अरिकेसरी (ऊर्फ प्रथम केशिदेव)
(१०१५–१०२०) (ज्ञात वर्ष १०१७)

छित्तराज
(सु. १०२०–१०३५)
(ज्ञात वर्षे १०२४, १०२६,
१०२७, १०३४)

नागार्जुन
(सु. १०३५–१०४५)
(ज्ञात वर्ष १०३९)

मुम्मुणि
(सु. १०४५–१०७०)
(ज्ञात वर्षे १०४९,
१०५३, १०६१)

प्रथम अनन्तदेव अथवा अनन्तपाल
(सु. १०७०–१११०)
(ज्ञात वर्षे १०८१, १०९५)

अपरार्क ऊर्फ प्रथम अपरादित्य
(सु. १११०–११४०)
(ज्ञात वर्षे ११२७, ११३७ व ११३९)

विक्रमादित्य (सु. ११३८–?)
(ज्ञात वर्ष ११३९)

हरिपालदेव
(सु. ११३८–११५५)
(ज्ञात वर्षे ११४८, ११४९,
११५३, ११५४)

मल्लिकार्जुन (सु ११५५–११७०)
(ज्ञात वर्षे ११५६, ११६२)

द्वितीय अपरादित्य (सु. ११७०–११९५)
(ज्ञात वर्षे ११८४, ११८५, ११८७)

द्वितीय अपरादित्य (सु. ११७०–११९५)

- द्वितीय अनन्तदेव (सु. ११९५–१२००) (ज्ञात वर्ष ११९८)
- द्वितीय केशिराज (सु. १२००–१२४५) (ज्ञात वर्षे १२०८, १२३९)
  - तृतीय अनन्तदेव (सु. १२४५–१२५५) (ज्ञात वर्ष १२५४)
    - सोमेश्वर (सु. १२५५–१२६५) (ज्ञात वर्षे १२५९, १२६०)

प्रथम कपर्दीनंतर त्याचा मुलगा पुल्लशक्ती गादीवर आला. त्याचा एक लेख कान्हेरीच्या लेण्यात आहे.[१] त्याच्या अखेरीस शक संवताचे वर्ष कोरले होते पण ते आता अगदी अस्पष्ट झाले आहे. कीलहॉर्नने त्याचे (शक) ७६५ असे संशयपूर्वक वाचन केले होते. हे वाचन असंभवनीय नाही; कारण त्याचा मुलगा द्वितीय कपर्दी हा कान्हेरी येथील लेखांवरून शक संवत् ७७५ आणि ७९९ या वर्षी राज्य करीत होता.

कान्हेरी लेण्यातील लेखांत पुल्लशक्तीच्या 'महासामन्त' आणि 'कोंकण-वल्लभ' या पदव्या उल्लेखिल्या आहेत आणि त्याला 'महाराजाधिराज' 'परमेश्वर' 'पृथिवीवल्लभ' अमोघवर्ष याच्या कृपेने समग्र पुरीकोकणचे राज्य मिळाले आहे, असे म्हटले आहे. हा त्याचा सम्राट् राष्ट्रकूटवंशी प्रथम अमोघवर्ष (सु. इ. स. ८१४–८७८) होय. या लेखात कोणी विष्णुगुप्ताने कृष्णगिरि (कान्हेरी) लेण्याच्या डागडुजीकरिता आणि तेथील बौद्धभिक्षूंची चीवरे (वस्त्रे) आणि ग्रंथ यांकरिता २०० द्रम्म दान दिल्याचा उल्लेख आहे.

पुल्लशक्तीनंतर त्याचा पुत्र द्वितीय कपर्दी गादीवर आला. त्याचे तन्नामक आजापासून भिन्नत्व दर्शविण्याकरिता कोरीव लेखात त्याला 'लघुकपर्दी' (सवाई कपर्दी) म्हटले आहे.[२] त्याच्या कारकीर्दीचे शक संवत् ७७५ (इ. स.

---

१ क्र. १.

२ क्र. ८, ओ. ८.

८५१) व ७९९ (इ.स. ८७७–७८) चे दोन लेख कान्हेरी लेण्यांत कोरले आहेत.[१] त्यांमध्ये कृष्णगिरि येथील महाराज महाविहारामध्ये राहणाऱ्या भिक्षूंच्या चीवरांकरिता व ध्यानधारणेसाठी आवश्यक अशा स्थानाकरिता गौड देशातून आलेल्या गोमिन् अविघ्नाकर याने आणि बेब नामक श्रावकाने दिलेल्या द्रम्मदानांचा उल्लेख आहे.

द्वितीय कपर्दीनंतर त्याचा पुत्र वप्पुवन्न राज्य करू लागला. त्याच्या वंशजांच्या लेखात त्याचे वर्णन ठरीव ठशाचे आले आहे. त्याच्या कारकीर्दीत त्याचा सम्राट् राष्ट्रकूट नृपति द्वितीय कृष्ण याने उत्तरेतील संयान (सध्याचे संजान) जवळचा प्रदेश मधुमति (मुहम्मद) नामक ताजिक (अरब) मांडलिकाला देऊन त्याची स्थापना केली होती.[२] त्याच्या वंशजांचे कांही ताम्रपट अलीकडे डहाणु तालुक्यातील चिंचणी येथे सापडले आहेत. त्यांवरून अरबांच्या निदान तीन पिढ्या – मधुमति, सहियारहार आणि सुगतिप अशा – तेथे राज्य करीत होत्या, असे कळते. ही नावे मुहम्मद, शहरिअर आणि सुबक्त यांची संस्कृत रूपांतरे होत. या अरब मांडलिक घराण्याचा शिलाहारांना बराच त्रास झालेला दिसतो. मधुमतीने पश्चिम समुद्रावरील सर्व बंदरे काबीज करून तेथे आपली ठाणी प्रस्थापित केली होती. त्याचा नातू सुगतिप याने राज्यकारभाराकरिता हिंदू मंत्री व अधिकारी नेमले होते. त्याने कांही धर्मादाय कृत्ये केल्याचे वर्णन त्याच्या ताम्रपटांत आले आहे. त्याने संजान येथे एक अन्नसत्र स्थापिले होते. संजानजवळच्या दोन नद्यांना पार करण्याकरिता धमतरींची आणि इतर नद्यांकरिता मंचांची (साकवांची) सोय केली होती. संजान येथील भगवती देवीच्या सर्वोपकरणांनी युक्त अशा उपभोगाकरिता आणि देवालयाच्या डागडुजीकरिता आपला सम्राट् राष्ट्रकूटवंशी तृतीय इंद्र याच्या संमतीने ग्रामदान व भूमिदान केले होते. हे अरब मांडलिक घराणे संयान मंडळांत राष्ट्रकूटांच्या सन ९७४ मधील पतनापर्यंत राज्य करीत होते. त्यानंतर शिलाहार अपराजिताने त्याचा उच्छेद करून तेथे आपल्या मांडलिकाची स्थापना केली.

वप्पुवन्नानंतर झंझ गादीवर आला. त्याचा उल्लेख अरब इतिहासकार अल् मसूदी याने केला आहे. तो म्हणतो की सन ९१६ मध्ये समूर (कुलाबा जिल्ह्यातील चौल) झंझाच्या अमलाखाली होते. झंझ हा निष्ठावान् शिवोपासक होता. त्याने भगवान् शंकराची आपल्या नावाने बारा देवालये बांधली होती. ही अर्थातच बारा ज्योतिर्लिंगांच्या स्थानी असावी. पण त्यातले एकहि सध्या विद्यमान नाही.

---

१ क्र. २ आणि ३.

२ *Ep. Ind.*, Vol. XXXII, pp. 45 f.

सेऊणदेशाच्या (खानदेशाच्या) सु. सन ९८० ते १००५ या कालात राज्य करणाऱ्या भिल्लम नामक यादव नृपतीने झंझ राजाच्या लक्ष्मी नामक कन्येशी विवाह केला होता, असे त्याच्या वंशजांच्या लेखांत म्हटले आहे. डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांनी हा झंझ शिलाहारवंशी झंझ असावा असे म्हटले आहे[१]. पण तो वप्पुवन्नाचा पुत्र असणे शक्य नाही. कारण तो भिल्लमाच्या पूर्वी सुमारे ७५ वर्षे होऊन गेला होता. तो कदाचित् त्याचा अज्ञात (गादीवर न आलेला) तन्नामक नातू असेल.

झंझानंतर त्याचा धाकटा भाऊ गोग्गि आणि त्याच्यानंतर त्याचा पुत्र वज्जड राज्य करू लागला. यांच्या कारकीर्दीविषयी आपणांस कांही माहिती नाही. वज्जडानंतर त्याचा भाऊ छद्वैदेव गादीवर आला असे दिसते. त्याचे नाव नंतरच्या लेखात गाळले आहे. याचे कारण तो उत्तरकालीन शिलाहारांचा सरळ रेषेत पूर्वज नव्हता, हे असणे संभवनीय नाही. कारण गादीवर न आलेल्या अशा अनेक राजांचे उल्लेख शिलाहारांच्या वंशावळीत आढळतात.[२] कदाचित् त्याने गादी बळकावली असेल. त्याचा एकच एक ताम्रपट प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियममध्ये आहे[३]. त्यात कालाचा उल्लेख नाही, पण त्यामध्ये शिलाहारांचे सम्राट् राष्ट्रकूट यांची वंशावळ तृतीय कृष्णापर्यंत दिली असल्याने तो ताम्रपट दहाव्या शतकाच्या उत्तरार्धात दिला असावा. त्या ताम्रपटात नवीन अशी ऐतिहासिक माहिती नाही, पण त्यात छद्वैदेवाने सालाणक ग्रामातील तीन शेते एका ब्राह्मणास दान दिल्याचा उल्लेख आहे[४] हे सालाणक कुलाबा जिल्ह्यातील पोयनाड जवळचे सालिंदे असावे. छद्वैदेवाचा पुतण्या व उत्तराधिकारी अपराजित याचे सन ९९३ व ९९७ चे ताम्रपट मिळाले आहेत. म्हणून छद्वैदेवाने थोडाच काळ (सन ९६५ ते ९७५) राज्य केले असावे.

छद्वैदेवानंतर त्याचा पुतण्या व वज्जडदेवाचा मुलगा अपराजित गादीवर आला. त्याचे दोन ताम्रपट – दोन्ही शक संवत् ९१५ (इ. स. ९८३) मध्ये दिलेले– कुलाबा जिल्ह्यातील जंजिरा येथे सापडले आहेत[५]. ते तैलपाने राष्ट्रकूटांचा उच्छेद केल्यानंतरच्या काळातले आहेत. तरीहि त्यांत अपराजिताने आपल्या

---

१ *Collected Works of Bhandarkar*, Vol. III, p. 140. लक्ष्मीची माता राष्ट्रकूट वंशातील होती. तेव्हा या झंझाने राष्ट्रकूट राजकन्येशी विवाह केला होता, असे दिसते.

२ सरळ पूर्वज–पंक्तीत नसलेल्या पण गादीवर बसलेल्या राजांची नावे शिलाहार वंशावळीत आढळतात. उदाहरणार्थ, छित्तराज व नागार्जुन यांचे नंतरच्या लेखांतील उल्लेख पाहा.

३ क्र. ४. ४ पूर्वोक्त. ५ क्र. ५ व ६.

उच्छिन्न राष्ट्रकूट सम्राटांची वंशावळ – प्रथम गोविंदापासून शेवटच्या कक्कलापर्यंत – दिली असून शेवटी तैलप नामक झंझावाताने शेवटच्या राष्ट्रकूट राजाचा प्रदीप मालवल्याबद्दल दुःख व्यक्त केले आहे. त्याने स्वतः उत्तरकालीन चालुक्यांचे स्वामित्व स्वीकारले नव्हते, एवढेच नाही तर 'पश्चिमसमुद्राधिपति' आणि 'मांडलिकत्रिनेत्र' (मांडलिकांमध्ये भगवान शंकरासारखा श्रेष्ठ) अशी मोठमोठी बिरुदे धारण करण्यास सुरवात केली. त्याने अनेक विजय प्राप्त केले. प्रथम त्याने उत्तरेच्या संयान येथील अरब अधिपतीचा उच्छेद करून त्याचा प्रदेश आपल्या राज्यास जोडला. यानंतर पश्चिम समुद्रतीरावरील या अरब अधिपतींचे उल्लेख आढळत नाहीत. नंतर त्याने पुणक (पुणे), संगमेश्वर आणि चिपुलण (चिपळूण) हे देश जिंकून घाटावरील देश आणि दक्षिण कोंकण येथपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. जंजिरा ताम्रपटांत त्याच्या राज्याचा विस्तार येणेप्रमाणे वर्णिला आहे[१]:– उत्तरेस लाट (दक्षिण गुजराथ) पासून दक्षिणेस चंद्रपुर (गोव्यातील चांदोर) पर्यंत आणि पश्चिमेस समुद्रापासून पूर्वेस भिल्लमाच्या राज्यापर्यंत (खानदेशापर्यंत) त्याचे राज्य पसरले होते. खारेपाटण ताम्रपटात त्याच्या खालील कर्तृत्वाचा निर्देश आहे – "त्याने सहाय्यार्थ आलेल्या गोम्माचे रक्षण केले, ऐयपाला गादीवर स्थिरपणे बसविले, आणि भिल्लम, अम्मण आणि मम्बुव यांना निर्भय केले. आणि अशा रीतीने तो 'बिरुदंकराम' नावाने विख्यात झाला." यांतील भिल्लमाखेरीज अन्य अधिपतींचा सुगावा अद्यापि लागला नाही.

अपराजित हा मोठा महत्त्वाकांक्षी होता. त्याने स्वकालीन प्रबळ राजांशी सख्य करून आपली शक्ति वाढविण्याचा प्रयत्न केला. पद्मगुप्ताच्या 'नवसाहसांकचरिता'त माळव्याच्या परमार नृपति सिंधुराजाच्या दक्षिण कोसलावरील स्वारीत विद्याधरकुमार शशिखण्ड याने त्याला साहाय्य केल्याचे वर्णन आले आहे. शिलाहार अपराजित विद्याधरवंशी आणि सिन्धुराजाचा समकालीन होता. त्याने आपल्या पुत्राला त्या परमार राजाच्या छत्तीसगडावरील स्वारीत साहाय्य करण्याकरिता पाठविलेले दिसते[२].

अपराजिताची दूर देशांवरील आक्रमणे, त्याचे परमारांशी सख्य, त्याची मोठमोठी बिरुदे, आणि उत्तरकालीन चालुक्यांचे आधिपत्य स्वीकारण्यास नकार इत्यादिकांमुळे तैलपाचा पुत्र सत्याश्रय याला क्रोध येऊन त्याने त्याच्या राज्यावर स्वारी केली, आणि त्याच्या राजधानीपर्यंतचा प्रदेश काबीज केला. तेव्हा अपराजित राजधानीतून निसटून समुद्रात आश्रयास गेला. तैलपाचा कन्नड राजकवि

---

१ क्र. ५, ओ. ४० – ४२.

२ *C. I. I.*, Vol. IV, Introd., pp. cxviii f.

रण्ण याने आपल्या सन ९८२ मध्ये रचलेल्या ' गदायुद्ध ' किंवा ' साहसभीमविजय ' काव्यात वर्णन केले आहे की एका बाजूने समुद्र आणि दुसऱ्या बाजूने सत्याश्रयाची सेना यांच्या कात्रीत सापडल्यामुळे दोन्ही बाजूने जळणाऱ्या काडीवर बसलेल्या कीटकाप्रमाणे अपराजिताची अवस्था होऊन तो कांपू लागला[१]. सत्याश्रयाने अंशुनगराला आग लावून ते उद्ध्वस्त केले आणि अपराजितावर अकरा हत्तींची खंडणी लादली. रण्णाच्या सन ९८२ मध्ये रचलेल्या या काव्यात या स्वारीचे वर्णन असल्यामुळे ती निदान सन ९८० च्या अगोदर झाली असावी. तेव्हा अपराजिताने त्यानंतर सन ९९३ व ९९७ मध्ये दिलेल्या ताम्रपटांत उत्तरकालीन चालुक्यांच्या सार्वभौमत्वाचा उल्लेख केला नाही, हे लक्षणीय आहे. त्याने लौकरच चालुक्यांच्या मांडलिकत्वाचे जू झुगारून दिले असावे. त्याची कारकीर्द सन १०१० मध्ये समाप्त झालेली दिसते.

अपराजितानंतर त्याचा पुत्र द्वितीय वज्जड गादीवर बसला. त्याच्याविषयी त्याच्या वंशजांच्या लेखांत केवळ रूढ पद्धतीची प्रशंसा आढळते. हनगल येथील कोरीव लेखावरून असे कळते की कदंब नृपति छट्टदेव (द्वितीय षष्ठदेव) (सु. सन १००५–१०५५) याची राणी कुंदलदेवी ही ठाणीचा (ठाण्याचा) राजा वाच्छव्य याची कन्या होती. डॉ. अळतेकरांनी अनुमान केल्याप्रमाणे हा वाच्छव्य शिलाहारनृपति द्वितीय वज्जड असावा.[२] वज्जडाच्या पद्मलदेवी राणीचा उल्लेख छित्तराज आणि मुम्मुणिराज यांच्या ताम्रपटांत आला आहे.[३]

वज्जडानंतर त्याचा धाकटा भाऊ अरिकेसरी याला राज्य मिळाले. कुमारावस्थेत त्याने परमार नृपति सिंधुराज याच्या छत्तीसगडातील स्वारीत भाग घेतला होता. तसेच सैन्यासह सौराष्ट्रात जाऊन तेथील सोमनाथाला पित्राज्ञेने आपले सर्व विजय अर्पण केले होते.[४] अरिकेसरीला (प्रथम) केशिदेव असे दुसरे नाव होते.

अरिकेसरीच्या कारकीर्दीत विख्यात परमार नृपति भोजाने उत्तर कोकणावर आक्रमण केले होते. कोकणविजयपर्वावर दिलेले त्याचे दोन ताम्रपट सन १०२० सालचे आहेत – एक त्या वर्षाच्या जानेवारीत आणि दुसरा सप्टेंबरमध्ये दिला होता.[५] भोजाने उत्तर कोकणावर केलेल्या या आक्रमणाचे कारण माहीत नाही. डॉ. देवदत्तपंत भांडारकरांच्या मते भोजाच्या स्वारीचा उद्देश आपला चुलता मुंज

---

१ *Ind. Ant.*, Vol. XL, p. 42, २ *Ind. Cult.*, Vol. II, p. 408.

३ क्र. ६१, पृ. ३४२ आणि क्र. १६, ओ. १२.

४ क्र. ८, श्लो. १६.

५ *Ep. Ind.*, Vol. XI, pp. 182 f.; Vol. XVIII, pp. 322 f.

याच्या तैलपाने केलेल्या वधाचा सूड घेण्याचा होता. पण हे कारण सयुक्तिक भासत नाही. कारण या वेळी सन ९७५ मधील मुंजाच्या वधानंतर ४४ वर्षांचा दीर्घ काळ लोटला होता. डॉ. अळतेकरांनी म्हटल्याप्रमाणे कदाचित् अरिकेसरीला उत्तरकालीन चालुक्यांचे मांडलिकत्व स्वीकारावे लागले असावे आणि त्याचा भोजाला राग आला असावा.[१] बेट्मा ताम्रपटावरून भोजाने कोकण आपल्या ताब्यात कांही काळ ठेवले होते असे दिसते. पण चालुक्य नृपति जयसिंह याने दक्षिण कोंकण जिंकून घेतल्यावर उत्तर कोकणच्या स्वारीकरिता कोल्हापुर येथे सन १०२४ मध्ये मुक्काम केला होता, असे त्याच्या मिरज ताम्रपटावरून कळते.[२] पुढे त्याने उत्तर कोकणवर स्वारी केली काय हे माहीत नाही, पण यानंतर लौकरच (सन १०२४ मध्येच) छित्तराजाने दिलेल्या ताम्रपटात [३] चालुक्यांच्या सार्वभौमत्वाचा निर्देश आढळत नाही हे लक्षणीय आहे.

अरिकेसरीनंतर छित्तराज सन १०२४ पूर्वी थोडाच काळ गादीवर आला असावा. त्या वर्षी त्याने आपला भोइघर ताम्रपट दिला होता.[४] त्याच्या काळचे इतर दोन ताम्रपट, एक त्याचा स्वतःचा बर्लिन म्यूझियम् ताम्रपट[५] आणि दुसरा त्याचा मांडलिक चामुंडराज याचा चिंचणी ताम्रपट[६], हे दोन्ही शक संवत् ९५६ (सन १०३४) चे आहेत. तेव्हा छित्तराजाची कारकीर्द सु. सन १०२० पासून सन १०३५ पर्यंत असावी.

छितराजाच्या कारकीर्दीच्या आरंभी गोव्याचा कदंब नृपति द्वितीय षष्ठदेव याने उत्तर कोकणवर आक्रमण केले. यापूर्वी छितराजाचा आजा अपराजित याने चंद्रपुरावर (गोवा प्रदेशातील चांदोरवर) आक्रमण करून तेथील (कदम्ब) राजाचा पराभव केला होता. हा राजा कदम्ब नृपति द्वितीय गूहल्लदेव असावा. त्याचा वचपा घेण्याची संधि गूहल्लदेवाचा पुत्र द्वितीय षष्ठदेव याला छित्तराजाच्या राज्यारोहणानंतर लौकरच मिळाली. त्यावेळी छित्तराज अल्पवयस्क होता. षष्ठदेवाने प्रथम दक्षिण कोंकण (कोकण ९००) जिंकून घेतले आणि नंतर कवडीद्वीपावर (उत्तर कोंकणवर) स्वारी केली. नरेंद्र लेखात या स्वारीचे वर्णन पुढील शब्दांत केले आहे[७]– "षष्ठदेवाने कवडीद्वीप आणि इतर अनेक देश जिंकल्यावर आपल्या जहाजांच्या रांगांनी लंकेपर्यंत (गोव्यापर्यंत) जणू पूलच निर्माण केला आणि रानटी लोकांवर खंडणी लादली. तेव्हा त्या कदंब राजाचे साम्राज्य अत्यंत

---

१ *Ind. Cult.*, Vol. II, p. 408.

२ *Ind. Ant.*, Vol. VIII, p. 18.

३ क्र. ६१. ४ पूर्वोक्त. ५ क्र. ११. ६ क्र. १२.

७ *Ep. Ind.*, Vol. XIII, p. 369.

विशाल झाले. अनेकांनी तर ते भगवान् रामचंद्राच्या अर्चनेकरिता एक विशाल धार्मिक संस्थानच अस्तित्वात आले, असे उद्‌गार काढले."

षष्ठदेवाने उत्तर कोकण आपल्या अमलाखाली दीर्घकाळ ठेवले नाही. आपले स्वामित्व कबूल करण्याच्या अटीवर त्याने ते छित्तराजाला परत केले. छित्तराजाच्या काळी उत्तर कोकणावर आणखी एकदा आक्रमण झालेले दिसते. कोल्हापूरच्या शिलाहार शाखेचा गोंक (सु. सन १०२० – १०६०) हा स्वतःस उदग्र कोकणाचा अधिपति म्हणवीत असे.[१] त्याने उत्तर कोकणावर विजय मिळविला असावा; कारण दक्षिण कोकण त्याला चालुक्य जयसिंहाकडून यापूर्वीच मिळाले होते.

मागे सांगितल्याप्रमाणे प्रथम अपराजिताने संयान मंडल अरब मांडलिकांकडून जिंकून घेतले होते. त्याचा पुत्र अरिकेसरी याने मोढवंशी विज्जराणक नामक मांडलिकाची तेथे स्थापना केली होती. त्याचा पुत्र चामुंडराज हा छित्तराजाच्या कारकीर्दीत त्याचा मांडलिक म्हणून तेथे राज्य करीत होता. आपल्या शके ९५६ (सन १०३४) च्या चिंचणी ताम्रपटात त्याने आपल्या सम्राटाचा छितुराज असा उल्लेख केला आहे.[२] चिंचणी ताम्रपटात त्याचे 'लाटप्राकारराज्यविध्वंसक' असे बिरुद आले आहे. त्यावरून त्याने लाट किंवा दक्षिण गुजराथ येथे विजय मिळविलेला दिसतो. त्याने स्वतः 'त्रिभुवननील' असेहि बिरुद धारण केले होते. चिंचणी ताम्रपटात त्याचा पिता विज्जराणक याच्या 'आहवनील' या बिरुदाचा उल्लेख आहे. या बिरुदांत तगर येथे नील आणि महानील या विद्याधर राजकुमारांनी राज्य केले होते, या पारंपरिक कथेचे प्रतिबिंब दिसते; कारण चामुंडराज शिलाहारांप्रमाणे स्वतःचेहि 'तगरपुरपरमेश्वर' असे वर्णन करतो.

छित्तराजाचा विद्या आणि कला यांनाहि उदार आश्रय होता. त्याने 'उदयसुंदरीकथा' नामक चंपूकाव्याचा कर्ता सोड्ढल याला राजाश्रय दिला होता. त्याच्या एका श्लोकात 'प्रदीप' शब्दाचा समुचित प्रयोग केलेला पाहून त्याने त्याला 'कविप्रदीप' अशी पदवी बहाल केली होती.[३] त्याने सोड्ढलाप्रमाणे इतरहि कांही विद्वानांना व कवींना उदार आश्रय दिला होता. त्याने कल्याणजवळ अंबरनाथ येथे सुंदर आणि भव्य असे शिवालय बांधण्यास आरंभ केला होता.[४] ते पुढे त्याचा धाकटा भाऊ मुम्मुणिराज याच्या कारकीर्दीत पूर्ण झाले.

---

१ क्र. ४३, ओ. १२. २ क्र. १२, ओ. ४.

३ उदयसुंदरीकथा, पृ. १५२.

४ क्र. १७, ओ. ६. भाऊ दाजींनी 'छित्तराजदेवस्य भवनं' याचा अर्थ छित्तराजाचा राजवाडा असा केला होता. *J. B. B. R. A. S.*, Vol. IX, p. 219 f.

छित्तराजानंतर त्याचा धाकटा भाऊ नागार्जुन हा गादीवर आला. त्याने थोडा काळच राज्य केले असावे. त्याचा शक संवत् ९६१ (सन १०३९) चा एकच ताम्रपट उपलब्ध झाला आहे.[१] त्यात त्याची 'नरेन्द्रनागार्जुन' (मन्त्रौणधिनिपुणांमध्ये श्रेष्ठ नागार्जुन) आणि 'कोदंडसहस्रार्जुन' (धनुर्विद्येत निपुण सहस्रार्जुन) ही बिरुदे उल्लेखिली आहेत.[२] त्याचा पुत्र प्रथम अपरादित्य याच्या चांजे शिलालेखात त्याच्या लीलादेवी राणीचा उल्लेख आला आहे. छित्तराजाप्रमाणे त्याचाहि सोड्ढल कवीला उदार आश्रय होता.

नागार्जुनाने सन १०३५ ते १०४५ या कालात राज्य केले असावे. उत्तरकालीन चालुक्य सत्याश्रय याने शिलाहार अपराजिताचा पराभव करून त्याच्यावर खंडणी लादल्याचे मागे सांगितले आहे.[3] पण त्याने व त्याच्या नंतरच्या शिलाहारांनी चालुक्यांचे स्वामित्व मान्य केल्याचे दिसत नाही; कारण त्याचा निर्देश त्यांच्या कोरीव लेखांत आढळत नाही. म्हणून बलाढ्य चालुक्य सम्राट् प्रथम सोमेश्वर याने शिलाहारांना वठणीवर आणण्याचा निश्चय केला. त्याने आपल्या अनेक सामंतांना व सेनापतींना उत्तर कोकणच्या स्वारीकरिता जमा केले. त्यांमध्ये काकतीय प्रोल; वनवासीचा कदम्ब सामन्त चामुंडराय, यादव नृपति अज्जरस, हैहय रेवरस ह्या सामंतांचा आणि मधुसूदन किंवा मधुव आणि पुलकेशिन् या सेनापतींचा निर्देश आढळतो.[४] नंतर त्याने प्रचंड सेनेनिशी उत्तर कोकणावर स्वारी केली. त्या लढाईत नागार्जुन मारला गेला असे दिसते.[५] या घटनेचा उल्लेख अनेक कोरीव लेखांत येतो, पण त्यांतील कालक्रमाने पहिला नांदेड जिल्ह्यातील तडखेळ येथील शक संवत् ९६९ (इ. स. १०४७) हा आहे.[६] तेव्हा हे आक्रमण नागार्जुनाच्या कारकीर्दीत सन १०४५ च्या सुमारास झाले असावे. नंतर नागार्जुनाचा धाकटा भाऊ मुम्मुणि याला गादीवर बसवून सोमेश्वर परत गेला असावा. त्यावेळी

---

१ क्र. १३,

२ पूर्वोक्त, ओ. ३६–३७.

३ मागे, पृ. २४ पाहा.

४ *H. C. I. P.*, Vol. V, p. 171.

५ डी. सी. गंगुली यांनी या युद्धात मारला गेलेला शिलाहार राजा मुम्मुणि असावा, असे म्हटले होते. पण मुम्मुणि सन १०६१ पर्यंत राज्य करीत होता. क्र. १७ पाहा.

६ *Inscriptions from the Nanded District*, Introd., p. xxii. सोमेश्वराच्या कोकणातील विजयाचा उल्लेख करणारा तडखेल येथील लेख शक संवत् ९६९ (सन १०४७) चा आहे.

नागार्जुनाचा पुत्र (प्रथम) अनन्तदेव हा अल्पवयस्क होता. म्हणून त्याच्या चुलत्याला गादीवर बसविलेले दिसते.

मुम्मुंणीच्या काळचे तीन कोरीव लेख आतापर्यंत सापडले आहेत. त्यांतील कालक्रमाने पहिला शक संवत् ९७० (सन १०४९)चा ताम्रपट हा आहे.[१] त्यांत तीन विषयांतील किंवा जिल्ह्यांतील गावे दान दिल्याचा उल्लेख आहे. त्यांपैकी 'वरेटिकाविषया'त कुलाबा जिल्ह्यांतील कर्जत तालुक्याचा समावेश होत होता. कारण त्यांतील बहुतेक गावे त्या तालुक्यात अद्यापि ओळखता येतात. दुसरा विषय 'अभ्यन्तरषट्षष्टि' यात सहासष्ट गावांचा अंतर्भाव होत होता आणि त्यांत राजधानी स्थानक ह्याचाहि समावेश होता म्हणून हे नाव पडले होते. इतरत्र याचा उल्लेख 'स्थानकाभ्यंतरषट्षष्टि' असाहि येतो. तिसरा विषय 'शूर्पारकषट्षष्टि' यात शूर्पारक (सोपारे) सभोवतालचा सहासष्ट गावांचा प्रदेश समाविष्ट होता. मुम्मुणीचा दुसरा कोरीव लेख शक संवत् ९७१ (सन १०४९)चा असून[२] त्यांत मन्दरजविषयातील किंइच्छित गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. दान दिलेले गाव आता ओळखता येत नाही; पण मन्दरज विषयात दिवे आगरजवळचा प्रदेश समाविष्ट होता, असे दुसऱ्या एका कोरीव लेखावरून कळते. मुम्मुणीने आपला ज्येष्ठ बन्धु छित्तराज याने आरंभिलेले अम्बरनाथ येथील शिवालयाचे काम पूर्ण केले. तेथे त्याचा शक संवत् ९८२ (सन १०६१) चा कोरीव लेख खांबांवरच्या तुळईवर कोरला आहे.[३]

मुम्मुणीच्या कारकीर्दीत शिलाहारांच्या सत्तेला उतरती कळा लागली. त्याला गोव्याच्या कदंबांचे स्वामित्व कांही काळ मान्य करावे लागले. जेव्हा द्वितीय षष्ठ-देव हा त्याच्या भेटीकरिता आला तेव्हा मुम्मुणीने त्याचे मोठे स्वागत केले. नरेन्द्र येथील कोरीव लेखात या प्रसंगाचे पुढील वर्णन आले आहे[४] –"जेव्हा छट्टयदेवाच्या समुद्रावरील वैभवयुक्त विहाराची वार्ता मुम्मुणीला कळली तेव्हा तो त्याला सामोरा गेला आणि त्याला आपल्या प्रासादात बोलावून त्याने त्याचे मोठ्या प्रेमाने स्वागत केले आणि मोठ्या समारंभाने आपली कन्या त्याला अर्पण केली आणि त्या जावयाला पाच लक्ष सुवर्णनाण्यांचा अहेर केला." मुम्मुणीच्या पट्टमहाराणीचे नाव 'पद्मै' असे होते.[५]

---

१ क्र. १४. २ क्र. १५. ३ क्र. १७.

४ *Ep. Ind.*, Vol., XIII, p. 310.

५ क्र. १४, ओ. ५५. छित्तराजाच्या भोइघर ताम्रपटात (क्र. ६१) आणि मुम्मुणीच्या दिवे आगर ताम्रपटात (क्र. १६. ओ. १२) उल्लेखिलेली महाराज्ञी पद्मलदेवी ही 'पद्मै' राज्ञीहून भिन्न असून छित्तराजादि तीन बंधूंची माता होती.

शिलाहारांची सत्ता दुर्बल झाल्यावर संयानचे त्यांचे मौढवंशी सामंत स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करू लागले आणि शिलाहारांची बिरुदे स्वतः धारण करू लागले, असे दिसते. शक संवत् ९७५ (सन १०५३) च्या चिंचणी ताम्रपटात[१] राजा विज्जल स्वतःचे 'तगरपुरपरमेश्वर' आणि 'शरणागतवज्रपंजर' असे वर्णन करतो. ही बिरुदे उत्तर कोकणच्या शिलाहारांची होती. यानंतर लौकरच मुम्मुणीने या बंडखोर सामंताचा उच्छेद करून संयान मंडल आपल्या राज्याला जोडले, असे दिसते. कारण यानंतर या सामन्तवंशाचे लेख सापडले नाहीत.

आपल्या दोन वडील भावांप्रमाणे मुम्मुणि हा विद्वानांचा आणि कवींचा उदार आश्रयदाता होता. सोड्ढल कवीने त्याच्या कारकीर्दीत आपली 'उदयसुंदरी-कथा' रचून त्याच्या राजसभेत त्याला वाचून दाखविली.[२] मुम्मुणीने तिची प्रशंसा करून त्या कवीचा मोठा सन्मान केला आणि त्याला त्याच्या मनोरथाहून अधिक धन अर्पण केले. त्यानंतर सोड्ढल लाटदेशाधिपति वत्सराजाच्या आश्रयास गेला; पण त्याने आपल्या 'उदयसुन्दरीकथे'त आपणांस छित्तराज, नागार्जुन आणि मुम्मुणि या तीन्ही शिलाहार नृपतींनी दिलेल्या उदार आश्रयाचा व संमानाचा कृतज्ञतेने उल्लेख केला आहे.

मुम्मुणीच्या कारकीर्दीचा शेवट सु. सन १०७० मध्ये झाला असावा. खारे-पाटण ताम्रपटात मुम्मुणीच्या मृत्युनंतर उत्तर कोकणात दायादव्यसन (भाऊबंदकी) उत्पन्न झाल्याचा निर्देश केला आहे, पण ते कोणांमध्ये ते सांगितले नाही मागे सांगितल्याप्रमाणे नागार्जुन युद्धात मारला गेला, तेव्हा त्याचा पुत्र अनन्तपाल (प्रथम अनन्तदेव) हा अल्पवयस्क असल्यामुळे मुम्मुणि गादीवर बसला. नंतर चालुक्य मंगलेश आणि यादव महादेव या राजांनी केले, त्याप्रमाणे मुम्मुणीने आपणानंतर आपल्या मुलास गादी मिळावी अशी व्यवस्था केली असावी. पण नागार्जुनाचा पुत्र अनन्तदेव किंवा अनन्तपाल याला आपला हक्क मारला जात असल्यामुळे ती पसंत पडणे शक्य नव्हते. म्हणून हे 'दायादव्यसन' उत्पन्न झालेले दिसते. कांही संशोधकांच्या मते हे दायादव्यसन उत्तर कोकण व कोल्हापूर येथील शिलाहार राजांच्या कलहामुळे उत्पन्न झाले असावे. पण तसे असते तर त्या कल-हाला 'दायादव्यसन' असे नाव मिळाले नसते. कारण कोल्हापुरचे शिलाहार हे ठाण्याच्या शिलाहारांचे 'दायाद' (पैतृक संपत्तीचे वाटेकरी) नव्हते.

या झगड्यात गोव्याच्या कदंबांनी मुम्मुणीच्या मुलाचा पक्ष घेतलेला दिसतो. कदम्ब नृपति जयकेशी याने उत्तर कोंकण जिंकून कांही काळ आपल्या ताब्यात

---

१ *Ep. Ind.*, Vol, XXXII, p. 63.

२ उदयसुन्दरीकथा, पृ. १२.

ठेवले होते; कारण कांही लेखात त्याला ' कोकणाधिपति ' म्हटले आहे. या युद्धात पश्चिम किनाऱ्यावरील अरब वसाहतीतील अधिकाऱ्यांनी कदंबांना साहाय्य केले असावे. जयकेशीच्या पणजी ताम्रपटात[१] चेमूल्य (कुलाबा जिल्ह्यातील चौल) येथील अरब व्यापारी अरियम याच्या वसाहतीचा निर्देश आहे. कदंबांनी कांही अरबांना आपले मंत्री नेमून त्यांना ग्रामदाने दिली होती.[२] पश्चिम किनाऱ्यावर अशाच आणखीहि वसाहती झाल्या असतील. नंतरच्या काळात इंग्लिश, डच वगैरे वखारींनी केले त्याप्रमाणे त्यांनी स्वतःच्या संरक्षणाकरिता थोडी बहुत फौज ठेवली असावी. प्राचीन काळी श्रेणींना अशी फौज ठेवता येत असे. तिला ' श्रेणिबल ' असे म्हणत. संकटकाळी तत्कालीन राजे स्वतःच्या संरक्षणार्थ त्याचा उपयोग करीत असत. कालांतराने ह्या अरब वसाहती प्रबळ झाल्या असाव्या. त्यांच्या अधिपतींनी (मुम्मुणीच्या मृत्यूनंतर) कदंबांच्या शिलाहारांशी झालेल्या चकमकीत भाग घेतलेला दिसतो. या यवन सैनिकांनी देश उद्ध्वस्त केला आणि देवब्राह्मणांचा या दायादव्यसनात छळ केला, असे खारेपाटण ताम्रपटात म्हटले आहे.[३] पण नागार्जुनाचा पुत्र अनन्तपाल याने शौर्याने लढून या यवन सहाय्यकांचा धुव्वा उडविला आणि देशाचे रक्षण केले, असे पुढील श्लोकात वर्णिले आहे--

> जाते दायादवैरिव्यसनिनि समये यैरवाप्तप्रभावै-
> र्ध्वस्ता देवद्विजातिप्रमथनविधिना कोंकणक्षोणिरेषा ।
> तानुग्रान्पापराशीन्मुनयवनभरान्खड्गधाराम्बुराशौ:
> क्षिप्त्वोच्चैश्चन्द्रबिम्बे स्वकुलपतिसखो यः स्वकीर्तिं लिलेख ।।

(भाउबंदकीचे संकट प्राप्त झाले असता ज्यांनी प्रबळ होऊन देवब्राह्मणांचा छळ केला आणि ही कोंकणभूमि उद्ध्वस्त केली त्या उग्र आणि पापी यवन सैनिकांना आपल्या खड्गधारेच्या जलौघाने दूर फेकून त्या स्वकुलाच्या रक्षणकर्त्या अनन्तपालाने आपली कीर्ति चन्द्रबिंबावर कोरून ठेवली.)

अनन्तपालाचा (किंवा प्रथम अनन्तदेवाचा) एकच कोरीव लेख – शक संवत् १०१६ (सन १०९४) चा खारेपाटण ताम्रपट हा – सापडला आहे. त्यावरून त्याने 'पश्चिमसमुद्राधिपति' ही पदवी धारण केली होती आणि तो स्वतःस पुरीकोकणादि सबंध कोकण प्रदेशाचा अधिपति समजत होता, असे दिसते. पूर्वोक्त ताम्रपटात त्याने आपल्या कांही मंत्र्यांच्या जहाजांना स्थानक (ठाणे), शूर्पारक (सोपारा), चेमूल्य (चौल) इत्यादि बंदरातील जकातीची सूट दिली होती, असा उल्लेख आहे.

---

१ *Indica* (Indian Historical Research Institute Silver Jubilee Volume), p. 89 f.

२ *Ibid.*, p. 93.

३ क्र. १९, ओ. ५२–५५.

अनन्तपालाच्या कारकीर्दीच्या अखेरीस पुनः शिलाहारांचा गोव्याच्या कदंबांशी झगडा उत्पन्न झाला. कदम्ब नृपति द्वितीय जयकेशी याने उत्तर कोकणवर स्वारी केली. त्या युद्धात अनन्तपाल धारातीर्थी पडला. देगावे येथील लेखात[१] जयकेशीला 'कवडीद्वीपाच्या नृपतीचा काळ' असे म्हटले आहे. नंतर जयकेशीने कोकण काही काळ आपल्या ताब्यात ठेवले. सन ११२५ आणि ११२६ येथील नरेंद्र शिलालेखांत[२] 'चालुक्य सम्राट् त्रिभुवनमल्ल (षष्ठ विक्रमादित्य) याच्या काळी जयकेशी हा सवालाख कवडीद्वीपावर राज्य करीत आहे' असे म्हटले आहे. या वेळी अनन्तपालाचा पुत्र प्रथम अपरादित्य यावर आलेल्या संकटाचे यथातथ्य वर्णन त्याच्या वडवली ताम्रपटाच्या[3] खालील श्लोकांत केले आहे.

आसीत्कोऽप्यसुरो जगद्दलयितुं छित्तुकनामान्तक–
स्तस्यैवं च समस्तमेव मिलितं सामन्तचक्रं ततः ।
ध्वस्ते धर्मधने गतेषु गुरुषु विलष्टे विभासंश्रये
शीर्णे जीर्णपुरप्रजापतिजने नष्टे च राष्ट्रोदये ।।

एकश्चैकतुरंगमश्च भुजयोर्द्वन्द्वं च खड्गश्च तं
द्रागदृष्ट्वा कठिने रणे सरभसं तत्संमुखं धावितः ।
नायोद्धुं न पलायितुं किमपि वा ज्ञातं च तेन स्फुटं
संग्रामं परिहृत्य यस्य च भिया म्लेच्छाश्रये संस्थितः ।।

---

१ *J. B. B. R. A. S.*, Vol. IX, p. 266.

२ *Ep. Ind.*, Vol. XIII, pp. 316 and 383. मुंबई गॅझेटीयर (जुनी आवृत्ति), व्हॉ. १, भाग २, पृ. ५६८ वर फ्लीटने म्हटले आहे की नरेंद्र येथील पहिल्या कोरीव लेखानंतर केवळ पांच महिन्यांनी कोरविलेल्या दुसऱ्या कोरीव लेखात द्वितीय जयकेशीच्या वर्णनात कवडी द्वीपाच्या आधिपत्याचा उल्लेख गाळला आहे. फ्लीटच्या विधानावर विसंबून डॉ. अ. स. अळतेकरांनीहि तसेच म्हटले आहे. पण ते बरोबर नाही. हे दोन्ही लेख ए. इं. मध्ये (व्हॉ. १३, पृ. २९८ इ. व ३१६ इ. वर) प्रसिद्ध झाले आहेत. त्या दोन्हींत द्वितीय जयकेशीचे वर्णन 'सवालाखी कवडीद्वीपाचा अधिपति' म्हणून केले आहे.

तथाकथित सोमनाथ (वस्तुतः ठाणे) शिलालेखाचे ११०७ हे वर्ष अळतेकरांनी म्हटल्याप्रमाणे विक्रम संवताचे नसून शक संवताचे आहे. म्हणून तो लेख प्रथम अपरादित्याच्या काळचा नसून द्वितीय अपरादित्याच्या कारकीर्दीतील आहे. खंड २, क्र. ३१ पाहा.

३ क्र. २०, ओ. ३२–३५.

(पृथ्वीचा उच्छेद करणारा छित्तुक्क नामक यमासारखा राक्षस होऊन गेला. त्याला सर्व मांडलिक जाऊन मिळाले. त्याने धर्माचा नाश केला. वृद्धांचा छळ केला. सर्वत्र अंधकार माजला. प्रजाजन जीर्ण शीर्ण झाले. राष्ट्राचा अभ्युदय नष्ट झाला. तेव्हा अपरादित्य घोड्यावर स्वार होऊन एकटा त्या भीषण रणांगणात घुसला आणि त्याने आपल्या बाहुबलाच्या आणि खड्गाच्या योगे शत्रूची दाणादाण केली. तेव्हा शत्रूला युद्ध करावे किंवा पळ काढावा हे सुचेना. शेवटी त्याने भीतीने रणांगण सोडून म्लेच्छांचा आश्रय घेतला.)

वरील श्लोकात ज्याचा छित्तुक्क म्हणून उल्लेख आहे तो कदंब नृपति द्वितीय जयकेशी होय यात संशय नाही. डॉ. अळतेकरांनी म्हटल्याप्रमाणे[१] या जयकेशीला शिवचित्त आणि विष्णुचित्त असे दोन पुत्र होते. तेव्हा तो स्वत: ‘ छित्तुक्क ’ नावाने ज्ञात असला तर त्यात आश्चर्य नाही. अपरादित्याने शत्रूला पिटाळून लावले आणि आपले पैतृक राज्य मिळविले. या घटनेचा निश्चित काल ठरविता येतो. मागे सांगितल्याप्रमाणे सन ११२५ व ११२६ च्या नरेन्द्र येथील शिलालेखांत जयकेशीचा ‘ कवडीद्वीपाचा अधिपति ’ म्हणून उल्लेख आहे. पुढच्याच वर्षी सन ११२७ मध्ये अपरादित्याने सबंध कोकण प्रदेश जिंकून परत मिळविला, असे सन ११२७ च्या त्याच्या वडवली ताम्रपटावरून दिसते.[२] या युद्धात त्याला कोल्हापूरचा शिलाहार नृपति गंडरादित्य याचा पुत्र विजयादित्य याचे बहुमोल साहाय्य झाले असे दिसते. त्या शाखेचा शेवटचा नृपति द्वितीय भोज याच्या कशेळी ताम्रपटात[३] विजयादित्याने स्थानकाच्या राजाला पुन: गादीवर बसविल्याचा उल्लेख आहे तो या घटनेसंबंधी असावा.

अपरादित्याने समकालीन राजांच्या दरबारी आपले वकील नेमले होते, असे दिसते. दूरच्या काश्मीर देशातील त्याचा वकील तेजकंठ याचा उल्लेख मंखाच्या ‘श्रीकंठचरिता’त आला आहे. ते काव्य काश्मीर नृपति जयसिंह (सु. सन ११२८–११५०) याच्या राजसभेत वाचले जात असता तेथे कुंकणेश्वर अपराजिताने पाठविलेला दूत तेजकंठ उपस्थित होता, असे त्या काव्यात म्हटले आहे. काश्मीरला जाण्यापूर्वी तेजकंठाने वाटेत शूर्पारकात (सोपाऱ्यात) आपल्या

---

१ *Ind. Cult.*, Vol. II, pp. 412 f.

२ क्र. २०.

३ क्र. ६०. ओ. १७.

प्रतिस्पर्ध्यांचा वादात पराभव केला होता, असेहि तेथे म्हटले आहे.[१] हा अपरादित्य तन्नामक प्रथम नृपति होय, हे डॉ. अळतेकरांनी दाखविले आहे.[२]

अपरार्क विविध विद्यांत प्रवीण होता. तो जसा संगीतकलेत तसा धर्मशास्त्रातहि रस घेत असे. 'याज्ञवल्क्यस्मृति'वरील त्याची 'अपरार्कटीका' अद्यापि काश्मीरात प्रमाणभूत मानली जाते. पूर्वोक्त तेजकण्ठाने तेथे तिचा प्रचार केला असावा.

अपरादित्याने दक्षिण कोंकणातूनहि कदंबांना हाकून लावून सबंध कोकण प्रदेश आपल्या ताब्यात आणला होता. तो सबंध कोकणावर राज्य करीत होता, असे त्याच्या वडवली ताम्रपटात म्हटले आहे. त्याने दक्षिण कोकणावर आपला धाकटा पुत्र विक्रमादित्य याची नेमणूक केली होती. त्याची राजधानी प्रणाल (रत्नागिरी जिल्ह्याच्या दापोली तालुक्यातील पन्हाळे) येथे होती. विक्रमादित्याच्या शक संवत् १०६१ (सन ११३९) च्या पन्हाळे ताम्रपटात अपरादित्याने कुलाबा जिल्ह्याच्या मुरुड गावातील मरुदीश्वराला दिलेल्या खैरडी ग्रामदानाचा उल्लेख आहे.[3] ते गाव विक्रमादित्याच्या अमलाखाली असल्यामुळे अपरादित्याने तेथे राज्य करणाऱ्या त्या आपल्या मुलाला त्याचा ताम्रपट देण्याविषयी सांगितलेले दिसते. तो देण्यापूर्वीच अपरादित्याचे निधन झाले असावे. कारण त्या ताम्रपटात विक्रमादित्य स्वतःच्या 'महामण्डलेश्वर' पदवीचा उल्लेख करताना दिसतो. तेव्हा अपरादित्याची कारकीर्द शक संवत् १०६० (सन ११३९) मध्ये समाप्त झाली असावी.

विक्रमादित्य पित्याच्या निधनानंतर स्थानक (ठाणे) येथे गादीवर बसला होता काय, हे सांगता येत नाही. कारण त्याचा दुसरा एकहि लेख मिळाला नाही. अपरादित्याला हरिपालदेव नामक दुसरा पुत्र होता असे दिसते. तो बहुधा त्याचा ज्येष्ठ पुत्र असावा. आपल्या निधनानंतर राज्यात बखेडा माजू नये म्हणून

---

१ पाहा – वचोभिर्नुनुदे दन्तद्युतिश्रीखण्डपाण्डुभिः ।
वादीनां वाददर्पोष्मा येन शूर्पारकाध्वसु ॥
यं श्रीमदपरादित्य इति दूतप्रसिद्धये ।
प्रजिघाय घनश्लाघः काश्मीरान् कुङ्कणेश्वरः ॥
सर्ग २५, श्लो. १०९-११०.

२ डॉ. रा. गो. भांडारकरांनी या अपरादित्याला द्वितीय अपरादित्य मानले होते. *Collected Works*, Vol. III, p. 210,.

३ क्र. २३, ओ. ६५–६६.

अपरादित्याने कदाचित् उत्तर कोकण हरिपालदेवाला आणि दक्षिण कोकण विक्रमादित्याला देऊन राज्याची विभागणी केली असेल. हरिपालदेवाचे अनेक लेख[१] शक संवत् १०७०, १०७२, १०७५ आणि १०७६ चे ठाणे जिल्ह्यात मिळाले आहेत. त्यांवरून तो उत्तर कोकणात सन ११३९ ते ११५५ पर्यंत राज्य करीत होता, यात संशय नाही. हरिपालदेवाच्या कारकीर्दीपासून उत्तर कोकणाच्या शिलाहारांचे फक्त शिलालेखच मिळाले आहेत. ते संस्कृत-मराठी मिश्रित भाषेत लिहिले आहेत. या शिलालेखांत तत्कालीन राजांची वंशावळ दिलेली नाही. म्हणून यानंतर राजांचा परस्पर सबंध निश्चितपणे सांगता येत नाही. हरिपालदेवाचे प्रथम अपरादित्याशी कोणते नाते होते हे कोणत्याहि लेखात सांगितले नाही. तथापि पूर्वोक्त कारणांवरून तो त्याचा ज्येष्ठ पुत्र असावा. त्याच्या कारकीर्दीतील लेखांत त्याचे मंत्री, प्रजाजन आणि ग्रामपरिषदा यांनी दिलेल्या दानांचे उल्लेख आढळतात.

हरिपालदेवानंतर मल्लिकार्जुन गादीवर आला.[२] त्याचे दोन लेख सापडले आहेत. एक रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण[३] येथे आणि दुसरा ठाणे जिल्ह्यातील वसई येथे.[४] पहिला लेख शक संवत् १०७८ (सन ११५६) चा असून त्यात सुप्रया नामक दण्डाधिपतीला (सेनाधिकाऱ्याला) प्रणालक देशाचा शासनकर्ता नेमल्याचा उल्लेख आहे. या लेखावरून दक्षिण कोकण विक्रमादित्यानंतरहि शिलाहारांच्या राज्यात राहिले होते, असे दिसते. बहुधा विक्रमादित्य निपुत्रिक वारला असावा आणि म्हणून दक्षिण कोकण ठाणे शाखेच्या अंमलाखाली आलेले दिसते. प्रणालक हे पूर्वोक्त प्रणाल (दापोडी तालुक्यातील पन्हाळे) होय. वसईचा लेख शक संवत् १०८३ (सन ११६२) चा आहे. त्यात एका शिवालयाच्या जीर्णोद्धाराचा उल्लेख असून लखण उपाध्याय नामक ब्राह्मणाला लोणवाटक (भिवंडी तालुक्यातील लोनांड) ग्राम दान दिल्याचे सांगितले आहे.

---

१ क्र. २४-२७. See also *Bomb. Gaz.*, Vol. II, pt. ii, p. 19, n. 3 and Kielhorn 's *List*, No. 310.

२ मल्लिकार्जुनाचे हरिपालदेवाशी कोणते नाते होते, हे माहीत नाही. जिनमण्डनाच्या (वि. सं. १४९२) 'कुमारपालप्रबन्धा'त मल्लिकार्जुन हा महानन्दाचा पुत्र होता, असे म्हटले आहे. त्यावरून तो हरिपालदेवाचा पुतण्या होता, असे कांही विद्वान् समजतात. पण महानन्दासारखे नाव शिलाहार वंशावळीत येत नाही. शिवाय जिनमंडन हा पुष्कळ नंतरचा ग्रंथकार असून मुळीच विश्वासार्ह नाही. पाहा *The Chaulukyas of Gujarat*, pp. 114 and 419.

३ क्र. २८. ४ क्र. २९.

हेमचंद्राने आपल्या 'कुमारपालचरिता'त[1] चौलुक्य नृपति कुमारपाल याने पाठविलेल्या सैन्याशी मल्लिकार्जुनाने केलेल्या मुकाबल्याचे सविस्तर वर्णन केले आहे. मेरुतुंगानेहि आपल्या 'प्रबन्धचिन्तामणी'त त्याचा वृत्तांत दिला आहे,[2] पण तो काल्पनिक दिसतो. मेरुतुंग सांगतो की मल्लिकार्जुनाने 'राजपितामह'[3] हे बिरुद धारण केल्यामुळे कुमारपालाला चीड आली आणि त्याने अम्बड नामक आपल्या सेनापतीला कोकणावर हल्ला करण्याचा आदेश दिला. मल्लिकार्जुनाने त्याचा पराभव केला. तेव्हा खिन्न होऊन त्याने कृष्णगिरि (कान्हेरी) येथे कृष्ण वस्त्रे परिधान करून कांही दिवस घालविले. कुमारपालाला हे समजताच त्याने सैन्याची मोठी कुमक त्याच्याकडे पाठविली. नंतर अम्बडाने मल्लिकार्जुनाचा पूर्ण पराभव केला, त्याच्या हत्तीवर चढून त्याचा शिरच्छेद केला आणि कुमारपालाला त्याच्या राज्यसभेत बाहत्तर सामंतांच्या समक्ष त्याचे शिरकमल सादर केले. या वृत्तांतात बरीच अतिशयोक्ति दिसते. तथापि अनेक जैन ग्रंथांत उदयनाचा पुत्र अम्बड याने मल्लिकार्जुनाचा पराभव केल्याचा उल्लेख आहे खरा.[4] तेजःपालाच्या अबू

---

१ सर्ग ६, श्लो. ४०–७०.

२ मेरुतुंग, 'प्रबन्धचिन्तामणि' (सं. डी. के. शास्त्री, १९३२), पृ. १३० इ.

३ पूर्वोक्त. फ्लीटने दाखविले आहे की 'राजपितामह' याचा खरा अर्थ 'राजांमध्ये जणू ब्रह्मदेव' असा आहे. यासारखीच (षष्ठ विक्रमादित्य, यादव कृष्ण, आणि यादव रामचंद्र यांनी धारण केलेली) 'रायनारायण', (राष्ट्रकूट द्वितीय गोविंदाचे) 'श्रीनृपतित्रिनेत्र' इत्यादि बिरुदे पाहा. मेरुतुंगाने सांगितलेली गोष्ट खरी असेल तर कुमारपालाने 'राजपितामह' याचा 'राजांचा पणजा' असा चुकीचा अर्थ केलेला दिसतो. पण तसे असेल तर मेरुतुंगाच्याच म्हणण्याप्रमाणे पुढे त्याने अंबडाला तीच पदवी दिली, हे आश्चर्यकारक नव्हे काय ?

शिवाय, लक्षणीय गोष्ट ही की ही पदवी मल्लिकार्जुनानेच प्रथम धारण केली नव्हती. त्याच्या पूर्वीच्या शिलाहारांनीहि तिचा उपयोग केला होता. प्रथम अनन्तदेवाच्या शक संवत् १०१६ (क्र. १९)च्या ताम्रपटातील ओ. ६१–६२ पाहा.

४ सोमेश्वराची 'कीर्तिकौमुदी', २, श्लो. ४७–४९ पाहा. सोमदेवाने म्हटले आहे की कुमारपालाने स्वतः मल्लिकार्जुनाच्या शिराचे आपल्या बाणांनी तुकडे तुकडे केले. पण हेमचन्द्राच्या वर्णनाप्रमाणे कुमारपालाने या युद्धात मुळीच भाग घेतला नव्हता. अरिसिंह (सुकृतसंकीर्तन, २, ४३) सांगतो की एका वणिजाने (बनियाने) (अर्थात् अंबडाने) मल्लिकार्जुनावर विजय मिळविला. बालचन्द्राचा 'वसन्तविलास' (५, ४३) आणि प्रभाचंद्राचे 'प्रभावकचरित' (२२, ७२६) पाहा. जयसिंहसूरि आणि जिनमंडन हे मेरुतुंगाप्रमाणेच या घटनेचे वर्णन करतात.

प्रशस्तीत म्हटले आहे की परमारवंशी यशोधवलाचा पुत्र धारावर्ष रणांगणावर मोठ्या धैर्याने लढत असता कोकण नृपतीच्या स्त्रिया नेत्रकमलांतून अश्रूंचा वर्षाव करीत होत्या.[१] या वर्णनातहि पूर्वोक्त घटनेचाच उल्लेख आहे, असे कांही विद्वान म्हणतात; पण हे वर्णन मोघम आहे. जयानकाच्या 'पृथ्वीराजविजया'त चाहमान राजकुमार सोमेश्वर याने कोकण नृपतीला कंठस्नान घातले, असे म्हटले आहे.[२] पण हे उल्लेख कुमारपालाचा आश्रित हेमचंद्र याच्या 'कुमारपालचरिता'त आढळत नाहीत. हेमचंद्र कुमारपालाचा समकालीन असल्यामुळे त्याच्या वर्णनाला विशेष महत्त्व आहे. आपल्या 'कुमारपालचरिता'त हेमचंद्राने या युद्धाचे खालील वर्णन दिले आहे : एकदा कुमारपाल आपल्या दरबारात बसला असता त्याचा सान्धिविग्रहिक येऊन कोकणावरील स्वारीचा वृत्तांत सांगू लागला. कुमारपालाची सेना कोकणाच्या राजधानीजवळ आली असता कोकणाधिपति तिचा प्रतिकार करण्याकरिता चालून आला. राजधानीवरचा हा हल्ला अनपेक्षित होता, असे दिसते. कारण हेमचन्द्राने वर्णन केले आहे की मल्लिकार्जुनाचे सैनिक विहीरीवर स्नान करण्याचे टाकून शत्रूचा प्रतिकार करण्याकरिता धावले.[३] मल्लिकार्जुन मोठ्या शौर्याने लढला, त्याचे सैन्य शत्रूची फळी फोडून आत घुसले आणि क्षणभर असे वाटू लागले की कोकणाधिपति विजयी होणार. पण तितक्यात गुर्जरांच्या सैन्याने एकवटून शत्रूशी झुंज दिली. मल्लिकार्जुनाच्या हत्तीवर बाणांचा वर्षाव झाला. तेव्हा मल्लिकार्जुन खाली कोसळला आणि त्याच्या सैन्याची दाणादाण झाली, आणि अशा रीतीने कुमारपाल 'पश्चिमसमुद्राधिपति' झाला.

हेमचन्द्राने या युद्धाच्या वर्णनात अम्बडाचा किंवा सोमेश्वराचा उल्लेख केला नाही. तसेच या युद्धात दोन चकमकी झाल्या, पहिलीत मल्लिकार्जुन विजयी आणि दुसरीत पराभूत झाला, असेहि तो सांगत नाही. त्याच्या वर्णनात मल्लिकार्जुनाचे शिरकमल कुमारपालाला राजसभेत नजर केल्याचाहि उल्लेख नाही. एकंदरीत त्याचा वृत्तांत जास्त विश्वसनीय वाटतो. नंतरच्या कालात या युद्धातील विजयाचे श्रेय अम्बडाला दिलेले दिसते.[४] त्याला वणिक् (बनिया) म्हटले आहे. या कालात चाहमान राजकुमार सोमेश्वर अणहिलपाटण येथे राहत होता. म्हणून जयानकाने वर्णिल्याप्रमाणे त्याने या युद्धात भाग घेतला असणे शक्य आहे.

---

१ *Ep. Ind.*, Vol. VIII, p. 211.

२ सर्ग ७, श्लो. १५. सोमेश्वराने आपल्या हत्तीवरून मल्लिकार्जुनाच्या हत्तीवर उडी मारली आणि त्याची कटचार हिसकावून घेऊन तिने त्याचा शिरच्छेद केला, असे यात वर्णन आहे.

३ कुमारपालचरित, ६, श्लो. ५३.

४ सुकृतसंकीर्तन, २, श्लो. ४३.

या युद्धाला कारण काय झाले ते निश्चितपणे सांगता येत नाही. मुजुमदारांनी म्हटले आहे की या कालात कदंब होयसळाशी झगडण्यात गुंतले असल्यामुळे त्यांच्याकडून धोका नव्हता. म्हणून मल्लिकार्जुनाने गुजराथवर स्वारी करण्याचे साहस केले असावे.[१] पण हे बरोबर वाटत नाही. हेमचंद्र आणि मेरुतुंग या दोघांच्या वर्णनावरून या युद्धात कुमारपाल हाच आक्रमक होता असे दिसते. हेमचन्द्राच्या वृत्तांतावरून तर गुर्जरांचा शिलाहारांच्या राजधानीवरचा हल्ला अगदी आकस्मिक व अनपेक्षित होता, असे दिसते. सामान्यतः शिलाहार राजे शांतताप्रेमी होते. त्यांच्या इतिहासांत त्यांनी इतरांवर आक्रमण केल्याची उदाहरणे क्वचितच आढळतात. याच्या उलट कुमारपालाने अनेक आक्रमक युद्धे केली असल्याचे माहीत झाले आहे. तेव्हा त्यानेच या प्रसंगीहि आक्रमक पवित्रा घेतला असावा. मेरुतुंगाने सांगितलेले त्याचे पूर्वोक्त कारण मात्र काल्पनिक दिसते.

मल्लिकार्जुनानंतर द्वितीय अपरादित्याला गादी मिळाली. पण त्याचे मल्लिकार्जुनाशी नाते माहीत नाही. त्याचे लोनाड, ठाणे आणि परळ येथे अनुक्रमे शक संवत् ११०६, ११०७ आणि ११०८ चे शिलालेख सापडले आहेत.[२] त्यांपैकी एकातहि त्याने गुजराथच्या चौलुक्यांच्या सार्वभौमत्वाचा उल्लेख केला नाही. याच्या उलट परळच्या लेखावरून त्याने स्वातंत्र्यनिदर्शक 'महाराजाधिराज' आणि 'कोंकणचक्रवर्ती' या पदव्या धारण केलेल्या दिसतात. त्यांवरून चौलुक्यांचे जोखड त्याने लौकरच झुगारून दिलेले दिसते. त्याने सन ११७० ते ११९५ या कालात राज्य केले असावे.

अलीकडे सापडलेल्या शक संवत् ११२० (सन ११९८) च्या वसई शिलालेखावरून[3] द्वितीय अपरादित्यानंतर (द्वितीय) अनंतदेव गादीवर आला असे दिसते. पण त्यांचा परस्परसंबंध माहीत नाही. कदाचित् हा अनंतदेव द्वितीय अपरादित्याचा पुत्र असेल. तो नागार्जुनाचा पुत्र (शक संवत् १०१६ चा) पूर्वोक्त अनन्तदेव यापासून भिन्न होता. म्हणून त्याला 'द्वितीय अनन्तदेव' म्हटले पाहिजे. त्याने अल्पकाळ राज्य केले असावे. कारण यानंतर पाचच वर्षांनी शक संवत् ११२५ मध्ये द्वितीय केशिदेव[४] राज्य करीत होता, असे कळते. हा केशिदेव द्वितीय अनन्तदेवाचा भाऊ दिसतो.

---

१ A. K. Majumdar, *The Chaulukyas of Gujarat*, p. 114.

२ क्र. ३०–३२.

३ क्र. ३३.

४ अरिकेसरी हा प्रथम केशिदेव होय. क्र. ९, ओ. १४ आणि क्र. १० ओ. ११ पाहा.

या द्वितीय केशिदेवाचे तीन शिलालेख आतापर्यंत आपडले आहेत. त्यांतील पहिला शक संवत् ११२५ (सन १२०४) चा वसई तालुक्यात मांडवी येथे सापडला होता.[१] त्यात मांडवली (मांडवी) येथे लक्ष्मीनारायणदेवासमक्ष कांही दान दिल्याचा उल्लेख आहे. शेवटचा शक संवत् ११६१ (सन १२४०) चा चौधरपाडा येथील शिलालेख ऐतिहासिक दृष्टचा जास्त महत्त्वाचा आहे.[२] त्यावरून हा द्वितीय केशिदेव द्वितीय अपरार्काचा पुत्र असून त्याने त्या वर्षी बोपग्राम (सध्याचे वाबगाव) येथील एका शिवालयाच्या चार ब्राह्मण पुजाऱ्यांना एक शेत किंवा वाडी दान दिली होती, असे कळते. खोलेश्वराच्या आंबेजोगाई येथील शिलालेखावरून यादव नृपति सिंघणाने एका केशी राजावर विजय मिळविला होता असे कळते.[३] तो केशी हा द्वितीय केशिदेवच असावा.

या केशिदेवाच्या दोन कोरीव लेखांतले अंतर ३६ वर्षांचे असल्यामुळे त्याने दीर्घ काळ राज्य केले असे दिसते. त्याची कारकीर्द सन १२०० ते १२४५ या कालात झाली असावी

या केशिदेवानंतर तृतीय अनंतदेव राज्य करू लागला.[४] त्याचा एकच, शक संवत् ११७६ (सन १२५४)चा, शिलालेख दिवे आगर येथे सापडला आहे.

यानंतरचा आणि उत्तर कोकणचा शेवटचा शिलाहार नृपति सोमेश्वर याने ‘महाराजाधिराज’ आणि ‘कोंकणचक्रवर्ती’ अशा स्वतःच्या सम्राट्पदाच्या निदर्शक पदव्या धारण केल्या होत्या. त्याचे दोनच शिलालेख आतापर्यंत सापडले आहेत. त्यांतील अगोदरचा, शक संवत् ११८१ (सन १२५९)चा, कुलाबा जिल्ह्यातील उरणजवळ रानवड[५] येथे, आणि नंतरचा, शक संवत् ११८२ (सन १२६०)चा, पनवेल तालुक्यातील चांजे[६] येथे सापडला होता. त्या दोन्हींत सोमेश्वराच्या दानांचा उल्लेख आहे. पहिल्यात उल्लेखिलेले दान कांही ब्राह्मणांना आणि दुसऱ्यातील स्थानक (ठाणे) राजधानीतील उत्तरेश्वर देवाला दिले होते.

सोमेश्वर हा उत्तर कोकणचा शेवटचा शिलाहार राजा होय. त्याच्या कालात देवगिरीच्या यादवांची सत्ता वर्धिष्णु होती. यादव नृपति कृष्ण (सन १२४७–१२६१) याने मोठी सेना देऊन आपला सेनापति मल्ल याला उत्तर कोकणावर स्वारी करण्यास पाठविले. मल्लाने शिलाहार नृपतीचा पराभव केला, असे यादवांच्या

---

१ क्र. ३४. २ क्र. ३६.

३ ग. ह. खरे, ‘दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने’, भाग १, पृ. ६२ व ७१ पाहा.

४ क्र. ३७. ५ क्र. ३८. ६ क्र. ३९.

लेखात म्हटले आहे.[१] पण त्यामुळे यादवांना विशेष लाभ झालेला दिसत नाही. पण कृष्णानंतर गादीवर आलेल्या त्याच्या महादेव नामक भावाने हत्तींची मोठी सेना घेऊन उत्तर कोकणावर स्वारी केली. सोमेश्वराचा पराभव होऊन त्याने समुद्रात आश्रय घेतला. तेथेहि महादेवाने त्याचा पाठलाग केला. तेव्हा सोमेश्वर समुद्रात बुडून मृत्यु पावला. ह्या घटनेला उद्देशून हेमाद्रीने वर्णन केले आहे की सोमेश्वराने महादेव राजाच्या क्रोधाग्नीपेक्षा समुद्रातील वडवाग्नीला तोंड देणे पसंत केले असावे.[२] बृहन्मुंबईतील बोरिवली स्टेशनाजवळ कांही वीरगळ शिलांवर एका सागरी युद्धाचे शिल्प आहे, ते या युद्धाचे असावे. त्यांतील कांही वीरगळांवर गजयुद्धाचे व इतर कांहींवर नौकायुद्धाचे शिल्प कोरले आहे. त्यांत जहाजांचा तांडा युद्धात गुंतलेला दिसतो आणि युद्धाची धुमश्चक्री चाललेली दिसते. महादेव नृपतीच्या सैन्यात हत्तींची मोठी संख्या होती आणि या शिल्पांच्या घाटणीवरून ती तेराव्या शतकातील दिसतात. म्हणून हे शिल्पपट्ट महादेव व सोमेश्वर यांच्या युद्धाचे असावे असे अनुमान पुरातत्त्व खात्याचे कझेन्स याने केले होते,[३] ते संभवनीय आहे.

हे युद्ध सु. सन १२६५ मध्ये झाले असावे. त्यानंतर यादवांनी उत्तर कोकणच्या प्रशासनाकरिता अच्युत नामक राज्यपालाची नेमणूक केली. त्याचा ठाणे येथील शिलालेख सन १२७२ चा आहे.[४] त्यानंतर यादवांचे अनेक कोरीव लेख उत्तर कोकणात सापडले आहेत.[५]

---

१ *H. C. I. P.*, Vol. V, p. 192.

२ एतत्प्रतापो बहिरम्बुराशेरौर्वोन्तरेऽप्यस्ति कुतः प्रयामि । चिरं विमृश्येति यदीयवैरी सोमेश्वरो वाडवमेव यातः ।। हेमाद्रि, चतुर्वर्गचिन्तामणि, श्लो. १८.

३ Cousens, *Mediaeval Architecture in the Deccan*, p. 21. pl. IV.

४ *Ep. Ind.*, Vol. XIII, pp. 198 f.

५ उत्तर कोकणमध्ये सापडलेल्या शक संवत् ११८८ च्या शिलालेखात वर्णिलेला जैतुगिदेव हा सोमेश्वरानंतरचा शिलाहार नृपति होय, असे कांही विद्वानांनी प्रतिपादिले आहे (ए. इं., व्हॉ. २६, पृ. १२७ इ.). त्याने 'महाराजाधिराज' आणि 'कोंकणचक्रवर्ती' या पदव्या धारण केल्या होत्या, असे त्या शिलालेखावरून कळते. त्याचे कांही मंत्री व अधिकारी पूर्वी सोमेश्वराच्या नोकरीत होते, त्यावरून हे अनुमान केले आहे. या प्रश्नाची सविस्तर चर्चा आम्ही इतरत्र केली आहे. (*Studies in Indology*, Vol. IV, pp. 162 f.) हा जैतुगिदेव शिलाहारवंशी नसून माहीमचा राजा होता. सोमेश्वराच्या निधनानंतर त्याने आपले स्वातंत्र्य पुकारले. पण यादव नृपति रामचंद्राने पुढे त्याचा उच्छेद केला, हे त्याच्या पुरुषोत्तमपुरी ताम्रपटावरून कळते. ए. इं., व्हॉ. २५, पृ. २११ पाहा.

शिलाहारांनी उत्तर कोकणावर दीर्घ काळ – सुमारे साडे चारशे वर्षे – राज्य केले. त्यांच्या अमलाखाली ठाणे आणि कुलाबा हे जिल्हे होते. दक्षिण कोकणच्या शिलाहारशाखेचा अस्त झाला तेव्हा त्यांनी तो प्रदेशहि कांही काळ आपल्या राज्यास जोडला असावा. त्यांच्या उत्तर कोकणातील प्रदेशाला 'पुरी-कोंकण' किंवा 'पुरी-प्रभृति कोंकण' असे नाव होते. त्यात १४०० खेड्यांचा समावेश होता, अशी परंपरागत समजूत होती.[१] कांही प्राचीन लेखांत ही संख्या १४००० अशी दिली आहे,[२] तर इतर कांहीत त्याला (त्याच्या उत्पन्नावरून) 'सवालाखी' म्हटले आहे. त्यांची राजधानी स्थानक (सध्याचे ठाणे) येथे होती. त्यांचे अनेक लेख ठाणे जिल्ह्यात सापडले आहेत.

या शिलाहार नृपतींचा विद्या व कला यांना उदार आश्रय होता. अंबरनाथ, पेलार व वाळकेश्वर येथे अद्यापि विद्यमान असलेली देवालये तत्कालीन स्थापत्य व शिल्प या कलांतील नैपुण्याची साक्ष देतात. उत्तर कोकणात इतरत्रहि तत्कालीन ब्रह्मदेव, विष्णु महिषासुरमर्दिनी इत्यादि देवतांच्या सुंदर मूर्ति सापडल्या आहेत. सोड्ढलाच्या 'उदयसुंदरीकथे'त शिलाहारांच्या दरबारच्या चन्दनाचार्य, विजयसिंहाचार्य, महाकीर्ति, इन्द्र यांसारख्या अनेक जैन व हिंदूधर्मी कवींचा व विद्वानांचा उल्लेख आहे.[३] त्याच्याप्रमाणे त्यांनाहि शिलाहारांचा उदार आश्रय होता. 'याज्ञवल्क्यस्मृती'वरील 'अपरार्कटीके'ने धर्मशास्त्रातहि शिलाहारांचे नाव चिरस्मरणीय केले आहे

---

१ क्र. २९, ओ. ६४.

२ *C. I. I.*, Vol. IV, p. 149.

३ सोड्ढलाची 'उदयसुन्दरीकथा', पृ. १५५ पाहा. यांतील कांही ग्रंथकार नंतर लाटदेशाचा राजा वत्सराज याच्या आश्रयास गेले.

दक्षिण कोकणचे शिलाहार

बदामीचा चालुक्य नृपति मंगलेश याच्या कारकीर्दीत चालुक्यांनी दक्षिण कोंकण जिंकून घेतले होते. नेरूर ताम्रपटात[१] म्हटले आहे की मंगलेशाने अठरा युद्धांत विजयी झालेल्या चालुक्यवंशी स्वामिराजाला ठार केले. त्याची राजधानी रेवतीद्वीप (रत्नागिरी जिल्ह्यात वेंगुर्ल्याच्या दक्षिणेस आठ मैलांवरची रेडी) येथे होती. नंतर मंगलेशाने आपला नातलग बट्पुरा वंशातील सत्याश्रय ध्रुवराज इंद्रवर्मा याला दक्षिण कोकणाचा अधिपति केले. गोवा ताम्रपटावरून[२] तो शक संवत् ६१० (सन ६८८–८९) मध्ये रेवतीद्वीप येथे चार प्रांतांवर राज्य करीत होता, असे कळते. यानंतर मात्र दीर्घ काळपर्यंत दक्षिण कोकणाच्या राज्यकर्त्यांविषयी माहिती मिळत नाही. हा प्रदेश बदामीच्या चालुक्यांच्या मांडलिकांच्या – बहुधा सेंद्रकांच्या – अमलाखाली असावा. कारण सेंद्रकांचा प्रांत – प्राचीन सेंद्रकविषय – जवळच दक्षिणेस होता.

मागे सांगितल्याप्रमाणे राष्ट्रकूट सम्राट् दन्तिदुर्ग याने उत्तर कोकण जिंकून आपल्या राज्यास जोडले होते. नंतर त्याचा चुलता आणि उत्तराधिकारी प्रथम कृष्ण याच्या काळी दक्षिण कोकणात राष्ट्रकूटांची सत्ता प्रस्थापित झाली. या कृष्णराजाने शिलाहारवंशी सणफुल्लाची या प्रांताचा प्रशासक म्हणून नियुक्ति केली. या वंशातील रट्टराज याच्या ताम्रपटांत त्याचा पूर्वज सणफुल्ल याला कृष्ण-राजाच्या कृपेने राज्य मिळाल्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख आहे[३]. तो कृष्णराज म्हणजे सु. सन ७५८ ते ७७३ या कालात राज्य करणारा राष्ट्रकूटवंशी प्रथम कृष्णराज होय. हा सणफुल्ल शक संवत् ९३० आणि ९३२ चे ताम्रपट देणाऱ्या रट्टराजाचा नववा पूर्वज होता, असे त्या ताम्रपटांत म्हटले आहे. त्यावरून तो पूर्वोक्त राष्ट्रकूट प्रथम कृष्णराजाचा समकालीन होता, असे दिसते.

या शिलाहार वंशाचे फक्त तीन ताम्रपट आतापर्यंत मिळाले आहेत. त्यांतील पहिला, पट्टणकुडी येथील, ताम्रपट[४] शक संवत् ९१० मध्ये द्वितीय अवसराने दिला होता. दुसरे दोन, शक संवत् ९३० व ९३२ चे, ताम्रपट[५] त्याचा पुत्र

---

१ *Ind. Ant.*, Vol. VII, pp. 161 f.

२ *J. B. B. R. A. S.*, Vol. X, (old series), pp. 365.

३ क्र. ४१, ओ. २३–२४; क्र. ४२, ओ. ९–१०.

४ क्र. ४०. ५ क्र. ४१ व ४२.

रट्टराज याने दिले होते. रट्टराजाच्या ताम्रपटांत या दक्षिण कोकणच्या शिलाहारांची पुढील वंशावळ दिली आहे. पट्टणकुडी ताम्रपटात तीत थोडा फरक आहे; त्याची चर्चा पुढे करू.

सणफुल्ल (सु. सन ७६५–७८५)
|
धम्मियर (सु. सन ७८५–८२०)
|
ऐयपराज (सु. सन ८२०–८४५)
|
प्रथम अवसर (सु. सन ८४५–८७०)
|
आदित्यवर्मा (सु. सन ८७०–८९५)
|
द्वितीय अवसर (सु. सन ८९५–९२०)
|
इंद्रराज (सु. सन ९२०–९४५)
|
भीम (सु. सन ९४५–९७०)
|
तृतीय अवसर (सु. ९७०–९९५)
| (ज्ञात वर्ष सन ९८८)
रट्टराज (सु. सन ९९५–१०२४)
(ज्ञात वर्षे १००८ व १०१०)

पूर्वी सांगितल्याप्रमाणे सणफुल्लाने राष्ट्रकूट सम्राट् प्रथम कृष्णाच्या कृपेमुळे सह्याद्रि आणि पश्चिम सागर यामधील कोकण प्रदेश मिळविला होता, असे रट्टराजाच्या ताम्रपटात म्हटले आहे. पण त्या देशाचे नाव पट्टणकुडी ताम्रपटात येत नाही. सणफुल्ल गोवा प्रदेशावर राज्य करीत होता. त्या प्रदेशाला सिंहल असे नाव होते. त्याची राजधानी कोठे होती, याचा निर्देश ताम्रपटात नाही. पण ती बहुधा चंद्रपुर (सध्याचे गोव्याच्या दक्षिणचे परोदा नदीच्या डाव्या तीरावरील चांदोर) असावे. त्याचा पुत्र व उत्तराधिकारी धम्मियर याने समुद्रकिनाऱ्यावरील बलिपत्तन वसविले. वराहमिहिराच्या बृहत्संहितेत[१] ज्या 'बलदेवपत्तना'चा उल्लेख

१ बृहत्संहिता, १४, १६.

आहे, ते हेच असावे. टॉलेमीने अरिआके साडिनॉन (अपरान्त किंवा कोकण) यातील बल्तिपट्नाचा निर्देश केला आहे[१] तो याच स्थलाचा असावा. तसे असल्यास धम्मियराने ते नवीन वसविले नसून फक्त राजधानीला आवश्यक अशी त्याची तटबंदी केली असावी. हे बलिपत्तन सध्याचे रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण असावे. त्या ठिकाणी या वंशातील रट्टराजाचा एक ताम्रपट मिळाला आहे. धम्मियराने गोव्याच्या उत्तरेचा प्रदेश जिंकल्यावर त्याला खारेपाटणसारख्या मध्यवर्ती स्थानाची राजधानीकरिता जरूर वाटली असावी. कदाचित् शत्रूंनी त्याची चंद्रपुर राजधानी जिंकून घेतल्यामुळे त्याला ती बलिपत्तन येथे हलवावी लागली असेल. त्याचा उत्तराधिकारी ऐयप याच्या कारकीर्दीत ती शत्रूच्या ताब्यात होती, असे शिलाहारांच्या ताम्रपटांतील वर्णनावरून दिसते.

रट्टराजाच्या ताम्रपटांत धम्मियरानंतर ऐयप गादीवर आला, असे म्हटले आहे. पण पट्टणकुडी ताम्रपटात या दोघांमध्ये आमल्लाचे नाव दिले आहे. कदाचित् आमल्लाने राज्य केले नसेल; म्हणून रट्टराजाच्या ताम्रपटांत त्याचे नाव गाळले असावे. ऐयपाने आक्रमक धोरण स्वीकारून आपल्या वंशाची पूर्वीची राजधानी असलेल्या, पण नंतर शत्रूच्या हाती गेलेल्या, चंद्रपुरावर स्वारी केली आणि ते जिंकून घेतले. तेथे त्याने आपल्या विजयाच्या घोषणेकरिता स्वतःस नारळाच्या पाण्याने अभिषेक करवून घेतला, असे ताम्रपटात वर्णन आहे.

रट्टराजाच्या ताम्रपटांत ऐयपानंतर त्याचा पुत्र प्रथम अवसर हा राज्य करू लागला, असे म्हटले आहे, पण पट्टणकुडी ताम्रपटात त्याचे नाव गाळले आहे. बहुधा त्या ताम्रपटात तद्वर्णनपर एक श्लोक चुकीने गळला असावा. अवसर हा राजनीतिनिपुण होता, एवढीच त्याच्याविषयी माहिती मिळते. अवसरानंतर आदित्यवर्मा गादीवर आला. यानंतर मात्र या तीन्ही ताम्रपटांतील वंशावळींत एकवाक्यता आहे. आदित्यवर्म्यानंतर द्वितीय अवसर राज्य करू लागला. त्याने चेमुल्य आणि चंद्रपुर येथील राजांना साहाय्य केल्याचा उल्लेख पूर्वोक्त ताम्रपटांत येतो. चेमुल्याचा उल्लेख पश्चिम किनाऱ्यावरील बंदर म्हणून टॉलेमीच्या ग्रंथात येतो.[२] ते मुंबईच्या दक्षिणेस सुमारे ३० मैलांवरचे चौल होय. या स्थानाचा अधिपति बहुधा उत्तर कोकणच्या शिलाहारांचा मांडलिक असावा. त्यावेळी नुकताच गादीवर आलेला ठाण्याचा वप्पुवन्न अल्पवयस्क होता. ही संधि साधून चेमुल्याच्या सामन्ताने त्याच्या विरुद्ध बंड करून दक्षिण कोकणच्या द्वितीय अवसराच्या साहाय्याची प्रार्थना केली असावी. त्यानेहि आपल्या प्रभावाचा उत्तर कोकणात प्रसार व्हावा म्हणून त्याला साहाय्य केले, असे दिसते. दुसरा राजा गोव्यातील चंद्रपुरचा. त्याचे नाव

---

१ R. C. Majumdar, *The Classical Accounts of India*, p. 365.

२ *Ibid.*, p. 365.

ताम्रपटात आले नाही; पण तो गोव्याच्या कदंब राजवंशाचा मूळ पुरुष प्रथम षष्ठ ऊर्फ कंटकाचार्य असावा. अवसराच्या साहाय्याने त्याने तो प्रदेश जिंकून चंद्रपूर ही आपली राजधानी केलेली दिसते.

द्वितीय अवसरानंतर त्याचा पुत्र इंद्र गादीवर बसला. पण त्याच्याविषयी कांहीच माहिती मिळत नाही. त्यानंतर त्याचा पुत्र भीम राज्य करू लागला. त्याने चन्द्रमण्डल (गोव्यातील चन्द्रपुरसभोवारचा प्रदेश) जिंकून घेतला आणि अशा रीतीने आपल्या आजाच्या राजनीतीविरुद्ध आचरण केले. चंद्रपुरचा तत्कालीन राजा द्वितीय षष्ठदेवाचा पुत्र द्वितीय गूवल असावा.

भीमानंतर तृतीय अवसर गादीवर आला. तो थोर मनाचा आणि शांत-स्वभावी होता. त्याला 'अजातशत्रु' म्हणत असत. त्याने शक संवत् ९१० (सन ९८८) मध्ये पट्टणकुडी ताम्रपट दिला. त्यात कांही श्रेष्ठींनी चाळीस दीनार देऊन आपले दोन 'जीवलोक' किंवा वृत्ति कायम व्हाव्या म्हणून राजाची पादपूजा केली, असे म्हटले आहे. दीनार हे प्राचीन काळचे सोन्याचे नाणे होते. पुढे ते प्रचारातून गेले. म्हणून या लेखातील त्याचा उल्लेख ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाचा आहे.

उत्तर कोकणातल्याप्रमाणे दक्षिण कोकणाचे शिलाहार राजेहि राष्ट्रकूटांचे मांडलिक होते. तृतीय अवसराने पट्टणकुडी ताम्रपट शक संवत् ९१० (सन ९८८) मध्ये दिला. त्यापूर्वी सन ९७४ मध्ये द्वितीय तैलपाने राष्ट्रकूटांचा उच्छेद करून साम्राज्यसत्ता बळकाविली होती. त्यानंतर गंग नृपति मारसिंह याने राष्ट्रकूट नृपति तृतीय कृष्णाचा नातू आणि स्वतःचा जामात चतुर्थ इंद्र याला राष्ट्रकूटांचे राज्य परत मिळवून देण्याचा प्रयत्न केला; पण तो यशस्वी झाला नाही आणि इन्द्राने सन ९८२ मध्ये धार्मिक प्रायोपवेशनाने आपल्या जीविताचा अंत केला. तेव्हा तृतीय अवसराने सन ९८८ मध्ये पट्टणकुडी ताम्रपट दिला तेव्हा कोणीहि राष्ट्रकूट सम्राट् जिवंत नव्हता. तरीहि आपल्या पुरातन सम्राट् राष्ट्रकूट वंशाशी कृतज्ञताबुद्धीने अवसराने आपल्या ताम्रपटाच्या आरंभी राष्ट्रकूट सम्राटांची वंशावळ दिली आहे, आणि शेवटी बद्दिगदेवरूपी कल्पवृक्षाचा थोर अंकुर तैलपरूपी पर्वताखाली चिरडून गेल्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. बद्दिगदेव हा कोण याचे स्पष्टीकरण ताम्रपटावरून होत नाही.[1] तो बहुधा खोट्टिकाचा पुतण्या द्वितीय कक्कल असावा.

---

१ बद्दिगदेव हा कोण हे निश्चितपणे सांगता येत नाही. वर्णनाच्या धाटणीवरून तो चतुर्थ इंद्र असावा असे वाटते. आपली सत्ता स्थिर होण्यापूर्वीच त्याने आपली कारकीर्द संपविली होती. पण खारेपाटण ताम्रपटात (क्र. ४१, ओ. १७) तैलपाने उच्छेदिलेल्या राष्ट्रकूट राजाचे नाव कक्कल असे दिले आहे. कदाचित् कक्कलाचे बद्दिग असे दुसरे नाव असेल.

अवसर मोठ्या बिकट परिस्थितीत राज्य करीत होता. त्याच्या राष्ट्रकूट सम्राटाचा उच्छेद झाला होता तरी त्याने तैलपापुढे मान वाकविली नव्हती. म्हणून त्याने आपल्या ताम्रपटाच्या आरंभी आपल्या वंशाचे भूतपूर्व सम्राट् राष्ट्रकूट यांची वंशावळ दिली आहे.

तृतीय अवसरानंतर त्याचा पुत्र रट्टराज राज्य करू लागला. त्याची शक संवत् ९३० आणि ९३२ ची अशी दोन दानपत्रे मिळाली आहेत.[१] पट्टणकुटी-नंतरच्या वीस वर्षांच्या काळात उत्तरकालीन चालुक्यांनी कुन्तल देशात आपली सत्ता दृढ करून राष्ट्रकूटांच्या पूर्वीच्या मांडलिकांना वठणीवर आणण्याचा उद्योग आरंभिला होता. रट्टराजाला त्यांच्यापुढे नमावे लागले. तथापि त्याने शक संवत् ९३० च्या ताम्रपटात राष्ट्रकूटांची वंशावळ दिल्यानंतरच तैलप आणि त्याचा पुत्र सत्याश्रय यांची प्रशंसा केली आहे. त्या काळी सत्याश्रय रट्टपाडीवर (राष्ट्रकूटांच्या प्रदेशावर) राज्य करीत होता, असे शेवटी नमूद केले आहे.

खारेपाटण ताम्रपटात उल्लेखिले दान आचार्य अंभोजशिव याचा शिष्य आत्रेय याला दिले होते. हा अंभोजशिव शैव पंथाच्या मत्तमयूर शाखेच्या कर्करोणी नामक उपशाखेचा आचार्य होता. या दानाचा उद्देश अव्वेश्वर नामक शिवाची पूजा आणि त्याच्या देवालयाची डागडुजी हा होता. अव्वेश्वर या देवाच्या नावावरून ते देवालय रट्टराजाचा पिता तृतीय अवसर याने बांधून त्यातील शिवलिंगाला आपले नाव दिलेले दिसते. ज्या मत्तमयूर स्थलावरून या शाखेला हे नाव पडले होते ती मध्य हिंदुस्थानातील चालुक्यांची राजधानी होती. सध्या त्याला कद्वाहा असे नाव आहे.[२] तेथील राजांच्या साहाय्याने तेथे बांधलेली अनेक शिवालये खजूराहो येथील देवालयाशी सौंदर्यात स्पर्धा करणारी अद्यापि विद्यमान आहेत.[३] मत्त-मयुराच्या कर्करोणी या उपशाखेचे स्थान अद्यापि निश्चितपणे ठरविता येत नाही. ते मध्य भारतातच कोठेतरी असले पाहिजे. रट्टराजाच्या दुसऱ्या, शक संवत् ९३२ (सन १०१०) च्या, ताम्रपटात संकमैय नामक सेणावई (शेणवी) ब्राह्मणास[४] एक शेत दान दिल्याचा उल्लेख आहे.

---

१ क्र. ४१ व ४२.

२ *C. I. I.*, Vol. IV, pp. cii. f.

३ *Loc. cit.*

४ या ताम्रपटाचे संपादक चक्लदर यांनी सेणावई याचा सेनापति असा अर्थ केला आहे. पण त्या संदर्भात तो असंभवनीय वाटतो.

रट्टराज हा या शाखेचा शेवटचा ज्ञात राजा होय. सत्याश्रयाच्या मृत्यूनंतर चोलांशी झालेल्या लढायांमुळे उत्तरकालीन चालुक्यांच्या सत्तेला उतरती कळा लागली होती. या संधीचा फायदा घेऊन रट्टराजाने आपले स्वातंत्र्य उद्घोषित केले असावे. सत्याश्रयानंतर गादीवर आलेल्या पंचम विक्रमादित्याला त्याचे शासन करता आले नाही. पण त्याच्यानंतर गादीवर आलेल्या त्याच्या जयसिंह नामक भावाने दक्षिण कोकणावर स्वारी करून रट्टराजाचा उच्छेद केला आणि त्याची सर्व संपत्ति जप्त केली. या घटनेचा उल्लेख त्याच्या सन १०२४ च्या मिरज ताम्रपटात आला आहे. तो ताम्रपट त्याने दक्षिण कोकण जिंकून उत्तर कोकणावर स्वारी करण्याच्या तयारीत असताना कोल्हापूर येथील आपल्या शिबिरातून दिला होता.

या शाखेचे राज्य दक्षिण कोकणातील रत्नागिरी जिल्हा आणि गोव्याचा कांही प्रदेश यावर सु. सन ७६५ ते १०२४ पर्यंत सुमारे अडीचशे वर्षे होते. एका काळी तिची सत्ता उत्तरेस चौलपर्यंत पसरली होती. तिची राजधानी बलिपत्तन येथे होती. हे नगर सध्याचे खारेपाटण असावे.

कोल्हापूरचे शिलाहार

शिलाहारांची तिसरी शाखा सध्या आपण ज्याला दक्षिण महाराष्ट्र प्रदेश (Southern Maratha Country) म्हणतो त्यावर राज्य करीत होती त्यामध्ये सध्याच्या सातारा, सांगली, कोल्हापूर आणि बेळगाव या जिल्ह्यांचा समावेश होता. या प्रदेशाचा प्राचीन इतिहास बराचसा अज्ञात आहे. ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकात हा प्रदेश पूर्वकालीन राष्ट्रकूटांच्या अमलाखाली होता. त्या वंशाचा मूळ पुरुष मानाङ्क याने आपल्या नावे मानपुर नामक नगर स्थापून तेथे आपली राजधानी केली होती.[१] हे मानपुर सातारा जिल्ह्याच्या माण तालुक्याचे मुख्य ठिकाण माण असावे. या वंशाच्या अमलाखालचा प्रदेश प्राचीन कुन्तल देशात अन्तर्भूत होत असल्याने[२] त्याच्या राजांना कुन्तलेश्वर किंवा कुन्तलाधिपति असे नाव होते. या वंशातील राजांना उत्तरेतील बलाढ्य गुप्त सम्राटांचा पाठिंबा होता. राजशेखर, भोज, क्षेमेन्द्र इत्यादि अनेक संस्कृत ग्रंथकारांनी उल्लेखिलेल्या परंपरेप्रमाणे गुप्त नृपति द्वितीय चन्द्रगुप्त – विक्रमादित्य याने स्वकालीन राष्ट्रकूट नृपतीच्या–तो बहुधा मानाङ्काचा पुत्र देवराज असावा – दरबारात राजकवि कविकुलगुरु कालिदास याला आपला दूत म्हणून पाठविले होते. नंतर या घराण्याचे विदर्भाच्या वाकाटकांशी विवाहसंबंध झाले आणि पुढे ते त्यांचे सामन्त बनले. या प्रदेशात या वंशाचे राज्य बदामीच्या द्वितीय पुलकेशीच्या उदयापर्यंत चालू होते, असे दिसते. पुलकशीने आपला चुलता मंगलेश याच्या विरुद्ध उठाव केला, त्यावेळी भीमरथीच्या (भीमा नदीच्या) उत्तरेकडून चालुक्यांच्या राज्यावर स्वारी करणारा गोविंद हा या राष्ट्रकूट वंशाचा असावा.[३] नंतर पुलकेशीने त्याचा पराभव करून त्याचे राज्य खालसा केले आणि तेथे आपला भाऊ विष्णुवर्धन याची कांही काळ स्थापना केली.[४] पुढे हा प्रदेश त्याच्या स्वतःच्या अमलाखाली होता.

---

१ *Studies in Indology*, Vol. IV, pp. 124 f.

२ कुन्तल देशात कृष्णवर्णा किंवा कृष्णा नदीच्या काठच्या प्रदेशाचा अंतर्भाव होत असे. पुढील वर्णन पाहा – विख्यातकृष्णवर्णे तैलस्नेहोपलब्धसरलत्वे । कुन्तलविषये नितरां विराजते मल्लिकामोदः ॥ *Ep. Ind.*, Vol. XII, p. 153. करहाट – ४००० प्रदेशाचा कुन्तल देशात समावेश होत होता. *An. Rep. Ind. Ep.* for 1953–54, No. 18.

३ *Studies in Indology*, Vol. IV, pp. 124 f.

४ *Ind. Ant.*, Vol. IV, pp. 78 f.

बदामीच्या चालुक्यांच्या पतनानंतरचा या प्रदेशाचा इतिहास सुस्पष्ट नाही. तो राष्ट्रकूटांच्या साम्राज्यात अंतर्भूत झाला असावा आणि त्यांनी त्यावर एखाद्या सामन्ताची नेमणूक केली असावी. या कालातील त्यांची राजधानी बहुधा सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड (प्राचीन करहाटक) असावी. कर्नाटकातील उत्तरकालीन सिंद राजे आपल्या लेखांत स्वत:चा 'करहाटपुरवराधीश्वर' असा निर्देश करतात.[१] यासारख्या इतर बिरुदांप्रमाणे याचा अर्थ ते मूळचे करहाटाचे (कऱ्हाडचे) होते, असा केला पाहिजे. या सिंद राजांचे लेख अद्यापि कऱ्हाड येथे सापडले नाहीत; पण पश्चिम महाराष्ट्रात कोठेतरी सापडलेल्या सिंदनृपति आदित्यवर्मा याच्या एका अपूर्ण ताम्रपटावरून हा प्रदेश त्याच्या अमलाखाली ख्रिस्तोत्तर दहाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास होता असे दिसते.[२] या ताम्रपटात आदित्यवर्म्याने आपला आजा भीम आणि पिता मुंज यांचा निर्देश केला आहे. त्यात इन्द्र नदीच्या तीरावरील आणि जवळच लयनगिरि असलेला किणिहिक ग्राम दान दिल्याचा उल्लेख आहे. हे किणिहिक म्हणजे सध्याचे इंद्रायणी नदीच्या काठचे पुण्याच्या नैर्ऋत्येस १६ मैलांवरचे किन्है खेडे होय. त्याच्या जवळ प्राचीन लेणी आहेत. तेव्हा त्या ताम्रपटातील वर्णन याला ठीक जुळते. आदित्यवर्म्याने 'महासामन्त' पदवी धारण केली होती. त्याचा पूर्वोक्त अपूर्ण ताम्रपट शक संवत् ८८७ (सन ९६५) चा आहे. तो मान्यखेटच्या राष्ट्रकूटांचा मांडलिक असावा. त्याच्या काळी राष्ट्रकूटांची सत्ता दुर्बल झाल्यामुळे त्याने आपल्या सम्राटाचा निर्देश केला नसावा. पूर्वोक्त दान दिलेल्या गावाच्या स्थलनिश्चयावरून तो दक्षिण महाराष्ट्र प्रदेशावर राज्य करीत होता, असे दिसते. त्याच्या राजधानीचा निर्देश त्या ताम्रपटात नाही. तथापि तो सिंदवंशी होता आणि कर्नाटकातील कांही सिंदराजांच्या लेखांत ते मूळचे करहाटचे होते. या वर्णनावरून आदित्यवर्म्याची राजधानी करहाटच (कऱ्हाडच) असावी असे वाटते. या राजवंशाचा दुसरा ताम्रपट जुन्नरजवळच्या नारायणगावी सापडला होता. तो शकसंवत् ९३३ (सन १०११–१२) चा आहे.[३] तो अद्यापि अप्रकाशित आहे. तथापि त्यावरून या वंशाचे दक्षिण महाराष्ट्रावरील राज्य अकराव्या शतकाच्या प्रथम पादापर्यंत टिकून होते असे दिसते.

पुढे दाखविल्याप्रमाणे कोल्हापूरचे शिलाहार याच काळात उदयास आले. आदित्यवर्म्याच्या नंतरच्या सिंदवंशीयांचे सन १०१२ नंतरचे लेख अद्यापि दक्षिण महाराष्ट्रात सापडले नाहीत. म्हणून कोल्हापूरच्या शिलाहार शाखेचा द्वितीय जतिग

---

१ *Pali, Sanskrit and Old Kanarese Inscriptions*, No. 119.
२ *Ep. Ind.*, Vol. XIV, pp. 164 f.
३ *Ep. Ind.*, Vol. XXV, p. 164, n. 1.

याने आदित्यवर्म्याच्या वंशजाचा पराभव करून दक्षिण महाराष्ट्रात आपला अंमल बसविला असावा,[१] असे अनुमान करणे बहुधा चूक होणार नाही. तसे असल्यास करहाट ही या शिलाहारांची आरंभीची राजधानी असावी. कऱ्हाड येथे अद्यापि शिलाहारांचे लेख सापडले नाहीत. म्हणून त्यांनी लौकरच आपली राजधानी कोल्हापुरास हलविली असे दिसते. कोल्हापुर येथे व त्याच्या आसमन्तात् शिलाहारांचे अनेक लेख सापडले आहेत. तरीहि कोरीव लेखांत व वाङमयातहि त्यांचा उल्लेख 'करहाटाधिपति' असा येतो.[२]

इतर शाखांच्या प्रमाणे याहि शाखेचे राजे आपण विद्याधरनृपति जीमूतवाहन याच्या वंशातले असे सांगतात व आपल्या गरुडध्वजाचा निर्देश करतात. उत्तर कोकणाच्या शिलाहारांप्रमाणे ते 'तगरपुरवराधीश्वर' असे बिरुद धारण करून आपण मूळचे तगरपुरातील असे सूचित करतात. तथापि या दोन शाखांचे परस्पर संबंध माहीत नाहीत. या शाखेची कुलदेवता कोल्हापूरची महालक्ष्मी होती. हे राजे स्वतःच्या लेखात आपणांस महालक्ष्मीचा वरप्रसाद लाभला आहे, असा अभिमानाने उल्लेख करतात.[३] कोरीव लेखात यांच्या तीन राजधान्यांचा निर्देश आढळतो–(१) खिळिगिल,[४] प्रनालक[५] किंवा पद्मनाल[६] (सध्याचा कोल्हापूरच्या वायव्येस

---

१ विजयादित्याच्या (क्र. ५३ च्या) कोल्हापूर शिलालेखांतील वंशावळ या द्वितीय जतिगापासूनच सुरू होते. करहाट सोडावे लागल्यावर ही सिंदशाखा विजापूर जिल्ह्यात राज्य करू लागली असे दिसते. षष्ठ विक्रमादित्याच्या कारकीर्दीच्या सातव्या वर्षी (सन १०८२–८३) दिलेल्या तिडगुंडी (विजापूर जिल्हा) ताम्रपटात पुढील सिंदराजांचा उल्लेख आहे :भीम – त्याचा पुत्र सिंदराज – त्याचा पुत्र मुंज. मुंज शक संवत् १००४ (सन १०८२–८३) मध्ये राज्य करीत होता. वरील वंशावळीतील दोन नावे सिंदनृपति आदित्यवर्म्याच्या पूर्वोक्त ताम्रपटातल्या सारखी आहेत. भीमाचे वर्णन प्रत्यण्डक ४००० चा अधिपति, असे केले आहे. करहाट देशामधील ग्रामसंख्या हीच असल्यामुळे प्रत्यण्डक म्हणजे सध्याचे कऱ्हाड, असे काही विद्वान् म्हणतात. *Early History of the Deccan*, Vol. I, p. 52. इतरांच्या मते प्रत्यण्डक हे ओस्मानाबाद जिल्ह्यातील परेंडा असावे. *A History of Karnāṭaka*, p. 226. ते काही असले तरी भीमाचा काल शक संवत् ९३३ (सन १०११) जवळ येतो यात संशय नाही.

२ *H. K.*, p. 176. ३ क्र. ४३, ओ. ३०.

४ क्र. ४३, ओ. ३१–३२. ५ क्र. ५९, ओ. १. ६ क्र. ६०, ओ. ३१.

१२ मैलांवरचा पन्हाळगड); (२) क्षुल्लकपुर[1] किंवा कोल्लापुर (सध्याचे कोल्हापुर) आणि (३) वल्लवाड (वलवाड)[2] (बहुधा कोल्हापूरच्या पूर्वेस ५ मैलांवर असलेले वळिवडे) -- या त्या तीन राजधान्या होत.

बिल्हणाने विक्रमांकदेवचरितात विद्याधर (शिलाहार) वंशी राजकन्या चन्द्रलेखा हिचा स्वयंवर वर्णिला आहे. त्याने तिच्या पित्याचे नाव दिले नाही, पण त्याचा 'करहाटपति' (करहाट देशाचा अधिपति) असा उल्लेख केला आहे त्यावरून कऱ्हाड हे त्या काळी शिलाहारांच्या राजधानीचे शहर होते असे दिसते.[3] चन्द्रलेखेचा पिता शिलाहार नृपति मारसिंह (सु. सन १०५० – १०७५) हा असावा. मिरज ताम्रपटात त्याचा पिता गोंक याचे करहाट विषयाचा अधिपति असे वर्णन आले आहे. गोंकाच्या पित्याने सिंदवंशीयांचा पराभव करून करहाट येथे आपली राजधानी स्थापिली होती असे दिसते. पण या विवाहानंतर लौकरच शिलाहारांना आपली राजधानी कऱ्हाडहून कोल्हापुरास हलवावी लागली. नंतरच्या काळात करहाट येथे चालुक्य राजपुत्र मल्लिकार्जुन (चन्द्रलेखेचा पुत्र) आणि षष्ठ विक्रमादित्याचा मांडलिक जोगम हे कांही काल राज्य करीत होते, असे उल्लेख आढळतात.

चन्द्रलेखेने षष्ठ विक्रमादित्याला आपल्या स्वयंवरात वरले होते. ती विद्येत व कलांत पारंगत असल्याने कोरीव लेखांत तिचे 'नृत्यविद्याधरी' आणि 'अभिनव-शारदा' (किंवा 'अभिनवसरस्वती') असे वर्णन येते. ती स्वतः चालुक्यांच्या कांही प्रदेशातील राज्यकारभार पाहात असे.

या शाखेची वंशावळ खाली दिली आहे.

प्रथम जतिग (सु. सन ९४० – ९६०)
|
नायिवर्मन् (सु. सन ९६० – ९८०)
|
चन्द्र (सु. सन ९८० – १०००)
|
द्वितीय जतिग (सु. सन १००० – १०२०)

---

१ क्र. ५३, ओ. १९. क्र. ४८, ओ. २४–२५ मध्ये त्याचे नाव कोल्लापुर असे आले असून त्याला 'महातीर्थ' म्हटले आहे.

२ क्र. ४८, ओ. २२. क्र. ५४, ओ. ११ मध्ये त्याचे 'वळवाड', आणि क्र. ५८, ओ १९ मध्ये 'वलवाड' असे नाव येते.

३ सर्ग ८, श्लो. २.

- द्वितीय जतिग (सु. सन १०००–१०२०)
  - प्रथम गोंक (सु. सन १०२० – १०५०)
    - मारसिंह (सु. सन १०५० – १०७५) (ज्ञात वर्ष सन १०५८)
      - द्वितीय गूवल (सु. सन १०७५ – ११००)
      - द्वितीय गोंक
      - बल्लाळ (सु. ११००– ११०५)
      - प्रथम भोज
      - गंडरादित्य (सु. सन ११०५ – ११४०) (ज्ञात वर्षे १११०, १११५, १११८, ११२८, ११३५)
        - विजयादित्य (११४० – ११७५) (ज्ञात वर्षे ११४३, ११५३)
          - द्वितीय भोज (११७५ – १२१२) (ज्ञात वर्षे ११७८, ११८७, ११९०, ११९१, ११९४)
  - प्रथम गूवल
  - कीर्तिराज
  - चन्द्रादित्य

उत्तर व दक्षिण कोकणचे शिलाहार आपल्या लेखांत आपल्या राष्ट्रकूट सम्राटांची वंशावळ देतात तशी या शाखेचे शिलाहार देत नाहीत. याची कारणे ही शाखा राष्ट्रकूटांच्या अवनतीच्या काळात उदयास आली आणि तिच्या पहिल्या कांही राजांचे लेख अद्यापि सापडले नाहीत ही होत. पण ही शाखाहि प्रथम राष्ट्रकूटांच्या आश्रयानेच उदयास आली, यात संशय नाही. गंडरादित्याच्या कोल्हापूर ताम्रपटात म्हटले आहे की या शाखेचा मूळ पुरुष प्रथम जतिग हा गोमंथ किल्ल्याचा अधिपति[१] आणि गंगनृपति पेर्मानडि याचा मामा होता.[२] गोमन्थ हे नाव ज्या टेकडीवर चन्द्रगुप्ति किंवा चन्द्रगुत्ति ही राजधानी बसली होती तिचे असावे. ही टेकडी कर्नाटक देशाच्या शिमोगा जिल्ह्यात आहे. यावरून असे दिसते की जरी कोल्हापूरची शिलाहार शाखा मूळची तगरपुरची, तरी ती प्रथम कांही काळ दक्षिण कर्नाटकात राज्य करीत होती. या शाखेचे पहिले राजे तेथे होऊन गेले असावे. नंतर तिने कऱ्हाडजवळचा प्रदेश जिंकून तेथे आपले राज्य स्थापले. जतिगाला आपला भाचा गंगनृपति पेर्मानडि अथवा मारसिंह याचा यथार्थ अभिमान होता. हा मारसिंह राष्ट्रकूट सम्राट् तृतीय कृष्ण याचा मेव्हणा बूतुग याचा पुत्र होता.

---

१ क्र. ४६, ओ. ६. २ पूर्वोक्त, ओ. ७.

मारसिंहाने तृतीय कृष्णाच्या लढायांत भाग घेतला होता व राष्टकूटांच्या अवनति-काळांत त्या वंशाचे राज्य टिकविण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले होते, याचा जतिगाला साहजिकच अभिमान वाटत होता.

पूर्वोक्त वंशावळीतील आरंभीच्या कांही राजांची नावे गंडरादित्याच्या दोन लेखांवरूनच ज्ञात झाली आहेत आणि त्या लेखांतहि त्यांची मोघम प्रशंसा केली आहे. म्हणून डॉ. अळतेकरांनी असे म्हटले आहे की त्यांना सामन्तपदहि प्राप्त झाले नसावे. त्यांचे वंशज मोठ्या पदास चढल्यावर त्यांनी आपल्या पूर्वजांचे राजे म्हणून वर्णन केले असावे. पण मागे सांगितल्याप्रमाणे सिंदवंशीयांचा शक संवत् ९३३ (सन १०११) चा ताम्रपट दक्षिण महाराष्ट्रात सापडला असल्यामुळे अकराव्या शतकाच्या प्रथम पादापर्यंत सिंदवंशीयांचे राज्य दक्षिण महाराष्ट्रात टिकून होते, असे दिसते. नंतर शिलाहार द्वितीय जतिगाने तो प्रदेश जिंकून करहाट (कऱ्हाड) येथे आपली राजधानी केली असावी. पुढे त्याने पन्नाळ दुर्ग (पन्हाळा किल्ला) जिंकून आपल्या सत्तेचा विस्तार केला.

या शाखेचा पहिला ज्ञात लेख मारसिंहाचा शक संवत् ९८० (सन १०५८) चा मिरज ताम्रपट होय.[१] मारसिंह प्रथम जतिगापासून पांचव्या पिढीतला. तेव्हा हा जतिग त्याच्या सुमारे शंभर वर्षे पूर्वी (सु. सन ९४०–९६० मध्ये) राज्य करीत असावा. त्याचे गंग नृपति मारसिंह याच्याशी जे नाते होते, त्यावरूनहि हाच काळ सूचित होतो. जतिगाने राष्ट्रकूटांचे स्वामित्व मान्य केले असावे. पण नंतर राष्ट्रकूटांची सत्ता दुर्बळ होत गेल्यामुळे त्याच्या वंशजांनी आपले स्वातंत्र्य उद्घोषित केले, असे दिसते. तथापि आपणांस जतिग आणि त्याचा पुत्र नायिवर्मा आणि नातू चन्द्रराज यांच्या राजवटीतील घटनांची कांहीच माहिती नाही. त्यांचे राज्यहि महाराष्ट्राबाहेर कर्नाटकावर होते, असे दिसते.

चंद्रराजाचा पुत्र द्वितीय जतिग याचे त्याचा नातू मारसिंह याच्या मिरज ताम्रपटात 'पन्नाळदुर्गाद्रिसिंह' (पन्हाळे किल्ला हाच कोणी पर्वत त्यांतील सिंह) असे वर्णन केले आहे.[२] त्यानेच तो दुर्ग प्रथम जिंकून घेतला असावा. त्याने त्याचे सामर्थ्य निश्चितच वाढले असावे. त्याने सभोवतालच्या प्रदेशावर आपली सत्ता स्थापण्याचा प्रयत्न केला, असे दिसते. त्यावेळी उत्तरकालीन चालुक्यांच्या चोल व परमार यांच्याशी लढाया चालू असल्यामुळे जतिगाला आपल्या राज्यविस्तारासाठी नामी संधि प्राप्त झाली असावी. कदाचित् चालुक्यांच्या संमतीनेहि त्याने हा उद्योग केला असेल.

---

१ क्र. ४३. २ पूर्वोक्त, ओ. ६.

कारण त्याचा पुत्र गूवल हा सत्याश्रयाचा प्रिय मित्र होता असे त्या लेखात म्हटले आहे.[१] हा सत्याश्रय म्हणजे उत्तरकालीन चालुक्यवंशसंस्थापक द्वितीय तैलप याचा तन्नामक पुत्र (सु. सन ९९७-१००८) होय. गूवलाने सत्याश्रयाच्या कांही स्वाऱ्यांत (उदाहरणार्थ, त्याची उत्तर कोकणाच्या अपराजितावरील स्वारी यासारख्यांत) भाग घेतला असावा.

द्वितीय जतिगाने स्वकालीन अन्य नृपतींशी राजनैतिक सख्य जोडून आपले सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. हेमचन्द्राच्या 'द्व्याश्रयकाव्या'त (६, ३२) म्हटले आहे की महालक्ष्मीच्या कृपेने आपल्या पित्याला झालेल्या कोल्लापुरच्या राजाने चौलुक्य नृपति चामुंडराजाला (सु. सन ९९५-१००८) उत्कृष्ट माणकांचा नजराणा पाठविला होता. यात त्याचा उद्देश चामुंडराजाचे राजनैतिक सख्य साधण्याचाच असावा. हा कोल्हापुरचा राजा द्वितीय जतिग दिसतो.

द्वितीय जतिगाचा पुत्र आणि उत्तराधिकारी गोंक याचे वर्णन त्याचा पुत्र मारसिंह याच्या ताम्रपटात पुढीलप्रमाणे आले आहे. तो करहाट, कुण्डी, मिरिंज देश आणि समग्र कोकणदेश यांचा अधिपति होता. करहाट हे कऱ्हाड होय. मिरिंज म्हणजे सध्याचे मिरज. कुंडिदेश हे बेळगावसभोवारच्या प्रदेशाचे नाव होते. कोकण याने दक्षिण कोकणाचा निर्देश केला असावा. गोंक हा चालुक्य सम्राट् जयसिंह याचा समकालीन होता. जयसिंहाच्या सन १०२४ च्या मिरज ताम्रपटात म्हटले आहे की तो दक्षिण कोकण जिंकून झाल्यावर उत्तर कोकणच्या स्वारीकरिता त्यावेळी कोल्हापूर येथे तळ देऊन राहिला होता.[२] गोंकाने जयसिंहाला दक्षिण कोकण जिंकण्यात साहाय्य केले असावे आणि नंतर जयसिंहाकडून तो प्रदेशहि मिळविला असावा. त्याच्या काळचे लेख उपलब्ध न झाल्यामुळे त्याने किती काळ चालुक्यांचे स्वामित्व मान्य केले, हे समजण्यास मार्ग नाही.

गंडरादित्याच्या ताळले ताम्रपटात[३] प्रथम गूवल (याचे गूहल असे दुसरे नाव होते) आणि कीर्तिराज यांचा गोंकाचे भाऊ म्हणून उल्लेख आहे. त्यांचे राजे म्हणून वर्णन आल्यामुळे ते गोंकानंतर एकामागून एक गादीवर आले, असे समजले जाते. गूवल हा (चालुक्य नृपति) सत्याश्रयाचा प्रिय मित्र होता, असेहि म्हटले आहे. विजयादित्याच्या कोल्हापुर ताम्रपटात गोंकाच्या चंद्रादित्य नामक तिसऱ्या भावाचा उल्लेख येतो. हे तीन्ही भाऊ गोंकानंतर एकामागून एक गादीवर आले असणे संशयास्पद आहे. त्यांच्यापैकी एकाचेहि लेख मिळाले नाहीत. त्या सर्वांनी राज्य केले होते असे मानल्यास ते सर्व निपुत्रिक वारले, असे म्हणावे लागेल. ते

---

१ क्र. ४३, ओ. १४.

२ *Ind. Ant.*, Vol. VIII, p. 18. ३ क्र. ४५.

अर्थातच असंभवनीय वाटते. तेव्हा ते शिलाहार राज्याच्या भिन्न भिन्न प्रांतांवर अधिपति नेमले गेले होते, म्हणून त्यांना कोरीव लेखांत राजे म्हटलेले दिसते.

गोंकानंतर त्याचा पुत्र मारसिंह गादीवर आलेला दिसतो. त्याने आपला मिरज ताम्रपट शक संवत् ९८० (सन १०५८) मध्ये दिला होता.[१] त्यात तो आपली 'महामण्डलेश्वर' अशी पदवी उल्लेखितो, पण आपल्या सम्राटाचा नामनिर्देश करीत नाही. त्यावरून त्याने आपले स्वातंत्र्य जाहीर केले नसले तरी तो बराच प्रबळ असावा. त्याने अनेक बिरुदे धारण केली होती. त्यांपैकी ' रूपनारायण ' हे एक होते. हे बिरुद त्याच्यानंतर त्याच्या कांही वंशजांनीहि धारण केले होते. आपणास श्रीमहालक्ष्मीचा वरप्रसाद मिळाला आहे, असे तो आपल्या ताम्रपटात सांगतो. त्याची राजधानी खिळिगिळ (पन्हाळगड) येथे होती. आपल्या मिरज ताम्रपटात त्याने पाशुपतपंथी ब्रह्मेश्वर पंडिताचा शिष्य चिक्कदेव याला कुंटवाड गांव दान दिल्याचा उल्लेख आहे. हे कुंटवाड कृष्णानदीच्या काठचे मिरजेच्या दक्षिणेस पांच मैलांवरचे कुडवाड असावे. मारसिंहाचा पुत्र गंडरादित्य याच्या काळच्या लेखांत नागलदेवी नामक जैनधर्मी राणीचा उल्लेख आदराने येतो. ती त्याची माता (मारसिंहाची राणी) असावी.

मारसिंहाला (द्वितीय) गूवल, (द्वितीय) गोंक, बल्लाळ, प्रथम भोज आणि गंडरादित्य असे पांच पुत्र होते. पूर्वोक्त द्वितीय जतिगाच्या पुत्रांप्रमाणे त्यांना प्रांताधिपति केले असावे. बल्लाळ व गंडरादित्य पुढे गादीवर आले.

' विक्रमांकदेवचरिता 'त बिल्हणाने विद्याधर (शिलाहार) राजकन्या चन्द्रलेखा हिच्या सौंदर्याचे विस्तृत वर्णन करून तिच्या करहाट येथे झालेल्या स्वयंवराची माहिती दिली आहे.[२] या स्वयंवराकरिता चेदि, कान्यकुब्ज, मालव, गुर्जर, पांडय, चोल इत्यादि भारताच्या सर्व प्रदेशांतील राजे जमा झाले होते. बिल्हणाचे हे वर्णन कालिदासाच्या ' रघुवंशा 'तील इंदुमतीस्वयंवराच्या धाटणीवर आहे. ते ऐतिहासिक दृष्टचा विश्वसनीय मानता येत नाही. तथापि षष्ठ विक्रमादित्याने एका अपूर्व सौंदर्याच्या शिलाहार राजकन्येशी विवाह केला होता, हे दूरच्या काश्मीरातहि माहीत झाले होते. कल्हण सांगतो[३] की काश्मीरचा राजा हर्ष याने जेव्हा कर्णाटनृपति पर्माण्डि (षष्ठ विक्रमादित्य) याच्या अलौकिक सौंदर्याच्या चन्दलेची (चन्द्रलेखेची) तसबीर पाहिली तेव्हा तो मदनपरवश झाला आणि त्याने पर्माण्डीला जिंकून चन्दलेला आणण्याची प्रतिज्ञा केली, आणि तोपर्यंत आपण अपक्व कापूर सेवन करणार नाही, असेहि त्याने जाहीर केले. कल्हणाने त्याच्या मूर्खपणाची चेष्टा केली आहे.

---

१ क्र. ४३. २ तरंग ८ व ९.

३ तरंग ७, श्लो. ११११९ इ.

ही चन्द्रलेखा कोणत्या राजाची कन्या होती हे कल्हणाने सांगितले नाही. तथापि शिलाहार नृपति मारसिंह हाच षष्ठ विक्रमादित्याचा ज्येष्ठ समकालीन असल्याने ती त्याचीच कन्या असावी.[१]

मारसिंहानंतर द्वितीय गूवल व त्याच्यानंतर बल्लाळ गादीवर आलेले दिसतात. होन्नूरच्या शिलालेखात बल्लाळ व गंडरादित्य या दोघांचा नामनिर्देश आला असला तरी बल्लाळालाच 'महामण्डलेश्वर' उपाधि लावली आहे. भोजाचा राजा म्हणून कोठेहि उल्लेख नाही, त्यामुळे तो गादीवर आला नसावा. त्याने येलबुर्ग्याच्या सिंद नृपतींच्या प्रदेशावर स्वारी केली होती[२] पण सिंदनृपति द्वितीय आचुगि याच्या कोडिकोप कोरीव लेखात म्हटले आहे की त्याच्या मुलखावर स्वारी करणाऱ्या भोजाला व त्याच्या सैन्याला त्याने ओकून टाकले होते. याचा अर्थ असा दिसतो की त्याने भोजाला पकडून नंतर मुक्त केले होते. या लेखाचा काल वर्तमान शक संवत् १०४५ (सन ११२२) असल्याने हा भोज पहिला तन्नामधारी शिलाहार नृपति असावा. त्याने आपला वडील भाऊ बल्लाळ याच्या कारकीर्दीत येलबुर्ग्याच्या सिंदराजांच्या प्रदेशावर स्वारी केली, पण तीत त्याचा पराभव झाला, असे दिसते. त्याचे चालुक्यनृपति षष्ठ विक्रमादित्य याच्याशीहि बिनसले होते. सन ११०० मध्ये या विक्रमादित्याने भोजावरील स्वारीत भीमरथीच्या (भीमेच्या) काठी मुक्काम केला होता असा उल्लेख एका कोरीव लेखात आढळतो.[३]

बल्लाळानंतर गादीवर आलेल्या गंडरादित्याचे अनेक लेख – सन १११० पासून ११३५ पर्यंतचे – सापडले आहेत.[४] 'आपण मिरिंज देश, सात खोल्ल आणि कोकण या देशांचा एकच एक अधिपति आहो' असे तो एका लेखात म्हणतो. हे कोकण दक्षिण कोकण दिसते. चालुक्य जयसिंहाने ते जिंकून घेतल्यापासून त्याच्या बऱ्याचशा भागावर कोल्हापूरच्या शिलाहारांची सत्ता होती. गंडरादित्य या प्रदेशावर षष्ठ विक्रमादित्याचा मांडलिक म्हणून राज्य करीत असावा. कारण या विक्रमादित्याने सात कोकणे (म्हणजे दक्षिण कोकणाचा सर्व प्रदेश) आपल्या हाताच्या कंकणाप्रमाणे धारण केली होती, असे एका लेखात म्हटले आहे.[५]

---

१ मारसिंह सु. सन १०५० ते १०७५ या कालात राज्य करीत होता. षष्ठ विक्रमादित्याची कारकीर्द सन १०६७ ते ११२६ पर्यंत होती.

२ *J. B. B. R. A. S.*, Vol. XI, p. 269.

३ P. B. Desai – *A History of Karnāṭaka*, p. 176.

४ क्र. ४५–५१.

५ *H. C. I. P.*, Vol. V, p. 176.

ताळले ताम्रपटात[१] म्हटले आहे की गंडरादित्याने प्रयाग येथे लक्ष ब्राह्मणांना भोजन घातले. हे प्रयाग उत्तरेतील गंगा–यमुना संगमावरचे नसून कोल्हापूर-जवळ कासारी आणि भोगावती नद्यांच्या पंचगंगेशी झालेल्या संगमाजवळचे होय. गंडरादित्याने आजुरिका (कोल्हापूर जिल्ह्याच्या आजरे महालाचे मुख्य स्थान) येथे जिनालय बांधून त्याला आपल्या 'त्रिभुवनतिलक' विरुदाचे नाव दिले होते.[२] त्याचा सामन्त निंबरस याने कोल्हापूरच्या शुक्रवार वेशीजवळ दुसरे जिनालय बांधून त्यालाहि गंडरादित्याच्या 'रूपनारायण' नामक दुसऱ्या बिरुदाचे नाव ठेवले होते.[३] या जिनालयाच्या अनेक आचार्यांची नावे तत्कालीन शिलालेखात येतात.[४]

गंडरादित्याने इरुकुडी (मिरज तालुक्यातील इरळी) येथे एक तलाव खोदून त्याला 'गंडसमुद्र' नाव दिले होते. त्याच्या बांधाशेजारी त्याने हिंदू, बौद्ध आणि जैन धर्मांची देवालये बांधून भूमिदाने दिली होती.[५] या काळात बौद्ध धर्म भारतातून जवळ जवळ नष्ट झाला होता; म्हणून बौद्ध देवालयाचा हा उल्लेख महत्त्वाचा आहे. दुसऱ्या एका ताम्रपटात त्याने आपल्या मैलपैय्य या मंत्र्याच्या विनंतीवरून कोल्हापूरजवळ पंचगंगेच्या काठच्या ब्रह्मपुरी उपनगरात खेडादित्याच्या देवालयाला भूमिदान दिल्याचा निर्देश आहे. हा ताम्रपट शक संवत् १०४८ (सन ११२८) च्या कर्कट संक्रान्तीला दिला होता.[६]

गण्डरादित्याला कर्णादेवी नामक जैनधर्मी राणी होती.[७] त्याचा स्वतःचाहि जैन धर्माकडे बराच ओढा होता. त्याने व त्याच्या कांही मंत्र्यांनीहि त्याच्या कारकीर्दीत कोल्हापुरात व इतरत्र जैन मंदिरे बांधलीं होती. तथापि तो स्वतःच्या लेखात आपणांस श्रीमहालक्ष्मीचा वरप्रसाद प्राप्त झाल्याचे नमूद करतो. शिरोळ-जवळच्या खिद्रापूर गावी त्याने कोप्पेश्वर नामक भगवान् शंकराचे उत्तुंग आणि सुंदर देवालय बांधण्यास आरंभ केला होता.

गंडरादित्याला बहुधा कर्णादेवीपासून झालेला पुत्र विजयादित्य याने स्थानकाच्या पदच्युत राजाला त्याचे राज्य मिळवून दिले, असे कशेळी ताम्रपटात म्हटले

१ क्र. ४५, ओ. ३१.

२ सोमदेवाच्या 'शब्दार्णवचंद्रिके'तील पुढील उतारा पाहा – कोल्लापुरदेशान्तर्वर्त्याजुरिकामहास्थानयुधिष्ठिरावतारमहामण्डलेश्वरगण्डरादित्यनिर्मापितत्रिभुवनतिलकजिनालये . . . । 'त्रिभुवनतिलक' या नावाचेच चन्द्रप्रभजिनाचे मंदिर कोल्हापुर येथेहि गण्डरादित्याच्या कारकीर्दीत बांधले होते, असे कर्णपार्याच्या 'नेमिनाथपुराणा'वरून कळते.

३ See the Terdāl Stone inscription. *Ind. Ant.*, XIV, pp. 14 f.

४ क्र. ४७, ४९ व ५०. ५ क्र. ४५, ओ ३४. ६ क्र. ४८.

७ क्र. ५०, ओ. ४. ओ. ५ मध्ये उल्लेखिलेली नागलदेवी गंडरादित्याची माता असावी.

आहे.[१] ही घटना गंडरादित्याच्या काळी घडली असावी. हा उल्लेख कदंबनृपति द्वितीय जयकेशीने अनन्तपाल किंवा प्रथम अनन्तदेव यास ठार मारून उत्तर कोकणाचे राज्य कांही काळ बळकावले होते, त्या घटनेला अनुलक्षून असावा.[२] त्या वेळी गंडरादित्य वृद्ध झाल्यामुळे त्याने आपल्या पुत्रास अनन्तदेवाचा पुत्र अपरादित्य याच्या साहाय्यास पाठविले असावे. विजयादित्याने जयकेशीला उत्तर कोकणातून हाकून लावून अपरादित्याला त्याचे राज्य मिळवून दिले.

गंडरादित्याने आपला सामन्त निंबरस यास मोठे सैन्य देऊन आपल्या चालुक्य सम्राटाच्या साहाय्यास पाठविले होते.[३] कोल्हापूरच्या एका लेखात निंबदेवाचे वर्णन 'तोंड मंडलाच्या सरदाररूपी कमलसमूहांचा नाश करणारा मदोन्मत्त हत्ती' असे केले आहे.[४]

गंडरादित्यानंतर विजयादित्य सु. सन ११४० मध्ये गादीवर आला. आपल्या पित्याप्रमाणे त्यानेहि अनेक बिरुदे धारण केली होती व पंचमहाशब्दांचा अधिकार प्राप्त करून घेतला होता. त्याने उत्तरकालीन चालुक्य नृपति द्वितीय तैलप याला पदच्युत करण्यात प्रमुख भाग घेतला होता, असे दिसते. त्याच्या साहाय्यामुळेच बिज्जलाला राज्य मिळाले, असे म्हटले आहे. त्याने स्थानकाच्या (ठाण्याच्या) पदभ्रष्ट राजाला त्याचे राज्य मिळवून दिल्याचे मागे सांगितले आहेच. त्याने गोव्याच्या राजालाहि तसेच साहाय्य केले होते. हा उल्लेख द्वितीय जयकेशीचा पुत्र पेर्माडि याचा कलचुरि बिज्जल याच्याशी जो झगडा झाला त्याला अनुलक्षून असावा. बिज्जलाने त्याला आपल्या दरबारात उपस्थित राहण्याची आज्ञा केली, पण विजयादित्याने ती जुमानली नाही. तेव्हा बिज्जलाने त्याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला असे 'बल्लाळचरिता'त म्हटले आहे; पण ते कितपत खरे आहे हे सांगता येत नाही. शिरोळच्या आग्नेयेस बारा मैलांवर कोप्पेश्वराचे कांही अंशी अपूर्ण राहिलेले देवालय आहे. त्याच्या अनेक ब्रॅकेटांवर बोप्पण दंडनायकाचे अनेक कोरीव लेख आहेत. त्यांवरून त्याने त्या ठिकाणी घनघोर युद्धात मोठा विजय मिळविलेला दिसतो.[५] या लेखांत कालाचे निर्देश नाहीत. पण एका लेखात बोप्पणाला 'विजयादित्याचा दंडनायक (सेनापति)' म्हटले आहे. त्यांत शत्रूचाहि उल्लेख नाही. कदाचित् तो बिज्जलच असावा. विजयादित्य आपले स्वामित्व कबूल करीत नाही, असे समजल्यावर बिज्जलाने त्याच्या प्रदेशावर स्वारी केली, पण

१ क्र. ६०, ओ. १७.

२ मागे [पृ. ३१] पाहा.

३ क्र. ४९, ओ. ७.

४ पूर्वोक्त.

५ *I. N. K. K. S.*, p. 175.

खिद्रापुरजवळ झालेल्या लढाईत त्याचा पुरा मोड झालेला दिसतो. बोप्पणाचे लेख त्या विजयाला अनुलक्षून असावे. विजयादित्य आपल्या लेखात बिज्जलाच्या स्वामित्वाचा उल्लेख करीत नाही हेहि येथे उल्लेखनीय आहे.

विजयादित्याची पट्टराणी पोन्नलदेवी हिचा उल्लेख तत्कालीन कन्नड कवि कर्णपार्य याच्या 'नेमिनाथपुराणा'त आला आहे. त्या पुराणात कर्णपार्याने सामन्त निंबदेवरस, विजयादित्याचा करणाग्रणी आणि आपला आश्रयदाता लक्ष्मण इत्यादिकांचा उल्लेख केला आहे.

विजयादित्य आपल्या लेखात स्वत:ला श्रीमहालक्ष्मीचा वरप्रसाद प्राप्त झाल्याचे सांगतो.[१] तेव्हा तो हिंदुधर्मी होता यांत संशय नाही. तथापि भारतीय राजांच्या उज्ज्वल परंपरेस अनुसरून त्याचा आपल्या राज्यातील अन्य धर्मांसहि उदार आश्रय होता. त्याच्या शक संवत् १०६५ (सन ११४३) च्या कोल्हापूर येथील लेखात श्रीपार्श्वनाथ तीर्थंकराच्या बसदीच्या डागडुजी करिता आणि तेथील आचार्यांच्या योगक्षेमाकरिता आजिरगे (सध्याचे आजरे) खोल्लातील कांही जमीन दान दिल्याचा उल्लेख आहे[२]. विजयादित्याची दुसरी राणी श्रीरत्ना हिचा उल्लेख त्याच्या भोज नामक पुत्राच्या ताम्रपटात आला आहे.[३]

विजयादित्यानंतर त्याचा पुत्र द्वितीय भोज हा गादीवर आला. हा या वंशातील शेवटचा व श्रेष्ठ राजा होय. त्याच्या शौर्यामुळे त्याला 'वीरभोज' असे नाव मिळाले होते. त्याच्या कांही लेखांत त्याची 'महामण्डलेश्वर' अशी मांडलिक-पदनिदर्शक पदवी उल्लेखिली असली तरी नंतर त्याने सम्राट्पदनिर्देशक 'राजाधिराज', 'परमेश्वर', 'परमभट्टारक' 'पश्चिमचक्रवर्ति' अश्या पदव्या धारण केल्या होत्या, हे त्याचा आश्रित सोमेश्वर याच्या जैनेंद्रव्याकरणावरील 'शब्दार्णवचन्द्रिके'वरून कळते[४]. तेव्हा भोजाने आपले स्वातंत्र्य उद्घोषित केले होते, यात संशय नाही. त्या वेळी दक्षिणेत देवगिरीच्या यादवांची सत्ता दृढ होत होती. त्यांना भोजाचे स्वातंत्र्य मान्य होणे शक्य नव्हते. बलाढ्य यादवनृपति सिंघण याने भोजाच्या प्रदेशावर स्वारी केली. खिद्रापुरजवळ कृष्णवेणी आणि कुवेणी या नद्यांच्या संगमाजवळ यादव आणि शिलाहार यांच्या सैन्यात घनघोर लढाई झाली. खिद्रापुर येथील कांही लेखात बन्नेस हा संगमाजवळच्या युद्धात आपल्या घोडदळासह मोठ्या शौर्याने लढत असता धारातीर्थी पडून स्वर्गास गेल्याचा उल्लेख

१ क्र. ५३, ओ. १३–१४. २ क्र. ५३, ओ. १५–२५.

३ क्र. ६०, ओ. २०.

४ पाहा – श्रीमच्छिलाहारकुलकमलमार्तण्डतेज:पुंजराजाधिराजपरमेश्वरपरमभट्टारकपश्चिमचक्रवर्तिश्रीवीरभोजदेवविजयराज्ये.....। शब्दार्णवचंद्रिका, पृ. १२१.

आहे[१]. हा बन्नेस भोजाचा सेनापति असावा. या लढाईत सिंघण विजयी झालेला दिसतो.

नंतर. सिंघणाने प्रणालक दुर्गाला (पन्हाळगडला) वेढा घालून लौकरच तो काबीज केला आणि भोजराजाला पकडून त्याच गडावर बंदीत टाकले. काही यादव लेखांत सिंघणाचे वर्णन 'पर्णाल येथील प्रबल भोज भूपालरूपी नागाला पळवून लावणारा गरुड' असे केले आहे[२] रामदेवरावाच्या पुरुषोत्तमपुरी ताम्रपटात[३] सिंघणाने दुर्गावर भोजाला कैदेत ठेवल्याचा उल्लेख आहे. अद्यापि पन्हाळगडावर भोजाला जेथे बंदिवान् म्हणून ठेवले होते ती जागा दाखवतात.

नंतर सिंघणाने कोल्हापूरच्या शिलाहारांचे राज्य खालसा केले. भोजाला गंडरादित्य नामक पुत्र होता हे कशेळी ताम्रपटावरून कळते[४]. पण त्याच्या विषयी अधिक माहिती मिळत नाही. सिंघणाचा शक संवत् ११३६ (सन १२१३) चा शिलालेख खिद्रापुर येथील कोप्पेश्वर मंदिराच्या दक्षिण दिशेच्या दरवाज्याजवळ कोरला आहे. त्यावरून सिंघणाने सन १२१२ मध्ये शिलाहार राज्य जिंकून घेतले असे दिसते[५]. यानंतर यादवांच्या अधिकाऱ्यांचे लेख कोल्हापुरात मिळू लागतात. त्यांतील पहिला सन १२१८ चा आहे[६]. याप्रमाणे या तिसऱ्या शिलाहारशाखेचा अस्त झाला.

या शाखेच्या इतर राजांप्रमाणे भोजहि आपल्या लेखांत आपणांस श्रीमहा-लक्ष्मीचा वरप्रसाद प्राप्त झाल्याचे सांगतो. त्याने कांही दाने श्रीमहालक्ष्मीच्या पूजाअर्चेकरिता आणि नैवेद्याकरिता तसेच तिच्या देवळाच्या आवारातील

---

१ *I. K. N. K.*, p. 179.

२ पर्णालनिलयप्रबलभोजभूपालव्यालविद्रावणविहगराज – *Bom. Gaz.*, Vol. I, pt. ii. (old ed.), p. 254.

३ *Ep. Ind.*, Vol. XXV, p. 203.

४ क्र. ६०, ओ. ३३.

५ *J. B. B. R. A. S.*, Vol. XII (old series), pp. 7 f. या शिलालेखात सिंघणाने कोप्पेश्वराच्या पूजेकरिता दिलेल्या दानाचा उल्लेख आहे. त्याचा काळ वर्तमान शक संवत् ११३६, श्रीमुख संवत्सर, चैत्र अमावास्येचे सूर्यग्रहण, म्हणजे २२ एप्रील सन १२१३ हा होय. फ्लीटने तो सन १२२४–२५ असा चुकीने दिला आहे.

६ *J. B. B. R. A. S.*, Vol. II, pp. 284 f.

उमामहेश्वराच्या पूजेकरिता दिली होती.[१] तत्कालीन कांही लेखांमध्ये घैसास[२] उपनामाच्या करहाटक (सध्याच्या कऱ्हाडे) ब्राह्मणांना तसेच दुसऱ्या सहवासी ब्राह्मणांना[3] त्यांच्या योगक्षेमाकरिता भूमिदाने दिल्याचे उल्लेख आहेत.

उत्तर कोंकणच्या शिलाहारांप्रमाणे या कोल्हापुरच्या शिलाहारांचा विद्वानांस आश्रय होता. त्यांपैकी एक पूर्वोल्लिखित 'जैनेंद्रव्याकरणा'वरील 'शब्दार्णव-चन्द्रिके'चा कर्ता सोमेश्वर हा होता.[४] कन्नड भाषेतील 'नेमिनाथपुराणा'चा कर्ता कर्णपार्य याला विजयादित्याच्या एका मंत्र्याचा आश्रय होता. त्या काळी अनेक ठिकाणी जैन तीर्थंकरांची मंदिरे उभारण्यात आली होती. त्यांपैकी कोल्हापूर, तेरदाळ, जूगळ, खिद्रापुर वगैरे ठिकाणी कांही अद्यापि अवशिष्ट आहेत. खिद्रापुरचे सुंदर कोप्पेश्वर देवालय तत्कालीन उत्कृष्ट स्थापत्य व शिल्पकलेचा नमुना आहे.

---

१ क्र. ५९ व ६०.

२ घैसास हे 'गृहीतसहस्र' याचे अपभ्रष्ट रूप असून सामवेदनैपुण्याचे द्योतक मानण्यात येते. कारण सामवेदाच्या हजार शाखा होत्या. क्र. ५, ओ ६० पाहा.

३ या ब्राह्मणांविषयी विवेचन पुढे 'धार्मिक परिस्थिति' या प्रकरणात पाहा.

४ याविषयी माहिती पुढे 'साहित्य' प्रकरणात पाहा.

राज्यशासन

शिलाहारांच्या शासनाखालील प्रदेशाचे तीन भाग करता येतात : (१) उत्तर कोकण. याला त्याच्या पूर्वीच्या पुरी नामक राजधानीवरून 'पुरीकोंकण[१]' किंवा 'पुरीप्रभृति कोंकण' आणि शिलाहारांच्या या शाखेचा मूळ पुरुष पहिला कपर्दी याच्या नावावरून 'कपर्दिद्वीप' किंवा 'कवडीद्वीप[२]' अशीहि नावे होती. यात सध्याच्या ठाणे आणि कुलाबा जिल्ह्यांचा समावेश होता. रूढ कल्पनेनुसार यात चौदाशे गावांचा अन्तर्भाव होत होता. पण हरिश्चन्द्रवंशी भोगशक्ति याच्या अंजनेरी येथे मिळालेल्या एका ताम्रपटात यातील ग्रामसंख्या चौदा हजार दिली आहे[३]. (२) दक्षिण कोंकण. याला 'सप्तकोंकण[४]' असेहि नाव होते. यांतील गावांची संख्या नउशे[५] मानली जात असे. यातील उत्पन्नावरून याला सपादलक्ष (सवा-लाखी) असेहि म्हणत. यात सध्याच्या रत्नागिरी जिल्ह्याचा समावेश होता. (३) रत्नागिरी जिल्ह्याच्या पूर्वेचा घाटावरील प्रदेश. यात सातारा, कोल्हापूर, सांगली व बेळगाव या सध्याच्या जिल्ह्यांचा समावेश होता. या तीन्ही भागांचे राज्यशासनाच्या सोईकरिता अनेक विभाग आणि पोटविभाग केले होते.

राज्यशासनाच्या सर्वांत मोठ्या अशा विभागाला 'देश' अशी संज्ञा होती. उदाहरणार्थ, पुणक देशात[६] सध्याच्या पुण्याच्या सभोवारच्या विस्तृत प्रदेशाचा, मीरिंजा देशात[७] मिरजेच्या जवळच्या भागाचा आणि कुण्डी देशात बेळगावभोव-तालच्या प्रदेशाचा अन्तर्भाव होत होता. कोकणात अनेक देशांचा अंतर्भाव होत असल्याने त्याचा उल्लेख 'महादेश' असा आला आहे.[८] देशांचे 'राष्ट्र' नामक पोट विभाग पूर्वी केले जात. उत्तर कोकणाच्या कांही आरंभीच्या लेखात[९], इतर प्राचीन लेखांतल्याप्रमाणे, 'राष्ट्रपतीं'ना दानपत्राची माहिती देण्याचा उल्लेख आला आहे. पूर्वीच्या दानपत्रांच्या अंधानुकरणाने तो आलेला दिसतो; कारण शिलाहारांच्या दानपत्रांत अशा राष्ट्र नामक पोट विभागाचा निर्देश आढळत नाही. त्यांच्या काळी देशांच्या पोट विभागांना 'विषय' अशी संज्ञा होती. शिलाहारांच्या

---

१ क्र. १, ओ. २०,
२ ए. इं., व्हॉ. २३, पृ. ३१६ व ३२३.
३ *C. I. I.*, Vol. IV, p. 149.
४ ए. इं., व्हॉ. १४.
५ Fleet, *Dyn. Kan. Distr.*, p. 282, n. 5 & p. 436.
६ क्र. ५, ओ. ४०.
७ क्र. ४३, ओ. ११.
८ क्र. ४३, ओ. १२.
९ क्र. ९, ओ. २५.

लेखांत अनेक विषयांचा (जिल्ह्यांचा) नामनिर्देश आढळतो. उदाहरणार्थ, पाणाड विषय[१], चिक्खलाडविषय[२], माहिरिहारविषय[३] (याचे पूर्वीचे नाव महागिरिहारविषय[४] असे होते), वरेटिकाविषय[५], षट्षष्टिविषय[६] (सहासष्ट गांवे असलेला जिल्हा), अणितपल्लाविषय[७], करकूटविषय,[८] मन्दरजविषय[९] आणि कटषडीविषय[१०] ही उत्तर कोकणातील विषयांची नावे पाहा. दक्षिण कोकणातील लेख थोडे सापडले आहेत. त्यामुळे त्यातील फारच थोड्या विषयांची नावे माहीत झाली आहेत. उत्तर कोकणाच्या शिलाहारांनी तो प्रदेश जिंकून घेतल्यावर त्याची राजधानी दापोली तालुक्यातील पन्हाळा येथे केली. त्या प्रदेशाचा 'प्रणालकविषय[११]' असा उल्लेख कोरीव लेखांत येतो. याशिवाय चिपुलणविषयाचाहि[१२] उल्लेख कोरीव लेखात आला आहे.

उत्तर आणि दक्षिण कोकण प्राचीन काळी संस्कृतोद्भूत भाषा बोलणाऱ्या राजवंशांच्या शासनाखाली असल्यामुळे तेथील विभागांची नावे, शिलाहार राजे स्वतः कन्नड भाषी असले तरी, संस्कृतोद्भव होती. पण घाटावरील कुन्तल देशात सामान्य जनांची भाषा कन्नड असल्यामुळे तेथील विभागांची नावे त्या भाषेतील आहेत. तेथील देशविभागांना 'नाड' किंवा 'खोल्ल'(गोल्ल) असे म्हणत. उदाहरणार्थ, कोल्हापूर जिल्ह्याला एडेनाड विषय असे नाव होते[१३] तसेच पणतुरगेखोल्ल,[१४] आजिरगे खोल्ल,[१५] कवडेगोल्ल[१६] ही विभागांची नावे पाहा. यांचे खंपण किंवा गंपण या नावांचे पोट विभाग होते. उदाहरणार्थ,मिरिंजेगम्पण,[१७]कोडवल्लिखंपण[१८] पाहा. कांही विषयांतील आणि खोल्लांतील गावांची संख्या त्यांच्या नावांना जोडली जात असे. उदाहरणार्थ, षट्षष्टिविषय[१९] (सध्याचा साष्टी तालुका) पाहा. असे अनेक षट्षष्टिविषय असल्यामुळे, त्यांतील मुख्य गावाचे नाव त्यांच्याशी जोडले जात असे. उदाहरणार्थ, 'शूर्पारकषट्षष्टि[२०]' (सोपाऱ्याजवळचा प्रदेश)

---

१ क्र. ४, ओ. ४४; क्र. ६१, पृ.३४१.
२ क्र. ५, ओ. ६१.
३ क्र. ७, ओ. ५६-५७.
४ *C. I. I.*, No. IV, p. 150.
५ क्र. १४, ओ. ७६.
६ क्र. २६, ओ. ४.
७ क्र. २१, ओ. १०–११.
८ क्र. २०, ओ. ६२.
९ क्र. १५, ओ. ७२.
१० क्र. २९, ओ. १४.
११ क्र. २३, ओ. ७१.
१२ क्र. ५, ओ. ४१.
१३ क्र. ४५, ओ. २५.
१४ क्र. ५८, ओ. २६.
१५ क्र. ५३, ओ. १८.
१६ क्र. ४९, ओ. २३.
१७ क्र. ४६, ओ. ४६.
१८ क्र. ४८, ओ. ३०.
१९ क्र. २६, ओ. ४.
२० क्र. १४, ओ. १४७–१४८.

पाहा. ज्या षट्षष्टिमध्ये स्थानक (ठाणे) या राजधानीचा समावेश होता त्याला 'स्थानकाभ्यन्तरषट्षष्टि[१]' किंवा नुसतेच 'अभ्यन्तरषट्षष्टि[२]' असे नाव पडले होते. याशिवाय 'माहिरहारषट्षष्टि[३]' हा असाच सासष्ट गावांचा विभाग होता. 'कोरियला-द्वादशक[४] हा केवळ बारा गावांचा विभाग होता. याशिवाय देशांच्या नावांना जोडलेल्या मोठ्या संख्यांवरून त्यांतील ग्रामांची संख्या ज्ञात होत असे. उत्तर कोकणांत १४०० गावे होती. मिरिंजदेशात ती ३००० होती[५] म्हणून त्याला 'सहस्रत्रितयमिरिंजदेश' असे नाव होते. करहाट (कऱ्हाड) देशात ४००० गावे होती.[६] या संख्या अर्थातच परंपरांवरून रूढ झाल्या होत्या.

विषय आणि खोल्ल यांत नगरे व ग्राम यांचा अन्तर्भाव होत असे. शिलाहार कालीन फारच थोड्या नगरांचे उल्लेख कोरीव लेखांत येतात. उदाहरणार्थ, उत्तर कोकणाची अत्यंत प्राचीन राजधानी पुरी[७], शिलाहारांची राजधानी स्थानक[८] (ठाणे), त्यांतील एक प्रमुख बंदर चेमूल्य[९] (चौल), दक्षिण कोकणाची राजधानी बलिपत्तन[१०] (खारेपाटण), त्याच्या उत्तर विभागाचे मुख्य स्थान प्रणालक[११] (पन्हाळे), घाटावरील शिलाहारांची राजधानी कोल्लापुर[१२] (याला क्षुल्लकपुर[१३] असेहि नाव होते), करहाटक[१४] (कऱ्हाड), मिरिंजे[१५] (मिरज), एडेनाड[१६] (कोल्हापूरजवळचा प्रदेश), कुंडी[१७] (बेळगाव) इत्यादि नगरनामे पाहा. प्रनालक[१८] (सध्याचा पन्हाळा) ही कोल्हापुरच्या शिलाहारांची तटबंदी केलेली राजधानी आणि वल्लवाड[१९] (वळिवडे) हे त्यांचे नेहमीचे शिबिराचे ठिकाण होते. ग्रामदानांचा निर्देश करताना त्या ग्रामांच्या सीमांवरची गावे उल्लेखिली जात; म्हणून शिलाहारांच्या लेखांत अनेक गावांचे उल्लेख आढळतात. त्यांच्या नावांच्या शेवटी पल्ली किंवा पल्लिका (उ. मंचकपल्ली[२०], चिख्यल्लपल्लिका[२१]), वल्ली (उ.

---

१ क्र. ९, ओ. ४१.
२ क्र. १४, ओ. ९९.
३ क्र. ११, ओ. ५२.
४ क्र. १३, ओ. ६२.
५ क्र. ४३, ओ. ४६-४७.
६ *E. H. D.* Vol. I, p. 56.
७ *Ep. Ind.*, Vol. VI., p. 1 f.
८ क्र. ६, ओ. ५९.
९ क्र. ४१, ओ. २९.
१० क्र. ४१, ओ. २५.
११ क्र. २९, ओ. ४३.
१२ क्र. ४८, ओ. २५.
१३ क्र. ५३, ओ. १९.
१४ क्र. १४, ओ. ६१.
१५ क्र. ४५, ओ. ३३.
१६ क्र. ४६, ओ. ३१.
१७ क्र. ४५, ओ. २५.
१८ क्र. ५९, ओ. १.
१९ क्र. ४८, ओ. २२.
२० क्र. ४, ओ. ४५.
२१ क्र. २, ओ. ५.

कोटिलेवल्ली)[१], वाड (उ. पाणीवाड[२], तीरवाड[३] इत्यादि), ग्राम (उ. वट्टार-ग्राम[४], वोपग्राम[५], चांडिजेग्राम[६], कशेलिग्राम[७] इत्यादि) हे शब्द जोडले जात. जेव्हा एका ठिकाणी एकाच नावाची दोन गांवे असत तेव्हा त्यांमध्ये फरक करण्यासाठी त्यांच्या आकारानुसार त्यांच्या पूर्वी वृहद् (मोठे) किंवा लघु (लहान) हे शब्द जोडले जात. उदाहरणार्थ, वृहदडणिका[८] आणि लघुअडणिका[९] पाहा. जेव्हा गावांना जोडलेल्या वाड्यांचा उल्लेख करावयाचा असे तेव्हा त्यांचा 'वाडी' असा निर्देश केला जाई. उदाहरणार्थ, बलिपत्तन ताम्रपटातील 'आवडि नाम वाडी[१०]' हा उल्लेख पाहा.

शिलाहारांच्या तीन्ही शाखांची शासनपद्धति राजसत्ताक होती. उत्तर आणि दक्षिण कोकणांतील शिलाहार राष्ट्रकूटांचे मांडलिक म्हणून उदयास आले होते. दक्षिण कोकणाच्या शिलाहार शाखेचा मूळ पुरुष सणफुल्ल याला राष्ट्रकूट सम्राट् प्रथम कृष्ण याच्या कृपेने राज्य मिळाले होते[११]. उत्तर कोकणाच्या शाखेचा उत्पादक प्रथम कपर्दी याला बहुधा तृतीय गोविंदाने गादीवर बसविले होते. या दोन्ही शाखा आपल्या सम्राटांशी राजनिष्ठ राहिल्या. त्यांनी आपल्या आरंभीच्या लेखांत 'महासामन्त'[१२] यापेक्षा उच्चतर पदवी उल्लेखिली नाही. त्यांची सत्ता वाढू लागली तेव्हा ते आपणांस 'महासामन्तशेखर'[१३] किंवा 'महासामन्ताधिपति'[१४] म्हणवू लागले, पण त्यांनी राष्ट्रकूटांचे मांडलिकत्व झुगारून टाकले नाही. दुसऱ्या तैलपाने राष्ट्रकूटांचा उच्छेद करून साम्राज्यसत्ता बळकावल्यावरहि या शिलाहारांनी आपल्या ताम्रपटांत आपल्या पूर्वीच्या सम्राटांची वंशावळ देऊन त्यांच्या उच्छेदाबद्दल खेद व्यक्त केलेला दिसतो.[१५] कोल्हापूरच्या शाखेच्या लेखांत असे उल्लेख येत नाहीत, याचे कारण राष्ट्रकूटांच्या उच्छेदानंतर ते उदयास आले होते आणि त्या शाखेच्या आरंभीच्या राजांचे लेख अद्यापि सापडले नाहीत, हे होय.

शिलाहारांना विविध प्रकारची बिरुदे धारण करण्याचा हव्यास होता. उदाहरणार्थ, मुम्मुणीच्या दिवेआगर ताम्रपटात आरंभीच्या दानविषयक सोळा

---

१ क्र. ५, ओ. ६३.
२ क्र. १५, ओ. ७३.
३ क्र. ४५, ओ. २५.
४ क्र. २५, ओ. १०.
५ क्र. ३६, ओ. १७.
६ क्र. ३९, ओ. १०.
७ क्र. ६७, ओ. ३३.
८ क्र. १४, ओ. ११९–१२०.
९ क्र. १४, ओ. १२७.
१० क्र. ४२, ओ. ५१–५२.
११ क्र. ४१, ओ. २४.
१२ क्र. १, ओ. १.
१३ क्र. २, ओ. ३.
१४ क्र. ५, ओ ४७.
१५ क्र. ५, ओ. २१.

ओळींपैकी पाच ओळींत त्या राजाच्या वीस बिरुदांचा उल्लेख आला आहे.[१] त्यांचे राष्ट्रकूट सम्राट् 'परमभट्टारक' 'महाराजाधिराज,' 'परमेश्वर' अशी सम्राट्-पदनिदर्शक बिरुदे उल्लेखून समाधान मानीत, पण त्यांचे हे शिलाहार मांडलिक आपला वंश, मूलस्थान, सामर्थ्य, चारित्र्य, विद्वत्ता, औदार्य, राजचिन्ह, दैवत, फलज्योतिषानुसार अनिष्ट प्रभावातून मुक्तता इत्यादींची निदर्शक विविध बिरुदे धारण करताना दिसतात. उत्तर कोकणचे आणि कोल्हापूरचे शिलाहार आपल्या 'तगरपुरपरमेश्वर'[२] किंवा 'तगरपुराधीश्वर'[३] या बिरुदाने आपण मूळचे तगरपुरचे (ओस्मानाबाद जिल्ह्यातील तगर गावचे) असे सांगतात. तसेच आपण विद्याधर जीमूतवाहनाचे वंशज आहोत[४] याचा अभिमान बाळगून 'सहज-विद्याधर' या श्लेषयुक्त बिरुदाने स्वतःची विद्वत्ताहि सूचित करतात.[५] एका बिरुदात ते आपल्या 'सुवर्णगरुड' लांछनाचा उल्लेख करतात.[६] इतर कांही बिरुदांत आपण विविध गुणांत पूर्वकालीन श्रेष्ठ राजांसारखे आहोत, असे सांगतात. उदाहरणार्थ, 'कलियुगयुधिष्ठिर',[७] 'निजभुजविक्रमादित्य',[८] 'कोदण्डसहस्रार्जुन',[९] 'नरेन्द्रनागार्जुन'[१०] ही बिरुदे पाहा. जेव्हा त्यांना एखादा मोठा विजय प्राप्त होत असे तेव्हा ते तद्द्योतक एखादे बिरुद धारण करीत. उदाहरणार्थ, प्रथम अनन्तपालाने धारण केलेले 'निःशंकलंकेश्वर'[११] हे बिरुद त्याच्या गोवा प्रदेशाच्या (लंकेच्या) विजयाचे सूचक दिसते. त्यांचे कांही सामंतहि त्यांचे अनुकरण करीत असत. शिलाहार छित्तराजाचा मांडलिक चामुंडराज याने लाट (दक्षिण गुजराथ) मध्ये मिळालेल्या विजयानंतर 'लाटप्राकारराज्यध्वंसक'[१२] अशी पदवी धारण केली होती. त्यांच्या 'त्यागजगज्झंप'[१३] या बिरुदाने त्यांची दानशूरता, 'शरणागतवज्रपंजर'[१४] याने शरणागत राजांना संरक्षण देण्यात तत्परता, 'परनारीसहोदर'[१५] याने त्यांचा इंद्रियनिग्रह आणि 'शनिवारविजय'[१६] याने दैव विरुद्ध असले तरी विजय प्राप्त करण्याची त्यांची जिद्द व्यक्त होते.

---

१ क्र. १६, ओ. ३–७.
२ क्र. ५, ओ. ४७–४८.
३ क्र. ४८, ओ. १६–१७.
४ क्र. ४, ओ. २५–२६.
५ क्र. ७, ओ. ४५.
६ क्र. ७, ओ. ४४.
७ क्र. ५८, ओ. १८.
८ क्र. १३, ओ. ७.
९ क्र. १३, ओ. ३६–३७.
१० पूर्वोक्त, ओ. ३७.
११ क्र. १६, ओ. ४.
१२ क्र. १२, ओ. ८.
१३ क्र. १३, ओ. ३७.
१४ पूर्वोक्त, ओ. ३७.
१५ क्र. ५८, ओ. १८.
१६ क्र. ७, ओ. ४६.

उत्तर कोकणाच्या शिलाहारांची सत्ता वाढू लागल्यावर त्यांनी 'महाराजाधिराज' 'पश्चिमसमुद्राधिपति'[१] 'कोंकणचक्रवर्ती'[२] यांसारखी सम्राट्पदनिदर्शक विरुदे धारण करण्यास आरंभ केला. तसेच कोल्हापूरच्या द्वितीय भोजाने 'राजाधिराज', 'परमेश्वर,' 'परमभट्टारक', 'पश्चिमचक्रवर्ती' या पदव्या धारण केल्या.

शिलाहारांचे बहुतेक लेख संस्कृतमध्ये असल्यामुळे त्यांची अनेक बिरुदे त्या भाषेतच आहेत. पण कांही बिरुदे कन्नड भाषेतहि आहेत. याचे कारण ते तगर-पुराहून आले होते, हे होय. तगर (सध्याचे तेर) हे आता मराठीभाषी प्रदेशात असले तरी पूर्वी ते कन्नड प्रदेशात समाविष्ट होते. शिलाहारांची भाषा कन्नड असल्यामुळे साहजिकच त्यांची अनेक बिरुदे त्या भाषेत आहेत. उदाहरणार्थ, खालील बिरुदे पाहा – विमलगलगण्ड[३] (विमल गळयाचा वीर), गण्डरगण्ड[४] (वीरांमध्ये श्रेष्ठ), गण्डवङ्गर[५] (वीरांमध्ये सुवर्णासारखा), नन्निसमुद्र (सत्याचा सागर), पुसिगंजुवात[६] (असत्याला भिणारा), विल्लविडेङ्ग[७] (धनुर्विद्येत प्रवीण), बिरुदंकराम[८] (बिरुदधारकांमध्ये रामासारखा) ही बिरुदे पाहा. उत्तर कोकणांतील त्यांच्या संस्कृत लेखांतील हंयमन, नगर यांसारखे कन्नड शब्द आपाततः संस्कृतसदृश असल्यामुळे त्यांनी संशोधकांना दीर्घकाळ चकविले होते. अलीकडेच त्यांचा खरा अर्थ ध्यानात आला आहे.[९] उत्तर कोकणात कन्नड भाषेचा हा प्रभाव छित्तराजाच्या कारकीर्दीनंतर ओसरू लागला आणि सामान्य जनांची भाषा मराठी ही पुढे येऊ लागली. पण कोल्हापूरसभोवारच्या प्रदेशात जनसामान्यांची भाषा कन्नड असल्यामुळे कन्नड बिरुदे तद्देशीय लेखांत अगदी शेवटपर्यंत योजिलेली आढळतात. उदाहरणार्थ, शेवटचा शिलाहार राजा द्वितीय भोज याच्या लेखांतील पुढील बिरुदे पाहा–'इडुवरादित्य'[१०] (आक्रमकांमध्ये सूर्यासारखा), 'मण्डलिकगण्डपेण्डर'[११] (माण्डलिक वीरांमध्ये पैंजणासारखा सुंदर), 'अरसासवारिमदनमहेश्वर'[१२] (राज्यशासनाला विरोध करणारे शत्रु हेच कोणी मदन त्यांचा निःपात करणारा महेश्वर शिव) इत्यादि.

---

१ क्र. १९, ओ. ६१.
२ क्र. ३६, ओ. ७; क्र. ३८, ओ. १–२.
३ क्र. ५, ओ. ४८–४९.
४ पूर्वोक्त, ओ. ४९.
५ पूर्वोक्त, ओ. ४९.
६ पूर्वोक्त, ओ. ५०.
७ पूर्वोक्त, ओ. ५०.
८ पूर्वोक्त, ओ. ५०.
९ ए. इं., व्हॉ. ३४, पृ. २९२.
१० क्र. ६०, ओ. २६.
११ पूर्वोक्त, ओ. २९.
१२ पूर्वोक्त, ओ. २८–२९.

शिलाहार मांडलिक होते तेव्हा त्यांना सम्राटांना खंडणी द्यावी लागे, सम्राटांच्या दरबारात उपस्थित असावे लागे, आणि त्यांच्या युद्धांत स्वसैन्यासह सहभागी होणे आवश्यक असे. कोल्हापूरच्या शिलाहारांनी आपले सम्राट् उत्तरकालीन चालुक्य यांच्या लढायांत स्वत: लढून किंवा आपले सामन्त पाठवून विजयप्राप्तीत साहाय्य केल्याचे निर्देश त्यांच्या लेखांत आढळतात.[१] इतर बाबतींत मात्र ते स्वतंत्र होते. कोकणचे शिलाहार आरंभीच्या लेखांत आपले सम्राट् राष्ट्रकूट यांची संपूर्ण वंशावळ देत असत; पण त्यांना भूमिदानांत त्यांची संमति घ्यावी लागत नसे. या बाबतीत राष्ट्रकूटांच्या संयान येथील अरब सामंतांपेक्षा त्यांना जास्त स्वातंत्र्य होते, असे दिसते.[२] कारण या अरब सामंतांनी दिलेल्या ताम्रपटांत त्यांनी आपल्या राष्ट्रकूट सम्राटांची पूर्वी अनुमति मिळविल्याचा स्पष्ट निर्देश आढळतो.

पित्यानंतर ज्येष्ठ पुत्राला गादी मिळत असे. कित्येकदा राजा आपल्या हयातीत आपल्या राज्याची वाटणी करून कनिष्ठ मुलालाहि राज्याचा भाग देत असे.[३] तसेच शासनकर्त्या राजाने आपल्या बंधूंना प्रांताधिपति नेमल्याचीहि उदाहरणे आहेत.[४] कित्येकदा त्यांचा नामनिर्देश ताम्रपटांतील वंशावळींत केलेला आढळतो, पण ते सर्व एकामागून एक गादीवर आले होते, असे समजणे बरोबर होणार नाही.

शिलाहारांच्या इतिहासात भाऊबंदकीची उदाहरणे अत्यल्प आहेत. वज्जडाच्या निधनानंतर त्याचा भाऊ छद्वैदेव याने कांही काळ गादी बळकाविली असावी.[५] म्हणून त्याचा उल्लेख उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या वंशावळीत कटाक्षाने टाळलेला दिसतो. नंतरच्या काळात उत्तरकालीन चालुक्य प्रथम सोमेश्वर याने केलेल्या आक्रमणात नागार्जुन धारातीर्थी पडला, त्यावेळी त्याचा मुलगा अनन्तपाल हा अल्पवयस्क असल्यामुळे नागार्जुनाचा धाकटा भाऊ मुम्मुणि याला गादी मिळाली. त्याने आपल्या मागे आपल्या मुलाला गादी मिळावी अशी व्यवस्था करून ठेवली असावी; पण नागार्जुनाचा पुत्र अनन्तपाल आपला गादीवरचा हक्क सोडण्यास तयार नव्हता. म्हणून राज्यात 'दायादवैरिव्यसन' (भाऊबंदकी) उत्पन्न झाल्याचा उल्लेख अनन्तपालाच्या खारेपाटण ताम्रपटात आला आहे.[६] त्यात अनन्तपाल शेवटी विजयी झाला. एवढीच भाऊबंदकीची उदाहरणे शिलाहारांच्या इतिहासात आढळली आहेत.

---

१ क्र. ४६, ओ. १८–१९.
२ ए. इं., व्हॉ. २३, पृ. ५३.
३ क्र. २३ पाहा.
४ क्र. ४८ पाहा.
५ क्र. ४, पृ. १३ पाहा.
६ क्र. १९, ओ. ५२.

आपल्या राज्यात शिलाहारांची सत्ता अनियंत्रित होती. ते स्वत: आपले प्रांताधिपति व मंत्री नेमत आणि आपणांस योग्य वाटेल त्याप्रमाणे युद्धे किंवा संधि करीत. ते परदेशातील राजसभांत आपले वकील नेमीत. शिलाहार स्वत:स क्षत्रिय म्हणवत.[१] याज्ञवल्क्य स्मृतीत म्हटले आहे की क्षत्रियाचे (राजाचे) मुख्य कर्तव्य प्रजेचे पालन करणे हे होय[२] याज्ञवल्क्यांनी हेहि सांगितले आहे की राजाने आपल्या प्रजेचे यथायोग्य पालन केले तर तिच्या पुण्यार्जनाचा एक षष्ठांश भाग त्याला मिळतो.[३] पण त्याने तिचे पालन न केल्यामुळे तिने पापाचरण केले तर त्याचा निम्मा भाग त्याला घ्यावा लागतो.[४] याज्ञवल्क्यस्मृतीवरील अपरार्क टीकेत स्पष्ट म्हटले आहे की राजा प्रजेचे जे संरक्षण करतो त्याबद्दल ती त्याला करभार देते.[५] म्हणून राज्यात शांतता आणि सुव्यवस्था स्थापन करणे हे राजाचे मुख्य कर्तव्य होय. राजाने प्रजेचा छळ केल्यास त्यापासून उफाळणारा प्रजेचा क्रोधाग्नि त्याचे राज्य, वंश, किंबहुना, त्याचा स्वत:चा जीव नष्ट केल्याशिवाय शांत होणार नाही, अशी स्पष्ट ताकीद याज्ञवल्क्यस्मृतीत दिली आहे.[६]

राजा प्रजापालनाप्रमाणे परदेशाक्रमणामुळेहि पुण्यार्जन करू शकतो, असेहि त्या स्मृतीत म्हटले आहे.[७] याचा परिणाम प्राचीन काळच्या राजांच्या सदैव चालू असलेल्या परस्परयुद्धांत दिसून येतो. त्यामुळे दोन्ही पक्षांचे सामर्थ्य खच्ची होत असे. स्वदेशाचे संरक्षण आणि परदेशांचे आक्रमण यांसाठी केलेल्या युद्धांत राजा स्वत: भाग घेत असे. शिलाहारांनी अनेक प्रसंगीं रणांगणावर शौर्याने लढून प्रतिकूल परिस्थितीतहि विजय संपादन केला होता. मुम्मुणीच्या निधनानंतर राज्यांत भाऊबंदकी उद्भवून अराजक उत्पन्न झाले. शत्रूंनी त्याचा फायदा घेऊन राज्यावर आक्रमण केले, देश उद्ध्वस्त केला आणि देवब्राह्मणांचा छळ आरंभिला. तेव्हा नागार्जुनाचा पुत्र अनन्तपाल पुढे झाला आणि मोठ्या शौर्याने लढून त्याने चंद्रबिंबावर आपली कीर्ति कोरविली, असे खारेपाटण ताम्रपटात म्हटले आहे.[८] याच तऱ्हेचा दुसरा प्रसंग अनन्तपालाच्या कारकीर्दीअखेर उत्पन्न झाला. गोव्याच्या कदंबांनी उत्तर कोकणावर स्वारी केली. त्यावेळी शिलाहारांचे सामंत त्यांना जाऊन मिळाले. तत्कालीन बिकट परिस्थितीचे वर्णन वडवली ताम्रपटात पुढील प्रमाणे केले आहे– "धर्म नष्ट झाला, वृद्ध जनांचा छळ होऊ लागला, प्रजाजन जीर्ण जीर्ण झाले आणि राष्ट्राची भरभराट नष्ट झाली. तथापि न डगमगता अपरादित्य घोड्यावर

---

१ क्र. ६०, ओ. २४–२५.
२ अध्याय १, श्लो. ३३६.
३ पूर्वोक्त, अध्याय १, श्लो. ३३५.
४ पूर्वोक्त, अ. १, श्लो. ३३७.
५ पूर्वोक्त, अ. १, श्लो. ३३५.
६ पूर्वोक्त, अ. १, श्लो. ३४१.
७ पूर्वोक्त, अ. १, श्लो. ३४२.
८ क्र. १९, ओ. ५२–५५.

स्वार होऊन एकटा रणांगणात घुसला आणि आपल्या बाहुबलाच्या व खड्गाच्या साहाय्याने त्याने शत्रूचा धुव्वा उडवला. तेव्हा शत्रूला लढावे की पळावे असा पेच पडला. शेवटी त्याने म्लेच्छांचा आश्रय घेतला."[१] हे वर्णन इतके हृदयस्पर्शी आहे की त्याची तुलना भितारी लेखांतील हूणांबरोबर कुमार स्कन्दगुप्ताने केलेल्या लढ्याच्या वर्णनाशीच होऊ शकेल.[२]

सर्व जाती जमाती वर्णाश्रमधर्म बरोबर पाळतात की कोठे संकर होतो, हे पाहून त्याचे निवारण करणे हे तत्कालीन स्मृतींत राजाचे एक प्रमुख कर्तव्य मानले गेले आहे. प्राचीन काळच्या इतर राजांप्रमाणे शिलाहार या बाबतीत जागरूक होते. त्यांच्या लेखांत त्यांचे दातृत्व, नीतिनैपुण्य व विद्येला उदार आश्रय याबद्दल त्यांची प्रशंसा केली आहे. कोल्हापूर शाखेच्या विजयादित्य नृपतीविषयी खालील वर्णन आले आहे – " त्याचे धनार्जन दानाकरिता, शौर्य प्रजेच्या रक्षणाकरिता, प्रिय भाषण सत्याच्या प्रतिष्ठेकरिता, चिंतन भगवंताच्या ध्यानाकरिता, आणि संपत्ति सज्जनांच्या विपत्तीचा लोप करण्याकरिता असे. त्या विजयादित्याच्या गुणांचे यथार्थतेने वर्णन करण्यास कोणता कवि समर्थ आहे बरे ? "[3]

शिलाहारांच्या कांही बिरुदांवरून त्यांनी कोणते उच्च आदर्श आपल्यापुढे ठेवले होते ते स्पष्ट होते – 'शौचगांगेय'[४] (शुद्ध नैतिक आचरणांत भीष्मासारखा), 'कलियुगयुधिष्ठिर'[५] (कलियुगात युधिष्ठिरासारखा), 'सत्यराधेय'[६] (सत्यपालनात कर्णासारखा) आणि 'परनारीसहोदर'[७] (परस्त्रीच्या बाबतीत तिच्या सख्या भावासारखा) ही बिरुदे पाहा.

राजाची सत्ता तत्त्वतः अनियंत्रित असली तरी व्यवहारात तिजवर अनेक अंकुश होते. त्याला अन्याय्य कायदे करता येत नसत. कारण प्राचीन स्मृतींत दिवाणी व फौजदारी कायदे अगोदरच घालून दिले असल्यामुळे राजाने फक्त ते प्रजेकडून पाळावयाचे असत. त्याविषयी कांही शंका उपस्थित झाल्यास त्याला परिषदेचा (वेदविद्या व शास्त्रे यांत निपुण अशा विद्वानांच्या समितीचा) सल्ला घ्यावा लागे. उत्तर कोकणात अशी परिषद होती हे चांजे शिलालेखात तिला मिळालेल्या राजदानावरून स्पष्ट दिसते.[८] प्राचीन काळी धर्माचा पगडा जनमतावर मोठा होता. त्यामुळे राजेलोक स्मृतीतील नियमांविरुद्ध वर्तन करण्यास सहसा धजत

---

१ क्र. २०, ओ. ३२–३५.

२ *C. I. I.*, Vol. III, p. 54.

३ क्र. ६०, ओ. १५–१७.

४ क्र. ४६, ओ. ४०.

५ क्र. ५८, ओ. २८.

६ क्र. ४६, ओ. ४०.

७ क्र. ५८, ओ. १८.

८ क्र. २२, ओ. ९.

नसत. 'याज्ञवल्क्यस्मृती'त म्हटले आहे की राजाने लोकांचा छळ केल्यास ते त्याच्या विरुद्ध बंड करतील आणि त्यात त्याच्या राज्याचीच नव्हे तर त्याच्या प्राणांचीहि आहुति पडेल.

राज्यशासन राष्ट्रपति (विभागप्रमुख), विषयपति (जिल्हाप्रमुख) आणि ग्रामपति (गावपाटील) यांच्या साहाय्याने केले जात असे. नंतरच्या दिवे आगर ताम्रपटात[१] सामन्त (प्रांताधिपति), नायक (विभागप्रमुख) आणि ठाकुर (जिल्हाप्रमुख) अशी शासकांची नांवे आली आहेत. सामान्यतः सेनाधिकाऱ्यांची प्रांताधिपति म्हणून नियुक्ति करण्यात येई. त्यांना 'दंडाधिपति' म्हणत. उत्तरेच्या शिलाहारांनी दक्षिण कोकणचा कांही भाग जिंकून घेतला, तेव्हा त्याचा वेगळा विभाग बनविला जाऊन प्रणालक येथे त्याची राजधानी स्थापण्यात आली. प्रथम अपरादित्याने आपला प्रिय पुत्र विक्रमादित्य याची तेथे स्थापना केली.[२] विक्रमादित्याचे स्वतःचे मंत्रिमंडळ असून वेगळा सांधिविग्रहिक (परराष्ट्रमंत्री) हि होता. पुढे तो प्रदेश उत्तर कोकणच्या राज्यात विलीन झाल्यावर तेथे सुप्रया या 'दण्डाधिपती'ची नेमणूक केली गेली.[३] त्याचे निराळे 'श्रीकरण' (सचिवालय) होते.

शिलाहारांच्या कांही प्राचीन ताम्रपटांत राष्ट्रपति, विषयपति आणि ग्रामपति यांना भूमिदानविषयक राजाज्ञा कळविल्याचा उल्लेख आहे. पण पुढे राष्ट्र ही देशविभागसंज्ञा प्रचारातून गेली. शिलाहारांच्या लेखांत राष्ट्राचा उल्लेख आढळत नाही. तथापि ताम्रशासनांच्या मसुद्याचे अंधानुकरण होत राहिलेले दिसते. राष्ट्राची जागा मण्डलाने घेतली. विषयपति हे सध्याच्या कलेक्टरांप्रमाणे जिल्हाधिकारी असत. एका लेखात तद्द्योतक 'विषयी' शब्दाचा उपयोग केला आहे.[४] ग्रामपति हे अर्थातच ग्रामप्रमुख असत. एका लेखात त्या अर्थी पटकील (पाटील) या संज्ञेचा उपयोग केला आहे.[५] कोल्हापूरच्या शिलाहारांच्या लेखांत 'नार्गावुंड' याचा 'विषयपति' या अर्थी उपयोग केला आहे.[६] गावुंड म्हणजे ग्रामाधिकारी.[७] एका लेखात एकापेक्षा जास्त गावुंडांचा निर्देश आला आहे.[८] ते अनेक गावांचे प्रमुख म्हणून जमले असावे किंवा पाळीपाळीने ग्रामप्रमुख होत असावे.

राजा आपल्या मंत्र्यांची (सल्लागारांची) आणि महामात्यांची (कार्यकारी प्रधानांची) नेमणूक करीत असे. त्यांची नावे व शासकीय पदे यांचा उल्लेख उत्तर

---

१ क्र. २६, ओ. १४.
२ क्र. २३, ओ. ३८.
३ क्र. २८, ओ. ८.
४ क्र. १२, ओ. १२.
५ क्र. २५, ओ. १३.
६ क्र. ४६, ओ. ४८.
७ क्र. ५४, ओ. १६–१७.
८ पूर्वोक्त पाहा.

कोकणाच्या शिलाहारांच्या लेखांत येतो, आणि त्यामुळे संशयित ठिकाणी कालनिर्णय करण्यात मदत होते. उत्तर कोकणात राजाचे पांच मुख्य सल्लागार असत[१]–(१) महाप्रधान[२] (यालाच एका लेखात सर्वाधिकारी म्हटले आहे). हा मुख्य प्रधान होता. (२) महामात्य.[३] याच्यावर सर्व राज्यकारभार सोपविला असे. (३) महासान्धिविग्रहिक[४] किंवा परराष्ट्रखात्याचा प्रमुख. (४) प्रथम छेपाटी[५] किंवा मुख्य कोशाध्यक्ष. (५) द्वितीय छेपाटी[६] किंवा दुय्यम कोशाध्यक्ष. यांपैकी महाप्रधान आणि महासान्धिविग्रहिक यांचा दर्जा इतरांपेक्षा मोठा होता असे दिसते. कारण त्यांचा निर्देश सर्व लेखांत आढळतो. एका लेखात दोन सांधिविग्रहिकांचा उल्लेख आहे. त्यांपैकी एकाची पदवी कर्णाटसांधिविग्रहिक[७] अशी आहे. तो कर्णाटदेशविषयक परराष्ट्र खात्याचा प्रमुख दिसतो. दुसऱ्या एका लेखात 'नागरसांधिविग्रहिका'चा[८] उल्लेख आहे. त्याच्याकडे कोणते काम असे हे कळत नाही. 'छेपाटी' हा कोशाध्यक्ष असावा. एका लेखात त्याला 'भांडारगारसेन'[९] म्हटले आहे. मुख्य तसेच दुय्यम कोशाध्यक्षाचा निर्देश अनेक लेखांत येतो. या प्रमुख अधिकाऱ्यांच्या हाताखाली अमात्य, सचिव, सांधिविग्रहिक यांसारखे दुय्यम दर्जाचे अधिकारी असत. एका लेखात 'कडितामात्या'चा[१०] उल्लेख आला आहे. तो युद्ध खात्याचे काम पाहत असावा. कांही लेखांत राजगुरूचा[११] उल्लेख आहे. राजगुरूला त्याकाळी बरेच महत्त्वाचे स्थान असावे. एका लेखात तर त्याला महामात्याचा दर्जा दिला आहे,[१२] तर दुसऱ्या एका लेखात त्याचा दुय्यम 'लघुराजगुरु'[१३] याचा निर्देश आहे. 'श्रीकरणी'[१४] हा सचिवालयाचा प्रमुख असावा. दक्षिण कोकण व कोल्हापूर येथील कांही लेखात 'हडप' किंवा 'हडपवल' याचा निर्देश आहे. तो राजाचा तांबूलधारक किंवा स्वीय सेवक असावा.

उत्तर कोकणच्या एका प्राचीन लेखात शौल्किक (जकाताधिकारी), गौल्मिक (सुरक्षाधिकारी) आणि चौरोद्धरणिक (चोरांचा बंदोबस्त करणारा) यांचा निर्देश आढळतो[१५], पण पुढील लेखांत ते दिसत नाहीत. त्यांची खाती अर्थातच

---

१ क्र. ९, ओ. २३.
२ क्र. १७, ओ. ३.
३ पूर्वोक्त, ओ. ३.
४ क्र. ७, ओ. ८५.
५ क्र. १९, ओ. ६६–६७.
६ पूर्वोक्त, ओ. ६७.
७ क्र. ९, ओ. २२.
८ क्र. ४०, ओ. ४८.
९ क्र. १३, ओ. ८७.
१० क्र. ४८, ओ. २४.
११ क्र. २६, ओ. ९.
१२ क्र. ३२, ओ. ५.
१३ क्र. १७, ओ. ५.
१४ क्र. ३८, ओ. ४.
१५ क्र. ४, ओ. ४२–४३

चालू असलीच पाहिजेत. ग्रामप्रमुख पट्टकील (पाटील) याचा उल्लेख काही लेखात आला आहे[१].

नगरे आणि गाव यांतील स्थानिक कारभार समित्यांतर्फे केला जात असे. त्यांवर श्रेष्ठी (व्यापारी), कारागीर आणि श्रेणि (उद्यममंडळे) यांचे प्रतिनिधि सभासद म्हणून नेमले जात. अशा समित्यांच्या सभासदांस 'महाजन' म्हणत[२]. त्यांची संख्या सोळा असे, असे एका लेखावरून दिसते.[३] कांही लेखांत त्यांस 'महत्तर' असे उल्लेखिले आहे, त्याचे अपभ्रष्ट रूप म्हातारा[४] हेहि एका लेखात आढळते. कन्नड लेखात प्रभु नामक अधिकाऱ्याचा उल्लेख आढळतो. तो नगराचा महापौर (Mayor) असावा[५]. या समितीच्या अध्यक्षाला 'महत्तम' म्हणत. स्थानिक धार्मिक संस्थांच्या प्रतिनिधींनाहि अशा समित्यांमध्ये घेतले जाई. एका लेखात पञ्चमहामठस्थानाचा उल्लेख आहे[६] पण त्याचे निश्चित रूप समजत नाही. कदाचित् त्यात ब्रह्मा, विष्णु, शिव, सूर्य आणि देवी यांच्या पांच देवालयांचा किंवा पांच धर्मपंथांचा – ब्रह्मा, विष्णु, शिव, बुद्ध आणि जिन यांच्या पंथांचा – अंतर्भाव होत असेल. या नगर आणि ग्राम समित्यांना स्थानिक गावुंडाच्या (अधिकाऱ्याच्या) किंवा राजपुरुषाच्या संमतीने भूमिदाने करता येत.

आयस्थाने— राज्यकारभाराचा खर्च भागवण्याकरिता विविध आयस्थाने होती. त्यांतील मुख्य जमीनमहसूल, याला शिलाहारांच्या लेखांत 'सिद्धाय'[७] असे म्हटले आहे. कांही इतर लेखांत त्याचा 'भूमिदेणक'[८] असा निर्देश केला आहे. तो स्मृतींमध्ये उत्पन्नाचा एक षष्ठांश असा सांगितला आहे. अपरार्क टीकेत बृहस्पतीचे एक वचन उद्धृत केले आहे.[९] त्यात जो ब्राह्मण स्वतः शेत नांगरून उत्पन्न काढतो त्याने राजाला त्याचा एक षष्ठांश, स्थानिक देवांना (त्यांच्या देवालयांना) एक विसांश, आणि सर्वसामान्य स्थानिक ब्राह्मणांना एक तिसांश भाग दिला पाहिजे, असे म्हटले आहे पण हा नियम त्या काळी अमलात आला होता काय हे माहीत नाही. शिलाहारांच्या लेखांवरून असे दिसते की जमीन महसूल अंशतः द्रम्मांत (म्हणजे रोख पैशांत) आणि अंशतः धान्यरूपाने (विशेषतः भातशेतीच्या बाबतीत) दिला जात असे.[१०] उत्पन्नाचे दुसरे साधन घरांवरील कर. याचा उल्लेख 'गृहंदेणक'[११] असा येतो. बाजारात विकल्या जाणाऱ्या पदार्थांवरहि कर असे.

१ क्र. २१, ओ. २१.
२ क्र. ४८, ओ. ४७.
३ क्र. १६, ओ. १२.
४ क्र. २५, ओ. १५-१६.
५ क्र. ५२, ओ. ४५.
६ क्र. ४२, ओ. ३५.
७ क्र. १४, ओ. ७७, ८० इ.
८ क्र. २१, ओ. १४.
९ अपरार्क, पृ. ९३६.
१० क्र. १४, ओ. १०७ इ.
११ क्र. २६, ओ. ५.

अपराध्यांवर लादलेल्या दंडापासूनहि कांही उत्पन्न मिळत असे. कांही दानपत्रांत हे उत्पन्न दान घेणाऱ्यांस दिल्याचा उल्लेख आहे.[१] हे अपराध किंवा गुन्हे शुक्रनीतिसारात पुढील प्रमाणे दिले आहेत.[२] हिंसा, चौर्य, परदाराभिमर्श, चहाडी, वाक्पारुष्य, असत्यभाषण, गुप्त गोष्टींचे प्रकटीकरण, दुष्ट कट करणे, नास्तिकता आणि कार्यात विघ्न आणणे हे ते होत. कांही लेखांत या संबंधात 'कुमारी-साहसा'चा[३] (अविवाहित स्त्रीवर केलेल्या बलात्काराचा) उल्लेख केला आहे. हे दण्ड सोळा सभासदांची कमिटी ठरवीत असे, तिला 'स्मारिका' असे नाव होते;[४] कारण ती तद्विषयक नियम स्मृतींतून काढून योग्य दंड सुचवीत असे. उत्पन्नाची कांही इतर साधने भूमिगत निधि[५] आणि निपुत्रिक गृहस्थाच्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीचे राजगामित्व[६] ही होती. याज्ञवल्क्य-स्मृतीत अशा निपुत्रिक मृत मनुष्याचे वारस म्हणून त्याची पत्नी, कन्या, मातापिता वगैरेंचा निर्देश आहे.[७] तेव्हा सर्व निपुत्रिक लोकांची मालमत्ता त्यांच्या निधनानंतर जप्त होत असे, असे दिसत नाही. यासंबंधात आलेल्या 'अपुत्र'[८] या विशेषणाचा अर्थ ज्याचा कोणी वारस हयात नाही तो, असा केला पाहिजे.[९] उत्पन्नाची आणखी कांही साधने मांडलिक राजांची खंडणी, खाणींवरील कर, वनसंपत्तीवरील कर इत्यादि होती.

जेव्हा देवांना (देवालयांना) किंवा ब्राह्मणांना ग्रामदाने दिली जात तेव्हा त्यांतील उत्पन्नावरचा कर त्यांना देण्याचा दानपत्रांत आदेश असे. राज्ञी व राजकुटुंबातील राजकुमारासारख्या इतर व्यक्तींना दानांत ढवळाढवळ करण्याची

---

१ क्र. ५, ओ. ६५.
२ क्र. अध्याय ३, श्लो. ६.
३ क्र. ५, ओ. ६६.
४ क्र. १६, ओ. १५.
५ क्र. ५, ओ. ६६.
६ पूर्वोक्त.
७ अध्याय २, श्लो. १३६.
८ पूर्वोक्त.
९ अ. कु. मुजुमदार यांनी शाकुन्तल, अंक ५ चा हवाला देऊन प्रतिपदिले आहे की स्मृतीत कांही नियम असले तरी निपुत्रिकाची मालमत्ता खालसा होत असे. त्यांनी म्हटले आहे की गुजराथेंत मात्र हेमचंद्राने निपुत्रिक मनुष्याची मालमत्ता राजगामी मानण्यास स्मृतींचा विरोध आहे, हे चौलुक्य नृपति कुमारपाल याच्या नजरेस आणून दिल्यावर ही प्रथा बंद पडली. *The Chaulukyas of Gujarat*, p. 247. पण हे मत्त बरोबर वाटत नाही. स्मृतींनी नियम बदलले तरी कोरीव लेखांत मागील वचने जशीच्या तशी लिहिली जात असत, हे जास्त संभवनीय आहे. अशा संदर्भात 'अपुत्र' याचा अर्थ 'कोणताही वारस नसलेला' असा केला पाहिजे.

सक्त मनाई असे.[१] तसेच सामन्त (प्रान्ताधिपति), नायक (विभागाधिपति) आणि ठाकुर[२] (विषयाधिपति) यांनाहि तसेच आदेश दिले जात. एवढेच नव्हे तर कोणाहि राजसेवकाने अंगुलीनेहि दानात अढथळा आणू नये अशी सक्त ताकीद दिली जात असे.[३] गृहांवरील कर, तसेच पुढे चर्चिलेला 'कुमारगद्याणक' कर दान दिलेल्या व्यक्तीला देण्याचा आदेश संबंधित व्यक्तींना दिला जात असे. जेव्हा एखाद्याला जमीन महसूलाची सूट दिली जात असे तेव्हा तिचा निर्देश 'भूमिदेणक-निर्मुक्ति'[४] असा केला जात असे. तसेच घरावरच्या करापासून सूट दिली असल्यास तिला 'गृहदेणकनिर्मुक्ति'[५] म्हणत. देवांना व ब्राह्मणांना दिलेल्या गावांत चाट (पोलीस) आणि भट (सैनिक) यांना प्रवेश करण्याची मनाई असे. पण चोर आणि राजद्रोही अपराध्यांना पकडण्याच्या बाबतीत हा निर्बंध नसे.[६] तसेच ग्रामदान दिलेल्यांना राजसेवकांच्या राहण्याची व त्यांच्याकरिता वाहनांची सोय करण्याच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात येत असे.[७]

उत्पन्नाची आणखी एक बाब म्हणजे जकात ही होय. कोकणाच्या पश्चिम किनाऱ्यावरच्या सोपारा, ठाणा, कल्याण, चौल, देवगड, खारेपाटण, मालवण इत्यादि बंदरांतून परदेशांशी मोठा व्यापार प्राचीन कालापासून चालत आला आहे. त्यावरील जकातीचे उत्पन्न मोठे असे. मुसलमानी प्रवाश्यांच्या वृत्तांतांवरून[८] या बंदरांतून कापूस, मलमलीची वस्त्रे, चामडी, नारळ, सुपाऱ्या, नीळ वगैरे वस्तु परदेशी पाठविल्या जात आणि सोने, चांदी, तांबे, कथील, शिसे वगैरे धातू भारतात

---

१ क्र. १६, ओ. १४.

२ क्र. ओ. १६. ओ. १४. क्र. ५ व ६ यांवरून असे दिसते की निदान प्राचीन काळी विषयांच्या (जिल्ह्यांच्या) प्रमुखांस 'महामात्य' म्हणत असत.

३ 'राजकीयानामनङ्गुलिप्रेक्षणीयम्' असे वचन अनेक कोरीव लेखांत येते. क्र. ५८, ओ. २८; क्र. ५९, ओ. १२ इ. त्याचा अर्थ 'करांगुलीनेहि अडथळा आणू नये' असा दिसतो.

४ क्र. २१, ओ. १४.

५ क्र. २६, ओ. ५.

६ क्र. ७, ओ. ६१–६२ मधील 'अचाटभटप्रवेश्य:' पाहा. याला 'चोरराजा-पथ्यवर्जम्' (चोर आणि राजद्रोही यांचा अपवाद करून) अशी मर्यादा घातली असे, पण ही मर्यादा सर्वत्र स्पष्टपणे उल्लेखिली नसते. कॉ. इ. इं., व्हॉ. ४, पृ. २४ पाहा.

७ यांचा उल्लेख 'देणक' आणि 'पडणक' असा क्र. १६, ओ. १५–१६ मध्ये केला आहे.

८ *H. C. I. P.*, Vol. IV., pp. 522 f.

आणल्या जात. याशिवाय घोडयांची आयात मोठया प्रमाणावर होत असे. भारतातील राजरजवाडयांना अरबी घोडे फार पसंत पडत. त्यामुळे त्यांचा व्यापार कोकणातील बंदरांत जकातीच्या दृष्टीने फार किफायतशीर होत असे. परदेशाशी तसेच कोकणच्या किनारपट्टीवरील बंदरांशी व्यापार करणाऱ्या जहाजांवर जकात बसविली जात असे. अनन्तपालाच्या खारेपाटण ताम्रपटांत कांही मंत्र्यांच्या व त्यांच्या नातलगांच्या जहाजांना व खलाशांना या जकातीची सूट दिल्याचा उल्लेख आहे.[1]

शेवटी उत्तर भारतातील गाहडवालांच्या ताम्रपटांतल्याप्रमाणे[2] उत्तर कोकणाच्या अनेक ताम्रपटात[3] उल्लेखिलेल्या 'कुमारगद्याण' नामक कराची थोडी चर्चा करू. कोकणांतील प्रत्येक खेडयावर हा कर लादला जात होता. त्याचे विविध अर्थ करण्यात आले आहेत. कोणी म्हणतात, 'कुमारगद्याण' नामक नाणी होती त्यावर हा कर असे.[4] गद्याण नामक नाणे प्रसिद्ध आहे. ते सोन्याचे असून 'लीलावती'त सांगितल्याप्रमाणे त्याचे वजन ४८ रती (सध्याची अधेली) असे. किट्टेलला बेल्लारी आणि मैसूर प्रदेशात ही सोन्याची गद्याण नाणी एक रुव्वी किंवा फार्दिगच्या वजनाची आढळली. पण 'कुमारगद्याणक' नावाच्या नाण्यांचा निर्देश मात्र कोठेहि आढळत नाही. या संज्ञेचे दुसरे एक स्पष्टीकरण हे की ते नाणे कुमाराच्या किंवा राजपुत्राच्या जन्मोत्सवप्रसंगी राजाला नजराणा म्हणून द्यावे लागे.[5] पण असे प्रसंग क्वचितच यावयाचे. म्हणून त्यांचा उल्लेख ग्रामदानांत करण्याची जरुरी नव्हती. तिसरे एक स्पष्टीकरण असे की तो टेकाडांवर किंवा वन भागात केलेल्या 'कुमरी शेती'वर बसविलेला कर असावा.[6] पण हेहि बरोबर वाटत नाही. कारण 'कुमारगद्याणक' कर उत्तर तसेच दक्षिण कोकणांतील सर्व गावांवर – ती टेकडीवर असोत किंवा अरण्यात वसलेली असोत – बसविलेला आढळतो. कांही ठिकाणी 'कुमारद्रोणा'चा उल्लेख आहे.[7] त्यावरून हा कर नाण्यात किंवा धान्याच्या विशिष्ट मापात भरला जात असे, असे दिसते. तेव्हा असे वाटते की हा

---

१ क्र. १९, ओ. ७७–८०.

२ इं. अँ., व्हॉ. १८, पृ. १७; ए. इं., व्हॉ. ९, पृ. ३०२ इ.; पूर्वोक्त, व्हॉ. ४, पृ. १२० इ.

३ क्र. १४, ओ. ८२, ८६, ९०, ९४ इ.

४ B. P. Muzumdar, *Socio-Economic History*, p. 237.

५ *J. N. S. I.*, Vol. VII, pp. 20 f.

६ *Ep. Carn.*, Vol. X, pp. 86 f.

७ *Ep. Ind.*, Vol. XXXIII, pp. 244-45.

'कुमारगद्याणक' कर राजकुमाराचे पालनपोषण, शिक्षण वगैरेकरिता प्रजेवर बसविला जात असावा. इतर कर राजाला त्याच्या कर्तव्यपूर्तीकरिता दिले जात तर हा कर राजपुत्राच्या योगक्षेमाकरिता द्यावा लागे. जेव्हा ग्रामदाने केली जात तेव्हा त्यातील लोकांस इतर करांबरोबर तोहि (दर शेतास एका गद्याणाच्या रूपाने) दान दिलेल्या व्यक्तीस द्यावा लागे[१].

---

१ हा कर राजकुमाराच्या नावाने प्रत्येक गद्याणावर अमुक असा होता असे घोषालांचे मत आहे. लल्लनजी गोपाल यांच्या मते प्रत्येक कुटुंबावर प्रतिवर्षी एक गद्याण असा हा कर असे. ते म्हणतात, जरी 'कुमार' म्हणजे राजपुत्र, तरी हा कर सर्व राजकुटुंबाकरिता लादला जात असे. See his *Economic Life of Northern India*, A. D. 700-1200, pp. 52 f.

धार्मिक परिस्थिति

भारताचे तीन मुख्य धर्म हिंदू, बौद्ध आणि जैन हे होत. यांपैकी बौद्ध धर्माचे अनुयायी शिलाहारांच्या काळात फारच थोडे होते. त्या काळांतील बौद्ध धर्माचे कोरीव लेख फक्त कान्हेरी येथील लेण्यांत सध्या अवशिष्ट आहेत. ते उत्तर कोकणाच्या शिलाहारांच्या आरंभीच्या काळातलें आहेत. त्या लेखांवरून असे दिसते की कान्हेरी येथील बौद्ध धर्माचे केंद्र गौड (पश्चिम बंगाल) सारख्या दूर दूरच्या प्रदेशातून बौद्धधर्मीयांना आकृष्ट करीत असे.[१] त्या धर्माच्या उपासकांनी कान्हेरी येथील भिक्षूंचे भोजन, चीवरे व धार्मिक ग्रंथ यांच्या करिता तेथील भिक्षुसंघापाशी द्रम्म नाण्यांच्या कायम ठेवी (अक्षयनीवि) ठेवल्या होत्या. यानंतर खिस्तोत्तर बाराव्या शतकाच्या उत्तरार्धातील मल्लिकार्जुनाच्या काळापर्यंत उत्तर कोकणातील बौद्ध धर्माच्या अस्तित्वाचा पुरावा आढळत नाही. मेरुतुंगाच्या 'प्रबन्धचिन्तामणी'त म्हटले आहे की चौलुक्य नृपति कुमारपाल याच्या अंबड नामक मन्त्र्याने कोंकणनृपति मल्लिकार्जुन याच्या राज्यावर स्वारी केली. परंतु तीत त्याचा पराभव झाला. तेव्हा त्याने कृष्णगिरीच्या (कान्हेरीच्या) लेण्यात कृष्ण वस्त्रे परिधान करून कांही काळ घालविला.[२] मेरुतुंगाचा या स्वारीचा वृत्तांत सर्वस्वी विश्वसनीय नाही. तथापि त्यावरून खिस्तोत्तर बाराव्या शतकापर्यंत कान्हेरीच्या लेण्यांत बौद्ध भिक्षु राहत होते, असे अनुमान काढण्यास हरकत नाही. त्यापूर्वी सुमारे शंभर वर्षे अगोदर होऊन गेलेल्या सोड्ढल कवीने आपल्या 'उदयसुन्दरीकथे'त खानदेशातील एका बौद्ध चैत्याचे वर्णन केले आहे.[३] पण ते अर्थातच काल्पनिक आहे. तथापि कोल्हापूरसभोवतालच्या प्रदेशात खिस्तोत्तर बाराव्या शतकापर्यंत बौद्ध धर्मीयांची वसती होती हे त्या शिलाहार शाखेच्या गंडरादित्य नृपतीने (सु. सन ११०५–११४०) इरुकुडी (मिरजेजवळचे सध्याचे इरळी) येथे शिव आणि जिन यांच्या देवालयांबरोबर बुद्धाचेहि देवालय बांधून त्याच्या पूजेअर्चेकरिता एक निवर्तनाचे भूमिदान दिले होते, त्यावरून स्पष्ट दिसते.[४]

---

१ क्र. २, ओ. ४.

२ प्रबन्धचिन्तामणि (सं. आर. डी. शास्त्री), पृ. १२८ इ.

३ उदयसुन्दरीकथा, पृ. २८.

४ क्र. ४५, ओ. ३४. बौद्ध धर्म दक्षिण भारतात अकराव्या शतकापर्यंत प्रचलित होता. ए. क., व्हॉ. ७, S. K. 170.

शिलाहारांच्या कालात हिंदूधर्म अत्यंत उत्कर्षावस्थेत होता. त्या काळी वाजपेय, अश्वमेध यांसारखे जुने वैदिक यज्ञ प्रचारातून गेले होते. त्या काळात प्रमाणभूत मानलेल्या स्मृतींत आणि त्यांवरील टीकांतहि तशा मोठ्या खर्चाच्या यज्ञयागांचा पुरस्कार केलेला आढळत नाही. त्याऐवजी नेहमी करता येणाऱ्या पंचमहायज्ञांवर भर दिला आहे. त्यांमध्ये 'बलि' (सजीव प्राण्यांना अन्नदान), 'चरु' (देवतांना अन्नार्पण), 'वैश्वदेव' (देवतांची पूजा), 'अग्निहोत्र' (शास्त्रोक्त विधीने अग्नि सर्वकाळ ठेवून हवन करणे) आणि 'अतिथिपूजन' यांचा अंतर्भाव असे. या कालांतील शिलाहारांच्या तसेच इतर राजांच्या दानपत्रांत ब्राह्मणांना हे पंचमहायज्ञ करण्याकरिता भूमिदाने दिलेली आढळतात. या यज्ञांच्या नियमितपणाने केलेल्या अनुष्ठानाने राज्याचे कल्याण होते, अशी त्या काळी श्रद्धा होती

या कालात वैदिक यज्ञयाग प्रचारातून चालले तसा पौराणिक हिन्दू धर्माचा उत्कर्ष होऊ लागला. पुराणोक्त देवदेवतांची पूजाअर्चा या काळात सर्वत्र प्रचलित होती. या कालांतील राजेलोक, त्यांचे मंत्री व सामान्य जन यांच्या दानाचे उद्देश देवदेवतांची मंदिरे बांधणे, त्यांच्या पंचोपचारयुक्त पूजेची व्यवस्था करणे, त्यांच्या देवळांत सदैव दिवा जळत राहील याची उपाययोजना करणे, त्यांना जोडलेल्या मठांत तपस्वी व विद्यार्थी यांच्या राहण्याची आणि संलग्न अन्नसत्रांत त्यांच्या भोजनाची व्यवस्था करणे इत्यादि असत. शिलाहारांच्या लेखांत शिव, विष्णु, आदित्य आणि ब्रह्मा या देवांचे आणि महालक्ष्मी, जोगेश्वरी आणि भगवती या देवतांचे निर्देश आढळतात. या सर्वांत भगवान् शंकराचे उल्लेख जास्त आहेत. उत्तर कोकणच्या शिलाहारांची बहुतेक दाने शिवमंदिरांच्या निर्मितीकरिता आणि भगवान् शंकराच्या पूजार्चनेकरिता दिली होती. त्या वंशातील झंझ नृपतीने आपल्या नावे बारा शिवालये बांधली होती.[१] ही अर्थातच बारा ज्योतिर्लिंगांच्या पवित्र क्षेत्रीं बांधली असावी. पण त्यांतील एकहि आता अवशिष्ट नाही. छित्तराजाने कल्याणजवळ अंबरनाथ येथे भगवान् शंकराचे उत्तुंग आणि उत्कृष्ट शिल्पाकृतींनी युक्त असे देवालय बांधण्यास आरंभ केला होता. ते त्याचा कनिष्ठ बंधु मुम्मुणि याच्या काळात पूर्ण झाले.[२] दक्षिण कोकणच्या रट्टराजाने आपला पिता तृतीय अवसर याने प्रतिष्ठापित केलेल्या अव्वेश्वर नामक शंकराच्या पूजाअर्चेकरिता ग्रामदाने दिली होती.[३] कांही शिलाहारांनी सौराष्ट्रातील सोमनाथाची यात्रा करून भूमिदाने दिली होती. अरिकेसरी या शिलाहार राजकुमाराने पित्राज्ञेने सोमनाथाचे दर्शन घेऊन त्याला आपले विजय अर्पण केल्याचा उल्लेख अनेक लेखांत येतो.[४]

---

१ उदाहरणार्थ, क्र. १३, ओ. १२–१४ पाहा.

२ क्र. १७, ओ. ५–६. ३ क्र. ४१. ओ. ४२.

४ क्र. १३, ओ. २६–२८.

राजेलोकांप्रमाणे त्यांच्या मंत्र्यांनी तसेच सामान्य जनांनी अनेक शिवालये आपल्या नावांनी बांधली होती. उदाहरणार्थ, व्योमशिव या द्वितीय अपरादित्याच्या राज-गुरूने व मंत्र्याने व्योमेश्वर नामक शंकराची स्थापना करून त्या राजाच्या संमतीने त्याला भूमिदान दिले होते.[१] त्याच राजाच्या लक्ष्मणनारायण नामक दुसऱ्या एका मंत्र्याने सौराष्ट्रातील सोमनाथ पट्टणाच्या सोमनाथाला कांही द्रम्म आणि स्थानक येथील आपल्या वाटिकेचे (वाडीचे) उत्पन्न अर्पण केले होते.[२] तसेच द्वितीय अपरादित्याने माह्वली गावातील एका वाटिकेच्या उत्पन्नातून २४ द्रम्म दर्भवतीच्या (गुजराथेतील दाभोईच्या) वैद्यनाथ देवाला दिले होते.[३] या शिवाय पुढील शिवालयांचे उल्लेख शिलाहारांच्या लेखांत आले आले आहेत – मरुत्क्षेत्र (मुरुड) येथील मरुदीश्वर,[४] स्थानक (ठाणे) येथील उत्तरेश्वर,[५] भिवंडी तालुक्यातील चौधरपाडा येथील षोंपेश्वर,[६] कोल्हापूरच्या राधानगरी तालुक्यातील गुडालय येथील गुडालेश्वर,[७] सेडम्बाळ (शेडबाळ) येथील माधवेश्वर[८] इत्यादि. कांही लेखांत शिवपंचायतनाला[९] (शिव, पार्वती, गजानन वगैरेंना) दिलेल्या दानांचा उल्लेख आहे.

भगवान् शंकराच्या दोन पुत्रांपैकी कार्त्तिकेय याचा उल्लेख कोरीव लेखांत येत नाही. पण दुसरा पुत्र गजानन याची पूजा मात्र या काळात सर्वत्र प्रचलित होती. त्याच्या स्वतंत्र देवालयाचे उल्लेख आढळत नाहीत, पण उत्तर कोकणाच्या सर्व कोरीव लेखांच्या आरंभी त्याला नमन केले आहे. त्याचे वाहन मूषक याचा उल्लेख अपरार्क टीकेत राजानक शितिकण्ठ याच्या ग्रंथातून उद्धृत केलेल्या उताऱ्यात आला आहे. पण तो भाग काश्मीरात त्या टीकेचा प्रसार झाला तेव्हा त्यात घुसडण्यात आला असावा.

विष्णु हाहि त्या कालांतील प्रमुख देव होता; पण उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या स्वतःच्या लेखांत त्याच्या देवालयाचा उल्लेख येत नाही. द्वितीय केशिदेव याचा मंत्री लक्ष्मीधर याने मांडवली (ठाणा जिल्ह्यातील मांडवी) येथे बांधलेल्या लक्ष्मीनारायण देवाला दिलेल्या दानाचा उल्लेख एका लेखात आला आहे,[१०] इतर कांही ठिकाणीहि भगवान् विष्णूची देवालये होती. उदाहरणार्थ,

---

१ क्र. ३०. ओ. ८–९.
२ क्र. ३१, ओ. २–३
४ क्र. २३, ओ. ६५–६६.
६ क्र. ३६, ओ. ११–१२.
८ क्र. ५२, ओ. २१.
१० क्र. ३४, ओ. ५.
३ क्र. ३२ ओ. १०.
५ क्र. ३९, ओ. १५.
७ क्र. ४५, ओ. ३६.
९ क्र. ४३, ओ. ६०–६१.

कोल्हापूरचे उपनगर ब्रह्मपुरी येथे शिलाहार राजाच्या मंत्र्याने खेडादित्याच्या मंदिराचा जीर्णोद्धार करताना ब्रह्मा आणि विष्णु यांचीहि देवालये तेथे बांधल्याचा उल्लेख आहे.[१] एका लेखाच्या मंगलश्लोकात विष्णूच्या वराहावताराची स्तुति आली आहे.[२]

या कालात ब्रह्मदेवाचे महत्त्व पुष्कळच कमी झाले होते. त्याच्या मूर्ति इतर देवांच्या देवळांच्या भिंतीवर कोरल्या जात. अंबरनाथ येथील शिवालयाच्या भिंतीवर अशी मूर्ति आहे. पण त्याची स्वतंत्र देवालये क्वचितच बांधली जात. कोल्हापूरच्या ब्रम्हपुरी उपनगरात खेडादित्याच्या देवालयाजवळ कडितामात्य (लष्करी मंत्री) मैलपैय्य याने बांधलेले ब्रम्हयाचे पूर्वोक्त देवालय हेच त्याचे शिलाहारांच्या राजवटीतील एकमेव उदाहरण होय.[३] त्यापेक्षा आदित्याची देवालये जास्त होती. उत्तर कोकणचे शिलाहार राजे त्याचे सूर्योदयी पूजन करून मगच आपली दाने देत. लवणेतट (भिवंडीजवळ लोनाड येथे) लोणादित्याचे देवालय होते.[४] ब्रह्मपुरीच्या खेडादित्याच्या मंदिराचा उल्लेख पूर्वी केला आहेच.[५]

कांही देवींच्या देवालयांचे उल्लेख शिलाहारांच्या लेखात येतात. त्यांमध्ये कोल्हापूरची महालक्ष्मी प्रमुख होती. कोल्हापूर येथील तिचे देवालय कोणी बांधले हे निश्चितपणे सांगता येत नाही; तथापि ख्रिस्तोत्तर नवव्या शतकापूर्वीच तिचे माहात्म्य प्रस्थापित झाले होते असे दिसते; कारण राष्ट्रकूट नृपति प्रथम अमोघवर्ष याने कांही सार्वजनिक आपत्तीच्या निवारणार्थ आपल्या डाव्या हाताची अंगुलि तिला अर्पण केल्याचा उल्लेख त्याच्या संजान ताम्रपटात आला आहे.[६] कोल्हापूर येथील तिचे देवालय तीन गर्भागारांचे असून तिच्या उजवीकडे महाकाली आणि डावीकडे महासरस्वती यांच्या देवकुली आहेत. हे देवालय शिलाहारांपूर्वी करहाटक (कऱ्हाड) येथून राज्य करणाऱ्या सिंदवंशी राजाने बांधले असावे.[७] त्यापूर्वीच ते शाक्तपीठ म्हणून प्रसिद्धि पावले होते. कोल्हापूरचे शिलाहार तिचे निःसीम भक्त होते. आपणांस तिचा वरप्रसाद मिळाला असल्याचा उल्लेख त्यांच्या अनेक लेखांत येतो.[८] संयान (सध्याचे उत्तर कोकणातील संजान) येथील भगवती देवीहि सुप्रसिद्ध होती. तेथे राज्य करणाऱ्या अरब मांडलिकांनी दिलेला,[९] तसेच शिलाहार

---

१ ओ. ४८, ओ. २६.

२ क्र ४६, ओ. १. हा श्लोक पूर्वकालीन चालुक्यांच्या लेखांतून घेतला आहे.

३ क्र. ४८, ओ. २६.

४ क्र. ७, ओ. ६२.

५ क्र. ४८, ओ. २५.

६ ए. इं., व्हॉ. १८, पृ. २४८.

७ मागे, पृ. [४८] पाहा.

८ उदाहरणार्थ, क्र. ४८, ओ. २० पाहा.

९ ए. इं., व्हॉ. ३२, पृ. ५१ इ.

छित्तराजाच्या चामुंडराज नामक मांडलिकाने दिलेला ताम्रपट[1] हे अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत तिच्या पूजेकरिता व सत्रादिकांकरिता दिलेल्या दानाचा उल्लेख आहे. चित्रा येथील शिलालेखात उल्लेखिलेल्या जोगेश्वरी देवीचे देवालय साष्टी बेटातील तन्नामक गावातील असावे.[2] जैन तीर्थंकर पार्श्वनाथ याची शासन-देवता पद्मावती हिचा उल्लेख विजयादित्यकालीन एका शिलालेखात आला आहे.[3]

उत्तर आणि दक्षिण कोकणचे शिलाहार नृपति निष्ठावान् शिवभक्त होते. त्यांनी दूरदूरच्या प्रदेशांतून शैव मुनींना आपल्या राज्यात आदराने बोलावून ग्रामदाने दिली होती. दक्षिण कोकणचा रट्टराज याने आपल्या शक संवत् ९३० च्या ताम्रपटात मत्तमयूर नामक शैव संप्रदायाच्या कर्करोणी शाखेचा आचार्य अंभोजशंभु याचा शिष्य आत्रेय याला ग्रामदान दिल्याचा उल्लेख आहे.[4] कर्करोणीचे स्थान निश्चित नाही. ते स्थान मध्यभारतात असावे. पण ज्या मत्तमयूर संप्रदायाची ती शाखा होती त्याचे ते नाव ख्रिस्तोत्तर दहाव्या व अकराव्या शतकांत राज्य करणाऱ्या चौलुक्य नृपतींच्या मध्यभारतातील राजधानीवरून पडले होते. हे मत्तमयूर पूर्वीच्या ग्वाल्हेर संस्थानातील कद्वाहा असावे. त्या ठिकाणी एका मठाचे आणि चौदा-पंधरा हिंदू देवालयांचे अवशेष अद्यापि दृष्टीस पडतात. ती देवालये ख्रिस्तोत्तर दहाव्या–अकराव्या शतकातील दिसतात.[5] ग्वाल्हेर संस्थानच्या पुरातत्त्व खात्याचे संचालक श्री. मो. ब. गर्दे यांनी म्हटले आहे की, "अशा प्रकारच्या देवालयांचा समूह मध्य भारतात दुसऱ्या कोठेहि एके ठिकाणी आढळत नाही. कद्वाहा हे ग्वाल्हेर संस्थानातील खजूराहो किंवा भुवनेश्वर होय." या पंथाचे आचार्य दूर दूर देशीं आपल्या पंथाच्या प्रसारार्थ जात असत[6]

शैवपंथाचे शैव, पाशुपत, कारुक (किंवा कारुणिक) आणि कापालिक असे चार संप्रदाय होते. मत्तमयूर शाखेचे आचार्य शैव संप्रदायाचे होते. त्यांची नांवे 'शिव' किंवा 'शंभु' पदान्त असत, जशी पाशुपतांची 'राशि'पदान्त असत. या दोन्ही संप्रदायांच्या आचार्यांचे उल्लेख शिलाहारांच्या लेखांत येतात. भाइयपेश्वर देवालयाचा ज्ञानशिव हा शैवसंप्रदायी होता.[7] त्याचा उल्लेख पश्चिमाम्नायाचा वाडाचार्य याचा शिष्य म्हणून आला आहे. त्यावरून शैव संप्रदायाची एक शाखा उत्तर कोकणांत होती, असे दिसते. शैव संप्रदायाचा दुसरा आचार्य अंभोजशम्भु

१ क्र. १२, ओ. १७.
२ क्र. २१, ओ. १४.
३ क्र. ४९, ओ ९.
४ क्र. ४१, ओ. ५३–५६.
५ *C. I. I.*, Vol. IV, pp. clv f.
६ *Ibid.*, pp. cliii f.
७ क्र. ११, ओ. ५८.

याचा निर्देश मागे केला आहे. मल्लिकार्जुनाचा राजगुरु वेदशिव हाहि याच संप्रदायाचा होता. तो पुढे त्या राजाचा मंत्री झाला. भोपक व्योमशिव हा द्वितीय अपरादित्याचा महाप्रधान होता.[१] यांवरून या शैवसंप्रदायी आचार्यांचे राजदरबारी कसे प्रस्थ होते, ते स्पष्ट होते. मारसिंहाच्या मिरज ताम्रपटात पाशुपत पंडित ब्रह्मेश्वराची मोठी प्रशंसा केली आहे. त्याचा शिष्य चिक्कदेव हाहि तसाच विद्वान् होता, असे म्हटले आहे.[२]

'याज्ञवल्क्यस्मृती'वरील 'अपरार्क टीके'त या शैव पंथाच्या उपादेयत्वाविषयी आणि तत्प्रणीत आचारांच्या अनुकरणाविषयी विस्तृत चर्चा आली आहे. सनातनी वैदिकमार्गी हिंदूंचे या पंथाविषयी अनुकूल मत नव्हते. हे पंथ भगवान् शंकरांनी वेदमार्गापासून चळलेल्या लोकांचा बुद्धिभ्रंश करण्याकरिता उपदेशिले होते असे ते म्हणत. अपरार्काने या पंथाच्या कित्येक आचारांचा – उदाहरणार्थ, मद्यसेवन, चंडिकेला मनुष्य बळी देणे, सिद्धिप्राप्त्यर्थ ग्रहण प्रसंगी नृकरोटीत नेत्रांजन तयार करणे इत्यादिकांचा – तीव्र निषेध केला आहे. चर्चेचा समारोप करताना त्याने म्हटले आहे की या पंथाचे जे आचार सनातनधर्मी पवित्र ग्रंथांविरुद्ध नसतील तेवढयांचेच अनुसरण करावे.[३]

शिव आणि इतर पौराणिक देवदेवतांच्या पूजेत 'अंगभोग' आणि 'रंगभोग' असत.[४] 'अंगभोगा'त जलस्नान, चन्दनलेप पुष्पे, अक्षता, धूप, दीप, नैवेद्य आणि ताम्बूल यांची अष्टविध अर्चना असे. रंगभोगात गायन, वादन आणि नर्तन यांनी देवतांचे मनोरंजन केले जाई. एका लेखांत 'दारिकां'चा उल्लेख आढळतो.[५] त्या नृत्यगीतादिकांनी देवतेचे मनोरंजन करणाऱ्या देवदासी असाव्या.

शैव देवालयांच्या मठांत शिवसंप्रदायांच्या मुनींना आश्रय दिला जात असे. त्यांच्या वस्त्रभोजनादिकांकरिता दान दिलेल्या गावांच्या उत्पन्नातून व्यवस्था केली जात असे. कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या मठात देवीच्या पंचोपचार पूजेकरिता करहाटक आणि सहवासी ब्राह्मणांच्या निवासादिकाची व्यवस्था केली होती.[६] अनेक देवालयांना जोडून पाठशाला असत. त्यांमध्ये धर्मग्रंथांचे पठणपाठण केले जात असे. तसेच मठांशी जोडून अन्नसत्रेहि असत. त्यांमध्ये अतिथींना व अनाथांना आश्रय व भोजन मिळे. एका लेखांत वैदिक पंडित, अभ्यागत आणि छात्र यांच्या पायांना तेल लावण्याची व्यवस्था केल्याचा उल्लेख आहे.[७] दुसऱ्या एका लेखात

---

१ क्र. ३०, ओ. ५–६.
२ क्र. ४३, ओ. ३६–४४.
३ अपरार्क, पृ. १९.
४ *J. B. R. A. S.*, Vol. XII, p. 8.
५ क्र. ४१, ओ. ५८.
६ क्र. ५८, ओ. २४–२५.
७ क्र. १२, ओ. १८.

पंचमहामठाचा उल्लेख आहे.[१] त्याचे निश्चित स्वरूप कसे होते, हे कळत नाही. अशा मठांचे उल्लेख इतरत्रहि आढळतात.[२] कांही विद्वानांच्या मते या मठांत ब्रह्मा, विष्णु, महेश्वर, बुद्ध आणि जिन यांच्या पूजाअर्चेची व्यवस्था केली जात असे.[३] पण शिलाहारांच्या काळी कोकणात अशी बुद्ध आणि जिन यांची देवालये होती काय, हा प्रश्न आहे.

शिलाहारांच्या राज्यात जैन धर्महि भरभराटीत होता. 'उदयसुन्दरीकथे'त सोड्ढलाने लाट आणि उत्तर कोकण देशांतील कांही जैन ग्रंथकारांचा उल्लेख केला आहे,[४] पण उत्तर आणि दक्षिण कोकणाच्या शिलाहारांच्या एकाहि लेखात जैन मंदिराचा उल्लेख नाही. कोल्हापूरच्या शिलाहारांच्या अनेक लेखांत जैन मंदिरांना दिलेल्या दानांचे उल्लेख येतात. कोल्हापूर येथे माघनन्दि सिद्धान्तदेव नामक मोठा विद्वान् आणि सन्मान्य जैन मुनि शुक्रवार वेशी जवळच्या 'रूपनारायण' जैन वसतीचा आचार्य होऊन गेला. त्याचे अनेक शिष्य दूरवर पसरले होते. ही रूपनारायण-वसति गंडरादित्याचा सामन्त निंबरस किंवा निंबदेव याने बांधली होती आणि तिला त्याने आपल्या सम्राटाचे बिरुद 'रूपनारायण' हे नाव ठेवले होते.[५] निंबदेव हा गण्डरादित्याचा सामन्त असल्यामुळे त्याने बांधलेल्या या जिनालयाला श्रवणबेळ्गोळ येथील कोरीव लेखात 'सावन्तबसदि' (सामन्तवसति) असे म्हटले आहे.[६] गंडरादित्याने स्वतः मिरिज देशातील इरुकुडी (मिरजेजवळचे इरळी) येथे गंडसागर तलाव खोदून त्याच्या कांठावर शिव आणि बुद्ध यांच्याप्रमाणे जिनाचेहि मंदिर उभारून त्याच्या पूजाअर्चेकरिता एक निवर्तन भूमीचे दान दिले होते.[७] माघनन्दि सिद्धान्तदेव मूल संघाच्या देशीय गणाचा आणि पुस्तकसंघाचा आचार्य होता. त्याचे शिष्य कोल्हापूरच्या शिलाहारांच्या राज्यांत अनेक ठिकाणी उभारलेल्या वसतींचे (मंदिरांचे) आचार्य म्हणून दान स्वीकारताना तत्कालीन लेखांत आढळतात. हाविन हेरिळगे (आजरे महालातील हेरे) येथे पार्श्वनाथ जिनाचे मंदिर होते ते शिलाहार विजयादित्याचा सामन्त कामदेव याचा हडपवळ (ताम्बूलवाहक सेवक) वासुदेव याने बांधले होते.[८] दुसरे पार्श्वनाथ मंदिर मडलूर (भूदरगड तालुक्यातील मडूर)

---

१ क्र. ४२, ओ. ३५.
२ *Ep Carn.*, Vol. VII SK., 99.
३ G. S. Dikshit : *Local Self-Government in Mediaeval Karnāṭaka*, p. 162, n. 21.
४ उदयसुन्दरीकथा, पृ. १५.
५ *Iud. Ant.*, Vol. XIV, p. 19; क्र. ५४, ओ. २५
६ *Ep, Ind.*, Vol. II, Intro., p. 61.
७ क्र. ४५, ओ. ३४–३५.
८ क्र ५३, ओ. १८–२२.

येथे होते.[१] त्याचा आचार्य, पूर्वोक्त माघनन्दि सिद्धान्तदेवाचा शिष्य अर्हन्नन्दि सिद्धान्तदेव, याला विजयादित्याने आपला मामा सामन्त लक्ष्मण याच्या विनंतीवरून भूमिदान दिले होते. तिसरे पार्श्वनाथ मंदिर कवडेगोल्ल येथे गंडरादित्याचा पूर्वोक्त सामन्त निंबदेवरस याने बांधले होते.[२] त्याला तत्कालीन अय्यावोळेचा मोठा व्यापारी संघ वीरबणंजु याच्याकडून त्या गावाच्या बाजारात विकलेल्या वस्तूंवर अनेक करांच्या रूपाने दाने मिळाली होती.[३] त्यांचा स्वीकार कोल्हापूरच्या रूपनारायण वसतीचा आचार्य श्रुतकीर्ति त्रैविद्य याने त्या जैन मंदिराच्या वतीने केला होता. दुसरे एक जैन मंदिर आजुरिका (आजरे) येथे होते. ते नेमिनाथ जिनाचे असून शिलाहार गंडरादित्याने बांधले होते व त्याला त्याने आपल्या 'त्रिभुवनतिलक' बिरुदाचे नाव दिले होते. त्याचा उल्लेख सोमदेवाने आपल्या 'शब्दार्णवचन्द्रिकेत' केला आहे.[४]

याशिवाय कोल्हापूर प्रदेशात आणखी दोन जैनमंदिरे होती. त्यांपैकी एक हेर्ले येथील नेमिनाथाचे असून आजुरिका येथील मंदिराप्रमाणे त्याचेहि नाव 'त्रिभुवन-तिलक'च होते. दुसरे आदिनाथ तीर्थंकराचे असून ते शिलाहार गंडरादित्याचा पूर्वोक्त सामन्त निम्बरस याने महालक्ष्मी देवालयाजवळ उभारले होते. त्या देवा-लयाच्या पूर्वेकडील आवारात सध्या शेषशायी विष्णूचे मंदिर आहे. त्याच्या मंडपाच्या तुळयांवर त्याचा लेख कन्नड भाषेत कोरला आहे. त्यावरून ते जिनमंदिर विशाल आकाराचे होते. दोन्ही बाजूंस बांधलेल्या व्यापाऱ्यांच्या व गणिकांच्या हवे-ल्यांनी त्याला शोभा आली होती. त्याच्यासमोर उंच मानस्तंभ होता इत्यादि माहिती मिळते.[५] कालांतराने त्याचे सध्याच्या शेषशायी मंदिरात रूपांतर झाले आहे, तथापि त्याच्या सभामंडपाच्या छताच्या तुळयांवर जैनतीर्थंकरांच्या पंक्ति अद्यापि ओळखता येतात.

याशिवाय खिद्रापूर येथे जैन तीर्थंकर ऋषभदेव याचे एक सुंदर देवालय अद्यापि सुस्थितीत आहे. कोरीव लेखाच्या पुराव्याच्या अभावी ते कोणी बांधले हे निश्चितपणे सांगता येत नाही. तथापि त्याच्या भिंतीवरच्या सरस्वतीसारख्या देवतांच्या मूर्ति खिद्रापूर येथील शिवालयावरील त्याच देवतांच्या सारख्या हुबेहुब आहेत. त्यावरून खिद्रापूरच्या शिवालयाचा निर्माता गंडरादित्य याचा सामन्त निंबदेव यानेच ते जिनालय बांधले असावे असे अनुमान करता येते. या मंदिराला अनेक शिल्पाकृतींनी सुशोभित केले आहे.

---

१ क्र. ५४, ओ. १८.
२ क्र. ४९, ओ. १०.
३ पूर्वोक्त ओ. २६–३२
४ शब्दार्णवचन्द्रिका, पृ. २२१.
५ क्र. ५०, श्लो. ११–१३.

तत्कालीन प्रमाणभूत स्मृतींत इष्ट आणि पूर्त कर्मांनी पुण्यप्राप्ति होते असे सांगितले आहे. इष्ट म्हणजे वैदिक यज्ञ-याग. ते तीन उच्च वर्णांना करता येत; पण पूर्त किंवा दानधर्मादि पुण्य कर्में सर्व वर्णांना विहित होती. अपरार्क टीकेत पुढील पूर्तविषयक श्लोक महाभारतातून उद्धृत केला आहे.[१]

वापीकूपतडागानि देवतायतनानि च ।
अन्नप्रदानमारामः पूर्तमित्यभिधीयते ॥

(लहानमोठ्या विहिरी, तळीं, देवतामंदिरें, अन्नसत्रें आणि बागबगीचे यांना पूर्त म्हणतात.)

शिलाहारकालात या सर्व साधनांच्या योगे तत्कालीन जनता पुण्योपार्जन करीत असलेली दिसते. तत्कालीन मंदिरनिर्माणाची माहिती मागे दिली आहे. तडागाचे उदाहरण शिलाहार गंडरादित्याने इरुकुडी येथे खोदलेला गंडसमुद्र होय.[२] लहान मोठ्या विहिरींचा तसेच वाटिकांचा (फळबागांचा) उल्लेख अनेक लेखांत आढळतो. कांही लेखांवरून देवालये व मठ यांना जोडून अन्नसत्रें होती; त्यांमध्ये मुनि, विद्यार्थी व अभ्यागत यांना आश्रय व भोजन यांची व्यवस्था होत असे, असे समजते.

प्रस्तुत ग्रंथातील कोरीव लेखांचे वर्गीकरण केल्यावर तत्कालीन धार्मिक प्रवृत्तींविषयी महत्त्वाची आणि मनोरंजक माहिती मिळते. प्रस्तुत ग्रंथातील शिलाहारकालीन बासष्ट लेखांपैकी तीन बौद्ध धर्मासंबंधी[३] आणि सहा जैन धर्मासंबंधी आहेत.[४] राहिलेल्यांपैकी बारांचे विषय ऐहिक बाबींसंबंधी आहेत – उदाहरणार्थ दण्डाधिपतीची नियुक्ति,[५] राजसेवकांना दिलेली दाने,[६] विशिष्ट परंपराप्राप्त हक्काला राजाची अनुमति,[७] कांही बंदरांतील जकातीमध्ये विशिष्ट अधिकाऱ्यांच्या जहाजांस सूट[८] इत्यादि. बाकीच्या लेखांपैकी बारा लेखांमध्ये हिंदू देवतांना[९] आणि एकविसांमध्ये ब्राह्मणांना दिलेल्या दानांचे उल्लेख आहेत.[१०] देवतांना दिलेल्या दानांचे उद्देश त्यांच्या मंदिरांची निर्मिति, त्यांची डागडुजी, त्यांच्या नियमितपणे पूजेची आणि त्यांच्या गाभाऱ्यात सर्वकाळ नंदादीपाची

१ अपरार्क, पृ. २४.
२ क्र. ४५, ओ. ३४.
३ क्र. १–३ पाहा.
४ क्र. ४४, ४७, ४९, ५०, ५३ आणि ५४.
५ क्र. २८, ओ. ८.
६ क्र. ४६, ओ. ६०.
७ क्र. ४०, ओ. ३६–३७.
८ क्र. १९, ओ. ७५–८१.
९ क्र. ७, १२, १७, ३१, ३२, ३४, ३५, ३९, ४१, ४५, ५२, ५८.
१० क्र. ४, ५, ६, ८, १०, १३, १४, १५, २०, २३, २४, २५, २९, ३३, ३६, ३८, ४८, ५९, ६०, ६१, ६२.

व्यवस्था, त्यांच्या अन्नसत्रांतील मुनि, अतिथि व छात्र यांच्या भोजनाची व्यवस्था आणि त्यांच्या नैमित्तिक उत्सवाची तरतूद इत्यादि होते. एका लेखात राजाला धार्मिक आणि कायद्याच्या बाबीत सल्ला देणाऱ्या परिषदेला दिलेल्या दानाचा उल्लेख आहे [१] राहिलेल्या लेखांत ब्राह्मणांना त्यांच्या धार्मिक कृत्यांकरिता पुण्यतिथींच्या किंवा ग्रहणांच्या प्रसंगी दिलेल्या दानांचा उल्लेख आहे.[२]

ज्या पवित्र प्रसंगी देवांना व ब्राह्मणांना दाने दिली जात त्यांचा निर्देश 'अपरार्क' टीकेत उद्धृत केलेल्या जातूकर्ण्याच्या पुढील श्लोकात केला आहे–[३]

ग्रहोपरागे यद्दानं सूर्यसंक्रमणेषु च ।
द्वादश्यादौ च यद्दानं पूर्तमित्यभिधीयते ॥

या श्लोकात चंद्रसूर्यांची ग्रहणे, संक्रान्ति, द्वादशीसारख्या पुण्यतिथि हे दानाकरिता पवित्र प्रसंग होत, असे म्हटले आहे. या सर्व प्रसंगी शिलाहारकाली दाने दिली जात होती.

ग्रहणे – चंद्राच्या तसेच सूर्याच्या ग्रहणप्रसंगीं दाने दिली जात.

सूर्यग्रहणे – सूर्यग्रहणांच्या नऊ प्रसंगीं दानें दिल्याचे उल्लेख आहेत. यांतील आठ दाने उत्तर कोकणच्या शिलाहारांनी दिली होती[४] व एक कोल्हापूरच्या द्वितीय भोजाने दिले होते.[५] या प्रसंगी उत्तर कोकणचे शिलाहार राजे समुद्रस्नान करून सूर्याची पुष्पादिकांनी पूजा करीत आणि नंतर दान देत असत. त्या सर्व ग्रहणांच्या तिथि बरोबर जुळतात.

चन्द्रग्रहणे – यांचे अकरा उल्लेख आहेत. त्यांपैकी सात उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या[६] आणि चार कोल्हापूरच्या शिलाहारांच्या लेखात[७] आले आहेत.

संक्रान्ति – संक्रान्तींचे दिवस फार पवित्र गणले जात. संक्रान्तींमध्ये मकर किंवा उत्तरायण संक्रान्ति आणि कर्कट किंवा दक्षिणायन संक्रान्ति विशेष पवित्र मानली जात असे. उत्तरायण संक्रान्तीच्या प्रसंगी पाच[८] आणि दक्षिणायन संक्रान्तीस दोन ग्रामदाने[९] दिली होती. एक मेष संक्रान्तीस दिले होते. दुसरे वृश्चिक संक्रान्तीस दिले असावे; पण त्या संक्रान्तीचा स्पष्ट निर्देश केला नाही.[१०]

---

१ क्र. २२, ओ. ९.

२ क्र. ४, ५, ८, १३, १४, १५, २२, २३, २६, २९, ३०, ३९, ४५, ६१, ६२.

३ अपरार्क, पृ. २४.

४ क्र. ५, ६, ९, १३, २२, २९, ३०, ३९.

५ क्र. ६२.

६ क्र. ४, ८, ९, १४, १५, २३, २६.

७ क्र. ४५, ४७, ५३, ५४.

८ क्र. १०, २५, ४३, ५८, ५९.

९ क्र. ४८, ६०.

१० क्र. ३८, ४६.

तिथि – कांही दाने पवित्र तिथींस दिलीं होतीं. उत्तर कोकणचे शिलाहार राजे शिवोपासक असल्याने ते माघ वद्य चतुर्दशी (शिवरात्रि) तिथि फार पवित्र मानीत. द्वितीय केशिदेवाने चौधरपाडा लेखात उल्लेखिलेले दान त्या तिथीस दिले होते.[१]

दुसरी लेखांत उल्लेखिलेली पवित्र तिथि वैशाख शुक्ल तृतीया (अक्षय तृतीया) होय. त्या तिथीस मल्लिकार्जुनाने सुप्रयाला प्रनालक देशाचा दण्डाधिपति नेमले होते. ती तिथि मंगळवारी पडली होती आणि त्या दिवशी नक्षत्र मृगशिरस् होते म्हणून तिला 'युगादि' म्हणजे त्रेतायुगाची आरंभतिथि म्हटली आहे.[२] आश्विन शुक्ल प्रतिपदा ही महालक्ष्मीच्या नवरात्राची आदि तिथि. त्या तिथीस द्वितीय भोजाने दिलेले दान त्याच्या कोल्हापूरच्या शिलालेखात उल्लेखिले आहे.[३]

पौर्णिमा – ही तिथिहि पवित्र गणली जात असे. ह्या तिथीस कांही दाने दिलेली आढळतात. उदाहरणार्थ, रट्टराजाच्या खारेपाटण ताम्रपटात उल्लेखिलेले ज्येष्ठ पौर्णिमेस दिलेले,[४] आणि द्वितीय केशिदेवाच्या मांडवी लेखांतील माघ पौर्णिमेचे दान पाहा.[५] याशिवाय द्वितीय अपरादित्याच्या ठाणे लेखात चैत्री पूर्णिमेचा शिवपूजेकरिता पवित्र तिथि म्हणून उल्लेख आला आहे.[६] प्रथम अपरादित्याच्या वडवली ताम्रपटात निर्दिष्ट केलेले दान कार्त्तिक पौर्णिमेस दिले होते.[७]

द्वितीय अपरादित्याच्या पूर्वोक्त ठाणे लेखात 'पवित्रिक' या आणखी एका पवित्र तिथीचा उल्लेख आहे.[८] तिला 'पवित्रारोपणव्रततिथि' असेहि नाव आहे. त्या तिथीस इष्ट देवतेस पवित्र (पोवळे) अर्पण करण्यात येते. याकरिता देवतेनुसार भिन्न भिन्न तिथ्या विहित आहेत. पूर्वोक्त लेखात शिवाची पवित्रारोपणतिथि विवक्षित आहे. त्याकरिता कोणत्याहि पक्षातील अष्टमी किंवा चतुर्दशी विहित आहे – ती आश्विनातील असल्यास उत्तम, श्रावणातील मध्यम आणि भाद्रपदातील कनिष्ठ गणली जाते.[९]

विशेष लक्षणीय गोष्ट ही की शिलाहार कालात ग्रहणे आणि संक्रान्ति यांना दानाकरिता पवित्र प्रसंग म्हणून महत्त्व आले, पण अगोदरच्या गुप्त-वाकाटक कालात अत्यंत पवित्र म्हणून गणलेल्या एकादशीचे महत्त्व मात्र नष्ट झाले. शिलाहारांच्या फक्त एका लेखात (क्र. २१) चैत्र शुक्ल द्वादशीस दान दिल्याचा निर्देश

---

१ क्र. ३६, ओ. ६.
२ क्र. २८, ओ. ४.
३ क्र. ५९, ओ. १४.
४ क्र. ४१, ओ. ४२.
५ क्र. ३४, ओ. १–२.
६ क्र. ३१, ओ. ११.
७ क्र. २०, ओ. ५६.
८ क्र. ३१, ओ. ११.
९ काणे, हि. ध., व्हॉ. ५, पृ. ३३९.

आहे. त्या लेखात प्रसंगाचा उल्लेख नसला तरी ते दान त्यापूर्वीच्या एकादशीस उपोषण करून नंतर द्वादशीस पारण्याच्या वेळेस दिले असावे. शिलाहारांच्या लेखांत या एकादशीव्रताचा उल्लेख नसल्यास आश्चर्य नाही. कारण ते व्रत भगवान् विष्णूच्या प्रसादनाकरिता विहित होते पण शिलाहार राजे शिवोपासक होते. तरीहि आश्चर्याची गोष्ट ही की 'याज्ञवल्क्यस्मृती'वरच्या 'अपरार्क टीके'त एकादशी तिथीस उपोषण करावे किंवा करू नये याविषयी प्रदीर्घ चर्चा आली आहे. अपरार्काने शेवटी तिचा निष्कर्ष असा दिला आहे की सपुत्र गृहस्थांनी एकादशीस उपोषण करू नये. निपुत्रिकांनी हवे तर करावे.[१]

व्रते – शिलाहारांच्या कालांत व्रतांना व दानांना विशेष महत्त्व आले होते. तत्कालीन राजे विविध दानांनी पुण्योपार्जन करताना आढळतात. उदाहरणार्थ, तुलादान (स्वतःची सोन्याची किंवा चांदीची तुला करून तिचे दान करणे), उभयतोमखी (आसन्नप्रसवा) गाईचे दान,[२] तृषित पांथांकरिता प्रपा (पाणपोई) घालणे,[३] पुण्यस्थळी ब्राह्मणांचा विवाह करविणे,[४] लक्षब्राह्मणभोजन घालणे,[५] देवालयात सदैव दीप तेवत ठेवणे,[६] इत्यादींचे उल्लेख पाहा. याशिवाय गंडरादित्याच्या लेखातील दोन व्रते उल्लेखनीय आहेत. पहिले पंचलांगलव्रत. यात कठीण लाकडाचे पांच आणि सोन्याचे पांच असे दहा नांगर, दहा बैल आणि त्यांना नांगरता येईल एवढी जमीन यांचे दान दिले जात असे. दुसरे व्रत अग्निष्टिका. हे थंडीच्या हेमंत आणि शिशिर ऋतूंत करावयाचे असे. यात मार्गशीर्षातील मंगल तिथीपासून विशिष्ट मंत्रांनी अग्नीचे प्रज्वालन, आणि सकाळ संध्याकाळ ब्राह्मणभोजन विहित असे. पेटवलेल्या अग्नीच्या सभोवार बसून लोक राजकीय, धार्मिक आणि सामाजिक बाबींची चर्चा करीत. त्यायोगे पुण्यप्राप्ति होते अशी श्रद्धा होती. ह्या व्रताचा उल्लेख तत्कालीन इतर कोरीव लेखांत[७] आणि वाङमयातहि[८] आढळतो.

---

१ अपरार्क पृ. २०६ इ.

२ क्र. ४८, ओ. १५; क्र. ६२, श्लो. ९.

३ क्र. ४५, ओ. ३६, ३७.

४ पूर्वोक्त, ओ. २७, २८.

५ क्र. ४५, ओ. ३१.

६ क्र. ४५, ओ. ३६.

७ *Ep. Ind.*, Vol. XXV, p. 215.

८ लीळाचरित्र (सं. शं. गो. तुळपुळे), पूर्वार्ध, लीळा क्र. ३४१; उत्तरार्ध, लीळा क्र. २४०,

सामाजिक परिस्थिति

शिलाहारांच्या कालात हिंदू समाजाच्या तत्त्वतः ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार जाति असल्या तरी व्यवहारात अनेक उपजाति निर्माण झाल्या होत्या. जातिव्यवस्थेत ब्राह्मणाला मानाचे स्थान होते. त्याचे जीवन पवित्र आणि निग्रहयुक्त असावे आणि त्याने विद्याव्यासंगात आणि धर्माचरणात सदैव व्यापृत असावे, अशी अपेक्षा असे. स्मृतींमध्ये त्याची सहा कर्तव्ये सांगितली आहेत. ती अशी–अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान आणि प्रतिग्रह. त्याने धनसंचय करावयाचा नसे. त्याच्या घरात एक ते बारा दिवस पुरेल इतकीच सामग्री असावी असा नियम असे. अहिंसा, सत्यवादित्व, अस्तेय, नैतिक शुचिता, इंद्रियनिग्रह. दान, दया, क्षांति इत्यादि सद्‌गुण सर्वांनाच विहित होते, पण ते ब्राह्मणांच्या ठिकाणी विशेषेकरून अपेक्षित होते. त्यांच्या पुढे ठेवलेला आदर्श फार उच्च प्रतीचा होता. ज्यांनी तसे आचरण ठेवले त्यांस समाजात मान मिळाला असला तर आश्चर्य नाही.

आपल्या दानाकरिता ब्राह्मण निवडताना ते विद्वान् तसेच उच्च धार्मिक दर्जाचे असावे याची काळजी शिलाहार नृपति घेत असत. याज्ञवल्क्याने म्हटले आहे की केवळ विद्वत्तेने किंवा तपश्चर्येने (धार्मिक आचरणाने) ब्राह्मण दान घेण्यास पात्र होत नाही. जेथे या दोन्हींचा समन्वय असतो तोच ब्राह्मण दानास पात्र होय.[१] शिलाहारांच्या दान-पत्रांत अनेक ब्राह्मणांचा महाब्राम्हण,[२] किंबहुना, परमब्रह्मन्[३] असा उल्लेख आढळतो. त्यांतील कांहींचे क्रमविद्[४] (वेदांचा क्रमपाठ करणारे), द्विवेदी[५] आणि चतुर्वेदी[६] असे वर्णन केले आहे. अद्यापि ही ब्राह्मणांची उपनामे झाली नव्हती. त्यायोगे त्यांचे वेदांचे अध्ययन सूचित होत असे. दान दिलेले ब्राह्मण सदैव षट्कर्मव्यापृत असे असत.[७] अशा ब्राह्मणांची नावे दानपत्रांत संमानार्थ बहुवचनांनी दिली आहेत.[८] त्यांना

---

१ न विद्यया केवलया तपसा वाऽपि पात्रता । यत्र वृत्तमिमे चोभे तद्धि पात्रं प्रकीर्तितम् ।। याज्ञवल्क्य, १, २००.

२ क्र. ९, ओ. ३८; क्र. १०, २७.

३ क्र. १३, ओ. ६०.

४ क्र. ६, ओ. ७२–७३.

५ क्र. २३, ओ. ६९.

६ क्र. ४८, ओ. ३९.

७ क्र. ९, ओ. ३७–३८.

८ क्र. ४८, ओ. ३९–४१. हे उल्लेखनीय आहे की त्याच दानपत्रांत जे इतर अविद्वान् ब्राह्मण होते त्यांच्या बाबतीत एकवचन योजिले आहे.

दूरदूरच्या प्रदेशांतून – उदाहरणार्थ, मध्यभारतातील मुंजस्थानाहून[१] किंवा उत्तर भारतातील वाराणसीहून[२]– मुद्दाम आमंत्रित केले जाई. पन्हाळे ताम्रपटात उल्लेखिलेला वाराणसीचा रुद्रभट्टोपाध्याय याचे वर्णन 'सोमयाजी' आणि 'ब्रह्मज्ञानी' असे केले आहे. तो दोन वेदांत पारंगत होता आणि पवित्र गंगेच्या दर्शनाने आणि तिच्या जलाच्या स्नानाने पावन झाला होता, असे म्हटले आहे.[३] नंतरच्या दानपत्रांत मात्र ब्राह्मणांची अशी सविस्तर वर्णने आढळत नाहीत.

शिलाहारांच्या काळी विविध शाखांचे ब्राह्मण कोठे कोठे प्रामुख्याने राहत असत हे पाहणे उद्बोधक होईल. शिलाहारांकडून दान मिळालेल्या ब्राह्मणांमध्ये ऋग्वेद्यांचे प्राचुर्य आहे. त्यांपैकी बहुतेक करहाट (कऱ्हाड)हून आले होते.[४] कांही पूर्वीच तेथून येऊन उत्तर कोकणात स्थायिक झाले होते. सध्याहि अशा ब्राह्मणांची वस्ती उत्तर कोकणात विपुल आहे. कोल्हापूरच्या नंतरच्या एका लेखात त्यांना 'करहाटक' म्हटले आहे.[५] त्यावेळी त्यांची कऱ्हाडे ही उपजाति बनू लागली होती असे दिसते.

त्या मानाने तैत्तिरीय किंवा कृष्ण यजुर्वेदी ब्राह्मण कमी आढळतात. पन्हाळे ताम्रपटात उल्लेखिलेला पूर्वोक्त वाराणसीचा ब्राह्मण त्या शाखेचा होता. सध्या माध्यन्दिन किंवा शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण महाराष्ट्राच्या सर्व भागांत विपुल संख्येत आहेत, पण शिलाहारांच्या लेखांत त्यांचा उल्लेख क्वचितच आढळतो. नागार्जुन राजाच्या ठाणे ताम्रपटात उल्लेखिलेला ब्राह्मण मध्यदेशातील हस्तिग्रामाहून आलेला यजुर्वेदी होता;[६] पण त्याच्या उपशाखेचा निर्देश त्या ताम्रपटात आला नाही. उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या लेखांत फक्त दोन माध्यन्दिनी ब्राह्मणांचा उल्लेख आहे. त्यांपैकी एक मध्यदेशातील मुंजस्थानाहून आला होता.[७] प्रथम अपरादित्य याच्या वडवली ताम्रपटात उल्लेखिलेला ब्राह्मण माध्यन्दिन शाखेचाच होता,[८] पण त्याचे मूलस्थान त्या ताम्रपटात सांगितले नाही.

शिलाहारांच्या कांही लेखांत सामवेदी ब्राह्मणांचा उल्लेख आहे. सामवेदाच्या सहस्र शाखा असल्यामुळे अशा ब्राह्मणांना 'गृहीतसहस्र' (सहस्र शाखेच्या

---

१ क्र. १५, ओ. ६२. मुंजस्थान हे गुजराथेतील राधनपूरच्या दक्षिणेचे मुंजपुर असावे.

२ क्र. २३, ओ. ६७.

३ पूर्वोक्त.

४ क्र. १४, ओ. ६१ इ., १०४, ११८ इ.

५ क्र. ५९, ओ. ११.

६ क्र. १३, ओ. ६०–६१.

७ क्र. १५, ओ. ६२.

८ क्र. २०, ओ. ६०

सामवेदाचे अध्ययन केलेला) हे नाव असे, असा एक तर्क आहे.[१] या विशेषणापासून पुढे घैसास असे उपनाम बनले. पण लक्षणीय गोष्ट ही की अपराजिताच्या दोन्ही जंजिरा ताम्रपटांत उल्लेखिलेला 'गृहीतसहस्र' हरिदेव ब्राह्मण बह्वृच किंवा ऋग्वेदी होता. एक सामवेदी ब्राह्मण दूरच्या गौड (पश्चिम बंगाल) देशातून आला होता[२] तो कौथुमशाखी होता. भृगुकच्छ (भडोच) हे सामवेदी ब्राह्मणांचे प्रसिद्ध निवासस्थान होते. तेथील सामवेदाच्या राणायनीय शाखेच्या ब्राह्मणाला मुम्मुणि राजाच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम् तांम्रपटांतील दान दिले होते.[३] याच शाखेच्या दुसऱ्या ब्राह्मणाला छित्तराजाचे भांडुप दानपत्र दिले होते,[४] पण त्यात त्याच्या मूल स्थानाचा उल्लेख दिला नाही.

महाराष्ट्रात अथर्ववेदी ब्राह्मण अत्यल्प आहेत. शिलाहारांच्या लेखांत एकाचाहि उल्लेख आला नाही. सध्या या वेदाचे ब्राह्मण सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागात आढळतात. त्यांची शाखा शौनक आहे.

मागे सांगितल्याप्रमाणे या कालात ब्राह्मणांच्या उपजाति पूर्णपणे बनल्या नव्हत्या, पण त्या बनण्याच्या मार्गावर होत्या. अनेक ब्राह्मण करहाट (कऱ्हाड)-हून उत्तर कोकणात गेले होते. त्यांची पुढे कऱ्हाडे ही उपजाति झाली. कोल्हापूर येथील कांही नंतरच्या लेखांत त्यांना सहवासी ब्राह्मणांहून वेगळे दाखविण्याकरिता 'करहाटक' असे म्हटले आहे.[५] याचेच पुढे 'कऱ्हाडे' असे रूप बनले. मुम्मुणीच्या ठाणे ताम्रपटात वावैलक ब्राह्मणांचा निर्देश आहे.[६] पण त्यांचे सध्याचे प्रतिनिधि कोण हे निश्चितपणे सांगता येत नाही.

रट्टराजाच्या बलिपत्तन ताम्रपटात एक सेणावइ ब्राह्मणाचा उल्लेख आहे.[७] या ब्राह्मणांनाच पुढे शेणवी ब्राह्मण असे नाव पडले असावे. कोकणात यांची बरीच वसती आहे.[८] पंढरपूरच्या चौऱ्यायशीच्या लेखात सेणवैंचे कांही उल्लेख आहेत[९] ते या ब्राह्मणांचे असावे.

कोल्हापूरच्या शिलाहारांच्या दोन लेखांत सहवासी ब्राह्मणांना दाने दिल्याचा उल्लेख आहे.[१०] सध्या महाराष्ट्राच्या कोल्हापूर, कऱ्हाड, मिरज, सांगली, आणि

१ क्र. ६, ओ. ७१–७३.
२ क्र. १५, ओ. ६१.
३ क्र. १५, ओ. ६५.
४ क्र. ९, ओ. ३८.
५ क्र. ५८, ओ. २४; क्र. ५९ ओ. ११.
६ क्र. १४, ओ. ९७.
७ क्र. ४२, ओ. ४४.
८ कांहींनी 'सेनवै' हे कन्नड सन्मानार्थक 'षण्भोग' पासून निघाले असावे असे म्हटले आहे.
९ चौऱ्याशीचा लेख (प्रा. म. को. ले.), १७८ व १८० पाहा.
१० क्र. ५८, ओ. २३–२४; क्र. ५९, ओ. ५, १०.

कागल तालुक्यांत, तसेच कर्नाटकाच्या अथणी, हावेरी, मैसूर, हुबळी, या विभागात बऱ्याच मोठ्या संख्येने आढळणाऱ्या सवाशे ब्राह्मणांचे हे सहवासी ब्राह्मण पूर्वज दिसतात. त्यांच्या 'सहवासी' संज्ञेची विविध स्पष्टीकरणे दिली आहेत. कोणी म्हणतात ते रामाबरोबर दंडकारण्यात राहत होते म्हणून त्यांना असे नाव पडले. हे स्पष्टीकरण अर्थातच ग्राह्य वाटत नाही. कारण त्यांचा उल्लेख यापूर्वीच्या वाङ्मयात किंवा लेखांत येत नाही. हे सर्व सवाशे ब्राह्मण वैष्णव असून ते कर्नाटकातून महाराष्ट्रात आले, असे म्हणतात. कदाचित् द्वैत वेदान्तमताचे संस्थापक मध्व आनन्दतीर्थ (सु. सन ११९७ – १२७६) यांचे ते सहवासी असल्याने त्यांना हे नाव पडले असावे. कालान्तराने 'सहवासी' शब्दाचे सवाशे असे अपभ्रष्ट रूप झाल्यावर त्यांच्याविषयी सध्या प्रचलित असलेली समजूत – ते कांही कारणाने बहिष्कृत केलेल्या सवाशे ब्राह्मणांचे वंशज होत ही – उत्पन्न झाली असावी. पण हेहि स्पष्टीकरण सयुक्तिक वाटत नाही; कारण त्यांचा उल्लेख असलेले शिलालेख (क्र. ५८ व ५९) मध्वाचार्यांच्या सन ११९७ मधील जन्मापूर्वीचे आहेत. पण शिलाहारांच्या लेखांतील त्यांच्या 'सहवासी' नावावरून – मग त्याचे खरे कारण कोणतेहि असो – ती समजूत अत्यन्त निर्मूल आहे यात संशय नाही.[१]

शिलाहारांच्या कालाच्या अखेरीपर्यंत उपनामे प्रचारात आली नव्हती. क्रमविद्, षडङ्गविद्, चतुर्वेदी, द्विवेदी ही तत्कालीन ब्राह्मणांची विशेषणे सार्थ असून ती त्या त्या ब्राह्मणांच्या विद्वत्तेची निदर्शक होती.

कांही ब्राह्मण स्मृत्युक्त नियमांप्रमाणे धार्मिक आचरण करीत असले तरी सध्याप्रमाणे त्या काळी इतर अनेक ब्राह्मण विविध व्यवसायांत गुंतले असले पाहिजेत. याज्ञवल्क्य व इतर स्मृतिकार आपत्काली ब्राह्मणांना अन्य व्यवसाय करण्याची अनुज्ञा देतात.[२] सध्याहि कोकणात अनेक ब्राह्मण स्वतः शेती करतात. शिलाहारांच्या लेखांत दान दिलेल्या शेतांच्या सीमा सांगताना ब्राह्मणांच्या (भट्टांच्या) शेतांचा निर्देश केला आहे.[३] ते आपापली शेते मजुरांच्या साहाय्याने

---

१ अनेक कर्णाटक कोरीव लेखांत सहवासींचा उल्लेख आढळतो. हेम्पचट्ट नामक सहवासीने बेळगवे येतील बुद्धविहाराला सन १०६७ मध्ये दान दिले होते. (*Ep. Carn.*, Vol. VII, SK. 169). एका सहवासिगळ् अधिष्ठायकाचा (सहवासींच्या अधीक्षकाचा) उल्लेख दोन कोरीव लेखांत येतो (*Ibid.*, Vol. VII, SK. 106; *Ep. Ind.*, Vol. XVI, p. 33). के. नीळकण्ठ शास्त्री सहवासी हे शस्त्रधारक सहयोद्धे, राजाकरिता जीव देण्यास तयार असलेले सैनिक होते, असे म्हणतात. *The Cholas*, Vol. II, pp. 225—226. पण शिलाहारांच्या लेखात त्यांच्या लढाऊपणाचे मुळीच चिह्न नाही.

२ याज्ञवल्क्य, २, १२.

३ क्र. ९, ओ. ४२.

सध्याप्रमाणे स्वत: कसत असावे. काही राजसेवेत घेतले गेले असतील. दानपत्रांत सामान्यत: राजाधिकाऱ्यांच्या जातीचा उल्लेख नसतो त्यामुळे या बाबतीतले आपले ज्ञान अत्यंत मर्यादित आहे. तथापि शिलाहारांचे कांही वरिष्ठ अधिकारी ब्राह्मण होते, यात संशय नाही. पहिल्या अनन्तदेवाच्या खारेपाटण ताम्रपटात त्याच्या महासान्धिविग्रहिकाचा ऋषिभट्ट असा निर्देश आला आहे.[१] तो नि:संशय ब्राह्मण होता. इतर महाप्रधान, महामात्य, भांडागारिकसेन यांसारखे वरिष्ठ अधिकारी, ज्यांच्या नावांच्या शेवटी ऐय (संस्कृत आर्य) पद दिसते तेहि, ब्राह्मणच असावे – उदाहरणार्थ, केसपार्य,[२] झंझमैय[३] इत्यादि पाहा. भादान दानपत्रातील व्यवस्थापनसमितीचा सभासद विप्र गोवनैय होता.[४] रट्टराजाच्या खारेपाटण ताम्रपटात उल्लेखिलेला सांधिविग्रहिक देवपालाचा पुत्र लोकपार्य हाहि ब्राह्मणच असावा.[५] राजगुरु आणि लघुराजगुरु हेहि अर्थात् ब्राह्मणच असले पाहिजेत. मात्र ज्यांची नावे शिवपदान्त होती (उदाहरणार्थ, व्योमशिव) ते शैवपंथाचे संन्यासी असत.[६] द्वितीय भोजाच्या कशेळी ताम्रपटाचा कोरक्या एक विप्र (ब्राह्मण) होता हे उल्लेखनीय आहे.[७]

चातुर्वर्ण्य व्यवस्थेत ब्राह्मणानंतर क्षत्रियाचे स्थान असे. शिलाहार राजे आपण विद्याधर जीमूतवाहनाचे वंशज व क्षत्रिय आहोत असा अभिमान बाळगत. द्वितीय भोजाच्या कशेळी ताम्रपटात त्या राजाला 'क्षत्रियशिखामणि' म्हटले आहे.[८] 'याज्ञवल्क्यस्मृती'त म्हटले आहे की क्षत्रिय राजांचे मुख्य कर्तव्य प्रजेचे न्यायाने परिपालन करणे हे होय. तसे केल्यास त्याला प्रजेच्या पुण्यार्जनाचा एक षष्ठांश भाग मिळतो.[९] परदेश जिंकूनहि तशीच पुण्यप्राप्ति होते असेहि याज्ञवल्क्याने पुढे म्हटले आहे.[१०] शिलाहार राजांनी प्रजापालनाचे आपले कर्तव्य उत्तम रीतीने बजावले होते. कोकणावर शत्रूंची कांही आक्रमणे झाली तरी त्यांनी त्यांच्याशी शौर्याने लढून शेवटी त्यांना पिटाळून लावले. उत्तर कोकणच्या राजांपैकी अपराजित[११] व अनन्तदेव[१२] यानीच काय ते परदेशांवर आक्रमण केले होते. बाकीच्या

---

१ क्र. १९, ओ. ६६.

२ क्र. ६, ओ. ९७–९८.

३ पूर्वोक्त, ओ. ९८.

४ क्र. ७, ओ. ६४.

५ पण या संबंधात हेहि लक्षात घेतले पाहिजे की वैश्यासारख्या इतर जातींच्या व्यक्तींचीहि नावे 'ऐय' पदान्त असत. उदाहरणार्थ, क्र. ७, ओ. ६४ मध्ये उल्लेखिलेली श्रेष्ठी आणि वणिक् यांची वाप्पैय आणि चेलपैय ही नावे पाहा.

६ क्र. २९, ओ. ९, १९, इ.

७ क्र. ६०, ओ. ४४.

८ क्र. ६०, ओ. २४–२५.

९ याज्ञवल्क्य, १, ३३५.

१० याज्ञवल्क्य, १, ३४२.

११ क्र. ५, ओ. ४०–४३.

१२ क्र. १९.

राजांनी आपल्या प्रजेचे न्यायाने पालन करण्यात समाधान मानले होते. कोल्हापूरच्या प्रथम भोजानेहि परदेशांवर कांही स्वाऱ्या केल्या होत्या, पण त्या आपल्या चालुक्य सम्राटाचा मांडलिक म्हणून.[१] सामान्यतः शिलाहारांच्या राजवटीत प्रजेला शांतता आणि समृद्धि प्राप्त झाली होती.

शिलाहारांनी अनेक क्षत्रियांना आपल्या राज्यांत उच्च पदांवर नेमले असले पाहिजे, पण त्यांच्या लेखांत अधिकाऱ्यांच्या जातीचा निर्देश नसल्यामुळे या बाबतीत निश्चित विधान करणे शक्य नाही. तथापि त्यांच्या ताम्रपटांत उल्लेखिलेले अनेक सामन्त, ठाकुर आणि प्रभु हे क्षत्रिय वर्णाचेच असावे.[२]

या कालात कायस्थांची स्वतंत्र जात झाली होती. कांही कायस्थांचा लेखक म्हणून शिलाहारांच्या लेखांत निर्देश येतो. सोड्ढलाने आपल्या 'उदयसुन्दरीकथे'त कायस्थ जातीच्या उत्पत्तीचा काल्पनिक वृत्तांत दिला आहे. तो स्वतः वलभीच्या (सौराष्ट्रातील सध्याच्या वला गावाच्या) कायस्थ जातीत जन्मला होता. तो म्हणतो शंकराचा एक गण त्याच्या समुद्ररूपी कायाच्या (शरीराच्या) सेवेत तत्पर असल्यामुळे त्याला कायस्थ असे नाव प्राप्त झाले होते.[३] सोड्ढल म्हणतो की कायस्थ हे क्षत्रिय जातीचे होते. त्याने दिलेल्या कायस्थ नावाच्या व्युत्पत्तीसारख्या इतर अनेक काल्पनिक व्युत्पत्त्या कोरीव लेखांत व ग्रंथांत आल्या आहेत.[४]

व्यापारी आणि शेतकरी यांचा तिसऱ्या वर्णात समावेश होत असे. व्यापाऱ्यांच्या श्रेणि असत आणि नगरांच्या तसेच गावांच्या समितींत त्यांचे मोठे वजन असे. देवस्थानांच्या व्यवस्थापन समितीचे प्रमुख सभासद म्हणून अनेक लेखांत त्यांचे उल्लेख येतात.[५] त्या काळी अय्यावोळे (विजापूर जिल्ह्यातील ऐहोळे) किंवा अहिच्छत्र येथील मोठ्या 'बीरबणञ्ज' नामक व्यापारी संघाच्या शाखा दक्षिणेत सर्वत्र पसरल्या होत्या. त्याचे प्रतिनिधि हरएक महत्त्वाच्या गावी असत. त्यांच्या सभा बाजाराच्या दिवशी भरत आणि त्यांत बाजारात विक्रीकरिता आणलेल्या मालावर कर बसवून त्यांचे उत्पन्न स्थानिक हिंदू व जैन मंदिरांना दिले जात असे.[६]

चौथा वर्ण शूद्रांचा. त्यांच्याकडे इतर वर्णांच्या सेवेचे काम स्मृतींत सांगितले असले तरी त्याशिवाय कलाकुसरीचे (शिल्पादिकांचे) कामहि ते करीत असत. याज्ञवल्क्याने त्याचा उल्लेख केला आहे.[७]

---

१ क्र. ४६, ओ. १८–२४.
२ कांही 'नायक' ब्राह्मण होते.
३ उदयसुन्दरीकथा, पृ. १०.
४ *C. I. I.*, Vol. IV, p. 271.
५ क्र. ७, ओ. ६४.
६ क्र. ४९, ओ. २४–३२.
७ याज्ञवल्क्य, १, १२०.

शिलाहारांच्या राज्यांत भिन्न भिन्न धर्मांत व वर्णांत सामंजस्य होते. शिलाहार स्वत: हिंदूधर्मी असले तरी त्यांनी बुद्ध व जिन यांची मंदिरे बांधली होती. उदाहरणार्थ, गंडरादित्याने मिरजे जवळ इरुकुडी येथे शिव, बुद्ध आणि जिन यांची मंदिरे उभारून त्यांच्या पूजेअर्चेकरिता भूमिदाने दिली होती.[१] त्याने आजुरिका येथेहि जैन तीर्थंकर नेमिनाथ याचे मंदिर बांधून त्याला 'त्रिभुवनतिलक' असे आपल्या बिरुदाचे नाव ठेवले होते.[२] हेर्ले येथेहि दुसरे या नावाचे जैन मंदिर होते. हिंदू आणि जैन यामध्ये विवाह होत असत. गंडरादित्याची माता नागलदेवी आणि राणी कर्णादेवी या जैनधर्मी होत्या. बामणी लेखात शिलाहार विजयादित्याने आपला मामा लक्ष्मण याच्या विनंतीवरून एका जैनमंदिराला ग्रामदान केले होते. ते त्याचे गोत्रदान (सर्व कुटुंबाने मिळून दिलेले दान) म्हटले आहे तेव्हा तो जैनधर्मी होता यात संशय नाही.[३] कर्णपार्याच्या 'नेमिनाथपुराणा'त विजयादित्याचा करणाग्रणी (सचिवालय प्रमुख) म्हणून प्रशंसिलेला लक्ष्मण हाच तो असावा, असे दिसते.

तत्कालीन हिंदू समाजात हळू हळू परिवर्तन होत असल्याचे दिसते. उदाहरणार्थ मांसाशन घ्या. फार प्राचीन काळापासून विद्वान् अतिथींना गोमांस देणे मधुपर्क आणि अर्घ्य यांत विहित होते. इतर अनेक स्मृतींप्रमाणे 'याज्ञवल्क्यस्मृती'त श्राद्ध-प्रसंगी ब्राह्मणांना खाऊ घातलेल्या विविध प्रकारच्या मासांनी पितरांची किती काल तृप्ति होते ते सांगितले आहे.[४] अपरार्काने याज्ञवल्क्याच्या या सर्व श्लोकांचे यथार्थ व्याख्यान केले आहे आणि विविध स्मृतींतील व पुराणांतील वचनांनी त्यांचे समर्थन केले आहे. तरीही त्याकाली विचारी लोकांत मधुपर्क आणि श्राद्ध प्रसंगी मांसाशना-विरुद्ध भावना प्रसार पावत होती हेहि त्याने अन्य स्मृति व पुराणे यातून वचने उद्धृत करून दाखविले आहे.[५] याज्ञवल्क्य, १, १५६ या श्लोकाचे व्याख्यान करताना त्याने म्हटले आहे की अभिचार (जादुटोणा) याकरिता मंत्रांचा उपयोग, मधुपर्काकरिता गोहत्या, विधवाविवाह, शूद्रकन्याविवाह यांसारख्या गोष्टी शास्त्रा-नुज्ञात व रूढीसंमत असल्या तरी त्या कलियुगात वर्ज्य मानाव्या.[६] त्याने

१ क्र. ४५, ओ. ३४.

२ 'कोल्लापुरदेशान्तर्वर्त्याजुरिकामहास्थानयुधिष्ठिरावतारमहामण्डलेश्वर-गण्डरादित्यदेवनिर्मापितत्रिभुवनतिलकजिनालये। शब्दार्णवचन्द्रिका, पृ. २२१.

३ क्र. ५४, ओ. २३–२४.

४ याज्ञवल्क्य, १, २५८–२६०.

५ पूर्वोक्त, १, १८१.

६ तस्मादभिचारो मधुपर्कादौ गोवधो विधवानियोगः शूद्राविवाह इत्यादयोऽस्वर्ग्यत्वाल्लोकविद्विष्टत्वाद्विहिता अपि न कार्या विशेषेण कलियुगे। अपरार्क, १, १३३.

'मार्कंडेयपुराणा'तील एक वचन उद्‌धृत करून मधुपर्क प्रसंगी गोमांसाऐवजी सुवर्ण-दान करता येते, असे प्रतिपादिले आहे.[१]

इतर काही बाबतीत मात्र तत्कालीन समाज अनुदार प्रवृत्तीचा बनत चालला होता असे दिसते. याज्ञवल्क्याने अस्पृश्यतेचा उल्लेख केला नसला तरी अपरार्काने 'हारीतस्मृती'तील एक वचन उद्‌धृत करून रंगारी, धोबी, शिकारी, धीवर, खाटिक, नट, सुराविक्रेता यांचा स्पर्श झाला असता सचैल स्नान करावे असे असे म्हटले आहे.[२]

शिलाहारांच्या कालात स्त्रियांना वांशिक धनाचा अधिकार मिळून त्यांची स्थिति किंचित् सुधारली असावी. 'याज्ञवल्क्यस्मृती'त निपुत्रिक गृहस्थाच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवेला वारसाहक्क दिला आहे.[३] त्यापूर्वीच्या मन्वादिकांचे मत याविरुद्ध होते. अपरार्काने प्रदीर्घ चर्चेनंतर या दोन मतांतील विरोध पुढीलप्रमाणे निकालात काढला आहे. निपुत्रिक गृहस्थाच्या सदाचरणी विधवेला त्याची संपत्ति मिळावी, पण ती जर दुराचरणी असेल तर 'याज्ञवल्क्यस्मृती'त उल्लेखिलेले त्याचे मातापिता, बंधु इत्यादिकांना वारसाहक्क मिळावा.[४] शिलाहारांच्या कित्येक लेखांत 'अपुत्र-धन' ग्रामदान दिलेल्या ब्राह्मणास मिळावे असे म्हटले आहे.[५] त्यावरून इतर बाबतींत ते राजगामी होते असे असते. या ठिकाणी 'अपुत्र' याचा 'वारस नसलेला' असा व्यापक अर्थ घेतला पाहिजे.

'याज्ञवल्क्यस्मृती'त सतीच्या प्रथेचा उल्लेख नाही. अपरार्काने या प्रश्नाविषयी स्मृतिकारांच्या विविध मतांची चर्चा करून 'विष्णुस्मृती'तील विधानाचा पुरस्कार

---

१ माधुपर्किकपश्वर्थे ततो मात्रां निवेदयेत् । सहिरण्यं बीजपात्रं द्रविणेन सदैव तु। पशुः कलौ न कर्तव्य इत्याह भगवान्भृगुः ।। पूर्वोक्त, पृ २५३.

२ अपरार्क, १, २७९ – रजकश्चर्मकृच्चैव व्याधजालोपजीविनौ । निर्णेजकः सौनिकश्च नरः शैलूषिकस्तथा । चक्री ध्वजी वध्यघाती ग्राम्यकुक्कुट-सूकरौ । एभिर्यदङ्गं स्पृष्टं स्याच्छिरोवर्जं द्विजातिषु । तोयेन क्षालनं कृत्वा आचान्ताः प्रसृता मताः ।।

३ याज्ञवल्क्य, २, १३५.

४ पाहा – कथं तर्हि विरोधापहारः। उच्यते 'अपुत्रा शयनं भर्तुः' इत्यादि मनु-वाक्योक्तगुणा पत्नी पितृभ्रातृसद्भावेऽपि स्वयमेव पतिधनं समग्रं गृह्णाति, पत्युश्च श्राद्धादि करोति। अपरार्क, २, पृ. ७४२.

५ क्र. ५, ओ. ६६; क्र. ६, ओ. ६७–६८; क्र. ७, ओ. ६१ इत्यादि. अ. कु. मुजुमदार यांच्या मते कुमारपालाच्या कालापर्यंत पूर्वीचा नियम चालू होता. पण हे असंभवनीय आहे.

केला आहे. पतीच्या निधनानंतर ब्राह्मण स्त्रीने धर्माचरणार्थ सती जाण्यास हरकत नाही. शोकामुळे मात्र आत्मदहन करू नये.[१] शिलाहारांच्या लेखात सतीचे एकहि उदाहरण नाही.

शिलाहारांच्या काळी पश्चिम समुद्रतीरी अरबांच्या काही वसाहती होत्या. शिलाहारांचे सम्राट् राष्ट्रकूट यांचे अरबांसंबंधी सलोख्याचे धोरण होते. त्यांनी कांही अरबांना प्रदेशाधिपति नेमले होते. उत्तर कोकणात शिलाहारांच्या राज्याला लागून उत्तरेस असलेले संयान मंडळ अरब मांडलिकांच्या अमलाखाली होते.[२] राष्ट्रकटांच्या या पश्चिम किनाऱ्यावरील दोन सामंतांत वारंवार कटकटी उत्पन्न होत. राष्ट्रकूटांच्या पतनानंतर शिलाहार अपराजिताने संयान मंडळ जिंकून खालसा केले.[३] चौल येथेहि अरबांची वसाहत होती. तशीच दक्षिण कोकणातहि होती. पण तिचे नक्की ठिकाण माहीत नाही. तेथील अरबांचे गोव्याच्या कदंबांशी सख्य होते. कदंबांनी मुम्मुणीच्या निधनानंतर उत्तर कोकणावर स्वारी केली तेव्हा त्यांच्या या अरब स्नेह्याने कोकणात धुमाकूळ मांडला. त्याचे वर्णन वडवली ताम्रपटात यथातथ्य आले आहे. या प्रसंगी कदंबांच्या या स्नेह्यांनी – यवन सैनिकांनी – देव ब्राह्मणांचा छळ आरंभिला, पण शेवटी अनन्तपालाने त्यांना पिटाळून लावले.[४] तथापि उत्तर कोकणाच्या शिलाहारांच्या राज्यातील कांही अरब प्रजाजनांचा उल्लेख कोरीव लेखांत येतो. त्यांपैकी कांही खलाशी (नोरिक कर्मकर) होते.[५] कांही यवन शेतकऱ्यांचा खोजा असा उल्लेख आला आहे.[६] शिलाहारांचा मांडलिक चामुंडराज याच्या चिंचणी ताम्रपटात उल्लेखिलेले अल्ली, यमहर व मधुमत हे व्यापारी मुसलमानी दिसतात.[७] ते संयान येथील प्रमुख नागरिकांपैकी होते. त्यांसारखे इतर अनेक अरबी मुसलमान शिलाहारांच्या राज्यात गुण्यागोविंदाने राहत असावे.

---

१ पाहा – तस्माद्विधितः प्रवर्तमानाया ब्राह्मण्या अनुगमनाद्दोषो न विद्यते। शोकादिप्रवृत्तायास्तु भवत्येव।

२ *Ep. Ind.*, Vol. XXIII, pp. 45 f.

३ क्र. ५, ओ. ४०.

४ क्र. १९, ओ. ५२–५५.

५ क्र. १९, ओ. ७९–८०

६ क्र. १४, ओ. १४९.

७ क्र. १२, ओ. ११.

आर्थिक परिस्थिति

फार प्राचीन काळापासून भारतातील व्यापार उदीम श्रेणींच्या हातात असे. 'याज्ञवल्क्यस्मृती'तील (२, १९२) श्रेणीवगैरेंचे स्पष्टीकरण अपरार्काने पुढीलप्रमाणे केले आहे[१]–श्रेणि म्हणजे एकाच जातीच्या आणि समान धंद्याच्या लोकांचा संघ. उदाहरणार्थ रजकांची (धोब्यांची) श्रेणि.[२] नानाजातींचे लोक व्यापाराकरिता एकत्र येऊन परदेशात जाण्याकरिता संघ स्थापतात त्याला निगम असे म्हणतात. आणि ब्राह्मणांहून इतर अवैदिक पाखंडी संन्यासी लोकांचा संघ म्हणजे गण होय. शिलाहारांच्या लेखांत अनेक श्रेष्ठींचा (व्यापाऱ्यांचा) उल्लेख येतो, पण त्यांच्या श्रेणींचा उल्लेख स्पष्टपणे आढळत नाही.

उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या लेखांतील दोन संज्ञांचा या संबंधात विचार केला पाहिजे – हंयमन आणि नगर या त्या संज्ञा होत. यांपैकी हंयमन ही सोनार, लोहार, तांबट, सुतार आणि पाथरवट या सारख्या कारागिरांची संस्था होती,[२] तर नगर ही व्यापाऱ्यांची श्रेणि होती.[२] याशिवाय एक आन्तरप्रान्तीय व्यापारी मंडळ अय्यावोळे (विजापूर जिल्ह्यातील ऐहोळे) किंवा अहिच्छत्र येथील 'वीर-वणंज' नावाने विख्यात होते. हे व्यापारी आपल्या लेखांत आपण वासुदेव, खंडलि आणि मूलभद्र यांचे वंशज असून, बत्तीस समुद्रकाठची नगरे, अठरा पत्तने आणि चौसष्ट घटिकास्थाने यांचे रहिवाशी आहो, असे अभिमानाने प्रतिपादित असत पण त्यांच्या निवासस्थानांच्या या संख्या केवळ पारंपारिक वाटतात. त्यांचे स्वत:चे पर्वत-लांछित निशाण असे. त्यांच्या 'वीर–वणंज' नावाने सूचित केल्याप्रमाणे ते लढाऊ वृत्तीचे व्यापारी होते. त्यांनी आपल्या बाहुबलाने अनेक विजय संपादन केले होते. ते उदारमतवादी असून हिंदू, बौद्ध तसेच जैन धर्मांच्या देवळांना आपल्या उदार देणग्या देत असत. ते खुष्कीच्या मार्गाने तसेच जलमार्गानेहि प्रवास करीत आणि दूरदूरच्या देशांत व्यापाराकरिता जात येत असत.[३]

---

१ पाहा – एकजातिनिविष्टानां समानवृत्त्युपजीविनां समूहः श्रेणिर्यथा रजकश्रेणिरिति। सह देशान्तरवाणिज्यार्थं ये नानाजातीया अभिगच्छन्ति ते नैगमाः। अवैदिकाः प्रव्रज्यास्थिताः पाषण्डिनो ब्राह्मणेभ्योऽन्ये समानजीविका इह गणाः।

२ *Ep. Ind.*, Vol. XXXIV, p. 292. याला कन्नडमध्ये 'नगर' किंवा 'नकर' म्हणत.

३ क्र ४९, ओ. ११ – २० आणि क्र. ५२, ओ. १ – १२.

कोल्हापूर येथील दोन शिलालेखांवरून या वीर–बणंजांच्या आणि तत्तद्देशीय व्यापाऱ्यांच्या सभांविषयी बरीच माहिती मिळते. कोल्हापूर येथे सन ११३५ मध्ये भरलेल्या सभेत हे वीर–बणंजू आपल्या गवरे, गत्रिगे इत्यादि घटकांसह उपस्थित होते. तसेच त्या सभेला कोल्हापूर आणि मिरज येथील सेट्टि, राजश्रेष्ठी, मण्डलेश्वर-श्रेष्ठी, तसेच कुंडि (बेळगाव), तोरंबगे (तुरंबे), बलयवत्तन (खारेपाटण), कवडेगोल्ल इत्यादि ठिकाणांचे प्रतिनिधिहि आले होते. त्यांनी कोल्हापूर येथील रूपनारायण नामक जैन मंदिराच्या आचार्याला देण्याकरिता पूर्वोक्त ठिकाणी मापाने किंवा वजनाने विकल्या जाणाऱ्या वस्तूंवर रोख किंवा त्या त्या वस्तूंच्या रूपांत कर, तसेच तेथील सोनार, कापडाचे व्यापारी, बागवान आणि कुंभार यांच्यावरहि कर निश्चित केले होते.[१] याच आन्तरप्रान्तीय व्यापारी मंडळाच्या सन ११४४ मध्ये सेडंवाळ (सध्याचे शेडबाळ) येथे भरलेल्या सभेत तत्कालीन राजश्रेष्ठी, (मिरिंजेचा) मुख्य श्रेष्ठी, आणि बागे (बागडगे), दोणिकोडु, तोळकळे, कुंडिलि, तसेच जवळच्या पिरियगुवार, सिरिगुप्प, आणि जुगुलकोप्प या गावांचे आणि सेडंबाळ (शेडबाळ)चे प्रतिनिधि उपस्थित होते. त्यांनी बाजारात विकलेल्या सुपारी, विड्याची पाने, अन्नधान्ये, तूप, तेल इत्यादि विविध वस्तूंवर माधवेश्वर देवाच्या पूजाअर्चे-करिता कर बसविले होते. तसेच सेडम्बाळ येथील सोनार, कुंभार, चामडी कमाव-णारे, बुरड आणि चांभार यांनी, तसेच तेथील लोकांनी माधवेश्वराचा चैत्रातील उत्सव आणि कार्त्तिकातील दिवाळीचा उत्सव यांकरिता आपापल्या वस्तूंचे कर देण्याचे कबूल केले होते.[२]

या बाबतीत लक्षणीय गोष्ट ही की हे कर तत्कालीन शासनकर्त्यांनी बसविले नसून त्या श्रेणींच्या, व्यापाऱ्यांच्या आणि राजप्रतिनिधींच्या मिळून भरलेल्या सभांत निश्चित केले होते. यात आपणांस स्थानिक स्वराज्याची मुळे दिसतात. हे कर वसूल करणे अर्थातच त्या त्या विषयांचे मुख्य (पेगडे) आणि राजाधिकारी यांचे काम असे.

श्रेणि आपापल्या कामाच्या बाबतीत स्वायत्त असत. राजेलोक त्यात ढवळा-ढवळ करीत नसत.[३] त्यांचे सुरक्षिततेसाठी सैन्य (श्रेणिबल)हि असे. राजेलोक जरुरीच्या प्रसंगी त्यांचे साहाय्य घेत असत.

लोक आपल्या ठेवी तत्कालीन शासनाजवळ न ठेवता या श्रेणींजवळ ठेवणे पसंत करीत; कारण राज्ये वरचेवर बदलत; पण या श्रेणि दीर्घकाळ चालू असत. प्रस्तुत लेखसंग्रहातील पहिल्या तीन लेखांत बुद्धमूर्तीची पूजा, विहाराची डागडुजी

---

१ क्र. ४९, ओ. २५–३२.   २ क्र. ५२, ओ. २२–३८.

३ याज्ञ. २, १९२.

आणि भिक्षूंची चीवरे व धर्मग्रंथ यांकरिता कृष्णगिरि (कान्हेरी) येथील आर्यभिक्षु-संघाला अक्षयनीवि (कायम ठेवी) म्हणून दिलेल्या द्रम्मदानांचे उल्लेख आहेत. त्या भिक्षुसंघाने ह्या ठेवी, तसा स्पष्ट उल्लेख नसला तरी, तेथील श्रेणींजवळच व्याजाने ठेवल्या असल्या पाहिजेत.

शिलाहारांच्या राजवटीच्या आरंभकालातील व्याजाचा दर कान्हेरी येथील एका लेखात दिलेल्या माहितीवरून अजमावता येतो. एका उपासकाने २९ द्रम्मांच्या व्याजाकरिता तेथील भिक्षुसंघाजवळ २०० द्रम्मांची कायम ठेव (अक्षयनीवि) ठेवली होती. त्या व्याजापैकी वीस द्रम्म बुद्ध मूर्तीची पूजा, तीन द्रम्म विहाराची डागडुजी, पांच द्रम्म भिक्षूंची चीवरे आणि एक द्रम्म त्यांचे धर्मग्रंथ यांकरिता खर्चावयाचे होते.[१] यावरून तत्कालीन व्याजाचा दर दरसाल दरशेकडा साडेचौदा येतो. नंतरच्या कालातील तेथील व इतर प्रदेशांतील व्याजाचा दर अजमावण्यास शिलाहारांच्या लेखांत साधन नाही.

शिलाहार कालातील भिन्न भिन्न स्तरांच्या लोकांची आर्थिक परिस्थिति कशी होती हे समजण्यास साधन नाही. तथापि त्या काळी दान दिलेल्या ब्राह्मणांच्या स्थितीविषयी अनुमान करणे शक्य आहे. साधारण आकाराच्या ब्राह्मण कुटुंबाच्या पोषणाकरिता आवश्यक असणाऱ्या भूमिमानाला वृत्ति असे म्हणत. ताळले ताम्रपटावरून कोल्हापूर प्रदेशात ही वृत्ति निदान तीन निवर्तनांची असे.[२] देवाची पूजाअर्चा, रंगभोग इत्यादिकांकरिता निदान एक निवर्तनाची वृत्ति आवश्यक असे. त्याकाळी त्या त्या प्रदेशात भिन्न भिन्न आकारांची निवर्तने प्रचलित होती. उत्तर कोकणात कल्लिवनचे,[३] (नाशिक जिल्ह्यातील कळवणाचे) आणि कोल्हापूर प्रदेशात कुण्डि (बेळगाव)चे[४] तसेच एडेनाडचे[५] (स्थानिक) निवर्तन प्रचलित होते. 'लीलावती 'त (१,६) म्हटले आहे की एक निवर्तन ४०० दंडांचे असते. दंड दहा हातांचा किंवा १५ फूटांचा असे. तेव्हा एका निवर्तनात चाळीस हजार चौरस हात किंवा दहा हजार चौरस यार्ड जमीन येत असे. एक एकर म्हणजे ४८४० चौरस यार्ड. म्हणून कोल्हापूर प्रदेशात तीन निवर्तने म्हणजे जवळ जवळ सव्वा सहा एकर होत असत. इतकी जमीन पाच जणांच्या लहानशा कुटुंबालाहि पुरत नसावी.[६] गंडरादित्याच्या कोल्हापूर ताम्रपटात तांबूलाशिवाय तत्कालीन ब्राह्मणांच्या भोजनाचे जिन्नस पुढीलप्रमाणे सांगितले आहेत – शुभ्र भात, आढकीची (तुरीची) किंवा

---

१ क्र. १, ओ. ३–५.
२ क्र. ४५, ओ. २९–३०.
३ क्र. १४, ओ. १७०.
४ क्र. ४८, ओ. ३१.
५ क्र. ५८, ओ. २९–३०; क्र. ५९, ओ. ८–९.
६ सध्याचे किमान जीविकावश्यक भूमिप्रमाण ५४ एकर आहे.

दुसऱ्या डाळीची आमटी, तूप आणि चार भाज्या.[१] यावरून त्याकाळी विद्वान् ब्राह्मणांचेहि जीवनमान अत्यंत काटकसरीचे होते, हे दिसून येईल. कर्नाटकांत तशा ब्राह्मणांची वृत्ति दोन मत्तर भूमि असे.[२] मत्तरचा आकार निश्चितपणे माहीत नाही. कांहींच्या मत्ते मत्तर म्हणजे पाच एकर.[३] ते खरे असल्यास कर्नाटकातील विद्वान् ब्राह्मणांची परिस्थिति महाराष्ट्र-कोकणातील ब्राह्मणांपेक्षा थोडी बरी होती, असे म्हणावे लागेल. कांही दानपत्रांत याहीपेक्षा कमी भूमिदानांचे उल्लेख आढळतात. इतर कांहींत वप्पक या भूमिमापक प्रमाणाचा उल्लेख आहे. पण त्याचा आकार निश्चितपणे माहीत नाही.[४] कन्नडभाषी प्रदेशात कम्म हे भूमिमान प्रचलित होते.[५] शंभर कम्मांचे एक मत्तर होत असे. एका लेखात स्तंभ या भूमिमापक प्रमाणाचा उल्लेख आला आहे.[६] स्तंभ हा कम्माचाच वाचक असावा.

स्मृतींत राजाने ब्राह्मणांना गृहदान द्यावे असे म्हटले आहे. 'याज्ञवल्क्यस्मृती'त गृहाबरोबर त्यातील उपकरणेहि दान द्यावीत असे सांगितले आहे.[७] शिलाहार राजे ग्रामदान देताना नव्हे, पण भूमिदान देताना गृहदानहि करीत असत.[८] लेखांत त्यांचा आकार दिलेला असतो. गृहांचे अनेक प्रकार होते. पण सामान्यतः बारा हातांचे घर दान दिले जात असे.[९] याचा अर्थ ते बारा हात लांब आणि तितकेच रुंद असा असावा. म्हणजे ते १८ फूट लांब आणि १८ फूट रुंद किंवा ३२४ चौरस फूट आकाराचे असे. तेव्हा त्यात ९ फूट लांब व ९ फूट रुंद या आकाराच्या चार खोल्या असाव्या. याशिवाय त्याला अंगण असे. त्याचा 'खडवल' असा उल्लेख कोल्हापूर प्रदेशातील लेखांत येतो.[१०] घराच्या एकंदर जागेस कन्नड भाषेत 'मगिल' म्हणत.[११]

शेताच्या एकंदर उत्पन्नास सिद्धाय असे नाव होते. कन्नड लेखात दवणाय असा शब्द येतो. त्याचाहि अर्थ हाच असावा.

शिलाहारांच्या लेखांत शेतांची अनेक नावे – बहुधा त्यांत उत्पन्न होणाऱ्या पिकांवरून पडलेली – आढळतात. उदाहरणार्थ पिंपरिकाक्षेत्र, कोट्टारवेढिक्षेत्र, खैरोंढाक्षेत्र, वांखडिक्षेत्र इत्यादि.[१२] ज्या क्षेत्रांच्या नावांच्या शेवटी 'वाप' असे

---

१ क्र. ४८, ओ. ३६–३७.
२ *Ep. Ind.*, Vol. V, p. 22.
३ Altekar, *The Rāshṭrakūṭas* etc., p. 395.
४ क्र. ४८, ओ. ४३–४४.
५ क्र. ४४, ओ. २.
६ क्र. ५४, ओ. २२.
७ याज्ञ. १, ३३३.
८ उदाहरणार्थ, क्र. ४५, ओ. ३० पाहा.
९ क्र. ५३, ओ. २४.
१० क्र. ५९, ओ. १८.
११ क्र. ४८, ओ. ३८.
१२ क्र. १४. ओ. ९९ इ.

असे पद आहे त्यांच्या बाबतीत तरी असे अनुमान करणे बरोबर होईल. उदाहरणार्थ, नाणेवापक्षेत्र, वाडेवापक्षेत्र इत्यादि.[१] कांही क्षेत्रांना शालिखल्लक्षेत्र म्हणत. तीं शाळीची – भाताची – शेते होती.[२] एका लेखात वाइंगण क्षेत्राचा उल्लेख आहे. हिवाळचात तसेच उन्हाळचात पीक देणाऱ्या दुपीकी जमिनीला 'वाइंगण' म्हणतात.[३] ही संज्ञा अद्यापि कोकणात प्रचलित आहे.

शिलाहारांच्या लेखांत अनेक वजनामापांचे, तसेच नाण्यांचेहि उल्लेख आढळतात. उत्तर कोकणातील वजने व मापे महाराष्ट्राच्या इतर प्रदेशांतल्या प्रमाणे, आणि कोल्हापुर प्रदेशातील कर्नाटकातल्या प्रमाणे असत.

मापे – मुम्मुणीच्या ठाणे ताम्रपटावरून आपणांस खालील कोष्टक समजते–[४]

२० कुडव = १ खंडिका
४ खंडिका = १ मूटक

कोल्हापूर प्रदेशात पुढील मापे प्रचलित होती–[५] हसर, सोल्लगे (कुडव किंवा बळ्ळचा एक चतुर्थांश), बळ्ळ (चार मण), कोदवण (३२० रती), सिद्दिगे (२८ ते ३६ तोळयांचे माप), कोळगे (१६ मण), संगडि (दोन सिद्दिगे), दंडिगे, सोळस, ओहिळम्, भंडिगोड (एका गाडीचे ओझे), मोरु (एका माणसाचे ओझे) इत्यादि.[६]

नाणी – उत्तर कोकणांत पुढील नाणी प्रचलित होती – द्रम्म सर्वत्र चालू होता. द्रम्म चांदीचा तसाच सोन्याचा होता असे कीलहॉर्नने म्हटले होते, पण ते कान्हेरी येथील एका लेखाच्या चुकीच्या वाचनावर आधारित आहे.[७] कुतापुर दानपत्रात (क्र. ६२) त्यालाच 'रजतनिष्क' म्हटले आहे.[८] दीनार हे सोन्याचे नाणे कुशाण आणि गुप्त काळात प्रचलित होते. पण नंतर ते प्रचारातून गेले. त्याचे वजन १२४ ग्रेन होते. शक संवत् ९१० (सन ९८८) च्या रट्टराजाच्या लेखात त्याचा उल्लेख आढळतो, हे लक्षणीय आहे.[९] उत्तर व दक्षिण कोकणच्या लेखात आढळणारी इतर नाणी होन्नु, पोण, गद्याण आणि धरण ही होत. ती सर्व सोन्याची होती हे त्यांच्या 'सुवर्ण' या अर्थावरून किंवा स्वर्ण या पूर्व पदावरून स्पष्ट आहे.[१०] गद्याण हे सध्याच्या अधेलीच्या आकाराचे सोन्याचे नाणे होते. त्याचे

---

१ क्र. १४, ओ. १२३–१२४ इ.
२ क्र. ५९, ओ. ९.
३ क्र. ४२, ओ. ४६.
४ कोरीव लेख खंड, पृ. १००–१०१ पाहा.
५ क्र. ओ. ४९, २६–३२.
६ पूर्वोक्त.
७ क्र. १, ओ. ५, टीप २.
८ क्र. ६२, पृ. ३४७.
९ क्र. ४०, ओ. ३६.
१० क्र. ४१. ओ. ५७.

प्रमाणित वजन ४८ गुंजा किंवा ८७.८४ ग्रेन असे.[१] धरणाला 'पुराण' असेहि नाव होते. ते सामान्यतः चांदीचे असे. याज्ञवल्क्य स्मृतीत ते ३२ गुंजांचे चांदीचे नाणे म्हणून उल्लेखिले आहे.[२] इतरत्र त्याचे वजन १४४ गुंजा दिले आहे. खारेपाटण ताम्रपटात सोन्याच्या धरणाचा उल्लेख आहे.[३] 'मनुस्मृती'त सुवर्ण धरण १० पळ (किंवा ३२०० गुंजा) वजनाचे असते असे म्हटले आहे.[४] एवढ्या मोठ्या वजनाचा सुवर्ण धरण खारेपाटण ताम्रपटात विवक्षित असेल, असे वाटत नाही. शिलाहारांच्या लेखांत उल्लेखिलेली सुवर्ण गद्याण आणि सुवर्ण धरण यांची वजने 'लीलावती'त निर्दिष्ट केल्याप्रमाणे अनुक्रमे ४८ गुंजांची व २४ गुंजांची असावी.[५] कांही लेखात 'विसोव्या'चा किंवा 'वीसा'चा उल्लेख आहे.[६] ते तांब्याचे नाणे असून त्याच्या नावाप्रमाणे द्रम्माच्या एक विसांश किंमतीचे होते. पण आणि हाग (भाग) ह्यांचाहि उल्लेख कांही लेखांत येतो. तीहि तांब्याची नाणी असावी.

शिलाहार राजांपैकी फक्त छित्तराजाची नाणी आतापर्यंत सापडली आहेत. त्यापैकी एकाचे छायाचित्र आणि वर्णन रॅप्सनने प्रसिद्ध केले आहे.[७] ते 'गधिया का पैसा' या जाड ससानीय प्रकाराचे चांदीचे असून त्याचा आकार ·६ इंच व त्याचे वजन ५३ ग्रेन होते. त्याच्या पुढील बाजूवर विकृत रूपात राजाचे मुख आणि मागील बाजूवर 'श्रीछित्तराजस्य' असा लेख होता. 'गधियाका पैसा' प्रकारच्या नाण्यांवर लेख सहसा आढळत नाही, पण सोमलदेवीच्या नाण्यांप्रमाणे या नाण्यांवर तो आहे हे विशेष होय. ही नाणी कोकणात 'द्रम्म' नावाने प्रचलित होती.[८]

उत्तर कोकणच्या कांही लेखांत[९] पोरुथ किंवा पोरुथि द्रम्मांचा उल्लेख आढळतो. या संज्ञेचे स्पष्टीकरण अनेकांनी अनेक प्रकारे केले आहे. कोणी म्हणतात, ती पार्थियन नाणीं होती.[१०] पण ही नाणीं कोकणातल्या प्रमाणे राजपुताना, माळवा, गुजराथ आणि मेवाड या प्रदेशांतहि चालू होती. त्या प्रदेशांत पार्थियन नाणी प्रचलित असणे संभवनीय वाटत नाही. 'लेखपद्धती'त या नाण्यांचे नाव

---

१ तुल्या यवाभ्यां कथितात्र गुञ्जा वल्लस्त्रिगुञ्जो धरणं च तेऽष्टौ ।
गद्यानकस्तद्‌द्वयमिन्द्रतुल्यैर्वल्लैस्तथैको धटकः प्रदिष्टः ।। लीलावती

२ याज्ञ० १, ३६४. ३ क्र. ४१, ओ. ५७.

४ मनु०, ८, १३४–१३६.

५ 'लीलावती'तील वर उद्‌धृत केलेला श्लोक पाहा.

६ क्र. ३९, ओ. १४; क. ५५, ओ. २१.

७ *J. R. A. S.* for 1900, p. 118.

८ उदाहरणार्थ, क्र. १४, ओ. ७७ पाहा.

९ क्र. ३०, ओ. १०; क्र. ३९, ओ. १३–१४.

१० *Bom. Gaz.*, Vol. I, Part ii, p. 21, n. 6.

पारुपथ किंवा पारुपथक असे दिले आहे. त्यावरून ती एका विशिष्ट प्रदेशात (पथात) प्रचलित होती असे दिसते.[१] 'पुरातनप्रबन्धसंग्रहा'त म्हटले आहे की पोरुथक द्रम्म भिनमाळ जवळच्या जालोर येथील राज्यात चालू आहेत. त्यावरून त्यांचे नाव त्या प्रदेशावरून पडले होते. असेच भिल्लमालचे द्रम्म ज्ञात आहेत.[२] 'पुरातनप्रबंधसंग्रहा'वरून एका पोरूत्थ द्रम्माची किंमत आठ इतर द्रम्मांच्या बरोबर असे. ही विशेष किंमत त्यांच्या आकारापेक्षा त्यांतील चांदीच्या शुद्धतेमुळे असावी.

मागे सांगितल्याप्रमाणे उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या लेखात द्रम्मांचे आणि पोरुथ द्रम्मांचे उल्लेख आढळतात. या बाबतीत लक्षणीय गोष्ट ही की पुष्कळ वर्षांपूर्वी उत्तर कोकणात सापडलेल्या एका भांड्यांत गधिया आणि क्षत्रप नाणीं मिळाली होती.[३] त्यांपैकी गधिया नाणी छित्तराजाची आणि पोरुथ नाणी क्षत्रपांची असावी. त्यांना पोरुथ नाव पडण्याचे कारण ती पार्थियनांनी पाडली असा तत्कालीन समज असावा. त्या कालात क्षत्रप नाण्यांचा प्रचार होता. याचे आणखीहि एक गमक आहे. अल्मसूदी (मृत्यु सन ९५६) सांगतो की राष्ट्रकूटांच्या राज्यातील ताहिरिया नाण्यांवर राजाच्या कारकीर्दीचे वर्ष उमटविलेले असते. प्राचीन भारतीय नाण्यांमध्ये हा विशेष क्षत्रप नाण्यांचाच होय हे सुप्रसिद्ध आहे.

कोल्हापूरचे उपनगर ब्रह्मपुरी येथील उत्खननात दोन लहान सोन्याची नाणी सापडली होती.[४] त्यांचा आकार वाटोळा होता. त्यांच्या पुढील भागावर चंद्र व सूर्य हे आपल्या बेचक्यामध्ये असलेले त्रिशूळ आणि मागील बाजूवर डाव्या हातात फडफडणारा ध्वज आणि उजव्यात सर्प धारण केलेल्या उभ्या गरुडाची आकृति होती. कोल्हापुरच्या शिलाहार राजांचे निशाण सुवर्णगरुडांकित होते. म्हणून हीं नाणीं त्यांची असावी. पण त्यांवर लेख नसल्याने तीं कोणी पाडली होती हे सांगता येत नाही.

कोल्हापूरच्या शिलाहारांच्या लेखांत पणम् आणि बीसिगे या नाण्यांचा उल्लेख येतो.[५] एका लेखात 'मुद्रापणा'चा (टंकाहत पणाचा) उल्लेख आहे. पणम् किंवा फणम् हे अगदी लहान आकाराचे, पांच किंवा सहा ग्रेन वजनाचे, नाणे होते. बीसिगे हे संस्कृत विंशोपक किंवा मराठी विसोवाप्रमाणे फणम्च्या विसांश किंमतीचे नाणे असावे.

---

१ लेखपद्धति, पृ. ४३.
२ *J. N. S. I.*, Vol. XII, p. 201.
३ *Bomb. Gaz.* (Nasik Dist.) (old ed.), p. 617, n. 2.
४ *J. N. S. I.*, Vol. XIV, pp. 15–16.
५ क्र. ४९, ओ. २७–२८.

साहित्य

अनेक प्राचीन भारतीय राजांप्रमाणे शिलाहारांनीहि संस्कृत विद्या आणि साहित्य यांना उत्तेजन दिले. दुर्दैवाने तत्कालीन अनेक संस्कृत ग्रंथ आता नष्ट झाले आहेत. त्यांच्यापैकी फक्त तीन – सोड्ढलाची 'उदयसुन्दरीकथा', 'याज्ञवल्क्य-स्मृती'वरील 'अपरार्कटीका' आणि जैनेन्द्रव्याकरणावरची सोमदेवाची 'शब्दार्णवचन्द्रिका' हे आता उपलब्ध आहेत. याशिवाय कर्णपार्याचा 'नेमिनाथपुराण' हा कन्नड भाषेतील ग्रंथहि प्रसिद्ध झाला आहे. या सर्वांविषयी संक्षिप्त माहिती पुढे दिली आहे.

१. सोड्ढलाची उदयसुन्दरीकथा

सोड्ढलाची 'उदयसुन्दरीकथा' सुमारे पन्नास वर्षांपूर्वी कै. कृष्णमाचार्य यांनी बडोदा संस्थानातील पाटण येथे पार्श्वनाथ भांडाराच्या हस्तलिखित संग्रहालयात सापडलेल्या एकमेव हस्तलिखितावरून गायकवाड ओरिएंटल सीरीजमध्ये प्रसिद्ध केली. संस्कृतातील उत्कृष्ट गद्यकाव्यांमध्ये तिची गणना करण्यासारखी असूनहि तिच्याकडे अद्यापि अभ्यासकांचे लक्ष गेलेले दिसत नाही.

बाणकवीप्रमाणे सोड्ढलानेहि आपल्या ग्रंथाच्या आरंभी आणि शेवटीहि स्वत:विषयी बरीच माहिती दिली आहे. तो वलभीच्या कायस्थ वंशात जन्मला होता. वलभी हे मैत्रक वंशातील राजांचे राजधानीचे शहर होते. ते आता सौराष्ट्रातील पूर्वीच्या भावनगर संस्थानात वला नामक खेड्याच्या रूपाने अवशिष्ट आहे. सोड्ढल आपल्या कायस्थ वंशाची पुढील पारंपरिक किंवा काल्पनिक माहिती देतो.[१]

वलभी राजधानीत शिलादित्य नामक राजा राज्य करीत होता. त्याला कलादित्य नावाचा शूर व विद्वान् असा धाकटा भाऊ होता. एकदा कलादित्याने धर्मपाल नामक शत्रूचा पराजय करून त्याला शरण यावयास लावले. आपल्या राज्यातील प्रधानादि मंत्री अविश्वसनीय आहेत असे चारांकडून समजल्यामुळे चिताक्रान्त झालेल्या राजाला राजलक्ष्मीने स्वप्नात येऊन सांगितले की "भगवान् शंकराच्या जलरूपी 'काया'च्या (शरीराच्या) सांनिध्यात राहणाऱ्या आणि म्हणून 'कायस्थ' नावाने विख्यात झालेल्या गणाने मंदर पर्वताने घुसळलेल्या समुद्रातून

---

१ उदयसुन्दरीकथा, पृ. ४ इ.

उत्पन्न झालेल्या आणि त्याच्या जलात बुडत असलेल्या मला वर काढून देवांच्या स्वाधीन केले. या कायस्थ गणाच्या क्षत्रिय वंशात उत्पन्न झालेला कलादित्य तुझा धाकटा भाऊ आहे. त्याला ही गरुडांकित मुद्रा देऊन त्यावर राज्यकारभार सोपव." राजाने त्याप्रमाणे केले. त्या शिवगणापासून वालभ कायस्थ वंश उत्पन्न झाला.

कायस्थ वंशाच्या उत्पत्तीविषयी अनेक काल्पनिक कथा आढळतात.[१] त्यासारखीच वरील कथा आहे. वलभी येथे खिस्तोत्तर सातव्या–आठव्या शतकांत शिलादित्य नामक सात राजे होऊन गेले. सोड्ढलाच्या काळी (अकराव्या शतकात) ते विद्यमान नव्हते. तथापि ते वलभी येथे राज्य करीत होते. ही पारंपरिक माहिती सोड्ढलाला होती असे दिसते. म्हणून त्याने आपल्या कायस्थ वंशाचा संबंध त्यांच्याशी जुळविलेला दिसतो.

सोड्ढलाने आपल्या पूर्वजांची, सहाध्यायांची, स्नेह्यांची, गुरूची आणि स्वकालीन कवींची बरीच माहिती दिली आहे. त्याचे घराणे मूळचे लाट (दक्षिण गुजराथ) प्रदेशातील. तेथे त्याच्याकडे सिक्करहारीय–७२, वाहिरिहार–७०, अन्नापलीय–७०[२] इत्यादि प्रदेशांची ध्रुववृत्ति (मालगुजारी) होती. सोड्ढलाने चण्डपति – त्याचा पुत्र सोल्लपेय – त्याचा पुत्र सूर अशी आपल्या पूर्वजांची नावे दिली आहेत. सूराला पम्पावतीपासून सोड्ढल हा पुत्र झाला. लाट देशाच्या चालुक्य राजांची या घराण्यावर विशेष मर्जी होती, असे दिसते. म्हणून सोड्ढलाच्या बाल्यावस्थेतच त्याचा पिता वारला, तेव्हा लाट नृपति गोग्गिराज[३] याच्या गंगाधर

---

१ यांपैकी एक व्युत्पत्ति कॉ. इ. इं., व्हॉ. ४, पृ. २७१ इ. वर दिली आहे.

२ या प्रदेशांची सध्याची नावे अहमदाबादच्या शेठ भोलाभाई संशोधन मंडळाचे संचालक डॉ. एच्. जी. शास्त्री यांनी पुढीलप्रमाणे सुचविली आहेत – अन्नापलीय सुरत जिल्ह्याच्या महुवा तालुक्यातील अनावल असावे. दक्षिण गुजराथेतील अनावल ब्राह्मणांचे हे मूलस्थान. वाहिरिहार हे सुरत जिल्ह्याच्या ओलपाड तालुक्यातील विहारा किंवा त्याच्या जिल्ह्याच्या मंगरोळ तालुक्यातील वहार असावे. सिक्करहारी हे सुरत जिल्ह्याच्या वालोड महालातील सिकेर असावे. या प्राचीन प्रदेशनामांस जोडलेले संख्यावाचक उल्लेख त्या त्या प्रदेशांतील ग्रामसंख्येचे द्योतक समजले जातात.

३ हे नाव 'उदयसुन्दरीकथे'च्या गा. सं. सी. मधील आवृत्तीत गोगिराज असे दिले आहे. (शेवटचे शुद्धिपत्र पाहा.) पण ते कोरीव लेखांत 'गोग्गिराज' असे येते. भांडारकर, लिस्ट ऑफ नॉर्दर्न इन्स्क्रिप्शन्स्, क्र. १०८८ आणि १०९२ पाहा.

नामक पुत्राने त्याचे पालन पोषण केले. पुढे गोग्गिराजपुत्र कीर्तिराज हा गादीवर आला. तेव्हा त्याचा पुत्र सिंहराज याच्या बरोबर सोड्ढलाचे अध्ययन झाले. त्यांच्या गुरूचे नाव चंद्र. सोड्ढलाची काव्यप्रतिभा अध्ययन करता करताच प्रफुल्लित झाली. पुढे परिस्थिति बदलल्यामुळे[१] तो लाट देशातून उत्तर कोकणातील शिलाहारांची राजधानी स्थानक (ठाणे) येथे आला. तेथे त्याला शिलाहारनृपति छित्तराज याच्या दरबारी आश्रय मिळाला. एकदा सोड्ढलाने 'प्रदीप' शब्द असलेला एक सुंदर श्लोक रचला. त्यायोगे आनंदित होऊन छित्तराजाने त्याला 'कविप्रदीप' अशी पदवी दिली.[२] छित्तराजानंतर त्याचा भाऊ नागार्जुन आणि त्यानंतर दुसरा भाऊ मुम्मुणिराज हे गादीवर आले. त्यांनीहि सोड्ढलाला मोठ्या आदराने वागविले.

ठाण्याला असता सोड्ढलाला लाटदेशाधिपति, पूर्वोक्त कीर्तिराजाचा पुत्र आणि कोकणेशाचा परममित्र, वत्सराज याने लाट देशाला येण्याविषयी प्रेमाचे आमंत्रण दिले. तेथे एकदा वत्सराज आपल्या कविजनांसह दरबारात बसला असता एका व्यापाऱ्याने त्याला अनेक मोत्यांचा समूह दाखविला. तेव्हा राजा पुढील साभिप्राय आर्या म्हणता झाला–[३]

> एकैकशः प्रकीर्णैर्मुक्तामणिभिः किमेभिरेभिस्तु ।
> यं सृजसि हन्त हारं तस्यान्यः कोऽपि परिभोगः ।।

(अलग अलग असलेल्या या मोत्यांचा काय उपयोग? त्यांचा जर हार बनवलास तर मोठा आनंद होईल.)

या आर्येचा व्यंग्यार्थ राजसभेत बसलेल्या सोड्ढलाच्या लागलीच लक्षात आला. पण तो काही बोलला नाही. घरी आल्यावर तो स्वतःशीच म्हणाला, "महाराजांनी माझ्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले आहे. त्यांचा आशय असा की 'फुटकळ मुक्तक स्वरूपाचे श्लोक न रचता तू एक भरीव काव्य रचावे.' हे काव्य रचावयाचे तर ते केवळ गद्यात किंवा केवळ पद्यात न रचता ते गद्यपद्यमय

---

१ हे अणहिलपाटणच्या चौलुक्यांच्या स्वाऱ्यांमुळे असावे. मूलराजाने गोग्गिराजाचा पिता बारप्प याला ठार मारून लाट देश खालसा केला होता. अ. कु. मजुमदार, चौलुक्याज् ऑफ गुजराथ, पृ. २८ इ.

२ अशी टोपणनावे इतर संस्कृत कवींनाहि दिलेली आढळतात. उदाहरणार्थ, कालिदासाला 'रघुवंश', ६, ६७ या श्लोकावरून 'दीपशिखाकालिदास' आणि भारवीला 'किरातार्जुनीया'तील एका श्लोकावरून 'छत्रभारवि' असे टोपणनाव मिळाले होते.

३ उदयसुन्दरीकथा, पृ. १२.

किंवा चम्पू स्वरूपाचे असावे हे उघड आहे." नंतर अशा ग्रंथरचनेला अवश्य असे एकान्त स्थान असावे म्हणून तो सुखसोयींनी युक्त अशा आपल्या एका गावात जाऊन राहिला आणि त्याने काही दिवसांतच एक उदात्तनायकविषयक कथा पूर्ण केली. नंतर तिचे पुस्तक वस्त्रात बांधून तो परत यावयास निघाला. वाटेत अरण्यातील दुस्तर मार्गाने जाताना त्याला एक अत्यंत शुभ्र असे देवालय लागले.[१] त्यांतील भगवती सरस्वती देवीचे दर्शन न घेता जाणे इष्ट नव्हे, म्हणून तो आत गेला. आणि त्याने त्या देवीची तत्कालरचित श्लोकाने स्तुति केली. तितक्यात संध्याकाळ झाल्यामुळे व बरोबरचे लोक पुढे गेल्यामुळे तो त्या देवळाच्या मंडपातील मत्तवारणकात[२] (बाजूच्या भागात) विश्रांति घेण्याकरिता बसला. तेव्हा त्याला गर्भगृहाच्या दोन्ही बाजूंस शिलानिर्मित दोन द्वारपालांच्या सुंदर मूर्ती दिसल्या. रात्री त्या मूर्तींच्या मध्ये एक तैलरहित दीपाची उज्ज्वल ज्योत उत्पन्न झाली. त्याबरोबर त्या मूर्तींतून दोन यज्ञोपवीत धारण करणारे दिव्य पुरुष प्रकट होऊन त्यांनी तत्काळ एक एक श्लोक रचून भगवती देवीची स्तुति केली आणि ते समोरच्या मत्तवारणकात बसले. नंतर त्यांनी कवीला पाहून विचारले, "आपल्या या बिछान्यावर ठेवलेला ग्रंथ कसला आहे?" कवीलाहि ती आश्चर्यकारक घटना पाहून त्यांच्या विषयी जिज्ञासा उत्पन्न झाली आणि तो म्हणाला, "सांगतो. पण अगोदर तुम्ही कोण ते सांगा." तेव्हा त्यांच्यापैकी एक युवक म्हणाला, "या महात्म्याचे नाव तिलक आणि माझे तालक. सदैव भगवती देवीच्या सांनिध्यात असल्यामुळे आमच्या मध्ये कवित्वशक्ति जागृत झाली आहे. पण तुमचा हा ग्रंथ कसला हे सांगा." त्यावर कवि म्हणाला, "हा माझाच ग्रंथ आहे. पण तो एखादा सत्कवि श्रोता मिळेपर्यंत असाच बांधला राहील." त्यावर त्या दोघांनी त्याला ते काव्य वाचून दाखविण्याचा आग्रह केला. तेव्हा कवि म्हणाला, "मी आपल्या अनुचरांना दीपासाठी काटक्या आणण्याकरिता पाठविले होते. पण आता त्यांची जरुरी नाही. या देवालयाला जोडून असलेल्या क्षेत्रपालाच्या देवकुलीत जाऊन मी आपल्या शयनाची व्यवस्था करतो आणि नंतर मी तुम्हांस हा ग्रंथ वाचून दाखवितो." तसे केल्यावर त्याने

---

१ हे देवालय भार्गवाने बांधले होते असे म्हटले आहे. तेव्हा ते भृगुकच्छाहून (भडोचहून) दूर नसावे. ते शूर्पारकाहून (सोपाऱ्याहून) लाट देशाच्या राजधानीला जाणाऱ्या मार्गावर होते, असे म्हटले आहे.

२ सोड्ढलाने या शब्दाचा प्रयोग अनेकदा केला आहे. तो 'मत्तवारणी' या भरताच्या 'नाट्यशास्त्रा'त योजिलेल्या संज्ञेपासून निघालेला दिसतो. 'मत्तवारणक' म्हणजे सभागृहाच्या मध्यभागापासून दोन्ही बाजूंस खांबांनी विभक्त केलेला भाग. इंग्रजीत याला aisle म्हणतात.

पुन: त्या मत्तवारणकात येऊन तो ग्रंथ वस्त्रातून बाहेर काढला आणि आपली ' उदयसुंदरीकथा ' वाचण्यास आरंभ केला.[१]

उदयसुंदरीकथा

कुन्तल देशात गोदावरीच्या काठी प्रतिष्ठान नामक एक समृद्ध नगर होते. तेथे मलयवाहन नावाचा राजा राज्य करीत होता. एकदा तो आपल्या सभेत बसला असता त्याचा वसंतशील नामक माळी डोक्यावर आश्चर्यकारक शिखा असलेल्या आणि ' चित्रशिख ' असे यथार्थ नाव प्राप्त झालेल्या पोपटाला घेऊन तेथे आला. तो पोपट वास्तविक मथुरेचा राजकुमार कुमारकेसरी होता; पण एकदा तो पाताळात गेला असता त्याचा पाय पूजेच्या माणिकनिर्मित शुक्तीवर चुकून पडला आणि ती भग्न झाली. तेव्हा तेथील तापसीने रागावून ' तू पोपट होशील ' असा त्याला शाप दिला. तिचा राग कुमारकेसरीच्या प्रार्थनेने शमल्यावर तिने उ:शाप दिला की " तू पोपट झालास तरी तुला मानवाप्रमाणे राहता येईल, आणि पुढे शिवालयांत तुझी चोच भग्न होईल तेव्हा तुला तुझे पूर्व रूप प्राप्त होईल." कांही काळानंतर तो राजा त्या पोपटाला घेऊन शिकारीस गेला. शिकार करता करता तो एका देवालयाला पोचला. त्याच्या मंडपात रत्ननिर्मित स्त्रीमूर्ति होत्या. तितक्यात आपल्या पिंजऱ्याचे प्रवालनिर्मित दार मोडून तो चित्रशिख पोपट बाहेर आला आणि एका स्त्रीमूर्तीच्या हातातील डाळिंबास चोच मारू लागला. त्या प्रयत्नात त्याची चोच मोडली, आणि काय आश्चर्य ! त्याला आपले पूर्वीचे राजकुमाराचे रूप प्राप्त झाले. तितक्यात त्या पोपटाची शिखा खाली पडून तीतून एका सुंदर स्त्रीची तसबीर बाहेर पडली. राजा ते चित्र पाहून त्या अज्ञात स्त्रीवर आषक झाला आणि तिला शोधण्याकरिता इतस्तत: भटकू लागला. एकदा चांदण्या रात्री हिंडत असता त्याला एक राक्षस चण्डिकेच्या निर्जन देवालयात एका तरुण तापसीला त्रास देत असलेला दिसला. त्याने त्या राक्षसाच्या तावडीतून तिची मुक्तता केली. तेव्हा तिने पुढील वृत्तांत सांगितला, " माझे नाव तारावली. पातालातील नागराजा शिखंडतिलक याची कन्या उदयसुंदरी नामक आहे, तिची मी सखी. एकदा तिने एका किन्नरयुगलाने पातालात आणलेली मलयवाहन राजाची तसबीर पाहिली आणि ती त्याच्यावर अनुरक्त झाली. पुढे आपल्या मातेच्या आज्ञेने ती पाताळातील हाटकेश्वर शिवाच्या दर्शनाकरिता गेली असता तेथे कुमारकेसरी नामक राजपुत्र आला होता. तेथे त्याचा पाय माणिक्यनिर्मित शुक्तीवर पडून ती भग्न झाली. तेव्हा तेथील तापसीने पूर्वोक्त शाप दिला. आणि तिची तसबीर त्याची

---

१ याच्या विस्तृत सारांशाकरिता ' संशोधन–मुक्तावलि ', सर ६, पृ. ७३–८४ पाहा.

शिखा झाली." तिचा वृत्तांत ऐकल्यावर मलयवाहनाने तिला आपल्या राजधानीतील मठात कांही काळ राहण्यास सांगितले.

तितक्यात आपल्या प्रासादाच्या गच्चीवर झोपलेल्या उदयसुंदरीला हाटकेश्वराच्या दर्शनार्थ गेलेल्या एका विद्याधराने पळविले. आपल्या विमानाने तो तिला घेऊन जात असता एका तपश्चर्या करणाऱ्या मुनीला त्याचा धक्का लागला. त्याच्या शापाने त्या विद्याधराचे एका वानरात रूपांतर झाले. त्याने उदयसुंदरीला एका टेकडीच्या आत निर्माण केलेल्या प्रासादात कैदेत ठेवले. एकदा मलयवाहनाने एक आश्चर्यकारक घोडी पाहिली. तिच्यावर आरूढ होताच तिने त्याला उदयसुंदरीच्या बंदीस्थानाजवळ आणले. मलयवाहनाने तेथे त्या माकडाला चपराक लगावताच त्याचे मूळ विद्याधररूपात परिवर्तन झाले. नंतर त्याने उदयसुंदरीची सुटका केली. ती घोडी वस्तुतः तारावलीच होती. एका जादूच्या कुंडातील पाणी प्याल्यामुळे तिला घोडीचे रूप प्राप्त झाले होते. तिलाहि नंतर आपले पूर्व रूप मिळाले.

नंतर त्या राक्षसाने स्वतःचे विमानात रूपांतर केल्यावर त्यात बसून ते सर्व प्रतिष्ठान राजधानीला परत आले. नंतर मलयवाहनाने स्वतः उदयसुंदरीशी विवाह केला आणि तारावली कुमारकेसरीला अर्पण केली.

* * *

सोड्ढलाने 'उदयसुंदरीकथा' वाचून दाखवून आपले पुस्तक पुनः वस्त्रात बांधले. तेव्हा तालकाने त्या प्रबन्धाची प्रशंसा केली. तो म्हणाला, "आम्ही हा तुमचा प्रबन्ध ऐकला. यात पूर्वसूरींनी ज्या तऱ्हेचे गुण असावेत असे सांगितले आहे त्या सर्वांचा समावेश आहे. या कथेचा आरंभ आकर्षक आहे. संविधानकाच्या संधींमध्ये सुश्लिष्टता आहे. रससंपद् सुस्पष्ट आहे. पदरचना कानाला गोड लागणारी आहे. वर्णनामध्ये लौकिक व्यवहाराची कुशलतेने गुंफण केली आहे." ते ऐकून कवीला मोठा विस्मय वाटला. आणि त्याने त्याला नमस्कार करून विनयाने विचारले, "आपण कोण आणि येथे मूर्तिरूपाने कसे आहा ?" तेव्हा तालक म्हणाला, 'हा विश्वविख्यातकीर्ति, 'कादम्बरी' आणि 'हर्षचरित' यांचा कर्ता, वात्स्यायनगोत्री सरस्वतीशिष्य 'कवीन्द्रतिलक' बाण, आणि मी भगवान् ब्रह्मदेवाच्या सभेतील सामान्य देवर्षि तालक. एकदा ब्रह्मदेवाच्या दर्शनार्थ गेलो असता मी त्याची पुढील श्लोक रचून स्तुति केली.

ब्रह्मंस्त्वां स्तौमि तं यस्य पुष्पलिड्भिः प्रलक्षितम् ।
पाण्ड्वाभं वल्गु सुष्ट्वब्जं जन्म धिष्ण्यं च विष्टरम् ॥

(हे भगवन् ब्रह्मदेव ! भ्रमरांनी वेष्टिलेले सुंदर श्वेत कमल ज्यांचे जन्मस्थान तसेच आसनहि आहे, त्या तुमची मी स्तुति करतो.)

या श्लोकाच्या रचनेने आनंदित होऊन मी नंतर सरस्वतीभवनाच्या सभागृहात बाण कवीच्या अध्यक्षतेखाली कालिदासादि महाकवि, विक्रमादित्य, श्रीहर्ष, मुंज, भोजदेवादि नृपति, आणि वाक्पतिराज, मायुराज, विशाखदेव इत्यादि सामन्त काव्यचर्चा करीत होते तेथे गेलो आणि हा माझा श्लोक म्हटला. तेथील सर्वांनी माझे स्वागत केले आणि त्या श्लोकाबद्दल माझे अभिनन्दन केले. फक्त बाण कवीने त्यात 'श्रुतिकटुत्वा 'चा दोष काढला.[1] तेव्हा मलाहि क्रोध येऊन, तो बाण कवि सरस्वती देवीचा लाडका शिष्य आहे हे ध्यानात न घेताच, मी त्याला शाप दिला; "हे कविबटो, मी माझा श्लोक म्हणत असता तू शिलास्तंभासारखा निश्चल राहिलास, म्हणून तू मर्त्य लोकातील सरस्वती देवीच्या देवालयात पाषाणमूर्ति होऊन कांही काळ राहशील." तेव्हा सर्वत्र कोलाहल झाला. तेथे बसलेल्या कवींनी माझी उश्शापाकरिता प्रार्थना केली. तेव्हा 'हा बाणकवि त्या सरस्वतीच्या दीपप्रभेने सर्वशास्त्रज्ञ आणि कवितारहस्यवेत्ता होईल आणि रात्रीच्या वेळी याची शिलावस्था नाहीशी होऊन हा सुखी होईल; आणि हा जेव्हा सोड्ढलाची 'उदयसुंदरीकथा' श्रवण करील तेव्हा याला पूर्वरूप प्राप्त होईल' असा मी उश्शाप दिला. नंतर सरस्वती देवीने आपल्या प्रियकवि बाणाला मी शाप दिलेला पाहून मलाहि बाणाच्या सारखाच शाप दिला. आणि मी अनुग्रहाकरिता प्रार्थना केली तेव्हा 'तू बाणाच्या सांनिध्यात राहशील आणि त्याच्या बरोबरच तुझीहि शापातून मुक्तता होईल,' असा उश्शाप तिने दिला. पुढे तालक म्हणाला, "तेव्हापासून आम्ही दोघेहि शिलामूर्ति बनून या देवालयात राहत आहोत. रात्री मात्र वनदेवता आमच्या करिता दिव्य प्रकाशाची तजवीज करते. तुझ्या विषयी आम्हांस पूर्ण माहिती आहे." बाणानेहि त्याच्या काव्याची प्रशंसा केली आणि म्हटले की "तू हा प्रबन्ध सर्वांस वाचून दाखवू नको. फक्त सज्जनांना तो ऐकव. तू कवीन्द्रपदाला प्राप्त झाला आहेस." असे म्हणून ते दोघे सरस्वती देवीला नमस्कार करून विमानात बसून ब्रह्मलोकाला गेले.

नंतर सोड्ढलाने ती रात्र त्या मत्तवारणकात आपले पुस्तक उशाला घेऊन घालविली. स्वप्नात त्याने आपले नाव वाल्मीकीपासून उत्पन्न झालेल्या कविवंशावळीत लिहिलेले पाहिले. पहाटे उठल्यावर त्याने आपल्या सेवकांकडून खोदण्याचे वगैरे साहित्य मिळवून त्या देवळाच्या पाचूच्या भिंतीवर कविप्रशस्ति कोरून ठेवली. तीत प्रथम भगवान् शंकराच्या स्तुतिपर मंगल श्लोक आणि नंतर वाल्मीकि, व्यास, गुणाढ्य, भर्तृमेण्ठ, कालिदास, बाण, भवभूति, वाक्पतिराज, अभिनन्द, यायावर

---

१ त्या श्लोकातील कठोर वर्णांमुळे तेथे 'श्रुतिकटुत्व' हा पददोष झाला आहे.

(राजशेखर), कुमारदास इत्यादिकांच्या प्रशंसेचे श्लोक होते आणि नंतर त्याने स्वत:विषयी म्हटले होते–[१]

तस्मिन्सुवंशे कविमौक्तिकानामुत्पत्तिभूमौ क्वचिदेकदेशे ।
कश्चित्कविः सोड्ढल इत्यजातनिष्पत्तिरासीज्जलबिन्दुरेव ।
यो वत्सराजेन वरेण राज्ञां लाटावनीमण्डलनायकेन ।
सूक्ष्मादृढस्तोकगुणाश्रितोऽपि मित्रीकृतो भानुमतेव पद्मः ॥
जडेन तेनोदयसुन्दरीति कथा दुरालोकिनि काव्यमार्गे ।
सारस्वतालोकलवैकदृष्टा सृष्टा कविंमन्यमनोरथेन ॥
सा चात्र देवीभवने निवृत्तशापार्तिना बाणकवीश्वरेण ।
कविश्रमोद्भूतकृपेण सम्यक् श्रुता धृता हृद्यभिनन्दिता च ॥

[वाल्मीकीपासून उत्पन्न झालेल्या त्या सद्वंशात – ज्यात कविरूप मौक्तिके उत्पन्न होतात त्यात – मौक्तिक रूपाला न पोचलेल्या जलबिन्दूप्रमाणे एक सोड्ढल नामक कवि उत्पन्न झाला.]

लाटदेशाधिपति नृपश्रेष्ठ वत्सराज याने त्याच्या ठिकाणचे गुण सूक्ष्म, अस्थिर आणि अल्प असले तरी त्यांकडे लक्ष न देता, सूर्य जसा कमलाला आपला मित्र मानतो त्याप्रमाणे त्याला मित्र मानले. त्या मन्दबुद्धि सोड्ढलाने कवि होण्याच्या महत्त्वाकांक्षेने दैदीप्यमान अशा काव्यसृष्टीमध्ये (न शोभणारी) सारस्वताच्या अल्प प्रकाशाने युक्त अशी ही ' उदयसुन्दरीकथा ' लिहिली.

या सरस्वतीभवनात शापपीडेतून मुक्त झालेल्या कवीश्वर बाणाने कवीच्या श्रमाने दयार्द्र होऊन ती कथा ऐकली आणि अन्तःकरणपूर्वक प्रशंसिली.]

नंतर सरस्वती देवीची स्तुति व पूजा करून तो आपल्या नगराला परत गेला. तेथे ' अशोकवती ' नामक कथेचा कर्ता चन्दनाचार्य नावाचा श्वेताम्बर जैन महाकवि, नागार्जुन राजाने ' खड्गाचार्य ' पदवीने विभूषिलेला खड्गकाव्यकर्ता शीघ्र कवि विजयसिंहाचार्य, भाषात्रयवेत्ता दिगम्बराचार्य महाकीर्ति, ' रत्नमञ्जरी ' नामक चम्पूकथेचा कर्ता इन्द्र इत्यादि कवींनी त्याची प्रशंसा केली. कांही दिवस गेल्यावर कोकणच्या मुम्मुणि राजाने आपल्या दरबारच्या भाषात्रयाभिज्ञ आणि शूर अशा मधुरसाहार नामक कविमित्राला सोड्ढलाला आपल्याकडे आणण्याकरिता पाठविले. तो सोड्ढलाची भेट घेऊन त्याला म्हणाला, "मुम्मुणिराजांना कळले आहे की तुम्ही ' उदयसुन्दरी ' नामक कथा रचली आहे. ती तुम्ही निर्जन अशा अरण्यातील सरस्वतीच्या देवालयात बाणभट्टाला वाचून दाखविली आणि त्याने तिची प्रशंसा

१ उदयसुन्दरीकथा, पृ १५४ इ.

केली. मुम्मुणिराजाचे मित्र लाटदेशेश्वर वत्सराज यांनी शूर्पारक नगरातून जात असता वाटेत एका सरस्वती देवालयात तुम्ही लिहिलेली प्रशस्ति पाहिली. तेव्हा त्यांना आपण म्हटलेल्या आर्येच्या संदर्भात ती लिहिली गेली असे वाटून त्यांनी तुम्हांला बोलाविले आणि तो प्रबन्ध पाहिला. त्यांनी मुम्मुणिराजांना त्याबद्दल आणि बाणभट्टाने केलेल्या त्याच्या प्रशंसेबद्दल सर्व सांगितले. तो आश्चर्यकारक वृत्तांत ऐकून त्या राजांनी तुम्हाला आणण्याकरिता मला पाठविले आहे." नंतर सोड्ढल कवि त्याच्या बरोबर मुम्मुणिराजाच्या सभेत गेला. तेव्हा राजाने त्याला तो प्रबन्ध वाचण्यास सांगितले. तो ऐकल्यावर मुम्मुणिराजाने त्याचा सत्कार केला. सभेतील लोकांनी त्याचे अभिनन्दन केले आणि त्याच्या कविमित्रांनी त्याला गाढ आलिंगन दिले. त्यामुळे त्याला त्रिभुवनाधिपत्यापेक्षा जास्त आनंद झाला. भगवान् शंकराच्या स्तुतीने सोड्ढलाने आपल्या कथेची समाप्ति केली आहे.

सोड्ढलाचा काल निश्चित करणे कठीण नाही. त्याला छित्तराज, नागार्जुन आणि मुम्मुणि या तीन शिलाहार बंधूंचा राजाश्रय होता. छित्तराजाचा सर्वात अगोदरचा लेख सन १०२४ चा[१] आणि मुम्मुणीचा शेवटचा लेख सन १०६० चा[२] आहे. तेव्हा सोड्ढल शिलाहारांच्या दरबारी सन १०३० ते १०४५ पर्यंत राहिला असावा. त्याला लाट देशाच्या चालुक्य नृपतींचाहि आश्रय होता. त्या वंशातील खाली दिलेल्या पहिल्या तीन राजांचा उल्लेख 'उदयसुन्दरीकथे'त आला आहे.

गोग्गिराज
|
कीर्तिराज (ज्ञात वर्ष सन १०१८)[३]
|
वत्सराज
|
[त्रिलोचनपाल (ज्ञात वर्ष सन १०५१)][४]

गोग्गिराजाचा पुत्र गंगाधर आणि कीर्तिराजाचा पुत्र सिंहराज यांचेहि उल्लेख 'उदयसुन्दरीकथेत'त आले आहेत; पण ते गादीवर बसले नव्हते. वत्सराजाचे लेख अद्यापि सापडले नाहीत. तथापि त्याचा पिता आणि पुत्र यांच्या लेखांवरून तो सु. सन १०३० ते १०५० या कालात होऊन गेला असावा. तेव्हा सोड्ढलाने

---

१ क्र. ६१, पृ. ३४२. २ क्र. १७, ओ. १.

३ D. R. Bhandarkar, *List of Northern Inscriptions*, No. 1088.

४ पूर्वोक्त, क्र. १०९२. याचा उल्लेख 'उदयसुन्दरीकथे'त आला नाही.

म्हटल्याप्रमाणे तो शिलाहार मुम्मुणीचा समकालीन होता. त्या दोघा राजांचा सोड्ढलाला आश्रय होता. म्हणून त्याचा पूर्वोक्त काल निश्चित होतो.

सोड्ढलाची 'उदयसुन्दरीकथा' बाणाच्या 'कादम्बरी'सारखी रचली आहे. बाणाचे 'हर्षचरित' आणि 'कादम्बरी' हे दोन्ही ग्रन्थ त्याला माहीत होते. 'हर्षचरिता'तल्या प्रमाणे त्याने आपल्या ग्रंथाच्या आरंभी आपल्या वंशाच्या उत्पत्तीविषयी काल्पनिक कथा देऊन आपल्या पूर्वजांविषयी व आश्रयदात्यांविषयी माहिती दिली आहे. पण 'हर्षचरिता'पेक्षा 'कादंबरी'ची छाप त्याच्या ग्रंथावर जास्त पडली आहे. हे दोन्ही ग्रंथ 'कथा'स्वरूपाचे आहेत. म्हणजे त्यांचे कथानक काल्पनिक आहे. दोन्हींतील कथा गुंतागुंतीच्या आहेत. 'कादंबरी'त भूलोक व स्वर्गलोक या दोनच लोकांतील घटनांचा उल्लेख येतो तर 'उदयसुन्दरी'तील काही घटना पातालातील नागलोकात घडल्या आहेत असे दाखविले आहे. दोन्हींत शापामुळे त्यांतील पात्रांना शुकाचा व अश्वाचा जन्म प्राप्त झाल्याचे दाखविले आहे. दोन्हींतील शुक विद्वान्, शास्त्रपुराणादिकांचे ज्ञान असलेले असे, आणि घोडा–घोडी वायुवेगासारखी चपळ दाखविली आहेत. दोन्ही कथांची भाषा समासप्रचुर आहे; पण सोड्ढलाने बाणासारखा श्लेषाचा व विविध अलंकारांचा उपयोग केलेला दिसत नाही. त्याच्या कथेत उत्प्रेक्षांचेच प्राचुर्य आढळते. त्याच्या कल्पनेची भरारी बाणाच्या सारखी उच्च प्रतीची नाही. अनेक ठिकाणी त्याचे वर्णन ठरीव ठशाचे वाटते. त्याच्या कथेत जास्त पात्रे असून त्याची गोष्ट अधिक गुंतागुंतीची झाली आहे. तथापि शेवटी त्याने सर्व धागे समाधानकारक रीतीने उलगडून दाखविले आहेत.

सोड्ढलाच्या पुढे बाणाच्या कादंबरीचा आदर्श होता. म्हणून त्याने बाणाची स्तुति तर केली आहेच,[१] पण त्याला शापित रूपाने पृथ्वीवर आणून त्याच्याकडून आपल्या ग्रंथाची प्रशंसाहि करविली आहे.

सोड्ढलाने आपल्या कथेत वैदर्भी, गौडी आणि पांचाली या तीन्ही रीतींचा यथोचित उपयोग केला आहे. त्यांना तो अनुक्रमे कौकिली (कोकिल स्वराची), मायूरी (मयूरस्वराची) आणि माराली (हंसस्वराची) अशी नावे देतो.[२] सामान्यत: पद्यांत तो वैदर्भी किंवा पांचाली रीतीचा आणि गद्यात गौडी रीतीचा उपयोग करतो. त्याच्या गद्यातील समासांनी कित्येकदा पानेच्या पाने भरली आहेत.

---

१ पाहा – वागीश्वरं हन्त भजेऽभिनन्दमर्थेश्वरं वाक्यतिराजमीडे । रसेश्वरं नौमि च कालिदासं बाणं तु सर्वेश्वरमानतोऽस्मि ।। उदयसुन्दरीकथा, पृ. १५७.

२ पूर्वोक्त, पृ. १४९.

त्याने विविधरसव्यंजक रचना केली आहे. विरही मलयवाहन आणि उदयसुंदरी यांच्या वर्णनात विप्रलंभ शृंगार, राक्षसाच्या वर्णनात भयानक, श्मशानवर्णनात बीभत्स आणि विमानवेगवर्णनात अद्भुत, अशा विविध रसांचा परिपोष त्याच्या कथेत आढळतो. तत्कालीन पद्धतीप्रमाणे त्याने समासांचा प्राचुर्याने उपयोग केला असला तरी त्यांत श्लेष नसल्यामुळे त्याची शैली दुर्बोध झाली नाही. त्याने उद्यान, वन, सरोवर इत्यादिकांच्या वर्णनात आपली सृष्टिसौंदर्याची आवड व सूक्ष्म निरीक्षणशक्ति हीं व्यक्त केली आहेत.

सोड्ढलाने अनेक प्राचीन सूरींचा आणि स्वकालीन ग्रंथकारांचा उल्लेख केला आहे. त्याचा स्वत:चा काल निश्चित असल्यामुळे त्या कवींच्या काव्याची उत्तर मर्यादा निश्चित होते. त्यांपैकी वाल्मीकि, व्यास, गुणाढ्य, भर्तृमेण्ठ, कालिदास, बाण, भवभूति, वाक्पतिराज, राजशेखर यांचे काल इतर प्रमाणांवरून निश्चित झाले आहेत. तथापि त्यांपैकी कांहींविषयी त्याने दिलेली माहिती नवीन आहे. वाक्पतिराज, मायुराज आणि विशाखदेव हे सामन्त होते, असे सोड्ढल सांगतो. एका सुभाषितावरून मायुराज हा कलचुरि वंशातला राजा होता हे माहीत झाले आहे.[१] तथापि वाक्पतिराज आणि विशाखदेव यांच्या विषयी ही माहिती नवीन आहे. विशाखदेव हा बहुधा 'मुद्राराक्षस' आणि 'देवीचन्द्रगुप्त' या नाटकांचा कर्ता विशाखदत्त असावा.

सोड्ढलाने स्वकालीन श्वेताम्बर व दिगम्बर जैन कवींचा आणि त्यांच्या ग्रंथांचा उल्लेख केला आहे. त्यावरून त्या काळी लाट देश हा जैन साहित्याविषयी सुप्रसिद्ध होता असे दिसते. पण दुर्दैवाची गोष्ट ही की या ग्रंथांपैकी एकहि सध्या उपलब्ध नाही. संस्कृत चम्पूकाव्यांत सोड्ढलाची 'उदयसुन्दरीकथा' आरंभीच्या कालातील आहे. त्याच्या पूर्वी वैदर्भ कवि त्रिविक्रमभट्ट याची 'नलचम्पू' किंवा 'दमयन्तीकथा' (दहाव्या शतकाच्या प्रथमपादातील) आणि दिगम्बर जैन सम्प्रदायाची 'यशस्तिलकचम्पू' (सन ९५३) ही दोन चम्पूकाव्ये अद्यापि उपलब्ध आहेत. पण त्यांचा निर्देश सोड्ढलाच्या कथेत येत नाही. तो स्वत: चन्दनाचार्याची 'अशोकवती' आणि इन्द्र कवीची 'रत्नमन्जरी' या दोन चम्पूकाव्यांचा निर्देश करतो. पण तीं दोन्हीं कालाच्या ओघात नष्ट झाली आहेत. पुढे 'रामायणचम्पू', 'भारतचम्पू', 'भागवतचम्पू' इत्यादि अनेक चम्पूकाव्ये निर्माण झाली. पण सोड्ढलाच्या 'उदयसुन्दरीकथे'तल्या सारखे गुंतागुतीचे कथानक त्यांत आढळत नाही. श्लेषादिकांच्या प्राचुर्याने त्यांची शैली जास्त क्लिष्ट होत गेली. आरंभीच्या चम्पूकाव्याचे उदाहरण म्हणून सोड्ढलाच्या 'उदयसुन्दरीकथे'स संस्कृत साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे.

---

१ *C. I. I.*, Vol. IV, Introd., p. cl xxiii.

सोड्ढलाने उल्लेखिलेले स्वकालीन बहुतेक कवि लाट देशातील होते. ते बहुधा चालुक्यांच्या दरबारचे असावे. पण कांहींचा निर्देश शिलाहारांनी संमानिलेले म्हणून आला आहे. त्यांपैकी एक विजयसिंहाचार्य हा 'शीघ्रकवि' होता. त्याने 'खड्गकाव्य' रचले होते. ते बहुधा चित्रकाव्य प्रकाराचे असावे. त्याच्या श्लोकांतील अक्षरांनी खड्गाकृति निर्माण होत असल्यामुळे त्याला ते नाव प्राप्त झालेले दिसते.[१] तो नागार्जुनाच्या दरबारी होता. त्याला त्या रचनेचे कौतुक वाटल्यामुळे त्याने त्या कवीला 'खड्गाचार्य' ही पदवी दिली होती. दुसरा कवि मधुरसाहार हा मुम्मुणिराजाचा बालमित्र होता.[२] तो तीन भाषांचा – बहुधा संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश यांचा – अध्यापक असून काव्यरचनेप्रमाणे शौर्याबद्दलहि विख्यात होता.[३] मुम्मुणीने त्याला सोड्ढलाला लाट देशातून आपल्या सभेत येण्याविषयी आमंत्रण देण्याला पाठविले होते. उत्तर कोकणाच्या काही लेखात जोगपैय लेखकाचा चुलता नागलैय याचा 'महाकवि' म्हणून उल्लेख आला आहे.[४] पण त्याची काव्यकृति उपलब्ध नाही. दक्षिण कोकणच्या कवींविषयी कांहीच माहिती नाही.

शिलाहारांच्या अनेक दानपत्रांचे निर्माते उत्कृष्ट कवि होते, हे त्यांतील राजप्रशस्तीवरून स्पष्ट दिसते; पण त्यांची नावे अज्ञात आहेत. त्यांच्या प्रतिभेची उदाहरणे म्हणून खालील वर्णने पाहा – अपराजिताच्या जंजिरा ताम्रपटातील[५] राष्ट्रकूट नृपति पहिला अमोघवर्ष याची श्लेषांच्या योगाने कल्याणकारी मेघाशी तुलना, खारेपाटण ताम्रपटातील[६] अनन्तदेवाच्या कारकीर्दीच्या आरंभी यवन-सैनिकांनी उत्तर कोकणात घातलेल्या धुमाकुळाचे यथातथ्य वर्णन, आणि वडवली ताम्रपटातील[७] एकटचा प्रथम अपरादित्याने बेडर वृत्तीने रणांगणात घुसून केलेल्या शत्रूसंहाराचे शब्दचित्र पाहा. कांही ठिकाणी श्लोकातील वर्णनात विनोदाची झाक आढळते. उदाहरणार्थ, वप्पुवन्नाने रणांगणांत शत्रूंच्या हत्तींचे एक एक दात

---

१ या सारखे 'शिशुपालवधा'तील बंध पाहा – सर्ग १९, श्लो. १६, २९, ४४ इत्यादि.

२ त्याने मुम्मुणीच्या शौर्याचे वर्णन करून त्याच्या शत्रूंना गर्भगळीत केले होते असे म्हटले आहे.

३ उदयसुन्दरीकथा, पृ. १५५. दुसरा एक महाकीर्ति नामक कवीहि तीन भाषांत प्रवीण होता, असे म्हटले आहे.

४ क्र. ८, शेवटची ओळ; क्र. ९, ओ. ५८–५९, क्र. १०, ओ. ४७; क्र. ११, ओ. ७३; क्र. १४, ओ. १८५ पाहा.

५ क्र. ५, ओ. ९–११; क्र. ६, ओ. ९–११.

६ क्र. १९, ओ. ५२–५५.

७ क्र. २०, ओ. ३२–३५

कापून त्या सर्वांना विनायक (एकदन्त गजानन) बनविल्याचे वर्णन पाहा.[1] पहिला अपरादित्य हा स्वतः विद्वान् असून कवींचा उदार आश्रयदाता होता. त्याच्या दरबारी उत्कृष्ट कवि होते, हे त्याचा पुत्र विक्रमादित्य याच्या पन्हाळे ताम्रपटातील श्लोकांवरून स्पष्ट दिसते.[2] नंतरच्या शिलाहारांच्या काळात ही परिस्थिति पालटली. त्यांचे सर्व लेख शिलांवर कोरले असून ते संस्कृत – मराठी मिश्र भाषेत लिहिले आहेत. त्यांत काव्यगुणांचा अभाव आहे, हे सांगणे नकोच. त्या काळी मराठीची जडण घडण होत होती.[3]

दक्षिण कोकण व कोल्हापूर येथील शिलाहारांचे बहुतेक लेख साध्या अकृत्रिम भाषेत लिहिलेले असून त्यांत अलंकारादिकांचा अभाव आहे. त्यांतील काही कन्नड भाषेत आहेत.[4] त्यांवरून ती भाषा मराठीच्या मानाने पुष्कळच उन्नतावस्थेस पोचली होती, असे दिसते.

२. अपरार्कटीका

दुसऱ्या एका ग्रंथाने शिलाहार राजवटीला संस्कृत साहित्याच्या इतिहासात नाव मिळवून दिले आहे तो ग्रंथ म्हणजे 'याज्ञवल्क्यस्मृती 'वरची अपरार्क किंवा अपरादित्य याची 'अपरार्कटीका ' होय. या टीकेच्या प्रास्ताविक श्लोकात ग्रंथकर्त्याविषयी पुढील श्लोक आला आहे[5]–

भक्त्या यस्य सविस्मयः स्मररिपुर्बुद्ध्या च वाचस्पति-
र्विक्रान्त्या द्विषतां गणः शुचितया भास्वान्क्षमित्वेन भूः ।
जीमूतान्वयभूषणं स विपुलां योगीश्वरेणोदिते
शास्त्रे वाक्यनयानुगां वितनुते व्याख्यां सतां संमताम् ।।

या श्लोकात टीकाकाराचे नाव दिले नसले तरी तो जीमूताच्या (म्हणजे जीमूतवाहनाच्या) वंशाचे भूषण आहे, त्याने भगवान् शंकराला आपल्या भक्तीने, बृहस्पतीला बुद्धिसामर्थ्याने, शत्रूंच्या समूहाला शौर्याने, सूर्याला चारित्र्याने, आणि पृथ्वीला क्षमाशीलत्वाने आश्चर्यचकित केले आहे, असे त्याचे वर्णन केले आहे. टीकेच्या शेवटी त्याचे पुढील वर्णन दिले आहे[6]–

---

१ क्र. १४, ओ. ९–११; गणपति हा एकदन्त आहे.

२ क्र. २२, ओ. ३३–३७.

३ मराठीतील पहिला कोरीव लेख शक संवत् ९८२ (इ. स. १०६०) च्या दिवेआगर ताम्रपटावरील आहे.

४ उदाहरणार्थ, क्र. ४९ व ५२.

५ अपरार्क, व्हॉ. १, पृ. १

६ पूर्वोक्त, व्हॉ. २, पृ. १२५२

राष्ट्रं यस्य निरंकुशा वसुमतिः कोशः समृद्धः सुहृ-
च्छक्तो दुर्गमनागमं क्षतपरा सेना हिता मन्त्रिणः ।
शास्त्रार्थामृतचर्वणार्पितमतिर्विश्वैकनाथोऽप्यसौ
शौर्यौदार्ययशोधनोऽयमपरादित्यो निबन्धं व्यधात् ॥

या श्लोकात सांगितले आहे की जो निरंकुशपणे सर्व पृथ्वीवर राज्य करीत आहे, ज्याचा कोश सुसमृद्ध आणि मित्र बलवान् आहेत, ज्याचे किल्ले अभेद्य आणि सेना शत्रूचा निःपात करण्यास समर्थ आहे, ज्याचे मंत्री स्वामिनिष्ठ आहेत आणि संपूर्ण पृथ्वीचा अधीश्वर असूनहि ज्याला शास्त्रार्थरूपी अमृताची रुचि घेण्याची आवड आहे तो शौर्य, औदार्य आणि कीर्ति यांनाच आपले धन मानणारा अपरादित्य हा निबन्ध रचता झाला.

या दोन श्लोकांवरून प्रस्तुत टीकेचा कर्ता अपरार्क किंवा अपरादित्य हा विद्याधरवंशी जीमूतवाहनाच्या कुलात जन्मला होता, हे स्पष्ट दिसते. अपरादित्य नावाचे दोन राजे उत्तर कोकणच्या विद्याधरवंशी शिलाहारकुलात होऊन गेले. त्यातील पहिला सु. सन १११०–११३९ या कालात आणि दुसरा सन ११७०–११९५ या कालात झाला होता. यांपैकी दुसऱ्या अपरादित्याविषयी आपणांस फारशी माहिती नाही. गुजराथचा चौलुक्य राजा कुमारपाल याच्या सैन्याशी झालेल्या युद्धात मारला गेलेला शिलाहार मल्लिकार्जुन याच्यानंतर तो द्वितीय अपरार्क गादीवर आला होता, त्याने चौलुक्यांना आपल्या राज्यातून पिटाळून लावून 'महाराजाधिराज' आणि 'कोंकणचक्रवर्ती'[१] या सम्राटपदनिदर्शक पदव्या धारण केल्या होत्या, एवढीच माहिती त्यांच्या विषयी मिळते. तो इतिहासात विशेष प्रसिद्ध नाही. याच्या उलट त्याचा पूर्वज पहिला अपरादित्य हा त्याच्यापेक्षा जास्त प्रसिद्ध आहे. त्याला सुद्धा शत्रूशी झगडून आपले राज्य परत मिळवावे लागले. त्याचा पिता अनंतपाल याच्या निधनानंतर गोव्याच्या कदंबांनी उत्तर कोकणावर आपला अंमल बसवला होता. अपरादित्यावर त्या वेळी फार कठीण प्रसंग आला होता. तथापि संकटांनी न डगमगता तो एकटा रणात घुसला आणि आपल्या बाहुबलाने शत्रूची दाणादाण करून त्याने आपले राज्य परत मिळविले. त्याने आढ्यतापूर्ण पदव्या धारण केल्या नव्हत्या, तरी त्याने आपले राज्य दक्षिण कोकणाच्या काही प्रदेशावर पसरविले होते. त्याची 'पश्चिमसमुद्राधिपति'[२] ही पदवी त्याच्या वडवली ताम्रपटात उल्लेखिली आहे. तत्कालीन दुसऱ्या एका लेखात म्हटले आहे की त्याच्या जवळ श्री (लक्ष्मी), सरस्वती आणि कीर्ति या तिघांचाहि निवास होता.[३] हे वर्णन 'अपरार्कटीके'तील पूर्वोक्त वर्णनाशी जुळणारे आहे.

१ क्र. ३२, ओ. २–३. २ क्र. २३, ओ. ४०–४१.
३ पूर्वोक्त, ओ. ३७.

काश्मीरी कवि मंख याच्या 'श्रीकण्ठचरिता'त म्हटले आहे की कोकणदेशाचा राजा अपरादित्य याचा वकील तेजकंठ हा काश्मीरनृपति जयसिंह (सु. सन ११२८–११५०) याच्या दरबारी होता.[१] तेव्हा हा अपरादित्य प्रथम अपरादित्यच होय, कारण तोच जयसिंहाचा समकालीन होता. डॉ काणे यांनी दाखविले आहे की सन १२४० च्या सुमारास रचलेल्या 'स्मृतिचन्द्रिके'त 'अपरार्कटीके'चे एका बाबतीत खंडन केले आहे.[२] तेव्हा ती टीका बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेल्या दुसऱ्या अपरार्काची असणे शक्य नाही. कारण तसे मानले तर त्या टीकेच्या निर्मितीनंतर दूरवर तिच्या प्रसाराला अवश्य असलेला अवधि राहत नाही. म्हणून प्रथम अपरार्क हाच या 'अपरार्कटीके'चा कर्ता होय आणि त्या टीकेचा काल बाराव्या शतकाचा पूर्वार्ध हा आहे.

अपरार्काच्या कृतीला पूर्वोक्त प्रास्ताविक श्लोकात टीका म्हटले असले[3] तरी वस्तुतः ती टीका नाही. कारश तिचा उद्देश मूळ ग्रंथाचे स्पष्टीकरण करणे एवढाच नाही. तो एक निबंध आहे आणि तसे त्याला अखेरच्या श्लोकात म्हटलेहि आहे.[४] त्यामध्ये पूर्वकालीन धर्मशास्त्रकारांनी तत्तद्विषयांवर जे जे म्हटले होते त्यांचे एकत्रीकरण करून त्यांचा समन्वय केला आहे. 'अपरार्कटीके'त उल्लेखिलेल्या श्रुति (वेदवाक्ये), गृह्य व धर्मसूत्रे आणि स्मृति यांची संख्या १६८ आहे. तसेच तीत २१ पुराणांतील उतारे दिले आहेत. स्मृतिकारांपैकी कांहीना लघु (उदाहरणार्थ लघुयम आणि लघुविष्णु) आणि इतर कांहींना वृद्ध (उदाहरणार्थ, वृद्ध गार्ग्य, वृद्ध गौतम, वृद्ध पराशर इत्यादि) म्हटले आहे. 'अपरार्कटीके'चा काल निश्चित असल्यामुळे या उताऱ्यांवरून अनेक स्मृति आणि पुराणे यांच्या कालाची उत्तर मर्यादा निश्चित करता येते.

मागे म्हटल्याप्रमाणे अपरार्क 'याज्ञवल्क्यस्मृती'चा केवळ अर्थ देऊनच थांबत नाही; तर तो त्या त्या विषयाविषयी आपल्या पूर्वीच्या धर्मशास्त्रकारांनी काय म्हटले आहे ते देतो आणि त्या सर्व वचनांचा समन्वय करतो. अपरादित्याच्या कालापर्यंत धर्मशास्त्रप्रश्नांवर विशाल वाङमय निर्माण झाले होते आणि त्यात परस्परविरोधी मते मांडली होती. त्या सर्वांची सप्रमाण चर्चा करून सनातनधर्मीयांना उचित मार्गदर्शन करणे अवश्य होते. अपरार्काने विरोधी वचनांचा समन्वय विविध प्रकारे केला आहे. काही ठिकाणी त्याने विरोधी वचने पूर्वीच्या

---

१ श्रीकण्ठचरित, सर्ग २५, श्लो. १०९–११०.

२ Kane, *History of Dharmasāstra*, p. 334.

३ पाहा – जीमूतान्वयभूषणं स विपुलां योगीश्वरेणोदिते
शास्त्रे वाक्यनयानुगां वितनुते व्याख्यां सतां संमताम् ।।

४ पाहा – शौर्यौदार्ययशोधनोऽमुमपरादित्यो निबन्धं व्यधात् ।

कालाला उद्देशून होती, ती कलियुगात प्रमाण मानता येत नाहीत, असे म्हटले आहे; इतर काही भिन्न परिस्थितीतच योग्य होत, असे दाखविले आहे; तर इतर कांही ठिकाणी विरोधी मते जवळ जवळ देऊन त्यांतील आचरणार्थ योग्य ते निवडण्याचे स्वातंत्र्य जनतेला दिले आहे. उदाहरणार्थ, 'याज्ञवल्क्यस्मृती'त (१,१६८) ब्राह्मणांना कांही विशिष्ट शूद्रजातींपासून अन्नग्रहण करण्याची अनुज्ञा दिली आहे. अपरार्काच्या काली जातिसंस्था कट्टर झाली होती. म्हणून त्याने अनेक परस्परविरोधी वचने धर्मशास्त्रांतून उद्धृत करून शेवटी आपले मत दिले आहे की याज्ञवल्क्याने दिलेली शूद्रान्नग्रहणाची अनुज्ञा आपत्कालाला अनुलक्षून – जेव्हा दुसरे कोणतेहि अन्न उपलब्ध नसेल त्या प्रसंगाकरिता – दिली आहे.[१] याज्ञवल्क्याने निपुत्रिक मृत गृहस्थाच्या विधवेला वारसा हक्क दिला आहे. पूर्वीच्या मन्वादि स्मृतिकारांना स्त्रियांचा वारसा हक्क संमत नव्हता. अपरार्काने दोन्ही मतांची समर्थक वचने देऊन शेवटी निर्णय दिला आहे की पूर्वीच्या स्मृतिकारांचे मत दुराचरणी विधवेविषयी होते.[२]

अपरार्काच्या कालापर्यंत हिंदू समाजात धार्मिक व सामाजिक बाबतीत अनेक परिवर्तने झाली होती. अपरार्क याज्ञवल्क्याच्या वचनांचा प्रथम सरळ अर्थ देतो आणि मागाहून नंतरच्या धर्मशास्त्रकारांची वचने उद्धृत करून आपले मत सांगतो. अपरार्काच्या काळी महाराष्ट्र आणि कोकण येथील ब्राह्मणांनी मांसाशन वर्ज्य केले होते.[३] अपरार्क 'याज्ञवल्क्यस्मृती'तील श्राद्धप्रसंगी ब्राह्मणांना वाढावयाच्या विविध मांसविषयक वचनांचा अर्थ प्रथम देतो आणि नंतर 'ब्रह्मपुराण' आणि 'पुलस्त्यस्मृति' यांतील श्राद्धप्रसंगीची शाकाहारविषयक वचने उद्धृत करून स्वकालोचित मत प्रतिपादन करतो. तसेच 'मार्कण्डेयपुराणा'तील वचन देऊन मधुपर्कप्रसंगी गोमांसाऐवजी हिरण्ययुक्त पात्राचे दान करणे इष्ट आहे, असे सांगतो.[४]

---

१ पाहा – एवं सति यः शूद्रान्नभोजनानुग्रहः स आपद्विषय एव ज्ञेयः ।

२ पाहा – कथं तर्हि विरोधपरिहारः । उच्यते – 'अपुत्रा शयनं भर्तुः' इत्यादिमनुवाक्योक्तगुणा पत्नी पितृभ्रातृसद्भावेऽपि स्वयमेव पतिधनं समग्रं गृह्णाति पत्युश्च श्राद्धादि करोति ।

३ पाहा – मुन्यन्नं ब्राह्मणस्योक्तं मांसं क्षत्रियवैश्वयोः । मधुप्रदानं शूद्रस्य सर्वेषां चाविरोधि यत् ॥ हे अपरार्काने उद्धृत केलेले पुलस्त्याचे वचन आहे. व्हॉ. १, पृ. ५५५,

४ पाहा – तस्मादभिचारो मधुपर्कादौ गोवधो विधवानियोगः शूद्राविवाहोऽस्वर्ग्यत्वाल्लोकविद्विष्टत्वाद्विहिता अपि न कार्याः, विशेषेण कलियुगे । ... यन्मार्कण्डेयः माधुपार्किकपश्वर्थे तत्र मात्रां निवेदयेत् सहिरण्यं बीजपात्रं द्रविणेन सहैव तु ।

'याज्ञवल्क्यस्मृती 'त 'सती' चा उल्लेख नाही. अपरार्काने या प्रश्नाची चर्चा कांहीशी विस्ताराने केली आहे. त्याने विराट आणि अंगिरस् यांची 'सती'च्या चालीविरुद्ध वचने उद्धृत केली आहेत. पण शेवटी ब्राह्मण विधवेने, शोकाने नव्हे पण धार्मिक बुद्धीने, मृत पतीबरोबर सहगमन करावे, असे आपले मत दिले आहे.[१]

अपरार्क शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्ताचा अनुयायी होता. त्याने आपल्या टीकेच्या आरंभी जगताच्या सृष्टिस्थितिसंहाराचे कारण आणि सच्चिदानन्दस्वरूपी आत्म्याहून अभिन्न अशा ब्रह्माला वंदन केले आहे. एका ठिकाणी त्याने 'ब्रह्मसूत्रा'-वरील श्रीशंकराचार्यांच्या शारीरक भाष्याचा उल्लेख केला आहे. मूळ 'याज्ञवल्क्य'-स्मृतीतहि शांकरवेदान्तातील घटाकाश,सुवर्णालङ्कार,कोळयाने स्वतःच्या लाळेने जाळे विणणे[२] इत्यादि दृष्टांत आले आहेत. अपरार्काने त्यांचे यथार्थ स्पष्टीकरण केले आहे.

'याज्ञवल्क्यस्मृति', १, ७ वरील टीकेत अपरार्काने सांख्य, योग, शैव, पाशुपत इत्यादि दर्शनांच्या तत्त्वांचे स्पष्टीकरण केले आहे. तो स्वतः शिवोपासक होता. त्याने आपल्या वडवली ताम्रपटाच्या आरंभी भगवान् शिवाची स्तुति केली आहे. पण तो आपल्या 'अपरार्कटीके'त वैदिक धर्माचा पुरस्कार करतो, सांप्रदायिक शैव मताचा नव्हे. त्याने 'वराहपुराणा'तले उतारे देऊन प्रतिपादिले आहे की भगवान् शिवाने शैव, पाशुपत इत्यादि पंथांचे आगम ग्रंथ वेदमार्गभ्रष्ट लोकांना कुमार्गाकडे वळविण्याकरिता प्रकाशित केले होते.[३] पांचरात्र मताविषयी त्याने म्हटले आहे की ते तत्त्वज्ञान योग्य प्रायश्चित्ताच्या अभावी वैदिक धर्मापासून च्युत झालेल्या व्रात्य लोकाकरिता आहे.[४] शैव आगमातील सुरापान, चण्डिकेपुढे बलिदान, सिद्धिप्राप्तीकरिता तान्त्रिक अनुष्ठान यांचा अपरार्काने कडक निषेध केला आहे.[५]

---

१ पाहा – अपरार्क, व्हॉ. १, पृ. ११२ – तस्माद्विधितः प्रवर्तमानाया ब्राह्मण्या अनुगमनाद्दोषो न विद्यते । शोकादिप्रवृत्तायास्तु भवत्येव ।

२ याज्ञ०, ३, १४३–१४६.

३ पाहा – ये वेदमार्गनिर्मुक्तास्तेषां मोक्षार्थमेव च । सिद्धान्तसंज्ञकं पूर्वं मया शास्त्रं प्रदर्शितम् । . . . इत्यादिनाऽगस्त्यं प्रति रुद्रवचनेन वराहपुराणे तस्य विमोहकत्वेन विप्रलम्भकत्वमेव प्रतिपादितम् । अपरार्क, व्हॉ. १, पृ. १२.

४ पाहा – ब्राह्मणक्षत्रियविशां पाञ्चरात्रं विधीयते । शूद्रादीनां न तच्छास्त्रपदवी-मुपयास्यति । . . अस्य वाक्यस्य कुतश्चिद्दैवयोगात्प्रायश्चित्तव्रात्यविषयत्वाद-विप्लुतब्राह्मणाद्यनाश्रेयत्वम् । पूर्वोक्त, व्हॉ. १, पृ. १०.

५ पाहा – नराश्वमेधौ मद्यं च कलौ वर्ज्यौ द्विजातिभिः । इत्यादिना मद्यादेव ब्रह्मपुराणादौ सामान्यतो वर्ज्यत्वेनाभिहितत्वात् । एतेन चण्डिकाद्युपहारा व्याख्याताः ।

त्याने म्हटले आहे की जरूर तर शैव आगमांचे अध्ययन करावे, पण त्यांतील जे आचार वैदिक धर्माला विरोधी नसतील तेवढ्यांचेच आचरण करावे.

'याज्ञवल्क्यस्मृती'तील ३, २०५ या श्लोकाचे व्याख्यान करताना अपरार्काने मोक्षप्राप्तीचे साधन म्हणून ज्ञान आणि कर्म यांच्या उपयुक्ततेच्या वादग्रस्त प्रश्नाची चर्चा केली आहे. जर एखाद्या गृहस्थाने सर्व नित्य विधींचे आचरण करून, योग्य त्या उपायांनी धनार्जन करून आणि आपल्या आश्रमाचे सर्व नियम पाळून धार्मिक रीतीने आपले जीवन व्यतीत केले असेल तर त्याला मोक्षप्राप्ति होते काय ? अपरार्काने या प्रश्नावर परस्परविरुद्ध मते त्यांच्या उपोद्बलक प्रमाणांसह सविस्तर मांडली आहेत. चर्चेचा समारोप करताना त्याने मनु, वशिष्ठ आणि याज्ञवल्क्य यांची मते उद्धृत करून ज्ञानकर्मसमुच्चयवादाचे समर्थन केले आहे; त्यावरून त्याकडे त्याचा कल दिसतो. तथापि त्यांतील कोणत्याहि एका मताचा आग्रही पुरस्कार न करता या मतांपैकी जे न्याय्य वाटेल त्याचा स्वीकार करावा, असे शेवटी त्याने म्हटले आहे.[१]

'अपरार्कटीके'च्या कालातच याज्ञवल्क्य स्मृतीवर दुसरी सुप्रसिद्ध 'मिताक्षरा-टीका' लिहिली गेली.[२] तिच्याशी तिची तुलना करणे बोधप्रद होईल. 'मिताक्षरे'पेक्षा 'अपरार्कटीका' पुष्कळच विस्तृत आहे. अपरार्कानेहि स्वत: तिचे 'विस्तृत' असे वर्णन केले आहे. पण गुणांच्या दृष्टीने ती कमी प्रतीची वाटते. तिच्यामध्ये स्मृति आणि पुराणे यांतून विस्तृत उतारे उद्धृत केले असले तरी 'मिताक्षरे'तल्याप्रमाणे पूर्वमीमांसेच्या न्यायांनुसार त्यांचे परीक्षण केलेले आढळत नाही. डॉ. काणे यांनी म्हटल्याप्रमाणे सुबोध प्रतिपादन, वादविवादातील चातुर्य आणि प्रमाणांची सूक्ष्मता या गुणांत 'अपरार्कटीका' 'मिताक्षरे'पेक्षा न्यून वाटते.[३]

'अपरार्कटीका' काश्मीरात प्रमाण मानली जाते. अपरादित्याचा काश्मीरच्या राजसभेतील वकील तेजकंठ याने तिचा तेथे प्रचार केला असावा. या बाबतीत लक्षणीय गोष्ट ही की 'अपरार्कटीके'त राजानक शितिकण्ठ याच्या ग्रंथातून देवतांच्या मूर्तींविषयी एक प्रदीर्घ उतारा प्रक्षिप्त केलेला आढळतो.[४] त्याच्या नावावरून तो काश्मीरी ग्रंथकार दिसतो.

---

१ पाहा – तदनयोर्मतयोर्यन्न्याय्यं तद्ग्राह्यम् । अपरार्क, व्हॉ. २, पृ. १०३४.

२ डॉ. काणे यांनी दाखविले आहे की अपरार्काला 'मिताक्षरा' माहीत होती. *H. D.*, Vol. I (first ed.), p 571.

३ पूर्वोक्त, पृ. ३३०

४ अपरार्क, व्हॉ. १, पृ. ५७१.

जरी ही टीका शिलाहार नृपति प्रथम अपरादित्य याच्या नावाने प्रचलित आहे आणि तीत आणि तत्कालीन इतर लेखांत त्या राजाची विद्वत्तेबद्दल प्रशंसा केली आहे तरी ती त्याची स्वत:ची नसून त्याच्या दरबारच्या पंडितांनी रचली होती, यात संशय नाही. तिच्यावरून त्या काळी प्रचलित असलेल्या विशाल धर्मशास्त्र-विषयक ग्रंथसंभाराची चांगली कल्पना करता येते.

३. सोमदेवकृत 'शब्दार्णवचन्द्रिका'

शिलाहार कालातील आणखी एक ग्रंथ जैनेन्द्र व्याकरणाच्या गुणनन्दीकृत 'शब्दार्णव' ग्रंथावरील 'शब्दार्णवचन्द्रिका' ही टीका होय. तिचा कर्ता सोमदेव मुनि तिच्या अखेरीस सांगतो की आपण ती टीका श्रीकोल्लापुरदेशातील आजुरिका महास्थानामध्ये महामण्डलेश्वर गण्डरादित्याने बांधलेल्या 'त्रिभुवन-तिलक' नामक जिनालयात (वसतीत) पूर्ण केली. आजुरिका हे सध्या कोल्हापूर जिल्ह्याच्या आजरे महालाचे मुख्य ठिकाण आजरे होय. सोमदेव आणखी सांगतो की आपण ती टीका राजाधिराज, परमेश्वर, परमभट्टारक, पश्चिमचक्रवर्ती वीर-भोजदेव याच्या कारकीर्दीत शक संवत् ११२७ (सन १२०५) मध्ये क्रोधन संवत्सरी लिहिली.[१] हा वीरभोज कोल्हापूरच्या शिलाहार शाखेतील द्वितीय भोज होय. शक संवत् ११२७ ला दक्षिण भारतीय परंपरेप्रमाणे क्रोधन संवत्सर येते. तेव्हा हा कालनिर्देश बरोबर आहे. सोमदेव आपल्या टीकेत पूज्यपादाच्या (महावीर तीर्थंकराच्या) पादांचे चिन्तन करणारा मुनीश्वर असा आपला निर्देश करतो आणि आपण वादिरूपी हत्तींना अंकुशाप्रमाणे भासणाऱ्या विख्यात पंडित विशालकीर्तींचा शिष्य आहो, असे सांगतो. त्याने ही टीका मूलसंघाच्या माघ-चन्द्राचा शिष्य नागचन्द्र याच्या हरिचन्द्र नामक शिष्याकरिता रचली होती.

---

१ पाहा – स्वस्ति श्रीकोल्लापुरदेशान्तर्वर्त्याजुरिकामहास्थानयुधिष्ठिरावतार-महामण्डलेश्वरगण्डरादित्यदेवनिर्मापितत्रिभुवनतिलकजिनालये श्रीमत्पर-मपरमेष्ठिश्रीनेमिनाथपादपद्माराधनबलेन वादीभवज्रांकुशश्रीविशाल-कीर्तिपंडितदेववृत्तितः श्रीमच्छिलाहारकुलकमलमार्तण्डतेज:पुंजराजाधिराज-परमेश्वरपरमभट्टारकपश्चिमचक्रवर्तिश्रीवीरभोजदेवविजयराज्ये शकवर्षैक-सहस्रैकशतसप्तविंशति ११२७ तमक्रोधनसंवत्सरे स्वस्ति समस्तानवद्यविद्या-चक्रवर्तिश्रीपूज्यपादानुरक्तचेतसा श्रीसोमदेवमुनीश्वरेण विरचितेयं शब्दार्णव-चन्द्रिका नाम वृत्तिरिति ।

जैनेन्द्रव्याकरणाच्या दोन संहिता आहेत. त्यांपैकी लहान संहितेत सुमारे ३००० सूत्रे आणि मोठीत ३७०७ सूत्रे आहेत.[१] लहान संहिता देवनन्दी अथवा पूज्यपाद याने रचली होती. तिचा काल निश्चित नाही. डॉ. का. बा. पाठक यांनी लक्ष्मेश्वर येथील लेखाच्या प्रमाणावरून हा देवनन्दी रक्तपुर किंवा अलक्तकपुर येथील रहिवासी असून तो शक संवत् ६५१ (सन ७२९-३०) मध्ये होऊन गेला असे प्रथम प्रतिपादिले होते,[२] पण पुढे त्यांनी आपले मत बदलून तो पांचव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला असावा, असे म्हटले आहे.[३] पण या दोन्ही मतांच्या सिद्धयर्थ त्यांनी मांडलेली प्रमाणे निर्णायक वाटत नाहीत.[४] जैन परंपरेनुसार हा पूज्यपाद गंग नृपति दुर्विनीत (सु. ५४०-६००) याचा गुरु होता. तेव्हा तो सहाव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला असावा.[५]

देवनन्दीच्या जैनेन्द्रव्याकरणसंहितेचे पांच अध्याय आहेत. म्हणून तिला पंचाध्यायी म्हणतात. कीलहॉर्नने म्हटले आहे की ती पाणिनीच्या अष्टाध्यायीची केवळ नक्कल आहे.[६] तीत वैदिक भाषेसंबंधी पाणिनीची सूत्रे गाळली आहेत. तसेच उदात्त, अनुदात्त आणि स्वरित या संज्ञांखेरीज स्वरविषयक सूत्रेहि घेतली नाहीत. शिवाय देवनन्दीच्या पंचाध्यायीत प्रत्याहारसूत्रेहि दिली नाहीत, पण प्रत्याहारांचा निर्देश मात्र केला आहे. तसेच तीत एकशेषवृत्तिविषयक सूत्रे घेतली नाहीत. म्हणून त्यातल्या जैनेन्द्रव्याकरणाला 'अनेकशेष-व्याकरण' असे नाव पडले आहे.[७]

---

१ कीलहॉर्नने सूत्रसंख्या ३७१२ दिली आहे पण भारतीय जैन सिद्धान्तप्रकाशिनी संस्थेने प्रकाशित केलेल्या 'शब्दार्णवचन्द्रिकेच्या' आवृत्तीत ती प्रत्याहारसूत्रे धरून ३७०९ आहे. देवनन्दीच्या मूळ व्याकरणात सूत्रसंख्या ३०६७ होती.

२ *Ind. Ant.*, Vol. XII, p. 20. हे मत लक्ष्मेश्वरच्या लेखावर (*Ibid.*, Vol. VII, p. 112) आधारित आहे. पण त्यात पूज्यपादाचा 'जैनेन्द्रव्याकरणाचा कर्ता' म्हणून उल्लेख नाही.

३ या मताचीहि प्रमाणे संदिग्ध आहेत.

४ काशिकेतील या व्याकरणाचा उल्लेख निःसंदिग्ध नाही.

५ पण हेहि लक्षात घेतले पाहिजे की त्या लेखांत दुर्विनीताला 'शब्दावताराचा कर्ता' म्हटले आहे. शब्दावताराने जैनेन्द्रव्याकरण विवक्षित आहे किंवा नाही हे निश्चितपणे सांगता येत नाही. *Gazetteer of Mysore and Kurg*, p. 373.

६ *Ind. Ant.*, Vol. X, p. 76.

७ पाहा महावृत्ति – स्वाभाविकत्वादभिधानस्यैकशेषानारम्भः ।

पाणिनीने जशा घ, घि, घु यासारख्या संज्ञांचा उपयोग केला आहे[१] तसा देवनन्दीने प्र (ह्रस्व), दी (दीर्घ), एप् (गुण), ऐप् (वृद्धि), मृद् (प्रातिपदिक) अशा विविध अर्थांच्या नवीन संज्ञा बनवून त्यांचा उपयोग केला आहे. त्यामुळे त्याचे व्याकरण क्लिष्ट झाले आहे. त्याने पाणिनीच्या फ, ढ, ख इत्यादि संज्ञाहि घेतल्या आहेत.[२]

देवनन्दीच्या व्याकरणावर अभयनन्दीची 'महावृत्ति' नामक टीका आहे. त्याने देवनन्दीच्या व्याकरणांतील त्रुटि भरून काढण्याकरिता अनेक वार्त्तिके रचली आहेत.

जैनेन्द्रव्याकरणाची बृहत्संहिता 'शब्दार्णव' नावाने प्रसिद्ध आहे. तिचा कर्ता गुणनन्दी श्रवणबेळ्गोळ येथील अनेक कोरीव लेखात उल्लेखिलेल्या गृध्रकपिच्छाचा प्रशिष्य आणि बालकपिच्छाचा तन्नामक शिष्य होय. तो न्याय, व्याकरण आणि साहित्य शास्त्रांत पारंगत होता.[३] तो विक्रमसंवत् ९५७ (सन ९००) मध्ये विद्यमान होता.

आपल्या संहितेत गुणनन्दीने देवनन्दीच्या संहितेवरच्या वार्त्तिकांचा अन्तर्भाव केला आहे. तसेच त्याने प्रत्याहारसूत्रे आणि एकशेषवृत्ति – विषयक सूत्रेहि घेतली आहेत. म्हणून त्याच्या सूत्रपाठात ७०० हून अधिक सूत्रे आली आहेत. त्याने स्नि (सर्वनाम),[४] स्थि (संख्या)[५] यांसारख्या कांही नवीन संज्ञा बनवून आपल्या संहितेत घातल्या आहेत आणि देवनन्दीची सूत्रे जास्तच लहान करण्याचा प्रयत्न केला आहे.[६] याप्रमाणे गुणनन्दीने जैनेन्द्रव्याकरणात अनेक बदल केले आहेत तरी ते देवनन्दिकृत व्याकरण म्हणूनच प्रसिद्ध आहे.[७]

सोमदेव मुनीची 'शब्दार्णवचन्द्रिका' टीका गुणनन्दीच्या या मोठ्या जैनेन्द्र-व्याकरणावर आहे. तिला लघुवृत्ति (लहान टीका) असे म्हणतात. तीत सूत्रांचा

---

१ *Ind. Ant.*, Vol. X, p. 77.

२ पाहा – आयनेयीनीयियः फढखछघां त्यादीनाम् । V. 1, 2.

३ पाहा – हीरालाल जैन – 'भारतीय संस्कृति में जैनधर्म का योगदान'; तसेच नाथूराम प्रेमीकृत *Introduction to the Jainendra Mahāvritti*, p. 126.

४ शब्दार्णवचन्द्रिका, १.१.४०.   ५ पूर्वोक्त, १.१.२२.

६ देवनन्दीचे सूत्र 'निरेकाजनाङ ।' आणि गुणनन्दीचे 'न्यजनाङ ।' (१, १, २३) पाहा.

७ सोमदेवाच्या वृत्तीतील १. ४. १०७ सूत्रावरील 'एकमुनि जिनेन्द्रम् ।' हे उदाहरण, आणि १. ४. ११५ सूत्रावरील 'देवोपज्ञमनेकशेषं व्याकरणम्' हे उदाहरण पाहा.

संक्षेपाने अर्थ दिला असून महावृत्तीतल्या प्रमाणे विवाद्य प्रश्नांची चर्चा टाळली आहे. अभयनन्दीने जशी काही ठिकाणी सूत्रांची नवीन उदाहरणे दिली आहेत तसेच सोमदेवानेहि केले आहे. ती उदाहरणे ऐतिहासिक आणि सामाजिक दृष्टचा उपयुक्त वाटतात.[१] याखेरीज त्याच्या टीकेत विशेष असे कांही नाही. ती सुबोध असून जैनेन्द्रव्याकरणाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे.[२]

---

१ खालील उदाहरणे पाहा – क्षीरपाणा आन्ध्राः । सौवीरपाणा द्राविडाः । सुरापाणाः प्राच्याः । (५.४.११० सूत्रावरील वृत्ति). सौवीर म्हणजे पेज. महावृत्तीत ५.४.९३ सूत्राचे उदाहरण देताना 'द्राविडाः' बद्दल 'द्रमिणाः' असा पाठ आहे.

२ शक संवत् १०४५ (सन ११२३–२४) च्या तेरदाळ येथील शिलालेखाचे (इं. अँ., व्हॉ. १४, पृ. ४ इ. मध्ये) संपादन करताना प्रा. का. बा. पाठक यांनी असे प्रतिपादिले की कोल्हापूर येथील रूपनारायण नामक जैन वसतीचा आचार्य माघनन्दी सिद्धान्तदेव याचा शिष्य श्रुतकीर्ति त्रैविद्य हा आणि कन्नड कवि अभिनव पम्प याने आपल्या 'पम्परामायणा'त प्रशंसिलेला 'राघवपाण्डवीयकाव्या'चा कर्ता श्रुतकीर्ति त्रैविद्य हे एकच होत – आणि ते काव्य धनञ्जय कवीच्या नावाने प्रसिद्ध असलेले 'द्विसन्धान' किंवा 'राघवपाण्डवीय' काव्य होय. हे मत विंटर्निट्झ्, कीथ आणि सुशीलकुमार दे यांनी स्वीकारून आपापल्या संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासात दिले आहे. पण ते चूक आहे, हे ए. वेंकटसुब्बय्या यांनी आपल्या लेखात दाखविले आहे. [*J. B. B. R. A. S.*, Vol. III (New Series), pp. 134 f.] त्यांनी सप्रमाण सिद्ध केले आहे की रूपनारायण वसतीचा श्रुतकीर्ति त्रैविद्य हा अभिनव पम्पाने प्रशंसिलेल्या श्रुतकीर्ति त्रैविद्याहून भिन्न होता; कारण (१) त्यांच्या गुरुपरंपरा भिन्न होत्या. कोल्हापूरच्या श्रुतकीर्ति त्रैविद्याची गुरुपरंपरा कुलभूषण – कुलचन्द्र – माघनन्दी – श्रुतकीर्ति अशी होती तर पम्पाने 'राघवपाण्डवीयकाव्या'चा कर्ता म्हणून प्रशंसिलेल्या श्रुतकीर्ति त्रैविद्याची गुरुपरम्परा बालचन्द्र–मेघचन्द्र–शुभकीर्ति (वासुपूज्य)– श्रुतकीर्ति अशी होती. दुसरे असे की सध्या उपलब्ध असलेल्या 'द्विसन्धान' अथवा 'राघवपाण्डवीय' या संस्कृत काव्याचा कर्ता धनञ्जय हा या दोन्ही श्रुतकीर्तींहून भिन्न असून तो त्यांच्या पूर्वी कित्येक शतके (सन ७००–७५० च्या सुमारास) होऊन गेला होता. याविषयी विस्तृत विवेचन विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, १९७२ मधील 'धनञ्जयकवीचे द्विसन्धान अथवा राघवपाण्डवीय काव्य' (पृ. १–२९) या आमच्या लेखात केले आहे.

(पुढील पानात चालू)

४. कर्णपार्याचे नेमिनाथपुराण

कोल्हापुरचे शिलाहार नृपति आणि त्यांचे सामन्त यांनी त्या काली झालेल्या कन्नड ग्रंथकारांना उदार आश्रय दिला होता. त्यांपैकी कन्नड काव्य 'नेमिनाथ-पुराण' याचा कर्ता कर्णपार्य हा एक होता. तो शिलाहारनृपति विजयादित्य याच्या काळी होऊन गेला. त्याने त्याची आणि त्याचा पिता गंडरादित्य याची प्रशंसा आपल्या काव्यात केली आहे. त्याने वर्णिलेली एक घटना ऐतिहासिक असावी. विजयादित्याने गोमन्थशैलाग्रावरील आपल्या जन्मभूमीला मुक्त केले आणि स्वत: तिला विभूषित केले, असे कर्णपार्य सांगतो. मागे सांगितल्याप्रमाणे[1] कोल्हापुरचे शिलाहार कर्णाटक राज्याच्या शिमोगा जिल्ह्यातील गोमन्थ येथून आले होते; गोमन्थगिरीतील चन्द्र-गुप्ति ही त्यांची राजधानी होती. विजयादित्याने गोमन्थगिरीवर स्वारी करून आपल्या पूर्वजांचे मूलस्थान काबीज केले असावे. कर्णपार्याने विजयादित्याची अग्रमहिषी पोन्नलदेवी हिचाहि उल्लेख केला आहे.

कर्णपार्याने आपले काव्य कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणगलेच्या पश्चिमेस ७ मलावरच्या हेर्ले गावातील चंद्रप्रभ तीर्थंकराच्या 'त्रिभुवनतिलक' नामक जिना-लयात रचले. हे जिनमंदिर पूर्वोक्त आजुरिका (आजरे) येथील 'त्रिभुवनतिलक' मंदिराहून भिन्न असावे. आजुरिका येथील त्रिभुवनतिलक जैन मंदिर गण्डरादित्याने बांधले होते. पण हेर्ले येथील चंद्रप्रभ तीर्थंकराचे त्याच नावाचे जैनमंदिर नेम गावुंड याने बांधले होते.[2] या त्रिभुवनतिलक जैनमंदिराचा आचार्य जैन मुनि बाल-चन्द्र राद्धान्त हा होता. कर्णपार्याने शुभचन्द्र नामक दुसऱ्या एका त्याच्या सारख्याच

(मागील पानावरून)

श्रवणबेळ्गोळ येथील एका लेखात कोल्हापूरच्या श्रुतकीर्ति त्रैविद्याच्या स्तुत्यर्थ अभिनवपम्पाच्या 'पम्परामायणा'तून 'राघवपाण्डवीय काव्या'च्या श्रुतकीर्ति त्रैविद्याच्या प्रशंसापर श्लोक उद्धृत केला आहे खरा, पण तो चुकीने तेथे दिला आहे. कारण अभिनवपम्प कोल्हापूरच्या श्रुतकीर्ति त्रैविद्याच्या पूर्वी (सन ११०० च्या पूर्वी) होऊन गेला होता. जैन मुनींच्या प्रशंसेकरिता 'पम्परामायणा'तून असे श्लोक घेतल्याची इतरहि उदाहरणे आहेत.

कोल्हापूरच्या श्रुतकीर्ति त्रैविद्याने 'राघवपाण्डवीय' काव्य रचले याला पुरावा नाही. त्याने तसे काव्य रचले असते तर कर्णपार्याच्या 'नेमि-नाथपुराणा'त त्याचा उल्लेख आला असता.

१ क्र. ४६, ओ. ६. २ क्र. ४७, ओ. २१–२४ पाहा.

जैन आचार्यांचाहि उल्लेख केला आहे.[१] या जैन मुनींचे निर्देश श्रवणबेळ्गोळ येथील लेखांत आले आहेत.

कर्णपार्याला विजयादित्याचा करणाग्रणी (सचिवालयप्रमुख) लक्ष्म, लक्ष्मण किंवा लक्ष्मीधर याचा आश्रय होता.[२] तो भूषणार्य आणि काञ्चनव्वा यांचा पुत्र आणि गणपार्य (किंवा गोणपार्य) याचा जामात होता. लक्ष्मणाला दोन बंधु वर्धमान आणि शांतिनाथ या नावाचे होते. तो नेमिनाथ तीर्थंकराचा उपासक होता म्हणून त्याने कर्णपार्याला त्याचे चरित्र 'नेमिनाथपुराण' रचण्यास सांगितले होते.

आपल्या ग्रंथाच्या पहिल्या अध्यायातील १३–२३ श्लोकात कर्णपार्याने आपल्या पूर्वीच्या अनेक आचार्यांचा आणि ग्रंथकारांचा नामनिर्देश केला आहे. त्यांत बेट्टदमुनि, कानुर्गणाचा नेमिचन्द्र सिद्धान्तचक्रेश्वर, पोन्न, रण्ण, पम्प, नागचन्द्र कवीन्द्र (किंवा अभिनवपम्प) इत्यादि आहेत. पण लक्षणीय गोष्ट ही की त्यांमध्ये श्रुतकीर्ति त्रैविद्याचे नाव नाही. 'राघवपाण्डणीय' काव्याचा कर्ता श्रुतकीर्ति त्रैविद्य हा कोल्हापूरच्या रूपनारायण जैनमन्दिराचा तन्नामक आचार्य असता तर कर्णपार्याने त्याचे नाव अन्य पूर्वगामी सूरींच्या प्रमाणे आपल्या ग्रंथाच्या आरंभी आदरपूर्वक निर्दिष्ट केले असते, असे वाटल्याशिवाय राहत नाही.[३]

---

१ या शुभ्रचंद्राचा 'देवकीर्ति पंडितदेवाचा शिष्य' म्हणून उल्लेख श्रवणबेळ्गोळच्या क्र. ६४ च्या लेखात आला आहे. ए. क., व्हॉ. २, पृ. १८ (अनुवाद) पाहा.

२ हा लक्ष्मण आणि क्र. ५४ मध्ये उल्लेखिलेला विजयादित्याचा मामा सामन्त लक्ष्मण हे एकच असावेत.

३ या काव्याविषयी आणि त्याच्या कर्त्याविषयी येथे दिलेल्या माहितीबद्दल मी डॉ. आ. ने. उपाध्ये यांचा ऋणी आहे. हे कन्नड काव्य मद्रास विश्वविद्यालयाने सन १९४० मध्ये प्रसिद्ध केले होते. ते आता अत्यंत दुर्मिळ झाले आहे.

स्थापत्य आणि शिल्पकला

शिलाहारकालीन मंदिरे

शिलाहार राजांनी आपल्या काळी प्रचलित असलेल्या बौद्ध, हिंदू व जैन या तीन्ही धर्मांच्या व त्यांतील पंथांच्या लोकांना समानतेने वागवून त्यांच्या देवतांची मंदिरे बांधली; त्यांच्या सामंतांनी, अधिकाऱ्यांनी, व्यापाऱ्यांनी व सामान्य जनतेनेहि त्यांचे अनुकरण केले. या देवालयांविषयी सविस्तर माहिती मागील धार्मिक परिस्थितिविषयक प्रकरणात दिली आहे. या देवळांपैकी फारच थोडी आता सुस्थितीत आहेत. कांहीचे अवशेष मात्र आता राहिले आहेत, तर इतर कांही पूर्णपणे नष्ट झाली आहेत. या प्रकरणात अवशिष्ट देवालयांपैकी कांहींचे संक्षिप्त वर्णन करू.

बौद्ध देवालये

कान्हेरी येथील कांही लेण्यांत तत्कालीन उपासकांनी भिक्षूंच्या ध्यानधारणेकरिता आवश्यक त्या कोलिवेश्मिका (लहान खोल्या) खोदण्याकरिता द्रम्मांच्या रकमा दिल्या होत्या. तीं लेणीं अद्यापि विद्यमान आहेत. पण इतर चैत्ये व देवालये आता नामशेष झाली आहेत.

कान्हेरीजवळच्या बोरीवली गावानजीक 'देवी का पारा' या खेड्याच्या परिसरात कझेन्स साहेबाला एका प्राचीन इमारतीचे अवशेष आढळले. त्यांतील कांहींवर बौद्ध धार्मिक चिह्ने कोरली असल्याने ती इमारत बौद्ध धर्माची असावी, असा त्याने तर्क केला. पण त्या अवशेषांवरून तिचे स्वरूप अजमाविणे शक्य नव्हते.[१] सोपारा (प्राचीन शूर्पारक) येथेहि प्राचीन बौद्ध अवशेष सापडले आहेत; पण तेथेहि स्तूपांशिवाय इतर बौद्ध इमारती आढळल्या नाहीत.

कोल्हापूरच्या गंडरादित्याने मिरजेजवळच्या इरुकुडी (सध्याच्या इरळी) गावाजवळ आपल्या नावाने 'गण्डसागर' नामक तलाव खोदवून त्याच्या काठी हिंदु व जैन देवालयांप्रमाणे बुद्धाचेहि मंदिर उभारले होते,[२] पण तेहि आता अवशिष्ट नाही.

---

१ Cousens, *Mediaeval Temples in the Deccan*, pp. 20–21.

२ क्र. ४५, ओ ३४.

हिंदू देवालये

१. अंबरनाथ येथील शिवमंदिर

शिलाहार काळी कोकणात तसेच कोल्हापूर प्रदेशात अनेक हिंदू देवालये बांधण्यात आली होती. त्यांची माहिती इतरत्र सविस्तर दिली आहे. त्या सर्वांत अत्युत्कृष्ट आणि प्राचीन असे भगवान् शंकराचे देवालय उत्तर कोकणांत कल्याणच्या आग्नेयेस चार मैलांवरच्या अंबरनाथ गावाजवळ अद्यापि बऱ्याचशा सुस्थितीत विद्यमान आहे. ते 'दक्षिण' (डेक्कन) स्थापत्यपद्धतीचे सर्वांत प्राचीन आणि उत्कृष्ट उदाहरण मानण्यात येते.[1]

सुदैवाने या देवालयाचा निर्माणकाल निश्चित आहे. क्र. १७ च्या अंबरनाथ लेखात त्याला 'श्रीअंबरनाथदेवकुल' म्हटले असून त्याचा संबंध महामण्डलेश्वर श्रीमच्छित्तराजदेवाशी जोडला आहे. त्या लेखातील मिति महामण्डलेश्वर श्रीमाम्वाणिराजदेव याच्या कारकीर्दीतील शक संवत् ९८२, श्रावण शुद्ध ९ शुक्रवार (२७ जुलै सन १०६१) अशी दिली आहे.[2] या उल्लेखांवरून हे देवालय बांधण्यास छित्तराजाच्या कारकीर्दीत सुरवात होऊन ते काम त्याच्यानंतरचे त्याचे दोन धाकटे भाऊ नागार्जुन आणि मुम्मुणि यांच्या कालात चालू राहिले आणि शेवटी ते मुम्मुणिराजाच्या कारकीर्दीच्या अखेरीस सन १०६१ मध्ये पूर्ण झाले असे दिसते.[3]

हे देवालय अंबरनाथ गावाच्या जवळच पूर्वेस एका खोलगट जागेंत, वालधान नदीला पुढे मिळणाऱ्या एका ओढ्याच्या काठी उभारले आहे. सामान्यतः अशी भव्य देवालये सपाट जागी उंच जगतीवर (प्लॅटफॉर्मवर) उभारली जात असत. प्रस्तुत देवालय खोलगट जागेत उभारण्याचे कारण तेथील शिवलिंग 'स्वयंभू' किंवा भवभूति म्हणतो त्याप्रमाणे 'अपौरुषयेप्रतिष्ठ' (कोणाहि मानवाने न स्थापिलेले) होते, हे होय. याच कारणास्तव त्याचा गाभारा देवालयाच्या इतर भागापेक्षा ८ फूट खोल असून त्यांतील शिवलिंगाच्या दर्शनाकरिता ९ पायऱ्या उतरून जावे लागते.

हे देवालय पश्चिमाभिमुख असून त्याची पूर्व–पश्चिम लांबी ६० फूट आहे.[4] पश्चिमेस नंदीकरिता पूर्वी देवकुली उभारली असावी, पण ती आता नष्ट झाली

---

१ कदाचित् विदर्भाच्या चांदा जिल्ह्यातील मार्कंडी येथील शिवालय यापेक्षा प्राचीन असेल. सं. मु., सर ६, पृ. ५३ इ.

२ क्र. १७, ओ. १.

३ या लेखाची मिति अनियमित आहे. पृ. १३१ पाहा.

४ प्लेट २, आकृति ४ मधील देवालयाचे चित्र पहा.

आहे. पश्चिमेच्या द्वारमंडपा (porch) मध्ये एक लहानसा नंदी ठेवला आहे, पण तो प्राचीन नाही. देवालयाचे गर्भगृह (गाभारा) आणि सभामंडप असे दोन चौकोनी मुख्य भाग असून ते एकमेकांस कर्णरेषेनुसार (diagonally) जोडले आहेत.[१] त्यांच्या बाहेरच्या बाजू छाया-प्रकाशाच्या योजनेनुसार तारकाकार (star-shaped) केल्या आहेत.

या देवळाचे गर्भगृह, अंतराल व सभामंडप असे तीन भाग होतात. सभामंडपाच्या दोन बाजूंस आणि पश्चिमेस एक, असे तीन द्वारमंडप आहेत. गाभारा तेरा फूट लांब रुंद असून त्यात लहानसे स्वयंभू शिवलिंग आहे. गाभाऱ्याच्या जमिनीपासून सुमारे आठ फूट उंचीवर उत्तरेच्या आणि दक्षिणेच्या भिंतीवर काही बांधकामाचे कंगोरे अवशिष्ट आहेत. त्यांवरून कझेन्सने अनुमान केले आहे की हा गाभारा मूळचा दोन मजली असावा. दुसऱ्या मजल्यावर पुढील सभामंडपाच्या पातळीवर दुसरे दर्शनी शिवलिंग असावे. कांही कालानंतर वरील शिखर कोसळून पडल्यामुळे वरचा मजला नष्ट झाल्याने गाभाऱ्याचा दरवाजा अंतराल भागात पुढे घ्यावा लागला असे दिसते.[२] पण या कल्पनेला काही आधार दिसत नाही. शिवलिंग स्वयंभू असल्याने गाभारा खोल झाला आहे आणि त्यात जाण्याकरिता पायऱ्यांची आवश्यकता असल्यामुळे त्याचा अंतराळातील दरवाजा आरंभीच पुढे घ्यावा लागला, हे स्पष्ट आहे.

गर्भगृहाचा दरवाजा ९ फूट उंच व ४ फूट रुंद आहे. त्याच्या शीर्षपट्टीवर ध्यानमग्न भगवान् शंकराची मूर्ति असून बाजूस योगी, हत्ती आणि सिंह यांच्या मूर्ति कोरल्या आहेत. दरवाज्याच्या दोन्ही बाजूंस दोन फूट उंचीचा किरीटधारी पुरुष आणि त्याच्या एका बाजूस पुरुषाची आणि दुसऱ्या बाजूस स्त्रीची आकृति कोरली आहे. या आकृति तत्कालीन राजदंपतीच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या द्योतक असाव्या. दरवाज्याच्या दोन्ही बाजूंस एक एक देवळी आहे. उजवीकडील देवळीत गणपतीची मूर्ति असून डावीकडील रिकामी आहे.

अंतरालासमोरील सभामंडपात मध्यभागी चार उत्कृष्ट कोरीव काम केलेल्या स्तंभांनी २२ फूट लांबीरुंदीचा चौक केला आहे. हे स्तंभ खाली चौकोनी, नंतर अष्टकोनी आणि शेवटी कणीयुक्त वर्तुलाकार झाले असून त्यावरच्या चौकोनी भागाच्या शीर्षपट्टींवरील तुळयांवर सभामंडपाचा घुमट आधारला आहे. हे सर्व स्तंभ उत्कृष्ट कोरीव मूर्तिशिल्पांनी व वेलपत्तींनी सुशोभित केले आहेत.

---

१ अंबरनाथ देवालयाचे भूमिमानचित्र पाहा. मानचित्र क्र. १.

२ *M. T. D.*, pp. 14–15.

सभामंडपाचे छत एका आत एक अशा उत्तरोत्तर लहान होत गेलेल्या एककेंद्रक पाच वर्तुलांचे बनविले असून त्यांच्या मध्यभागी कमलाकृति आहे. या वर्तुलांपैकी बाहेरचे वर्तुल वेलपत्तींत कोरले असून त्याच्या आतील चार वर्तुले अर्धचंद्राकृतींनी सुशोभित केली आहेत.

सभागृहाच्या तीन बाजूंच्या द्वारमंडपांतहि दोन्ही बाजूंस उत्कृष्ट कोरलेले असे तीन स्तंभ आहेत. त्यांपैकी दोन अलग असून एक भिंतीला जोडला आहे.

या सबंध स्थापत्य कृतीत शिलांना जोडण्याकरिता चुन्याचा किंवा लोखंडी पट्ट्यांचा उपयोग केला नसून सर्व बांधकाम उत्कृष्ट घडविलेल्या शिलांच्या संतुलित वजनाने स्थिर झाले आहे. सभामंडप व गर्भगृह यांच्या अधिष्ठानाला कीर्तिमुखे, हत्तींच्या पंक्ति (गजथर) आणि मनुष्यांच्या पंक्ति (नरथर) यांनी विभूषित केले आहे. येथे अश्वांची पंक्ति (अश्वथर) मात्र दिसत नाही.

देवळाच्या बाहेरील भिंतींवर देवदेवता, तापस, अप्सरा इत्यादिकांच्या मूर्ति कोरून त्यांना अत्यंत सुशोभित केले आहे. त्यांपैकी कांही मूर्तींना त्यांच्या प्राधान्यामुळे मोठ्या आकाराच्या देवळ्या दिल्या आहेत. सामान्यतः देवालयाच्या पाठीमागील रथिकाबिंबात (देवळीत) बसविलेली मूर्ति प्रमुख असते. आणि तिजवरून त्या देवळाचे धार्मिक लक्षण अजमावता येते. प्रस्तुत देवळाच्या पूर्वेकडील मुख्य देवळीतील मूर्ति घारापुरीच्या लेण्यातल्याप्रमाणे त्रिमुखी शिवाची आहे. पण ती बैठी नसून उभी आहे. तिने जटामुकुट धारण केला असून तिच्या गळ्यातले हार, कमरेची मेखला, हातांतले आणि पायांतले अलंकार सुंदर रीतीने कोरले आहेत. या मूर्तीचे बहुतेक हात आता भग्न झाले आहेत. फक्त वरचा डावा हात शाबूत असून त्यांत सर्प धरला आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूस दोन दोन गण लहान आकारात दाखविले आहेत.

उत्तरेच्या बाजूतील मुख्य मूर्ति अष्टभुजा महाकालीची आहे.[१] ही नरमुंडमालाधारी अशी नृत्य करीत असलेली दाखविली असून तिच्या हातात कट्यार, तलवार, त्रिशूल, खट्वाङ्ग इत्यादि विविध आयुधे आहेत. तिच्या दोन बाजूंस तिजसारख्याच अस्थिपंजर झालेल्या तिच्या उपासक–उपासिका कोरल्या आहेत. एकंदर दृश्य बीभत्स व किळसवाणे आहे.

या महाकालीच्या देवळीखाली ब्रह्मदेवाची देवळी आहे. तीत ब्रह्मदेवाची त्रिमुखी आलिंगनमूर्ति सावित्रीला आपल्या मांडीवर घेऊन बसलेली दाखविली आहे.[२] ब्रह्मदेवाचे चौथे मुख मागील बाजूस असल्याने दाखविले नाही. ब्रह्मदेवाच्या हातात रुद्राक्षमाळा आणि यज्ञपात्र ही दाखविली आहेत. त्याच्या उजव्या मांडीखाली त्याचे वाहन हंस कोरले आहे.

---

१ प्लेट ३, आकृति क्र. ५ पाहा. २ प्लेट ४, आकृति क्र. ६ पाहा.

दक्षिणेकडच्या मुख्य देवळीत नृत्य करणाऱ्या अष्टभूजा चंडिकेची मूर्ति बसविली आहे.[१] तिचे कांही हात आता भग्न झाले आहेत. तिच्या पायाखाली चिरडलेला राक्षस अधोमुख होऊन पडलेला दाखविला आहे. देवीच्या कानांत वर्तुळाकार कुंडले, गळयात अनेक रत्नहार, कमरेत रशना, पायांत पैंजण इत्यादि अलंकार कोरले आहेत.

याशिवाय इतरहि अनेक शैव संप्रदायाच्या मूर्ति – अर्धनारीश्वर, शिवपार्वती, इत्यादि या देवालयाच्या जंघेला लावलेल्या इतर देवळींत आढळतात. याशिवाय उल्लेखनीय अशी मूर्ति विष्णूची होय.[२] तिच्या हातात नंदक धनुष्य, कमळ, शंख व गदा ही आहेत. विष्णूने किरीट मुकुट घातला असून कर्णकुंडलादि विविध अलंकार धारण केले आहेत. उजव्या बाजूस खाली त्याचे वाहन गरुड बसलेला दाखविला आहे. या देवळीला एका विशाल कीर्तिमुखाने अलंकृत केले असून त्याखाली दोन्ही बाजूंस वर्तुलांत विविध प्रसंगातील अनेक मूर्ति कोरल्या आहेत.

या देव-देवतांच्या मूर्तीशिवाय देवालयाच्या सर्व बाजूंवर अप्सरादिकांच्या सुंदर मूर्ति कोरून त्याची शोभा वाढविली आहे. कांही कोनाडयांत बसविलेल्या मूर्ति तत्कालीन जनपदातील सामान्य स्त्रियांच्या दिसतात. उदाहरणार्थ, आकृति ९ मधील उजव्या हातात कलश घेऊन उभी राहिलेली स्त्री पहा [३] हिच्या मुखावरून व अरुंद भालप्रदेशावरून ती आर्येतर वंशाची आणि तिच्या साध्या आखूड जाड अधोवस्त्रावरून ती जनपदातील सामान्य स्त्री दिसते. तिच्या गळयातील आणि हातापायांतील अलंकार सामान्य प्रतीचे बोजड आहेत. त्यावरूनहि शिल्पकाराने तिला जानपद स्त्री म्हणूनच कोरलेले दिसते.

गर्भगृह, सभामंडप व द्वारमंडप यांवर अलग अलग शिखरे आहेत. गर्भगृहावरील शिखर आता बरेचसे कोसळले आहे, पण उत्तरेकडचा कांही भाग अद्यापि शाबूत आहे. त्यावरून त्याच्या मूळच्या स्वरूपाची कल्पना करता येते. हे शिखर उत्तर भारतीय प्रकाराचे, पण दक्षिण (डेक्कन) पद्धतीचे आहे. उत्तर भारतीय प्रकारातल्या प्रमाणे ते सरळ उंच गेले आहे, पण दक्षिणेतील पद्धतीनुसार त्याला चारी बाजूस मध्यभागी चैत्यगवाक्षादि आकृतींनी विभूषित केलेले चार पट्टे आहेत. त्यांवर मुख्यतः शिखराचे स्थैर्य अवलंबून असल्यामुळे त्या पट्टयांना शिखराचे कणे (spines) मानले जाते. या पट्टयांमधील शिखराच्या भागांस लहान लहान शिखरांनी (अंगशिखरांनी) वेष्टिले आहे. या अंगशिखरांना आडव्या कंगोऱ्यांनी विभागले असल्यामुळे ते नुसतेच उभे (vertical) गेले आहेत, असे दृश्य दिसत नाही.

---

१ प्लेट ५, आकृति क्र. ७ पाहा.

२ प्लेट ६, आकृति क्र. ८ पाहा.

३ प्लेट ७, आकृति क्र. ९ पाहा.

शिखराच्या पश्चिमेस अन्तराल भागावर शुकनासिका असून त्यांत एका सुंदर वेलपत्त्यांदिकांनी अलंकृत अशा वर्तुळात एक तुंदिलतनु व्यक्ति बसलेली दाखविली आहे. गर्भगृहावरच्या शिखराचा वरचा आमलक, कलश आदि भाग आता नष्ट झाला आहे.

सभामंडप व द्वारमंडप यांवरील शिखरे घुमटाच्या (pyramidal) पद्धतीची असून त्यांना कंगोऱ्यांनी शोभा आणली आहे.

अंबरनाथाचे देवालय दक्षिण (Deccan) पद्धतीचे सर्वात प्राचीन आणि सर्वोत्कृष्ट उदाहरण गणण्यात येते. उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या उत्कृष्ट स्थापत्य कलाकृतीच्या प्रेमाचे ते निदर्शक आहे.

२. खिद्रापुरचे कोप्पेश्वर मंदिर

शिलाहार कालातील अवशिष्ट असे दुसरे उल्लेखनीय हिंदू देवालय खिद्रापुरचे कोप्पेश्वर नामक शिवालय होय. खिद्रापुर हे सुमारे दीड हजार वस्तीचे लहानसे खेडे कोल्हापूर जिल्ह्याच्या शिरोळ तालुक्यात शिरोळच्या आग्नेयेस बारा मैलांवर कृष्णा नदीच्या काठी आहे. येथे सामान्यत: पूर्ववाहिनी असणारी कृष्णा नदी पश्चिमवाहिनी झाली आहे. म्हणून या स्थलास विशेष पावित्र्य आले असावे. असाच प्रकार विदर्भाच्या चांदा जिल्ह्यातील वैनगंगातीरी असलेल्या मार्कंडीस्थलाच्या बाबतीत झाला आहे. या स्थलाला लष्करी दृष्टयाहि महत्त्व होते, असे दिसते. कारण या देवळावर कित्येक ठिकाणी शिलाहारनृपति विजयादित्य याचा दंडनायक (सेनापति) बोप्पण याने शत्रूवर विजय मिळविल्याचे उल्लेख आहेत.[१] ही लढाई कलचुरि नृपति बिज्जल याने विजयादित्यावर केलेल्या स्वारीत झाली असावी.

हे देवालय कोणी बांधले याचा निश्चित उल्लेख कोठेहि नसला तरी गंडरादित्याच्या कारकीर्दीत त्याचा आरंभ झाला असावा. पुढे दाखविल्याप्रमाणे याचे गर्भगृह, अंतराल, गूढमंडप आणि सभामंडप (सध्याचा तथाकथित स्वर्गमंडप) असे चार भाग एकापुढे एक बांधले आहेत.[२] सभामंडपाच्या खांबावरील ब्रॅकेटांवर विजयादित्याच्या बोप्पण सेनापतीच्या विजयाचे उल्लेख आहेत.[३] तेव्हा विजयादित्याच्या कारकीर्दीत ते बरेचसे बांधून झाले होते, असे दिसते. एवढे

१ क्र. ५७, ओ. २–४.

२ प्लेट ८, आकृति क्र. १० मधील देवालयाचे चित्र पाहा.

३ क्र. ५७. *I. N. K. K. S.*, Inscrr. Nos. 25–33.

भव्य व अनेक सुंदर शिल्पाकृतींनी विभूषित झालेले मंदिर थोड्या थोडक्या काळात बांधून होणे शक्य नाही. विजयादित्याच्या राजवटीतहि ते पूर्ण झाले नाही. एवढेच नाही तर त्याचा पुत्र आणि उत्तराधिकारी भोज यालाहि ते पूर्ण करता आले नाही. कारण त्याचा सभामंडप अद्यापि अपूर्ण आहे हे पुढे दाखविले आहे. ते पुरे होण्यापूर्वी सन १२१२ च्या सुमारास यादव सम्राट् सिंघण याने भोजाचा उच्छेद करून त्याचे राज्य खालसा केले, हे कोप्पेश्वर देवळाच्या दक्षिण दिशेच्या दरवाजाबाहेरील शक संवत् १२३६ (सन १२१३) च्या त्याच्या लेखावरून स्पष्ट दिसते.[1]

कोप्पेश्वराचे देवालय पूर्वाभिमुख असून १०३ $\frac{1}{2}$ फूट लांब, ६५ फूट रुंद आणि कळसापर्यंत ५२ फूट उंच आहे. त्याचे गर्भगृह, अंतराळ, गूढमंडप आणि सभामंडप असे चार भाग आहेत.[2] इतरत्र अंतराळ लहान आकाराचे असते, पण येथे ते बरेच विस्तृत आहे. त्याच्या दरवाज्याच्या दोन्ही बाजूंस जय व विजय या दोन भव्य चतुर्भुज द्वारपालांच्या आकृति होत्या. त्यांपैकी उजवीकडचा द्वारपाल विजय भग्नावस्थेत स्वस्थानी आहे त्याच्या उजव्या हातातील गदेचा दांडा मोडला आहे, पण डावीकडचा जय तर तेथून काढला असून त्याचा कमरेखालचा भग्न भाग मंडपाच्या दक्षिण दरवाज्याजवळ पडला आहे.

अंतराळापुढील मुख्य (गूढ) मंडपात उत्कृष्ट कोरीव काम केलेल्या स्तंभांच्या योगे एकात एक असे दोन चौक झाले आहेत. बाहेरील चौकास वीस आणि आतील चौकास बारा खांब आहेत. ते सर्व प्रथम चौकोनी, नंतर अष्टकोनी, पुढे वर्तुळाकार कणीयुक्त असे केले असून कलाकुसरीने भरले आहेत, पण या खांबांवर अंबरनाथ देवळाच्या सभामंडपातील खांबांवरीलप्रमाणे मूर्तिशिल्पे कोरली नाहीत. या मंडपाचे छत तत्कालीन इतर देवळांच्या सभामंडपांच्या छताप्रमाणे एकात एक बसविलेल्या एककेंद्रक वर्तुळाकार चक्रांनी बनविले आहे. अशा मंडपावर पिरॅमिड (घुमटाकार) पद्धतीचे शिखर असते. पण या मंडपावर ते उभारण्यापूर्वी त्याचे बांधकाम स्थगित झाले होते, असे दिसते.

मुख्य सभामंडपासमोर दक्षिणेतील देवालयांना द्वारमंडप असतो. (अंबरनाथच्या देवालयाचे भूमिमानचित्र पाहा.) पण येथे त्याच्या ऐवजी उत्तर भारतातील मोढेरा येथील सूर्यदेवालयातल्याप्रमाणे[3] मुख्य सभामंडपापासून अलग

---

१ क्र. ६३.

२ या देवळाचे भूमिमानचित्र पाहा.

३ मोढेरा येथील सूर्यमंदिराच्या भूमिमानचित्राकरिता Percy Brown, *Indian Architecture* (Buddhist and Hindu), Plate CVIII, No. 4 पाहा.

असा त्याच्या पुढे अष्टकोनी दुसरा विशाल मंडप आहे.[१] त्याची बाहेरची बाजू थोडया उंचीच्या कठडयावर उभारलेल्या ३६ खांबांनी वेष्टिली आहे. या मंडपात बारा खांबांचे वर्तुळ झाले आहे. त्यांच्या ब्रॅकेट्स्वर (तीरांवर) इंद्र, ब्रह्मा, विष्णु, शिव इत्यादिकांच्या सुंदर कोरीव मूर्ति बसविल्या आहेत. मागे सांगितल्याप्रमाणे या मंडपाचे छत अपूर्ण राहिले आहे. त्याचे खालचे अर्धवर्तुलाकार सुंदर शिपल्याच्या आकृतींनी बनलेले एकच वर्तुळ बांधून झाले होते.[२] तितक्यात बांधकाम स्थगित झाले, असे दिसते. या मंडपाच्या मध्यभागी १४ फूट व्यासाची गोल शिला असून त्यावरचा छताचा भाग उघडा आहे. त्या शिळेवर उभे राहणाऱ्या श्रद्धावान् सच्छील मनुष्यास स्वर्गास जाता येते अशी भोळी पण वेडी समजूत स्थानिक लोकांत प्रचलित आहे. वस्तुत: या मंडपाचे छत बांधण्यापूर्वीच शिलाहारांचे राज्य नष्ट झाल्यामुळे या मंडपाचे काम अपूर्ण राहिले आहे.

खिद्रापूरजवळ शिलाहार आणि यादव यांच्या मध्ये घनघोर लढाई झाली होती, याचा निदर्शक एक लेख या मंदिराच्या जवळ एका वीरगळावर कोरलेला आहे.[३] त्यात म्हटले आहे की महामंडलेश्वर भोजदेव याचा (सेनापति) बन्नेस हा येथे संगमाजवळच्या लढाईत आपल्या घोडदळासहित धारातीर्थी पडला. यात शत्रूचे नाव उल्लेखिले नाही; पण यानंतर कोल्हापूर प्रदेशात शिलाहारांचे लेख सापडत नाहीत. या उलट यादव नृपति सिंघण देवाने शक संवत् ११३६, श्रीमुख संवत्सर, चैत्र महिन्यातील सूर्यग्रहणप्रसंगी, सोमवारी (२२ एप्रील सन १२१३ रोजी) श्रीकोप्पेश्वराच्या पूजाअर्चेकरिता कूडलदामवाड ग्राम दान दिल्याचा उल्लेख करणारा शिलालेख गूढमंडपाच्या दक्षिण दरवाज्याबाहेर बसविला आहे.[3] त्या वेळी सिंघणाचा मुक्काम त्याच्या देवगिरि राजधानीत होता, असे त्यात म्हटले आहे. यानंतरचे सिंघणाचे व त्याच्या अधिकाऱ्यांचे लेख कोल्हापुरात सापडले आहेत.[४] त्यावरून असे दिसते की सिंघणाने विजयप्राप्तीनंतर श्रीकोप्पेश्वराच्या पूजाअर्चेची व्यवस्था केली. पण जिंकलेल्या प्रदेशातील अपूर्ण राहिलेले हे सुन्दर देवालय मात्र पूर्ण करण्याची कांही तजवीज त्याने केली नाही. कदाचित् गर्भगृहावरील सध्याचे ओबड धोबड दिसणारे शिखर त्या काळी बांधले असेल. पण गूढमंडप व तथाकथित स्वर्गमंडप यांवरील शिखरे बांधली नाहीत. स्वर्ग मंडपाचे तर छतहि तेव्हापासून आजपर्यंत अपूर्णच राहिले आहे.

---

१ प्लेट क्र. ९, आकृति क्र. ११ पाहा.

२ प्लेट क्र. १०, आकृति क्र. १२ पाहा.

३ *I. N. K. K. S.*, p. 179.

४ त्यातील पहिला शक संवत् ११४० चा आहे *J. B. B. R. A. S.* (Old Series), Vol. II, pp. 284 f.

सामान्यत: अशा देवळांना कमी अधिक उंचीची जगती (प्लॅटफार्म) असते. तसेच त्यांना अधिष्ठान असते. या देवळालाहि हे भाग असावे. पण या देवळाचा खालचा भाग जमिनीत दबून गेला आहे. सध्या देवळातील आणि बाहेरील जमिनी एकाच पातळीवर आहेत. देवळासभोवारची जमीन खोदून त्याचा खालचा अधिष्ठानाचा भाग मोकळा करणे आवश्यक आहे.

गर्भगृह, अंतराळ आणि गूढमंडप हे बाहेरून तारकाकार (star-shaped) असून खालपासून वरपर्यंत विविध प्रकारच्या शिल्पाकृतींनी भरले आहेत. जंघेच्या (अधिष्ठान आणि शिखर यांमधील भिंतींच्या) अगदी खालच्या भागावर सभोवार हत्तींच्या सुंदर आकृति कोरल्या आहेत. त्यांवर ब्रह्मदेव, विष्णु, शिव, इंद्र इत्यादि देव आरूढ होऊन कोप्पेश्वराच्या मंदिराला आलेले दाखविले आहेत. एकंदर हत्ती ९२ आहेत. देवालयाच्या पश्चिमेच्या मध्यभागापासून डावी–उजवीकडचे हत्ती मोजल्यास त्यांची संख्या प्रत्येक बाजूची ४६ – दोन्ही बाजूंची ९२ – भरते. याशिवाय गर्भगृहाच्या पश्चिम, दक्षिण आणि उत्तर या दिशांतील मध्यभागी भगवान् शंकराची एक एक मूर्ति पार्वतीसह नन्दीवर आरूढ झालेली कोरली आहे. तेव्हा या मंदिराच्या जंघेवर एकंदर ९५ वाहने कोरली आहेत. पण त्यांपैकी बहुतेक वाहने आता मूर्तिभंजक दुष्टांनी भग्न केली आहेत. क्वचितच एखाद्या हत्तीची सोंड शाबूद आहे.[१] वर आरूढ झालेल्या देवदेवतांच्या मूर्तीहि पुष्कळशा तोडल्या आहेत. मूर्तिभंजकांचा हात जेथवर पोचत होता तेथवर बहुतेक मूर्ति भग्न झाल्या आहेत हे पाहून मन अत्यंत उद्विग्न होते. गर्भगृहात श्रीकोप्पेश्वराची उंच पिंडी आहे.[२]

गर्भगृह, अंतराल आणि गूढमंडप हीं बाहेरून तारकाकार असल्याने त्यांवर कोरलेल्या मूर्तींना छायाप्रकाशाच्या समुचित योजनेने सुंदर उठाव मिळतो. या वरच्या भागांवर अनेक सुंदर देवदेवता, सुरसुंदरी, नृत्याच्या विविध अवस्थां-(poses) मध्ये नर्तकी, वादक इत्यादिकांनी देवालयाच्या जंघेचे वरील भाग भरून गेले आहेत. त्यांमध्ये दक्षिण दिशेस गणपति आहे तर उत्तर दिशेस सरस्वती आहे. याशिवाय महिषासुरमर्दिनी, भैरव, विष्णु, ब्रह्मदेव, विविध दिक्पाल वगैरेंचे मोठे शिल्पपट्ट सर्व बाजूंस बसविले आहेत. नर्तकींच्या तर विविध अवस्थांतील मूर्ति असंख्य आहेत.[३] यांपैकी एक दोन मूर्तींचे येथे वर्णन करू.

सरस्वती – हिची मूर्ति देवालयाच्या उत्तर बाजूच्या जंघेवर उंचावर असल्यामुळे अद्यापि सुस्थितीत राहिली आहे.[४] ती पद्मासनात बसली असून तिच्या

१ प्लेट क्र. ११, आकृति क्र. १३ पाहा.

२ प्लेट क्र. १२, आकृति क्र. १४ पाहा.

३ प्लेट क्र. १३; आकृति क्र. १५ पाहा.

४ प्लेट क्र. १४, आकृति क्र. १७ पाहा.

मस्तकावर करंडमुकुट आहे. ती चतुर्भुज आहे. वरच्या उजव्या हातात अंकुश आणि डाव्यात पाश आहे खालच्या उजव्या हातात अक्षमाला आणि डाव्यात पोथी आहे. कानात कुंडले, पायांत पैंजण, हातांत कंकण आणि गळ्यात रत्नहार आहेत. हे सर्वच शिल्प अत्यंत रेखीव आणि कलापूर्ण आहे.

यासारखेच दुसरे एका राजपुरुषाचे शिल्प तत्कालीन वस्त्रालंकारांच्या दृष्टीने उल्लेखनीय आहे.[1] हा राजपुरुष त्रिभंगावस्थेत उभा दाखविला आहे. त्याच्या मस्तकावरचा उंच टोप. गळ्यातील विविध अलंकार, कमरेचे आखूड पण रशनेच्या अनेक लंबमान पदरांनी युक्त असे वस्त्र, कान, हात, पाय इत्यादिकांत घातलेले विविध अलंकार यांनी त्याची मूर्ति रमणीय झाली आहे. त्याच्या मुखावर रम्य हास्य विलसत आहे. ही मूर्ति तत्कालीन शिल्पकौशल्याचे सुंदर उदाहरण आहे.

या शिल्पांत क्वचित विनोदी आकृत्याहि आढळतात. एका शिल्पपट्टात एक नर्तिका नाचण्यात दंग झाली असता एक मुलगा त्यात व्यत्यय आणण्याच्या प्रयत्नात असलेला दाखविला आहे.[2] यांच्याहि वस्त्राभरणांच्या पद्धति तत्कालीन सामान्य जनांच्या रीतिरिवाजांच्या दृष्टीने अभ्यसनीय आहेत.

कोप्पेश्वराच्या मंदिराला बाहेरून लावलेले बहुतेक मोठे शिल्पपट्ट शैवसंप्रदायाच्या मूर्तींचे आहेत. पण क्वचित् ते अन्य संप्रदायाचेहि आढळतात. सभामंडपाच्या बाहेर दक्षिण बाजूस ठेवलेली महावराहाची मूर्ति या दृष्टीने उल्लेखनीय आहे. हिचा खालचा आणि वरचाहि भाग आता भग्न होऊन नष्ट झाला आहे. तथापि अवशिष्ट भागावरूनहि महावराहाच्या भव्य शरीराची आणि प्रलयकाली पृथ्वीला समुद्रातून उचलून काढण्याच्या त्याच्या निश्चयाची प्रतीति येते. असेच गुप्तकालीन शिल्प विदिशेजवळच्या उदयगिरि येथील लेण्यात कोरले आहे, ते सुप्रसिद्ध आहे. कालान्तराने प्रचलित झालेल्या कलासंप्रदायानुसार खिद्रापूरच्या या शिल्पात वस्त्राभरणांचे प्राचुर्य आहे, पण इतर बाबतीत या दोन शिल्पांत बरेच साम्य आहे.

मागे उल्लेखिलेल्या खिद्रापूरच्या शिलालेखात यादव नृपति सिंघणाने देवगिरीस असताना शक संवत् ११३६, श्रीमुख संवत्सर, चैत्र अमावास्येस, सोमवारी (दि. २२ एप्रील सन १२१३ रोजी) झालेल्या सूर्यग्रहणप्रसंगी मिरिंजि (सध्याच्या मिरज) देशातील कूडलकृष्णवेणी आणि भेणसी या नद्यांच्या संगमावरचे कूडलदामवाड नामक गाव श्रीकोप्पेश्वराच्या पूजाअर्चेकरिता दान दिले असे म्हटले आहे.[4] तसेच त्या देवाला पूर्वी दान दिलेल्या जुगुल आणि सिरिगुप्प या दोन गावातील

---

१ प्लेट क्र. १३, आकृति क्र. १६ पाहा.

२ प्लेट क्र. १५, आकृति क्र. १८ पाहा.

३ प्लेट क्र. १६, आकृति क्र. १९ पाहा.

४ क्र. ६३, ओ. १५.

उत्पन्नाचा विनियोग देवळाच्या जीर्णोद्धाराकरिता करावा, असा आदेशहि त्याने दिला होता. 'या कोपेश्वराच्या देवालयाच्या परिसराला दीर्घ कालानंतर समुचित उत्कृष्ट स्थान आणि (यादव नृपतींसारखे) श्रीमान्, बुद्धिमान्, उदार आणि चतुर महापुरुष प्राप्त झाल्यामुळे धर्म भरभराटीस येवो' अशी आशा त्या लेखात व्यक्त केली आहे.[1] पण सिंघणाने हे देवालय पूर्ण करण्याचा प्रयत्न केला नाही. कदाचित् या मंदिराच्या गर्भगृहावरचे सध्याचे ओबड धोबड शिखर त्याच्या काली बांधले असेल. नंतरच्या कालात इस्लामच्या अनुयायांनी तेथील शिल्पाकृतींचा कसा विध्वंस केला याचे वर्णन मागे केले आहे.

सध्या हे मंदिर महाराष्ट्र सरकारच्या पुरातत्त्व खात्याच्या अधिकाराखाली आहे. त्या खात्याने गूढमंडपाच्या पूर्वेच्या भिंतीला दोन दगडी भिंतींचे टेकू देऊन सावरले आहे, पण इतर कांही दुरुस्ती केली नाही. मागे सांगितल्याप्रमाणे मंदिराच्या सभोवार उत्खनन करून त्याच्या अधिष्ठानाचा भाग मोकळा करणे आवश्यक आहे. मंदिराच्या भोवतालचा प्राकार पुष्कळ ठिकाणी पडला आहे. तोहि बांधणे अवश्य आहे. कृष्णा नदीच्या काठचे हे स्थान रमणीय आहे. पुरातत्त्व खात्याने याची योग्य ती काळजी घेतल्यास आणि पर्यटन खात्याने कोल्हापुराहून खिद्रापूरला जवळच्या मार्गाने जाण्यायेण्याच्या रस्त्यांच्या आणि त्या गावात प्रवाश्यांच्या उतरण्याच्या वगैरे सुखसोई केल्यास हे स्थान लोकप्रिय पर्यटनकेंद्र झाल्याशिवाय राहणार नाही.

जैन मंदिरे

कोल्हापूरच्या शिलाहारांनी, त्यांच्या सामंतांनी व अधिकाऱ्यांनी जैन मंदिरे बांधली होती. त्यांपैकी दोन सध्या कोल्हापुरातच आणि एक शिरोळजवळ खिद्रापूर येथे अशी पुरातन मंदिरे विद्यमान आहेत.

रूपनारायण वसति – कोल्हापूरच्या जुन्या शुक्रवार वेशीजवळ गंडरादित्याचा सामन्त निम्बदेवरस याने बांधलेली वसति अद्यापि सुस्थितीत आहे. त्याने तिला आपला सम्राट् गंडरादित्य याचे बिरुद 'रूपनारायण' हेच नाव ठेवले होते. निंबदेवरसाने ही वसति बांधल्याचा स्पष्ट उल्लेख शक संवत् ११०९ च्या तेरदाळ शिलालेखात आला आहे[2] श्रवणबेळ्गोळ येथील लेखातहि तिचा निर्देश आहे.[3]

१ क्र. ६३, ओ. २–६. २ *Ind. Ant.*, Vol, XIV. p 25.

३ या मंदिराचा निर्माता निंबदेव हा शिलाहार नृपति गंडरादित्य याचा सामन्त असल्यामुळे श्रवणबेळ्गोळ येथील एका लेखात त्याला 'सावन्तबसदि' असे म्हटले आहे. *Ep. Carn.*, Vol. II, Introd., p. 61. श्रवणबेळ्गोळ येथील लेखांत रूपनारायण वसति व तेथील आचार्य माघनन्दी यांचे उल्लेख आहेत. *Ibid.*, Introd., pp, 74 and 85.

ही रूपनारायण वसति उंच अधिष्ठानावर बांधली आहे.[१] तिचे अर्धमंडप, सभामंडप, अंतराळ व गर्भगृह असे चार भाग आहेत. हे सर्व आतून चौकोनी आहेत.[२] गर्भगृह मात्र बाहेरून तारकाकार आहे त्यावरचे शिखर उत्तर भारतीय पद्धतीचे साधे आहे. मंदिरासमोर मानस्तंभ आहे.

सभामंडपातले खांब चौकोनी, अष्टकोनी आणि वर्तुलाकार कणीदार होऊन वरच्या तुळयांना आधार देतात.[३] हे सुबक रीतीने कातले आहेत; पण यांवर मूर्तिशिल्प किंवा कलाकुसरी नाही. गर्भगृहात उंच अधिष्ठानावर श्रीपार्श्वनाथ तीर्थंकराची उभी मूर्ति आहे.[४] ती काळ्या प्रस्तराची बनविली असून तिच्या मस्तकावर त्या तीर्थंकराचे लांछन सर्प आहे. याशिवाय सभामंडपात व गर्भगृहात आणखी कांही तीर्थंकरांच्या विशाल मूर्ति ध्यानमग्न असलेल्या बसविल्या आहेत. त्यांच्या पीठांवर त्यांची लांछने किंवा नावे कोरली नाहीत; पण त्या देवळाच्या सध्याच्या पुजाऱ्याने ती शांतिनाथ, ऋषभनाथ, नेमिनाथ अशी सांगितली. या मूर्ति नंतरच्या काळात बसविलेल्या दिसतात, याशिवाय गर्भगृहावरच्या देवळीत बाहुबलीची शुभ्र संगमरवरी मूर्ति बसविली आहे.[५]

कोल्हापुरातील दुसरे प्राचीन जैन मंदिर श्रीमहालक्ष्मीच्या आवारात पूर्वेस होते. त्याचे आता शेषशायीच्या मंदिरात परिवर्तन झाले आहे. हे मंदिर उत्तराभिमुख असून त्याचे अर्धमंडप, सभामंडप व गर्भगृह असे भाग आहेत,[६] अर्धमंडपाच्या एका तुळईवर आणि सभामंडपाच्या छताला आधारभूत अशा आठ लहान तुळयांपैकी एक सोडून एक अशा चार तुळयांवर तत्कालीन लेख कोरला आहे.[७] त्यावरून असे समजते की ते मंदिर आदिनाथ तीर्थंकराचे असून ते गंडरादित्याचा पूर्वोक्त सामन्त निंबदेव यानेच बांधले होते. त्याचे त्या लेखात आलेले वर्णन– ते विशाल व सुंदर होते, त्याच्या दोन्ही बाजूंस बांधलेल्या व्यापाऱ्यांच्या हवेलींनी व गणिकांच्या हर्म्यांनी त्याची शोभा वृद्धिगत झाली होती इत्यादि – त्या मंदिराच्या सध्याच्या स्वरूपावरून अतिशयोक्त वाटते. त्याच्या समोरचा मानस्तंभ आता नष्ट झाला आहे आणि आदिनाथ तीर्थंकराच्या जागी भगवान् शेषशायी विष्णूची प्रतिष्ठापना झाली आहे.

---

१ प्लेट क्र. १७, आकृति क्र. २१ पाहा.

२ या मंदिराचे भूमिमानचित्र, क्र. ३ पाहा.

३ या मंदिरातील एका स्तंभाची आकृति (प्लेट १८, क्र. २२) पाहा.

४ प्लेट क्र. १९, आकृति क्र. २३ पाहा.

५ प्लेट क्र. २०, आकृति क्र. २४ पाहा.

६ या मंदिराचे भूमिमानचित्र, क्र. ४ पाहा.

७ क्र. ५०.

या मंदिराची बांधणी साधी आहे. सभामंडपाचे छत मात्र रूपनारायण मंदिराच्या छताप्रमाणे आतून वर्तुळाकार आहे. त्याच्या पूर्वोक्त कोरीव लेख असलेल्या तुळयांवर उभ्या तीर्थंकरांची रांग कोरली आहे. या मंदिरावरचे शिखर आता नष्ट झाले आहे.

याशिवाय तिसरे तत्कालीन जैन मंदिर ऋषभनाथ किंवा आदिनाथ या तीर्थंकराचे खिद्रापूर येथे अद्यापि सुस्थितीत आहे.[१] ते कोणी बांधले हे निश्चितपणे सांगता येत नसले तरी ते शिलाहारांच्या पूर्वोक्त निंबदेव नामक सामन्तानेच उभारले असावे, असे अनुमान करता येते. शिलाहार गंडरादित्याने खिद्रापूर येथे श्रीकोप्पेश्वराचे देवालय बांधण्यास घेतले त्यावेळीच त्याच्या या जैन सामन्ताने हे जिनालय बांधण्यास आरंभ केला असावा. नंतर शिलाहारांच्या उच्छेदामुळे श्रीकोप्पेश्वराचे मंदिर अपूर्ण राहिले, पण हे मंदिर त्यांच्या पूर्वोक्त जैन सामंताने पूर्ण केले. पूर्वोक्त दोन्ही जैन मंदिरे साधी शिल्पपट्टविरहित आहेत, पण हे मंदिर अनेक शिल्पाकृतींनी सुशोभित केले आहे. विशेष लक्षणीय गोष्ट ही की त्यांतील सरस्वतीदेवीसारख्या कांही शिल्पाकृति श्रीकोप्पेश्वराच्या देवळाला लावलेल्या शिल्पाकृतींसारख्या हुबेहुब आहेत. त्या एकाच शिल्पीने बनविल्या होत्या यात संशय नाही. या प्रमाणावरून या मंदिराचे शिलाहारकालीनत्व सिद्ध होते. या मंदिराचे शिखर इतर शिलाहारकालीन मंदिरांच्या शिखरांपेक्षा जास्त सुंदर आहे. त्याला लहान लहान मूर्तियुक्त सुंदर देवळींच्या आडव्या पट्टयांनी सुशोभित केले आहे.

शिल्पकला

शिलाहारकालीन अनेक देवालये नष्ट झाल्यामुळे तत्कालीन मूर्तिशिल्पांचा अभ्यास करण्याकरिता फारच थोडी साधने आता उपलब्ध आहेत. अंबरनाथ आणि खिद्रापूर येथील देवालयांना लावलेली आणि प्रसंगवशात् उपलब्ध झालेली कांही थोडी मूर्तिशिल्पे यांवरच आपली चर्चा मुख्यतः आधारित राहील.

मूर्तिशिल्पांचे अनेक प्रकार आहेत. त्यांपैकी एक प्रकार पूजनीय मूर्तींचा. ज्या देवतेच्या पूजेकरिता एखादे मंदिर उभारले असते तिची मूर्ति विशेष कौशल्याने घडविली जात असली तर त्यात आश्चर्य नाही. अंबरनाथ आणि खिद्रापूर येथील देवालये शैव संप्रदायाची असल्याने त्यांतील दैवत शिवलिंगरूपाचे होते; पण इतरत्र तत्कालीन मंदिरांत बसविण्याकरिता पूर्णपणे कोरलेल्या मूर्ति (images carved

---

१ प्लेट क्र. २१, आकृति क्र. २५ पाहा.

in the round) यदृच्छेने सापडल्या आहेत. त्यांवरून तत्कालीन शिल्पनिर्माण-कौशल्याची कल्पना करता येते. त्यांपैकी कांहींचे वर्णन येथे करू.

ब्रह्मा – ब्रम्हदेवाची देवालये क्वचितच बांधली जात. सध्या भारतात ती अत्यल्प आहेत. ब्रम्हदेवाच्या मूर्ति सामान्यत: इतर देवांच्या मंदिरातील देवळीत बसविण्याकरिता कोरल्या जात. तशी एक मूर्ति अंबरनाथच्या गर्भगृहाच्या जंघेला लावली आहे.[१] ती आलिंगनमूर्ति प्रकाराची आहे. तिचे वर्णन मागे केले आहे.

ब्रह्मदेवाची देवालये अत्यल्प असल्यामुळे पूजेकरिता बनविलेल्या त्याच्या मूर्ति क्वचितच आढळतात, पण कझेन्सला तशी एक मूर्ति उत्तर कोकणात सोपारा येथे रामकुंडानजीक देवळाजवळ आढळली.[२] ती मूर्ति उभी आणि सावित्रीविरहित असून तिच्या हातात अक्षमाला, स्रुव, पोथी आणि कमण्डलु दाखविले आहेत. त्याच्या दोन्ही बाजूंस उपासक उपासिका आहेत. कांही कारणाने ही मूर्ति पूर्णपणे कोरली गेली नव्हती असे दिसते; कारण तिचे पादपीठ आणि प्रभावळ यांसारखे कांही भाग पूर्णपणे कोरावयाचे राहिले आहेत. पण तिच्या अवशिष्ट रूपावरून तिची गणना तत्कालीन उत्कृष्ट मूर्तींत करण्यासारखी आहे.

श्रीधर – उत्तर कोकणचे शिलाहार शिवोपासक होते. त्यांनी स्वत: विष्णूची देवालये बांधली नसली तरी त्यांच्या राज्यात त्या देवाची कांही देवालये त्याच्या उपासकांनी बांधलेली कोरीव लेखांवरून ज्ञात झाली आहेत. पण ती आता अस्तित्वात नाहीत. तथापि त्यांत बसविलेल्या किंवा त्यांकरिता तयार होत असलेल्या त्या देवाच्या मूर्ति सापडल्या आहेत. त्यांपैकी एक मूर्ति शिलाहारांची राजधानी ठाणे येथेच ठाणा–आग्रा रस्त्यावर जोंधळी बाग भागात सन १९६१ मध्ये सापडलेली विशेषत: उल्लेखनीय आहे.

ही मूर्ति तिच्या हातातील आयुधांवरून 'श्रीधर' प्रकारची आहे.[३] तिची उंची १२५ सें. मी. असून ती समभंग अवस्थेत उभी आहे. तिच्या हातात अक्षमाला, चक्र, गदा आणि शंख, आणि गळ्यात विविध प्रकारचे हार आणि पिळीची कंठी (torque) आहे. भगवान् विष्णूने यज्ञोपवीत आणि चम्पक माला धारण केली आहेत. त्याची मेखला रुंद आणि अनेक पदरी असून तिचे पदर खाली सोडले आहेत. भगवान् विष्णूने कानात कुंडले, हातांत कंकण आणि पायांत सुंदर भूषणे धारण केली आहेत. मस्तकावर उंच करंडमुकुट असून त्यामागे कमलाकृति प्रभावळ दिसते. भगवान् विष्णूची मुद्रा प्रसन्न आणि स्मितयुक्त आहे. त्याच्या उजव्या बाजूस ही मूर्ति घडविणारा उपासक अंजलिमुद्रेत आणि डाव्या बाजूस

---

१ मागे, [पृ. १३२] पाहा. २ प्लेट क्र. १६, आकृति क्र. २० पाहा.
३ प्लेट क्र. २२, आकृति क्र. २६ पाहा.

उपासिका मोदकांनी भरलेले पात्र घेऊन उभी आहे. त्यांच्याजवळच अनुक्रमे वाद्य घेतलेला सेवक आणि शंख घेतलेली सेविका उभी आहे.

या मूर्तीच्या दोन बाजूंस स्तंभावर एक एक देवळी कोरून तीत अंगदेवता कोरावयाच्या होत्या, पण ते काम कांही कारणाने अपूर्ण राहिलेले दिसते. तसेच विष्णूच्या शिरोभागावरील त्रिकोणिके (pedimant) मध्ये इतर मध्ययुगीन मूर्तींच्या प्रमाणे त्याच्या दशावतारांच्या मूर्ति कोरावयाच्या होत्या, पण तो भागहि अपूर्ण राहिला आहे. तथापि प्रस्तुत अपूर्णावस्थेतहि या मूर्तीची गणना तिच्या सुबक कोरीव कामामुळे आणि मुखावरील प्रसन्न भावाविष्कारामुळे तत्कालीन उत्कृष्ट मूर्तिशिल्पांत करता येईल.

शिव – शिवमंदिरांत शिवलिंगाची पूजा होत असल्याने भगवान् शंकराच्या मूर्ति गाभाऱ्यात नसून जंघेवर बसविलेल्या असतात. त्यांमध्ये गर्भगृहाच्या पाठीमागे मध्यभागी रथिकाबिंबात बसविलेली मूर्ति प्रमुख असते. अंबरनाथ येथील देवालयात ही मूर्ति त्रिमुखी आहे. तिचे वर्णन मागे केले आहे [1]

याशिवाय शिवाची अर्धनारीश्वर मूर्ति, कल्याणसुंदर मूर्ति इत्यादि अन्य रूपे अंबरनाथ मंदिराच्या इतर प्रमुख देवळींत बसविली आहेत.

ब्रह्मा, विष्णु आणि शिव या हिंदू धर्माच्या तीन प्रमुख देवतांशिवाय इतरहि कांही देवदेवतांच्या मूर्ति कोकणात सापडल्या आहेत. त्यांमध्ये ठाण्यासच सापडलेली महिषासुरमर्दिनी देवीची मूर्ति विशेष उल्लेखनीय आहे.

महिषासुरमर्दिनी – ही मूर्ति ५८ सें. मी. उंच असून त्रिभंगावस्थेत महिषासुराचा वध करीत असताना दाखविली आहे.[2] तिच्या मस्तकावर किरीटमुकुट, गळयात विविध प्रकारचे हार, बाहुभूषणे, हातांत कंकणे आणि पायांत पैंजण दाखविले आहेत. तिच्या स्तनांना अर्धावृत करणारी काचोळी आणि कमरेला पायघोळ वस्त्र आहे. त्यावर क्षुद्र घंटिकांनी युक्त अशी रुंद रशना असून तिचे मोत्यांचे पदर खाली लोंबत आहेत. तिच्या वरच्या उजव्या हातात खड्ग आणि डाव्यात ढाल आहे. खालच्या उजव्या हातातल्या त्रिशूलाने ती खाली पडलेल्या छिन्नमस्तक महिषातून उद्‌भवलेल्या राक्षसाच्या पोटात त्रिशूल मारीत आहे. खालच्या डाव्या हाताने तिने त्याचे शिर घट्ट पकडून ठेवले आहे. तो राक्षस भयभीत होऊन त्रिशूल आपल्या पोटात खुपसला जाऊ नये म्हणून दोन्ही हातानी त्याला धरून ठेवीत असलेला दाखविला आहे. देवीचे वाहन सिंह खाली तिच्या उजव्या बाजूस असून महिषाचे मांस खाण्यात गुंतलेला दाखविला आहे.

---

१ मागे, [पृ. १३२] पाहा.

२ प्लेट क्र. २३, आकृति क्र. २७ पाहा.

देवीची मूर्ति प्रसन्न आणि आनंदी आहे. शेवटी युद्धात हा बलाढ्य महिषासुर मारला गेल्याबद्दल झालेला आनंद तिच्या मुखावर विलसत आहे. हे शिल्पहि शिलाहारकालीन शिल्पांत उत्कृष्ट गणले जाईल.

कार्त्तिकेय – रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण गावाजवळच्या विन्ध्यवासिनी लेण्यात कांही सुंदर शिलाहारकालीन मूर्ति कोरल्या आहेत. त्यांमध्ये कार्त्तिकेयाची मूर्ति विशेष उल्लेखनीय आहे. षण्मुख कार्त्तिकेय समभंग अवस्थेत उभा असलेला दाखविला आहे. त्याची उंची ७१ सें. मी. आहे. त्याच्या सहाहि मस्तकांवर किरीटमुकुट आहेत. त्याचे कांही हात आता भग्न झाले आहेत. पण इतरांत बाण, गदा, परशु, धनुष्य व कमल ही दिसतात. त्याच्या पादपीठाच्या डाव्या बाजूस त्याचे वाहन मोर आणि उजव्या बाजूस चामरधारी सेवक हे आहेत. मध्ययुगीन शिल्पसंप्रदायानुसार कार्त्तिकेयाने कंठात अनेक सुंदर हारादि अलंकार आणि कमरेत रशना घातलेली दाखविली आहे. त्याची मुद्रा प्रसन्न आहे.[१]

हे शिल्पहि शिलाहारकालीन कलेचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

ही मूर्ति शिलाहारकालीन आहे हे तिच्या धाटणीवरून वाटतेच, पण याशिवाय तिच्या प्राचीनत्वाचा पुरावा 'श्रीवाडेश्वरमहाकाव्यम्' या जुन्या संस्कृत काव्यात सापडतो.[२] हे काव्य कौशिकगोत्री विश्वनाथ नामक द्विजाने शक संवत् १५५० मध्ये (रन्ध्रबाणतिथिसंमिताब्दके शालिवाहनशके गते सति) (सन १६२८–२९ मध्ये) रचले होते. म्हणजे ते जवळ जवळ साडेतीनशे वर्षांइतके प्राचीन आहे. हे काव्य तीर्थमाहात्म्यरूपाचे असून त्याचा उद्देश रत्नागिरी जिल्ह्याच्या चिपळूण तालुक्यातील गुहागर येथील वाडेश्वर नामक शिवालयाची आणि त्याच्या परिसरातील अन्य देवालयांची निर्मिति आणि माहात्म्य वर्णन करण्याचा आहे. या देवालयांमध्ये एके ठिकाणी (५, ८) गुहागर येथील विंध्यवासिनी नामक देवीच्या मंदिराचा उल्लेख आहे. त्याशिवाय या काव्याच्या अकराव्या सर्गात चिपळूण गावाजवळच्या लेण्यातील कार्त्तिकेय आणि विन्ध्यवासिनी या देवतांचा उल्लेख आला आहे –

अथ वाडेश्वरात्प्राच्यां दिशि योजनपंचके ।
उपशल्ये[३] श्वभ्रगृहे[४] बहिश्चित्तपपत्तनात् ।। ३४ ।।

---

१ *Bulletin (No. 9) of the Prince of Wales Museum of Western India*, pp. 37 f. प्लेट क्र. २४, आकृति क्र. २८ पाहा.

२ हे काव्य डॉ. अ. द. पुसाळकर यांनी *Oriental Thought Series* मध्ये क्र. १० रूपाने छापले आहे.

३ 'उपशैलम्' वाचावे.

४ श्वभ्र म्हणजे रंध्र. म्हणून 'श्वभ्रगृह' हा शब्द येथे 'पर्वतात खोदलेले लेणे' या अर्थी योजला आहे.

भगवान् कृत्तिकापुत्रो जामदग्न्यानुरोधत: ।
स महात्मा महसि नो वरीवर्ति यदृच्छया ।। ३५ ।।
कार्त्तिक्यां कृत्तिकायोगे दृष्टो य: शिवयोगत: ।
सप्तजन्मसुविप्रत्वं धनाढ्यत्वं च यच्छति ।। ३६ ।।
तथा भगवती देवी वरदा विन्ध्यवासिनी ।
भक्तानुग्राहकामा सा स्थिता लोकैरुपासिता ।। ३७ ।।

या श्लोकांत गुहागर येथील वाडेश्वर देवालयाच्या पूर्वेस पांच योजनांवर चित्तपनगराबाहेरील पर्वताच्या लेण्यांतील (श्वभ्रगृहे) कार्त्तिकेय आणि विन्ध्यवासिनी यांच्या प्रतिमांचा उल्लेख आहे. चिपळूणचे शिलाहारकालीन नाव चिपुलण होते[1], पण ते विश्वनाथ कवीला माहीत नव्हते. त्याच्या काळी चिपळूण हे चित्तपांचे (चित्पावन ब्राह्मणांचे) मूलस्थान मानले जात असल्याने त्याने त्या नगराचे 'चित्तप' असे नाव कल्पिले आहे. हे चित्तप किंवा चिपळूण गुहागरच्या पूर्वेस सुमारे ५ योजनांवर आहे.[2] त्या जवळच्या पर्वताच्या लेण्यात अद्यापि महिषासुरमर्दिनी आणि कार्त्तिकेय यांच्या मूर्ति कोरलेल्या आढळतात. तेव्हा हे उल्लेख त्यांचेच आहेत यांत संशय नाही.

---

१ क्र. ५, ओ. ४१; क्र ६, ओ. ३९.
२ गुहागराहून पूर्वेच्या चिपळूण गावाचे सरळ रेषेतील अंतर सुमारे २५ मैल आहे.

खण्ड २

शिलाहार राजवंशाचे कोरीव लेख

विभाग १ – उत्तर कोकणच्या शिलाहारांचे लेख

कोरीव लेखांच्या वाचनासंबंधी सूचना

१ काटकोनाकृति [ ] कंसातील अक्षरे मूळात अस्पष्ट आहेत, असे समजावे.

२ काटकोनाकृति कंसातील अक्षरांवर तारकाचिन्ह * असल्यास ती अक्षरे मूळ लेखात अस्पष्ट असून ती अनुमानाने दिली आहेत, असे समजावे.

३ वर्तुळाकार ( ) कंसातील अक्षरे शुद्ध पाठाची आहेत, असे समजावे.

क्र. १

पुल्लशक्तीचा कान्हेरी लेण्यातील लेख : [शक] संवत् [७६५]

हा लेख आणि पुढील क्र. २ व ३ हे लेख मुंबईजवळच्या कान्हेरी लेण्यात कोरले आहेत. प्रस्तुत लेख क्र. १० च्या लेण्याच्या समोरच्या क्र. ७८ लेण्याच्या शीर्षपट्टीवर कोरला आहे. हा लेख अतिशय खराब अवस्थेत आहे. याची यथादृष्ट प्रत प्रथम वेस्टसाहेबाने रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या जर्नल (व्हॉ. ६) मध्ये प्रसिद्ध केली होती. नंतर तो कीलहॉर्नने इंडियन अँटिक्वरी (व्हॉ. १३, पृ. १३३ इ.) संपादिला.[१]

अक्षरवटिका नागरी आणि **भाषा** संस्कृत आहे. **विषय** – महाराजाधिराज, परमेश्वर, पृथ्वीवल्लभ श्रीमान् (राष्ट्रकूट सम्राट्) **(प्रथम) अमोघवर्ष** (सु. सन ८१४–८८०) याच्या कृपेने ज्याला सर्व कोकण देश मिळाला होता त्या **पुल्लशक्तीच्या** काळचा हा लेख आहे. हा पुल्लशक्ति **श्रीकपर्दी** नामक आपल्या पित्याच्या पायांचे चिंतन करीत होता आणि **पुरी**प्रभृति सर्व **कोकणावर** राज्य करीत होता, असे त्याचे वर्णन आहे.

लेखाचा उद्देश – सर्वाध्यक्ष **पूर्णहस्ताचा** पुत्र अमात्य **विष्णुगुप्त** याने **कृष्णगिरि** येथे भगवान् (बुद्धाच्या) पूजेकरिता वीस द्रम्म, विहाराच्या दुरुस्तीकरिता तीन द्रम्म, भिक्षूंच्या चीवरांकरिता पाच द्रम्म आणि पुस्तकांकरिता एक द्रम्म (प्रतिवर्षी) मिळावा म्हणून प्रत्येकी ४० द्रम्मांच्या दोन आणि १२० द्रम्मांची एक अशा रकमा तेथील भिक्षुसंघाजवळ अक्षयनीवि (कायम ठेवी) म्हणून ठेवल्या होत्या.

लेखाच्या शेवटी (शक) संवत् ७६५ चा उल्लेख होता. पण तो आता अगदी अस्पष्ट झाला आहे.

स्थलनिश्चय – **कृष्णगिरि** म्हणजे कान्हेरी. **पुरीचे** स्थान निश्चित नाही. कोणी ती घारापुरी तर कोणी ती जंजिऱ्याजवळची राजपुरी म्हणतात. याविषयी चर्चा इतिहास भागात केलेली आहे.

---

१ *J. B. B. R. A. S.*, Vol. VI (1862), p. 8; *Ind. Ant.*, Vol. XIII, pp. 133 f.

ओळ	वाचन[1]
१	सिद्धम्[2] [।*] [श्री] महाराजाधिराजपरमेश्वरपृथ्वीवल्लभश्रीमदमोघवर्षश्रीमहारा[ज्ञः][3]प्रवर्द्धमानविजयराज्ये तत्प्रसा[दावाप्त]-महा[सा]मन्तको-
२	ङ्कणवल्लभ[श्रीकपर्द्दिपादानुध्यात]श्रीपुल्लशक्तिम[हाधिपे] पुरीप्रभृतिकोङ्कणविषयं [समग्रं[4]] प्रशासति तत्पादोपजीवी[5] पुराणामात्यो [भद्र–[6]]
३	श्रीविष्णु[गुप्तः*] [सर्वाध्यक्ष]श्रीपूर्ण्णहरिसुतः श्रीकृष्णगिरौ श्रीमदार्यसङ्घं प्रणम्यातिकृपया श्रीभगवतः पू[जार्थं][7] विंशतिं [द्रम्माणां*]
४	[इहास्मिन्नेव विहारे व्यस्तव्याकीर्ण्णपरिष्करणार्थं द्रम्माणां[8]]त्रयं चीवरीयो [आर्यसंघस्य द्रम्माणां पञ्च दापनीयाः पुस्तकार्त्थमेको द्रम्मः[9]]

---

१ श्री. एम्. एन्. देशपांडे यांनी पाठविलेल्या छापावरून.

२ चिह्नाने प्रदर्शित. कीलहॉर्नने ते चिह्न ओंकाराचे मानले आहे, पण प्राचीन लेखात ते 'सिद्धम्'चे द्योतक असते.

३ 'महाराजस्य' वाचावे.

४ कीलहॉर्नने येथे 'सर्वतः' वाचावे असे सुचविले आहे; पण या संदर्भात 'समग्रं'चा प्रयोग आढळतो.

५ कीलहॉर्नने येथे 'पादानुजीवी' असे वाचले आहे; पण 'दो'ची मात्रा स्पष्ट आहे आणि पुढील अक्षरहि 'प' दिसते. या संदर्भात 'पादोपजीवी' इतरत्र योजलेले आढळते.

६ ही अक्षरे आता अस्पष्ट झाली आहेत. वेस्टच्या यथादृष्ट प्रतीतहि ती तशीच दाखविली आहेत. वरील वाचन कीलहॉर्नचे आहे.

७ कीलहॉर्नने येथे 'भगवत्प्रीत्यर्थं' वाचले आहे.

८ कंसातील अक्षरे वेस्टच्या यथादृष्ट प्रतीत तशी छापातहि अस्पष्ट आहेत. वरील वाचन कीलहॉर्नचे आहे.

९ ही अक्षरेहि आता अस्पष्ट आहेत. वरील वाचन कीलहॉर्नचे आहे.

५ [अक्षैनीविर्द्रम्मा[१]]श्चत्वारिंशच्चत्वारिंशदिह । एकं द्रम्मशतं[२] विंशत्युत्तरं । एतेषां द्रम्माणां[३] कलत्र[पुत्रव]त्प्रतिपालनीया[:*] सम्वत्[४] [७६५][५]

क्र. २

द्वितीय कपर्दीचा कान्हेरी लेण्यातील लेख : शक संवत् ७९९

हा लेख कान्हेरी येथील क्र. १० चे दरबार किंवा महाराज लेणे, याच्या व्हरांडयाच्या शीर्षपट्टीवर कोरला आहे. याचीहि यथादृष्ट प्रत व वाचन अनुक्रमे वेस्ट आणि कीलहॉर्न यांनी केले आहे.[६]

वर्णन – हा लेख सहा ओळींचा आहे. पहिल्या तीन ओळी प्रत्येकी ११' ८" लांब, नंतरच्या दोन प्रत्येकी १७' ८" आणि शेवटची ११' ८½" लांब आहे. लेख साधारणतः बऱ्या स्थितीत आहे.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे.

---

१ हीहि अस्पष्ट आहेत. कीलहॉर्नचे वाचन वर दिले आहे. 'अक्षयनीवि' वाचावे.

२ कीलहॉर्नने 'काञ्चनद्रम्मशतं' असे वाचले, पण ते चूक आहे. यथादृष्ट प्रत व छाप यांवरून वरील वाचन बरोबर आहे. यासंबंधी विवेचन आमच्या संशोधनमुक्तावलि : सर ५, पृ. १५५ वर पाहावे.

३ 'एते द्रम्माः' असे वाचावे.

४ कीलहॉर्नने 'सम्व' एवढेच वाचले होते, पण यथादृष्ट प्रतीत 'सम्वत्' आढळते. 'संवत्' असे वाचावे.

५ हे अंक आता पूर्णपणे नष्ट झाले आहेत. वेस्टच्या यथादृष्ट प्रतीतहि ते आढळत नाहीत. कीलहॉर्नला या वाचनाबद्दल संशय वाटत होता.

६ *J. B. B. R. A. S.*, Vol. VI, pp. 1 f.; *ibid*, Vol. XIII (1878), pp. 11 -- 12 ; *I. C. T. W. I.*, (1881), pp. 61 f.; *Ind. Ant.*, Vol. XIII, pp. 133 f.

विषय– परमभट्टारक महाराजाधिराज परमेश्वर **जगत्तुंगदेव** (राष्ट्रकूट सम्राट् तृतीय गोविंद) याच्या पायांचे चिंतन करणाऱ्या आणि तीच बिरुदे धारण करणाऱ्या (**प्रथम**) **अमोघवर्ष** याच्या काळचा हा लेख आहे. याची मिति **गत शक संवत् ७७५, प्रजापति संवत्सर, आश्विन कृष्ण द्वितीया, बुधवार** (इंग्रजी तारीख १५ सप्टेंबर सन् ८५१) अशी दिली आहे. पण या तारखचे, शक संवत् ७७३ असावयास पाहिजे, शक संवत् ७७५ नव्हे. कोरक्याने संवत्सर कोरताना चूक केली आहे.[१]

या काळी **अमोघवर्षाचा** श्रेष्ठ महासामन्त **शिलाहार द्वितीय कपर्दी समग्र कोंकणाचा** अधिपति म्हणून राज्य करीत होता. त्याचे वर्णन त्याच पदव्या धारण करणाऱ्या (त्याच्या पित्याच्या) पुल्लशक्तीच्या पायांचे चिंतन करणारा म्हणून आले आहे.

उद्देश – द्वितीय कपर्दीच्या शासनकालात **गौड** देशाहून आलेला सुगताचा (बुद्धाचा) परमभक्त **गोमी अविघ्नाकर** याने **कृष्णगिरि** येथे महाराज-महाविहारामध्ये राहणाऱ्या भिक्षूंच्या चीवरांकरिता आणि ध्यानधारणेकरिता आवश्यक ते लेणे खोदण्याकरिता शंभर द्रम्मांची अक्षयनीवि (कायमची ठेव) ठेवली आहे. या ठेवीवरील व्याज यावज्जीव त्याला मिळावे आणि नंतर योग्य अधिकाऱ्यांनी त्याचा वरीलप्रमाणे उपयोग करावा. याला साक्षी म्हणून **चिख्यल्ल-पल्लिकेचा** आचार्य **पत्तियाणकयोग** याचा निर्देश केला आहे.

स्थलनिश्चिति – **गौड**विषय म्हणजे पश्चिम बंगाल. **कृष्णगिरि** हे अर्थातच कान्हेरी पर्वताचे प्राचीन नाव. **चिख्यल्लपल्लिका** हे कान्हेरी लेण्यांच्या पूर्वेस सुमारे २० मैलावरचे कल्याण तालुक्यातील चिखलाली असावे.

ओळ **वाचन**[२]

१ **सिद्धम्**[३] **[।*] स्वस्ति [।*] शकनृपकालातीतसम्वत्सर**[४]**शतेषु सप्तसु पंचसप्ततिष्वंकतः[अपि सम्व]त्सरशः**[५] **७७५ तदन्तर्गत**

---

१ Kielhorn, *Inscriptions of Southern India*, p. 15.

२ श्री. एम्. एन्. देशपांडे यांनी पाठविलेल्या छापावरून.

३ चिह्नाने प्रदर्शित.

४ 'संवत्सर –' वाचावे.

५ 'संवत्सरशः' वाचावे.

प्रजापतिसम्वत्सरान्तःपाति आश्विन[१]व(ब)हुलद्वितीया[यां बुध-]दिने अस्यां सम्व[त्सर]-[२]

२ मासपक्षदिवसपूर्वायां तिथौ परमभट्टारकमहाराजाधिराजपरमेश्वरश्रीभज्जगत्तुंगदेवपादानुध्यातपरमभट्टारकमहाराजाधिराजपरमेश्वरश्रीमदमोघवर्षदेवप्रवर्द्धमा–

३ नविजयराज्ये तत्प्रसाकृतः अशेषकोंकणवल्लभ:[३] श्रीपुल्लशक्तिः समधिगतपंचमहाशव्द(ब्द)महासामन्तशेखरः तत्पादानुध्यातसमधिगतपञ्चमहाशव्द(शब्द)महासा[म]न्तशेखरः[४]श्रीकपर्द्दिरा[ज्ञः[५] प्रवर्द्ध–*]

४ मानविजयराज्ये इहैव गौडविषयादागतः परमसै(सौ)गतः गौमिनः अविघ्नाकरेण अस्मीं[६] श्रीकृष्णगिरिमहाराजमहाविहारे उपशमकालिक[वेश्मिकाः[७] सची]वरिकासमेता[८] अक्षैनीतिः[९] द्रम्मशतैकेन कारापिता[:*] इयं चाक्षयनीती[१०]र्यावदहं जीवामि तावन्ममोपभोगः [।*] ममोपरतौ क्ष(कु)शलै[:*] कारी निरूप्यान(व)श्यं दा–

५ तव्या न परिपन्थना कार्या[।*] यः प्रलेपिष्यति स अवीचिपरी[११] [तापकुम्भी]पाकादिषु नरकेषूत्पत्स्यते श्वानोद्गीर्णगोमांसं स

---

१ ‘संवत्सरान्तःपात्याश्विन –’ वाचावे.

२ ‘संवत्सर –’ वाचावे.

३ ‘तत्प्रसादीकृताशेषकोंकणवल्लभः’ वाचावे.

४ ‘शेखरस्य’ वाचावे.

५ ‘श्रीकपर्द्दिराजस्य’ वाचावे.

६ ‘गौडदेशादागतेन परमसौगतेन गोमिनाविघ्नाकरेणास्मिन्’ वाचावे.

७ कीलहॉर्नने ‘कोल्हिवेश्मिकाः’ असे वाचले होते, पण अक्षरांचे अवशेष आणि यथादृष्ट प्रत यांवरून वरील वाचन दिले आहे.

८ ‘सचीवरिकाः’ वाचावे.

९ ‘अक्षयनिविः’ वाचावे.

१० ‘चाक्षयनीवि–’ वाचावे.

११ ‘प्रलोपयिष्यति सोवीचिपरी –’ वाचावे.

भक्षयिष्यत्येवं व्यवस्था चार्यसंघस्य पुरतो आरोच्य[१] प्रतिष्ठाप्य लिखापिता [।*] साक्षिणश्चात्र पात्तियाणकयोगनामा चिख्यल्लपल्लिकाआचार्यश्चात्र[२] साक्षी । पुण्यं म[न्त्री]-साक्षि[णां] भो

६ भो दि. . . . व्वीं[3] कदाचीदपात्रं स[त्वापा]चारिणो[४] साध्वाचारस्य प्रतिपादयिष्ये स पात्रेणापतिष्ठे[५]त्तस्य पा[पाद-*] र्शनादेवावश्यं दातव्यं(व्यम्।) अत्र य[क्षि]चि[६]दूनाक्षरमधिका[क्षरं] तत्सव्वं प्रमाणामि[ति][।*]

क्र. ३

द्वितीय कपर्दीचा कान्हेरी लेण्यातील लेख : शक संवत् ७९९

क्र. १ च्या लेखाप्रमाणे हा लेखहि कान्हेरी येथील दरबार किंवा महाराज लेणे क्र. १० च्या समोरील क्र. ७८ च्या लेण्याच्या शीर्षपट्टीवर कोरला आहे.[७]

वर्णन – हा लेख सहा ओळींचा असून त्यांपैकी पहिल्या पांच ओळी ७ इं. लांब आहेत. याशिवाय जवळच्या एका स्तंभाच्या शीर्षावर कांही अक्षरे कोरली आहेत. त्यांचाहि संबंध या लेखाशी असावा.

---

१ ‘पुरत आरोच्य’ वाचावे.

२ ‘चिख्यल्लपल्लिकाचार्यश्चात्र’ वाचावे.

३ कीलहॉर्नने येथे ‘दिव्यबुद्धश्री’ असे वाचले होते, पण अक्षरांच्या अवशेषांवरून ते समर्थित होत नाही.

४ ‘कदाचिदपात्रस्य सत्त्वापाचारिणः’ वाचावे.

५ येथे ‘स पात्रत्वेनोपतिष्ठेत्’ असे विवक्षित असेल.

६ ‘यत्किञ्चिद्–’ वाचावे. इतरत्र सुद्धा ‘त्कि’ बद्दल ‘क्षि’ कोरलेले आढळते.

७ *J. B. B. R. A. S.*, Vol. VI (1862), pp. 1 f.; *ibid*, Vol. XIII (1878), pp. 11-12; *I. C. T. W. I.* p. 52 ; *Ind. Ant.* Vol. XIII, pp. 133 f.

३. द्वितीय कपर्दीचा कान्हेरी लेण्यातील लेख : शक संवत् ७९९ : ९

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे.

विषय – हा लेख (राष्ट्रकूट सम्राट्) **प्रथम अमोघवर्ष** याच्या काळचा असून त्यात त्याच्या 'महाराजाधिराज' आणि 'परमेश्वर' या पदव्यांचा निर्देश आहे. नंतर त्याच्या कृपेने प्राप्त झालेल्या **कोंकणाचा** अधिपति आणि महासामन्तांमध्ये श्रेष्ठ अशा (शिलाहार) **कपर्दीच्या** शासनाचा उल्लेख आहे. लेखाचा काल **गत शक संवत् ७९९** (सन ८७७–७८) आहे. आवश्यक त्या वारादिकांच्या अभावी नक्की तारीख सांगता येत नाही.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश द्वितीय कपर्दीच्या कारकीर्दीत **वैव** नामक गृहस्थाने कृष्णगिरि येथील महाविहाराच्या आर्य–भिक्षुसंघाला भिक्षूंच्या ध्यानधारणेकरिता दालन आणि आवश्यक अशा वस्त्रादि वस्तु यांकरिता १०० द्रम्म देऊन अक्षयनीवि (कायमची ठेव) केली, हे नमूद करण्याचा होता.

स्थलनिश्चय – **कृष्णगिरि** म्हणजे कान्हेरी.

ओळ **वाचन**[1]

१ **सिद्धम्[2] [।*] स्वस्ति [।*] शकनृपकालातीतसम्वत्सरशतेषु[3] सप्तसु नवनवत्यधिकेष्वंकतः ७९९ महाराजाधिराज[परमेश्वर-**

२ **श्री–]मदमोघवर्षदेवप्रवर्द्धमानविजयराज्ये तत्प्रसादीकृतकोंकण-वल्लभमहासामन्तशेखरश्रीकप[र्द्दि]प्रवर्द्धमानाधिपत्ये श्रीमत्कृ-ष्णगिरि[महावि–]**

३ **हारे भद्रश्रीवैव[:*][4] भिक्षूणां तत्रस्थार्य[संघस्य] द्रम्माणां शतमेकं दत्वो(त्वो)पशमनसदृशां चीवरिकादिलाभसमन्विता कालिवेश्मिकां[5] कृत्वा [न्यवीविश[6]]त्सेयमार्यभि[क्षो[7]]रे–**

---

१ श्री. एम्. एन्. देशपांडे यांनी पाठविलेल्या छापावरून.

२ चिह्नाने प्रदर्शित.

३ 'संवत्सरशतेषु' असे वाचावे.

४ कीलहॉर्नने 'विष्णुर्भिक्षूणां' असे वाचले आहे.

५ कीलहॉर्नने क्र. २ प्रमाणे येथेहि 'कोल्हिवेश्मिकां' असे वाचले, पण छापा-वरून वरील वाचनच बरोबर वाटते.

६ ही अक्षरे अस्पष्ट आहेत. यासारख्या संदर्भात ती अजंठाच्या एका लेखात येतात म्हणून कीलहॉर्नने ती तर्काने दिली आहेत. कॉ. इ. इं. व्हॉ. ५, पृ. १०९ पाहा.

७ हे अक्षर नष्ट झाले आहे.

४ वानुकम्पामुपादाय यावच्चन्द्रार्क्कादयः प्रतपन्ति[१] तावत्प्रतिपाल्या [।*] यस्तु न प्रतिपालयिष्यति स पंचानन्तर्यकर्म्मकार्यवीच्यादिषु महद्दुःखमनुभविष्यति[।*]व्यवस्थेयं

५ [आ]चार्यसंघस्य पुरत[२] आरोच्य प्रतिष्ठाप्य लिखापिता। साक्षिणश्चात्राचार्यधर्माकरमित्रः गोम्यविघ्नाक[रः] पत्तियानयोगः[३] पुण्येन चि [रमेति*]श्री [:] [कृ-][४]

६ त्वापि यत्नतः[५] [।*]

क्र. ४

छद्वैदेवाचा प्रिन्स ऑफ वेल्स् म्यूझियम ताम्रपट

हा ताम्रपट कोठे सापडला ते माहीत नाही. पण तो जॉर्ज द कुन्हा यांच्या संग्रहात होता[६]. तो सध्या मुंबईच्या प्रिन्स् ऑफ वेल्स् म्यूझियममध्ये आहे.

---

१ कीलहॉर्नने येथे 'प्रतपन्विता' वाचून 'प्रतापान्विता–' असे त्याचे शुद्ध रूप सुचविले आहे. पण येथे आमचे वाचनच बरोबर आहे.

२ कीलहॉर्नने 'पुरतो' असे वाचले आहे, पण येथे ओकार स्पष्ट नाही. 'त' पुढील उभी रेघ अविवक्षित असावी.

३ कीलहॉर्नने क्र. २, ओ. ५ यातील 'पत्तियाणकयोगनामा' या वाचनावरून येथे पत्तिया[णक]योगः असे वाचले, पण छापावरून आमचे वरील वाचनच बरोबर वाटते. 'या' आणि 'न' यांमध्ये लेण्याच्या भिंतीचा भाग ठीक नसल्यामुळे कांही जागा सोडलेली दिसते.

४ कीलहॉर्नने येथे 'पुण्येन तिरेमेति[श्री]अ' असे वाचले पण येथील अक्षरे खराब झाली आहेत.

५ वेस्टच्या यथादृष्ट प्रतीवरून ही अक्षरे वाचली आहेत. ती एका स्तंभाच्या शीर्षावर कोरली आहेत असे त्याने म्हटलें आहे. ज. बॉं. ब्रॅं. रा. ए. सो., व्हॉ. ६, पृ. १० पाहा.

६ *Progress Report of Arch. Surv. of Western India, Western Circle*, for 1919-20, pp. 55-56; *Ep. Ind.* Vol. XXVI, pp. 282 f.; Altekar, *Rāshṭrakūṭas and Their Times*, pp. 100-109.

वर्णन – या ताम्रपटाचे तीन पत्रे असून त्यांची लांबी ७·४ इं. आणि रुंदी ६ इं. आहे. त्यांचे एकूण वजन १७५ तोळे आहे. प्रत्येक पत्र्याच्या वरील भागी कडीकरिता .५ इं. चे छिद्र आहे, पण कडी किंवा मुद्रा सापडली नाही. सर्व लेख उत्तम स्थितीत आहे.

अक्षरवटिका नागरी लिपीची असून **भाषा** संस्कृत आहे. लेख घसीटी लिपीत लिहिला असून अत्यंत निष्काळजीपणाने कोरला आहे. प्रस्तुत ताम्रपटाच्या वेळी उत्तर कोकणच्या शिलाहार शासनांचा राजप्रशस्तिपर भाग सांचेबंद झाला नव्हता. म्हणून यांतील तो भाग इतर ताम्रपटांतल्यापेक्षा निराळा आहे. तथापि त्यात दक्षिण कोकणच्या शिलाहार रट्टराजाच्या शक संवत् ९३० च्या ताम्रपटा-तला एक श्लोकार्ध व एक पूर्ण श्लोक आढळतो हे उल्लेखनीय आहे.[1]

विषय – प्रस्तुत लेख उत्तर कोकणच्या **शीलार** (शिलाहार) नृपति महासामन्त **छद्वैदेव**[2] याने आपला वडील भाऊ **गोग्गिराजाचा** पुत्र **वज्जडदेव** याने दिलेले, पण त्याच्या हयातीत ताम्रपटावर न कोरलेले, दान नमूद करण्या-करिता कोरविला होता.[3] ते दान **पाणाड** विषयातील **सालाणक** गावाच्या पूर्वभागी असलेल्या तीन शेतांचे होते. त्यांच्या सीमा येणेप्रमाणे – पूर्वेस **मंचकपल्लीसीमा,** दक्षिणेस **वकोला** गावास जाण्याचा मार्ग व क्षार क्षेत्र, पश्चिमेस खड्डा आणि उत्तरेस दोन ओढयांचा संगम. हे दान **चन्द्रग्रहण**प्रसंगी **जह्नुपुर** येथील काश्यप-गोत्री **चाडदेव** नामक ऋग्वेदी ब्राह्मणाला बलि, चरु वगैरे पंचमहायज्ञांच्या अनुष्ठानाकरिता दिले होते.

---

१ प्रस्तुत ताम्रपटाच्या श्लो. ७ चा पूर्वार्ध खारेपाटण ताम्रपटाच्या (क्र. ४१) तिसऱ्या श्लोकाचा पूर्वार्ध म्हणून आला आहे. तसेच तृतीय कृष्णाच्या वर्णनपर असलेला श्लो. क्र. ११ त्याच संदर्भात (श्लोक क्र. ६) त्या ताम्रपटात आढळतो.

२ या राजाचे नाव चारदा प्रस्तुत ताम्रपटात आले आहे. श्लो. १६ आणि २५, तसेच ओ. ४२ व ७५ पाहा. पहिल्या दोन ठिकाणी ते अस्पष्ट आहे, पण इतरत्र ते निश्चित आहे. श्लो. २५ मध्ये ते 'छदय' आणि इतरत्र 'छद्वै' असे दिसते.

३ प्रस्तुत ताम्रपट निष्काळजीपणे लिहिला व कोरला असल्यामुळे ओ. ४९ वरून हे दान छद्वैदेवानेच दिले, असे वाटते. पण ओ. ७४ व ७५ वरून स्पष्ट दिसते की ते दान (प्रथम) वज्जडाने केले होते आणि छद्वैदेवाने फक्त ते ताम्रपत्रनिविष्ट केले.

काल – या लेखात कालाचा निर्देश नाही आणि यात उल्लेखिलेले चन्द्रग्रहण केव्हा झाले ते सांगता येत नाही. पण छद्वैदेव हा राष्ट्रकूट नृपति तृतीय अमोघवर्ष (सु. सन ९३६–९३९) चा किंवा त्याचा पुत्र तृतीय कृष्ण याचा मांडलिक होता असे श्लोक १६ वरून दिसते. त्यावरून तो दहाव्या शतकाच्या मध्यात होऊन गेला असावा. त्याचा पुतण्या अपराजित याचे जंजिरा (क्र. ५ व ६) आणि भादान (क्र. ७) ताम्रपट अनुक्रमे शक संवत् ९१५ (सन ९९३–९४) आणि ९१९ (सन ९९७–९९८) या वर्षी दिले होते.

विषय – देवतास्तुतीनंतर प्रथम **राष्ट्रकूट** सम्राटाची वंशावळ दिली आहे. तीत खालील नृपतींचा उल्लेख आहे – **दन्तिदुर्ग**; त्याचा मुलगा (**प्रथम**) **कृष्णराज**; (**द्वितीय**) **गोविन्द**; **निरुपम** (ध्रुव); त्याचा पुत्र **जगत्तुंग** (**तृतीय गोविंद**); त्याचा पुत्र (**प्रथम**) **अमोघवर्ष**; त्याचा पुत्र **अकालवर्ष** (**द्वितीय कृष्ण**); त्याचा पौत्र (**तृतीय इंद्र**). आठव्या श्लोकात म्हटले आहे की (**तृतीय**) इंद्राचा बन्धु (**तृतीय**) **अमोघवर्ष** याने (त्या इंद्राचा पुत्र) अन्यायकारक **गोज्जिग** (चतुर्थ गोविन्द) याचा समूळ उच्छेद करून पृथ्वीवर राज्य केले. येथे तृतीय इंद्राचा पुत्र द्वितीय अमोघवर्ष याचे नाव गाळले आहे. तसेच चतुर्थ गोविन्दाने कोणता अन्याय केला हेहि सांगितले नाही.[१]

दहाव्या श्लोकात तृतीय अमोघवर्षाने तीन राजछत्रे धारण केली होती, जणू काय चन्द्र त्याला भगवान् शंकर समजून तीन रूपे धारण करून त्याची सेवा करीत होता. ही तीन राजछत्रे त्याचे तीन देशांचे आधिपत्य सूचित करीत असावी, पण त्या देशांचा निर्देश यात नाही. त्याचा पुत्र तृतीय कृष्ण याच्या देवळी ताम्रपटावरून त्याने युवराज असताना गंगवाडीचा अधिपति राचमल्ल याला ठार मारून त्याचे राज्य भूतार्य (बूतुग) याला दिले होते,[२] तसेच नोलम्बवाडीचा पल्लव अण्णिग याचीहि दुर्दशा त्याने केली होती. ही दोन राज्ये तेव्हा राष्ट्रकूट साम्राज्यात समाविष्ट झाली होती. तिसरे राज्य कुन्तल देशाचे. अशी ती तीन राज्ये असावी.

तृतीय अमोघवर्षानंतर त्याचा पुत्र **तृतीय कृष्ण** याचे वर्णन ठरीव ठशाचे आले आहे.

श्लोक १६ पासून **शिलाहारांची** वंशावळ सुरू होते. त्यांच्या **सीलार** नामक पूर्वजाने जामदग्न्याच्या (परशुरामाच्या) बाणापासून सागराला संरक्षण

---

१ याची चर्चा आम्ही इतरत्र केली आहे. *Ep. Ind.*, Vol. XXVI, pp. 284 f.

२ *Ep. Ind.*, Vol. V, pp. 192 f.

दिले म्हणून त्याच्या वंशजांना 'सीलार' नाव पडले अशी त्या वंशनामाची अभिनव व्युत्पत्ति येथे दिली आहे.[१]

श्लोक २०–२५ मध्ये शिलाहारांची पुढील वंशावळ आली आहे – **(प्रथम) कपर्दी**; त्याचा पुत्र **पुल्लशक्ति**; त्याचा पुत्र **(द्वितीय) कपर्दी**; त्याचा पुत्र **वप्पुवन्न**; त्याचा पुत्र **झंझ**; त्याचा लहान भाऊ **गोग्गि**; त्याचा पुत्र **(प्रथम) वज्जड** आणि शेवटी त्याचा धाकटा भाऊ **छद्वय** (किंवा छद्वैदेव). त्याला 'महासामन्त' पदवी आणि पंचमहाशब्दाचा अधिकार प्राप्त झाला होता.

छद्वैदेवाचे नाव शिलाहारांच्या इतर ताम्रपटांत येत नाही. याचे कारण तो सरळ पूर्ववंशावळीत येत नव्हता हे असू शकत नाही. कारण तशाहि शिलाहार राजांची नावे त्यांच्या ताम्रपटांत आढळतात. प्रस्तुत ताम्रपट बनावट दिसत नाही. नंतरच्या वंशावळीतून त्याचे नाव गाळण्याचे कारण बहुधा त्याने आपल्या वडील भावानंतर कांही काल गादी बळकावली होती, हे असावे.

स्थलनिश्चय – पाणाड विषयाचे (जिल्ह्याचे) मुख्य गाव पाणाड हे कुलाबा जिल्ह्यातील कुलाब्याच्या उत्तरेस ८ मैलांवरचे पोयनाड असावे. **सालाणक** त्याच्या आग्नेयेस ८ मैलांवरचे सालिंदे दिसते.[२] **वखोली** हे त्याच्या दक्षिणेस चार मैलांवरचे कोलेति असण्याची शक्यता आहे. **जन्हुपुराला** जुळेल असे स्थलनाम सध्या कुलाबा जिल्ह्यात आढळत नाही.

ओळ **वाचन**[३]

पहिला पत्रा

१ **सिद्धम्**[४][।*] **श्रीर्व्वर्द्धतां नवोद्यानराजीवायतनेत्रया । शिवः सहोमया चास्तां राजीवायतनेत्रया**[५]।।[१।।*]

---

१ ब्रह्माण्डपुराण (३, ५७, श्लो. ४७ इ.) मध्ये परशुरामाच्या बाणाने उत्पन्न झालेल्या भीतीचे वर्णन आहे. वरुणाने शेवटी परशुरामाला शरण येऊन शूर्पारक क्षेत्रातून समुद्राला हटविले, असे तेथे वर्णिले आहे. पण त्या संदर्भात सीलाराचा उल्लेख नाही.

२ पाणाड आणि सालाणक यांचा उल्लेख जंजिरा ताम्रपट (क्र. ६) मध्येहि येतो. ओ. ६२ पाहा.

३ ए. इं., व्हॉ. २६ मधील पृ. २९०–२९१ यांच्या समोरील प्रतिमेवरून.

४ चिन्हाने प्रदर्शित.

५ श्लो. १–५ चे वृत्त अनुष्टुभ्.

२ स वोव्याद्वेधसा धाम यन्नाभिकमलं कृतं(तम्) । हरश्च यस्य कान्तेंदुकलया कमलंकृतम् ।। [२।।*]

३ नेत्त्रादत्त्रेरभूद्भूरिसुधां[शुः] तर्प्पितामरः। चंद्रमा जगदानन्द-कन्दकन्दलनक्षमः ।। [३।।*]

४ तस्यांगजोजनि वु(बु)धो विवु(बु)धाधीशपूजितः । सुतः पुरूरवा-स्तस्य तस्याप्यायुरजायत ।।[४।।*]

५ एवमच्छिन्नसंतानजायमानेषु राजसु । ययातिरभवत्तस्य सूनुर्यदुर-भूदिह ।।[५।।*]

६ ततस्तृलोकी[1]तिलकायमानो वंशो यदूनामभवत्पृथिव्यां(व्याम्)। श्रीराष्ट्रकूटापरनामधेयो

७ यत्त्राभिलेभे हरिरा[त्म]जन्म[2]।।[६।।*]तत्त्रासीद्दन्तिदुर्गः प्रभुरपि च ततः कृ[ष्ण]राजः पि-

८ तृव्यस्तस्माद्गोविंदराजस्तदनु ति(नि)रुपमोस्मज्जगत्तुंगदेवः । पुत्त्रोस्यामोघव-

९ [र्षः] सकलगुणनिधिः तस्य चाकालवर्शः(र्षः)।[3] तन्नप्ता श्रीन्द्रराजः प्रथितपृथु[य*]शाः सार्व्व-

१० भौमः प्रजातः[4]।।[७।।*] श्रीमानमोघव[र्षो] भ्रातास्य सुतं समूलमुन्मूल्य । गोज्जिगमन्या-

११ यकृतं सा(सो)मोघं स्वय[5]मशात्पृथ्वीं(थ्वीम्)[6] ।। [८।।*] अभिषेकजलेन समं तपस्विषु(षु) श्रेयसे स-

---

१ ‘ ततस्त्रिलोकी ’ – असे वाचावे.

२ वृत्त – उपजाति.

३ हा दंड निरर्थक आहे.

४ वृत्त – स्रग्धरा.

५ अळतेकरांनी येथे ‘ सामोघमयम् ’ असे वाचले होते. *Rāshṭrakūṭas* etc., p. 109, n. 59. ‘ सोमोघप्रियं ’ हे विवक्षित असावे, ‘ अमोघ ’ हे शिवाचे नाव आहे.

६ या व पुढील श्लोकाचे वृत्त – आर्या.

१२ मुच्छ्(त्य)[१] । येन धनानीव मलाननीयतात्मा परां शुद्धि-
(द्धिम्) ।। [९।।*] सितातपत्त्र[त्र]यमध्यव-

१३ र्त्ती रराज यो रूपजितेक्षुधन्वा । उपास्यमानः शरदिंदुनेव त्त्रिरूप-
तामेत्य महे[श]–

१४ बुध्या[२] ।।[१०।।*] शंभोः षडा[न]न इवात्त्रिमुनेरिवेंदू रामो
यथा दशरथस्य ˘ ¯ [३]र्जयं[तः]।

१५ तस्यांगजोपि चतुरंबु(बु)धिमेखलाया भर्त्ता भुवः समभवद्भुवि
कृष्णराजः[४]।। [११।।*]सत्यपि

१६ र[त्ना]भरणे जानानोपि प्रसाधनविशेषं(षम्) । यो वहति
भुजेन सदा कुवलयमाश्च--

१७ र्यकं लोके[५]।।[१२।।*] लक्ष्म्या नागेंद्रकर्ण्णातिशयचपलतां
यौवनस्यायुषश्च ।[६] यां(यान्) देवब्र(ब्र)ह्म--

१८ दायां(यान्) लुलुपुरवनिपाः पूर्व्वजा विस्मरन्तः । संसारासार-
भा[वं] मनसि कलय-

१९ ता येत(न) तेन्येपि मुक्ता ।[६] दत्तास्तेभ्यश्च गात्वः[७] शिव-
भवनजुषां कोटिशः काचनं च[८]

२० ।। [१३।।*] तस्मिन्प्रशासति महीं समहीधरेद्रा(न्द्रां) सि-
[ङ्ह]द्युतौ चतुरुदत्व(न्व)दनिंद्यकांची[म्]। [स्मृत्वा?]हि -- [९]

---

१ ‘समुन्मृज्य’ वाचावे.

२ ‘बुद्धया’ वाचावे. वृत्त उपेन्द्रवज्रा.

३ गळलेली अक्षरे ‘हरे’.

४ वृत्त – वसन्ततिलका.

५ वृत्त – आर्या.

६ हा दण्ड निरर्थक आहे.

७ ‘गावः’ वाचावे.

८ वृत्त – स्रग्धरा.

९ हा श्लोक अपूर्ण राहिला आहे. वृत्त – वसन्ततिलका.

दुसरा पत्रा : पहिली बाजू

२१ [1]तानतिज[वा]न्मायाविनो घा[त]कान् चंडान्मंडलिनो विलुप्तसमयानु--

२२ ध्रु(द्धृ)त्य [संत्रासयन् ?] । ‒ ‒ ‒ ⏑ ⏑ मंत्रधर्मरभसा[न्] दंडेन पा[षंडि]-

२३ [कान्] सामंतांश्चतुरोपि येन दलता का[मं] नरेंद्रायितं-(तम्)[2]।। [१५।।*] तस्मिव[न्] शास--

२४ ति पृथ्वीं [कृ]ष्णनरेंद्रे(न्द्रे) नरादि(धि)पः श्रीमान(न्) [।*] शीलारामलवंशे सकलगुणालंकृते–

२५ –[3]।। [१६।।*] विद्याधर[ः*] [स्व]चरिताधरितान्यकीर्त्ति-र्जी[मू]त[के]तुतनयो नयविक्रमाढ्यः [।*]

२६ जी[मू]तवाहन इति प्र[थि]तः पृथि[व्यां] श्रीमा[न्*] स्वकायमुपदाय सु(?)दञ्चता--

२७ हीन्[4]।[१७।।*] [गन्धर्वं ?] ⏑ ⏑ ‒ ‒ ‒ ⏑ [श्रु]त्वाहिञ्च दिवि [पृ](प्रि)यं (यम्) । गुणानुरागा[ज्जन्मा ?]र्थं [पू]-

२८ र्व्वजा [यम]शिश्रियत्(न्)[5]। [।१८।।*] जामदग्न्यशरात्र-(त्र)[स्तः] शीलारच्छद्मना तदा साग[रो*]

२९ रक्षित[स्तै]श्च प्रापुस्तन्नाम पू[र्व्व]जाः।[।१९।।*] शीला-रनाम्नि तट[द्व]ययेन[6] देवः

---

१ या श्लोकातील पहिली सात अक्षरे गळली आहेत.

२ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

३ ‘छद्दै’ वाचावे. दुसऱ्या अक्षरावरच्या मात्रा दिसतात. वृत्त – गीति.

४ संदर्भावरून येथे ‘अमुञ्चताहीन्’ असा पाठ असावा. पण त्यात सन्धीचा अभाव हा दोष येईल. वृत्त – वसन्ततिलका.

५ या पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

६ हा पाठ निश्चित नाही.

३० सा[क्षा]दभा[१] निजभुजार्जितकामदेवः । [आ]रातिसिधु(न्धु)-
मुपम[थ्य] करे क-

३१ पर्द्दी लक्ष्मीम[धत्त] स त(तु) कांनण[२]कंकणेन । [।।२०।।*]
त[स्यात्म]जो [यः] पुलशक्तिना[मा*]

३२ [पृथू]पमः पार्थसमानकीर्त्तिः । [आसी]त्प्र(त्पृ)थिव्या(व्यां)
प्रथितप्रतापः समस्त-

३३ सामन्तनतांघ्र(घ्रि)[भूपः][३]।[२१।।*] तस्याप्यपरः श्रीमा-
न्कपर्द्दिनामाभवताभा[४] नृप-

३४ तिः । वप्पुवनोति(मि)तश[क्ति]: शासित[भूमं]डलोभवत्त-
स्मात्[५]।[।२२।।*] झंझः सकलगु-

३५ णौघैः संपहो(न्नो) गीयते जगत्यनिशं(शम्)। आखंडल इव तस्मा-
दभवत्सां[ग्रामिकैर्*]

३६ गुणैः [वि]दितः[६]।[२३।।*] तस्याप्यनुजो जयवा[न्*] गोग्गि-
नृपो द्विगुणझंझ इति ग-

३७ दितः । [तेना मार्त्तंडोर्वा ?][७] त्त[स्मा]दपि कीर्त्ति[संप]न्नः[८] ।
[।२४।।*] तस्याप्यनुजः श्री[मांश्छ ?]-

---

१ 'साक्षाद्वभौ' वाचावे.

२ 'काञ्चन –' वाचावे.

३ वृत्त – उपजाति.

४ '–भवत्सुतो' वाचावे.

५ वृत्त – गीति.

६ 'गुणैर्विदितः' वाचावे. वृत्त – गीति.

७ या ठिकाणचा पाठ अत्यंत अशुद्ध आहे. येथे 'तस्यापि वज्जडोऽभूत्' यासारखा पाठ अपेक्षित आहे. कदाचित 'दीप्त्या मार्तण्डोऽभत्' असा पाठ असेल. पण त्यात गोग्गिराजाच्या उत्तराधिकाऱ्याचे नाव येत नाही.

८ या व पुढील श्लोकाचे वृत्त – आर्या.

३८ [दय]नृपो[१] व(ब)लिनिभोभवत्यागात् । महाहरेरिव रिपवो ध्वस्ता ह्य:(ह्या)संश्च

३९ ति[२]नास्नैव॥[२५॥*] स चानेकघोटका[रू]ढचारु(?) हा(चा)रभटविनि[र्जि]तप्रतिपक्षसीमं-

४० तिनीनयनवारि[धा]रा[प्रवा]ह[धौ]तमलिनीकृतकरो[३][आ]राति-यशोवगुंठ-

४१ विजयलक्ष्मीकल्याणपरंपराभ्युदयः समधिगत[पं]चम[हा]-शव्द(ब्द)महा-

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

४२ सा[मं]ता(तः) [श्री]च्छद्वैदेवः सर्व्वानेव यथासंव(ब)ध्यमान-का[न्] शौल्किकगौल्वि(ल्मि)कचौ-

४३ रे(रो)[द्ध]रणिकान् कीर्त्तिता[४]न्भविष्यद्वर्त्तमानकांश्च [भू*]-भृद्व(द्वं)[धू]न(न्) चरादीन् [प्र]ति[दि]च्य(श्य)-

४४ चितकपयंश्च(?)[५] समनुवो(बो)धयत्येवं य[था] पाणाड-विषयांतःपाति साल[ण]-

४५ कग्रामे प्राच्यां दिशि[६] यस्य चाघाटनानि [पू]र्व्वतो [मं]-चकपल्ले(ल्ली)सीमा । दक्षिणतो

४६ वखोलावि[ध्या][७] लव[ण]चरिका च । पश्चिमतः [तपारुप्यंति-कारिसैकानिवा?][८]ग-

---

१ 'श्रीमांश्छदयनृपो' वाचावे.

२ हे अक्षर निरर्थक आहे.

३ '–कर आराति–' वाचावे.

४ 'कीर्तिताकीर्तितान्' वाचावे.

५ श्री. एन्. एल्. राव यांनी सुचविल्याप्रमाणे विवक्षित पाठ 'प्रतिवासिनः कृषकांश्च' असावा.

६ येथे दानाचा विषय (पुढे ओ. ५७ मधील 'क्षेत्रत्रयम्' यासारखा) आवश्यक आहे.

७ येथे 'वखोलीवीथिः' असा पाठ विवक्षित असावा.

८ येथील पाठ अनिश्चित आहे.

४७ त्तैंवं च । उत्तरतो झिरिकाद्वयसंगमः । एवं चतुराघाट[नो]पल-[क्षि]तं स–

४८ वृक्षमालाकुलं पोढकस[मे]तं गंहि[रा]तटे कारं[जा]वृ[क्ष]-समेततलगटि[त](?)–

४९ निवातक्षेत्रं मयेदं जलधरधारानिपात[मि]तं [निवाता]वनोद्यत-[त*]ति[1](डि)[द्बु*]द्बु(द्बु)द–

५० विनाशजीवितमवलोक्य जललवलोलतरलतरं चासारं सं[सा]र-[म]वेत्य

५१ पुत्रपौत्रान्व[यो]पभोग्यमाचंद्रार्का[र्ण]वक्षितिसमकालीनतया पि-त्रोरा[त्म*]–

५२ न[श्चै]हिका[मु]ष्मिकपुण्यय[शो]भिवृद्ध[ये] विधुग्र(ग्रा)-सेन तनंत्ता(?)[2] योग[ग्र][3]–

५३ [ह]णपर्व्वणि [अं]गारिकायां तिथौ ह[स्तो]दकपूव्वं(र्व्वं) [स]कलसुरासुराभ्य[र्च्चि]–

५४ तच्चरण[नखमणिं]श्रीमच्छिवभट्टारकं [प्रपूज्य] [का]श्यपसगोत्र-[व(ब)]ह्वृचस–

५५ [व्र(ब्र)]ह्मचारि[णे*] वेदवेदां[ग]वेदा[न्त]पुराणमीमां[सास्मृ]-तिन्याय(या)भिज्ञ[जन्हु]पु–

५६ रनिवासिने चाडादेव[भ]ट्टाय वेसद्यववल[4]चरुकाग्निहोत्रक्रतु-क्रि–

५७ या[द्यु]पसर्प्पणा[र्थं] ग्रा[मम]ध्य(ध्ये) प्रलयवाव[मा]न(ने) न[5] श्रीक्षततृ[यं][6] स[श?]–

---

१ येथील पाठ अनिश्चित आहे.

२ येथील पाठहि अनिश्चित आहे.

३ ' सोमग्रहण – ' वाचावे.

४ ' वैश्वदेवबलि– ' वाचावे.

५ येथील पाठ संदिग्ध आहे. ' तद्विषयमानेन ' विवक्षित असेल.

६ ' क्षेत्रत्रयम् ' वाचावे. पण ओ. ४९ मध्ये एकाच क्षेत्राचा उल्लेख आहे.

५८ कगा(ग्रा)[मान्तः*]पातिपान[1]पोढकसहितं ता[म्र][शास]नेन प्रदत्तं(त्तम्) । तदागामि–

५९ नृपतिभि[श्च] भूदाना...... [2]पुण्यफलमवेत्य धर्म[दा]योयं

६० प्रतिपालना(नी)यः । यतः सामान्येयं [भू]दान[पालन ?]पुण्य–

६१ फलावाप्तिः । तथा चोक्तं भगव[ता] वेदव्यासेन [व्या]-से[न][।*]

तिसरा पत्रा

६२ अ[ग्ने]रप[त्यं] प्रथमं सुवर्णं भू[र्व्वैष्ण]वी [सू]र्यसुताश्च गावः । लोक–

६३ त्रयं तेन भवेधि(द्धि) दत्तं यः कांचनं गं(गां)च महीं च दद्यात्[3] । [।२६।।*]यत्प्रासादाश्च

६४ सौवर्ण्णा वसुधाराश्च कामदाः ।[4] गन्धर्व्वा[प्स]रसो यत्र तत्र गच्छंति [भू]–

६५ [मि]दाः[5]।[।२७।।*] कल्पकोटि[स]हस्राणि [क]ल्पकोटि-[शता]नि च । निवस्ते[6] पुरुषो

६६ लोके क्ष(क्षि)[ति]दानं ददाति यः।[।२८।।*] व(ब)हुभिर्व्व-सुधा भु[क्ता] रा[ज]भिः सगरादिभिः ।

६७ य[स्य] यस्य य[दा] भू[मि]स्तस्य तस्य तदा फलं(लम्)।[।२९।।*] [सर्व्वाने]तान्भाविनः पाथि(र्थि)वेंद्रा--

६८ न्भू[यो] [भूयो] याचते रा[म]भ[द्रः] । [सामा]न्योयं ध[र्म]सेतुनृ-(र्नृ)पाणां पा(का)ले काले पा–

---

१ ‘सालाणकग्रामान्तःपाति–’ विवक्षित असेल.

२ संदर्भावरून ‘भूदानस्य सामान्यम्’ या सारखा पाठ विवक्षित असावा.

३ वृत्त – इंद्रवज्रा.

४ येथील पाठ मंगलरसाच्या कच्छ ताम्रपटाच्या साहाय्याने दिला आहे.

५ श्लोक २७–२९ चे वृत्त – अनुष्टुभ्.

६ हे रूप प्रामादिक आहे. ‘रमते’ वाचावे.

६९ लनी[यो] भवद्भिः[१]।[।३०।।*] ष[ष्टि]व[र्षसहस्राणि] [स्व]र्गे ति[ष्ठ]ति भूमिदः । आच्छेत्ता चा--

७० नु[मं]ता च तान्येव नरक(के) वसेत्[२]।[।३१।।*] स्वदत्तं(त्तां) परदत्तां वा यो हरेत वसुंधरां(राम्) ।

७१ [स] वि[ष्ठा]यां कृमिर्भूत्वा कृ[मि]भिः सह पच्यते।[।३२।।*] गामेकां सुवर्ण्णमेकं भूमे--

७२ रप्येकमंगुलं(लम्) । हरन्नरकमाप्नोति [या]त(व)दाह(भू) तसंप्लवं(वम्)।[३३।।*] इति कमल--

७३ दलांवु(बु)वि(बि)न्दुलोलां श्रियमवलो[क्य] म[नु]ष्यजीवितं च । [अ]तिविमलम--

७४ [नो]भिरात्मनीनै[र्न] हि पु[रुषै]: परकीर्त्तयो विलो[प्याः[३] ।। [३४।।*] ध[र्म्मदा]यो--

७५ यं श्रीगो[ग्गिसु]तश्रीवर्ज्ज(ज्ज)डदेववि[हि]तः शृ(श्रु)तः । यथैवं तथा श्रीच्छद्वैदे--

७६ वः [शा]सनं ददाति ।।

क्र. ५

अपराजिताचा जंजिरा ताम्रपट (क्र. १) : शक संवत् ९१५

प्रस्तुत ताम्रपट कुलाबा जिल्ह्यातील मुरुड जंजिरा गावाच्या एका भागात खणत असता सापडला होता तो आता बडोद्याच्या संग्रहालयात ठेवला आहे.[४]

---

१ वृत्त – शालिनी.

२ श्लो. ३१–३३ चे वृत्त – अनुष्टुभ्.

३ वृत्त – पुष्पिताग्रा.

४ *Important Inscriptions from the Baroda State*, Vol. I, pp. 35 f.

या ताम्रपटाचे **तीन पत्रे** २७·९४ सें. मी. लांब व २२·८६ सें. मी. रुंद असून ते पूर्वी एका छिद्रातून घातलेल्या कडीत अडकवले होते, पण कडी व तिला जोडलेली मुद्रा सापडली नाही. सर्व लेख ९० ओळींचा आहे. ताम्रपट सुंदर रीतीने कोरला आहे. क्वचित् गळलेली अक्षरे त्याच पत्र्याच्या खाली समासात ओळीचा क्रमांक देऊन कोरली आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची असून **भाषा** संस्कृत आहे.

विषय – या लेखाचा उद्देश **सीलार** (शिलाहार) नृपति **अपराजितदेव** याने १४०० गावे असलेल्या **पुरी-कोंकणाच्या चिक्खलाड** विषयाच्या (जिल्ह्याच्या) **विहाले** विभागातील **पलच्छउच्छिका** नामक पल्लिका (गाव) दान दिल्याची नोंद करणे हा आहे. या गावाच्या मर्यादा सांगताना **मानेचोली, कोटिलेवल्ली** आणि **मज्जिग्राम** यांचा उल्लेख केला आहे. हे दान **गत शक संवत् ९१५, विजयसंवत्सरा**मध्ये **सिंह राशीत** सूर्य असताना **श्रावण अमावास्येस रविवारी सूर्यग्रहणाच्या** महापर्वप्रसंगी दिले होते. याची तारीख रविवार, २० ऑगष्ट सन ९९३ अशी येते. त्या दिवशी सूर्यग्रहण होते व सूर्य सिंह राशीत होता.

हे दान **करहाट** येथून आलेल्या 'गृहीतसहस्र'[१] हरिदेवपुत्र क्रमविद् **कोलम** नामक काश्यपगोत्री ऋग्वेदी ब्राह्मणाला दिले होते. त्यावेळी राजाचा मुख्य मंत्री महामात्य **अम्मणैय,** अमात्य **मणैय** आणि सांधिविग्रहिक **झंझमैय** होता. हा लेख **चक्कैयाचा** पुत्र **उद्दाम** या कायस्थाने लिहिला होता.

या ताम्रपटाच्या आरंभी क्र. ४ च्या लेखातल्याप्रमाणे राष्ट्रकूट सम्राटांची वंशावळ आली आहे. ती तृतीय कृष्णापर्यंत क्र. ४ च्या लेखातल्याप्रमाणेच आहे. फरक एवढाच की **नित्यवर्ष तृतीय इंद्रा**नंतर त्याचा मुलगा **द्वितीय अमोघवर्ष** याने एक वर्ष राज्य केले अशी जास्त माहिती दिली आहे. शिवाय तृतीय अमोघवर्षाने **राष्ट्रकूट कर्कर** याच्या राजधानीजवळ दुष्ट शत्रूंचा उच्छेद केल्याचे सांगितले आहे.[२] त्याचा पुत्र **तृतीय कृष्ण** याच्या प्रशस्तीत त्याच्या स्वाऱ्यांच्या वेळी चोल, गजपति, अश्वपति (प्रतीहार), आन्ध्र, पांड्य, सिंहलेश हे भयभीत होत असत;

---

१ 'गृहीतसहस्र' याचा अर्थ सामवेदी असा करण्यात येतो, कारण सामवेदाच्या हजार शाखा होत्या. पण येथे या 'गृहीतसहस्र' ब्राह्मणाला बह्वृच (ऋग्वेदी) म्हटले आहे हे उल्लेखनीय आहे.

२ हा कर्कराज अचलपुर (अमरावती जिल्हा) येथे राज्य करीत होता. तो चतुर्थ गोविंदाच्या पक्षाचा होता. हे युद्ध अचलपुराहून १० मैलांवर पयोष्णीच्या (पूर्णेच्या) काठी झाले होते हे आम्ही अन्यत्र दाखविले आहे. *C. I. I.*, Vol. IV, pp. lxxii f.

त्याने पश्चिम सागरापासून पूर्व सागरापर्यंत आणि हिमालयापासून रावणाची राजधानी लंका येथपर्यंत एकच्छत्री राज्य केले असे म्हटले आहे. त्याच्यानंतर **खोट्टिग** आणि त्याच्या निधनानंतर **निरुपमाचा** पुत्र **कक्कल** याने राज्य केले. त्याचा **तैलपाने** उच्छेद केल्यावर रट्टराज्य स्मृतिशेष झाले याबद्दल खेद व्यक्त केला आहे.

ओ. २२–४३ मध्ये **सीलार** (शिलाहार) राजांची वंशावळ जीमूतकेतूचा पुत्र **जीमूतवाहना**पासून **वज्जडा**पर्यंत क्र. ४ च्या लेखातल्याप्रमाणे दिली आहे. **गोग्गिराजाला इर्मडी झंझ** (दुसरा झंझ) असे म्हटले आहे. वज्जडानंतर त्याचा धाकटा भाऊ **छद्वैदेव** याचे नाव गाळून वज्जडाचा पुत्र **अपराजित** याची प्रशस्ति दिली आहे. तीत त्याच्या **संयान, पूणक, संगमेश्वर** आणि **चिपुलण** यांवरील विजयांचा निर्देश आहे. त्याच्या राज्याचा विस्तार उत्तरेत **लाट** देशापासून दक्षिणेत **चंद्रपुर**पर्यंत आणि पश्चिमेस सागरापासून पूर्वेस **भिल्लमाच्या** राज्यापर्यंत (खानदेशपर्यंत) होता असे म्हटले आहे.

रट्ट राज्य नष्ट झाल्यावर अपराजिताने अखिल महाशब्द मिळवून 'महासामन्ताधिपति' पदवी धारण केली. त्याची अनेक बिरुदे होती. उदाहरणार्थ, 'तगरपुरपरमेश्वर', 'सुवर्ण-गरुडध्वज', 'अभिमानमहोदधि', 'विमलगलगण्ड' (विमल गळ्याचा वीर), 'पश्चिमसमुद्राधिपति', 'गण्डरगण्ड' (वीरांमध्ये श्रेष्ठ वीर), 'दीप्तिमार्तण्ड', 'गण्डवङ्गर' (वीरपुरुषांमध्ये सोन्यासारखा), 'गण्डरुद्धफोडि' (वीरांचा विरोध मोडून काढणारा), 'गण्डनारायण' (वीर पुरुषांमध्ये विष्णु), 'नन्निसमुद्र' (सत्याचा सागर), 'पुसिगंजुवात' (असत्याची भीति बाळगणारा), 'विल्लविडेङ्ग' (धनुर्धारित्वात कुशल), 'झंपडाचार्य' (दात्यांत श्रेष्ठ), 'अहितकालानल' (शत्रूंना कालानलासारखा), 'बिरुदंकराम' (बिरुदे धारण करणाऱ्यांत रामासारखा श्रेष्ठ), 'माण्डलिकत्रिनेत्र' (मांडलिकांमध्ये भगवान् शंकरासारखा) इत्यादि. यांतील अनेक बिरुदे कन्नड आहेत. कारण शिलाहारांची मातृभाषा कन्नड होती.

स्थलनिश्चय -- संयान हे ठाण्याच्या उत्तरेतले संजान होय. ते पूर्वी राष्ट्रकूटांचे सामन्त अरब अधिपतींकडे होते. **पूणक** देशात पुण्याभोवतालचा प्रदेश अंतर्भूत होत होता. **चंद्रपुर** हे दक्षिण गोव्यातील चांदोर होय. **करहाट** हे कऱ्हाड हे सांगावयास नको. **पलच्छउच्छिका** हे मुरुडच्या पूर्वेस तीन मैलांवरचे पाले असावे. **विहाले** कुलाबा जिल्ह्याच्या मानगाव तालुक्यातील विहुले असेल.

ही गावे ज्या विषयात अंतर्भूत होती ते **चिक्खलाड** मुरुडच्या उत्तरेस आठ मैलांवरचे चिखळगाव असावे. **मज्जिग्राम** हे मुरुडच्या उत्तरेस चार मैलांवरचे माजगाव असले पाहिजे.

ओळ

वाचन[1]

पहिला पत्रा

१ सिद्धम्[२] [।*] नमः पुरुषोत्तमाय ।। स वोव्याद्वेधसा धाम यन्नाभिकमलं कृतं(तम्)[।*] हरश्च यस्य कान्तेन्दुकलया कमलंकृतम्[3] ।। [१।।*]

२ कुर्व्वन्त्वाम्नायपूतानि वेधसो वदनान्यलं(लम्)[।*] चराचरजगत्सृष्टिनामधामानि वः शुभम् ।।[२।।*] आसीद्गोविन्दराजः क्षि–

३ तिपतिरसमः कक्कराजस्ततोभूद्भूभर्त्ता श्रीन्द्रराजः पुनरभवदतो दन्तिवर्मेति सूनुः । ख्यातः श्रीकृष्णराजः

४ क्षपितरिपुरभूत्कक्कराजस्य सूनुस्तस्माद्गोविन्दराजस्तदनु तदनुजः श्रीध्रुवान्को(ङ्को)धिराजः[४]।।[३।।*] जगत्तुङ्गाङ्गज–

५ स्तस्य गुणोत्तुङ्गोऽभवत्ततः । वल्लभो[५]मोघवर्षः स कृष्णराजस्ततः सुतः[६]।।[४।।*] जगत्तुङ्गाङ्गजः श्रीमानिन्द्रदेव-

६ स्ततोभवत् । नित्यवर्षो भुवो भर्त्ता [वि]क्रमोत्तुङ्गशंकितः[७]। [।५।।*] जनहर्षकृते वर्षन्घन इव घनकनकवारिधाराभिः [।*]

७ तस्मादमोघवर्षो वर्षावधिराज्यभाजनो[८] जातः[९]।।[६।।*] तस्यानुजो हरिरिवोद्धृतभूतलश्रीर्गोविन्दराजनरनाथसु–

---

१ *Important Inscriptions from the Baroda State* मधील प्रतिमा ५–८ वरून.

२ चिह्नाने प्रदर्शित.

३ या व पुढील श्लोकांचे वृत्त – अनुष्टुभ्.

४ वृत्त – स्रग्धरा.

५ भादान दानपत्रात (क्र. ७) येथे 'दुर्लभो' असा पाठ आहे.

६ या व पुढील श्लोकांचे वृत्त अनुष्टुभ्.

७ भादान ताम्रपटात येथे 'विक्रमोत्तुङ्गलक्षितः' असा पाठ आहे.

८ '–भाजनं' वाचावे.

९ वृत्त – गीति.

८ वर्ण्णवर्षः । सन्नन्दकाच्युतसुदर्शनचक्रचिह्नः सि(सिं)हासनी गुरुव-
(ब)लः पुरुषोत्तमोभूत्[१]।।[७।।*] पितृव्यः स्वर्ण्णव-
९ र्षस्य नित्यवर्णानुजश्चिरं(रम्)। कुर्व्वन्नकंटकं राज्यं तपसा साह-
सेन च[२][।।८।।*] श्रीमत्कक्कर्रराष्ट्रकूटकटकेसद्वं-
१० ससंहर्षतो[३] रौद्रद्रोहदवप्रतापशमकं(नं) निस्तृं(स्त्रिं)शधारा-
जलैः । येनाकारि समुद्धृतेन्द्रधनुषा भूषा(पा)स्म(श्म)-
११ भिर्व्विद्युता भाति श्रीमदमोघवर्षसुघनोऽसद्धूलिविध्वंसनात्[४]
[।।९।।*] अथ गतवति तस्मिन्वह्निगेन्द्रे नरेन्द्रे सु-
१२ विमलमपि[५] शंभोर्द्धाम शुभ्रं विधातुं(तुम्) । कनककलस(श)-
धारापातधौतेव कन्या तदनु नरपतिश्रीः कृष्णराजं स-
१३ मागात्[६]।।[१०।।*]चोलो लोलो भियाभूद्गजपतिरपतज्जाह्नवी-
गह्वरान्तर्वाजीशस्त्रासशे(शे)षः समभवदभवच्छै-
१४ लरन्ध्रे तथान्ध्रः । पाण्ड्येशः खण्डितश्रीरनुजलधिजलं द्वीपपालाः
प्रलीना यस्मिन्दत्तप्रयाणे सकल-
१५ मपि सदा राजकं न व्यराजत्[७]।[११।।*] आ चंचत्सिन्धुवी-
चीनिचयपरिचितोपत्यकाप(त्प)श्चिमाद्रेरा पूर्व्वादुद्य-
१६ दर्क्कप्रखरहरिखुरोत्खातमूर्द्ध्नो महीध्रात् । आ वित्तेशालयादा
दशवदनपुरो मंडलाग्रप्रभावैः
१७ पृथ्वीमेकातपत्रामकुरुत सुकृती यो जगद्गीतकीर्त्तिः[८][१२।।*]
तस्मिन्नस्तमिते विभौ विधिवशादाक्रान्त-

---

१ वृत्त – वसंततिलका.

२ वृत्त – अनुष्टुभ्.

३ '– सद्वंशसंघर्षतो' वाचावे.

४ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

५ 'मपि' ही गाळलेली अक्षरे खालील समासात ओळीचा अंक १२ देऊन लिहिली आहेत.

६ वृत्त – मालिनी.

७ वृत्त – शिखरिणी.

८ वृत्त – स्रग्धरा.

१८ भूमण्डले लोकाह्लादिनि स(श)त्रुपंकजरुधि प्रोत्कृष्टरोचिष्मति । शीतांसा(शा)विव दिव्यसंगगतिके[1] राजा–

१९ धिराजे ततः श्रीमत्खोट्टिगदेव इत्यभिधया राज्ये स्थितो भूपतिः[2] [१३॥*] तदनु च जातो मन्मथमूर्त्तिर्व्वि–

२० मलमहीख्याताखिलकीर्त्तिः । नरपतिसंघाविष्कृतसेवो निरुपमसुनुः कक्कलदेवः[3]॥[१४॥*] तस्मिन्नरे–

२१ शे नृपतिप्रदीपे प्रचण्डतैलप्पसमीरणेन । विध्यापिते दुष्यमकाल-भावा[4]त्कथावभासे सति रट्टराज्ये[5]॥[१५॥*]

२२ ॥ O ॥ जीमूतकेतुतनयोऽवततार योस्मिन्जीमूतवाहन इति प्रथितः पृथिव्यां(व्याम्)। सीलारवंस(श)तिलकः स्व–

२३ शरीरदानत्राता हि लोकसमवाद्य गरुत्मदंघः[6] ॥[१६॥*] अभवदहितमर्द्दी तस्य वंशे कपर्द्दी

२४ विवु(बु)धजनसुतुष्टः श्रेष्ठगोपृष्ठतुष्टः । प्रियजलगिरिदुर्ग्गः प्रीण(णि)तात्मेष्टवर्ग्गः प–

दुसरा पत्रा : पहिली बाजू

२५ रपुरभयकर्त्ता रौन्द्रनागेन्द्रहर्त्ता[7]॥[१७॥*] विपुलमतिरुदीर्ण्णः कर्ण्णवत्स्वर्ण्णवर्षैः सपुलकपुलशक्तिः शक्ति–

---

१ भादान दानपत्रात ‘ शुभ्रपं(पुं)जधवले ’ असा पाठ आहे.

२ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

३ वृत्त – मात्रासमक.

४ भादान दानपत्रात ‘ संप्रापिते ज्योतिरलं विवृद्धे ’ असा पाठ आहे.

५ वृत्त – उपजाति.

६ भादान दानपत्रात ‘ स्वशरीरदानात्त्राता हि लोकमनघश्च गरुत्मतः सः । ’ असा पाठ आहे. वृत्त – वसन्ततिलका.

७ भादान दानपत्रात तीन्ही चरणांचा पाठ निराळा आहे. या आणि पुढील श्लोकाचे वृत्त – मालिनी.

२६ युक्तस्ततोभूत् । अभवदिह न दीनस्तस्य सुनुः कपर्द्दी जितपरव-
(ब)लदण्डाखण्डपृथ्वीतरण्डः।। [१८।।*] तस्माद्भु–

२७ वनतरण्डः खण्डितदोर्द्दण्डचण्डरिपुदण्डः । जज्ञे यस(श)सा मण्डि-
तमखण्डभूमण्डलं येन[1]।।[१९।।*] झंझनामा सुतस्तस्मा–

२८ द्वप्पुवन्नादभूदसौ[2]। उदितोदितता येन वंशस्य प्रकटीकृता[3]।।
[२०।।*] चतुरश्चतुरास्योपि न कृत्स्नान्गदितुं गुणान् । स-
(श)रदभ्र–

२९ सितान्यस्याचतुरास्ये तु का कथा ।।[२१।।*] तस्यानुजो निज-
भुजोर्ज्जितनिर्ज्जितारिः श्रीगोग्गिराज इह सुप्रथितप्रभावः ।

३० श्रीझंझराणकगुणान्द्विगुणान्दधानस्त्यागाद्भुजङ्गविजयीर्मडिझंझ-
नामा[4]।। [२२।।*] राज्यं चकार सचिवेन विचिन्त्यमा–

३१ नं श्रीनागसेन विनुतोनुजसन्निभेन । सन्मार्ग्गतानुगतकार्मुकवा-
(बा)णपाणिः श्रीलक्ष्मणानुगतराम इवाभिरा–

३२ मः ।।[२३।।*] परचक्रं नमद्यस्य स्य(स्प)र्द्धते धनुषा समं(म्)।
सद्वंस(शः) सद्गुणस्तत्व(त्त्वं) कराक्रमणया रणे[5]।।[२४।।*]
सार्द्धं च द्वारि दण्डेन

३३ योखण्डाखण्डलत्विषा । कोदण्डं मण्डलीकुर्व्वन्मण्डलीकत्व-
मासदत्।।[२५।।] परमण्डलप्रसाधनसत्कीर्त्तिगु–

३४ णाकरो गुणी तदनु । श्रीमद्वज्जडदेवो भूपालो राज्यमधितस्थौ[6]
।।[२६।।*] अनवरतदानशीलः प्रतापवान्नीतिविद्यशो–

३५ निलयः । सूनुस्तस्य च राज्ये श्रीमानपराजितो जातः ।।[२७।।*]
विशदमतिविवेकी धर्मतन्निष्ठचित्तोरिवु(बु)धजननिषेव्यः

---

१ वृत्त – आर्या.

२ '–दभू' ही गळलेली अक्षरे खालच्या समासात ओ. ४ चा निर्देश करून कोरली आहेत.

३ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

४ या व पुढील श्लोकाचे वृत्त – वसंततिलका.

५ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

६ या आणि पुढील श्लोकाचे वृत्त – आर्या.

३६ सत्क्रमोत्तुंगधैर्यः । सकलगुणनिवासः प्रार्त्थिनां पूरिताशो रिपुगण-
करिसिंहो राजधुर्यः प्रसिद्धः[१]।।[२८।।*] रुचिर-

३७ सुतनु[२]भासः प्रोल्लसत्सद्विलासो निरुपमनिजकीर्त्तिव्याप्तलोक-
त्रयश्च । भुवि सकलकलानामाश्रयो

३८ निष्कलंको महितचरितभार्य्यः[३] साधिताशेषशत्रुः।। [२९।।*]
कंदर्प्पो युवतीजने विमलधीर्नीतौ च वाचस्पतिः कार्याकार्य-

३९ विचारणासु निपुणो गांभीर्यवारांनिधिः । धाम्ना तीव्ररुचिर्व्वि-
शेषगुणभृद्दानक्रियायां गुरुः श्रीविद्यावसति-

४० र्जनप्रियतमो यो भूपवन्द्यः सदा[४]।। [३०।।*]सिद्धां संधानभूमिं
पृथुतरपुणकं देशमाज्ञाविधेयं सह्यं प्रत्यन्तकान्तं

४१ निजभटकलितं संगमादीश्वराख्यं(ख्यम्) । नामाख्यानप्रसाध्यं
चिपुलणविषयं नष्टवैषम्यभावं कृत्वा तेजोनुभा-

४२ वाद्धरविभवविभृत्स्वाज्ञया यः प्रशास्ति[५]।। [३१।।*] आ लाट-
देशाद्भुवि भिल्लमीयदेशं विधायावधिमत्र यस्य । आ प-

४३ श्चिमाव्धे(ब्धे)रथ चंद्रपूर्व्वं पुरं विधृत्य प्रभुताप्रभावः[६]।।
[३२*।।] प्रभुश्रीअम्मणैयेन[७] महामात्येन मंत्रिणा । संयुक्तो-

४४ सौ[८] विभातीह गुरुणाखण्डलो यथा[९] ।।[३३*।।] इति पूर्व्व(र्व्वं)
श्रीमान्यखेटकटके परमभट्टारकमहाराजाधिराजप-

---

१ या व पुढील श्लोकाचे वृत्त – मालिनी.

२ या पुढील 'सुतनु' ही अक्षरे खोडली आहेत.

३ येथे भादान दानपत्रातल्याप्रमाणे '–भाग्यः' वाचावे.

४ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

५ या ठिकाणी 'हरविभवं बिभ्रत्' असा पाठ पाहिजे, पण तो स्रग्धरा वृत्ताला जुळत नाही.

६ वृत्त – उपजाति.

७ गद्रे येथे 'अम्मणो येन' असे वाचतात पण ते चूक आहे.

८ 'सौ' हे प्रथम गळलेले अक्षर नंतर कोरले आहे.

९ वृत्त – अनुष्टुभ्.

४५ रमेश्वरश्रीमत्कृष्णराजदेवपादानुध्यातपरमभट्टारकमहाराजा-
धिराजपरमेश्वरश्रीमत्खोट्टिग–

४६ देवपादानुध्यातपरमभट्टारकमहाराजाधिराजपरमेश्वरश्रीमत्कक्क-
लदेवसंजातव्यपायानं–

४७ तरं नष्टभ्रष्टरट्टराज्ये ॥ स्वतेजोनुभावात्समधिगताशेषमहाशव्द-
(ब्द) महासामन्ताधिपतितगर–

४८ पुरपरमेश्वरशीलारनरेन्द्रजीमूतवाहना[1]न्वयप्रसूतसुवर्णगरुडध्व-
जाभिमानमहोदधिविमल–

४९ गलगण्डपश्चिमसमुद्राधिपतिगण्डरगण्डदीप्तिमार्त्तण्डगण्डवङ्कर-
गण्डरुद्धफोडिगण्ड–

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

५० नारायणनन्निसमुद्रपुसिगंजुवातविल्लविडेङ्गझंपडाचार्यंअहितका-
लानलवि (बि) रुदंकराममंडलीकत्रिने–

५१ त्रप्रभृतिसमस्तराजावलीसमलंकृतमहामण्डलेश्वरश्रीमदपराजित-
देवराजः सर्व्वानेव य[था]संव (ब)–

५२ ध्यमानकानागामिग्रामभोक्तृसामन्तराजपुत्राधिकारिपुरपतितृ-
(त्रि) वर्ग्गस्थाननगरप्रभृति[2]प्रधानाप्रधानजना–

५३ न्प्रणतिपूजासमादेशैः समनुवो (बो) धयत्यस्तु वः संविदितं यथा ॥
चला विभूतिः क्षणभंगि यौवनं कृ–

५४ तान्तदन्तान्तरवर्ति जीवितं (तम्)। तथाप्यवज्ञा परलोकशासनेऽहो
नृणां विस्मयकारि चेष्टितम्[3]॥[३४*॥] रंभास्तम्भ–

---

१ 'ना' हे प्रथम गळलेले अक्षर मागाहून ओ. क्र. २४ सह खालील समासात कोरलेले आहे.

२ 'प्रभृ' ही प्रथम गळलेली अक्षरे खालील समासात 'ओ. ३ 'च्या निर्देशासह कोरली आहेत.

३ वृत्त – वंशस्थ. 'अहो' यांतील 'अ' चा अवग्रह चूक आहे.

५५ गर्भ इव सकलमेतदसारतयाधि[ष्ठि]तं संसारजातं विनश्वरभावं
धर्म एवैकः सहायः सास्वत[१]श्चेति विमलेन म-

५६ नसा समाकलय्य।।[२] मातापित्रोरैहिकपारत्रिकपुण्यफलावाप्तये
आत्मनश्च महापुण्ययसो(शो)भिवृद्धये ।।[२]

५७ शकनृपकालातीतसंवत्सरशतेषु नवसु पंचदशोत्तरेष्वन्क(ङ्क)तः
संवत् ९१५ विजयसंवत्सरान्तर्ग्गतश्रा-

५८ वणव(ब)हुल १५ रवौ संजातसूर्यग्रहणमहापर्व्वणि [राहु]ग्रह-
ग्रासीकृततीव्रद्युतिमण्डले सिंहराशिगते

५९ च सूर्ये सति ।[२] विहितस्नानानन्तरं यथोचितस्थित्या हरिहिरण्य-
गर्भदहनादीनमरानमलश्रद्धया संपूज्य ।।[२] क-

६० रहाटविनिर्ग्गताय इहकार्या[भ्या]गताय कास्य(श्य)पगोत्र-
वह्वृच[३]शाखाय हरिदेवगृहीतसहस्रपुत्राय व्रा(ब्रा)ह्मण-

६१ कोलमवित्ताय[४]।।[२] चतुर्दशग्रामशतोपलक्षितपुरीकोंकणदे[शा]-
न्तष्पाति[५]।[२] चिख्खलाडविषयप्रतिव(ब)द्धविहले-

६२ क्षेत्रान्तर्व्वर्त्तिनी पलच्छउच्छिकाभिधाना पल्लिका । यस्याश्चा-
घाटनानि । पूर्व्वतः मानेचोलीसत्कविरकः । दक्षि-

६३ णतः कोटिलेवल्लीसत्कसीमा । पश्चिमतः मज्जिग्रामसत्कसीमा ।
उत्तरतोपि सैव । एवमियं चतुराघा-

६४ टनोपलक्षिता अधिकखुंटिलक्षेत्रार्द्धभोगभागसमन्विता सवृक्षमाला-
कुला स्वसीमापर्यन्ता सका-

६५ ष्ठतृणोदका सदण्डदशापराधा पूर्व्वदत्ता(त्त)देवदायव्र(ब्र)ह्म-
दायवर्ज्जा सर्व्वोत्पत्तियुक्ता । पुत्रपौत्राद्यन्वयोपभो-

१ 'शाश्वत-' वाचावे.

२ हे विरामचिह्न अनावश्यक आहे.

३ 'बह्वृच-' वाचावे.

४ ओ. ८८ मध्ये आहे त्याप्रमाणे 'कोलमक्रमविदे' वाचावे.

५ 'देशान्तःपाति' वाचावे.

६६ ज्या(ग्या) निधानालीयककुमारीसाहसापुत्रादिसमस्तदण्डदोष-
युक्ताऽचाटभटप्रवेशाऽकराऽस्मा–
६७ भिः परमया भक्त्या हस्तोदकादिविधिपूर्व्वकं प्रदत्ता ॥ तदस्य
सान्वयव(बं)धोरप्याचंद्रार्क्ककालमर्य्या–
६८ दया स्वेच्छया भुंजतो भोजयतो वा कृषतः कर्प(र्ष)यतश्च न
केनापि परिपंथना कार्या । सर्व्वदा समा–
६९ गामिनृपतिभिरस्मद्वंशजैरन्यैर्व्वाऽसत्कर्मगंभीरदरीप्रपातभयभीरु-
भिर्ज्वलदनलस्फुलिंग–
७० सहस्रभीषणवीचिनिच(र)यप्रपातवेदनागमशंकितैः प्रतिपालयि-
तव्या सत्कर्तव्यानुमन्तव्या
७१ च । यो वाज्ञानतिमिरपटलावृतमतिराच्छिद्यादाच्छिद्यमानं वाऽ-
नुमोदेत स पंचभिर्महापातकैरु–
७२ पपातकैश्च संयुक्तो भवेत् ॥ उक्तं च भगवता वेदव्यासेन ॥
षष्टिर्व्वर्षसहस्राणि[1] स्वर्ग्गे तिष्ठति भू–
७३ मिदः । आच्छेत्ता चानुमन्ता च तान्येव नरके वसेत्[2] ॥[३५*]
विंध्याटवीष्वतोयासु शुष्ककोटरवा–
७४ सिनः । महाहयो हि जायन्ते भूमिदायापहारकाः॥[३६*॥][स्व]-
दत्तां परदत्तां वा यो हरेत वसुं–

तिसरा पत्रा

७५ धरां(राम्) । षष्टिर्वर्षसहस्राणि[1] विष्ठायां जायते कृमिः
॥[३७॥*] गामेकां स्वर्ण्णमेकं वा भूमेरप्येक–
७६ मंगुलं(लम्)। हरन्नरकमाप्नोति यावदाहू(भू)तसंप्लवं(वम्)
॥[३८॥*] पंच पश्वनृते हन्ति दश हन्ति गवा–
७७ नृते [।*] शतमश्वानृते हन्ति सहस्रं पुरुषानृते ॥[३९॥*] हन्ति
जातानुजातांश्च हिरण्यार्थेनृतं वदेत् । सर्व्वं भू–

---

१ 'षष्टिं वर्षसहस्राणि' वाचावे.

२ श्लोक ३५–४० चे वृत्त – अनुष्टुभ्.

७८ स्यनृते हन्ति मा स्म भूम्यनृतं वदीः ।।[४०*।।] अग्नेरपत्यं प्रथमं सुवर्णं भू[वैं]ष्णवी सूर्यसुताश्च गावः । लोक–

७९ त्रयं तेन भवेद्धि दत्तं यः कांचनं गां च महीं च दद्यात्[1]।।[४१।।*] स्वदत्तां परदत्तां वा यत्नाद्रक्षन्नराधिप[2] । महीं

८० महीभुजां श्रेष्ठ दानाच्छ्रेयोनुपालनम्[3]।।[४२।।*] व[ब]हुभिर्व्व-सुधा भुक्ता राजभिः सगरादिभिः । यस्य यस्य यायदा भू–

८१ मिस्तस्य तस्य तदा फलं(लम्)।।[४३।।*] धवला[4]न्यातपत्राणि दन्तिनश्च मदोक्ष(त्क)टाः । भूमिदानस्य पुष्पाणि फलं स्वर्ग-(र्गः)

८२ पुरंदर ।।[४४।।*] सर्व्वानेतान्भाविनः पार्त्थिवेन्द्रान्भूयो भूयो याचते रामभद्रः । सामान्योयं धर्म्मसेतुर्नृ–

८३ पाणां काले काले पालनीयो भवद्भिः[5]।।[४५।।*] मद्वंशजाः परमहीपतिवंशजा वा पापादपेतमनसो

८४ भुवि भाविभूपाः । ये पालयन्ति मम धर्ममिमं समग्रं तेषां मया विनिहितोन्ज(ञ्ज)लिरेष मूर्द्धनि[6]।।[४६।।*]

८५ यथा चैतदेवं तथा च । महामण्डलेश्वरश्रीमदपराजितदेवराजो लेखकहस्तेन स्वमतमारो–

८६ पयति । मतं मम 'श्रीमदपराजितदेवराजस्येति।।O।। लव्ध्वा-(ब्ध्वा) गण्डरगण्डराजनियमं

८७ श्रीमन्मणैयाभिधेऽमात्येधिष्ठितसंधिविग्रहपदे श्रीझंझमैये सति । उद्दामो ननु–

---

१ वृत्त – इंद्रवज्रा.

२ 'रक्ष नराधिप' वाचावे.

३ श्लोक ४२–४४ चे वृत्त अनुष्टुभ्.

४ प्रथम गळलेला 'ला' नंतर 'ओळ ७' चा निर्देश करून खालील समासात कोरला आहे.

५ वृत्त – शालिनी.

६ वृत्त – वसंततिलका.

८८ कोलमक्रमविदे सर्व्वैर्मतं शासनं चक्कैयस्य सुतस्तदेतदलिखत्काय-
स्थवंशोद्भवः[१]॥[४६॥*]

८९ यत्किमपि लिखितमुक्तं युक्तमयुक्तं च नोक्तमिह सर्व्वं(र्व्वम्) ।
अलिखितमगुणं सगुणं प्रमा-

९० णभूतं सदा ज्ञेयम्[२]॥O॥O॥

क्र. ६

अपराजिताचा जंजिरा ताम्रपट (क्र. २) : शक संवत् ९१५

मागील क्र. ५ च्या ताम्रपटाबरोबर हा ताम्रपटहि मुरुड–जंजिरा गावाच्या एका भागात खणत असता सापडला होता. तो सध्या बडोदा संग्रहालयात ठेवला आहे.[३]

या ताम्रपटाचे **तीन पत्रे** असून ते मागील ताम्रपटाच्या पेक्षा किंचित् लहान आहेत. त्यांची लांबी २२.७७ सें. मी. आणि रुंदी १७.७८ सें. मी. आहे. त्यांच्या वरच्या बाजूस कडीकरिता छिद्र केले आहे, पण कडी किंवा मुद्रा मिळाली नव्हती. सबंध लेख १०० ओळींचा असून अक्षरे स्पष्टपणे आणि काळजीपूर्वक खोदली आहेत. लेख सुस्थितीत आहे.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे. मागील ताम्र-पटातल्या प्रशस्तीचे सात श्लोक (२३–२५, २८–३० आणि ३३) यात आले नाहीत, पण यातील दोन श्लोक (२५ व २८) नवीन आहेत.

विषय– प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश **शीलार** (शिलाहार) राजा **अपराजित-देव** याने १४०० गांवे असलेल्या **पुरी–कोंकणाच्या पाणाड** विषयातील **सालणक** गावात **चम्मेलेवाखाडी**जवळ एक आराम (फळबाग) दान दिल्याचे

---

१ वृत्त – शार्दूलविक्रीडित. २ वृत्त – आर्या.

३ *Important Inscriptions from the Baroda State*, Vol. I, pp. 35 f.

नमूद करणे हा होता. हे दान त्या राजाने **स्थानक** येथे **गत शक संवत् ९१५** मध्ये **विजय संवत्सरी श्रावण अमावास्येस रविवारी** झालेल्या **सूर्यग्रहण-प्रसंगी** दिले होते. मागील ताम्रपटांतील दान याच दिवशी दिले होते. त्याची तारीख व वार – रविवार, २० ऑगस्ट सन ९९३ – बरोबर जुळतात हे मागे दाखविले आहे.

दान दिलेला ब्राह्मण मागील ताम्रपटात उल्लेखिलेलाच मूळ **करहाटचा**, पण नंतर **पुणक** देशातील **खेटक** गावी वास्तव्य असलेला आणि कांही कामा-निमित्त **स्थानकास** आलेला गृहीतसहस्र हरदत्ताचा पुत्र क्रमविद् **कोलम** हा होता. दान देण्याचा उद्देश पञ्चमहायज्ञाचे अनुष्ठान हा होता.

त्या वेळी राजाचा महामात्य **केशपार्य** आणि त्याचा सांधिविग्रहिक (पर-राष्ट्रमंत्री) **झंझमैय** होता. लेखक मागील ताम्रपटातल्याप्रमाणे **चकैयाचा** पुत्र कायस्थ **उद्दाम** हा होता. महामात्य मात्र निराळा उल्लेखिला आहे; कारण प्रस्तुत ताम्रपत्रातील दान भिन्न विषयातील (जिल्ह्यातील) होते. महामात्य हल्लीच्या कलेक्टरांप्रमाणे जिल्हाध्यक्ष असत; असे दिसते.

४ दीक्षित – 'दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने', भाग ४, पृ. ६२ इ.; 'मराठी संशोधन पत्रिका', भाग ९, पृ. १० इ.; तुळपुळे – 'प्रा. म. को. ले.', पृ. ४३ इ०. आल्फ्रेड मास्टरने दीक्षितांचे वाचन रोमन लिपींत देऊन स्वतःचा निराळा अर्थ लावला आहे.

ऑफीसजवळ नेण्यात आली. प्रस्तुत लेखात रांजली गावातील फळबागेच्या दानाचा उल्लेख असल्यामुळे त्याला रांजली शिलालेख म्हटले आहे.

ही शिला १ फू. ६ इंच रुंद आणि १० इंच उंच असून तिच्या वरच्या भागी मध्ये मंगल कलश व त्याच्या दोन बाजूंस सूर्य व चंद्र, आणि खालच्या बाजूस गर्दभशापाच्या आकृत्या आहेत. मध्यभागी प्रस्तुत लेख कोरला आहे. त्याची कांही अक्षरे आता अस्पष्ट झाली आहेत.

अक्षरवटिका नागरी आणि **भाषा** मराठीमिश्रित संस्कृत आहे.

विषय – हा लेख महामण्डलेश्वराधिपति **श्रीहरिपालदेव** याच्या कारकीर्दीतला आहे. लेखाच्या धाटणीवरून तो शिलाहारवंशी होता हे स्पष्ट आहे. ओ. २ व ३ मध्ये **शक संवताचे वर्ष अंकांत व शब्दांत दिले होते** ते आता अस्पष्ट झाले आहे. ते १०७० असे वाचले गेले आहे. ते असंभवनीय नाही. कारण याच राजाचा आगाशी लेख शक संवत् १०७२ चा आहे.

प्रस्तुत लेखाचा उद्देश **शूर्पारक[विषया]न्तर्गत रांजली** गावातील एक फळबाग देवलनायकादि[1] ग्रामवासीयांच्या संमतीने **विष्णु उपाध्याय** याला राजशासनाने देण्यात आली, हे नमूद करण्याचा होता. हा ब्राह्मण मूळचा **माहर** गावचा असून त्या वेळी **शूर्पारक २०००** मध्ये राहत होता.

प्रस्तुत लेखाच्या शेवटी **वीसलदेवाने** बहुधा वरील ब्राह्मणासच दिलेल्या **१० द्रम्मांच्या दानाचा** उल्लेख आहे. हे दान पूर्वोक्त दानापूर्वी शक संवत् **१०५९, पिंगल संवत्सरी**[2] दिले होते. पूर्वोक्त दान शिळेवर कोरण्याच्या वेळेस त्या ब्राह्मणाने आपणास मिळालेल्या पूर्वीच्या दानाचाहि उल्लेख त्याच शिळेवर करून घेतला असे दिसते. ते दान प्रथम अपरादित्याच्या काळचे होते. शक संवत् १०५९ ला पिंगल संवत्सर होते.

स्थलनिश्चय – शूर्पारक हे सध्याचे सोपारा होय हे मागे दाखविले आहे. **रांजली** त्याच्या आग्नेयेस चार मैलांवर आहे. **माहर** हे त्यापुढे सुमारे सात मैलांवर समुद्रकिनारी आहे.

---

१ दीक्षित व तुळपुळे हे नाव 'दिवलनायक' वाचतात. पण खरे नाव वर दिले आहे.

२ या संवत्सराचे नाव येथे प्रपिंगल असे आले आहे.

ओळ	वाचन[1]
१	सिद्धिः[2][।*] स्वस्ति [।*] जयस्वा(श्चा)[भ्युदयस्च(श्च)][।*]
२	स(श)कनृपकालाति(ती)तसंव[त्सरे*[3]]
३	दशस(श)ते[4] [१०७०] समस्तरा[जा*]-
४	वलीसमलंकृतमहामण्डलेस्व(श्व)रा[धि*]-
५	पति स्रीम[तु*[5]] हरिपालदेवराज्य[का]-
६	लविजयरा[ज्ये] श्रीसुर्पारकद्विसह[स्रा*]-
७	[न्त:]स्थितसामान्य[सागर]काटी अपर[त:*[6]]
८	[भागे][7]श्रीदेवल[8]नाएकप्रमुष(ख)समस्त[लो*]-
९	कएक[संमत][9] रांजलीचा आरा[मु]
१०	सासान प्रदत[10] श्रीमाहरविनिर्गत [सूर्पा*]-

---

१ प्रा. म. को. ले., प्रतिमा ७ वरून. २ चिह्नाने प्रदर्शित.

३ ही दोन अक्षरे अस्पष्ट आहेत. दीक्षित व तुळपुळे 'संवछरे' वाचतात.

४ दीक्षित व तुळपुळे यांनी येथे 'दशस[प्त*]ते' असे वाचले आहे, पण बहुधा 'सप्तत्यधिके' हा शब्द निष्काळजीपणामुळे कोरला गेला नसावा. यासारखाच हरिपालदेवाच्या आगाशी शिलालेखातील (क्र. २५) पुढील कालनिर्देश पाहा – 'संवत्सरशतेषु दस(श)सु द्विसप्तत्यधिकेषु.'

५ हे अक्षर अस्पष्ट आहे.

६ दीक्षित आणि तुळपुळे 'काटीअपर्यंत' असे वाचतात, पण शेवटची दोन अक्षरे संदिग्ध आहेत.

७ दीक्षित येथे 'कीअ' आणि तुळपुळे 'स्वकीअ' वाचतात, पण येथेहि अक्षरे अस्पष्ट आहेत.

८ दीक्षित व तुळपुळे 'दिवलनायक' वाचतात, पण 'दि' चा इकार अस्पष्ट आहे. आमचे वाचन जास्त संभवनीय आहे.

९ दीक्षित 'हस्तोदकसंहिता भुवं आणि तुळपुळे 'लोक एकसंमती भूत्व' वाचतात.

१० 'शासनेन प्रदत्तः ।' वाचावे.

११ रक[पुर]वासि[१]वि[ष्नु][२]उपाध्या[य*] राजली–

१२ [आ]रामधर्मपती[३] श्री..[४] साखु [।*] तथा

१३ वित्यत्रा निमित[५] द्र १० वाटस विसलदे[व*]

१४ [सकु] संवतु १०५[९*][६] प्रपिंगल[७] संवस्त(त्स)रं(रम्) [।*]

क्र. २५

हरिपालदेवाचा आगाशी शिलालेख : शक संवत् १०७२

या लेखाची **शिला** ठाणा जिल्ह्याच्या वसई तालुक्यातील **आगाशी** गावी सापडली होती[८]. ती आता मुंबईच्या प्रिन्स् ऑफ वेल्स् म्यूझियम्‌मध्ये ठेवली आहे. तिची रुंदी ९ फू. ८½ इंच व उंची १ फू. ४½ इंच आहे.

अक्षरवटिका नागरी लिपीची असून **भाषा** मराठीमिश्रित संस्कृत आहे.

विषय – हा लेख महामण्डलेश्वराधिपति **श्रीहरिपालदेव** याच्या कारकीर्दीतील आहे. लेखाच्या धाटणीवरून तो उत्तर कोंकणचा शिलाहार नृपति होता यात संशय नाही.

---

१ दीक्षित आणि तुळपुळे 'सहवासि' वाचतात, पण त्यांतील पहिली दोन अक्षरे अस्पष्ट आहेत.

२ 'विष्णु' वाचावे.

३ दीक्षित 'पुरानै धर्मु उती(त) गीर्णाति' आणि तुळपुळे 'पुरानै धर्मपती' असे वाचतात, पण या दोन्हींचा नीट अर्थ लागत नाही.

४ ही दोन अक्षरे संदिग्ध आहेत.

५ दीक्षितांचे 'व्रित्यआ' हे वाचन तुळपुळ्यांनी स्वीकारले आहे, पण त्याचा अर्थ नीट लागत नाही. कदाचित् 'वृत्त्यर्थनिमित्तं' विवक्षित असावे.

६ दीक्षित आणि तुळपुळे यांनी हे संवत्सर १०५९ असे वाचले आहे, पण शेवटचा अंक अनिश्चित आहे. पिंगलसंवत्सराला जुळतो म्हणून तो तसा वाचलेला दिसतो.

७ या संवत्सराचे नाव नेहमी 'पिंगल' असे येते.

८ *Bom. Gaz.* (Old Ed.), Vol. I, part ii, p. 19; *Ep. Ind.*, Vol. XXIII, pp. 273 f.; प्रा. म. को. ले. पृ. ४९ इ. व प्रतिमा.

लेखाचा **काल शक संवत् १०७२ प्रमोद संवत्सर, मार्गशीर्ष शुक्ल प्रतिपदा** असा दिला आहे. वारादिकांच्या अभावी ही तिथि पडताळून पाहता येत नाही, तथापि दक्षिणात्य पद्धतीप्रमाणे शक संवत् १०७२ ला प्रमोद संवत्सर होते. तिथीची इंग्रजी तारीख २२ नोव्हेंबर सन ११५० येते.

प्रस्तुत लेखाचा उद्देश महाप्रधान **आहवमल्लदेव** याने **पट्टकिल** (पाटील) **राजानक** याच्या **आनेवाडी** गावाचे उत्पन्न (सिद्धाय) **उत्तरायण संक्रान्तीच्या**[1] पर्वणीच्या प्रसंगी गोवर्धनभट्ट उपाध्यायाचा नातू, दिवाकर भट्ट उपाध्यायाचा पुत्र **ब्रह्मदेवभट्ट उपाध्याय** यास दान दिले हे नमूद करण्याचा होता. आहवमल्ल हा **शूर्पारक** (विषयातील) **वट्टार** गावाचा रहिवासी होता. त्या गावाच्या अनेक **महत्तरांची** (सभ्य गृहस्थांची) नावे साक्षीदार म्हणून यात उल्लेखिली आहेत. यात खालील अधिकाऱ्यांचाहि निर्देश आला आहे. **वासुदेव पडवल,** महाप्रधान **लक्ष्मणप्रभु**, महाप्रधान **पद्मशिव राउल** आणि प्रधान **वासुगि नायक**.

स्थलनिश्चय – **शूर्पारक** हे सध्याचे सोपारा हे मागे सांगितले आहे. त्या जिल्ह्यातील **वट्टार** हे सध्याचे सोपाऱ्याच्या ईशान्येस सहा मैलांवर आणि आगाशीच्या नैर्ऋत्येस चार मैलांवर असलेले वाटार होय. **आनेवाडी** त्याच्या जवळपास आता आढळत नाही.

ओळ **वाचन**[2]

१ सिद्धम्[3] **स्वस्ति [।*] जयश्चाभ्युदय[श्च*] [।*]स(श)क[नृ]प-कालातीतसंव[त्स][र*]शतेषु दस(श)[सु]**

२ द्विसप्तसंत्यधिकेषु[4] **यत्रांकतोपि सम्वतु(त्) १०७२ प्रमोदसंवत्स-[रा]–**

३ [न्त]र्गतमार्ग्गसिरसुध[5] **१ पूर्व्वंक**[6] **अद्येह समधिगत्ता(ता)शेष-पंचमहा[शब्द]–**

---

१ ही उत्तरायण संक्रान्ति शक संवत् १०७२ ची असणे शक्य नाही, कारण ती प्रस्तुत शिलालेखाच्या तिथीनंतर २५ डिसेंबर ११५० रोजी होती. म्हणून ती शक संवत् १०७१ ची घेतली पाहिजे. तिची इंग्रजी तारीख २४ डिसेंबर सन ११४९ येते. तेव्हा हे दान सुमारे वर्षभर लिहिले गेले नव्हते असे दिसते.

२ प्रा. म. को. ले., प्रतिमा ८ वरून.

३ चिह्नाने प्रदर्शित.

४ 'द्विसप्तत्यधिकेषु' वाचावे.

५ 'मार्गशीर्षशुद्ध' वाचावे.

६ 'पूर्वस्यां तिथौ' वाचावे.

४ श्रीसीलाहारनरेंद्रजीमूतवाहनान्वयप्रसूतसमस्तराजा[व*]-

५ लीसमलंकृतमहामण्डलेस(श्व)राधिपतिश्रीमद(द्)हरिपाल-
दे[व*]-

६ [क]ल्याणविजयराज्ये। तत्प्रसादावाप्तसमस्तमंडलचिन्ता[भा*]-

७ रं समुद्वहति श्रीवेसु पडवल[१]। तथा महाप्रधानश्रीलष्म[ण*]-

८ प्रभो। तथा महाप्रधानश्रीप[द्म]सि(शि)व तथा प्रधानवासु-

९ [गि] नायक सत्येतस्मि[न्]काले प्रवर्त्तमाने। श्रीसूर्प्पारकत-

१० [र्ग*]त[२]वट्टारग्रामप्रभुज्यमान[३] महा[प्रधा]नश्रीआहवमल्लदेवेन

११ श्रीगोव[र्ध][४]भट(ट्ट)उपाध्यासुतदिवाकरभट(ट्ट)उपाध्यासुत-
ब्रह्मदेव[५]

१२ भट(ट्ट)उपाध्य[६]। महापर्व्वणि उत्तराण[७]संक्रांतिसमये धर्म्मेण
उदकपू-

१३ [र्व्व]कः पटकील राजानक आनेवडिसिधाये[८] प्रदत्तः [।*]
आचंद्रार्क-

१४ तारकं जावतु[९] तिष्ठति मेदिनी केनापि [पश्चा][१०] वा(बा)धा
न करणी[या][।*]

१५ अत्रार्थे साक्षि[११] वट्टारग्रामप्रमुक्ष(ख)रिसिम्हतारा। तथा साक्षि
नागुजि [म्ह]-

१६ तारा। तथा साक्षि अनंतनायक। साक्षि चांगदेव म्हतरा सा-
क्षि ... केसवो ...

---

१ हे आणि यापुढील वैयक्तिक नावे ओ. ९ मधील 'सति' याच्याशी अन्वय होण्याकरिता सप्तमीत पाहिजेत.

२ 'श्रीशूर्प्पारकान्तर्गत-' वाचावे. ३ हे व्याकरणदृष्ट आहे. 'ग्रामं प्रभुञ्जानेन' वाचावे. ४ हे अक्षर संदिग्ध आहे. ए. इं. च्या संपादकांनी 'गोवन्नभट' हे वाचन सुचविले आहे.

५ 'उपाध्याय' वाचावे. ६ 'उपाध्याय' वाचावे.

७ 'उत्तरायण -' वाचावे. ८ '-राजानकस्य आनेवाडीसिद्धायः' वाचावे.

९ 'यावत्' वाचावे. १० 'पश्चात्' वाचावे.

११ येथे व पुढेहि 'साक्षी' वाचावे.

क्र. २६

हरिपालदेवाचा माहुल शिलालेख : शक संवत् १०७५

या लेखाची **शिला** सन १९५८ मध्ये ट्रॉंबे येथे सापडली होती. ती आता प्रिन्स् ऑफ वेल्स् म्युझियम्‌मध्ये ठेवली आहे. हा लेख यापूर्वी डॉ. मो. गं. दीक्षितांनी संपादिला आहे.[१]

ही शिला पिवळसर पांढऱ्या रंगाच्या वालुकाप्रस्तराची असून तिच्या शिरोभागी मध्ये कलश आणि दोन बाजूंस सूर्य व चंद्र यांच्या आकृत्या आहेत. शिलेचा मध्यभाग लेख कोरण्यासाठी गुळगुळीत केला आहे. शिलेच्या खालच्या बाजूस गर्दभशापाच्या आकृत्या आहेत. लेख सुस्थितीत आहे.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** मराठीमिश्रित संस्कृत आहे.

विषय – प्रस्तुत लेखाचा उद्देश **श्रीहरिपालदेवाने षट्षष्टिविषयातील माहवल** गावाविषयी जी **व्यवस्था** घालून दिली होती ती नमूद करण्याचा होता. ती व्यवस्था ही की त्या गावातील घरांवर कर आकारला जाणार नाही आणि त्यांतील पोफळीच्या झाडांवर शेकडा तीन द्रम्म कर द्यावा लागेल.[२] नंतर **डोंबिलच्या गोवर्धनभट्टाला** एक वाटिका (फळझाडांची बाग) दान दिल्याचा निर्देश आहे. शेवटी जो ही व्यवस्था चाळवील त्याच्या बाबतीत गर्दभशापाचा उल्लेख केला आहे.

कालनिर्णय – ही व्यवस्था हरिपालदेवाने शक संवत् १०७५, श्रीमुख संवत्सर, आषाढ पौर्णिमेस, रविवारी झालेल्या **चंद्रग्रहणप्रसंगी** जाहीर केली होती. ही तिथी बहुतेक बाबतीत जुळते. तिची इंग्रजी तारीख ७ जुलै सन ११५३ येते. फक्त त्या दिवशी मंगळवार होता, रविवार नव्हता. एवढ्या बाबतीत कालनिर्देश चुकीचा आहे.

---

१ *Ep. Ind.*, Vol. XXXVII, pp. 165 f.

२ दीक्षितांनी याचा अर्थ पोफळ्यांच्या शंभर टोपल्यांवर तीन टोपल्या कर असा केला आहे. पण येथील वाचन 'दाल ३' नसून 'द्राम ३' आहे. शिवाय भोइघर ताम्रपटात (क्र. ६१) यासारख्याच कराचा – १०० पोफळ्यांवर (पोफळ्यांच्या झाडांवर) ४ द्रम्मांचा – निर्देश आहे. दीक्षित – महाराष्ट्रातील कांही प्राचीन ताम्रपट व शिलालेख, पृ. ४५, पाहा.

हरिपालदेवाची वंशावळ दिली नसली तरी लेखाच्या धाटणीवरून तो **शिलाहारवंशी** होता यात संशय नाही. शक संवत् १०७५ त्याच्या कारकीर्दीत (१०७०–१०७६) पडते.

स्थलनिश्चय – षट्षष्टि हे साष्टी होय. **माहवल** हे ट्राँबेमधील माहुल गाव – जेथे प्रस्तुत लेख सापडला होता ते – हे निश्चित आहे. **डोंबिल** हे कल्याण तालुक्यातील डोंबिवली असावे.

ओळ **वाचन**[१]

१ **सिद्धम्**[२] ।। स्वस्ति [।*] जयश्चाभ्युदयश्च [।*] स(श)कनृप-कालातीतसंवत्सरस(श)तेषु [द]–

२ स(श)सु पंचसप्ततत्यधिकेषु यत्रांकतोपि स(श)कसंवत् १०७५ स्त्री(श्री)मुख–

३ संवत्सरांतर्ग्गत आषाढ सु(शु)द्ध १५ रविदिने सोमपर्वणि निज-स्त्रे(श्रे)–

४ योर्थिना श्रीहरिपालदेवेन षट्षष्टिविषयांतर्ग्गतमा–

५ हवलग्रामीयविप्राणां गृहदेणक[नि*]र्मुक्तिः तथा वा[टि]कानां

६ त्रिकस(श)तं ग्राह्यमिति दे[ज]व्यवस्थया[३] उदकातिसर्ग्गेण सा(शा)सने[न*] प्रति–

७ पादिता:[४] ।। माहवलग्रामे ब्राह्मणा गृहदेणे न गे हावें [।*] वा[टि][का*]–

८ यां पोफलीं स(श)तं [प्र]ति द्राम[५] ३ गेहावें [।*] तथा च श्रीगोव[र्द्ध][नभ*]–

---

१ ए. इं., व्हॉ. ३७ च्या पृ. १६६ समोरच्या प्रतिमेवरून.

२ चिह्नाने प्रदर्शित. ३ 'देयव्यवस्थया' वाचावे.

४ 'प्रतिपादितम्' वाचावे.

५ दीक्षितांनी येथे 'डाल' वाचले आहे, पण खरे वाचन द्राम आहे. हे भोइघर ताम्रपटातील 'पूगिफलशतं प्रति द्रम्मचतुष्टयम्' यावरून स्पष्ट दिसते.

९ टो(ट्टो)पाध्या[याय*] डोंवि(बि)लवाटिका सर्वनि(न)मस्यं-(स्यम्) ।। ई(इ)[ति*] सा(शा)[सनव्य]-
१० वस्था जो चाली[1] तेहाचिये माया गाढउ वलघें[2] ।।

क्र. २७

हरिपालदेवाच्या कारकीर्दीतील ब्रिटिश म्यूझियम् शिलालेख : शक संवत् १०७६

या लेखाची **शिला** उत्तर कोकणात कोठे सापडली याचा निर्देश आढळत नाही. ती सध्या इंग्लंडात ब्रिटिश म्यूझियम्मध्ये ठेवली आहे. बर्जेसने पाठविलेल्या ठशावरून कीलहॉर्नने प्रस्तुत लेखाचा अंतर्भाव आपल्या 'दक्षिणेतील कोरीव लेखांच्या यादी 'त केला आहे पण त्याचा सारांश दिला नाही. ब्रिटिश म्यूझियम्चे डग्लस बॅरेट यांनी पाठविलेल्या ठशावरून तो येथे संपादिला आहे.

हा लेख कोरलेल्या शिलेची रुंदी ३८.१० सें. मी. व उंची २२.८६ सें. मी. आहे. दोन्ही बाजूंची कांही अक्षरे आता नष्ट झाली आहेत आणि एकंदर लेख फार वाईट स्थितीत आहे. तथापि त्याचा उद्देश कळण्यात विशेष अडचण येत नाही.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** जुनी मराठी आहे. शेवटी नेहमीचा भूदानविषयक संस्कृत श्लोक आहे.

विषय – प्रस्तुत लेखात म्हटले आहे. की **तुरुभाम्र** गावातील सार्वजनिक अग्निहोत्र देवाच्या विहिरीजवळचा पाट कोणी दुष्टाने फोडला. म्हणून **श्रीहरिपाल-देवाच्या** कारकीर्दीत त्या गावच्या साहकैयादि रहिवाश्यांनी असे ठरविले की जो कोणी त्या विहिरीच्या विद्यमान किंवा भावी पाटांना नुकसान पोचवील त्याला

---

१ दीक्षितांनी ' टाली ' वाचले आहे, पण त्यातील पहिले अक्षर ' चा ' दिसते. ' चाली ' ' चाळवील ' या अर्थी योजिले आहे.

२ दीक्षितांनी ' अलघे ' वाचले आहे, पण त्यातील पहिले अक्षर ' व ' आहे. त्यातील धातूचा ' ओळगणे ' (आक्रमण करणे) या अर्थी प्रयोग केला आहे.

[जबर शिक्षा केली जाईल]. या निर्णयाविरुद्ध जो कोणी गावकरी वागेल त्याच्या बाबतीत पुढे गर्दभशापाचा उल्लेख केला आहे. शेवटी भूदानविषयक संस्कृत श्लोक घातला आहे.

कालनिर्णय – लेखाच्या आरंभी **शक संवत् १०७६, भाव संवत्सरं, माघ पौर्णिमा** असा कालनिर्देश आहे. वारादिकांच्या अभावी ही तिथि पडताळून पाहता येत नाही. तथापि दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे शक संवत् १०७६ ला भाव संवत्सर येते. हा हरिपालदेवाच्या कारकीर्दीतील शेवटचा ज्ञात लेख आहे. यानंतर दोनच वर्षांनी मल्लिकार्जुनाचा लेख (क्र. २८) सापडला आहे.

स्थलनिश्चय – प्राचीन **तुरुभाम्र**चे आता तुरभे असे रूप व्हावे. या नावाची अनेक गावे ठाणा जिल्ह्याच्या ठाणा तालुक्यात आणि कुलाबा जिल्ह्याच्या पालघर तालुक्यात आढळतात. तथापि प्रस्तुत लेखाचे प्राप्तिस्थान माहीत नसल्याने यांपैकी कोणते येथे विवक्षित आहे ते सांगता येत नाही.

ओळ **वाचन**[1]

१ **[सिद्धम्[2]]। शक १०[७]६ भावसम्वत्सरे[3] माघ सु(शु)द्ध पौर्ण्णमास्यां पर्व्वणि [चातु]र्हो[मे]**

२ **लोक[समूहे] अग्निहोत्रदेवप्रतिबद्धतुरुभाम्रग्रामाधिभा[क् ?]**

३ **. . .राचेया कूपपानपरि जे नाड अच्छंति ते कवणें दुष्टें लोपि-[ले*]**

४ **.[स्थ]ले न्वते इति अद्य श्रीहरिपालदेवराज्ये श्रीसाहकैयप्रभृति**

५ **[सर्व्वनि] उदकोत्सर्ग्गी नाड अच्छंति अवरु जे होहिति अवरु पू. . .**

६ **धि जे. . .कीरु होताती च किलेतिल पुनरपि सावुकाराची [नली ?]**

७ **. . .अधिष्ठाने जो ग्रामभुज मानु अथवा अधिकु कवण विरुद्धि-पूर्व्वक [ए*]–**

---

१ ब्रिटिश म्यूझियम्चे डग्लस बॅरेट यांनी पाठविलेल्या ठशावरून.

२ चिह्नाने प्रदर्शित. ३ 'संवत्सरे' वाचावे.

८ [या*] चा लोप करी तेहाची माय गाढव [झ]वे ।। बहुभिर्व्व-
सुद्धा(धा) दत्ता रा–

९ जभिः सगरादिभिः [।*] [य]स्य यस्य [यदा] भूमिस्तस्य तस्य
तदा फल[म्][1] [।।*]

क्रमांक २८

मल्लिकार्जुनाचा चिपळूण स्तंभलेख : शक संवत् १०७८

या लेखाचा **शिलास्तंभ** दक्षिण कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील **चिपळूण** गावी सन १८७९ मध्ये सापडला होता.[२] तो आता प्रिन्स ऑफ वेल्स् म्यूझियम्मध्ये ठेवला आहे.

हा लेख एका शिलास्तम्भाच्या दोन बाजूंवर कोरला आहे. या बाजू आरंभी प्रत्येकी १ फू. १० इं. होत्या असे दिसते. या स्तंभाला ओ. १२ मध्ये 'शासनस्तंभु' म्हटले आहे. आरंभी या लेखाच्या निदान २६ ओळी असाव्या. त्यांपैकी बारा एका बाजूवर आणि निदान तेरा दुसऱ्या बाजूवर कोरलेल्या दिसतात. दुसऱ्या बाजूस पहिली ओळ आणि शेवटच्या कांही ओळी आता पूर्णपणे नष्ट झाल्या आहेत. या शिवाय त्या बाजूवरचे कांही शब्दहि आता नष्ट झाले आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** मराठीमिश्रित अशुद्ध संस्कृत आहे.

विषय – हा लेख महामण्डलेश्वराधिपति **मल्लिकार्जुन** याच्या काळचा आहे. हा अर्थातच **शिलाहारवंशी** असून हरिपालदेवाचा उत्तराधिकारी असावा. या लेखाची मिति[3] **शक संवत् १०७८, धातृ संवत्सर, वैशाख शुक्ल पक्ष, अक्षय-**

---

१ वृत्त – अनुष्टुभ्.

२ *Bombay Gazetteer*, (Old. Ed.), Vol. I, part ii, p.20; n.1 : *Ind., Ant.*, Vol. XXIII, pp. 116–117; *List of Inscriptions of Southern India*, p. 56; *J. of Bom. Univ.* (New Series), Vol. XIII, part I, pp. 60 f.; प्रा. म. को. ले., पृ. ५३ इ. आणि प्रतिमा.

३ अळतेकरांनी या लेखाचे वर्ष शक १०७९ असे चुकीने दिले आहे. तसेच त्यांनी त्याची मितिहि चुकीने पौष व दि १४, सोमवार अशी दिली आहे. त्यांनी प्रस्तुत व पुढील लेख (क्र. २९) यांच्या मित्यांचा घोटाळा केला आहे.

तृतीया, मंगळवार, मृगशिरस् नक्षत्र, युगादि अशी दिली आहे. ही बरोबर जुळते. या तिथीने त्रेतायुगाचा आरंभ झाला होता म्हणून तिला युगादि म्हटले आहे. हिची इंग्रजी तारीख २४ एप्रील सन ११५६ आहे.

लेखाच्या आरंभी **लखुमादेवी** व **तिल[भांडे]** यांचा उल्लेख आहे.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा **उद्देश सुप्रया** याची **प्रनालक** देशाचा 'दंडाधिपति' म्हणून नियुक्ति झाली, हे जाहीर करण्याचा आहे. त्याने **पनलेचे नगर** आपले मुख्य स्थान करावयाचे होते. तसेच त्याच्यानंतर त्याच्या ज्येष्ठ मुलाने अधिकारावर येऊन तेथूनच कारभार करावयाचा, हेहि जाहीर केले आहे.

यात पुढील कारभाऱ्यांचा उल्लेख आला आहे : महाप्रधान **नारणनायक,** आणि लक्ष्मणै प्रभूचा पुत्र सांधिविग्रहिक **अनन्तुगि**. नंतर कांही व्यक्तींचा, कदाचित् साक्षीदार म्हणून, नामनिर्देश आला आहे.

स्थलनिश्चय – **प्रणालक** देश कोल्हापूरजवळचा पन्हाळा प्रदेश, असे दीक्षित आणि तुळपुळे यांनी म्हटले आहे पण ते बरोबर नाही. कारण शिलालेख मूळच्या जागेहून दूरवर सापडत नसतात. दुसरे असे की रत्नागिरि जिल्ह्याच्या दापोली तालुक्यात **पन्हाळे काजी** गाव आहे व तेथे त्या नगराचा उल्लेख असलेला ताम्रपटहि (क्र. २३) सापडला आहे. तेच प्रस्तुत लेखातील **पनलेचे नगर** होय.

ओळ **वाचन**[1]

पहिली बाजू

१ **...सिद्धं**[2] **[।] स्वस्ति। [मारुव] [।*] लखुमादेवि(वी) तिल-[भांडे*]**

२ **.. त ज्येणेचि गोलाकडें बैठला ॥ [तत्समीहायां**[3]**] शकनृपकालातीत–**

३ **[सं]वत्सरशतेषु दश[स्व]ष्टसप्तत्यधिकेषु शकसंवतु(त्) ॥ १०७८। धातासंव–**

---

१ ज. बॉं. यु., व्हॉ. १३ (न्यू सीरीज) मधील प्रतिमेवरून.

२ हा शब्द सामान्यत: चिह्नाने दर्शविला जातो, पण येथे तो पूर्णपणे लिहिला आहे हे उल्लेखनीय आहे.

३ तुळपुळयांचे वाचन येथे दिले आहे, पण त्याचा अर्थ नीट लागत नाही.

४ त्सरे[१] वैशाख सूध[२] अक्ष[य*]तृतीयायां युगादिपर्व्वणि भौमदिने मृग-
५ सिरनक्षत्रे[3] श्रीमल्लिकार्ज्जुनमहामंडलेश्वराधिपतिकल्यान(ण)-विज-
६ यराज्ये तद्राज्यचिन्तामारं समुद्वहनं[४] महाप्रधाननारणनायक[५]प्रभू-
७ ज्यमाने[६] तथा सं(सां)धिविग्रहि[क*] लक्ष्मणैप्रभुसुत अनंतुगिप्रभू[७] तस(त्स)म-
८ ये प्रनालक[८]देशचिंताभारसमुद्वहनार्थं सुप्रया दंडाधिपति के-
९ लें[९] । तेया प्रसाददत्त पनलेंचें नगर मुख्य करुंन ज्येष्ठप्रपुत्रेन[१०] घेया-
१० वे ॥ अत्र(त्रै)व श्रीकरणे वेतपप्रभूसुतपरसरामप्रभू तथा तारुपैप्र-
११ [भू]... गिप्रभु तथा जोइपैप्रभुसुत चिंछतुमैप्रभु हेयां सर्वां
१२ .....[शा]सनस्तंभु आचंद्रार्कपर्यंत पालि[११]-

दुसरी बाजू

१३ [१२] .. .. ..
१४ यस(श)स्कराणि [।] निर्माल्यवान्तप्रतिमानि [तानि को नाम साधु:*]
१५ पुनराददीत[१३]॥[१॥*] सद्योदानं निरायासं सायासं दीर्घ [पालनम् । अतो हि मु-*]

---

१ 'धातृसंवत्सरे' वाचावे. २ 'शुद्ध' वाचावे. ३ 'मृगशिरोनक्षत्रे' वाचावे.
४ सामान्यत: 'समुद्वहति' असा पाठ असतो. ५ '-नारणनायके' वाचावे.
६ 'प्रभुज्यमाने' हे एखाद्या स्थलवाचकाचे विशेषण म्हणून योजले असते, ते येथे अयोग्य आहे. ७ हा शब्द सुद्धा सप्तमीत पाहिजे. 'प्रभौ' वाचावे.
८ तुळपुळ्यांनी 'पंनालक' वाचले आहे, पण पहिले अक्षर 'प्रा' स्पष्ट दिसते.
९ या वाक्यात संस्कृत व मराठी यांचे मिश्रण आहे. पुढील वाक्य केवळ मराठीत आहे. १० दीक्षितांनी 'अेपुत्रन' असे वाचले आहे, पण 'ए' चे हे रूप प्राचीन लेखात येत नाही. 'ज्येष्ठपुत्रेण' वाचावे.
११ 'पालयितव्य:' वाचावे.
१२ ही ओळ पूर्णपणे नष्ट झाली आहे. ती पुढीलप्रमाणे असावी– 'यानीह दत्तानि पुरा नरेन्द्रैर्दानानि धर्मार्थ–'. १३ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

१६ नयः प्राहुर्दानाच्छ्रेयोनुपालनं(नम्) ।। [२।।*] विंध्याटवीष्वतो [या][सु शुष्ककोटरवा-*]

१७ सिनः [।*]कृष्णाहयो विजायन्ते व्र(ब्र)ह्मदेयापहारि[णः] [।।३।।*]...[१]

१८ आरामाणां स(श)तेन वा[।*] गवां कोटिप्रदानेन धर्महृ[र्त्ता न शुध्यति ।।४।।*]

१९ जरारा[।*]क्षसीप्रारब्ध(ब्ध)ग्रासं यौवन(नम्) । स्वर्गवा[सान्न]- .....[२]

२० मः । वियोगदुःखं[3] व्याधिजरामरणसाधा[रणकं] ...[४]

२१ लसितजलबुद्वु(द्बु)दतरलत [रमेवायुः] .....[५]

२२ पि चरितचंचला [लक्ष्मीः।*] ...

२३ वियोगनष्टसंतान शरीरं ती(?)...[६]

२४ च दानफलं(लम्) ।। इति मुनिव[चनानि][७]...

२५ [सहस्राणि स्वर्ग(र्गे)[८]]......

क्र. २९

मल्लिकार्जुनाचा वसई शिलालेख : शक संवत् १०८३

या लेखाची **शिला वसई** येथे सापडली होती असे समजते.[९] ती आता प्रिन्स् ऑफ वेल्स् म्यूझियम्मध्ये ठेवली आहे. ती १०३.९७ सें. मी. रुंद आणि

---

१ 'तडागानां सहस्रेण' वाचावे.

२ '-रकवाससममिष्टसमाग-' वाचावे. ३ 'मवियोगदुःखं' वाचावे.

४ 'शरीरं पवनचलितकमलिनीदलवि-' वाचावे.

५ 'विद्युद्विलसिताद-' वाचावे. ६ 'अवधार्य संगृह्णीयात्' वाचावे.

७ 'अवधारयेत् । तथा चोक्तं भगवता व्यासेन । षष्टिं वर्ष-' वाचावे.

८ 'तिष्ठति भूमिदः। आच्छेत्ता चानुमन्ता चा तान्येव नरके वसेत् ।।' वाचावे.

९ *Bomb. Gaz.*, (Old Ed.), Vol. I, part ii, p. 20 n. 2; *Ep. Ind.*, Vol. XXIII, pp. 274 f.

४६.९९ सें. मी. उंच आहे. कोरीव लेखाच्या खाली एका चौकोनात गर्दभशापाच्या आकृति कोरल्या होत्या. त्या आता अस्पष्ट झाल्या आहेत. शिरोभागी कोरीव लेख आणि चंद्रसूर्यांच्या आकृत्यांमध्ये एका चौकोनात दोन आकृत्या आणि त्यांच्या मध्ये दोन शिवलिंगे – एक मोठे आणि दुसरे लहान – दाखविली आहेत. या दोन व्यक्ती स्त्रिया असून त्यांनी आपले हात शिवलिंगावर ठेवले आहेत. मोठे शिवलिंग उंच शाळुंकेवर बसविले आहे.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे.

विषय – प्रस्तुत लेख **शिलाहार नृपति मल्लिकार्जुन** याच्या काळचा आहे. त्यांत त्याची ‘ महासामन्ताधिपति ’ आणि ‘ तगरपुरपरमेश्वर ’ ही बिरुदे उल्लेखिली आहेत.

कालनिर्णय – प्रस्तुत लेखाचा काल **‘शक संवत् १०८३, वृष संवत्सर, पुष्य अमावास्या, सोमवार, सूर्यग्रहण’** असा दिला आहे.[१] अमान्त पौषातील या तिथीची तारीख १७ जानेवारी सन ११६२ अशी येते. त्या दिवशी सूर्यग्रहण होते, संवत्सरहि वृष होते, पण वार मात्र सोमवार नसून बुधवार होता. कदाचित् प्रस्तुत लेख बुधवारी लिहिल्यामुळे ही चूक अनवधानाने झाली असेल

प्रस्तुत लेखात खालील अधिकाऱ्यांचा निर्देश आला आहे – महासान्धिविग्रहिक **प्रभाकर नायक,** मुख्य खजीनदार महाप्रधान **अनन्तपै प्रभु** आणि दुय्यम खजीनदार **अमुक**. नंतर प्रस्तुत लेखात राजगुरु **वेदशिव** आणि भोपक **व्योमशिव**[२] यांचा उल्लेख आला आहे. यात व्योमशिवाची मोठी स्तुति केली आहे.

---

१ हे संवत्सर १०८२ असे बॉ. गॅ., व्हॉ. १, पार्ट २, पृ.१ टीप १, आणि व्हॉ १३, पार्ट २, पृ. ४२६ यांत वाचले होते. इतरत्र ते १०८९ असे दिले आहे. ए. इं च्या संपादकांनी म्हटल्याप्रमाणे शेवटचा अंक प्रथम ९ लिहून नंतर ३ करण्यात आला असावा; पण त्या पूर्वीचा अंक ७ सारखा दिसतो हे त्यांचे म्हणणे बरोबर नाही. कारण चिपळूण लेखात (क्र. २८) तो ८ च दाखवतो. तेथे वर्ष शब्दांत दिले आहे. पौष महिना पूर्णिमान्त घेतल्यास अमावास्या सोमवारी येईल. पण कोकणात पूर्णिमान्त पद्धति प्रचलित नव्हती. शिवाय त्या तिथीस सूर्यग्रहण नव्हते.

२ मन्त्री अनन्तपै व अमुक हे द्वितीय अपरादित्याच्या शक संवत् ११०८ च्या परेळ लेखात उल्लेखिले आहेत. त्यात भोपक व्योमशिवाचा राजगुरु म्हणून उल्लेख आहे. तसाच तो त्या राजाच्या लोनाड लेखात (शक संवत् ११०८) हि येतो.

प्रस्तुत लेखाचा एक उद्देश (१) पूर्वोक्त राजगुरु आणि भोपक **व्योमशिव** यांनी एका शिवमंदिराचा जीर्णोद्धार केला हे नमूद करण्याचा आहे. हे काम महदुगिव झा याचा पुत्र **लवण वङ्कक** याने पूर्ण केले. दुसरा उद्देश त्यांच्या गुरूच्या निवासस्थानाजवळ खणलेल्या विहिरीचा निर्देश करणे आणि (३) तिसरा **कटषड** विषयातील **पटलखक** विभागातील **लोणवाटक** गाव **लषण** (लक्ष्मण) **उपाध्यायाला** दान दिला हेहि नमूद करणे हा होता.

स्थलनिश्चय – कटषड याचे सध्याचे रूपांतर कटखेड किंवा कडगाव व्हावे; पण या तऱ्हेची गावे ठाणे जिल्ह्यात आढळत नाहीत. इतर कांही जिल्ह्यांत ती सापडतात, पण त्यांचा येथे उपयोग नाही. **पटलखकहि** सापडत नाही. **लोणवाटक** ठाणे जिल्ह्याच्या भिवंडी तालुक्यातील लोनाड असावे. **तगर** हे ओस्मानाबाद जिल्ह्यातील तेर हे पूर्वी दाखविले आहे.

वाचन[१]

१ सिद्धम्[२] [।*] स्वस्ति [।*] सकु[३] संवत् १०८३ [वृ]षसयसरान्तर्गत[४]–

२ पुष्ये[५] मासि व दि १५ सोमदिने ।। सूर्ज[६]पर्व्वणि

३ अद्येह समधिगताशेषपंचमहास(श)व्द(ब्द)महासामंता–

४ धिपतितगरपुरपरमेश्वर ।[७] श्रीसीलाहार[८]नरेंद्र–

५ इत्यादिसम[स्त]र(रा)[जा*]वलीविराजितश्रीमल्लिकार्जुनदेव–

६ राज्ये । महासांधिविग्रहिकप्रभाकरनायको(कः) श्री–

७ करणे प्रथमस्थपाटिमहाप्रधानश्रीअणतपै[९]प्रभो(भुः) द्विती–

८ यस्थपाटिअमुक[:*] । सत्यपालतु काले[१०] प्रवर्तमाने सति

---

१ मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून. २ चिह्नाने प्रदर्शित.

३ 'शक' वाचावे. ४ 'संवत्सरान्तर्गत' वाचावे. ५ 'पौषे' वाचावे.

६ 'सूर्य–' वाचावे.

७ हा आणि पुढील ओळीतील दंड निरर्थक आहेत.

८ 'शिलाहार' वाचावे. ९ 'अनन्तपै' वाचावे.

१० 'सत्येतस्मिन्काले' वाचावे.

९ राजगुरुश्रीवे[द]सि(शि)व[:*] । भोप[क]व्यमसिव[१] । विवेक-[मूलो][२]

१० गुणपलवौघः ।। संपतिसापः स च कीर्तिपु[ष्प]: स्रे[यः]फले

११ ज(या)चककल्प[वृक्ष:] श्रीभोपकव्यमसिवो विभाति ।। ताभ्यां च पु–

१२ रु[ष]भ्यां स जीर्नोधारो । कारित[३] महद्रुगिव झासुतः । लाष–

१३ णवङ्ककेन [कृ]तः[४] . . .प्रसादेन । ता[भ्यं](भ्यां) गुरुकुले

१४ [वा]पी च. . .कटष[डी]विषयंतःपाती[५] । पटालसकस । लो–

१५ नवाटको । लाषण उवाझाय[६] दतः(त्तः) । तथा धमादा-[यः*] तपः सौखा–

१६ [य*] संप(प्र)दत(त्तः)[७]। जश्च वु(पु)रुषः । एतत्पाल्यते[८] वापः तपि[९] स धणं(नं) ल–

१७ [भ]ते. . .न केनापि प्रतिः विजानीथ[१०]। यस्तु परिप(पं)थी [भ]-वत(भवेत्)

१८ तस्य माता गदभेन[११]. . .

---

१ 'व्योमशिव:' वाचावे.

२ येथे उपजाति वृत्तातील पुढील श्लोक सुरू होतो– विवेकमूलो गुणपल्लवौघ: संपत्तिशाख: स च कीर्तिपुष्प: । श्रेय:फलो याचककल्पवृक्ष: श्रीभोपकव्योम-शिवो विभाति ।।

३ 'ताभ्यां च पुरुषाभ्यां स जीर्णोद्धार: कारित: ।' वाचावे.

४ 'महद्रुगिवझासुतलाखणवङ्ककेन कृत: ।' वाचावे.

५ 'विषयान्त:पाति' वाचावे. ६ 'लाखणोपाध्यायाय दत्त। ।' वाचावे.

७ 'धर्मादायतप:सौख्यार्थं संप्रदत्त: ।' वाचावे. ८ 'पालयति' वाचावे.

९ याचा अर्थ लागत नाही. १० 'प्रतिविज्ञातव्य: ।' वाचावे.

११ 'गर्दभेन' वाचावे.

क्र. ३०

द्वितीय अपरादित्याचा लोनाड शिलालेख : शक संवत् ११०६

प्रस्तुत लेखाची **शिला** सन १८८२ मध्ये ठाणे जिल्ह्याच्या भिवंडी तालुक्यातील **लोनाड** येथे सापडली होती.[१] ती आता मुंबईच्या प्रिन्स् ऑफ वेल्स् म्यूझियम्‌मध्ये ठेवली आहे.

वर्णन – ही शिला १ फू. ६ इं. रुंद, २ फू. ४ इं. उंच व सुमारे ७ इं. जाड आहे, तिच्या शिरोभागी मध्यभागी कलश आणि त्याच्या दोन बाजूंस सूर्य व चंद्र कोरले आहेत. त्याच्या खाली कोरीव लेखाच्या मध्यभागी ४ इं. × ७ इं. चा चौकोन असून त्यांत शिवलिंग कोरले आहे. कोरीव लेखाच्या खाली गर्दभशापाच्या आकृति दिसतात.

प्रस्तुत लेख फार खराब झाला आहे. विशेषत: ८ ते १२ ओळीत अनेक अक्षरे वाचता येत नाहीत. तथापि महत्त्वाचा भाग कळतो.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** मराठीमिश्रित अशुद्ध संस्कृत आहे.

कालनिर्णय – प्रस्तुत लेख द्वितीय अपरादित्याच्या काळचा आहे. इतर शिलाहारराजांप्रमाणे त्याचे वर्णन 'समस्तराजावलीविराजित' असे केले असले तरी त्याची बिरुदे दिली नाहीत. लेखकाल **शक संवत् ११०६, क्रोधिन् संवत्सर, कार्त्तिक अमावास्या, सोमवार, सूर्यग्रहण** असा दिला आहे. ही तिथि कार्तिक महिना अमान्त घेतल्यास बरोबर जुळते. तिची इंग्रजी तारीख ५ नोव्हेंबर सन ११८४ येते.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश भोपक **व्योमशम्भूने** राजाच्या अनुज्ञेने **सूर्यग्रहण** प्रसंगी **षट्षष्टि विषयातील** चातकेश्वराच्या **दहस**ग्रामामधील वेहरले वाडीतील एक शेत **व्यो**मेश्वरदेवाला दिले हे नमूद करण्याचा होता. हा व्योमेश्वर

---

१ *Bomb. Gaz.*, (Old Ed.), Vol. I, part ii, p 20, n, 2; *ibid.*, Vol. XIV, p, 212; *J. Bihar R. S.*, Vol. XXIV, pp. 210; प्रा. म. को. ले., पृ. ७२ इ. व प्रतिमा.

म्हणजे व्योमशंभूने बांधलेल्या देवालयात आपल्या नावाने प्रतिष्ठापना केलेले शिवलिंग असावे. नंतर त्या शिवलिंगाच्या महाभोगादिकाकरिता कांही **पोरुथि द्रम्म** दिल्याचा निर्देश आहे. शेवटी गर्दभशापाचा उल्लेख आहे.

हा लेख **माधव** नामक लेखकाने लिहिला आणि **गोपिराजाने** राजाज्ञा लिहून घेतली, असे शेवटी म्हटले आहे.

व्योमशम्भु याचा व्योमशिव नावाने उल्लेख वसई शिलालेखात (क्र. २९) पूर्वी आला आहे. त्याने लोनाड येथे एका देवालयाचा जीर्णोद्धार केला होता.

स्थलनिश्चय – **षट्षष्टि** हे साष्टीचे प्राचीन नाव. **वेहरली** हे ठाणा जिल्ह्यात कोन्दिवटेच्या दक्षिणेस असलेले विहरोली असे दीक्षितांनी सुचविले आहे. **दहस**गावाचा पत्ता लागत नाही.

ओळ **वाचन***

१ सिद्धम्[१] [।*] [स्वस्ति][।*]जयश्चाभ्यु[दयश्च][२] [श]क[नृपकाला]-

२ तीतसंवत्सरशते[ष्वेका]दश[सु] षडधिकेषु [यत्रांकतो]–

३ पि श[क] संवतु [११०६][३]क्रोधिसंव[छ]रे का[र्त्ति]क व

४ दि १५ सोमे अद्येह समस्तराजावलीविराजित[श्री]–

५ मदपरादित्यदेवराज्ये . .[४] महाप्रधानभोपकश्रीव्यो–

६ मसं(शं)भो इत्येतस्मिन्काले प्रवर्तमाने शासनं [समभिलि]-[ख्य*]ते यथा षट्षष्टिविषये श्रीचा–

७ [त]केश्वर[५]देवस्य दहसग्रामांतःपाती(ति)वेहरलेगावक्षेत्रे भोपक-श्रीव्योमशंभुना [श्रीअप]–

---

* प्रा. म. को. ले. प्रतिमा क्र. १४ वरून. १ चिन्हाने प्रदर्शित.

२ या लेखाच्या पहिल्या चार ओळी मध्यभागी कोरलेल्या शिवलिंगाच्या चौकोनाने विभागल्या आहेत.

३ या वर्षसंख्येतील तिसरा अंक ४ सारखा दिसतो.

४ येथे दोन अक्षरे अस्पष्ट झाली आहेत.

५ येथील देवाचे नाव अस्पष्ट आहे. दीक्षितांनी ते 'तारकेश्वर' वाचले आहे.

८ रादित्यदेवानुमत्या [सूर्यपर्वणि]..... [१] व्योमेश्वरदेवाय... दत्तं

९ ...वावकः[२] दक्षिणतः [राजमार्ग[३]] [:*] पूर्वतः [आरामकः] उत्तरतः [व्योमे][४]श्वरदेवाय दत्तमु–

१० ...[५] निमित्ता[य] पोरुथि द्र १०० महाभोग[निमित्ताय] दशवर्षावधी उपरि पो–

११ [रुत्थ]द्र [३०]...दिवाकरसत्क.. अवधी....

१२ ... .[६]

१३ ...उमासिवाय[७] प्रसादी[क्र]द(त) द्र [३०][८]...

१४ ...उपरि गृहे २ अकरेण लावी इ...आचंद्र[तारकावधि(?)]

१५ इ[ये] शासने लिखिता भाषा जो लोपी अथवा लोपावि जो गर्दभनाथु [गर्दभु ?]

१६ तेहाचिए मांए सूर्यपर्वे गर्दभु [झवे] इति विचार्य तथा यस्य यस्य यदा भूमि[स्तस्य*]

१७ तस्य तदा फलमिति श्लोकार्धः(र्धं) विचार्य न केनापि लोपा[येत]

---

१ येथे सुमारे ६ अक्षरे नष्ट झाली आहेत. दीक्षितांनी...लिखितं, आणि तुळपुळ्यांनी 'आत्मने लिखितं' वाचले आहे. कदाचित् विवक्षित वाचन समभिलिखित्वा (समभिलिख्य) असेल.

२ दीक्षित आणि तुळपुळे 'वाटकः' वाचतात, पण छापावरून 'वावकः' स्पष्ट दिसते. हा शब्द मुम्मुणिराजाच्या ठाणे ताम्रपटात (क्र. १४) आला आहे.

३ सुमारे चार अक्षरे येथे अस्पष्ट झाली आहेत. दीक्षित व तुळपुळे 'षंज' वाचतात.

४ येथील देवाचे नाव अस्पष्ट आहे.

५ सुमारे ४ अक्षरे येथे अस्पष्ट आहेत. दीक्षितांनी '[अभि]षेक' वाचले आहे.

६ या ओळीतील बहुतेक अक्षरे अस्पष्ट आहेत.

७ दीक्षित 'राजमासिवाय' वाचतात.

८ या ओळीतील राहिलेली अक्षरे अस्पष्ट आहेत. दीक्षित आणि तुळपुळे 'पुष्पादि द्र ३०' वाचतात.

१८ अपि [तु] सर्वैः पालनीयमिति लिखितं स[त्क]माधवेनेति[१] . . .
१९ श्रीव्योमेश्वरदेवा[चे] पा[उ]ल [।*] मंगलं महा[श्रीः]
२० [गो]पिराजेन लिखितं[२] शासनं(नम्) ।

क्र. ३१

द्वितीय अपरादित्याचा ठाणे शिलालेख : शक संवत् ११०७

या लेखाची **शिला** नक्की कोठे सापडली ते माहीत नाही, पण ते ठिकाण ठाणे जिल्ह्यात – बहुधा ठाणे हेच – असावे[३]. कारण त्यात स्थानकीयपट्टनातील एक शेत आणि त्यांतील फळबागेच्या उत्पन्नातून काही द्रम्म दान दिल्याचा निर्देश आहे. नंतर ती शिला रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या संग्रहालयात नेली होती. सध्या ती मुंबईच्या प्रिन्स् ऑफ वेल्स् म्यूझियम्मध्ये ठेवली आहे.

वर्णन – ही शिला १ फूट ११ इं. रुंद आणि १ फू. ५ इं. उंच असून तिचा शीर्षभाग तिकोनी आहे. त्यात लिंगावर अभिषेक कलशाची आकृति आहे. लेख बराच सुस्थितीत आहे, पण शेवटच्या ओळीतील काही अक्षरे अस्पष्ट झाली आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची व **भाषा** किंचित अशुद्ध अशी संस्कृत आहे.

कालनिर्णय – प्रस्तुत लेख **अपरादित्यदेवाच्या** काळचा आहे. या नावाचे दोन राजे उत्तर कोकणच्या शिलाहार वंशात होऊन गेले. येथे उल्लेखिलेल्या शक संवताच्या वाचनासंबंधी मतभेद असल्यामुळे तो अपरादित्य कोणता याविषयी वाद उत्पन्न झाला आहे.

---

१ दीक्षितांनी 'माधवेने' वाचले आहे.

२ दीक्षितांनी 'राजमालिखितं' आणि तुळपुळयांनी 'आधिराज्ये लिखितं' वाचले आहे. पण सामान्यतः शेवटी लेखकाचे नाव येते.

३ *Bomb. Gaz.*, Vol I, part ii, p. 20, n. 2; *Ind. Ant.*, Vol. IX, p. 40, n. 62; Kielhorn, *List of Inscriptions of Southern India*, p. 55, No. 312; *A. B. O. R. I.*, Vol. V, pp. 169 f.; *Ep. Ind.*, Vol. XXIII, pp. 277 f.; मराठी संशोधन पत्रिका, व. ६, अंक ४, पृ. ४–५; प्रा. म. को. ले., पृ. ७७–७९.

३१. द्वितीय अपरादित्याचा ठाणे शिलालेख : शक संवत् ११०७ : ११९१

डिसकळकरांनी प्रस्तुत लेखातील वर्ष (विक्रम संवत्) **११७६** (सन १११९) वाचून तत्कालीन राजा प्रथम अपरादित्य (सु. सन १११०–११४०) असे प्रतिपादिले. यात उल्लेखिलेले दान सौराष्ट्रातील सोमनाथाला दिले असल्यामुळे त्यांतील वर्ष सौराष्ट्रातल्याप्रमाणे विक्रम संवताचे असावे, असे त्यांस वाटले असावे. शिवाय यांतील महामात्य लक्ष्मणनायक प्रथम अपरादित्याच्या वडवली दानपत्रातील लक्ष्मणैयप्रभु असावा असे वाटून त्यांचा तद्विषयक ग्रह दृढ झाला. डिसकळकरांचे मत नंतर अळतेकरांनी स्वीकारले. पण डिसकळकरांचे संवत्सराचे वाचन चूक आहे. खरे वाचन **११०७** असून ते वर्ष उत्तर कोकणातल्या इतर लेखातल्याप्रमाणे **शक संवताचे** आहे.

प्रस्तुत लेखातील समग्र कालनिर्देश (शक) **संवत् ११०७, विश्वावसु संवत्सर, चैत्र पौर्णिमा, रविवार** असा आहे. ही मिती अगदी बरोबर आहे. तिची इंग्रजी तारीख १७ मार्च सन ११८५ अशी आहे. हे वर्ष द्वितीय अपरादित्याच्या कारकीर्दीत पडते; कारण त्याचा लोनाड लेख त्यापूर्वीच्याच वर्षाचा (शक संवत् ११०६ चा) आहे.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा **उद्देश** अपरादित्याचा महामात्य आणि भास्करनायकाचा पुत्र **लक्ष्मणनायक** याने **सौराष्ट्रातील सोमनाथाला** पुढील दाने दिली, हे उल्लेखिण्याचा होता. (१) **स्थानकीय पट्टनातील** वाटिकेच्या (फळबागेच्या) उत्पन्नातून प्रत्येक पूजाप्रसंगी चार **द्रम्म** आणि (२) एका भातशेताच्या उत्पन्नातून २४ **द्रम्म. सोमनाथ** देवाची पूजा (वर्षांतून) पुढील पाच पर्वप्रसंगी करावयाची – **चैत्रिक**[१], **पवित्रिक**[२], **शिवरात्रि, दक्षिणायन** आणि **उत्तरायण**. शेवटी **श्रीचाहडदेवाचे** नाव आले आहे[३], पण कोणत्या संदर्भात ते समजत नाही.

---

१ दीक्षित 'चैत्रिक' याचा अर्थ चैत्रातील संक्रान्ति असा घेतात. त्याचे कारण पुढे दक्षिणायन आणि उत्तरायण यांचे निर्देश आहेत, हे असावे.

२ सांकलिया व उपाध्याय यांनी 'पावित्रिक' वाचले होते. खरे वाचन 'पवित्रिक' असे आहे. ह्याला 'पवित्रारोपणव्रत' असेहि म्हणनात. या प्रसंगी देवाला 'पवित्र' (मराठी 'पोवळे') अर्पण करतात. भगवान् शंकराला पवित्र अर्पण करण्याची तिथि कोणत्याहि पक्षाची अष्टमी किंवा चतुर्दशी – ती आश्विनातील असेल तर उत्तम, श्रावणातील मध्यम आणि भाद्रपदातील कनिष्ठ – समजली जाते (काणे, हि. ऑ. ध. लि., व्हॉ. ५, पृ. ३३९ इ.). भाद्रपद शुक्ल चतुर्दशीस झालेले 'पवित्रिकापर्व' वाक्पतिमुञ्जाच्या एका दानपत्रात उल्लेखिले आहे. इं. अॅ., व्हॉ. ६, पृ. ५२.

३ दीक्षित आणि तुळपुळे येथे 'स्वी' वाचतात आणि त्याचा अर्थ 'स्वीकर्ता' असा करतात. खरे वाचन स्वस्ति श्रीचाहडदवाये(य) असे आहे.

दीक्षित आणि तुळपुळे यांच्या मते त्याने श्रीसोमनाथ देवाच्या वतीने हे दान स्वीकारले होते.

स्थलनिश्चय – स्थानकीयपट्टन हे सध्याचे ठाणे, आणि **सौराष्ट्र** हे काठेवाड होय.

ओळ **वाचन**[1]

१ **सिद्धम्[2] [।*] संवतु[3] ११०७ विस्वा(श्वा)वसुसंवच्छरे चैत्र शुद्ध १५ रवौ दि[ने]**

२ **अद्येह श्रीमदपरादित्यदेवराज्ये । सौराष्ट्रीयश्री[सो]–**

३ **मनाथदेवाय पूजासत्कारार्थं महामात्यश्रीलक्ष्मण–**

४ **नायकेन प्रमो(परमो)दधिसुतीर्थे स्नात्वा गगनैकचक्रचूडा–**

५ **मणये कमलिनीकामुकाय भगवते सवित्रे नानावि[ध]–**

६ **कुसुमस्ला(श्ला)घ्यमर्घ्यं दत्वा(त्त्वा) सव(क)लसुरासुरगुरुत्रैलोक्यस्वा–**

७ **मिनं भगवंतमुमापतिमभ्यर्च्य:[4] ॥ भास्करनायकपुत्रेण श्री–**

८ **लक्ष्मणनायकेन [आ]त्म[5]स्रे(श्रे)[यो]र्थं श्रीदेवाधिदेवस्य[6] श्री–**

९ **स्थानकीयपा(प)[ट्ट ?]नवाटिकामध्ये [दा]नविधौ[7] दातव्यभाग–**

१० **द्रम ४ दस्यावधो[8]उपरि समग्र तांडु[ल]हलि [क्षेत्रं][9] दाम २४[10]**

---

१ मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून.

२ चिह्नाने प्रदर्शित. ३ 'संवत्' वाचावे. ४ हा विसर्ग निरर्थक आहे.

५ सांकलिया, दीक्षित आणि तुळपुळे 'त्वात्म' वाचतात.

६ दीक्षित आणि तुळपुळे 'देवेभ्य' असे वाचतात, 'व' वर 'ए' ची मात्रा नाही, त्यापुढील अक्षर 'भ' पेक्षा 'स्य' ला जवळ आहे. शिवाय शेवटी विसर्ग नाही.

७ हे वाचन संदिग्ध आहे. दीक्षित आणि तुळपुळे [दत्तावधि] असे वाचतात. पण शेवटली तीन अक्षरे येथे वाचल्याप्रमाणे स्पष्ट दिसतात. सांकलिया व उपाध्याय असेच वाचतात. ८ 'दत्तिविधौ' वाचावे.

९ सांकलिया आणि उपाध्याय 'उत्पत्तिसमग्रस्य' एवढेच वाचून पुढील भाग सोडून देतात. दीक्षित आणि तुळपुळे 'उपरितंडुलहलिसेतां' वाचतात.

१० दीक्षित आणि तुळपुळे येथे '२८' वाचतात, पण शेवटचा अंक ४ आहे.

११ देयाचे। [सु]लग्ने पूजा पंचपर्व्वे[१]। चैत्रिक। पवित्रिक[२]। शि-
१२ वरात्रि दक्षिणायण[3] उत्तरायण [।*] स्वस्ति [श्री]चाहडदेव-
(वा)ये(य)[४] [।*]

क्र. ३२

द्वितीय अपरादित्याचा परळ शिलालेख : शक संवत् ११०८

या लेखाची **शिला** बृहन्मुंबईत कुर्ल्याजवळ **माहवली** येथे सापडली होती.[५] ती प्रथम परळ येथील गव्हर्नरच्या निवासस्थानाजवळ नेऊन ठेवल्यामुळे या लेखाला 'परळ शिलालेख' असे नाव पडले. आता ती मुंबईच्या प्रिन्स् ऑफ वेल्स् म्यूझियम्‌मध्ये ठेवली आहे.

वर्णन – ही शिला ६ फू. ९ इं. रुंद आणि १ फू. ५ इं. उंच आहे. तिच्या शिरोभागी मध्ये कलश आणि दोन बाजूंस चन्द्र व सूर्य दाखविले आहेत. कोरीव लेखाखाली गर्दभशापाच्या आकृति आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** बरीचशी शुद्ध संस्कृत आहे.

विषय – प्रस्तुत लेखाचा उद्देश महाराजाधिराज आणि कोंकणचक्रवर्ती (द्वितीय) **अपरादित्याने षट्षष्टि** विषयाच्या **माहवलि** गावातील **अनन्तपै** याच्या वाटिकेच्या उत्पन्नातून **२४ द्रम्म दर्भवतीच्या वैद्यनाथ देवाला** दान दिले, हे नमूद करण्याचा होता.

---

१ 'पंचपर्वसु' वाचावे. २ दीक्षित आणि तुळपुळे यांनीहि 'पवित्रिक' वाचले होते. ३ 'दक्षिणायन' वाचावे.

४ दीक्षित आणि तुळपुळे 'स्वी. चाहडदेव' असे वाचतात, पण उत्तरायण आणि 'श्रीचाहड–' यांच्यामध्ये एक नव्हे तर दोन अक्षरे आहेत. आणि शेवटचे 'ये'हि स्पष्ट आहे. सांकलिया आणि उपाध्याय येथल्याप्रमाणेच वाचतात.

५ *J. R. A. S.* Vol. V (Old Series); *J. B. B. R. A. S.*, Vol. XII (Old Series), pp. 332 f.; Kielhorn's *List of Inscriptions of Southern India*, (No.313), p. 56; *Ep. Ind.*, Vol. XXIII, p. 277, n. 4; प्रा. म. को. ले. पृ. ८० इ. आणि प्रतिमा.

कालनिर्णय – या लेखाचा काल **शक संवत् ११०८, पराभव संवत्सर माघ पौर्णिमा** असा दिला आहे.[१] वारादिकांच्या निर्देशाच्या अभावी ही तिथि पडताळून पाहता येत नाही, पण दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे गत शक ११०८ ला पराभव संवत्सर येते. या मितीची इंग्रजी तारीख २६ जानेवारी सन ११८७ अशी येते.

प्रस्तुत लेखात खालील मंत्र्यांचा उल्लेख आहे – महाप्रधान भोपा **व्योमशिव,** मुख्य खजीनदार आणि महासान्धिविग्रहिक **अनन्तपै** आणि दुय्यम खजीनदार **अमुक**. यांपैकी भोपा किंवा भोपक व्योमशिव याचा राजगुरु किंवा मंत्री म्हणून उल्लेख मल्लिकार्जुनाच्या वसई शिलालेखात[२] आणि द्वितीय अपरादित्याच्या लोनाड शिलालेखांत[३] येतो. मुख्य खजीनदार अनन्तपै याचे नाव मल्लिकार्जुनाच्या चिपळूण[४] आणि वसई[५] शिलालेखात येते.

स्थलनिश्चय – **षट्षष्टि** म्हणजे साष्टी बेट. **माहवलि** हे कुर्ल्याजवळ अद्यापि प्राचीन नावाने ज्ञात आहे. **दर्भावती** हे पूर्वीच्या बडोदे संस्थानातील दभोई होय. तेथील वैद्यनाथ नामक शिवालय प्राचीन काळी सुप्रसिद्ध होते.[६] त्याला अनेक दाने दिलेली आढळतात.

ओळ **वाचन**[७]

१ **सिद्धम्**[८] **[।*] स्वस्ति [।*] जयश्चाभ्युदयश्च ।। शकु संवतु ११०८ पराभवसं[व*]–**

२ **त्सरे माघमासि ।। [अ]द्येह समस्तराजावलीविराजितम[हा*]–**

---

१ भगवानलाल आणि कीलहॉर्न यांनी हे वर्ष ११०९ वाचले होते, पंण पण त्यांतील शेवटचा अंक ८ आहे, ९ नव्हे हे मल्लिकार्जुनाच्या चिपळूण व वसई शिलालेखांवरून (अनुक्रमे शक १०७८ व १०८३) स्पष्ट आहे. चिपळूण लेखातील वर्ष शब्दांतहि दिले आहे. म्हणून याविषयी संशय नाही. कीलहॉर्नने ११०९ वाचल्यामुळे संवत्सर नाम जुळण्याकरिता त्याला ते वर्ष वर्तमान मानावे लागले. पण वर्तमान वर्षांचे उल्लेख उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या लेखात येत नाहीत. २ क्र. २९, ओ. ९ आणि ११.

३ क्र. ३०, ओ. ७. ४ क्र. २८, ओ. ७. ५ क्र. २९, ओ. ७.

६ Burgess & Cousins, *Antiquities of Dabhoi*, *A. S. I. R.* Vol. II.

७ प्रा. म. को. ले., प्रतिमा पृ. १६ वरून. ८ चिह्नाने प्रदर्शित.

३ राजाधिराजकोंकणचक्रवर्त्तिश्रीमदपरादित्यदेवकल्याण-

४ विजयराज्ये तथैतत्प्रसादा[त्] समस्तराज्यचिंताभारं स[मु*]-

५ द्वहति महामात्यभोपाश्रीव्योमशंभु राजकुले श्रीकरणे भां[डा]-

६ गारे प्रथमस्थेपादी महासांधिविग्रहिक श्रीअनंतपै प्रभु द्वि[ती]-

७ यस्थेपादी श्रीअमुक । इत्यादिश्रीकरणे सत्येतस्मिन्[1] काले प्र[व]-

८ र्त्तमाने । मया श्रीमदपरादित्यदे[वे]न आत्मनः [श्रे]योर्थिना संजात-

९ माघीपर्व्वणि सुतीर्थे स्नात्वा भगवते कमलिनीनाथाय [अ]र्घं-(र्घ्यं) दत्वा(त्त्वा)

१० भगवंतसुमापतिमभ्यर्च्य दर्भवतीनाथश्रीवैद्यनाथदेवाय पंचो-[प*]-

११ चारपूजासत्कारार्थं षट्षष्टिप्रतिबद्धमाहवलिग्रामस्याभ्यंतरव-

१२ र्त्ती(र्त्ति) अनंतपैप्रभुसत्कवाटिकासिद्धायात् अवांतरप्रवृत्ताधिक-

१३ करसमस्तविमुक्ति कृत्वा निमित्तसिद्धायात् चतुर्विंशतिद्रम्मा

१४ उदकातिसर्गेण प्रदत्ता[:*] । अत्रांकतोपि द्र २४ [।*] तदेतस्याः वा-

१५ टिकायाः परिपंथना केनापि न करणीया ॥ यः कोपि पा-

१६ तकभाजी(गी) [इ]मं द्रव्यादिलोभत्वात्[2] ॥ नि[मि*]त्तसिद्धाया-दधिकं क[रं*]

१७ करोति स पंचभिरपि पातकैरुपपातकैश्च परिवृतो रौर-

१८ वमहारौरवतमिश्र(स्र)अंधतमिश्र(स्र)कुंभिपाकादिनरकान् चि-रम-

१९ नुभविष्यति । यतः स्वदत्तां परदत्तां वा यो हरेत वसुंधरां-(राम्)। षष्टिं

---

१ न् च्या खाली उ सारख्या चिह्नाने त्या अक्षराचे व्यंजनत्व दाखविले आहे.

२ 'द्रव्यादिलोभात्' वाचावे. त्यापुढील दंड निरर्थक आहे.

२० वर्षसहस्राणि विष्टा(ष्ठा)यां जायते कृमिः[1] ॥१[॥*] आरामाणां सह-

२१ स्त्रैश्च तडागानां शतैरपि। गवां कोटिप्रदानेन भूमिप्रदानै-[श्च*][2]

२२ भूमिहर्त्ता न शुध्यति ॥ २ ॥ अथ च जो कोणु हुवि ए प्रशासन लो-

२३ पी तेया श्रीवैद्यनाथदेवाची [भा]ल सकुटुंबिआं पडे ॥ तेहाची

२४ माय गाढवें झविजे ॥ छ[3] ॥ लिखितमिदं कायस्थ(स्था)न्वय-प्रसू[ते]-

२५ न चालिगपंडितेन ॥

क्र. ३३

द्वितीय अनंतदेवाचा वसई शिलालेख : शक संवत् ११२०

या लेखाची **शिला** वसईच्या किल्ल्यातील जुन्या त्रिविक्रममंदिरासमोर सापडली होती.[4] ती ७५ सें. मी. रुंद आणि २४ सें. मी. उंच आहे. तिच्या शिरोभागी मध्ये कलश, त्याच्या दोन बाजूंस सूर्य आणि चंद्र, आणि कोरीव लेखाच्या खाली गाय आणि तिचे वासरू ही कोरली आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** मराठीमिश्रित संस्कृत आहे.

कालनिर्णय – हा लेख महाराजाधिराज परमेश्वर कोंकणचक्रवर्ती महामंडलेश्वराधिपति **अनंतदेव** याच्या कारकीर्दीतील आहे. लेखाच्या धाटणीवरून तो **शिलाहारवंशी** होता यात संशय नाही. लेखाची मिती **शक संवत् ११२०,**

---

१ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.
२ 'भूमिप्रदानैश्च' हे अनावश्यक आहे.
३ या अक्षराने समाप्ति दाखविली जाते.
४ इतिहास आणि संस्कृति, क्र. २६.

कालयुक्त संवत्सर, मार्गशीर्ष अमावास्या,[१] **सोमवार** अशी दिली आहे. ती संवत्सर व वार यांना जुळते. तिची इंग्रजी तारीख ३० नोव्हेंबर सन ११९८ अशी आहे. तेव्हा हा अनंतदेव शक १००३ व १०१६ मध्ये राज्य करणाऱ्या प्रथम अनंतदेवाहून भिन्न आहे. त्याला **द्वितीय अनंतदेव** म्हटले पाहिजे. प्रस्तुत शिलालेखात त्याच्या पूर्वजांचा उल्लेख नसल्यामुळे त्याचा यापूर्वीच्या द्वितीय अपरादित्याशी कसा संबंध होता हे समजत नाही. तथापि तो त्याचा पुत्र असावा असे वाटते. त्याने अल्पकाल राज्य केले असावे. कारण प्रस्तुत लेखानंतर पांचच वर्षांनी द्वितीय केशिदेवाचा शक ११२५ चा लेख सापडला आहे. तो त्याचा धाकटा भाऊ दिसतो.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश अनंतदेवाने कांही ब्राह्मणांना दिलेले दान नमूद करण्याचा दिसतो, पण हा लेख अत्यंत खराब अवस्थेत असल्यामुळे त्या दानाचे स्वरूप सांगता येत नाही. त्यानंतर तेथील महामात्य, त्याचा पुत्र आणि इतर कांही लोकांनी बहुधा त्याच ब्राम्हणाला कांही **पेंड्या** दान दिल्याचा उल्लेख आहे.

प्रस्तुत लेखात महामात्य नायक **व्रीहिम प्रभु** आणि **वाहिम प्रभु** या अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. अवशिष्ट भागात स्थलनाम आले नाही.

ओळ **वाचन**[२]

१ [सिद्धम्[३]।*] स्वस्ति [।*] जयश्चाभ्युदयश्च [।*] शकनृपकालातीतसं–

२ वत्सरशतेषु एकादशसु वी(विं)शत्यधिकेषु प्रवर्त्तमा[ने][४] य–

३ त्रांकतोपि शकसंवत् ११२० कालयुक्तसंवत्सरांतर्ग–

४ तमार्ग्गसिर[५]वदि [१५] सोमे [अ]द्येह समस्तराजावलीवि–

५ राजितमहाराजाधिराजपरमेश्वरश्रीमदनंतदेवरा–

---

१ वि. भि. कोलते यांनी ही तिथि ८ अशी वाचली आहे, पण तेथे दोन अंक असून दुसरा ५ स्पष्ट आहे. तेव्हा 'व दि १५' विवक्षित होती यात संशय नाही.

२ खोबरेकर यांनी पाठविलेल्या छापावरून.

३ चिह्नाने प्रदर्शित.

४ बहुधा 'प्रवर्तमानेषु' असे वाचन विवक्षित असेल.

५ 'मार्गशिरो–' वाचावे.

६ यकल्याणविजयराज्ये [तथै]तत्प्रसादावाप्तसमस्तराज्य-
७ चिंताभारं समुद्वहति महासात्यनाइक व्रीहिम[प्र]भु
८ ...किलश्रीवाहिमप्रभु इत्यादिकश्रीकरणे प्र-
९ वर्त्तमाने सति कोंकणचक्रवर्त्ति......
१० ...महामण्डलेश्वराधिपतिमहाराजश्रीअनंत-
११ देवेन धर्मादाय...पुरवा[स्तव्या]य
१२ ...लाहुगिप्रभुसुतसामंतपैप्रभु...
१३ अमात्य...वाटिकायां...
१४ ...अंकतोपि...
१५ ...पेंढिआ १०००...
१६ ...पावी पेंढिआ १००० इये...
१७ ... ।। व(ब)हुभिर्व्वसुधा भुक्ता राजभिः सगरा...
१८ ...फलं(लम्)[1] ।[।१।।*] स्वदत्तां परदत्तां वा यो [हरेत वसु*]-
१९ [न्धरां(राम्) ।*] षष्टि वर्षसहस्राणि विष्ठायां [जा]य[ते कृमिः ।।२।।*]

क्र. ३४

द्वितिय केशिदेवाचा मांडवी शिलालेख : (शक) संवत् ११२५

या लेखाची **शिला** ठाणे जिल्ह्यात वसईच्या ईशान्येस १५ मैलांवर **मांडवी** येथे सापडली होती.[2] ती आता मुंबईच्या प्रिन्स् ऑफ वेल्स् म्यूझियम्मध्ये ठेवली आहे.

---

१ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

२ *Bom. Gaz.*, Vol. I (Old Ed.), part ii, p. 20, n. 3; मराठी संशोधन पत्रिका, भाग ६, पृ. ६ इ.; प्रा. म को. ले., पृ. ९८ इ. व प्रतिमा.

३४. द्वितीय केशिदेवाचा मांडवी शिलालेख :(शक) संवत् ११२५ : १९९

वर्णन – या शिलेची रुंदी ७६.२० सें. मी. आणि उंची ३६.१० सें. मी. असून तिच्या शिरोभागी कलशाची आकृति कोरली आहे. त्या खालचा लेख उन्हापावसाने बराच खराब झाला आहे. शिवाय या शिलेला एक भेग पडली आहे तिच्या मध्ये कांही अक्षरे गेली आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** मराठीमिश्रित संस्कृत आहे.

कालनिर्णय – प्रस्तुत लेख 'समस्तराजावलीविराजित' **केशिदेवाचा** आहे; पण त्यात एकाहि बिरुदाचा उल्लेख नाही. तो शिलाहारवंशी होता, यात संशय नाही. तेव्हा त्याला **द्वितीय केशिदेव** म्हटले पाहिजे.[१] त्याची मिति [**शक**] **संवत् ११२५, रुधिरोद्‌गारी संवत्सर, माघ पौर्णिमा** अशी आहे. वारादिकांच्या निर्देशाभावी ती पडताळून पाहता येत नाही, तथापि दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे गतशक ११२५ रुधिरोद्‌गारी संवत्सर होते. या मितीची इंग्रजी तारीख १८ जानेवारी सन १२०४ येते.[२]

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश पूर्वोक्त शिलाहार नृपतीचा महामात्य **लक्ष्मीधर** याने प्रतिष्ठापना केलेल्या **लक्ष्मीनारायण देवाला** कांही दान (बहुधा वाटिका[३] किंवा फळबाग) दिली हे नमूद करण्याचा होता. ते दान **सोम ठाकूर** याने दिले होते आणि त्याचा उपयोग अर्थातच त्या देवाच्या पूजाअर्चेकरिता करावयाचा असला पाहिजे.[४]

स्थलनिश्चय-मांडवली हे सध्याचे मांडवी–जेथे हा लेख सापडला ते–होय.

---

१ भांडुप (क्र. ९) आणि दिवे आगर (क्र. १०) ताम्रपटांत अपराजिताच्या पुत्राचे नाव 'केशिदेव' आणि इतरत्र 'अरिकेसरी' असे येते. तो प्रथम केशिदेव होय.

२ दीक्षित आणि तुळपुळे यांनी या लेखाची तारीख २९ जानेवारी सन १२०३ अशी दिली आहे, पण ती वर्तमान शक संवत् ११२५ ला अनुलक्षून आहे. कोरीव लेखांतील वर्षे सामान्यत: 'गत' असतात. शिवाय त्या दिवशी संवत्सर 'रुधिरोद्‌गारी' नव्हते, 'दुन्दुभि' होते.

३ दानविषय आता नष्ट झाला आहे, पण त्याचे स्त्रीलिंगी विशेषण 'प्रदत्ता' असे ओ. ७ मध्ये आले आहे, त्यावरून वाटिकेचे दान केले असावे, असे दिसते.

४ दीक्षितांनी यातील लेखाचा अर्थ सोम ठाकुराने महामात्य लक्ष्मीधराने नियुक्त केलेला रामभक्त लक्ष्मीनारायण यास कांही दान दिले, असा केला आहे. पण तो चूक आहे. महामात्य लक्ष्मीधराने भगवान् विष्णूचे देवालय बांधून त्याला आपल्या नावावरून 'लक्ष्मीनारायण' असे नाव ठेवले होते, असे दिसते. अशी अनेक उदाहरणे प्राचीन कालातील प्रसिद्ध आहेत. तुळपुळ्यांनी लावलेला अर्थ बरोबर आहे.

ओळ	वाचन*
१	सिद्धम्[१] [।*] संवतु(त्) ११२५ रुधिरो[द्गा][रि*] [सं]वछरे[२] मा[घ][सु]
२	ध[3] १५...[अद्येह समस्तराजावली]–[४]
३	समलंकृत[श्रीकेशि] [देव*]रायरा[ज्ये] म–
४	[हा]मात्यश्रीलक्ष्मीध[र*]प्र[तिष्ठापित[५]*]–
५	भ[गव*]तो[६] श्रीलक्ष्मीनाराय[णा]चे [सा।क्षी]–
६	[मांडव]लीतीर्थे सोमठा[कु][रे]ण[७]
७	.....प्रदता(त्ता)[।*]

क्र. ३५

द्वितीय केशिदेवाचा अक्षी शिलालेख : शक संवत् ११३१

या लेखाची **शिला** कुलाबा जिल्ह्यातील अलिबागाजवळील **अक्षी** या गावी देवीच्या देवळापासून पंचवीस पावलांवर अजून आहे.[८] तिची रुंदी ४ फू. ३ इं. आणि

---

* प्रा. म. को. ले. प्रतिमा २० वरून. १ चिह्नाने प्रदर्शित.

२ 'संवत्सरे' वाचावे. ३ 'शुद्ध' वाचावे.

४ येथील अक्षरे आता अस्पष्ट झाली असली तरी वरील वाचन अगदी संभवनीय.आहे.

५ दीक्षित आणि तुळपुळें 'प्रतिष्ठित' वाचतात. येथेहि कांही अक्षरे नष्ट झाली आहेत.

६ दीक्षितांनी 'रामभक्तो' वाचले आहे. तुळपुळे 'श्रीयुक्त' वाचतात. येथे 'भ' आणि 'तो' ही स्पष्ट आहेत. त्यांवरून वरील वाचन दिले आहे.

७ दीक्षित आणि तुळपुळे 'हेर्णि' वाचतात.

८ *Kolaba District Gazetteer* (Bom. Gaz., Old Ed.), Vol. XI, p. 233; मराठी संशोधन पत्रिका, व्हॉ. ५, भाग १, पृ. १–२; पूर्वोक्त, व्हॉ. ६, भा. २, पृ. ११६ इ.; पूर्वोक्त, व्हॉ. ९, भा. २, पृ. २ इ; प्रा. म. को. ले., पृ. १ इ.

उंची १ फू. आहे. तिच्या शीर्षभागी चंद्र व सूर्य आणि त्या खाली गर्दभशापाच्या आकृति कोरल्या आहेत. त्यानंतर नऊ ओळीचा प्रस्तुत लेख व त्याच्या खाली पुनः चन्द्रसूर्यांच्या आकृति आहेत लेख अनेक शतके उन्हापावसात असल्यामुळे अत्यंत खराब झाला आहे. मुळातहि तो निष्काळजीपणाने लिहिला व कोरला होता. त्यामुळे अनेक शब्दांचे वाचन संदिग्ध आहे.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** जुनी मराठी आहे. तीत संस्कृत शब्दांची रूपे पुष्कळच बदलली आहेत.

कालनिर्णय – प्रस्तुत लेख पश्चिमसमुद्राधिपति आणि कोंकणचक्रवर्ती **केशिदेवाच्या** काळचा आहे. तुळपुळे तो प्रथम केशिदेव आणि दीक्षित तो द्वितीय केशिदेव आहे, असे म्हणतात. दीक्षितांचे मत बरोबर आहे, हे पुढे दाखविले आहे. द्वितीय केशिदेवाने वर दिलेल्या पदव्या धारण केल्या होत्या.

प्रस्तुत लेखाचे **वर्ष** व **संवत्सर** तुळपुळे आणि दीक्षित यांनी भिन्न भिन्न प्रकारे वाचली आहेत. तुळपुळे ते शक संवत् ९३४ (सन १०१२) प्रधावी, आणि दीक्षित ते शक ११३२ प्रभवा (प्रभव) संवत्सर असे वाचतात. तुळपुळयांनी दाखविले आहे की शक ११३२ ला प्रभव संवत्सर जुळत नाही; कारण गत शक ११३२ ला संवत्सर प्रमोद होते, आणि वर्तमान ११३२ ला ते शुक्ल होते. पण असा आक्षेप तुळपुळयांच्या मतावरहि येऊ शकतो. शिवाय प्रस्तुत लेखाची अक्षरवटिका शक ९३४ इतकी जुनी दिसत नाही. खरे वाचन **शक ११३१** दिसते; कारण शेवटच्या अंकात '२' ची गांठ दिसत नाही. शक ११३१ हे **वर्तमान वर्ष** मानल्यास ते **विभव संवत्सराशी** जुळते. आणि ओ. ५–६ मध्ये संवत्सर विभवच निर्दिष्ट आहे. त्या नावातील पहिले अक्षर पाचव्या ओळीतील 'संवतु' मधील 'व' सारखे आहे. तेव्हा खरे वाचन **शक संवत् ११३१, विभवसंवत्सरे** असे आहे. हे वर्ष द्वितीय केशिदेवाच्या कारकीर्दीत पडते. कारण त्याचे लेख शक ११२५ आणि शक ११६१ चे सापडले आहेत.

उद्देश – प्रस्तुत लेख फार खराब स्थितीत असल्यामुळे त्याचा नक्की उद्देश कोणता होता, हे सांगता येत नाही. पण तो बहुधा केशिदेवाचा महाप्रधान भइर्जु याने कांही (तलाव किंवा विहीर) खोदविली आणि प्रधान अघोर याने तसेच कांही महालक्ष्मीप्रीत्यर्थ खोदविले, हे नमूद करण्याचा असावा. शेवटी सर्व सुखी होवोत अशी इच्छा व्यक्त केली आहे. या शिलालेखाच्या स्थानाजवळ देवीचे देवालय अद्यापि आहे, हे उल्लेखनीय णाहे.

---

१ तुळपुळयांच्या मते प्रस्तुत लेखाचा उद्देश महालक्ष्मीच्या बोडणाकरिता ९ कवळी धान्य दिले हे नमूद करण्याचा होता.

ओळ	वाचन[1]
१	गी सुष संतु[2] । [स्वस्ति ओं ।] पसीमस–
२	मुद्रधीपती[3] ।[4]श्रीकोंकणचक्र–
३	वर्ती । श्रीकेसीदेवराय[5]महाप्रधा–
४	न भइर्जु सेणुइ[6] तसीमीनी[7] क(का)ले
५	प्रव्रतम(मा)ने[8] । सकु संवतु[9] [११]३१ [व]भ–
६	वा संवत्सरे[10] अ–कडी धर्मुका बै–
७	लु । भइ[र्ज्जु] त[था] । बोडध्य त[भ]न उ–
८	क[र]ली[11] [।*] अधो[र] प्रधानु । मह(हा)लषु(खु)–
९	मीची प[डी ?] कलुन पोकरली[12] [।*][ज]–

---

१ प्रा. म. को. ले. मधील प्रतिमा पृ. १ वरून.

२ हे आरंभीचे शब्द शेवटल्या ओळीतील ज– नंतर वाचावयाचे. 'जगी सुख असो' हा अर्थ. या सारखाच लेखाचा अवशिष्ट भाग पहिल्या ओळीत कोरण्याचा प्रकार प्रा. म. को. ले., क्र. ३१ मध्ये पाहा.

३ 'पश्चिमसमुद्राधिपति–' वाचावे.

४ हा आणि यासारखेच पुढील ओळीतील इतर दंड निरर्थक आहेत.

५ 'श्रीकेशिदेवराय' वाचावे.

६ हे कदाचित् 'सेनाधिपति' या अर्थी आले असेल.

७ 'तस्मिन्' वाचावे.

८ 'प्रवर्तमाने' वाचावे.

९ 'शकसंवत्' वाचावे.

१० तुळपुळे हे वर्ष ९३४ असे, आणि दीक्षित ११३२ असे वाचतात. त्याच्या वाचनाची चर्चा मागे केली आहे. 'विभव' वाचावे.

११ तुळपुळे 'भइर्जुवें तथा वोडणा तथा नउ कुवंली' आणि दीक्षित 'भइर्जु–तला–तव्हानं उकरली' असे वाचतात. शेवटचा शब्द 'उकरली' स्पष्ट दिसतो.

१२ तुळपुळे 'वआण। लुनया कवली', आणि दीक्षित 'यज्ञा कलु(रु)न पोकरली' असे वाचतात. येथेहि शेवटचा शब्द स्पष्ट आहे, पण इतर वाचन संदिग्ध आहे.

क्र. ३६

द्वितीय केशिदेवाचा चौधरपाडा शिलालेख : शक संवत् ११६१

या लेखाची **शिला** ठाणा जिल्ह्याच्या भिवंडी तालुक्यातील **चौधरपाडा** गावाजवळ सन १८८२ मध्ये सापडली होती.[१] ती १८७.९६ सें. मी. रुंद, ४३.१८ सें. मी. उंच आणि २६.४० सें. मी. जाड आहे. तिच्या शिरोभागी सूर्य, चंद्र आणि कलश कोरले आहेत. तसेच प्रस्तुत लेखाखाली गर्दभशापाच्या आकृति आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची आहे. शिळेचा पृष्ठभाग गुळगुळीत करून त्यावर अक्षरे खोल व सुंदर रीतीने कोरली होती, पण ती आता – विशेषत: लेखाच्या शेवटच्या भागात – उन्हापावसामुळे अस्पष्ट झाली आहेत. **भाषा** संस्कृत, इतर लेखांतल्या पेक्षा पुष्कळ शुद्ध, आहे.

विषय – प्रथम विनायकाच्या आणि नंतर घुंपेश्वराच्या स्तुतिपर एक एक श्लोक आहे. नंतर शिलाहारनृपति **अपरार्काचा** पुत्र **केशिदेव** याच्या वर्णनपर श्लोक आहे.

प्रस्तुत लेखाचा उद्देश महाराजाधिराज, कोंकणचक्रवर्ती **केशिदेवाने शक-संवत् ११६१, विकारी संवत्सर, माघ कृष्ण चतुर्दशी, शिवरात्रि, मंगळ-वार,**[२] या दिवशी ब्रह्मपुरी पुढील चार ब्राह्मणांस दाने दिली – सोमनायक, सूर्य-नायक, गोविन्दनायक आणि नाउनायक; तसेच त्याने भगवान् शंकराच्या पुजाऱ्यांच्या योगक्षेमाकरिता **बोपग्रामान्तर्गत मांजसपल्ली** वाडी दान दिली हे नमूद करण्याचा होता.[३] त्या वेळी पुढील मंत्री राज्यकारभार पाहत होते – माहामात्य **झंपडप्रभु**, महासांधिविग्रहिक **राजदेव पंडित** आणि खजीनदार **अनंतप्रभु**.

कालनिर्णय – प्रस्तुत लेखाचा काळ भगवानलाल इंद्रजींनी शकसंवत् ११६१ वाचला होता. देवदत्त भांडारकरांनी तो शक संवत् ११६२ वाचला होता. मो. गं. दीक्षितांचे मत भांडारकरांसारखे होते. पण त्यांनी ते वर्ष वर्तमान मानून त्या वर्षी

---

१ *Bom. Gaz.*, Vol. I (Old Ed.), part ii, p. 20, n. 3, and Vol. XIV (Old Ed.), p. 212; *P. R. A. S. I. Western Circle* (1905–6), p. 30; *A. B. O. R. I.*, Vol. XXIII, pp. 98 f.

२ शिवरात्रि मंगळवारी पडल्यास विशेष पुण्यकारक असते अशी श्रद्धा आहे.

३ श्लो. ३ मध्ये म्हटले आहे की हे गाव सोमदेवाच्या वंशजांनी भोगावयाचे आहे. तेव्हा ते सोमनायक आणि त्याचे तीन पुत्र यांस दान दिलेले दिसते.

संवत्सर विकारी होते आणि शिवरात्रि मंगळवारी पडली होती, असे म्हटले आहे. पण वर्तमान वर्षे उत्तर कोकणच्या कोरीव लेखांत क्वचितच येतात. म्हणून शक संवत् ११६१ हे वाचनच बरोबर आहे. शिवरात्रीची इंग्रजी तारीख २४ जानेवारी १२४० येते.

स्थलनिश्चय – प्रस्तुत लेखात उल्लेखिलेली **ब्रह्मपुरी**[१] हे चौधरपाडयाचे प्राचीन नाव असावे. तेथे देवळाचे अवशेष आहेत. **बोपगाव** हे सध्याचे चौधरपाडयाच्या पश्चिमेस दोन मैलांवरचे बाबगाव होय. त्याची वाडी म्हणून उल्लेखिलेले मांजसपल्ली सध्या अस्तित्वात नाही.

ओळ **वाचन**[२]

१ सिद्धम् । ओं नमो विनायकाय ॥ नमामि भुवनोत्पत्तिस्थिति-संहारकारिणं(णम्) । श्रीमत्षुंपेस्व(श्व)–

२ रं[३] भक्तजनसर्व्वात्तिहारिणं(णम्)[४] ॥ १ ॥ श्रीविद्याधरवंश-मंडनमणिर्जीमूतकेतोः कु–

३ ले विख्यातोस्त्यपरार्क्कराजतनय(यः) श्रीकेशिपृथ्वीपतिः । यस्यापारपवित्र–

४ पौरुषनिधेरालोक्य राज्यस्थितिं[५] श्रीरामादिमहीभुजां भगवती धत्ते

५ धरा न स्मृतिं(तिम्)[६] ॥ २ ॥ स(श)कसंवत् ११६१[७] विकारि-संवत्सरांतर्ग्गत माघ व दि १४

६ चतुर्द्दश्यां भौमे शिवरात्रौ पर्व्वणि अद्येह समस्तराजावलीसम-लंकृ–

७ तमहाराजाधिराजकोंकणचक्रवर्त्तिश्रीकेशिदेवकल्याणवि–

---

१ ब्रह्मपुरी, ब्रह्मवाडी, ब्राह्मणगाव अशी गावे भिवंडी तालुक्यात आढळत नाहीत.

२ पुरातत्त्व खात्याच्या संचालकांकडून मिळालेल्या छापावरून.

३ 'श्रीमत्सोमेश्वर' असे दीक्षित वाचतात, पण यासारखे (षोंपेश्वर) नाव पुनः ओ. ११ व १८ मध्ये आले आहे.

४ वृत्त – अनुष्टुभ्. ५ हा दंड निरर्थक आहे. ६ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

७ खरे वाचन ११६१ आहे. ते भगवानलाल इंद्रजींनी दिले होते.

८ जयराज्ये तथैतत्प्रसादात्समस्तराज्यमंडलचिंताभारं समुद्वहति ।[1]

९ महामात्ये[2] श्रीझंपडप्रभु महासांधिविग्र(हि)क राजदेवे पंडित[3] श्री–

१० करणभांडागारे अनंतप्रभु प्रमु[खे]षु सत्सु एतस्मिन्काले प्रवर्त-माने

११ सति ब्रह्मपुरीग्रामदानसा(शा)सनं समधिलिक्ष(ख्य)ते यथा ॥ श्रीषोंपेश्व–

१२ रदेव[4]पूजनसदाव्यासक्तसर्वा[न्तरः*] । सत्पात्रद्विजसोमनायक–

१३ व(ब)टोः संतानयो(भो)ग्यस्थितिं(तिम्) । श्रीर्ब्रह्मपुरीं[5] पुरारिभवनक्ष्माभृन्मनोहा–

१४ रिणीं । वीरः कारयति स्म विस्मयमयीं श्रीकेशिपृथ्वीपतिः[6] ॥ ३ ॥ बटुक–

१५ नामानि कथ्यंते । सोमनायकः सूर्य्यनायकः । गोविंदनायकः । नाऊ ।[7]

१६ नायकः । इति चत्वारो बट(टु)काः ॥ निर्व्वाहाय पुरारिपूजक-बटुश्रेणीद्वि–

१७ जानां सदा वो(बो)पग्रामगता स्वसीमसहिता मां[जे?]सपल्ली[8] पुरा [।*] दत्ता श्रीशि–

---

१ हा दंड निरर्थक आहे.

२ 'महामात्य–' वाचावे. ३ 'देवपंडित' वाचावे.

४ 'श्रीसोमेश्वरदेव' वाचावे. ५ 'श्रीमद्ब्रह्मपुरीं' वाचावे.

६ वृत्त – शार्दूलविक्रीडित. दीक्षितांनी 'विस्तारयति निर्म्मलमती(ति)-श्रीकेशिपृथ्वीपतिः ।' वाचले आहे, पण छापात तसे दिसत नाही.

७ हा दंड अनावश्यक आहे.

८ 'मांजस्रपल्ली' यासारखे नाव येथे अपेक्षित आहे.

१८ वरात्रिपर्व्वणि विभोः षोंपेस्व(श्व)रस्याग्रतः श्रीमत्केशिनरेश्वरेण विमला[1] चं-

१९ द्रार्क्कतारावधि[2] ॥ ४ ॥ [राज्य]स्य मंत्रिणान्यैर्व्वा कर्त्तव्यं धर्म्मपालनं(नम्) । धर्म-

२० ध्वंशे[3]...... नरकस्थितिं[4](तिः) ॥ ५ ॥ तथा चोक्तं पूर्वाचार्य्यमुनि-

२१ भिः । सुवर्ण्णमेकं गामेकां भुमेरप्येकमंगुलं(लम्) । हरन्नरकमाप्नोति या-

२२ [वदाभूत]संप्लवं(वम्) ॥ ६ ॥ मंगलं महाश्रीः । [शुभं भ]-वतु ॥[5] ले[ख]कपाठकयोः ॥

क्र. ३७

तृतीय अनंतदेवाचा दिवे आगर शिलालेख : शक संवत् ११७६

या लेखाची **शिला** कुलाबा जिल्ह्याच्या श्रीवर्धन तालुक्यातील **दिवे आगर गावी** एका घराखाली खणत असता सापडली होती.[1] तिची रुंदी १०५.६८ सें. मी. आणि उंची ३३.०२ सें. मी. आहे. तिच्या शिरोभागी चंद्र व सूर्य, त्यांच्या खाली प्रस्तुत लेख आणि शेवटी गर्दभशापाच्या आकृत्या कोरल्या आहेत. ही शिला आता सापडत नसल्यामुळे डॉ. मो. गं. दीक्षितांच्या वाचनावरून हा लेख येथे संपादिला आहे.[6]

---

१ दीक्षितांचे 'धि(धी)मता' हे वाचन वृत्ताला जुळत नाही व छापहि त्याला अनुकूल नाही.

२ वृत्त – शार्दूलविक्रीडित. ३ 'धर्मध्वंसे' वाचावे.

४ शेवटचा भाग पुढीलप्रमाणे वाचावा– 'हि जायेत सर्वदा नरकस्थितिः ॥' या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

५ हे दंड अनावश्यक आहेत.

६ मो. गं. दीक्षित – महाराष्ट्रातील कांही प्राचीन ताम्रपट व शिलालेख, पृ. ८५ इ.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे.

कालनिर्णय – प्रस्तुत शिलालेख महामण्डलेश्वराधिपति **अनंतदेवाच्या** कारकीर्दीतील आहे. त्याची मिति **शक संवत् ११७६, आनंद संवत्सर, आषाढ कृष्ण अष्टमी** अशी दिली आहे. वारादिकांच्या अभावी ती पडताळून पाहता येत नाही, पण दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे शक संवत् ११७६ ला आनंद संवत्सर येते. मितीची इंग्रजी तारीख ९ जुलै सन १२५४ येते.[१]

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश **अनन्तदेवाचा** मांडलिक **राम** याने **दीपक** गावातील एक वाटिका (फळबाग) **गणपति नायकाला** दिली हे नमूद करण्याचा होता. हा लेख खाजगी असल्यामुळे त्यात राजमंत्र्यांचा उल्लेख नाही.

लेखाच्या धाटणीवरून आणि प्रस्तुत शिलेवरील शिल्पावरून हा अनंतदेव शिलाहारवंशी होता यात संशय नाही. त्याचे आणखी लेख सापडले नाहीत, पण प्रस्तुत लेखाच्या शक संवत् ११७६ या वर्षावरून तो द्वितीय केशिदेव (अन्त्य ज्ञात वर्ष शक ११६१) आणि सोमेश्वर (प्रथम ज्ञात वर्ष शक ११८१) यांच्यामधील कालात होऊन गेलेला दिसतो. त्याला तृतीय अनंतदेव म्हटले पाहिजे. त्याचा द्वितीय केशिदेवाशी कोणता संबंध होता, हे कळत नाही.

स्थलनिश्चय – **दीपक** हे सध्याचे दिवे आगर होय हे पूर्वी सांगितले आहेच.

ओळ **वाचन**[२]

१ **स्वस्ति [।*] शकु संवतु[३] ११७६ आनंदसंवत्सरे । आषाढ व दी(दि)**

२ **८ दिने अद्येह समस्तराजावलीविराजितमहामंड–**

३ **लेश्वराधिपतिश्रीमदनंतदेवकल्याणविज–**

४ **यराज्ये तत्प्रसादात(त्) श्रीराममंडलीकेन प्रभु–**

५ **ज्यमान(ने) श्रीदीपकग्रामे व्रिति(वृत्तिः) पश्चिमे–**

६ **.. .. .. दक्षिणतः श्रीधरस(स्य) वृत्ति[:*]**

---

१ दीक्षितांनी २४ जून सन १२५४ अशी इंग्रजी तारीख चुकीने दिली आहे. ती आषाढ शुक्ल ८ मीची आहे.

२ दीक्षितांच्या वाचनावरून. ३ 'शकसंवत्' वाचावे.

७ उत्तरतः । एवं सर्वसीमासमन्विता वाटिका श्री–
८ राममंडलीकेन गणपतिनायकाय हस्तो–
९ दकेन . . . वृत्तिः प्रदत्ता । मंगलं महा–
१० श्रीः [।*]

क्र. ३८

सोमेश्वराचा रानवड शिलालेख : शक संवत् ११८१

या लेखाची **शिला** कुलाबा जिल्ह्यातील उरण गावाजवळ **रानवड** येथे सापडली होती.[१] तिची रुंदी तीन फूट व उंची १ फूट आहे. तिच्या शिरोभागी मध्ये कलश आणि दोन बाजूंस सूर्य व चंद्र आहेत. मध्यभागी प्रस्तुत लेख कोरला असून त्याखाली गर्दभशापाच्या आकृत्या आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची असून **भाषा** आरंभी संस्कृत आणि नंतर मराठी आहे.

विषय – प्रस्तुत लेख महाराजाधिराज कोंकणचक्रवर्ती **सोमेश्वर** याच्या काळचा आहे. लेखाच्या धाटणीवरून व शिळेवरील शिल्पांवरून तो शिलाहारवंशी होता, यात संशय नाही. प्रस्तुत लेखाची **मिति शक संवत् ११८१, सिद्धार्थ संवत्सर, चैत्र अमावास्या** अशी दिली आहे. त्या दिवशी **सूर्यपर्व**प्रसंगी राजाने **उरण–पडिवसे** (उरणाजवळच्या पडिवसे) गावातील कांही शेतांच्या उत्पन्नाचे दान **दामोदरभट्ट** आणि त्याचा भाऊ यांस दिले होते. **सूर्यपर्व** म्हणजे सूर्यग्रहण नसून संक्रान्ति होती हे शेवटी सांगितले आहे.

कालनिर्णय – वारादिकांच्या अभावी प्रस्तुत लेखातील मिती पडताळून पाहता येत नाही, तथापि दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे शक संवत् ११८१ ला सिद्धार्थ संवत्सर येते. वरील मितीला सूर्यग्रहण नव्हते, पण अधिक चैत्र अमावास्येला **मेष संक्रान्ति**

---

१ *Bom. Gaz.*, Vol. I (Old Ed.), part ii, p. 21, n. 1; Kielhorn, *List of Inscriptions of Southern India*, p. 56; *Indian Culture:* Vol. II, p. 431; *Ep. Ind.*, Vol. XXIII, pp. 278 f.; मराठी संशोधन पत्रिका, व्हॉ. ६, क्र. ४, पृ. १३ इ.; प्रा. म. को. ले., पृ. १५६ इ. व प्रतिमा क्र. ३४.

होती. म्हणून सामान्यतः अधिक मासात दानधर्मादि पुण्यकृत्ये केली जात नसली तरी प्रस्तुत लेखातील दान दिले असावे. इंग्रजी तारीख २५ मार्च सन १२५९ येते.

या लेखात खालील मंत्र्यांचा उल्लेख केला आहे – महामात्य **झंपडप्रभु**, महासान्धिविग्रहिक **तैजप्रभु**, आणि श्रीकरणी (सचिवालयप्रमुख) **दादप्रभु**. यांपैकी झंपडप्रभूचा उल्लेख द्वितीय केशिदेवाच्या शक संवत् ११६१ च्या चौधरपाडा शिलालेखात आला आहे.

स्थलनिश्चय – **उरण** हे कुलाबा जिल्ह्यातील पनवेलपासून दहा मैलांवर आहे. त्याच्याजवळ **पडिवसे** गाव दिसत नाही. त्याच्या जागी रानवड वसले असावे.

ओळ **वाचन***

१ **सिद्धम्[1] । स्वस्ति [।*] श्री[ः*] अद्येह समस्तराजावलीसम-लंकृतमहाराजाधि–**

२ **राजकों[क*]णचक्रवर्त्तिश्रीमत्सोमेश्वरदेवरायकल्याणविजय-राज्ये**

३ **तथैतप्र(त्प्र)सादाव्या(वा)प्तसमस्तमंडलचित्ता(ता)भारं समु-द्वहति महामात्यश्री–**

४ **झंपडप्रभु महासांधिविग्रही [तैज]प्रभु श्रीकरणी दादप्रभु इत्यादि-[श्री]–**

५ **करणभांडागारे [सत्येतस्मिन्] काले प्रवर्त्तमाने सति शक संवतु[2] ११८१ [सि*]–**

६ **धा(द्धा)र्थसंवछरे[3] चैत्रवदि १५ सामाइ[4] श्रीदामोदरभट्ट तथा भ्रातर(ता) वासु–**

---

* प्रा. म. को. ले. मधील प्रतिमा व छाप यांवरून.

१ चिह्नाने प्रदर्शित. २ 'संवत्' वाचावे.

३ 'संवत्सरे' वाचावे. ४ 'समयी' वाचावे.

७ दे[व*]भट्ट नेऊन[1] २ नारियले [दे]णें निमित्तें[2] श्रीराउलें दामोदरभट्टांचिया
८ उरणेंपडिवसेंग्रामप्रतिबद्धखंडपलास्थानिचा[3] भाग १ देउले खं[ड*]
९ समग्र हिया वृत्ती ३ [सर्वे]षां वृत्तिची निमित्तें[4] सूर्य[प]र्वे हस्तादकपू-
१० र्वक दामोदरभटांचेआं भाउआं प्रती भाउआं प्र[ती][5] सकरंति[6] दी[ह](न्ह)-
११ लीआ[7] [।*] मंगलमहाश्रीः ।।

क्र. ३९

सोमेश्वराचा चांजे शिलालेख : शक संवत् ११८२

या लेखाची **शिला** कुलाबा जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील उगणजवळ **चांजे** येथे सापडली होती.[8] ती आता मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स् म्यूझियम्‌मध्ये ठेवली आहे.

---

१ पूर्वीच्या सर्व संपादकांनी येथे ‘लेऊन’ वाचले आहे, पण त्याचा अर्थ लागत नाही. पहिले अक्षर ने दिसते, म्हणून ‘नेऊन’ वाचावे.

२ दीक्षितांनी ‘नारायणपर्वनिमित्ते’ असे वाचून त्याचा अर्थ ‘अमावास्यानिमित्ते’ केला आहे. पण येथे ‘नारियले’ स्पष्ट आहे. सांकलिया आणि उपाध्याय ‘पावे’ असे वाचतात. ३ ‘खंडपल’ हे बहुधा ‘खडवल’ ‘अंगण’, ‘भोवतालची जागा’ या अर्थाने असावे.

४ सांकलिया आणि उपाध्याय यांनी हा शब्द वाचला नाही. दीक्षितांनी ‘एतेषां चरितार्थनिमित्ते’ असे वाचले आहे. पण ‘चरितार्थ’ हा शब्द प्राचीन नाही. तो जुन्या मराठीत कोठेहि आढळत नाही.

५ ‘भाउआं प्रति’ याचे अनावश्यक पुनर्लेखन केले आहे.

६ ‘संक्रांतीं’ वाचावे. ७ दीक्षित आणि तुळपुळे यांना ‘दीन्हलीआ’ असे वाचले आहे, पण त्यांतील दुसरे अक्षर ‘ह’ आहे. ‘न्ह’ नव्हे.

८ *Bom. Gaz.*, Vol. I (Old Ed.), part ii, p. 21, n. 1; *Ep. Ind.*, Vol. XXIII, pp. 279 f. 3; प्रा. म. को. ले., पृ. १६१ इ. आणि प्रतिमा क्र. ३५.

या शिलेची रुंदी ३ फूट ५ इंच असून उंची १ फू. आहे. तिच्या शिरोभागी मध्ये मंगल कलश, त्यावर नारळ आणि दोन बाजूंस सूर्य व चंद्र आहेत. कोरीव लेखाखाली गर्दभशापाच्या आकृत्या होत्या, पण त्या आता अस्पष्ट झाल्या आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** कांही भागात संस्कृत आणि इतरत्र मराठी आहे.

विषय – प्रस्तुत लेख महाराजाधिराज कोंकणचक्रवर्ती **सोमेश्वरदेव** याच्या काळचा आहे. लेखाच्या धाटणीवरून व शिळेवरील शिल्पावरून तो उत्तर कोकणच्या शिलाहार वंशातील शेवटचा ज्ञात राजा होय, यात संशय नाही. प्रस्तुत लेख मागील लेखानंतर फक्त एक वर्षाने कोरविला होता. त्यांत त्या लेखातल्या-प्रमाणे महामात्य **झंपडप्रभूचा** उल्लेख आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही की इतर मंत्री या अवधीत बदललेले दिसतात. यात सांधिविग्रहिक **माइनाक, बेबलप्रभु** आणि **पोमदे पंडित** यांचा उल्लेख आहे. मुख्य खजिनदार **गोवेनाक** हा होता.

उद्देश – प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश सोमेश्वर राजाने **स्थानक** नगरातील **उत्तरेश्वरदेवाला उरण** जवळ **चांदिजे** गावातील **कोंथलेस्थानवाटिका** दान दिली हे नमूद करण्याचा आहे. याशिवाय त्याने दहा **विसोव**[1] आणि १६२ **पोरुत्य द्रम्म**हि दान दिले होते.

कालनिर्णय – प्रस्तुत दानाची **मिति शक संवत् ११८२, रौद्र संवत्सर, चैत्र अमावास्या, सोमवार,** अशी दिली आहे. ते दान **सूर्यग्रहणप्रसंगी** दिल्याचा निर्देश आहे. ही तिथी पूर्णपणे जुळते. तिची इंग्रजी तारीख १२ एप्रील १२०६ अशी येते.

स्थलनिश्चय – **उरण** अद्यापि आपल्या प्राचीन नावाने प्रसिद्ध आहे. **चांडिजे** हे सध्याचे चांजे होय. **कोंथलेस्थान** हा चांडिजे गावातील एक भाग असावा. **स्थानक** हे अर्थातच ठाणे होय.

वाचन[2]

१ **सिद्धम्[3] । नमो विनायकाय । लंवो(बो)दर नम[स्तु]भ्यं सततं मोदकपृ(प्रि)यं(यम्)[4] ।**

---

१ सांकलिया आणि उपाध्याय यांच्या वाचनात विसोवांचा उल्लेख गाळला आहे. 'विसोव' हे संस्कृत 'विंशोपका'चे मराठी रूप त्याची किंमत द्रम्माच्या एकविसांश असे. तत्कालीन लेखात विसोवांचा अनेक ठिकाणी उल्लेख येतो. प्रा. म. को. ले., पृ. १०१ पाहा.

२ मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेला छाप आणि प्रा. म. को. ले. मधील प्रतिमा ३५ वरून. ३ चिह्नाने प्रदर्शित. ४ 'मोदकप्रिय' वाचावे.

२ अविघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा[1] ।[।१।।*]अद्येह समस्तरा–

३ जावलीसमलंकृत ।[2] महाराजाधिराज । कोंकणचक्रव–

४ र्त्तिश्रीसोमेश्वरदेवरायकल्याणविजयराज्ये तथैतत्प्रसादा–

५ व्या(वा)प्त समस्तमंडलचिंताभारं समुद्वहति महामात्यश्रीझांपड-
प्रभु

६ महासांधिविग्रही माइनाकु । बेबलप्रभु । पोमदेपंडित । श्रीक-
रणे भां–

७ डागारे प्रथमच्छेपाटी गोवेनाकु । इत्येतस्मिन्काले प्रवर्तमाने
सति श–

८ कनृपकालातीतसंवच्छ(त्स)रस(श)[ते*]ष्वेकादशसु । द्वासीत्य-
धीकेषु[3] अत्रांकतोपि

९ सकु संवतु[4] ११८२ रौद्रसंवच्छरे[5] चैत्रवदि १५ सोमदिने ।
सूर्योपरागे उ–

१० रण आगराभू[6] चांडिजेग्रामा(म)प्रतिब[द्ध]कोंथलेस्थानवाटिका-
भू अस्य चा–

११ घाटनानि । पूर्वे सानु ठाकुराची वृति । दक्षिणें विष्णु[क]हाची[7]
वृति । पश्चिमें

१२ राजमार्गु। उत्तरें विरा ।एवं चतुराघाटनानि । स(स्व)सीमापर्यंत
सतृणकाष्ठो–

१३ दकोपेतं रु(ऋ)णदायाद्य(द्या)दिसंबंधविर्वाजितं सर्व्वोत्पति(त्ति)-
सहितं सिद्धां पोरुथद्र–

---

१ वृत्त – अनुष्टुभ्. २ येथे आणि पुढेहि दोन शून्यांचा विरामचिह्न म्हणून उपयोग केला आहे. ३ ‘ द्व्यशीत्यधिकेषु ’वाचावे.

४ ‘ शकसंवत् ’ वाचावे. ५ ‘ रौद्रसंवत्सरे ’ वाचावे.

६ ‘आगराभू ’चा अर्थ माहीत नाही. सांकलिया आणि उपाध्याय यांनी ‘ ग्रामस्थभुव ’ वाचले आहे. सामान्यतः या संदर्भात ‘ अभ्यन्तर्गत ’ येते.

७ तुळपुळयांनी ‘ कान्हाची ’ वाचले आहे, पण जे ‘ न् ’ अक्षर समजतात ते ‘ क ’चे उजवे वर्तुळ आहे.

१४ माणां दश विसोव[1] द्विषष्ठी(ष्टि)द्रमाभ्यधीकमेकशतानि[2] । अंकतोपि द्र १६२

१५ श्रीस्थानकीयश्रीउत्तरेस्व(श्व)रदेवाय शासनप्रतिबधं(द्धं) कृत्वा । महाराजश्री

१६ सोमेश्वरदेवेन उदकातिसर्ग्गेण प्रदत्तं(त्तम्) ॥ वर्तमानस्यास्य धर्मस्य परिपं–

१७ थना न से(के]नापि कार्या । स्वदतां(त्तां) परदतां(त्तां) वा यो हरेत वसुंधरां(राम्) । षष्ठि(ष्टिं) वर्षसह–

१८ स्राणि विष्ठायां जायते कृमि(मिः)[3]॥[२॥*] मंगलं मा(म)-हाश्री[ः।*] सु(शु)भं भवतु ॥

---

१ सांकलिया, उपाध्याय आणि तुळपुळे 'दशविसोच' वाचतात, पण ते त्यांच्या विवेचनात गाळले आहे. येथील खरा शब्द 'विसोव' (सं. विशोपक) आहे.

२ 'द्विषष्टिद्रम्माभ्याधिकमेकशतम्' वाचावे. ३ वृत्त – अनुष्टुभ्.

विभाग २

दक्षिण कोकणच्या शिलाहारांचे कोरीव लेख

क्र. ४०

द्वितीय (?) अवसराचा पट्टणकुडी ताम्रपट : शक संवत् ९१०

हा **ताम्रपट** चिकोडीच्या एका गृहस्थाकडून श्री. वि. का. राजवाडे यांना मिळाल्यामुळे तो त्यांनी व श्री. गो. कृ. चांदोरकरांनी भारत इतिहास संशोधन मंडळाच्या शके १८३३ च्या त्रैमासिकात प्रसिद्ध करताना त्याला चिकोडी ताम्रपट म्हटले होते. त्यानंतर अलीकडे श्री. व्ही. एस्. सुब्रह्मण्यम् यांना तो **पट्टणकुडीच्या** एका गृहस्थाकडून मिळाला. त्याचे म्हणणे असे की तो आपल्या कुटुंबात वंशपरंपरेने चालत आला आहे. म्हणून त्याला येथे 'पट्टणकुडी' ताम्रपट असे नाव दिले आहे.[1]

वर्णन – या ताम्रपटाचे तीन पत्रे २६ सें. मी. लांब व १६ सें. मी. रुंद असून ते एका कडीत ओवले आहेत. तिच्यावर अंजलिमुद्रेच्या करंडमुकुट धारण करणाऱ्या गरुडाची आकृति आहे. ताम्रपट, कडी व मुद्रा यांचे वजन २३२० ग्रॅम आहे.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे.

विषय – प्रस्तुत ताम्रपट **सीलार** (शिलाहार) वंशी द्वितीय (?) अवसर याचा आहे. मंगल श्लोकात सर्वज्ञाचा[2] उल्लेख आहे. नंतर दक्षिण कोकणचे शिलाहार ज्या **राष्ट्रकूटांचे** मांडलिक होते त्यांची पुढील **वंशावळ** दिली आहे – **शुभतुंग** (द्वितीय कृष्ण); त्याचा पुत्र **जगत्तुंग**; त्याचा पुत्र **नित्यवर्ष** (तृतीय इंद्र); त्याचा धाकटा भाऊ (**तृतीय**) **अमोघवर्ष**; त्याचा पुत्र (**तृतीय**) **कृष्ण** – त्याला 'वनगजमल्ल' म्हटले आहे; त्याचा भाऊ **खोट्टिग** – त्याच्या निधनानंतर त्याचा उत्तराधिकारी **बद्दिग** याचा **तैलपाने** उच्छेद केला, असे म्हटले आहे.

या वंशावळीत तृतीय इंद्राचा पुत्र चतुर्थ गोविंद याचे नाव गाळले आहे. त्याला तृतीय अमोघवर्षाने पदच्युत केले होते. तृतीय कृष्णाचे 'वनगजमल्ल' बिरुद नवीन आहे. शेवटच्या कक्कल राष्ट्रकूट राजाचे नाव बद्दिग असे दिले आहे तो

---

१ भारत इतिहास संशोधक मंडळ वार्षिक अहवाल, शके १८८३, पृ. ४०० इ.; *Ep. Ind.*, Vol. XXXVII, pp. 56 f.

२ 'सर्वज्ञ' हे बुद्धाचे नाव आहे; पण प्रस्तुत लेखात बौद्धत्वाचे चिह्न नाही. 'सर्वज्ञा'चा अर्हत् असाहि अर्थ होतो. शिवाय प्रस्तुत ताम्रपट एका जैन कुटुंबात कित्येक पिढ्या होत्या; पण जैन धर्माचीहि कांही खूण यात आढळत नाही.

तृतीय अमोघवर्ष – बद्दिगाचा नातू होता. म्हणून त्याचे बद्दिग असे दुसरे नाव असणे शक्य आहे.

यानंतर **शिलाहारांची वंशावळ** सुरू होते. त्यांचा मूळ पुरुष जीमूतवाहन नामक विद्याधर होता. त्याच्यापासून निघालेल्या वंशाला **शिलार** (शिलाहार) नाव पडले. नंतर खालील राजांची नावे आली आहेत – **धम्मियर** – याने **बलिपत्तन** स्थापले – त्याचा पुत्र **आमल्ल** – त्याचा पुत्र **ऐयप** – त्याचा पुत्र **आदित्यवर्मन्** – त्याचा पुत्र **(प्रथम) अवसर** – त्याचा पुत्र **इन्द्र** – त्याचा पुत्र **भीम,** त्याने **चन्द्रमण्डल** काबीज केले – त्याचा पुत्र **(द्वितीय)**[1] **अवसर** – त्याने प्रस्तुत ताम्रपट दिला.

वरील वंशावळीत इतर ताम्रपटात उल्लेखिलेल्या **सणफुल्ल** या मूळ पुरुषाचा निर्देश नाही. तसेच यात उल्लेखिलेला धम्मियराचा पुत्र **आमल्ल** इतर ताम्रपटांत आढळत नाही. त्यांत **ऐयपाच्या** मुलाचे नाव **अवसर** येते, पण ते येथे गळले आहे. दक्षिण कोकणच्या शिलाहारांचे ज्ञात असे तीन्ही ताम्रपट अधिकृत रीतीने दिलेले असताहि त्यांतील वंशावळीत असे फरक का असावे याचा विचार इतरत्र करू. आदित्यसेनानंतरची वंशावळ मात्र सर्व ताम्रपटांत एकसारखी आहे.

कालनिर्णय – प्रस्तुत ताम्रपट **शक संवत् ९१०, सर्वधारी संवत्सर, कार्त्तिक शुक्ल प्रतिपदा, सोमवार** या दिवशी दिला होता, असे त्यात म्हटले आहे. पण हा कालनिर्देश जुळत नाही. दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे शक संवत् ९१० ला सर्वधारी संवत्सर येते खरे, पण उक्त तिथि गुरुवारी पडते, सोमवारी नाही. तिची इंग्रजी तारीख १८ ऑक्टोबर ९८८ आहे.

उद्देश – प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश **नागै श्रेष्ठी, लोकै श्रेष्ठी** आणि **आदित्यवर्मा** यांनी **किंजल** आणि **पुलीस** या गावातील आपल्या जीवलोकाच्या (परंपराप्राप्त हक्कांच्या) रक्षणार्थ **अवसर** राजाची ४० **दीनारांनी पादपूजा** केली, हे नमूद करण्याचा होता. याशिवाय त्यांनी दरवर्षी दोन लाख पोफळे द्यावयाची, असेहि म्हटले आहे, पण त्यांतून नागै श्रेष्ठीला वगळले आहे.[3] इतक्या नंतरच्या काळातील दीनारांचा हा उल्लेख लक्षणीय आहे.

---

१ पुढील दोन ताम्रपटांतील वंशावळीनुसार त्याला तृतीय अवसर मानावे लागेल.

२ प्रस्तुत ताम्रपटात याविषयी ‘जीवलोक’ हा शब्द योजिला आहे. त्याचा अर्थ सामान्यतः ‘वृत्ति’ (जीविकेचे साधन) असा होतो. या अर्थी तो शब्द अनेक कोरीव लेखांत आढळतो.

३ त्याच्या भागाला ‘नमस्य’ म्हटले आहे. ‘नमस्य’ म्हणजे ‘करमुक्त’, ‘नमस्यवृत्त्या’ ‘करमुक्त रूपाने’ हा शब्द अनेक ताम्रपटांत येतो.

हा करार पुढील लोकांना कळविण्यात आला होता – **रेवण मंत्री, उकै श्रेष्ठी, नागपाल** अमात्य, **पुलेन हडप**[1] तसेच इतर अधिकारी, लहानथोर लोक, कारागीर आणि श्रेणीचे सभासद, तसेच (स्थानिक) मठ. प्रस्तुत ताम्रपट नगरसांधिविग्रहिक **देवपाल**[2] याने लिहिला होता. **वज्जड** हा कोरक्या होता.

स्थलनिश्चय – बलिपत्तन हे खारेपाटणाचे प्राचीन नाव असावे. **चन्द्रमण्डल** म्हणजे गोव्यातील चांदोर सभोवारचा प्रदेश दिसतो. रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड तालुक्यात **किंजल** नावांची दोन आणि संगमेश्वर तालुक्यात एक, अशी खेडी आहेत; पण प्रस्तुत ताम्रपटात सीमांचा उल्लेख नसल्यामुळे त्यांपैकी कोणते येथे विवक्षित आहे समजत नाही. **पुलीस** गावाचा आता पत्ता लागत नाही.

ओळ **वाचन**[3]

१ सिद्धम्[4] [।*] जयतुतरां सर्वज्ञो नन्दन्तु जनाश्च राजगोविप्राः । सद्धर्म्मो

२ वर्द्धन्तामविनाशि च शासनं भवतु[5] ॥[१॥*] य इह परमपृथ्वीवल्ल–

३ भो वल्लभोऽभूदिन इव शुभतुङ्गस्तेजसा सुप्रसिद्धः । समभव–

४ दतिशूरस्तस्य पुत्रः प्रतापी विजितसकलशत्रुः श्रीजगत्तुङ्ग–

५ देवः[6] ।।[२।।*] सकलविवु(बु)धव(ब)न्धुस्तत्सुतो नित्यवर्ष्षो[7]-भवदिव दिविजेन्द्रः श्री–

६ न्द्रराजो जितात्मा । तदनु तदनुजोऽभूद्भूप्रियोऽमोघव[र्ष्षो][7] नृपगुण–

७ रमणीयः सर्व्वसामन्तनाथः[8] ।।[३।।*] अथ वनगजमल्लाद्य[ङ्क]-ना–

---

१ 'हडप' (कन्नड) म्हणजे पोफळ. ओ. ३९ मध्ये हा शब्द येथे 'हडपवळ' 'ताम्बूलवाहक' या अर्थी योजिलेला दिसतो. त्याचा राज्याच्या अठरा अधिकाऱ्यांमध्ये समावेश केलेला आढळतो.

२ या देवपालाचा पुत्र लोकपार्य याने या वंशाच्या रट्टराजाचे पुढील दोन ताम्रपट (क्र. ४१ व ४२) लिहिले होते.

३ एपि. इंडि., व्हॉ. ३७, पृ. ५८–५९ समोरील प्रतिमांवरून.

४ चिह्नाने प्रदर्शित. ५ वृत्त – आर्या. ६ वृत्त – मालिनी.

७ '–वर्षो' वाचावे. ८ श्लो. ३ व ४ चे वृत्त – मालिनी.

८ मप्रसिद्धः समभवदवनीशस्तत्सुतः कृष्णराजः । निहतनिखि–

९ लशत्रोस्तस्य धर्म्मैकव(ब)न्धोस्तदनु विधिवशेन भ्रातरि प्राप्तरा–

१० ज्ये ॥[४॥*] लोकप्रसिद्धसत्त्यागभोगादिगुणमालिनि । श्रीमत्खो–

११ ट्टिगदेवे तु परलोकं गते सति[१] ॥[५॥*] श्रीराष्ट्रकूटान्वयकल्प-वृक्षो–

१२ त्तुङ्गाङ्कुरे व(ब)ड्डिगदेवनाम्नि । श्रीतैलपानल्पनगातिभारा-दप्रा–

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१३ प्तवृद्धौ सति दैवयोगात्[२] ॥[६॥*] ए[३] इतः शिलारवर्णनम् ॥ श्रीमान्वि–

१४ द्याधरेन्द्रोऽभूत्परार्थनिरतः सदा । जीमूतकेतोः सत्पुत्रो नाम्ना

१५ जीमूतवाहनः[४] ॥[७॥*] मत्वा तृणवदात्मानं धीरः प्रादाद्ग-रुत्मते । यो ना–

१६ गरक्षणे वंशः शिलाराख्यस्ततोऽभवत् ॥[८॥*] आसीत्तत्रान्वये श्रीमा–

१७ [न्रा]जा धम्मियरः परः । अव्धि(ब्धि)वेलाकुलं रम्यं योऽकरो-द्वलिपत्तनम्[५]॥[९॥*]

१८ तत्र चाम्मल्लनामाभूत्तत्सुतो निर्ज्जिताहितः । प्रचण्डदण्डस्त-त्पुत्रस्स–

१९ मभूदैयपो नृपः ॥[१०॥*] आदित्यवर्म्मा पुत्रोऽभूत्तस्मादादित्य–

२० वत्स्वयम् । प्रतापापास्तवैरीन्द्रतमोराशिः प्रजाप्रियः ॥[११॥*]

२१ अवसर इति पुत्रस्तस्य जातो जितारिः प्रथितपरमकीर्त्तिर्द्ध–

२२ र्म्मर्यकर्म्माभिरामः । समभवदथ सूनुः शक्रवद्विक्रमाढ्यः सकलगु–

---

१ वृत्त – अनुष्टुभ् २ वृत्त – इन्द्रवज्रा

३ पूर्वीच्या संपादकांनी हे अक्षर 'प' असे वाचले आहे. हे अक्षर निरर्थक आहे.

४ श्लो. ७ ते ११ चे वृत्त – अनुष्टुभ्. ५ '–द्वलिपत्ततम्' वाचावे.

२३ णगरीयानिन्द्रराजस्तु तस्मात्[1] ॥[१२॥*] समभवत्तनयो नयवां-
स्ततो ज–

२४ गति भीम उदारतमोऽभयः । य इह भीम इव प्रथितोऽखिलै–

२५ र्नृपगुणैर्गुणवद्भिरुपास्त्रि(श्रि)तः[2] ॥[१३॥*] सैंहिकेय इव
योऽतिदुर्ज्ज–

२६ यो ग्रस्तकान्ततरचन्द्रमण्डलः । यश्च काम इव मानिनीमन–

२७ स्त्यक्तदर्प्पमकरोन्मनोरमः[3] ॥[१४॥*] तत्पुत्रस्यावसरनृपतेर्द्ध-
र्म्मपु–

२८ त्रोपमस्य सत्यत्यागाद्यनुपमगुणालंकृतेरस्तशत्रोः । कन्दर्प्प–

२९ स्यापरिमितमहारूपसौभाग्यलक्ष्म्या पूज्ये राज्येऽत्र व(ब)–

३० लिनगरे वर्द्धमानेऽसमाने[4] ॥[१५॥*] शकनृपकालव्यपगत–

३१ शतेषु नवसूत्तरेषु दशवर्ष्षैः(र्षैः) । श्रीसर्व्वधारिवर्ष्षे[5] कार्त्ति–

३२ कशि(सि)तसोमवारपञ्चम्याम्[6] ॥[१६॥*] श्रीमदवसररा-
जाय

३३ सिद्धैश्रेष्ठिपुत्रो रेउमश्रेष्ठी तत्सुतो नागैश्रेष्ठी

३४ तथा छठ्ठमैश्रेष्ठितनयो रेवणश्रेष्ठी तत्पुत्रो लोक्कै–

३५ श्रेष्ठी तथा महडैश्रेष्ठिपुत्रः खेत्रैय[7] इन्द्रश्रेष्ठिपुत्र आदित्यवर्म्मा
इति त्रयोऽपि क्रमागतकिं–

३६ जलपुलीसजीवलोकद्वयस्थिरीकरणार्थं चत्वारिंशद्दीनारजनि–

३७ तां पादपूजां प्राहुः । अर्हणमस्य हडपव्ययार्थं पूगलफललक्षद्व–

---

१ वृत्त – मालिनी २ वृत्त – द्रुतविलम्बित.
३ वृत्त – रथोद्धता. ४ वृत्त – मंदाक्रान्ता.
५ '–वर्षे ' वाचावे. ६ वृत्त – आर्या.
७ येथे ' क्रॉस 'च्या चिन्हाने कांही शब्द गळल्याचे सूचित केले आहे. ते ३८. ओळीखालील जागेत कोरले आहेत. ' खेत्रैय इन्द्रश्रेष्ठी तस्य पुत्रः ' वाचावे.

३८ यम्प्रतिवर्षं[१] त्रिभिरेव दातव्यम्[२]। नागैश्रेष्ठिनो भागो नमस्यः पालनीयः। किञ्च। श्रीरेवणार्यमन्त्र्यु--

तिसरा पत्रा

३९ क्कैश्रेष्ठिनागपालामात्यपुलेनहडपादिप्रधानराजपुरुष–

४० सवा(बा)लवृद्धनगरहञ्जमानपञ्चमठस्थानमठिकात्रयीविदितं

४१ श्रीमदवसरराजपुत्रपौत्रादिभिस्तत्पुत्रपौत्रेषु पालनी–

४२ यमेतदाचन्द्रार्क्कमिति ॥ व(ब)हुभिर्व्वसुधा भुक्ता राजभिः सगरा–

४३ दिभिः। यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फलम्[३] ॥ [१७॥*] स्वदत्तां

४४ परदत्तां वा यो हरेत वसुंधराम्। षष्टिं वर्ष्ष(र्ष)सहस्राणि वि–

४५ ष्ठायां जायते कृमिः ॥[१८॥*] सामान्योऽयं धर्म्मसेतुर्नृपा–

४६ णा(णां) काले काले पालनीयो भवद्भिः। सर्व्वानेतान्भाविनः

४७ पार्थिवेन्द्रा[न्*] भूयो भूयो याचते रामभद्रः[४] ॥[१९॥*]*॥

४८ श्रीमन्नागरसन्धिविग्रहवता स्वस्वामिनोऽनुज्ञया श्रीम–

४९ द्वामनसूनुनात्र कविना श्रीदेवपालेन हि। विस्पष्टं लिखि–

५० तं सविस्तरसमुत्कीर्ण्णं तथा वज्जडेनाकल्पावधि साधु तिष्ठतुत–

५१ रां सर्व्वैः समं शासनम्[५] ॥ इति मङ्गलमहाश्रीः ॥ * ॥

---

१ 'प्रतिवर्षम्' वाचावे.

२ क्रॉसच्या चिन्हाने येथे कांही शब्द गळल्याचे सूचित केले आहे. ते शब्द 'नागैश्रेष्ठिनो. . .पालनीयः' असे असून ते नंतर ओ. ३८ च्या खालील जागेत कोरले आहेत.

३ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्. ४ वृत्त – शालिनी.

५ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

क्र. ४१

रट्टराजाचा खारेपाटण ताम्रपट : शक संवत् ९३०

हा ताम्रपट **खारेपाटणच्या** एका ब्राह्मणास सुमारे सवाशे वर्षांपूर्वी सापडला होता. तो प्रथम पं. बाळ गंगाधर शास्त्री आणि नंतर डॉ. कीलहॉर्न यांनी संपादिला आहे.[1]

वर्णन – या ताम्रपटाचे **चार पत्रे** असून प्रत्येक पत्र्याचा क्रम त्यावर नागरी अंकात खोदला आहे. प्रत्येक पत्र्याची रुंदी ७$\frac{1}{2}$ ते ७$\frac{5}{8}$ इं. आणि उंची ४$\frac{3}{8}$ इंच आहे. पत्रे कडीत अडकवले असून त्यावर गरुडाची मुद्रा आहे. पत्र्यांचे वजन ४ पौंड ८ औंस आणि कडी व मुद्रा यांचे वजन ९$\frac{3}{4}$ औंस – एकूण वजन ५ पौंड १$\frac{3}{4}$ औंस आहे.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे.

विषय – हा ताम्रपट **सीलार** (शिलाहार) नृपति मांडलिक **रट्टराज** याचा आहे. त्याचे पूर्वज राष्ट्रकूटांचे मांडलिक असल्यामुळे त्यात प्रथम **राष्ट्रकूटांची** खालील **वंशावळ** आली आहे – **दन्तिदुर्ग**; त्याचा चुलता **(प्रथम) कृष्ण**; **(द्वितीय) गोविंद**; **(ध्रुव) निरुपम**; **(तृतीय गोविंद) जगत्तुंग**; त्याचा पुत्र **(प्रथम) अमोघवर्ष**; **अकालवर्ष** (द्वितीय कृष्ण); त्याचा पौत्र **(तृतीय) इन्द्र**; त्याचा पुत्र **(द्वितीय) अमोघवर्ष**; त्याचा धाकटा भाऊ **(चतुर्थ) गोविंद**; त्याचा चुलता **बद्दिग** (तृतीय अमोघवर्ष); त्याचा पुत्र **(तृतीय) कृष्ण**; त्याचा भाऊ **खोट्टिक** आणि त्याचा पुतण्या **कक्कल**. या शेवटच्या राजाचा उच्छेद **तैलपाने** केला. त्याचा पुत्र चालुक्यवंशी शूर **सत्याश्रय** हा ताम्रपट दिला त्यावेळी सम्राट् म्हणून राज्य करीत होता.

राष्ट्रकूट आणि उत्तरकालीन चालुक्यांच्या या वंशावळी त्यांच्या स्वतःच्या ताम्रपटांतल्या प्रमाणे आहेत. राष्ट्रकूटांच्या वंशावळीतून चतुर्थ गोविंदाचे नाव येथे गाळले नाही, पण त्याच्या विषयासक्तीचा उल्लेख केला आहे.

नंतर ओ. २१ ते ३३ मध्ये जीमूतवाहन नामक विद्याधरापासून निघालेल्या दक्षिण कोंकणच्या **शिलाहारांची वंशावळ** दिली आहे. या शाखेचा मूळ पुरुष **सणफुल्ल** हा **कृष्णराजाच्या** मर्जीमुळे **सह्याद्रि** व **पश्चिम समुद्र** यांमधील प्रदेशावर राज्य करीत होता. त्याचा पुत्र **धम्मियर** याने महादुर्ग **बलिपत्तन** येथे आपली राजधानी केली. त्याच्या नंतर **ऐयपाने चन्द्रपुर** येथे नारळाच्या

---

१ *J. B. B. R. A. S.*, Vol. I, (Old Series), pp. 209 f; *Ep. Ind.*, Vol. III, pp. 292 f.

पाण्याने स्वत:ला अभिषेक करवून घेतला. नंतर **(दुसरा) ऐयप** – त्याचा पुत्र **आदित्यवर्मा** – त्याचा पुत्र (**द्वितीय**) **अवसर** असे राजे झाले. या अवसराने **चेमूल्य** आणि **चन्द्रपुर** यांच्या राजांना साहाय्य केले. त्यानंतर **भीम** राजा झाला. त्याने **चंद्रमंडल** जिंकून घेतले. पुढे **(तृतीय) अवसर** आणि नंतर प्रस्तुत ताम्रपट देणारा **रट्टराज** हे राजे झाले.

हा **रट्टराज** उत्तरकालीन चालुक्य सम्राट् परमभट्टारक महाराजाधिराज **सत्याश्रय** याचा मांडलिक होता असे म्हटले आहे.

प्रस्तुत सम्राटाचा उद्देश **रट्टराजाने मत्तमयूर** नामक शैव आचार्यांच्या संप्रदायाच्या **कर्करोणी** शाखेचा आचार्य **अम्भोजशम्भु** याचा शिष्य आणि आपला गुरु **आत्रय** याला **अव्वेश्वर देवाची** पंचोपचार पूजा, मंदिराची दुरुस्ती आणि तपस्वी व त्यांचे शिष्य यांना अन्नवस्त्र आणि विद्वजन, अतिथि इत्यादिकांच्या उपयोगाकरिता **कूष्मांडी, असनवीर** आणि **वदङ्गुल**[1] हे तीन गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता. **कूष्मांडी** गावाच्या चतु:सीमा सांगताना **मणिग्राम, वापरवट** आणि **सचान्दलकपित्थ** यांचा उल्लेख आला आहे तसेच **असनवीराच्या** सीमा सांगताना **कारपर्णीग्राम,** आणि **गवहण** ग्राम यांचा निर्देश केला आहे, आणि तिसरा **वडङ्गुल** ग्राम याच्या सीमा सांगताना **भोगदेव** टेकडी आणि **स्तामान गाव** यांचा उल्लेख केला आहे. याशिवाय पुढील दानेहि दिली होती – **देवलक्ष्मी** गावात एक **जीवलोक, व्यंगऊल**[2] गावात **चाकांतर** आणि **सय्यापली** येथे **जूहक** – पण यांचा अर्थ नीट ध्यानात येत नाही.

असे दिसते की अव्वेश्वराचे हे देवालय रट्टराजाचा पिता **तृतीय अवसर** याने बांधून त्यांतील भगवान् शंकराच्या पिंडीला आपल्या नावावरून **अव्वेश्वर** नाव ठेवले होते. वरील दानांशिवाय आणखी कांही दानांचा उल्लेख ओ. ५६ मध्ये व नंतर केला आहे – परदेशाहून येणाऱ्या प्रत्येक जहाजावर एक **सुवर्ण गद्याण, चेमूल्य** आणि **चन्द्रपुर** यांना वगळून **कन्दलमूलीयाच्या** प्रत्येक जहाजावर **सुवर्णधरण** जकात द्यावी लागेल. याशिवाय दुर्गाच्या आत **दारिका** (देवदासी), तेली, कुम्भार, माळी, धोबी यांची कुटुंबे यांचा (देवाच्या उपकरणार्थ) निर्देश आहे.

प्रस्तुत लेख सान्धिविग्रहिक देवपाल याचा पुत्र **लोकपार्य** याने लिहिला होता.

---

१ कीलहॉर्नने 'वेडद्गुल' असे वाचले आहे. या काळात 'ङ' चा बिन्दु उत्पन्न झाला नव्हता. म्हणून द् आणि ङ चा घोटाळा होत असे.

२ येथेहि कीलहॉर्नने 'व्यद्गरुल' असे वाचले होते, पण खरा पाठ व्यङ्गरुल (सध्याचे 'वेंगुर्ले') आहे, यात संशय नाही. ३ एपि. इंडि., व्हॉ. ३, पृ. २९६.

कालनिर्णय – प्रस्तुत ताम्रपटातील दानाची **मिति शक संवत् ९३०, कीलक संवत्सर, ज्येष्ठ पौर्णिमा** अशी दिली आहे. वारादिकांच्या निर्देशाभावी ती पडताळून पाहता येत नाही, पण शक संवत् ९३० ला दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे कीलक संवत्सर होते. वार व इंग्रजी तारीख शनिवार २२ मे सन १००८ येतात.

चर्चा – प्रस्तुत ताम्रपटातील दक्षिण कोंकणच्या शिलाहारांची वंशावळ मागील ताम्रपटातील वंशावळीशी जुळत नाही. आदित्यवर्म्यानंतर दोन्ही वंशावळी समान आहेत, पण पूर्वीच्यांत कांही फरक आहेत.

पट्टणकुडी ताम्रपट	**खारेपाटण ताम्रपट**
धम्मियर	सणफुल्ल
।	।
(पुत्र)	(पुत्र)
आमल्ल	धम्मियर
।	।
(पुत्र)	ऐयप
ऐयप	।
।	अवसर
(पुत्र)	।
आदित्यवर्मन्	(पुत्र)
	आदित्यवर्मन

या वंशावळीत धम्मियर आणि आदित्यवर्मा यांमध्ये दोनच पिढ्या असल्या तरी नांवे भिन्न आहेत. पट्टणकुडी ताम्रपटातील राजांचा नातेसंबंध स्पष्ट सांगितला आहे, पण खारेपाटण ताम्रपटात तसे दिसत नाही. धम्मियरचा पिता सणफुल्ल याचा नामनिर्देश पट्टणकुडी ताम्रपटात नाही. म्हणून खरी तफावत फक्त आदित्यवर्म्याच्या पितृनामात आहे. पट्टणकुडी ताम्रपटात त्याला **ऐयप** आणि खारेपाटण ताम्रपटात **अवसर** म्हटले आहे.

दोन्ही ताम्रपट शासनातर्फे दिले होते, आणि त्यांच्या कालामधील अंतर फक्त वीस वर्षांचे आहे. तेव्हा या फरकाची उपपत्ति लावली पाहिजे.

असे दिसते की धम्मियरानंतर त्याचा पौत्र ऐयप गादीवर आला. म्हणून त्याच्या आमल्ल या मुलाचे नाव खारेपाटण ताम्रपटात गाळले आहे. तसेच ऐयपानंतरच्या अवसराचा वर्णनपर श्लोक चुकीने पट्टणकुडी ताम्रपटात गाळलेला दिसतो. म्हणून आदित्यवर्म्याला ऐयपाचा पुत्र असे त्यात म्हटले आहे. तो वास्तविक अवसराचा पुत्र होता. तेव्हा या शिलाहार वंशाची **आरंभीची वंशावळ** पुढीलप्रमाणे होईल.

सणफुल्ल
।
(पुत्र)
धम्मियर
।
(पुत्र)
ऐयप
।
(पुत्र)
प्रथम अवसर
।
(पुत्र)
आदित्यवर्मन्

आदित्यवर्म्यानंतरची वंशावळ दोन्ही ताम्रपटात एकच आहे, हे मागे सांगितले आहेच.

कीलहॉर्नने दाखविल्याप्रमाणे रट्टराजाचा दहावा पूर्वज सणफुल्ल याला कृष्ण-राजाच्या कृपेने समुद्र आणि सह्याद्रि यांच्या मधील प्रदेशाचे राज्य मिळाले होते. रट्टराजाचा प्रस्तुत ताम्रपट शक संवत् ९३० किंवा सन १००८ चा आहे. तेव्हा त्याचा पूर्वज सणफुल्ल खिस्तोत्तर आठव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला असावा. तेव्हा तो राष्ट्रकूट प्रथम कृष्ण (सन ७५८ – ७७३) चा मांडलिक होता, असे दिसते.

ओ. ८ मध्ये या वंशाला **सिंहल देशाचा श्रेष्ठ राजवंश** म्हटले आहे. कील-हॉर्नने 'सिंहल' चा लंका असा अर्थ करून हा वंश लंकेसारख्या दूरच्या प्रदेशातून आला असेल काय याविषयी शंका प्रदर्शित केली आहे. या संबंधात हे उल्लेखनीय आहे की इतर शिलाहार शाखांतल्या प्रमाणे या शाखेचे राजे आपण तगरपुराचे अधीश्वर होतो हे सांगत नाहीत. तथापि सिंहल हे लंका असणे असंभवनीय आहे. दगावे लेखात[१] म्हटले आहे की कदंबनृपति जयकेशीने लंकेच्या अधिपतीला जिंकून गोव्याचा प्रदेश काबीज केला. त्यावरून **गोव्याला पूर्वी लंका म्हणत असत** असे दिसते.[२] दक्षिण कोकणचे शिलाहार गोव्याहून आलेले दिसतात.

---

१ *J. B. B. R. A. S.*, Vol. IX, pp. 266 f.

२ *Ep. Ind.*, Vol. XIII, p. 369. कांही शिलाहार राजांनी हा प्रदेश जिंकून 'निःशंकलङ्केश्वर' असे बिरुद धारण केले होते.

दान दिलेल्या आत्रेयाचा गुरु **अम्भोजशम्भु** हा **मत्तमयूर** संप्रदायाच्या **कर्करोणी** शाखेचा आचार्य होता. कर्करोणीचा पत्ता अद्यापि लागला नाही, तथापि मत्तमयूर हे शैव (कापालिकाहून भिन्न) पंथाचे महत्त्वाचे केंद्र होते असे अनेक कोरीव लेखांवरून दिसते.[१] तेथील आचार्यांची नावे, अम्भोजशम्भु नावासारखी, 'शंभु' किंवा 'शिव'पदान्त असत, जशी पाशुपतांची 'राशि'पदान्त असत. **मत्तमयूर** हे मध्यभारतांतील कद्वाहा गावाचे प्राचीन नाव असावे. तेथे एका मठाचे आणि खिस्तोत्तर १० व्या शतकातील निदान चौदा शिवमंदिरांचे अवशेष दृष्टीस पडतात. ग्वाल्हेर संस्थानच्या पुरातत्त्व विभागाचे संचालक श्री. मो. ब. गर्दे यांनी म्हटले आहे की 'इतके विशाल अवशेष ग्वाल्हेर संस्थानात दुसऱ्या कोणत्याहि एका ठिकाणी आढळत नाहीत. कद्वाहा हे ग्वाल्हेर संस्थानातले खजुराहो होय.' अम्भोजशम्भु अशा दूरच्या प्रदेशातून दक्षिण कोकणात आलेला दिसतो. मत्तमयूर संप्रदायाचे आचार्य यापेक्षाहि दूरदूरच्या ठिकाणी आपल्या पंथाच्या प्रसारार्थ गेलेले आढळतात.

स्थलनिश्चय – मागे दाखविल्याप्रमाणे **सिंहल** हे गोवा द्वीपाचे प्राचीन नाव होय. **चन्द्रपुरमण्डलाचे** मुख्य स्थळ **चन्द्रपुर** हे गोव्याच्या दक्षिणेस सध्याचे पारोदा नदीवरचे चांदोर होय. **चेमूल्य** हे कुलाबा जिल्ह्यातील अलिबाग जवळचे चौल. **बलिपत्तन** हे खारेपाटणाचे प्राचीन नाव होय. प्रस्तुत ताम्रपटात उल्लेखिलेली बहुतेक नावे आता रत्नागिरी जिल्ह्यात आढळत नाहीत. पण **गवहण** हे देवगड तालुक्यातील गव्हाणे असावे. तसेच **व्यङ्गरुल** हे रत्नागिरी जिल्ह्यात वेंगुर्ले नावाने प्रसिद्ध आहे.

ओळ **वाचन**[२]

पहिला पत्रा

१ **सिद्धम्[3] [।*] ओं नमः शिवाय । हेलोल्लालित[४]चण्डदण्डचरणां[५]- गुष्ठाग्रभागा–**

---

१ *C. I. I.*, Vol. IV, Introd., pp. cli f.

२ ए. इं., व्हॉ. ३ यातील पृ. ३००–३०१ च्या मधील प्रतिमांवरून.

३ चिह्नाने प्रदर्शित. कीलहॉर्नने हे 'ओम्'चे वाचक मानले आहे, पण त्यामुळे येथे पुनरुक्ति होईल. प्राचीन लेखांच्या 'आरंभी' सिद्धम् येते.

४ इतर लेखांत या संदर्भात 'हेलोल्लासित' येते.

५ तसेच 'दण्डचरण' बद्दल 'चरणदण्ड' पाहिजे.

२ हतस्वर्गंगोद्गतशुक्तिसंपुटगलन्मुक्ताभृतं ताण्डवे। पाणौ वीक्ष्य कपा–

३ लमाश्वथ जटाचन्द्रामृतोज्जीवितं कंकालं च यदद्भुतं स्मितमवत्वीशेन तद्व–

४ शिव(श्च)रम्[1]॥[१॥*] गोत्रं भित्वा(त्त्वा) न भूतो न मधुपवसतिर्नो सदा धर्म्मवक्रो नाक्रान्तो द–

५ ण्डकोटया न च परपवनाकम्पितो नान्तहीनः। नाधस्तान्नीतमूलः प्रकृतिर–

६ तिघनो नो रणे दत्तपृष्ठः।[2] सोपूर्व्वोस्तीह वंशो यदुकुलतिलको राष्ट्रकूटेश्व–

७ राणां(णाम्)[3] ॥[२॥*] तत्रासीद्दन्तिदुर्ग्गः प्रभुरपि च ततः कृष्णराजः पितृव्यस्तस्माद्गोवि–

८ न्दराजस्तमनु निरुपमोऽस्माज्जगत्तुंगदेवः॥ (।) तत्पुत्रोमोघवर्ष्षो(र्षो) रिपुवनद–

९ हनोऽस्याप्यथाकालवर्ष्षो(र्षो) नप्तास्य श्रीन्द्रराजो रुचिरतरवपुस्तत्सुतोमोघव–

१० र्ष्षः(र्षः) ।[।३॥*] शृंगाररसनिवासो वसन्तवद्वरवधूसमूहवृतः। हरिरिव

११ तस्य कनीयान्भ्राता गोविन्दराजोभूत्[4] ॥[४॥*] पितृव्यस्तस्याशी(सी)त्प्रणय(यि)ज–

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१२ नताकल्पविटपी कृतांतोरातीनां नयगुणनिधिर्व्वद्दिगनृपः[5]। प्रतिच्छन्दः

१३ साक्षात्कृतयुगनृपाणां कलियुगे सदाचारः शान्तो मुनिरिव जगतुं(त्तुं)गतनयः[6] ॥[५॥*]

---

१ वृत्त – शार्दूलविक्रीडित. २ हा दण्ड निरर्थक आहे.

३ श्लो. २ व ३ चे वृत्त – स्रग्धरा. ४ वृत्त – आर्या.

५ ‘बद्दिगनृपः’ वाचावे. ६ वृत्त – शिखरिणी.

१४ सं(शं)भोः षडानन इवात्रिमुनेरिवेन्दू रामो यथा दस(श)रथस्य हरेर्ज्जयन्तः । तस्यात्मजो-

१५ पि चतुरंवु(बु)धिमेखलाया भर्त्ता भुवः समभवद्भुवि कृष्ण-राजः[1] ॥[६॥*] सौरं भित्वा(त्वा) मण्डलं

१६ योगदृष्टया याते तस्मि[न्वै](न्शै)वसद्मावकाशम् । तस्य भ्राता खोटिकाख्यस्ततोऽभूत्पृथ्वीभर्त्ता

१७ त्यागधामोर्ज्जितस्त्रीः(श्रीः)[2]॥[७॥*] कक्कलस्तस्य भा(भ्रा)-तृव्यो भुवो भर्त्ता जनप्रियः । आसीत्प्रचण्डधामेव

१८ प्रतापजितशात्रवः[3] ॥[८॥*] समरे तं विनिर्ज्जित्य तैलपोऽभून्म-हीपतिः । चालुक्यान्वयभ्रा-

१९ जिष्णुररातिगजकेसरी ॥[९॥*] तस्यात्मजः परं जिष्णुः ख्यातः सत्यास्त्र(श्र)योभवत् । सि(क्षि)-

२० तीश्वरः स[त्व](त्त्व)वृत्तिर्विक्रमैकरसोर्ज्जितः ॥[१०॥*] एवं प्रवर्द्धमानचालुक्यान्वयश्रीसत्याश्र-

२१ यराजे रट्टपाटीमनुशासति ॥ ॐ ॥ आसीद्विधाधराधीसो(शो) गरुत्मद(द्द)त्तजीवितः [।*]

२२ जीमूतकेतोः सत्पुत्रो नाम्ना जीमूतवाहनः ॥[११॥*] ततः सिलारवंशोभूत्सिंहलक्ष्माभृ-

२३ तां वरः । प्रभूतभूतसौभाग्यभाग्यवानूर्ज्जितोर्ज्जितः ॥[१२॥*] नाम्ना सणफुल्लः[4] ख्यातः

२४ कृष्णराजप्रसादवान् । समुद्रतीरसह्यान्तदेस(श)संसाधनोभवत्[5] ॥[१३॥*] तत्पुत्रो धर्म्म-

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

२५ एवाभून्नाम्ना धम्मियरः परः । प्रतापवान्महादुर्ग्ग[व](ब)लि-पत्तनकृत्कृती ॥[१४॥*] तस्मादै-

१ वृत्त – वसन्ततिलका.

२ वृत्त – शालिनी. ३ श्लोक ८ ते २१ चे वृत्त – अनुष्टुभ्.

४ येथे वृत्तानुसारी 'सणफुलः' असा पाठ आवश्यक आहे.

५ वलिपत्तन ताम्रपटात या संदर्भात 'संसाधको नृपः' असा पाठ आहे.

२६ यपराजोभूद्विजिगीषुगुणान्वितः । स्नातश्चन्द्रपुरास[न्न]नालिके-
राम्वु(म्बु)ना स यः ॥[१५॥*]

२७ व(ब)भूवावसरस्तस्मान्नीतिसा(शा)स्त्रार्थतत्व(त्त्व)वित् । एक-
मे(ने)त्रप्रलग्नारि[1]काण्डश्चण्डपराक्रमः ॥[१६॥*]

२८ आदित्यवर्म्मा पुत्रोभूत्तेजसादित्यवत्ततः । तस्मादवसरो जातो
जितारिर्द्धर्म्मवान्नृपः ॥[१७॥*]

२९ [चेमू]ल्यचन्द्रपुरजक्ष्माभृत्साहाय्यमदाद्यः[2] । ततोभवदिन्द्रराजो-
(ज)स्त्यागभोगातिसु–

३० न्दरः ॥[१८॥*] तस्मात्प्रभूतभाग्योभूद्भीमो भीमाभविक्रमः ।
तेजसा राहुवद्ग्रस्तचन्द्रमण्डल

३१ उ[ज्ज्व]लः ॥[१९॥*] ततश्चावसरो राजा जातोतीव विवेक-
वान् । प्राज्ञः प्राज्ञजनावासः

३२ [शू]रः परमरूपवान् ॥[२०॥*] रट्ट[ना]माभवत्तस्माद्राजा पुण्य-
वतां वरः । नीतिज्ञो नीति–

३३ सा(शा)स्त्रार्थवृ[द्ध]से[वी] जितेन्द्रियः ॥[२१॥*] परमभट्टारक-
महाराजाधिराजश्रीसत्याश्रयदे–

३४ वानुध्यातम(मा)ण्डलिकस्त्री(श्री)रट्टराजः सर्व्वानिव स्वसंव-
(ब)ध्यमानपौरजानपदप्रधा–

३५ नामात्यवर्ग्गमाहूयास्तु[3] वः संविदितं यथान्तर्लीनजरापूतनार-
व्ध(ब्ध)ग्रासं यौव–

३६ नं निरयपतनमिवेष्टवियोगदुःखं व्याधिजरामरणसाधारणं च

३७ शरीरकं पवन[4]चलकमलदलगतजललवसदृशी धनायुषी

---

१ या संदर्भात ' प्रदग्धारि ' सारखा पाठ हवा.

२ येथील वृत्त सदोष आहे. बलिपत्तन ताम्रपटातल्या प्रमाणे ' साहाय्यकार-
कात् ' वाचावे.

३ ' –माहूय संबोधयत्यस्तु ' वाचावे.

४ प्रथम ' पवनं ' असे कोरले होते, नंतर अनुस्वार काढून टाकला.

तिसरा पत्रा : पहिली बाजू

३८ मत्वा दानफलञ्च विवेकवु(बु)द्धया[१] ॥ उक्तं च मुनिभिः । अग्नेरपत्यं प्रथमं सु–

३९ वर्ण्णं द्यौर्व्वैष्णवी[२] सूर्यसुताश्च गावः । लोकत्रयं तेन भवेद्धि दत्तं यः कांचनं

४० गां च महीञ्च दद्यात्[3]।[।२०॥*] इति मुनिवचनमवधार्य पित्रो-रुद्देशेना[त्म]नश्च श्रेयसे श–

४१ कनृपकालातीतसम्वत्सर[४]नवशतेषु त्रिंशदधिकेषु प्रवर्त्तमानकी-लकसम्वत्स–

४२ रा[५]न्तर्गतज्येष्ठपौर्णमास्यां श्रीमदव्वेश्वरदेवपञ्चोपचारपूजापुर-स्सरखण्डस्फु–

४३ टितसंस्काराद्यर्थं सतपस्विभोजनाच्छादनच्छात्र(त्रा)विद्वज्जना-भ्यागताद्युपयोगाद्यर्थ–

४४ ञ्च ।[६] कूष्माण्डीग्रामस्तस्याघट्टा(ट्ट)नानि कथ्यत्ते(न्ते)[।*] पूर्व्वतो मणिग्रामप्रपा [।*] दक्षिणतो वापरवट–

४५ ग्राममार्गः [।*] पश्चिमतः सचान्दलकपित्थग्रामवाहला । उत्तरतः क्षारनदी तथाऽ

४६ सनवीरग्रामस्तस्य पूर्व्वतो धारवाहला । दक्षिणतः कारपर्ण्णीग्राम-नदी । पश्चिमतः

४७ समुद्रः [।*] उत्तरतो गवहणग्रामनदी । तथा वडङ्गुलग्राम-[७] स्तस्य पूर्व्वतो भोगदेवपर्व्व–

---

१ 'दानफलस्य विवेकबुद्धया' असा पाठ कीलहॉर्नने सुचविला आहे. उत्तर कोकणच्या अनेक दानपत्रात 'संगृह्णीयाद्दानफलम्' असा पाठ आहे.

२ येथील संदर्भात 'भूर्वैष्णवी' या सारखा पाठ हवा.

३ वृत्त – इन्द्रवज्रा. ४ 'संवत्सर' वाचावे.

५ 'संवत्सरा--' वाचावे. ६ हा दंड अनावश्यक आहे.

७ कीलहॉर्नने 'वडद्गुल' वाचले होते.

४८ तयमलप्रस्तरो दक्षिणतोऽखडदवाहला। पश्चिमतः पटसडपाषाणः उत्तरतः

४९ स्ताम्रानग्रामसीसवीपर्व्वतः ॥ ४ ॥ तथा देवलक्ष्मीग्रामे जीवलोकः । १ । व्यङ्गुरुले[1] चा–

५० कान्तरः १ । सय्यापल्यां जूहकः १ । तदेतद्ग्रामत्रयादिकं चतुराघाटविच्छिन्नं सर्व–

५१ राजकीयायाभ्यन्तरसिद्धम[2]चाटभटप्रवेस(शं) पूर्व्वदत्तदेवदायव्र(ब्र)ह्मदायवर्ज्जं श्रीमत्त–

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

५२ मयूरान्वयकर्करोणि(णी)संततिप्रसूतविद्वद्व्र(द्ब्र)ह्मचार्याचार्यभोग्यमाचंद्रार्कं पालनीयं(यम्) । श्रीम–

५३ न्मत्तमयूरान्वयान्तर्गतकर्करोणि(णी)सन्तानगुरुक्रमायातसिद्धान्ततत्वा(त्त्वा)र्कापहृतमोहा–

५४ न्धतमसानां तपोमहिमप्रध्वस्ताशेषसङ्गानां प्रवो(बो)धप्रदीपप्रकाशितस्वर्गापवर्गमार्गाणां

५५ समाधिजयलव्ध(ब्ध)त्रिभुवनकीर्त्तीनां श्रीमदम्भोजशम्भुगुरु(रू)णां चरणकमलान्तर्लीनमधु–

५६ लिड्भ्यः श्रीमदात्रेयविद्वद्गुरुभ्यो विद्यादानस्वरूपेण समदात्[3] । तथा द्वीपान्तरायातवहि–

५७ त्रात्स्वर्ण्णगदियाणं १ चेमूल्यचन्द(न्द्र)पुरवर्ज्जकन्दलमूलियायातप्रवहणात्स्वर्ण्णधरणं

५८ दारिकाकुटुम्वा(म्बा)नि च । तैलिककुटुम्व(म्ब)मेकं १ मालाकारकुटुम्वं(म्बं) १ कुम्भकारकुटुम्व(म्बं) १ रज–

---

१ कीलहॉर्नने ‘ व्यद्गरुले ’ वाचले होते.

२ सामान्यतः येथे ‘ सर्वराजकीयानामहस्तप्रक्षेपणीयमभ्यन्तरसिद्धिकम् ’ असा पाठ असतो.

३ ‘ समदाम् । ’ वाचावे.

५९ ककुटुम्ब(म्बम्) १ [।*] दुर्गाभ्यन्तरे च जगतीपुरार्थभूमिं[१] तस्या आघट्टनानि कथ्यन्ते पूर्व्वतो वसति–

६० प्राकारो दक्षिणतो मर्क्कटगोपुरं पश्चिमतः शीवटमार्ग उत्तरतो मार्गकूपः ।। दुर्गाद्व(द्ब)–

६१ हिश्च पुष्पवाटचर्थं पूर्व्वप्रसिद्धवडवाभुवं(वम्) ।। * ।। तदिदं-(मं) धर्म्मं मामकीनमात्मनीनैर्भा–

६२ विभिर्नरेन्द्रैरनुपालनीय[२]मुक्तञ्च मुनिभिः । यानीह दत्तानि पुरा नरेन्द्रैर्दानानि

६३ धर्म्मार्थयस(श)स्कराणि । निर्म्माल्यवान्तप्रतिमानि तानि को नाम साधुः पुनराददीत[३] ।[।२१।।*] व(ब)–

६४ हुभिर्व्वसुधा भुक्ता राजभिः सगरादिभिः ।। (।) यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य त–

६५ दा फलम्[४]।[।२२।।*] सद्योदान(नं) निरायासं सायासं दीर्घपालनम् । अत एवर्षयः

चौथा पत्रा

६६ प्राहुर्दानाच्छ्रेयोनुपालनम् ।[।२३।।*] दत्वा(त्त्वा) भूमिं भाविनः पार्थिवेन्द्रान्भूयो भूयो या–

६७ चते रामभद्रः । सामान्योयं धर्म्मसेतुर्नृपाणां काले काले पालनीयो भवद्भिः[५] ।।[२४।।*]

६८ यस्त्वेवमभ्यर्थितोपि कलिकालमुषितमनस्कः पुरातनधर्म्मदायलुं-प्तिं करिष्यति

६९ स एव निरयफलमनुभविष्यति । उक्तं च । स्वदत्तां परदत्ताम्वा[६] यो हरेत वसुन्धरा–

---

१ 'जगतीपुरार्थां भूमिम्' वाचावे.
२ 'तदयं धर्मो मामकीनः. . . . अनुपालनीयः । उक्तञ्च' वाचावे.
३ वृत्त – इन्द्रवज्रा. ४ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.
५ वृत्त – शालिनी. ६ 'परदत्तां वा' वाचावे.

७० म् । षष्टिर्वर्षसहस्राणि[1] विष्ठायां स कृमिर्भवेत्[2] ।[।२५।।*] षष्टिर्वर्षसहस्राणि[3] स्वर्गे तिष्ठ–

७१ ति भूमिदः। आच्छेत्ता चानुमन्ता च तान्येव नरकं व्रजेत्। [।२६।।*] इति मुनिवचनान्यवधा–

७२ र्य समस्तागामिनृपतिभिः पालनधर्म्मफललोभ एव करणीयः । न पुन–

७३ स्तल्लोपकलङ्कपरैर्भवितव्यम् । यथा चैतदेवं[4] श्रीरट्टराजः स्वहस्ते[4] स्वहस्त–

७४ मारोपयति [।*]स्वहस्तोयं मम श्रीरट्टराजस्य । मुद्राशुद्धं क्रिया-शुद्धं भुक्ति–

७५ शुद्धं सचिह्नकम् । राजस्वहस्तशुद्धं तु शुद्धिमायाति शासनम्[5] ।। [२७।।*]

७६ शिवमस्तु ।। सांधिविग्रहिकश्रीदेवपालसुतेन लोकपार्यनाम्ना लिखित–

७७ मिदम् ।।

क्र. ४२

रट्टराजाचा बलिपत्तन ताम्रपट : शक संवत् ९३२

ह्या ताम्रपटाचे प्राप्तिस्थान माहीत नाही. तो प्रा. स. रा. भांडारकरांकडून डॉ. द. रा. भांडारकरांना मिळाला होता.[6] त्यांच्याकडून तो घेऊन कै. हरणचन्द्र चक्लधर यांनी इंडियन हिस्टॉरिकल क्वॉर्टर्ली, व्हॉ. ४, पृ. २०३ इ. मध्ये प्रतिमेसह प्रसिद्ध केला. ती प्रतिमा पुष्कळच अस्पष्ट आहे. तथापि ताम्रपट आता अप्राप्य

---

१ ‘षष्टिवर्ष– ’ वाचावे. २ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

३ ‘षष्टिं वर्षसहस्राणि ’ वाचावे.

४ ‘तथा रट्टराजो लेखकहस्तेन स्वहस्तमारोपयति ’ असे वाचावे.

५ वृत्त – अनुष्टुभ्.

६ *Ind. Hist. Quart.*, Vol. IV, pp. 203 f.

असल्यामुळे तिच्यावरूनच तो येथे संपादिला आहे. तो बलिपत्तनाहून दिला असल्यामुळे त्याला बलिपत्तन नाव दिले आहे.[1]

या ताम्रपटाचे **तीन पत्रे** असून त्यांची लांबी ७ $\frac{1}{2}$ इं. आणि रुंदी ३ $\frac{1}{2}$ इं. आहे. ते एका कडीत अडकविले असून तिला गरुडमुद्रा जोडली आहे.

अक्षरवटिका नागरी लिपीची असून **भाषा** संस्कृत आहे.

विषय – हा ताम्रपट **सीलार** (शिलाहार) वंशी महामांडलिक **रट्टराजाचा** आहे. तो मागील खारेपाटण ताम्रपटानंतर दोनच वर्षांनी दिला होता तरी त्यांत **राष्ट्रकूटांची** तशीच **उत्तरकालीन चालुक्यांचीहि** वंशावळ दिली नाही. तसेच चालुक्य सम्राट् सत्याश्रय याचाहि उल्लेख नाही. पूर्वीच्या ताम्रपटात रट्टराज स्वतःचा 'मांडलिक' असा निर्देश करीत होता. प्रस्तुत ताम्रपटात तो स्वतःला 'महामाण्डलिक' म्हणवितो.

प्रस्तुत ताम्रपटात **रट्टराजाची वंशावळ** खारेपाटण ताम्रपटातल्याप्रमाणे आणि त्याच श्लोकांत दिली आहे.

कालनिर्णय – प्रस्तुत ताम्रपट रट्टराजाने **बलिपत्तनातून** दिला होता. ती त्याची राजधानी होती, असे दिसते. त्याची **मिति शकसंवत् ९३२, साधारण संवत्सर, पुष्य कृष्ण प्रतिपदा, उत्तरायण संक्रान्ति, रविवार** अशी दिली आहे. ही तिथि बरोबर जुळते. उत्तरायण संक्रान्ति शनिवारी २३ ता. २० मि. झाली होती. तद्विषक धर्मकृत्य रविवारी, पुष्य कृष्ण प्रतिपदेसच झाले असले पाहिजे. इंग्रजी तारीख २४ डिसेंबर सन १०१० येते.

उद्देश – प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश **रट्टराजाने** नागमैय ब्राह्मणाचा पुत्र **संकमैय** याला **कलवाल** नामक भक्तग्रामातील एक **वाईंगण क्षेत्र** (उन्हाळी व पावसाळी दोन पिके देणारे शेत), तसेच **पलउरे** नामक अग्रहार गावाच्या पश्चिमेस असलेल्या वाडीतील एक पोफळीची बाग दान दिली हे नमूद करण्याचा होता. दान दिलेल्या ब्राह्मणाची शाखा, गोत्र वगैरे दिले नाही, तसेच दानाचा उद्देश पञ्चमहायज्ञादिकांचे अनुष्ठान यासारखाहि सांगितला नाही. याउलट त्या ब्राह्मणाला **सेणावइ** (सेनापति) म्हटले आहे. तेव्हा या दानाचा उद्देश धार्मिक होता, असे दिसत नाही.

स्थलनिश्चय – दान दिलेल्या शेताच्या व बागेच्या चतुःसीमा दिल्या आहेत, पण त्यांतील स्थलनामे अस्पष्ट आहेत. इतरत्र प्रशस्तीत आलेल्या गावांबद्दल मागील ताम्रपटावरील लेखात चर्चा केली आहे.

---

१ चक्लधरांनी याला 'वलिपत्तन ताम्रपट' म्हटले आहे, पण यात 'ब' बद्दल 'व' लिहिले असल्याने स्थलनाम 'बलिपत्तन' घेतले पाहिजे. ते सार्थहि आहे.

ओळ वाचन[१]

पहिला पत्रा

१ सिद्धम्[२] [।*] [स्वस्ति][।*] श्रीरपि विपुला [स्ता]दभिम–
२ तदेवताप्रसादेन । संसारसा–
३ रधर्म्मक्रियावतां प्राणिनां स–
४ ततम्[४]॥[१॥*] आशी(सी)द्विद्याधराधीसो(शो)
५ [गरुत्मद्द]त्तजीवितः [।*] जीमूतकेतोः स–
६ त्पुत्रो नाम्ना जीमूतवाहनः[५]॥[२॥*] ततः
७ सिलारवंशोभूत्सिंहलक्ष्माभृतां वर–
८ : । प्रभूतभूतसौभाग्यभाग्यवांस्तत्र चो–
९ [र्जि]तः[६]॥[३॥*] नाम्ना सणफुल्लः[७] ख्यातः कृ–
१० ष्णराजप्रसादवान् । समुद्रतीरसह्या–
११ न्तदेस(श)संसाधको नृपः[८]॥[४॥*] तत्सुतो धर्म्म
१२ एवाभून्नाम्ना धम्मियरः परः । प्रता–
१३ पवान्महादुर्ग्गव(ब)लिपत्तनकृत्कृती
१४ ॥[५॥*] तस्मादैयपराजोभूद्विजिगीषु–
१५ गुणान्वितः । स्नातश्चन्द्रपुरासन्नना–
१६ लि[के]राम्वु(म्बु)ना स यः ॥[६॥*] व(ब)भूवाव[स*]रस्त–

---

१ इं. हि. क्वॉ., व्हॉ. ४, पृ. २१४ व २१५ मधील प्रतिमेवरून.

२ चिह्नाने प्रदर्शित.

३ चक्लधरांनी 'विप्लुलाप्ता–' असे वाचले, पण ते रूप व्याकरणदृष्टया अशुद्ध मानले. खरे वाचन स्तात् आहे. हे आज्ञार्थी वैकल्पिक रूप आहे. पाणिनि, ७, १, ३५ पाहा.

४ वृत्त – आर्या (अनियमित). ५ श्लो. २ ते १२ चे वृत्त– अनुष्टुभ्.

६ खारेपाटण ताम्रपटात 'भाग्यवानूर्जितोर्जितः' असा पाठ आहे.

७ येथे वृत्तानुसारी 'सणफुलः' असा पाठ आवश्यक आहे.

८ खारेपाटण ताम्रपटात 'देशसंसाधनोऽभवत्' असा पाठ आहे.

१७ स्मान्नीतिशा[स्त्रा]र्थतत्व(त्त्व)वित् । एकने-
१८ त्रप्रलग्ना(दग्धा)रिकाण्डश्चण्डपराक्रमः ।।[७।।*]
१९ आदित्यवर्म्मा पुत्रोभूत्तेजसादित्यव-
२० त्ततः । तस्मादवत(स)रार्योभूजि(ज्जि)तारि-
२१ र्द्धर्म्मवान्नृपः ।।[८।।*] चेमूल्यचन्द्रपुरज-
२२ क्ष्माभृत्साहाय्यकारकात् । ततोभू-
२३ दिन्दरस्त्याग[1] [भो]गवानतिसुन्दरः[2] ।।[९।।*]

दुसरा पत्रा : पहिली बाजू

२४ [त*]स्मात्प्रभूतभाग्योभूद्धी[मो भी*]-
२५ माभविक्रमः । तेजसा राहु[व]-
२६ द्ग्रस्तचन्द्रमण्डल उज्ज्वलः ।।[१०।।*]
२७ ततश्चावसरो राजा जातोतीव
२८ विवेकवान् । प्राज्ञः प्राज्ञः पटुः[3]
२९ सू(शू)रो धीरः परमरूपवान् ।।[११।।*] रट्ट-
३० नामाभवत्तस्माद्राजा पुण्यवतां व-
३१ रः । नीतिज्ञो नीतिशास्त्रार्थवृद्ध-
३२ सेवी जितेन्द्रियः ।।[१२।।*] तस्य महाम(मा)ण्ड-
३३ लिकश्रीरट्टार्यराजराज्ये । चन्द्रा-
३४ र्कप्रवर्द्धमान[यू]ज्ये श्रीव(ब)लिपत्त-
३५ ने ।। पञ्चमहामठस्थाननगरह-
३६ [ञ्ज]मानप्रधानामात्यवर्ग्गः[4] संवि
३७ दितम् ।। शकनृपकालातीतस-

---

१ खारेपाटण ताम्रपटातल्याप्रमाणे 'ततोऽभवदिन्द्रराजः' वाचावे.
२ खारेपाटण ताम्रपटात '–स्त्यागभोगातिसुन्दरः' पाठ आहे.
३ खारेपाटण ताम्रपटातील 'प्राज्ञः प्राज्ञजनावासः शूरः' यापेक्षा सरस आहे.
४ 'वर्ग्गमाहूय रट्टराजः संबोधयत्यस्तु वः–' वाचावे.

३८ म्वत्सर[1]नवशतेषु द्वात्रिन्शद[2]धि-
३९ केष्वङ्कतोपि ९३२ साधारणस-
४० म्वत्सरा[3]न्तर्गतपुष्यव(ब)हुलप्रति-
४१ पदि रविवारे उत्तरायणसंक्रा-
४२ न्तौ समस्तराजावलीसमलङ्कृ-
४३ तः(त)श्रीरट्टराजेन स्वहस्तेन हस्तो-
४४ दकं कृत्वा व्रा(ब्रा)ह्मणसेणावइनाग-
४५ मैयसुतसङ्कमैयस्य कल्वाल-
४६ भ[क्त]ग्रामाद्वाइङ्गणक्षेत्र-

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

४७ . स्तस्याभिधानम् । जवलरा-
४८ ..च वलोठी अत्र उभयत-
४९ : जपतनभ...रा[षट्क]मर्या-
५० दाः । अन्यच्च अग्रहारपलउ-
५१ रेग्रामात्पश्चिमायामावडि नाम
५२ वाडी तत्र संझैयनामव्रा(ब्रा)ह्मणस्त-
५३ स्य नप्ता(प्तृ)कुंवरैयस्य च छाठव्वैय-
५४ नामा व्रा(ब्रा)ह्मणो[4] तेन च स्वकीयन-
५५ प्तिका [अन्नणा ?] स्वरूपेण स्री(श्री)मार-
५६ सह पूग[स्थ]ली[5] जीवलोको दत्त-

---

१ 'संवत्सर-' वाचावे. २ 'द्वात्रिंशद-' वाचावे.

३ 'संवत्सरा-' वाचावे.

४ चक्लधरांनी 'ब्राह्मणी-' असे वाचले, पण ते पुढील 'तेन' शब्दाशी जुळत नाही. 'ब्राह्मणो' असे चुकीने ('ब्राह्मणः' बद्दल) कोरले आहे. येथे 'ग' चा ओकार घसीटी तऱ्हेचा आहे. त्याकरिता *C. I. I.*, Vol. IV, pp. 48, 67, 82 पाहा. 'ब्राह्मणस्तेन' वाचावे.

५ येथील पाठ व अर्थ अनिश्चित आहेत.

५७ स्तस्य मर्यादा । पूर्व्वतः पाष(षा)णदे-
५८ उली । दक्षिणत[:*] नदी । पश्चिमतः
५९ वोरिभाठासमीपसमुद्रः । उत्तर-
६० तः गावोम । इति सुप्रसिद्धमर्या-
६१ द(दा)विशुद्धः श्रीरट्टराजपुत्रपौत्रै[:]
६२ एतच्च पुत्रपौत्रेभ्यः[1] नमस्यरूपे-
६३ ण सर्व्वपरिहरं[2] प्रतिपालनीयम् [।*]
६४ एतदपहरणे महादोषः संपद्य-
६५ ते ।। उक्तञ्च मुनिभिः । यानीह दत्ता-
६६ नि पुरा नरेन्द्रैर्द्दानानि धर्म्मार्थय-
६७ शस्कराणि । निर्म्माल्यवान्तः(न्त)प्रति-
६८ मानि तानि को नाम साधुः पुनरा-
६९ ददीत[3] ।।[१३।।*] व(ब)हुभिर्वसुधा भुक्ता रा-
७० [ज*]भिः सगरादिभिः । यस्य य[स्य*]

तिसरा पत्रा

७१ [य*]दा भूमिस्तस्य तदा फलम्[4] ।।[१४।।*]
७२ [सा]मान्योयं धर्म्म[से]तुर्नृपाणां [का]-
७३ ले काले पालनी[यो] भवद्भिः । स-
७४ र्वानेतान्भाविनः पार्थिवेन्द्रान्भू-
७५ यो भूयो याचते [रामभद्रः][5] ।।[१५।।*] यस्त्वे-
७६ वमभ्यर्थितोपि कलिकालगुपितमन-
७७ स्कः पुरातनधर्म्मदायलुप्तिं करिष्य-
७८ ति स एव निरयफलमनुभविष्यति

---

१ या संदर्भात् 'एतेषां च पुत्रपौत्रैः' या सारखा पाठ आवश्यक आहे.
२ 'सर्वपरिहारान्परिहृत्य' वाचावे. ३ वृत्त – इंद्रवज्रा.
४ वृत्त – अनुष्टुभ्. ५ वृत्त – शालिनी.

७९ ।। उक्तं च स्वदत्तां परदत्तां वा यो ह्-
८० रेत वसुन्धराम् । षष्टिर्वर्षसहस्राणि[1]
८१ विष्ठायां स कृमिर्भवेत् ।।[१६।।*] षष्टिवर्ष-
८२ सहस्राणि स्वर्ग्गे तिष्ठति भूमिदः ।
८३ आच्छेत्ता चानुमन्ता च तान्येव नरके
८४ व्रजेत् ।।[१७।।*] इति मुनिवचनान्यवधार्य
८५ ।[2] समस्तागामिनृपतिभिः पालनध-
८६ र्म्मफललोभ एव करणीयः । न पु-
८७ नस्तल्लोपकलंकपरैर्भवितव्यम् ।।
८८ यथा चैतदेवम् ।[2] श्रीरट्टराजः स्वह-
८९ स्ते स्वहस्तमारोपयति[3] [।*] स्वहस्तोयं मम
९० श्रीरट्टराजस्य ।[2] मुद्राशुद्धं क्रियाशु-
९१ द्धं भुक्तिशुद्ध(द्धं) सचिन्ह(ह्न)कम् । राजस्व-
९२ [हस्त]शुद्धं [तु] शुद्धिमायाति शासनम्[4] ।[।१८।।*]
९३ सान्धिविग्रहिकश्रीदेवपालार्य-
९४ सुतेन लोकपार्यनाम्ना लिखित-
९५ [मिद*]मिति ।। [मंगलं*] महाश्रीः ।। ※ ।।

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

अलं हरणेन दी(दा)नपाट[स्य *][5]

---

१ ' षष्टि वर्षसहस्राणि ' वाचावे. या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

२ हे दण्ड निरर्थक आहेत.

३ सामान्यतः ' लेखकहस्तेन स्वहस्तमारोपयति ' असा पाठ असतो.

४ वृत्त – अनुष्टुभ्.

५ ' ह ' च्या आकृतीवरून ही ओळ पुष्कळ कालानंतर कोरली होती, असे दिसते. ' दानपट्टस्य ' वाचावे.

विभाग ३

कोल्हापूरच्या शिलाहारांचे कोरीव लेख

क्र. ४३

मारसिंहाचा मिरज ताम्रपट : शक संवत् ९८०

मुंबई सरकारचा सचिव वॉटेन याने अनेक ताम्रपट गोळा करून त्यांचे वाचन व भाषांतर रॉयल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये प्रसिद्ध केले. त्यांपैकी हा ताम्रपट होता. तो मिरज येथे सापडला होता. तो मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या शाखेच्या स्वाधीन केला होता, पण नंतर तो तेथे गहाळ झाला. तथापि सुदैवाने त्याचे छाप घेण्यात आले होते. ते पं. भगवानलाल इंद्रजींनी 'इन्स्क्रिप्शन्स् फ्रॉम दि केव्ह टेम्पल्स् ऑफ वेस्टर्न इंडिया' यामध्ये छापले आहेत. डॉ. फ्लीटने ताम्रपटाचे वाचन व त्याचा सारांश तेथेच प्रसिद्ध केला होता. त्या छापांवरून या ताम्रपटाचे संपादन येथे केले आहे.[१]

वर्णन – या ताम्रपटाचे तीन पत्रे आहेत. त्यावरील लेख सुस्थितीत आहे.

अक्षरवटिका कन्नड लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे. लेख रचणाऱ्याला संस्कृत भाषेचे चांगलेसे ज्ञान नव्हते. त्याने योजिलेले कित्येक शब्द दुर्ज्ञेय आणि प्रयोग अशुद्ध आहेत. राजप्रशस्तीत योजिलेल्या बिरुदांतील अनेक कन्नड शब्दांचा अर्थ नीट कळत नाही. त्यामुळे कांही भागाचा आशय दुर्बोध झाला आहे.

विषय – हा ताम्रपट कोल्हापूरच्या सभोवतालच्या भागावर राज्य करणाऱ्या **शिलाहार** शाखेच्या **मारसिंह** राजाचा आहे. त्याने धारण केलेली अनेक बिरुदे त्याच्या वंशजांनी चालू ठेवली होती. त्यांतील 'गोंकनंककार' या बिरुदाचा अर्थ नीट लागत नाही.

प्रस्तुत ताम्रपटात **मारसिंहाचा** आजा **जतिग,** त्याचा पिता **गोंक** आणि चुलता **गूहल** यांचे वर्णन आले आहे. गोंक हा **करहाट** आणि **कुंडी** या विषयांवर (जिल्ह्यांवर) आणि **मैरिंजा** देशावर राज्य करीत होता, असे म्हटले आहे. प्रस्तुत ताम्रपटातील दान दिले तेव्हा मारसिंह **खिळिगिळ दुर्गातील** आपल्या राजधानीत होता असे येथे म्हटले आहे.

---

१ *J. R. A. S.* (Old Series), Vol. IV, pp. 281 f., *Inscriptions from the Cave Temples of Western India,* pp. 102 f.; *Indian Antiquary,* Vol. XXIII, p. 115.

प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश मारसिंहाने कृष्णावेर्णा नदीच्या दक्षिण तीरावरचे **कुंटवाड** गाव **पाशुपत** पंडित **ब्रह्मेश्वर** याचा शिष्य **चिक्कदेव** मुनि याला दान दिले, हे नमूद करण्याचा होता. ते गाव **मिरिंज** देश **३०००** च्या **सिरिवोळल-२४** या विभागात होते आणि त्याच्या पूर्व, दक्षिण आणि पश्चिम सीमांवर अनुक्रमे **कन्नवाड, हाडलिवाड** आणि **गाळिकुट्टि** ही गावे होती. दानाचा उद्देश चिक्कदेवाच्या **मिरिञ्ज** येथील पंचायतनपूजेकरिता तजवीज करणे हा होता.

कालनिर्देश – हे दान **शक संवत् ९८०, विलंब संवत्सर, पौष शुक्ल सप्तमी, गुरुवार** या दिवशी **उत्तरायण संक्रान्तीस** दिले होते. ही तिथि पूर्णपणे जुळते. त्या वर्षीची उत्तरायण संक्रान्ति गुरुवारी (तारीख २४, डिसेंबर सन १०५८) मध्यम मानाने सूर्योदयापासून १० तास १८ मिनिटांनी झाली होती. त्यावेळी पौष शुक्ल सप्तमी चालू होती.

स्थलनिश्चय – **मिरिंज देश** हे मिरजेसभोवारच्या प्रदेशाचे प्राचीन नाव. **करहाट** हे कऱ्हाड, आणि **कुंडि** बेळगाव भोवतालचा प्रदेश होय. **खिळिगिळि** दुर्ग हा सध्याचा कोल्हापूरजवळचा पन्हाळा किल्ला. **कृष्णावेर्णा** हे कृष्णानदीचे नाव. **सिरिवोळल** हे सध्याचे शिरोळ होय. **कुंटवाड** हे शिरोळच्या पूर्वेस अडीच मैलांवरचे कृष्णाकाठचे कुटवाड. त्याच्या सीमेची **कन्नवाड, हाडलिवाड** आणि **गाळिकुट्टि** ही अनुक्रमे सध्याची कनवाड, हसूर आणि घलवाड होत.

ओळ **वाचन**[१]

पहिला पत्रा

१ **सिद्धम्**[२] **[।*] जयतु जगत्र(त्र)यनाथः ।**[3] **सकळकळाज्ञानधा-(ध्या)ननेत्रत्रितयः**[४] **। फणिपति-**

२ **विभूषणाङ्गः । कपिळजटाजूटमण्डनस्सं(श्शं)भुः**[५] **॥[१॥*] स्वस्ति श्रीसियळा-**

३ **रवंशतिळको जीमूतवाहान्वयप्रस्तारप्रभवः । सुवर्णगरुडव्याळो-ळली-**

---

१ इ. के. टें. वे. इं. मधील छापांवरून. २ चिह्नाने प्रदर्शित.

३ येथील आणि पुढील अनेक ठिकाणचे दंड निरर्थक आहेत.

४ 'दृक्त्रितयः' असे वृत्तानुसारी वाचावे. ५ वृत्त – आर्यागीति.

४ ळाध्वजो(जः) । विस्तीर्ण्णार्ण्णवमेखळावनिवधूकान्तो महीमण्ड-
ळप्रस्तुत्यो म–

५ लेयंक[1]सर्प्पनृपति[:*] श्रीराजविद्याधरः[2] ।।[२।।*] अरिभू-
भृच्चक्रवक्रस्तगरनगर–

६ भूपाळकस्ति(स्ती)व्रतेजाः । स्थिरवाक्यश्शौर्य्यशाळी नर(ग)व-
रवरपन्नाळ्दुर्ग्गाद्रिसिं–

७ हः । स्फुरितोद्यत्कीत्ति(र्त्ति)कान्तक्षितिमहितमहामण्डळीकाधि-
नाथः । धरणीर–

८ क्षाक्षम[:*] श्रीजतिगनरपतिस्तस्य सुनु[:*] प्रचण्डः[3] ।।[३।।*]
अरिबळसर्प्पः पात्थि(र्त्थि)वपु–

९ रन्दरः खचरवंशचूडारत्नः(त्नम्) । खरकरसमप्रभः समग्ररङ्ग-
प्रणयि–

१० माण्डळीकनिधानः[4]।।[४।।*] गंजामग्रमुदीर्य्य वैरिनिकरस्यात्मी-
यतीव्रासि–

११ ना । भुंजं तत्करहाटकुण्डिविषयं[5] स्वांगीकृतं सर्व्व[दो*] ।
मैरिंजादेस(श)मु[6]–

१२ दग्रकोंकणमहादेसं(शं) निजत्रासनाद्भुंजं(जन्) नित्य । मुदार-
वीरनृपति[:*] श्रीगोंकरा–

१३ जोत्तमः[7] ।।[५।।*] तस्यानुजो नृपनीतिविद्यः[8] हास्यं न
कृद्गण्डगुणे रणे वा ।

१४ लास्यं विधाने नृपगूहलांकः । श(स)त्याश्रयस्य क्रमपूजनेप्टः-
(ष्टः)[9]।।[६।।*] रिपुबळ–

---

१ 'मलयंक' असा वृत्तानुसारी पाठ पाहिजे. २ वृत्त – शार्दूलविक्रीडित.
३ वृत्त – महास्रग्धरा (?) ४ वृत्त – आर्यागीति (सदोष).
५ 'भुञ्जानः करहाटकुण्डिविषयं' असे वृत्तानुसारी वाचावे.
६ 'मैरिंजेश–' असे वृत्तानुसारी वाचावे. ७ वृत्त – शार्दूलविक्रीडित.
८ 'तस्यानुजोऽभून्नृप–' असे वृत्तानुसारी वाचावे. ९ वृत्त – इंद्रवज्रा.

१५ सर्प्प मण्डळिकभैरव । वारणवाजिसाधनाधिप । निजवश्यतंत्र । नवराज्य-

१६ समुद्धरणारिवर्ग्गनिप्कृ(ष्कृ)प । नृपथी(वी)रसत्कोळिगिळाच-ळदुर्ग्गसमग्र । भूरिभूमि-

१७ प त(न)वसाहसांकमरिराजमनोरुजमुग्रपौरुषं(षम्)[1]॥[७॥*] पूर्व्वा(र्व्वो)क्तगोंकरा-

१८ जः । सर्व्वगुणोपेतलक्षणस्तस्य सुतः । सर्व्वज्ञभक्तिभुवना । शीर्व्वादपुर-

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१९ स्सरो महामहिमः(मा)[2]॥[८॥*] बळवद्विद्विष्टसैन्यक्षयकर-परिपूर्ण्णासिहस्तं । दरिद्रा-

२० खिळदीनानाथवन्दिप्रकरमुदकरोद्दानहस्तं । सुरेन्द्राचळलीळाकार-देवायत-

२१ नकरलसद्धर्म्महस्तं । महोर्व्वीतलभारोद्धारहस्तं । त्रिभुवनतिळकं मा-

२२ रसिंहाग्रहस्तं(स्तम्)[3]॥[९॥*] माराकारशरीरः । वीरारिम-दान्धगन्धशि(सि)न्धुरसिंहः । शूरप्र-

२३ तापनिळयः । सारगुणोदारमारसिंहनृपः[4] ।[।१०॥*] रेम(व)-न्तो वत्सराजो वरतुरगच-

२४ यारूड(ढ)रेखाविशुद्धौ(द्धो) । भीमो भीमप्रतापे । निजभुजवि-जयी राजनीतिप्रवीणः । का-

२५ मो रूपप्रसन्ने धवळविमळदिग्वर्त्तिकीर्त्तिप्रतानः । रामाद्यादिक्षिति-पचरितो मार-

---

१ वृत्त अनिश्चित. कदाचित् हा दण्डक वृत्ताचा प्रकार असेल.

२ वृत्त – संयुक्त गीति आणि आर्यागीति.

३ वृत्त – महास्रग्धरा (सदोष). येथे सर्वत्र प्रथमेबद्दल द्वितीयेचा उपयोग केला आहे.

४ वृत्त – संयुक्त आर्यागीति आणि गीति.

२६ सिंहावनीशः[१] ॥[११॥*] समधिगतपंचमहाशब्दमहामण्डलेश्वर । तगरपुर–

२७ वराधीश्वर । श्रीशिळाहारनरेंद्र । जीमूतवाहनान्वयप्रसूत । सुव–

२८ र्ण्णगरुडध्वज । मरुवंक्कसर्प्प । गोंकनंककार । गूहेयनसिंहं(ह) ।

२९ रिपुमण्डळिकभैरव । विद्विष्टगजकण्ठीरव । इडुवरादित्य । रूप-नारायण । कलियु–

३० गविक्रमादित्य । तुरगरेवन्त । कामिनीकामदेव । श्रीमहालक्ष्मि-(क्ष्मी)लब्धवरप्रसादादिस–

३१ मस्तराजावळीसमळंकृतमहामंडळिकश्रीमारसिंहदेवः । निजराज-धानि(नी)श्रीखिळि–

३२ गिळदुर्ग्गे । सुखसंकथाविनोदेन राज्यं कुर्वण् तप्ठत्यवसरे[२] । श्रीसिंहस्पर्शार्ज्जित–

३३ पाशुपतागमकृताभिनवभुवनार्घ्या । वासितमुदुनीरो लमेलीशार्प्पि-तसन्ततिप्रकाश–

३४ मुनीशः[३] ॥[१२॥*] दूरो दूरन्तदुरिता । दाराध्यस्सकळभुवनमनु-जानां(नाम्) । धीरस्तपःप्रभावे ।

३५ मारास्त्रजयी विमुक्तसंसारः[४] ॥[१३॥*] ब्रह्मा कलासु । बाल-ब्रह्मसुचारी महेश्व–

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

३६ रांघ्रिध्यानः । जिह्मरहितस्सुमार्ग्गो । ब्रह्मेश्वरपण्डितो मुनिर्ज्ज-यतु[५]॥[१४॥*] तदीया–

३७ ग्रशिप्य(ष्य)स्समस्तागमज्ञः । मदक्रोधलोभादिदोषप्रदूरः । सुदृष्ट-स्सु–

---

१ वृत्त – स्रग्धरा. चौथा पाद सदोष (मंदाक्रान्तेचा) आहे.

२ 'कुर्वंस्तिष्ठत्यवसरे' वाचावे.

३ वृत्त – आर्यागीति. द्वितीयार्ध सदोष आहे.   ४ वृत्त – गीति.

५ वृत्त – प्रथमार्धात आर्यागीति आणि द्वितीयार्धात गीति.

३८ वृत्तस्सुधर्म्मप्रदि(दी)पः । पदार्त्थप्रवीणो मुमुक्षुप्रधानः[१] ॥
[१५॥*] श्रीमलेयाळो देवः ।

३९ तस्य महाशिष्य(ष्य)जनपतिस्तुत्यः । श्रीमन्मिरिजनगरस्या ।
स्यांबुजमण्डनो मुमु–

४० क्षुनिधिः[२] ॥[१६॥*] कर्म्मारातीभकुंभप्रहरजपनखानीक-
दुर्व्वारसिंहः । धर्म्मांभोजप्रका–

४१ शत्करपरिणतसिद्धान्तनित्योदयार्क्कः । कूर्म्माधान(र)प्रशस्ताच-
रणकरणपादांबुजा–

४२ सेवभृंगः । निम्मो(र्म्मो)हो निष्कळंको निरतिशयतप[:*]
श्रीयुतश्चिक्कदेवः[३] ॥[१७॥*] दानध–

४३ र्म्मतपःशीळ[४]ब्रह्मचर्य्यव्रतादिषु । चिक्कदेवसमो नास्ति । न
भूतो न भ–

४४ विष्यति[५] ॥[१८*॥] स(श)कनृपकालातीतसंवत्सरशतेषु ।
असी(शी)त्यधिकनवशतेष्वं–

४५ केषु[६] । प्रवर्त्तयिति[७] । विलंबि(ब)संवत्सरे । पौषमासस्य
शुद्धपक्षे । सप्तम्यां

४६ बृहस्पतिवारे । उदगयनपर्व्वणि । पादौ प्रक्षाल्य । धारापूर्व्वकं
च । श(स)हस्त्रत्रित–

४७ यमिरिजदेशाभ्यन्तरे । सिरिवोळळचतुर्विंशतिमध्ये । कृष्णावेर्ण्णा-
नदीदक्षिणतटे ।

४८ पूर्व्वदक्षिणपश्चिमत्रिदिशाभागसमावासित । कन्नवाड । हाडलि-
वाडगाळिकुट्टि

४९ एतेषां पार्श्ववत्ति(र्त्ति)ग्रामाणां मध्ये । चतुराघाटसमेत । संस्थितः
कुंटवाड–

---

१ वृत्त – भुजंगप्रयात. २ वृत्त – गीति. ३ वृत्त – स्रग्धरा.
४ 'तपःशीलो' वाचावे. ५ वृत्त – अनुष्टुभ्.
६ शक संवताचे अंक येथे लिहावयाचे राहून गेले आहेत.
७ 'प्रवर्तमाने' वाचावे.

५० नामग्रामः । तेन श्रीराजपुत्रेण । तस्मै दिव्यतपस्विने । तं ग्रामं दत्तवान्

५१ भक्त्या[१] । यत्साम्यं[२] तत्समस्तकं(कम्)[३]॥[१९॥*] मिरिंज-पुरबाहिय्यों(य्यें) । शिवायतनपंच–

५२ कं(कम्) । मार्रासहमहीशेन । कृतवत्[४] कीत्ति(र्त्ति)शासनं-(नम्)[५]॥[२०॥*] तदायतनसंबन्धः । तद्ग्रा–

तिसरा पत्रा

५३ मस्तत्र तापसः । पूर्व्वाश्रये भवेद्धि(द्वि)प्रः । इत्याश्रयस्य नैष्ठि–

५४ कः[६] ॥[२१॥*] स्वारंकर्यो(र्ये) सुशौचे जपनियमसमाधान-संपन्नशीले । मो(मौ)–

५५ नानुष्ठानयुक्ते शमदमनिळये ब्रह्मचर्य्यो(र्य्ये) सुधे(धै)र्य्यो(र्य्ये)

५६ स्वाध्यायध्यानधाने हरचरणयजे तत्व(त्त्व)वित्वे(त्त्वे) सुयोगे । नि–

५७ त्यं संध्यास्तवे तत्परिणतमुनयस्तत्र नि(ति)ष्ठंति नान्ये[७] ॥[२२॥*] परम–

५८ श्रीकामिनीकेतनममळवच[:*]श्रीरमावास । मुग्राचरणभ्रा–

५९ जत्तप[:*]श्रीविलुळितवरकान्ताळयं । नित्यश(स)त्रा(त्रा)-करदानश्रीसती–

६० संपदखिळयश[:*]श्रीवधूनीद(ड)मित्थंकरशोभापूतपं–

६१ चायतनमनुपमं चिक्कदेवेन पूज्यं(ज्यम्)[८] ॥[२३॥*] बहुभि–

६२ र्व्वा(र्व्व)सुधा भुक्ता । राजभिस्सगरादिभिः । यस्य यस्य य--

६३ दा भूमिस्तस्य तस्य तदा प(फ)लं(लम्)[९]॥[२४॥*] स्वदत्तां परदत्तां वा । यो हरे--

---

१ 'स ग्रामश्चार्पितो भक्त्या' वाचावे. २ 'यत्स्वाम्यं' वाचावे.
३ वृत्त – अनुष्टुभ्. ४ 'कृतं तत्' वाचावे. ५ वृत्त – अनुष्टुभ्.
६ वृत्त – अनुष्टुभ्. ७ वृत्त – स्रग्धरा. ८ वृत्त – महास्रग्धरा (?).
९ श्लोक २४ व २५ चे वृत्त – अनुष्टुभ्.

६४ त वसुन्धरां(राम्) । षष्टिवर्षा(र्ष)सहश्रा(स्रा)णि विष्ठायां जायते कृमिः ।।[२५।।*]

६५ सामान्योयं धर्म्मसेतुर्नृषा(पा)णां(णाम्) । काळे काळे पाळनी-या(यो)

६६ भवद्भिः । सर्व्वान्ने(ने)तां(तान्) भागि(वि)नः पात्थि(र्त्थि)-वेंद्रां(न्द्रान्) । भूयो भूयो

६७ याचते रामभद्रिः(द्रः)[१] ।।[२६।।*] आदेशादात्मभूपस्य । भूपाळश्श(स)–

६८ चिवोत्तमः । लिखितं शासनं तेन चिक्कदेवस्सु(स्तु) लब्धवान्[२] ।।[२७।।*]

क्र. ४४

बल्लाळाच्या कारकीर्दीतील होन्नूर मूर्ति–लेख

हा लेख कोल्हापूर जिल्ह्यातील कागलच्या नैर्ऋत्येस दोन मैलांवरच्या **होन्नूर** गावातील जैन मंदिरात पार्श्वनाथ तीर्थंकराच्या उभ्या मूर्तीच्या अभिषेक-पात्राश्रयावर (abhisheka stand) पुढच्या बाजूवर कोरला आहे. लेख सामान्यतः सुस्थितीत आहे; पण शेवटची कांही अक्षरे आता अस्पष्ट झाली आहेत.[३]

अक्षरवाटिका कन्नड लिपीची आणि **भाषा** जुनी कन्नड आहे.

विषय– प्रस्तुत लेख कोल्हापूरचा **शिलाहारनृपति** महामण्डलेश्वर **बल्लाळ** याच्या कारकीर्दीतील आहे. त्यात त्याला शासनात मदत करणाऱ्या **गंडरादित्य** नामक त्याच्या भावाचा उल्लेख आहे, पण त्याच्या नावाला राजपदवी जोडली नाही. या लेखात कालाचा उल्लेख नाही.

प्रस्तुत लेखाचा उद्देश **शिलाहार** महामण्डलेश्वर **बल्लाळदेव** आणि **गंड-रादित्य** यांनी **मूलसंघाच्या पुन्नागवृक्षमूलगणाचा जैनमुनि रात्रिमातिकंति**

---

१ वृत्त – शालिनी. २ वृत्त – अनुष्टुभ्.

३ Graham, *Kolhapur* etc., Inscr. No. 22; *Ind. Ant.*, Vol. XII, p. 102.

याचा शिष्य **बमगावुंड** याने बांधलेल्या जैनमंदिरातील (जैन मुनींच्या) भोजनाकरिता **दोनशे कम्म** भूमि आणि सहा हात मापाचे **घर** दान दिले हे नमूद करण्याचा होता. कम्म हे जमिनीचे माप होते. शंभर कम्म म्हणणे एक मत्तर.

प्रस्तुत लेखात कालाचा निर्देश नाही, पण तो शिलाहार बल्लाळच्या कारकीर्दीतील असल्यामुळे त्याचा काल ख्रिस्तोत्तर बाराव्या शतकाचा प्रथम पाद असावा.

ओळ **वाचन**[1]

१ **सिद्धम् [।*] स्वस्ति [।*] श्रीमूलसंघद पो(पु)न्नागवृक्षमूलगणद रात्रिमतिकन्तियर गुड्डं बमगावुंडं मा–**

२ **डिसिद बसदिगे श्रीमन्महामण्डलेश्वरं बल्लाळदेवनुं गण्डरादित्यदेवन्मा(नुमा)हारदानके बिट्टकम्मबि–**

३ **न्नू.रक्कमा.रुगयि मने. . . .**

क्र. ४५

गंडरादित्याचा ताळले ताम्रपट : शक संवत् १०३३

हा **ताम्रपट** कोल्हापूर जिल्ह्यातील **ताळले** गावी शेतात खणत असता सापडला होता.

वर्णन – या ताम्रपटाचे **तीन पत्रे** असून त्यांची लांबी १०½ इं. व रुंदी ८¼ इ. आहे. कडीकरिता त्यांना छिद्र आहे. पहिल्या पत्राच्या पहिल्या बाजूवर गाय आणि तिचे दूध पिणारे वासरू, त्यांच्या एका बाजूस उभी तरवार आणि त्या सर्वांच्या शिरोभागी चंद्र व सूर्य यांच्या आकृति आहेत. पं. भगवानलाल इंद्रजी यांनी याचा असा अर्थ लावला की ज्याला या ताम्रपटाने भूमि दान दिली आहे त्याने शासनापासून प्राप्त झालेल्या अधिकाराने यावच्चन्द्रदिवाकरौ तिचा उपभोग घ्यावा.

अक्षरवटिका – नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे.[2]

---

१ मुख्य एपिग्राफिस्ट यांनी पाठविलेल्या छापांवरून.

२ *J. B. B. R. A. S.* (Old Series), Vol. XIII, pp. 1 f.

राजवर्णन – यात **गंडरादित्य** या कोल्हापूरच्या **शिलाहार** नृपतीची **वंशावळ** त्याचा पूर्वज **जतिग** याच्यापासून आली आहे. यात त्याची अनेक संस्कृत व कन्नड बिरुदे उल्लेखिली आहेत. उदाहरणार्थ, 'तगरपुरवराधीश्वर,' 'सुवर्णगरुडध्वज,' 'मरुवंकसर्प' (शत्रुसेनेला सापासारखा), 'अय्यनसिंग' (पित्याला सिंहासारखा असणारा पुत्र), 'इडुवरादित्य' (धनुर्धारींमध्ये सूर्यासारखा), 'रूपनारायण', 'शनिवारसिद्धि' (शनिवारीहि विजयी होणारा), 'कलियुगविक्रमादित्य,' 'श्रीमन्महालक्ष्मीलब्धवरप्रसाद' (ज्याला श्रीमहालक्ष्मीच्या प्रसादाने वर मिळाला आहे) इत्यादि. गंडरादित्याचे वर्णन '**सात खोल्लांसह मिरिंज** देशाचा आणि **कोंकणाचा** अधिपति' असे केले आहे.

कालनिर्णय – दान देण्याच्या वेळी गंडरादित्याचा मुक्काम **एडेनाड** मधील **तीरवाड** गावी होता. त्याने गतशक संवत् **१०३२, विरोधी संवत्सर, माघ शुक्ल दशमीस, मंगळवारी,** कांही दाने दिली. नंतर पुढील वर्षी (गत शक संवत् **१०३३** मध्ये) **विकृत संवत्सर, वैशाख पूर्णिमेच्या चन्द्रग्रहणप्रसंगीं पञ्चलांगलव्रताच्या** उद्यापनाच्या वेळी त्याने आणखी कांही भूमिदाने दिली. या दोन्ही कालनिर्देशांतील शक संवताची वर्षे 'गत' म्हटली असली तरी ती वर्तमान घ्यावी लागतात. ती तशी घेतली तरच संवत्सर, वार आणि चन्द्रग्रहण यांचे उल्लेख जुळतात. पहिल्या कालनिर्देशाची इंग्रजी तारीख मंगळवार, १ फेब्रुवारी सन १११० आणि दुसऱ्याची इंग्रजी तारीख ५ मे सन १११० अशी येते. दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे संवत्सरांचे उल्लेख वर्तमान शकवर्षास जुळतात. वरील दुसऱ्या तारखेस चंद्रग्रहणहि होते.

वंशावळ – प्रस्तुत लेखात शिलाहारांच्या या शाखेची पुढील **वंशावळ** दिली आहे – (**प्रथम**) **जतिग** – त्याचा पुत्र **नायिवर्मा** – त्याचा पुत्र **चंद्र** – त्याचा पुत्र (**द्वितीय**) **जतिग** – त्याचा पुत्र **गोंक** – त्याचा भाऊ **गूवल** – त्याचा भाऊ **कीर्तिराज** – गोंकाचा पुत्र **मारसिंह** – त्याचा पुत्र (**द्वितीय**) **गूवल** – त्याचा धाकटा भाऊ (**प्रथम**) **भोजदेव** – त्याचा भाऊ **बल्लाल** – त्याचा धाकटा भाऊ **गंडरादित्य** या सर्वांचे वर्णन ठरीव ठशाचे आहे.

विषय – यात पूर्वोक्त दोन प्रसंगी **गंडरादित्याने** दिलेल्या पुढील **दानांचा** उल्लेख आहे – (१) सोळा ब्राह्मणांची लग्ने करून त्यांना **वंकवन श्चोलातील** (विभागातील) **गालगुट्टि-सजयपल्ली** या वाडीसहित **गुडाय** ग्रामात प्रत्येकी तीन निवर्तनांच्या सोळा **वृत्ति** (उपजीविकेची दाने); (२) **प्रयाग** येथे लक्ष ब्राह्मणभोजनाची व्यवस्था करणाऱ्या व्यवस्थापकाला एक वृत्ति; (३) **पंचलांगल**

व्रताच्या[१] पारणेच्या प्रसंगी दक्षिणा म्हणून तीन वृत्ति; (४) **मिरिंज** देशातील **इरुकुडी** गावाजवळ आपण खोदविलेल्या **गंडसागर तलावाच्या** काठी बांधलेल्या **ईश्वर** (शंकर), **बुद्ध** आणि **अर्हत्** (जैन तीर्थंकर) यांच्या पूजेअर्चेकरिता एक एक अशी तीन निवर्तने जमीन; (५) **गुडालय** गावातील मुनींच्या **योगक्षेमाकरिता** चार निवर्तने जमीन; (६) **गुडालेश्वर** देवाच्या मंदिरात सतत तेवणारा दिवा, **अग्निष्टिका**[२], **प्रपा** (पाणपोई) आणि देवाच्या उत्कृष्ट ताम्बूलाकरिता विड्याची पाने यांकरिता एक वृत्ति – ही ती दाने होत. याशिवाय त्याने पूर्वी दिलेली पुढील दाने चालू ठेवली – **गुडालेश्वराच्या** पूजेकरिता एक निवर्तन (भूमि) आणि त्या गावाच्या पश्चिमेच्या देवालयातील **महादेवाच्या** पूजेकरिता अर्ध निवर्तन जमीन. ओ. ५१–५३ मध्ये हे दानपत्र तयार करणाऱ्या **दामोदर** कवीचे न्यायनिष्णात म्हणून वर्णन आहे. तसेच ते ताम्रपटावर लिहिणाऱ्या **अप्पोजाचाहि** उल्लेख आला आहे.

स्थलनिश्चय – तगर हे सध्याच्या ओस्मानाबाद जिल्ह्यातील तेर हे मागे दाखविले आहे. ज्या ठिकाणी दान देताना राजाचे शिबिर होते ते **तीरवाड** गाव कोल्हापूर जिल्ह्याच्या भूधरगड तालुक्यातील तिरवडे असावे. दान दिलेली जमीन असलेले **गुडाय ग्राम** आता सापडत नाही, पण त्याची एक वाडी **गालगुट्टी** ही सध्याची भूधरगड तालुक्यातील गारगोटी असावी. **मिरिंज देश** हे सध्याच्या मिरजेभोवतालच्या प्रदेशाचे नाव होय. **इरुकुडी** हे मिरज तालुक्यातील इरली असावे. **गुडालय** हे कोल्हापूरच्या राधानगरी तालुक्यातील गुडाल दिसते. शेवटी, ज्या ठिकाणी गंडरादित्याने लक्ष ब्राह्मणभोजन घातले ते **प्रयाग** उत्तर प्रदेशातील

---

१ 'पंचलांगलव्रता'त पाच कठीण लाकडाचे आणि पाच सोन्याचे नांगर, आणि दहा बैल यांसह ग्रहण, युगादि तिथि यासारख्या पुण्यदिनी भूदान करण्यात येते.

२ 'अग्निष्टिका' हेमन्त व शिशिर या थंडीच्या ऋतूंत केली जाते. या व्रतात सकाळ संध्याकाळ उचित मंत्रांनी अग्नि प्रज्वलित करून ब्राह्मणांना व याचकांना अन्नसंतर्पण केले जाते. याचा आरंभ मार्गशीर्षातील पुण्य तिथीस करावयाचा असतो. शीत ऋतूंत अग्नीच्या सभोवार बसून लोक राजकीय, धार्मिक आणि सामाजिक बाबींची चर्चा करतात. त्यायोगे स्वर्गात पुण्यप्राप्ति होते, अशी त्या काली श्रद्धा होती. अग्निष्टिकेचा उल्लेख तत्कालीन कोरीव लेखांत व वाङ्मयात येतो. पुरुषोत्तमपुरी ताम्रपटाची ओ. ७८ पहा. 'लीळाचरित्रा'तहि याचा उल्लेख आहे. तुळपुळे यांनी संपादिलेले लीळाचरित्र, पूर्वार्ध, लीळा क्र. ३४१; उत्तरार्ध, लीळा क्र. २४० पाहा.

नसून कोल्हापूरच्या वायव्येस चार मैलांवर पंचगंगेस मिळणाऱ्या भोगवती व केसरी या नद्यांच्या संगमाचे स्थान होय. इतर स्थानांचा पत्ता लागत नाही.

ओळ **वाचन**[1]

पहिला पत्रा

१ स्वस्ति [।*] श्रीजयश्चाभ्युदश्च ॥ जयति स कश्यपसुनुदर्चः-
(र्य्यः) पीयूषं जहार जित्वेंद्रं(द्रम्) । जीमूतवा-

२ हनं प्रति नागानंद(दं) च यः कृतवान्[2] ॥[१॥*] श्रीशैलाहार-
वंशांव(ब)रतरणिरुदेति स्म मित्राब्ज(ब्ज)वं(बं)-

३ धुर्विद्विड्ध्वांतप्रा(प्र)हारो जतिगनृपतिरस्यात्मजो नायिवर्मा ।
तस्याभूच्चंद्रराजः प्रियतमतन-

४ यः शौर्यसंपति(त्नि)वासस्तस्यापत्यं विरेजे जतिगनृपतिरस्या-
त्मजो गोंकराजः[3]॥[२॥*] त[द्भ्रा]ता गू-

५ वलो राजा निर्ज्जितारिव्रजोभवत् । तद्भ्रा(द्भ्रा)ता विद्विषां
जेता कीर्त्तिराजा(जो) नृपो भावभात्[4] ॥[३॥*] मारो

६ वारवधूजनस्य समदद्विट्कुंभिसिं[हो] रणे यस्मात्तहृदितो[5]भव-
त्क्षितिपतिः

७ श्रीमारसिंहाह्वयः । पुत्रो गोंकनृपस्य सत्यनिलयो लंकेश्वरश्चा-
ज्ञया चक्रे-

८ शप्रियमातुलोमु(तु)लगुणः श्रीरूपनारायणः[6]॥[४॥*] तदात्मजो
गूवलदेवनामा नयांवू(बु)धिः

९ क्ना(क्षा)त्रगुणैकभूमिः । जयांगनालिंगितवा(बा)हुदंडो व(ब)-
भूव नित्यं कनपचंडः[7]॥[५॥*] तस्या-

---

१ ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो., व्हॉ १३, पृ. १ समोरील छापावरून.
२ वृत्त – आर्या. ३ वृत्त – स्रग्धरा.
४ 'व्यभात्' वाचावे. वृत्त – अनुष्टुभ्.
५ 'यस्मादभ्युदितो' वाचावे. ६ वृत्त – शार्दूलविक्रीडित.
७ 'कुनृपप्रचण्डः' वाचावे. वृत्त – उपेन्द्रवज्रा.

१० नुजन्मा विनतावनीशसत्कुंतलाल्यावृतपादपद्मः । श्रीभोजदेवो रिपु-वारनारीवैध-

११ व्यदीक्षाकरणैकदक्षः[१] ॥[६॥*] तद्भ्राता सुभगांगनारतिपति-र्व्व(र्ब्ब)ल्लालभूपालकः किं वर्ण्यः खलु

१२ यदा(द्य)शोधवलयदा(द्द्या)वापृथिव्योर्वपुः [।*] दृष्ट्वार्हणि-(र्नि)शमात्मनश्च किरणार्निदु[:*] प्रमुष्टान्दिवा

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१३ लज्जापाज्जिततहृत्कलंक[२]मधुना धत्ते यमकुच्छलात्[३]॥[७॥*] तस्यानुजन्मा सुचिर(रं) चकास्ति श्रीग(गं)डरा-

१४ दित्यनृपो जगत्यां(त्याम्) । विद्विष्टदुष्टावनिपालराजिघोरा-(रां)धकारक्षरणे(णै)द(क)ल(द)क्षः[४] ॥[८॥*] अनार्यतेजा[५]-

१५ स्सततोदयो यो मनोम(र)यानन्तविचित्रवाजी । रात्रिंदिवे संप-रिभासमानस्म(स्सं)माननामानम-

१६ ध[:*] करोति[६]॥[९॥*] पीनांभोजश्रियं कुर्वन्नुदितः खेव(च)-रेश्वरः । गंडरादित्यभूपालो विद्विड्ध्वां[ता](तां)तक-

१७ स्म(स्स)दा[७]॥[१०॥*] राजन्नीरेजहस्तो विबुधततिनुतस्सोदयः प्रत्यहश्च[८] प्राविर्भूतात्मतेजोनुविचरि-

१८ तजनो नात्मकार्यप्रवृत्तः [।*] [क्षो]णीमेना[९]मनुदिनमधिक(कं) भासयन्नासमंतादेकस्तो(स्थो) व्याप्ततेजाः

१९ खचरगणमणिगंडरादित्यदेवः[१०]॥[११॥*] समधिगतपंचमु(म)-हाश[व्द](ब्द)महाम(मं)डलेश्व(श्व)रः

---

१ वृत्त – इन्द्रवज्रा. २ 'लज्जोपार्ज्जितहृत्कलंक–' वाचावे.

३ 'यमङ्कच्छलात्' वाचावे. वृत्त – शार्दूलविक्रीडित.

४ वृत्त – इन्द्रवज्रा. ५ 'अवार्यतेजा–' वाचावे.

६ वृत्त – उपेन्द्रवज्रा. ७ वृत्त – अनुष्टुभ्. ८ 'प्रत्यहं च' वाचावे.

९ येथे 'मेना' नंतर गळलेली अक्षरे 'नमन' अशी ओळीखाली कोरली आहेत; पण येथील वृत्तानुसार 'क्षोणीमेनामनूनामनुदिन–' असा पाठ पाहिजे.

१० वृत्त – स्रग्धरा.

२० तगरपुरवराधीश्वरः श्रीशिलाहारनरेंद्रः जीमु(मू)तवाहनान्वय-
प्रसूतः सुवर्ण्ण-

२१ गरुडध्वजः मरुवंकसर्प्पः अय्यनसिंगः रिपुमंडलिकभैरवः विद्विष्ट-
गजकंठीरवः

२२ इडुवरादित्यः रूपनारायणः शनिवारसि[द्धिः] गिरिदुर्ग्गलंघनः
कलियुगविक्रमादि-

२३ त्यः श्रीमन्महालक्ष्मीलब्धवरप्रसादादिसमस्तनामावलिविराजितः
श्रीमन्महामंडले-

२४ श्वरो गंडरादित्यदेवः मिरिंजदेशं समस्तखोल्लं सकोंकणमेकच्छत्रेण
दुष्टनिग्रह-

२५ शि[ष्ट]प्रतिपालनपुरःसरधर्म्मेणोपभु(भुं)जानः एडेनाडान्तर्ग्गत-
तीरवाडग्रामे बी-

२६ डानुवृत्या(त्त्या) सुखसंकथाविनोदेन विजयराज्यं चिरं कुर्व्वन्
शकनृपकालातीतद्वा-

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

२७ त्रिंशदुत्तरसहस्रे विरोधिसंवत्सरे माघशुध्ध(द्ध)दशम्यां मंगलवारे
नानागोत्रेभ्यः षो-

२८ डशविप्र(प्रे)भ्यः कन्यादानं कृत्वा(त्वा) तत्पाणिग्रहणसमये
वकवंने[1] श्चोल्लांतर्गतगुडायना-

२९ मग्रामे गालगुट्टिसजयापल्या(ल्ल्या) प्रविष्टया सह वर्त्तमाने श्चो-
ल्लशुध्धि(द्धि)क्षेत्र[2] मानदंडेन नि-

३० वर्त्तनत्रयेणैकैका(कां) वृत्ति कला(ल्प)यित्वा षोडशव(वृ)त्तीः
समन्वितैकैकनिवेशनाः समदा-

३१ त(त्)। श्रीप्रयागे लक्षब्राह्मणान्भोजयित्वा तद्भोजनाधिष्ठायकाय
वृत्तिमेकामयच्छत्। तत्संव-

---

१ भगवानलालनी 'वंकवने' असे वाचले आहे.

२ येथील संदर्भात 'खोल्लशुद्धिक्षेत्रे' असा पाठ पाहिजे.

३२ त्सरोपरितने विकृतसवत्संर[१] वैशाखपौर्ण्णमास्यो(स्यां) सोमग्रह-णपर्वणि पंचलांगलव्रतं[२] कृ

३३ त्वा तदंगदक्षिणतया वृत्तिद्वय(यं) ददाति स्म। मिरिंजेदेशांतर्गत-इरुकुडिनामग्रामे

३४ निजनिम्मि(र्म्मि)तगंडसमुद्राख्यतटाकोपकंठे निजप्रतिष्ठितेश्वर-बौ(बु)ध्धा(द्धा)र्हन्द्रुयः प्रत्ये-

३५ कमेके(कं)कं निवर्त्तनमिति त्रिभ्यः त्रीणि निवर्त्तनानि प्रददौ। गुडालयग्राममूलिकाय निवर्त्त-

३६ नानि चत्व(त्वा)रि व्यतरत्। गुडालेश्वरदेवाखंडप्रदीपात्थंमग्नि-ष्टिकाग्निप्रगुणनात्थं प्रपो-

३७ दकप्रदानात्थं सौपर्ण्णता(तां)बूलदानात्थं(त्थं) च वृत्तिमेकामद-दात्॥ गुडालेश्वरदेवस्य पूजायै

३८ निवर्तनमेकं पूर्वप्रसिध्ध(द्ध)मेव पालितवान्। तद्गा(द्ग्रा)म-पश्चिमदिशि प्रतिष्ठितम-

३९ हादेवस्य पूजायै पूर्वप्रसिध्धं(द्धं) निवर्तनाध्ध(र्द्धं) प्रतिपालित-वान् [।*] एवमनेकविधभूमि-

४० दानेन सवृक्षमालाक(कु)लं ग्रामं धारापूर्वकमाच(चं)द्रतारमापुत्र-पौत्रि[कं] सशासनमयच्छत्।

तिसरा पत्रा

४१ तस्य सीमा आग्रे(ग्ने)यां(य्यां) दिशि पर्वताग्रे पणुतरर्ग(गे)[अ]-खोल्लस्य सीमा तत्पश्चिमतो मयूरवप्पया

४२ दक्षिणतः मासामप्राकारः तत्पश्चिमतो लघुश्रो(स्रो)तस्ततो नदीप्रवाहो यावच्चन्दनकालसंग-

४३ मः तद्दक्षिणश्वा(स्यां) दिशि श्व(ख)दिरस्थाणुः तत्पश्चिमतस्त-टाकपालिः प्रमाणः[३]। तद्दक्षिणतः

---

१ 'संवत्सरे' वाचावे. २ 'व्रतं' वाचावे.
३ 'प्रमाणम्' वाचावे.

४४ अगवालयस्य शव(ख)लयं प्रमाणं तद्दक्षिणतः मणियवप्पाः प्रमाणं ततः प्रागुक्तपणुतरगे-

४५ खोल्लस्य सीमा प्र[मा*]णमिति । मद्वंशजाः परमहीपतिवंशजा वा पापादपेत[म]नसो भू(भु)वि भूमि-

४६ पाला[:।*] ये पालयनि(न्ति) मम धर्म्ममिदं(मं) समस्वं(ग्रं) तेभ्यो मया विरचितोंजलिरेष मह्नि(मूर्ध्नि)[1]।।[१२।।*] सामान्योयं ध-

४७ र्मसेतुर्नृपाणां काले काले पालनीयो भवद्भिः [।*] सर्वानेतान्भाविनः पार्वि(र्थि)वेन्द्रा[न्भू]-

४८ यो भूयो मा(या)चते रामचंद्रः[2]।।[१३।।*] व(ब)हुभिर्वसुधा भुक्ता राजभिस्म(स्स)गरादिभिर्यस्य[3]

४९ यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा प(फ)लम्[4]।।[१४।।*] स्वदत्तां परदत्तां वा यो हरे[त*] वसुंधरां(राम्) [।*] षष्ठिर्वर्ष[5]स-

५० हस्राणि विष्ठायां जाये(य)ते कृमिः ।।[१५।।*] गामेकां रत्तिकामेकां भूमेरप्येकमंगुलं(लम्) [।*] माहरंन्नरक[6]मा-

५१ प्नोति यावदाभूतशं(सं)प्लवम् ।।[१६।।*] समधिगतन्यायार्णवसीम्ना दीर्ण्णान्यवादिकुमहिमा(म्ना)[।*] श्रीदामोद-

५२ रनाम्ना रचितमिदं शासनं जयति[7] ।।[१७।।*] समधिगतशिलाशास्त्रः कंडरण[कला*]कलापसर्वज्ञः [।*]

५३ लिखिताम्भोरुहगर्भः शासनमिदमलिखदप्पोजः[8] ।।[१८।।*] यावच्चंद्रश्च सूर्यश्च व्योम चांवु(बु)धय-

५४ सवा(स्तथा) [।*] तावच्च श्रीशिलाहारशासन(नं) जयताध्ध्रु(द्ध्रु)वम्[9] ।।[१९।।*] ।। श्री ›‿‹ ।। * ।। श्री ।। *[10]

---

१ वृत्त – वसन्ततिलका. २ वृत्त – शालिनी. ३ 'सगरादिभिः। यस्य' वाचावे. ४ या व पुढील दोन श्लोकांचे वृत्त – अनुष्टुभ्. ५ 'षष्टिं वर्ष–' वाचावे. ६ 'हरन्नरक–' वाचावे. ७ वृत्त – आर्या. ८ वृत्त – आर्या. ९ वृत्त – अनुष्टुभ्.

१० येथे चंद्रसूर्यांच्या आकृति आहेत

क्र. ४६

गंडरादित्याचा कोल्हापूर ताम्रपट : शक संवत् १०३७

हा **ताम्रपट कोल्हापूरचे** प्रा. आर्. एन्. आपटे यांच्या संग्रही होता. त्याचे प्राप्तिस्थान माहीत नाही. श्री. ग. ह. खरे यांनी तो दक्षिणच्या ' मध्ययुगीन इतिहासाची साधने, ' भाग १, पृ. ३३ इ. मध्ये प्रथम आणि नंतर एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. २७, पृ. १७६ इ. मध्ये छापांसह संपादिला. त्याच छापांवरून तो येथे संपादिला आहे.

प्रस्तुत ताम्रपटाचे १०½ इंच लांब आणि ७½ इं. रुंद असे तीन पत्रे असून ते एका कडीत अडकविले आहेत. तिला गरुडमुद्रा जोडली आहे. पूर्ण ताम्रपटाचे वजन २७८ तोळे आहे.

अक्षरवटिका कन्नड लिपीची असून **भाषा** संस्कृत आहे. तीत कांही कन्नड शब्द आले आहेत.

राजवर्णन – प्रस्तुत ताम्रपट शिलाहार नृपति महामंडलेश्वर **गंडरादित्य** याच्या काळचा आहे. शिलाहार राजांची अनेक बिरुदे त्याच्या वर्णनात आली आहेत. त्याशिवाय त्याची कांही नवीन बिरुदे – ' गणिकामनोज, ' ' हयवत्सराज, ' ' शौचगांगेय, ' ' सत्यराधेय ' – यात प्रथमच आली आहेत.

वंशावळ – प्रस्तुत ताम्रपटाच्या आरंभी **गंडरादित्याची वंशावळ** दिली आहे. तीन अनेक महत्वाचे ऐतिहासिक उल्लेख आहेत. शिलाहारांच्या इतर कांही ताम्रपटातल्याप्रमाणे **जतिगाचा** या शाखेचा मूळ पुरुष म्हणून उल्लेख आहे. **गोमन्थ दुर्गाचा** अधिपति आणि **गंगनृपति पेर्मानडीचा मामा** म्हणून त्याचे वर्णन आले आहे. हे दोन्ही उल्लेख ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाचे आहेत. गोमन्थ म्हणजे ज्यावर चन्द्रगुप्ति किंवा चन्द्रगुत्ति नामक राजधानी होती तो गोमन्थ पर्वत असावा. तो मैसूरच्या शिमोगा जिल्ह्यात आहे. कोल्हापूरचे शिलाहार राजे आपण मूळचे तगरचे (ओस्मानाबाद जिल्ह्यातील तेरचे), असे आपल्या एका बिरुदाने सुचवीत असले तरी ते प्रथम कांही काळ दक्षिण कर्नाटकात राज्य करीत होते असे दिसते. नंतर त्यांनी सध्याच्या दक्षिण महाराष्ट्रातील प्रदेश जिंकून तेथे आपली राजधानी केली असे दिसते. जतिग हा गंग नृपति पेर्मानडि याचा मामा होता, या उल्लेखाने याला पुष्टि मिळते. हा पेर्मानडि म्हणजे राष्ट्रकूट सम्राट् तृतीय कृष्ण याच्या बूतुग नामक मेव्हण्याचा पुत्र **मारसिंह** होय. या नात्यामळे शिलाहार जतिग तृतीय कृष्णाच्या नजरेस आला असावा. त्याने त्याला कोल्हापूरजवळचे राज्य दिलेले दिसते.

जतिगाला आपला भाचा गंगनृपति मारसिंह याचा रास्त अभिमान होता. मारसिंहाने तृतीय कृष्णाच्या उत्तर व दक्षिण भारतातील स्वाऱ्यांत भाग घेतला होता आणि राष्ट्रकूटांच्या अवनतीच्या कालात त्या वंशाला सावरण्याचे प्रयत्न केले होते.

प्रथम जतिगानंतर त्याचा पुत्र **नायिम** आणि त्याच्यानंतर **चंद्र** हे गादीवर आले. नंतर चन्द्राचा पुत्र **द्वितीय जतिग** राज्य करू लागला. या जतिगाच्या **गोंकल** आणि **गूवल** या दोनच पुत्रांचा या ताम्रपटात निर्देश आला आहे. गोंकलाचा पुत्र **मारसिंह** आणि त्याचा ज्येष्ठ पुत्र **द्वितीय गूवल** हे क्रमाने राज्य करू लागले. नायिमापासून द्वितीय गूवलापर्यंतच्या राजांचे वर्णन ठरीव ठशाचे आहे. द्वितीय गूवलाचा कनिष्ठ भाऊ **प्रथम भोज** याच्या विषयी बरीच माहिती मिळते. त्याने **कदम्ब नृपति सान्तर** याच्या शिरःकमलाने **विक्रमादित्याची** पूजा केली, असे वर्णन आले आहे. हा विक्रमादित्य म्हणजे उत्तरकालीन चालुक्य सम्राट् षष्ठ विक्रमादित्य होय. भोजाने पूर्वोक्त सान्तराचा शिरच्छेद करून त्याचे शिर आपला सम्राट् षष्ठ विक्रमादित्य याला अर्पण केले, असे दिसते. मध्यंतरीच्या काळात कोल्हापूरच्या शिलाहारांनी राष्ट्रकूटांचे स्वामित्व झुगारून देऊन उत्तरकालीन चालुक्यांचे मांडलिकत्व पत्करले असावे. हा **सान्तर** म्हणजे वनवासीचा **कदम्ब नृपति द्वितीय शान्तिवर्मा** होय. पण इतरत्र 'विक्रमादित्याचा मांडलिक' म्हणून त्याचा उल्लेख आला आहे. तो निदान सन १०८९ पर्यंत गादीवर होता. तेव्हा वरील वर्णनाचा अर्थ भोजाने त्याचा पाडाव करून त्याला विक्रमादित्याच्या पायापुढे नम्र व्हावयास लावले, असा केला पाहिजे.

नंतर भोजाने **कोंगज राजाचा** उच्छेद केला, असे म्हटले आहे. या राजाचा पत्ता लागत नाही. पुढे त्याने **सूर्यवंशी बिज्जणाला** इंद्रलोकाला पाठविले असे वर्णन आहे. श्री. खरे यांनी हा बिज्जण म्हणजे जोगमरसाचा चुलता मंगळवेढ्याचा बिज्जल होय, असे प्रतिपादिले आहे. भोजाने **कोक्कल्लाचाहि** उच्छेद केला होता. तोहि अज्ञात आहे.

भोजाचे श्लोक २३ मध्ये उल्लेखिलेले इतर पराक्रम असे – (१) **वेणुग्राम** (बेळगाव) चे दहन; (२) **गोविंदाचा** उच्छेद; (३) **कुरंजाचा** नाश; (४) **कोंकण** जिंकून घेणे; (५) **भिल्लमाची** सुटका करणे. यांविषयी फारशी निश्चित माहिती सध्या मिळत नाही. यांपैकी पहिला विजय सौंदत्तीच्या (प्राचीन सुगन्धवतीच्या) रट्टांवर असावा. कारण ते वेणुग्रामाजवळच राज्य करीत होते. **गोविंद** हा खानदेशात वाघली येथे शक संवत् ९९१ मध्ये राज्य करीत असलेला तन्नामक मौर्य नृपति असावा. कोंकणचा राजा अनन्तपाल (सुः सन १०७०–१११०) असावा. भिल्लम हा सेऊणदेशाचा अधिपति तृतीय भिल्लम असेल.

भोजाचा धाकटा भाऊ **बल्लाळ** याची स्तुति ठराविक ठशाची आहे. त्याचा धाकटा भाऊ **गंडरादित्य** याने आपल्या **वळयवाड** येथील शिबिरातून प्रस्तुत ताम्रपट दिला होता. त्यानेहि षष्ठ विक्रमादित्याच्या स्वाऱ्यांत भाग घेतला असावा, कारण त्याला त्या चालुक्य सम्राटाने 'निःशंकमल्ल' अशी पदवी दिली होती. त्याने **कुंडी** देशाच्या **दंडब्रह्मयाचा** उच्छेद केल्याचा उल्लेख आहे, पण त्याविषयी अधिक माहिती मिळत नाही. त्याने पश्चिमेच्या राजाचा रम्य देश (दक्षिण-कोंकण ?) जिंकल्याचा उल्लेख आला आहे.

कालनिर्देश– प्रस्तुत ताम्रपट गत **शक संवत् १०३७, मन्मथ संवत्सर, कार्त्तिक शुक्ल अष्टमी, बुधवार** या दिवशी दिला होता. ही तिथि बरोबर जुळते. तिची इंग्रजी तारीख २७ आक्टोबर सन १११५ येते. त्या दिवशी बुधवार होता, तसेच त्या दिवशी मध्यम मानाने सूर्योदयानंतर ८ तासांनी वृश्चिक संक्रान्ति झाली. तन्निमित्त हे दान दिले असावे. पण तसा उल्लेख प्रस्तुत लेखात नाही.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश **गंडरादित्याने** आपला **सामंत नोळंब** यास **मिरिंज देश** आणि **मिरिंज कम्पण** यातील **अंकुलगे** आणि **बोप्परवाड** या दोन गावांसह **आद्गे गाव** दिला हे नमूद करण्याचा होता.

हे दान मिळालेल्या **नोळंबाची वंशावळ** पुढीलप्रमाणे दिली आहे – **निगुंब वंशात होरिम** नामक जैनसंघाचा आश्रयदाता होऊन गेला. त्याचा पुत्र **बीरण** होता. त्याचा धाकटा भाऊ **अरिकेसरी** होता. बीरणाला **कुन्दाति** नामक पुत्र झाला. त्याचा भाऊ **नायिम** हा जैन धर्माचा पुरस्कर्ता होता. त्याचा पुत्र **नोळम्ब** याला प्रस्तुत ताम्रपटात उल्लेखिलेले दान दिले होते. त्याचा स्वतःचा सुवर्ण मत्स्य आणि उरगेन्द्र (शेष) यांनी युक्त असा ध्वज होता. तो आपण **पद्मावती** (महावीर तीर्थंकरांची शासनदेवता) हिच्याकडून वर प्राप्त करून घेतला होता, असे मानीत असे.

प्रस्तुत ताम्रपटात पुढे म्हटले आहे की पूर्वोक्त गावातील **नागगावुंड** आपले **नायकपणाचे** कर्तव्य करतील तर त्यांना जास्त **सुवर्ण नाणी** मिळणार नाहीत, पण त्यांनी तसे न केले तर मात्र त्यांना **कोदेवणही** मिळणार नाही. 'कोदेवण' हा गावकऱ्यांवरचा एक कर असावा.

स्थलनिश्चय – **गोमंथ, तगर** आणि **वेणुग्राम** यांविषयी मागे लिहिले आहे. **कुंडी** देशात बेळगावजवळचा प्रदेश येत असे. **मिरिंज** हे मिरज होय. **अंकुलगे** हे मिरजेच्या पश्चिम सुमारे सहा मैलांवरचे अंकली असावे, पण त्याच्या शेजारी **आद्गे** आणि **बोप्परवाड** यांना जुळणारी गावे दिसत नाहीत. वळयवाड-विषयी चर्चा पुढे केली आहे.[1]

---

१. क्र. ४८, पृ. २७२ वरील चर्चा पाहा.

ओळ वाचन[1]

पहिला पत्रा

१ सिद्धम्[।*] स्वस्ति । जयत्याविष्कृतं विष्णोर्व्वाराहं क्षोभितार्ण्णवं-(वम्) [।*] दक्षिणोन्नतदंष्ट्राग्रविश्रा-

२ न्तभुवनं वपुः[2] ॥[१॥*] जयति जगति रूढो राजलक्ष्मीनिवासः प्रविजितरिपु-

३ वर्ग्गस्वी(स्स्वी)कृतोत्कृष्टदुर्ग्गस्स(र्ग्गः । स)कळसुकृतवासो वीर-लक्ष्मीविलासो जनितसुजन-

४ रागः श्रीशिळाहारवंशः[3] ※ [॥२॥*] श्रीमल्लि(च्छि)ळाहार-नरेंद्रवंशे श्रीकीर्त्तिकान्ताः कमनी-

५ यरूपाः [।*] विख्यातशौर्य्या बहवो नृपेंद्राः संपाळयामासुरिमां धरि-

६ त्रीं(त्रीम्)※[4][॥३॥*] तद्वंशे नृपतिर्ब्बभूव जतिगो गोमन्थदुर्ग्गा-धिपो मामः श्रीवनितापतिस्सु-

७ चरितो गंगस्य पेर्मानडेस्त(डेः।त)स्याभूत्तनय‸प्रतापनिळय(यः) श्रीनायिमां-

८ को नृपः कर्ण्णाटीकुचकुंकुमांकिततनुर्व्विद्याधराधीश्वरः[5]※[॥४॥*] तस्यात्म-

९ जस्सुपरिर्वाद्धितराज्यलक्ष्मी‸प्रादुर्ब्बभूव समुपार्ज्जितपुण्यपुंजः [।*]

१० चंद्राह्वयो जगति विश्रुतकीर्त्तिः(र्त्ति)कान्तस्त्यागार्ण्णवो बुधनुतो नयनाभि-

११ रामः[6]※[॥५॥*] तस्सा(स्या)पि पुत्रो जतिगो नरेंद्रो जातः प्रवीरो गजयूथनाथः [।*] तस्या-

---

१ ए. इं., व्हॉ. २७, पृ. १८०–१८१ मधील छापांवरून.

२ वृत्त – अनुष्टुभ्. ३ वृत्त – मालिनी.

४ वृत्त – इन्द्रवज्रा. ५ वृत्त – शार्दूलविक्रीडित. ६ वृत्त – वसन्ततिलका.

१२ त्मजौ गोंकलगूवलाख्यौ जातावुभौ वैरिकुळाद्रिवज्रौ[1]*[।।६।।*] तद्गोंकलस्य तनुजो रिपुदन्ति-

१३ सिंहः श्रीमारसिंहनृपतिर्म्मरुवक्कश(स)र्प्पः[।*] प्रादुर्ब्बभूव समरांगणसूत्र-

१४ धारो विख्यातकीर्त्तिरिह पण्डितपारिजातः[2]* [।।७।।*] तस्याग्र-सूनुर्जगदेकवीरो वी-

१५ रांगनाबाहुलतावगूढः। कीर्त्तिप्रियो गूवलदेवनामा बभूव भूपाळ-

१६ वरो नरेंद्रः[3]* [।।८।।*] तस्यानुजस्सकळमंगळजन्मभूमिरासी-न्नृपाळतिळको भुवि भोज-

१७ देवः[।*] प्रोत्तुंगवीरवनिताश्रयबाहुदण्डश्चडारिमण्डळशिरोगिरि-वज्रदण्डः[4][।।९।।*]

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१८ श्रीमत्कदंबांबरतिग्मरश्मेशिरस्सरोजं खळु शान्तरस्य[।*] पूजां प्रचक्रे स च चक्रवर्त्तिश्रीविक्र-

१९ मादित्यनरेंद्रपादे[5]*[।।१०।।*] किं वर्न्न(र्ण्य)ते जगति वीरतरः प्रसिद्धः कोपात्तु कोंगजनृपोपि

२० पपात यस्य [।*] सूर्य्यान्वयांबररविस्स च बिज्जणोपि चक्रे गृहं सुरपतेर्भ्भुवि य-

२१ स्य कोपात्[6]* [।।११।।*] यत्प्रतापप्रदीपेस्मिन् कोक्कल्लस्स-(श्श)लभायितः [।*] पलायिता न गण्यन्ते सोयं

२२ भोजनृपालकः[7]*[।।१२।।*] वेणुग्रामदवानळो विजयते वैरी-भकण्ठीरवो गोविंदप्रळयान्त-

१ वृत्त – इंद्रवज्रा. २ वृत्त – वसन्ततिलका. ३ वृत्त – इन्द्रवज्रा.
४ वृत्त – वसन्ततिलका. ५ वृत्त – इन्द्रवज्रा.
६ वृत्त – वसन्ततिलका. ७ वृत्त – अनुष्टुभ्.

२३ कः शिखरिणो वज्रः कुरंजस्य च [।*] भोजः स्वीकृतकोंकणो भुजबळात्तद्भिल्लमोद्बन्ध–

२४ कृत्सोयं कर्न्न(र्ण)दिशापटो रिपुकुभृद्दोर्द्दण्डकण्डूहरः[1] * [॥१३॥*] तस्यानुजातो गुणराशि–

२५ रासीत्(द्) बल्लाळदेवो जितवैरिभूपः [।*] जीमूतवाहान्वयर-त्नदीपो गंभीर–

२६ मूर्त्तिर्भ्भु(र्भु)वि शौर्य्यशाली[2]* [॥१४॥*] अजनि तदनुजात-स्तिग्मरश्मिप्रतापो द्विविजपतिवि–

२७ भूतिस्सर्व्वलक्ष्मीनिवासः [।*] कृतरिपुमदभंगो राजविद्याप्रसंगो भुवनवि–

२८ नुतमूर्त्तिर्ग्गंडरादित्यदेवः[3]* [॥१५॥*] चक्रे चाळुक्यचक्रेशो विक्रमादित्यवल्लभः [।*] निश्शं–

२९ कमल्ल इत्याख्यां गण्डरादित्यभूपतेः[4]* [॥१६॥*] धन्यास्ते मानवास्सर्व्वे धन्याश्च मृगजात–

३० यः[।*] स देशस्सफलो यत्र गण्डरादित्यभूपतेः(तिः)*[॥१७॥*] यत्खड्गाद्भुततीव्र(व्र)घा–

३१ तचकितस्तत्कुण्डिदेशाधिपो दण्डब्रह्मनृपो जगाम सदनं संसेव्यमानं सुरै–

३२ स्त्यक्त्वा[5] राष्ट्रमतीव रम्यमतुळां लक्ष्मीं भुजोपार्ज्जितां सोयं गण्डरदेवम–

३३ ण्डळपतिस्संशोभते भूतळे[6]* [॥१८॥*] रत्नानि यत्नेन ददाति तस्मै रत्नाक–

३४ रो भंगभयाज्जडात्मा [।*] आपूर्य्य सम्यक्सततं ब(व)हित्रं सूक्ष्माणि

---

१ वृत्त – शार्दूलविक्रीडित. २ वृत्त – इंद्रवज्रा.
३ वृत्त – मालिनी. ४ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.
५ 'सुरैः । त्यक्त्वा' वाचावे. ६ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

३५ वासांसि हयांश्च तस्मै[1]*[॥१९॥*] किमिह बहुभिरुक्तैरल्पग-र्भ्भैर्व्वचोभिर्भ्भु(र्भु)वन-

तिसरा पत्रा : दुसरी बाजू

३६ विदितवीरः क्रूरसंग्रामधीरः [।*] अपरनृपतिकोशं देशमत्यन्तशोभं यदि स कुपितचित्तः

३७ कारयत्यात्मकीयं(यम्)[2]* ॥[२०॥*] समधिगतपञ्चमहा-शब्दमहामण्डळेश्वरः [।*] तगरपुरवरा-

३८ धीश्वरः। श्रीशिळाहारनरेंद्रः। जीमूतवाहनान्वयप्रसूतः [।*] सुव-र्णगरुड-

३९ ध्वजः। मरुवक्कश(स)र्प्पः। अय्यनसिंहः [।*] रिपुमण्डळिक-भैरवः [।*] विद्विष्टगजकण्ठी-

४० रवः। गणिकामनोजः। हयवच्छ(त्स)राजः। शौचगांगेयः। सत्यराधेयः।

४१ इडुवरादित्यः। रूपनारायणः। कलियुगविक्रमादित्यः। शनि-वार-

४२ सिद्धिः। गिरिदुर्ग्गलंघनः। श्रीमन्महालक्ष्मीलब्धवरप्रसादादिसम-स्तराजाव-

४३ ळीविराजितः श्रीमन्महामण्डळेश्वरः श्रीगण्डरादित्यदेवः श्रीमद्व-ळय-

४४ वाडशिबिरे सुखसंकथाविनोदेन राज्यं कुर्व्वाणः। सप्तत्रिंशदुत्तर-सह-

४५ स्रेषु स(श)कवर्षेषु १०३७ अतीतेषु मन्मथसंवत्सरे कार्त्तिकमासे शुक्लपक्षे।

४६ अष्टम्यां बुधवारे मिरिंजेदेशे। मिरिंजेगंपणमध्ये अंकुलगे बोप्पे-

४७ यवाड इति ग्रामद्वयं आदगेनामग्रामस्य[3] प्रविष्टं कृत्वा तद्ग्रा-

---

१ वृत्त – इन्द्रवज्रा. २ वृत्त – मालिनी. ३ 'ग्रामे' वाचावे.

४८ मारुवणं त्यक्त्वा तत्रत्यनार्ग्गावुण्डा यदि नायकत्वं कुर्व्वन्ति तेषां

४९ शरीरजीवितात्थं सुवर्ण्णं न ददाति यदि नायकत्वं नेच्छन्ति स्वेच्छया तिष्ठन्ति त-

५० दा कोदेवणं नास्ति । एवमनेन क्रमेण ※ श्रीमत्पवित्रेत्र निगुंब-

तिसरा पत्रा

५१ वंशे जातः पुमान् होरिमनामधेयः [।*] कीर्त्तिप्रियः पुण्यधनः प्रसिद्धः श्री-

५२ जैनसंघांबुजतिग्मरश्मिः ※[1] [॥२१॥*] तस्यात्मजोभूदिह बी-रणाख्यस्तस्यानुजोभू-

५३ दरिकेसरीति [।*] तद्वीरणस्यो(स्या)पि तनूभवोयं बभूव कुंदातिरिति प्रसिद्ध ॥ [२२*]

५४ तस्यानुजस्सुपरिपाळितबन्धुवर्ग्गः श्रीनायिमो जिनमतांबुधिचं-

५५ द्र ये(ए)षः [।*] त्यागान्वितस्सुचरितस्सुज्जनो बभूव प्रख्यातकीर्त्तिरिह धर्म्मप-

५६ रः प्रसिद्धः[2] ※ [॥२३॥*] तस्यापि वीरः सुजनोपकारी नोळंबनामा तनयो बभूव [।*]

५७ श्रीगण्डरादित्यपदाब्जभृंगो धर्म्मान्वितो वैरिमतंगसिंहः[3] ※ [॥२४॥*] तस्मै

५८ समस्तगुणगणाळंकृताय निगुंबकुळकमळमार्त्तण्डाय ।[4] सुवर्ण्णम-

५९ त्स्योरगेंद्रध्वजविराजिताय सम्यक्त्वरत्नाकराय पद्मावतीदेवीलब्धवर-

६० प्रसाधा(दा)य नोळंबसामन्ताय सर्वनमस्यं सर्व्वबाधापरिहारं पुत्र-

६१ पौतृ(त्रि)कमाचन्द्रार्क्कं दत्तवान् ※[।*]

---

१ या व पुढील श्लोकाचे वृत्त – इन्द्रवज्रा. २ वृत्त – वसन्ततिलका

३ वृत्त – इन्द्रवज्रा. ४ येथील विरामचिह्न निरर्थक आहे.

क्र. ४७

गंडरादित्याचा हेर्ले शिलालेख : शक संवत् १०४०

या लेखाची **शिला** कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणगलेच्या पश्चिमेस ११.२५ किलोमीटरवर असलेल्या **हेर्ले** गावात सापडली होती. त्याचे कांही अंशी चुकीचे भाषांतर ग्रॅहॅमने 'आपल्या स्टॅटिस्टिकल अकौंट ऑफ दि प्रिन्सिपॅलिटी ऑफ कोल्हापुर' या ग्रंथात दिले आहे. मुख्य एपिग्राफिस्ट डॉ. जी. एस्. गै यांनी त्याचे पाठविलेले वाचन व भाषांतर येथे दिले आहे.

या लेखाची **अक्षरवटिका** कन्नड लिपीची व **भाषा** संस्कृतमिश्रित कन्नड आहे.

विषय – प्रस्तुत लेख **शिलाहार नृपति गंडरादित्याचा** आहे. त्याने आपल्या इतर लेखातल्यासारखी बिरुदे धारण केली आहेत. त्यांशिवाय एक 'माण्डलिकडंगेयवर्म' हे नवीन आहे. तो **वळिवाड** येथून राज्य करीत होता, असे यात म्हटले आहे. तसेच तो आपल्या वंशातील भोजदेवासारखे पूर्वज यांच्यासारख्या क्षत्रियांची राज्यलक्ष्मी वृद्धिगत करीत आहे असेहि त्याचे वर्णन आले आहे.

प्रस्तुत लेखाचा उद्देश **गंडरादित्याने नागलदेवीच्या** सांगण्यावरून **एडेनाड** मध्ये **बगुवतहेरिळिगे** येथे **नेमगावुंड** याने बांधलेल्या तीर्थंकर **चन्द्रप्रभ** याच्या बसदीला (जैन मंदिराला) **एडेनाड** मधील एक **मत्तर** भूमि आणि बाग दान दिली, हे नमूद करण्याचा होता. नागलदेवीचा उल्लेख गंडरादित्याच्या शक संवत् १०५८ च्या शिलालेखात तसेच शेषशायी मंदिर लेखात आला आहे. ती बहुधा गंडरादित्याची जैनधर्मी माता असावी. **नेमगावुंडा**च्या वर्णनानंतर त्याची पत्नी **मैलियक्का** हिची माहिती आली आहे.

प्रस्तुत लेखातील दान **कोल्लापुर तीर्थाचा** आचार्य **जैनमुनि शांतिवीर सिद्धान्तदेव** यास दिले होते. तो त्या **चन्द्रप्रभ** जिनालयाचा पूर्वीचा आचार्य **बालचंद्र व्रती** याचा शिष्य होता. बालचंद्राची स्तुति गंडरादित्याचा पुत्र विजयादित्य याच्या लक्ष्मीधर नामक मंत्र्याचा आश्रित कर्णपार्य याच्या 'नेमिनाथपुराणा'त आली आहे. त्या कन्नड काव्यात त्रिभुवनतिलक नामक चन्द्रप्रभ तीर्थंकराच्या बसदीचा आचार्य म्हणून बालचंद्राचे वर्णन आले आहे. त्यावरून असे दिसते की जसे गंडरादित्याचा सामंत निंबरस याने कोल्हापूरच्या शुक्रवार वेशीजवळ जैन मंदिर बांधून त्याला गंडरादित्याच्या 'रूपनारायण' या बिरुदाचे नाव ठेवले, तसेच नेमगावुंडाने

चंद्रप्रभ तीर्थंकराचे मंदिर बांधून त्याला गंडरादित्याच्या 'त्रिभुवनतिलक' या बिरुदाचे नाव दिले होते. प्रस्तुत लेखात **त्रिभुवनचंद्र** आणि **नागचंद्र सैद्धान्तिक** या आणखी दोन जैन मुनींचा उल्लेख आला आहे. ते बालचंद्राचे सधर्मी असावेत. बालचन्द्राचा आणखी एक सधर्मी **शुभचंद्र** याचा उल्लेख पूर्वोक्त 'नेमिनाथपुराणा'त आला आहे.

कालनिर्णय – पूर्वोक्त भूमिदान **शक संवत् १०४०, विलंबि(ब) संवत्सर, चंद्रग्रहणप्रसंगी** केले होते. यात मासाचा उल्लेख नाही पण त्यावर्षी एकच चन्द्रग्रहण होते. ते ज्येष्ठ पौर्णिमेस बुधवारी, तारीख ५ जून सन १११८ रोजी, झाले होते. ती या लेखाची मिति होय. वारादिकांच्या अभावी ती पडताळून पाहत येत नाही, पण दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे शक संवत् १०४० ला विलंब संवत्सर होते.

स्थलनिश्चय – वगुबण हेरिळिगे हे प्रस्तुत शिलालेख जेथे सापडला ते हेर्ले गाव होय. ते हातकणगले तालुक्यांत आहे. हे ठिकाण विजयादित्याच्या कोल्हापूर शिलालेखात उल्लेखिलेले हवण हेरिळिगेहून भिन्न आहे. कारण हे दुसरे हेरिळिगे आजिरगे खोल्लामध्ये होते. ते सध्याचे भूधरगड तालुक्यातले हेरे हे होय. ही दोन्ही स्थळे **एडेनाड** मध्ये समाविष्ट होती. एडेनाडचा उल्लेख ताळले ताम्रपटात (क्र. ४५) आणि पूर्वोक्त कोल्हापूर शिलालेखात (क्र. ५३) आला आहे. **तीरवाड** (भूधरगड तालुक्यातील तिरवडे) आणि **कोप्परवाड** (कोल्हापूरच्या पश्चिमेस सात मैलावरचे कोपरडे) हीहि एडेनाडात समाविष्ट होती. तेव्हा एडेनाड यात सामान्यतः कोल्हापूर जिल्ह्याचा प्रदेश अंतर्भूत होत होता, असे दिसते.

वाचन[1]

१ **सिद्धम्[2] [।*] श्रीमत्परमगंभीरस्याद्वादामोघलांछनं(नम्) [।*] जीयात्त्रै-**

२ **लोक्यनायस्य शासनं जिनशासनं(नम्)[3] ॥[१॥*] सततं त्रिभुवनचं-**

३ **द्र व्रतिपरनीनागचंद्रसैद्धान्तिगरं [।*] नुतविबुधबाळचंद्र-**

४ **व्रतिपोत्तमरं धरातळं बण्णिसुगुं[4] ॥[२॥*] धरेगेल्लं तन्न पेंपगळिसे गुरु-**

---

१ मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून. २ चिह्नाने प्रदर्शित.
३ वृत्त – अनुष्टुभ्. ४ वृत्त – कंद.

५ जनाम्नायसद्धर्म्मरक्षापरनादं [दा]नियादं चतुरचरितनादं सु-

६ सैद्धान्तिकाग्रेस्सरनादं बाळचंद्रव्रति यतितिळकं भाप्पु विख्यात-

७ कोल्लापुरतीर्थाधीशचंद्रप्रभजिनभवनाचार्य्यनाचार्य्यवर्य्यं[1] ॥[३॥*]

८ सुरतरुगे शाखे निमिर्दंकुरिसिदौर्डेबन्ते बाळचन्द्रमुनींद्रा[।*]-भरणर्ग्गे शिष्य-

९ नेसेदं परहितनौदार्य्य शान्तिवीरमुनींद्रन्[2] ॥[४॥*] सुरतरुवं पळं-चले-

१० वुतिर्प्पुदु दानदर्पेंपु लोकदोळ् शरदमळोद्‌घ वं नगुतमिर्प्पुदु कीर्त्ति-

११ य कोर्ब्बुनिच्चलुं [।*] गिरिवरनाथनोळ्सेणसुतिर्प्पुदु धैर्य्यद बण्पेनल्के

१२ तां धरेगतिसेव्यनादनतिचारुगुणोत्करवार्द्धि नेमणं[3] ॥[५॥*] अतिशय शीळ-

१३ दोळ्विनुत सीतेगे पासटि चारुरूपिनोळ् रतिगनुसा[ठि] तां सुभागिनोळ्गिरि-

१४ जाते[गे] तोडु भोगदु [।*]न्नतिकेयोळिन्द्रकान्तेगे समं सलेयेन्दु मनोनुरागदिं [स्तु]-

१५ तियिसुतिर्प्पुदी धरणि नेमन कामिनि मैलियक्कनं ॥[६॥*] स्वस्ति [।*] समस्तप्रश-

१६ स्तिसहितं जीमूतवाहनान्वयप्रसू[तं] खचरचक्रवर्त्ति शिलाहारन-

१७ ने[न्द्रं] मंडळिक डंगेयबर्म्म सप्तांगराज्यलक्ष्मीस्वीकृत मंडलिक-त्रिणेत्र शिळा-

१८ हारवंशप्रागुत्पंन्न[4] भोजदेवप्रभृतिक्षत्रियराज्यलक्ष्मीप्रतिदिनप्रवर्द्ध-मान-

१९ गण्डरादित्यदेवर् वळवाडद नेलेवीडिनल्सुखसंकथाविनोददिं राज्यं गेय्युत्त-

---

१ वृत्त – महास्रग्धरा. २ वृत्त – कंद.

३ या व पुढील श्लोकाचे वृत्त – चम्पकमाले. ४ 'प्रागुत्पन्न' वाचावे.

२० मिरल् शकवर्ष १०४० नेय विळंबिसंवत्सरद सोमग्रहणपर्व्व-
निमित्त–

२१ मागि येडेनाडबळिय वगुबनहें.र्.लगेयल् नेमगावुंडं माडिसिद

२२ बसदिगे नागलदेवियर पेळिकेयिंदेडेनाडल् मत्तन्क्केय्युमेरडु
बावि–

२३ य नडुवे देवरिगे पूदोंटमुमं कोल्लापुरद तीर्त्थद बसदियाचार्य्यर्

२४ शान्तिवीरसिद्धान्तदेवर कालं कर्चिच धारापूर्व्वकंमाडि सर्ब्ब(र्व्व)-
नमस्यमागि कोट्ट–

२५ द.र् शी(सी)मासंबंधमेंतेंदडाग्नेयद देसेयल् नट्टकल्लु नैरित्यद
देसेयल्–

२६ हळ्ळदिं मूडल् नट्टकल्लु वायव्यद देसेयल् बडगणिन्दं बंद हळ्ळद
मूड–

२७ लु ईशान्यदल् नट्टकल्लिन्तु चतुराघाटशुद्धि[1] [।*] न विषं
विषमित्याहु[ः*][दे–]

२८ देवस्वं विषमुच्चय(च्य)ते[।*] विषमेकाकिनं हन्ति । देवस्वं
पुत्रपौत्रकं(कम्)[2] ।।[७।।*] स्वद–

२९ त्तं(त्तां) परदत्तं(त्तां) वा यो हरेत वसुंधरां(राम्) । षष्टिर्व्वर्ष-
सहस्राणि[3] विष्ठायां

३० जायते क्रिमिः[4] ।।[८।।*] मंगळमहाश्री[ः*] श्री[ः।*] श्री-
[ः।*]

भाषांतर

(श्लो. १) परम गंभीर असा स्याद्वाद ज्याची सदैव विजयी होणारी खूण आहे असा त्रैलोक्यनाथ जिनाचा धर्म विजयी होवो !

(श्लो. २) हे जग **त्रिभुवनचन्द्र**, **नागचन्द्र सैद्धान्तिक** आणि बुध जनांनी प्रशंसिलेला मुनिश्रेष्ठ **बालचन्द्र** यांची सदैव प्रशंसा करीत असते.

---

१ येथे एक चक्राकार चिन्ह आहे.

२ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

३ 'षष्टि वर्षसहस्राणि' वाचावे. ४ 'क्रमिः' वाचावे.

(श्लो. ३) आचार्यांमध्ये श्रेष्ठ आणि मुनींचे भूषण असा, चन्द्रप्रभ जिनालयाचा आचार्य, आणि सुप्रसिद्ध कोल्लापुर तीर्थाचा प्रभु **बालचंद्र** व्रती सर्व जगताला व्यापून टाकणाऱ्या आपल्या माहात्म्याने आपल्या पूर्वीच्या श्रेष्ठ मुनींच्या सद्धर्मपालनात, दातृत्वात आणि सच्छीलात व्यापृत असे; आणि (त्या योगे) तो सैद्धान्तिकांत श्रेष्ठ झाला.

(श्लो. ४) स्वर्गीय वृक्षाला मोठी शाखा फुटावी त्याप्रमाणे बालचन्द्राचा शिष्य, मुनींचे भूषण असा परोपकारी आणि उदार **शान्तिवीर** मुनीन्द्र शोभत होता.

(श्लो. ५) विपुल सद्‌गुणांचा सागर, ज्याचे दातृत्व सुरतरूशी जणु काय स्पर्धा करीत होते, ज्याची कीर्ति अभिमानाने शरद् ऋतूतील स्वच्छ आकाशाला हसत होती, ज्याचे महान धैर्य गिरिश्रेष्ठाशी जणू काय चढाओढ करीत होते तो **नेमण** सर्व जगताला पूज्य होऊन गेला.

(श्लो. ६) नेमणाची पत्नी **मैलियक्का** ही चारित्र्यात सीतेसारखी, सौंदर्यात रतीसारखी, सौभाग्यात पार्वतीसारखी आणि भोगैश्वर्यांत शचीसारखी आहे, अशी प्रशंसा (सर्व) जग प्रेमाने करीत आहे.

(ओ. १५–२०) जीमूतवाहनाच्या वंशात जन्म पावलेला, खचरवंशी सम्राट्, शिलाहार नृपति, मंडलिक डंगेयवर्म, सप्तांगराज्यलक्ष्मी प्राप्त करून घेतलेला, मांडलिकांमध्ये भगवान् शिवासारखा, शिलाहारवंशात पूर्वी जन्म पावलेल्या भोजदेवादिकांची क्षत्रियराज्यलक्ष्मी प्रतिदिन वृद्धिगत करणारा, सर्वपदवीविभूषित **गंडरादित्य वळवाड** येथे सुखसंवादाने मनोविनोदन करीत राज्य करीत असता–

(ओ. २०–२१) शक संवत् १०४०, विलंबि संवत्सर, चन्द्रग्रहण–पर्वणीप्रसंगी

(ओ. २१–२४) नागलदेवीच्या आदेशावरून, **नेमगावुंड** याने **एडेनाड** मधील **वगुबण-हेरिळगे** येथे बांधविलेल्या बसदीकरिता **कोल्लापुर** तीर्थाचे आचार्य **शान्तिवीर** सिद्धान्तदेव यांचे पादप्रक्षालन करून सर्व करांपासून मुक्त अशा एक मत्तर भूमीचे आणि दोन विहिरींच्या मध्ये असलेल्या बगीच्याचे दान उदकधारापूर्वक करण्यात आले.

(ओ. २४–२७) त्याच्या चतुःसीमा अशा – आग्नेयेस बसविलेली शिला; नैर्ऋत्येस ओहोळाच्या पूर्वेस बसविलेली शिला; वायव्येस उत्तरेकडून वाहत असलेल्या ओहोळाची पूर्वसीमा; ईशान्येस बसविलेली शिला – याप्रमाणे सीमा निश्चित केल्या आहेत.

(यानंतर शापात्मक श्लोक व मंगल वाक्य आले आहे.)

क्र. ४८

गंडरादित्याचा कोल्हापूर ताम्रपट : शक संवत् १०४८

हा **ताम्रपट कोल्हापुरातील** खासबाग मैदान सपाट करताना कांही वर्षीपूर्वी सापडला होता. तो आता तेथील राजाराम कॉलेजच्या संग्रहालयात ठेवला आहे.[१]

या ताम्रपटाचे ११ इं. लांब आणि ७½ इं. रुंद असे **तीन पत्रे** आहेत. ते एका कडीत अडकवले असून तिला **गरुडमुद्रा** जोडली आहे. शेवटच्या पत्र्याच्या बाहेरच्या बाजूवर गाय, शिवलिंग, तरवार, चंद्र आणि सूर्य यांच्या आकृत्या आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे. तीत कांही कन्नड शब्द, उ. मगिल, मळव आणि कुरुप असे, मिसळले आहेत.

राजवंशावळ – प्रस्तुत ताम्रपट **शिलाहारवंशी** महामण्डलेश्वर **गण्डरादित्य** याच्या काळचा आहे. लेखाच्या आरंभी चालुक्यांच्या कोरीव लेखांतील विष्णूच्या वराह अवताराच्या वर्णनात्मक मंगल श्लोक लिहिला आहे. त्यावरून गंडरादित्याने उत्तरकालीन चालुक्यांचे स्वामित्व मान्य केल्याचे सूचित होते.

नंतर गंडरादित्याची पुढील **वंशावळ** दिली आहे – प्रथम **जतिग** – त्याचा पुत्र **नायिवर्मा**, त्याचा पुत्र **चंद्रराज – द्वितीय जतिग** – त्याचा **ज्येष्ठ पुत्र गोंकल्ल** – त्याचा भाऊ **(प्रथम) गूहलेश** – त्याचा **धाकटा भाऊ कीर्तिराज–चंद्रादित्य–गोंकलाचा पुत्र मारसिंह–द्वितीय गूहल**–त्याचा **पुत्र भोजदेव–गूहलाचा धाकटा भाऊ गंडरादित्य** ही वंशावळ इतर ताम्रपटातल्याप्रमाणे आहे, पण हीत गोंकलाचा भाऊ चंद्रादित्य याचे नाम प्रथमच आले आहे आणि भोजाचा भाऊ बल्लाळ याचे नाव गाळले आहे. याचे कारण असे दिसते की जरी कोरीव लेखांत द्वितीय जतिग आणि मारसिंह यांच्या अनेक पुत्रांची नावे आली असली तरी ते सर्व गादीवर आले होते असे नाही.[२] त्यांपैकी कांहींना राज्यातील प्रांतांचे अधिपति नेमले असावे. म्हणून वंशावळी देताना कांहींची नावे गाळलेली दिसतात.

---

१ ए. इं., व्हॉ. २३, पृ. २८ इ.

२ डॉ. रा. गो. भांडारकरांनीहि गोंकलाचे सर्व पुत्र गादीवर आले नसावे, असे म्हटले आहे.

उद्देश – प्रस्तुत ताम्रपटाचा **उद्देश** गंडरादित्याने अमात्य **मैलपैय** याच्या विनंतीवरून **मिरिंजि देशातील कोडवल्लि खंपणाच्या** (तालुक्याच्या) **कौंनिजवाड** गावातील दोन निवर्तने जमीन बारा ब्राह्मणांच्या निवासस्थानाकरिता आणि उपजीविकेकरिता तसेच **ब्रह्मपुरीतील खेडादित्याचे** तीन शिखरी देवालय सुस्थितीत राखण्याकरिता दिली, हे नमूद करण्याचा होता. ही जमीन **राजय** आणि **सेनय** या **नागगावुंडा**कडून विकत घेतली होती. पूर्वोक्त अमात्याने त्याच गावातील आपली चार निवर्तने जमीन घालून ते दान सहा निवर्तनांचे केले हे निवर्तन **कुंडि**देशातील दंडाने मोजावयाचे होते.

मैलपैय्य अमात्याने खेडादित्याच्या देवळाचा जीर्णोद्धार करून त्याला आणखी दोन गाभाऱ्यांची जोड दिली आणि अशा रीतीने ते देवालय तीनशिखरी करून त्यात**ब्रह्मा** आणि **विष्णु** या देवांची स्थापना केली दान देण्याच्या वेळी गंडरादित्याच्या मुक्काम **वल्लवाड** येथे होता. पण प्रस्तुत लेखात असेहि म्हटले आहे की हे दान खेडादित्याच्या समक्ष दिले. राजा त्याकरिता तेथे गेला असावा.

कालनिर्देश – प्रस्तुत ताम्रपटातील दान गत **शक संवत् १०४८, पराभव संवत्सर, आषाढ शुक्ल चतुर्थी, शनिवार** रोजी झालेल्या **दक्षिणायन संक्रान्तीच्या** प्रसंगी दिले होते. ही मिति बरोबर जुळते. तिची इंग्रजी तारीख २६ जून सन ११२६ येते.

स्थलनिश्चय – **मिरिंजि** म्हणजे मिरज हे मागे सांगितले आहेच. **ब्रह्मपुरी** हे पंचगंगेच्या काठी कोल्हापूरचे उपनगर असून अजून आपल्या प्राचीन नावाने ज्ञात आहे. पुष्कळ वर्षांपूर्वी तेथे पुरातन अवशेषांचा करंडक व नाणी सापडली होती. अलीकडे केलेल्या उत्खननावरून त्या स्थलाचे प्राचीनत्व सिद्ध झाले आहे. **कोडवल्लि** हे कोल्हापूरच्या पूर्वेस सात मैलांवरचे कोडोली होय. **कौंनिजवाड** हे भूधरगड तालुक्यातील **कोनवडे** असावे. राजाच्या शिबिराचे **वल्लिवाड** याची अनेक समीकरणे सुचविली आहेत.[1] कोल्हापूरच्या नैर्ऋत्येस १६ मैलांवरचे वळवडे, सातारा जिल्ह्यातील वाळवे, कोल्हापुरच्या पूर्वेस ५ मैलांवरचे वळिवडे अशी विविध समीकरणे संशोधकांनी प्रतिपादिली आहेत. त्यांपैकी शेवटचे कोल्हापूरजवळे वळिवडे जास्त संभवनीय वाटते. कोल्हापूर ही मुख्य राजधानी होती. तेथे शिलाहारांचे अनेक शिलालेख सापडले आहेत. **वळिवडे** हे तत्कालीन राजांचे राजधानीजवळचे ग्रामीण भागातील शिबिर दिसते. तेथे प्राचीन अवशेष नाहीत[2] हे खरे, पण त्याचे कारण ती मुख्य राजधानी नव्हती. ग्रामीण भागातील राजाचे निवासस्थान होते हे होय.

---

१ इं. क., व्हॉ. २, पृ. ४१८, टीप २ पाहा.

२ ए. इं., व्हॉ. २७, पृ. १७९.

ओळ वाचन[1]

पहिला पत्रा

१ स्वस्ति श्री[ः।*] जयत्याविष्कृतं विष्णोर्वाराहं क्षोभितार्णवं-(वम्) [।*] द[क्षि]णोंन(णोन्न)नतदंष्ट्राग्रविश्रांतभुवनं

२ बपुः[2] [।।१।।*] आसीद्विधाधरः पूर्वं नान्मा(म्ना) जीमूतवाहनः [।*] परार्थं जीवितं येन गरुडाय

३ निवेदितं(तम्) । [।२।।*] शिलाहाराख्यवंशोयं तगरेश्वरभूभृतां-(ताम्) [।*] तद्वंशे जतिगो नाम जा-

४ तो भूभृच्छिखामणिः ।[।३।।*] स्वस्ति श्रीजतिगक्षितीशतनयो नायिम्मनामा नृ-

५ पः पुत्रस्तस्य च चंद्रराट्पृथुयशास्तस्यापि सूनुः किल [।*] संजातो जतिगो

६ जगज्जननुतः श्रीमांश्च तंनंदनो[3] गोंकल्लो भुवि भूमिपालति-

७ लकस्तस्याप्यभूदग्रजः[4]।[।४।।*] गूहलेशोथ तद्भ्राता कीर्त्ति-राजोनुजो

८ स्य च [।*] चंद्रादित्यस्ततस्तस्य चक्रे राज्यमकंटकं(कम्)[5] । [।५।।*] श्रीमद्गोंकलभू-

९ मिपालतनयः श्रीमार्रासहो नृपस्तत्सूनुर्न्नृपमौल्लि(लि)लालितप-

१० दश्रीगूहलाख्यो नृपः [।*] तद्भ्राता भूवि भोजदेवनृपतिर्वैरीभ-पंच्चा(चा)-

११ ननश्चक्रे राज्यमखंडितं पृथुयशा लंक(के)शतुल्यं किल[6]।[।६।।*] तस्यानुजो ध-

१२ र्म्मधरो धरित्र्यां दधार वर्ण्णानखिल्ला(ला)न्स्वधर्म्मे । धैर्याग्र-धुर्यो धनदो धनानां

---

१ ए. इं., व्हॉ. २३, पृ. ३० व ३१ मधील छापांवरून.

२ या व पुढील दोन श्लोकांचे वृत्त – अनुष्टुभ्.

३ 'तन्नन्दनो' वाचावे. ४ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

५ वृत्त – अनुष्टुभ्. ६ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१३ श्रीगंडरादित्य इति प्रसिद्धः[१] ।[।७।।*] दीनानाथदरिद्रदुःखिवि-कल्ल(ल)व्याकीर्णनाना-

१४ विधप्राणित्राणपरायणः प्रतिदिनं गुप्ताख्यदानेन यः [।*] यः कृष्णाजिनधे-

१५ नुभूम्युभयतोमुख्यादिदानप्रदः शश्वद्व्र(द्ब्र)ह्ममतिप्रवीणहृदयो भूदेवक-

१६ ल्पद्रुमः[२] ॥[८॥*] स्वस्ति समधिगतपंचमहाशव्द(ब्द)महामंडले-श्वरस्तगरपुर-

१७ वराधीश्वरः श्रीसिलाहारनरेंद्रो जीमूतवाहनान्वयप्रसूतस्सुवर्ण्णग-

१८ रुडध्वजो मरुवंकसर्प्पः[३] अय्यनसि(सिं)हो रिपुमंडलिकभैरवो विद्विष्टगजकंठीरव

१९ इडुवरादित्यो रूपनारायणः शनिवारसिद्धिर्गिरिदुर्ग्गलंघनः कलि-युगविक्रमा-

२० दित्यः श्रीमहालक्ष्मीलव्ध(ब्ध)वरप्रसादादिसमस्तराजावली-विराजित-

२१ श्रीमन्महामंडल्ले(ले)श्वरो गंडरादित्यदेवो दुष्टनिग्रहशिष्टप्रति-पाल्ल(ल)-

२२ नपुरस्सरं स्वधर्म्मेणैकच्छत्रमुपभुंजानो वल्लवाडग्रामे वीडानुवृ-

२३ त्या(त्त्या)[४]सुखसंकथाविनोदेन विजयराज्ज्यं(ज्यं) चिरं कुर्वन् विराजते [।*] तत्पा-

२४ दपद्मोपजीविमहाप्रधानेन कडितामात्यमैल्लपय्येन महातीर्थे-

---

१ वृत्त – उपजाति. २ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

३ 'मरुवक्कसर्प्पः' वाचावे.

४ डॉ. आ. ना. उपाध्ये यांनी दाखविले आहे की बीडानुवृत्त्या (कन्नड बीडिनोळ्) याचा अर्थ 'शिबिरातील रूढीस अनुसरून' असा आहे.

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

२५ श्रीकोल्लापुरे व्र(ब्र)ह्मनिर्मितव्र(ब्र)ह्मपुर्यां श्रीखेडादित्यदेवस्स्य-(स्य) जीर्णप्रासा–

२६ दसमुध्ध(द्ध)रणपुरस्सरं त्रिकूटप्रासादं विनिर्म्माय तत्र व्र(ब्र)-ह्मविष्णू प्र–

२७ तिष्ठाप्य तत्र धर्म्मचिकीर्षया विज्ञापितश्रीगंडरादित्यदेवस्तदधिग-म्म्य(म्य)

२८ शकवर्षेषु सहस्त्रोपर्य्यष्टाचत्वारिंशति गतायां वर्त्तमानपराभवसंव-त्स–

२९ रांतर्ग्गताषाढशुक्लचतुर्थ्यां शनिवारे दक्षिणायनसंक्रांतौ मिरिंजि-देशां–

३० तर्ग्गतकोडवल्लिखंपणानुर्वात्तिनि कोंनिजवाडग्रामे तत्रत्यनार्गा–

३१ वुंडराजयसेनयाभ्यां नार्गावुंडसाम्यभूतं कूं(कुं)डिदंडेन निवर्त्त-

३२ नद्वयं मान्यं चतुर्विशतिहस्तविस्तरं मगिलमष्टभोगतेजसाम्यं च क्रयेणादाय

३३ ग्रामभूमिमध्ये तेनैव दंडेन चत्वारि निवर्त्तनानि निक्षिप्य षण्निवर्त्त-नानि मान्यं कृत्वा त–

३४ त्प्रतिव(ब)ध्धं(द्धं) मल्लवं कुत्रुवं[1] च कृत्वा चतुर्विशति-हस्तविस्तरं निवेशनं अन्यदष्टाचत्वारिंशध्धस्तवि–

३५ स्तरं निवेशनं चेत्येवं द्वासप्ततिहस्तविस्तरं मगिलं चेत्येतत्सर्व-नार्गावुंडं साम्यं कृत्वा तन्म–

३६ ध्ये व्र(ब्र)ह्मपुर्यां श्रीखेडादित्यदेवसन्निधौ द्वादशानां व्रा(ब्रा)ह्म-णानां श्वेतव्रीह्योदनेन आढक्यादिसूपेन घृ–

तिसरा पत्रा

३७ तेन तक्रेण चतुर्भिः शाकैश्च भोजनाय तांबूलाय च तेनैव दंडेन मान्यं निवर्त्तनद्वयं

---

१ हे दोन शब्द पुढे ३८ व्या ओळीत मलवं आणि कुरुवं असे लिहिले आहेत.

३८ मलवं च कुरुवं च मगिलमध्ये चतुर्व्विंशतिहस्तविस्तरं निवेशनं च अष्टभोगतेज–

३९ साम्यं चेत्येतत् तथा तत्सर्व्वधर्म्मप्रचिन्तकाः गौतमगोत्रा गंगाधर-चतुर्व्वेदिभट्टोपाध्या–

४० याः भारद्वाजगोत्रा गोविन्दक्रमविदः अत्रिगोत्रा भास्करचतुर्व्वे-दिनः जामदग्न्य–

४१ वत्सगोत्रा नारायणभट्टाः भारद्वाजगोत्रो माधवः काश्यपगोत्रो वामनः धनंज–

४२ या(य)गोत्रा विष्णुभट्टाः भारद्वाजगोत्रो वामनः एवमष्टौ व्रा-(ब्रा)ह्मणाः तेभ्यः प्रत्येकं

४३ तेनैव दंडेन वप्पकशतचतुष्टयं मगिलमध्ये प्रत्येकं षड्हस्तविस्तरं निवे–

४४ शनं च तथा तत्रि(त्त्रि)कूटप्रासादस्य खंडस्फुटितजीर्णोद्धाराय तेनैव दंडेन वप्पकशतचतु–

४५ ष्टयं(यम् ।) एवमेतत्सर्व्वं पादप्रक्षालनधारापूर्व्वकं सर्व्वनमस्यं सर्व्ववा(बा)धापरिहारं सर्वायविशु–

४६ द्धं राजकीयानामनंगुलिप्रेक्षणीयं[1] आचंद्रार्क्कं दत्तवान् । एतत्सर्व्व-धर्म्मगोप्तारो व्र(ब्र)ह्मपुरि(री)–

४७ महाजनाः । व(ब)हुभिर्व्वसुधा दत्ता राजभिः सगरादिभिः यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तदा फलं(लम्)[2] ॥[९॥*] स्वद–

४८ त्तां परदत्तां वा यो हरेत वसुंधरां(राम्) । षष्टिर्व्वर्षसहस्राणि[3] विष्ठायां जायते क्रि(कृ)मिः ॥ मंगलं महाश्रीः [।*]

---

१ येथे 'अनङ्गुलिप्रक्षेपणीयम्' असे अपेक्षित आहे. 'सर्वराजकीयानामहस्त-प्रक्षेपणीयम्' हे वलभीच्या मैत्रकांच्या अनेक ताम्रपटांत येते ते पाहा. इं. अँ., व्हॉ. ६, पृ. १६ इ. २ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

३ 'षष्टि वर्ष–' वाचावे.

क्र. ४९

गंडरादित्याचा कोल्हापूर शिलालेख : शक संवत् १०५८

या लेखाची **शिला कोल्हापुरात** शुक्रवार वेशीजवळ पार्श्वनाथ तीर्थंकराच्या मंदिरासमोरच्या अंगणात उजव्या बाजूस ठेवली आहे.[१] तिच्या शीषभागी मध्ये मांडी घालून बसलेला जिन, त्याच्या डाव्या बाजूस तशीच हात वर केलेली जिनाची आकृति, पलीकडे कुंभ, जिनाच्या उजव्या बाजूस गाय व तिचे वासरू आणि त्यांच्या वरील भागी सूर्य व चंद्र कोरले आहेत.

अक्षरवटिका जुन्या कन्नड लिपीची व **भाषा** आरंभी - जिनस्तुतिपर श्लोकाची – संस्कृत,[२] आणि नंतरच्या भागाची जुनी कन्नड आहे. त्यामध्ये व्यवहारातले अनेक जुने कन्नड शब्द आले आहेत.

विषय – प्रस्तुत लेख शिलाहारनृपति महामण्डलेश्वर **गण्डरादित्य** याच्या काळचा आहे. त्यात इतर कोरीव लेखांतल्याप्रमाणे त्याची बिरुदे आली आहेत. **तो वळवाड** येथे आपल्या स्थायी शिबिरात सुखसंवादात आपले मनोविनोदन करीत असल्याचे वर्णिले आहे नंतर त्याचा सामन्तशिरोमणि **निंबदेव** याचे वर्णन आले आहे. त्याने 'पंचमहाशब्द' प्राप्त करून घेतले होते. तो **गंडरादित्याचा** अगदी उजवा हात होता. त्याने **तोंड** देशाच्या सामन्तांवर विजय मिळविला होता. तो अत्यंत धर्मनिष्ठ जैन असून त्याने **पद्मावती देवीचा** वर मिळविला होता, असे त्याच्याविषयी म्हटले आहे.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा **उद्देश** निंबदेवाने **कवडेगोल्ल** येथे बांधलेल्या[५] पार्श्वनाथाच्या मंदिरातील अष्टोपचार पूजा,[३] देवालयाची दुरुस्ती, आणि त्यात राहणाऱ्या मुनींना अन्नसंतर्पण या करिता **वीरवणंज** या व्यापारी श्रेणीने, कांही व्यापारी आणि **कोल्लापुर, मिरिंजे, तोरम्बगे, मयिसिगे, बळेयवट्टन, कवडेगोल्ल** इत्यादि नगरांचे प्रतिनिधि, तसेच **गण्डरादित्याचा** राजश्रेष्ठी, मण्डलेश्वराचा (निंबदेवरसाचा) कारभारी, **कुंडिपट्टनातील** देवालयाचा प्रमुख, यांच्या

---

१ *Ep. Ind.*, Vol. XIX, p. 31.

२ हा श्लोक जैन ग्रंथ इर्युपथ यांतून घेतला आहे. इं. अॅ., व्हा. १२, पृ. २१, टीप १३.

३ अष्टोपचार म्हणजे जल, चन्दन, पुष्पे, अक्षता, धूप, दीप, नैवेद्य आणि तांबूल यांनी पूजा.

संमतीने (बहुधा कवडेगोल्ल येथे) बाजारातील वस्तूंवर बसविलेले कर नमूद करणे हा आहे. हे कर रोख नाण्यांत किंवा विकलेल्या पदार्थांत, त्यांच्या वजनावर किंवा मापावर, गाड्यांतून किंवा डोक्यावरून वाहून आणलेल्या अन्नधान्यांवर तसेच फलांफुलांवर बसविले होते. दुसरे कांही कर तेथे केलेल्या आणि कापड-व्यापारी, सोनार, सुतार आणि कुंभार यांच्या दुकानांत विकल्या जाणाऱ्या पदार्थांवर बसविले होते.

हे दान **कोल्लापुरातील रूपनारायण** नामक जैनमंदिराचा आचार्य, **मूलसंघातील देशीयगणाच्या पुस्तकगच्छाचा श्रुतकीर्ति त्रैविद्यदेव**[१] याला दिले होते. हे मंदिर पूर्वोक्त निम्बदेवानेच बांधले होते आणि त्याला त्याने आपला राजा गण्डरादित्य याच्या ‘ रूपनारायण ’ बिरुदाचे नाव दिले होते, असे इतर लेखांवरून[२] कळते. हे जैनमंदिर म्हणजे कोल्हापूरच्या शुक्रवार वेशीजवळची पार्श्वनाथवसति होय.

कालनिर्देश – प्रस्तुत लेखाचा काल **शक संवत् १०५८, राक्षस संवत्सर, कार्त्तिक कृष्ण पञ्चमी, सोमवार** असा आहे. कोल्हापूर प्रदेशातील इतर कांही लेखांतल्या प्रमाणे प्रस्तुत शक वर्ष ‘ वर्तमान ’ घेतले पाहिजे तरच ते राक्षस संवत्सराशी जुळेल. त्यावर्षी अमान्त कार्त्तिक कृष्ण पञ्चमी मध्यममानाने सोमवारी सूर्योदयानंतर एक तास तीस मिनिटांनी सुरू झाली. तिची इंग्रजी तारीख २८ ऑक्टोबर सन ११३५ येते.

कवडेगोल्ल येथील बाजारात विकल्या जाणाऱ्या पदार्थांवर कर बसविण्यास ज्यांनी संमति दिली त्यांमध्ये **अय्यावोळे** (किंवा अहिच्छत्र) येथील **वीरवणंज** नामक व्यापाऱ्यांची श्रेणि प्रमुख होती. प्रस्तुत लेखात या श्रेणीची प्रदीर्घ प्रशस्ति आली आहे. तिच्यामध्ये ५०० **स्वामी** (हे बहुधा तिचे मूळचे सभासद असावे), तसेच गवरे, गद्रिगे, सेट्टि, सेट्टिगुत्त, गामण्ड आणि गामण्डस्वामी यांचा समावेश होता. त्यांचे शौर्य, तसेच सत्यवादित्व, प्रामाणिकपणा, विशुद्ध आचार, दातृत्व यांबद्दल त्यांची प्रशंसा केली आहे. आपण वसुदेव, खण्डलि, आणि मूलभद्र यांच्या वंशात

---

१ तेरदाळ येथील शक संवत् १०४५ च्या शिलालेखात आणि श्रवण बेळगोळ येथील एका लेखात (क्र. ३९) श्रुतकीर्ति त्रैविद्याला कोल्हापूरच्या रूपनारायण मंदिराचा भट्टाचार्य माघनंदी सिद्धान्तदेव याचा शिष्य म्हटले आहे. तो माघनंदीनंतर रूपनारायण मंदिराचा भट्टारक झाला.

२ तेरदाळ शिलालेखाच्या (शक संवत् १०४५) ओ. ६४ मध्ये कोल्हापूरचे रूपनारायण मंदिर सामन्त निंबदेवाने बांधले होते, असे स्पष्ट म्हटले आहे. इं. अँ., व्हॉ. १४, पृ. १९.

जन्मलो असून आपणांस भगवती देवीचा वर प्राप्त झाला आहे असे ते अभिमानाने सांगत. त्यांच्या निशाणावर टेकडीचे चित्र असे[1] आणि त्यांनी अनेक झगड्यांत विजयश्री प्राप्त करून घेतली होती. ही व्यापारी श्रेणि प्राचीन काळी सुप्रसिद्ध होती आणि तिचा व्यापार केवळ भारताच्याच भिन्न भिन्न प्रांतांशी नव्हे तर सयाम, सुमात्रा, ब्रह्मदेश, श्रीलंका इत्यादि परदेशांशीहि चालत असे.[2] त्या प्रदेशांत या 'पांचशे' व्यापाऱ्यांचा उल्लेख असलेले तामिळ भाषेतील लेख सापडले आहेत. त्यांवरून आपण सहा द्वीपांत प्रवेश केला आहे ही त्यांची बढाई पोकळ नव्हती, हे दिसून येईल.

स्थलनिश्चय – वळवाडाचे स्थान मागे निश्चित केले आहे. ज्या ठिकाणी निंबदेवरसाने बांधलेले पार्श्वनाथ मंदिर होते आणि ज्यातील बाजारात पूर्वोक्त कर बसविले जात ते **कवडेगोल्ल** कोल्हापूरपासून फार दूर नसावे; कारण प्रस्तुत लेखातील दान कोल्हापूरच्या रूपनारायण वसतीचा आचार्य श्रुतकीर्ति त्रैविद्य याला दिले होते. कवडेगोल्लाचा पत्ता अद्यापि कोणी लावला नाही; पण ते बहुधा कोल्हापूर जिल्ह्याच्या शिरोळ तालुक्यातील कवडेगुलंद असावे. **अय्यावोळे** हे विजापूर जिल्ह्यातील सध्याचे ऐहोळे होय. **मिरिंजे** आणि **कुंडिपट्टन** याविषयी पूर्वी लिहिले आहे. **तोरंबगे** हे राधानगरी तालुक्यातील तुरंबे होय. बार्नेटने **बळेयवट्टन** हे मलबार जिल्ह्याच्या विरक्कल तालुक्यातील बळियपट्टन असावे असे म्हटले आहे, पण ते फार दूर आहे. त्यापेक्षा ते दक्षिण कोकणातील शिलाहारांची राजधानी बलिपत्तन (सध्याचे खारेपाटण) असणे जास्त संभवनीय आहे. **मयिसिगेचा** पत्ता लागत नाही.

वाचन[3]

ओळ

१ **सिद्धम्**[4] **[।*] श्रीमत्परमगंभीरस्याद्वादामोघलांछनं(नम्) [।*] जीवात्त्रैलोक्यनाथस्य शासनं जिनशासनं(नम्)**[5]**।।[१।।*] स्वस्ति [।*]समधिगतपञ्चमहाशब्दमहाम–**

---

१ 'गुड्डध्वज' या शब्दावरून कांहींनी वीरबणंज हे जैनधर्मी होते, असे प्रतिपादिले आहे, कारण गुड्ड हा शब्द 'जैनधर्मी शिष्य' किंवा 'गृहस्थ' या अर्थी योजण्यात येतो. प्रा. का. बा. पाठक यांनी असे दाखविले आहे की बहुधा सर्व तीर्थंकर गिरिशिखरावर निर्वाण प्राप्त करते झाले. म्हणून 'गुड्ड' किंवा टेकडी हिचे चिह्न जैनधर्मात पूज्य मानले आहे.

२ हि. क. इं. पी., व्हॉ. ५, पृ. ५२६.

३ मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापांवरून.

४ चिह्नाने प्रदर्शित. ५ वृत्त – अनुष्टुभ्.

२ ण्डलेश्वरं ।[१] तगरपुरवराधीश्वररं श्रीशिळाहारनरेन्द्रं । जीमूतवाहनान्वयप्रसूतं । सुवर्ण्णगरुडध्वजं मरेवोक्कसर्प्पं[२] । अय्यन-

३ सिंगं । रिपुमंडळिकभैरवं । विद्विष्टगजकण्ठीरवं । इडुवरादित्यं । रूपनारायणं । कलियुगविक्रमादित्यं । शनिवारसिद्धि गिरिदु-

४ र्ग्गलंघनं । श्रीमहालक्ष्मीदेवीलब्धवरप्रसादादिसमस्तराजावळीविराजितरप्प श्रीमन्महामडळेश्वरं गण्डरादित्यदेवरु वळवाडद ने-

५ लेवीडिनल्सुखसंकथाविनोर्ददिं राज्यंगेयुत्तमिरे । तत्पादपद्मोपजीवि समधिगतपञ्चमहाशब्दमहासामन्तं । विजयल-

६ क्ष्मीकान्तं । रिपुसामन्तसीमन्तिनीसीमन्तभंगं । वीरवारांगनाप्रियभुजंगं । वैरिसामन्तमेघविघटनसमीरणं । नागलदेविय गन्धवा-

७ रणं । विद्विष्टसामन्तविळयकाळं । सामन्तगण्डगोपाळं । दायादसामन्ततारासुरवीरकुमारं । सामन्तकेदारं । तोण्डसामन्तपुण्डरीक-

८ षण्डप्रचण्डमदवेदण्डं । गण्डरादित्यदेवदक्षदक्षिणभुजादण्डं । याचकजनमनोभिलषितचिन्तामणि । सामन्तशिरोमणि । जिनचरणसरसिरु-

९ हमधुकरं सम्यक्त्वरत्नाकरनाहाराभयभैषज्यशास्त्रदानविनोदं । पद्मावतीदेवीलब्धवरप्रसादं । नामाडि(दि)समस्तप्रशस्तिसहितं श्रीमन्महा-

१० सामन्तं । निंबदेवरसरु । कवडेळ्ळगोद बळिय सन्तेय मुद्गोडेयल्माडिसिद बसदियपार्श्वनाथदेवरष्टविधार्च्चनक्कमा बसदिय जीर्ण्णोद्धारक्क-

११ मल्लिल्प रि(ऋ)षिवयराहारदानक्कं । स्वस्ति [।*] समस्तभुवनविख्यातपंचशतवीरशासनकलब्धानेकगुणगणालंकृत सत्यशौचाचारचारुचरित्रनयविनय-

---

१ या व पुढील ओळींतील विरामचिह्ने निरर्थक आहेत.

२ हे बिरुद इतर कांही लेखांत ' मरुवंकसर्प ' असे येते. क्र. ४५ ओ. २१ पाहा.

१२ विज्ञान वीरबळंजधर्म्मप्रतिपाळनविशुद्ध गुडड्ध्वजविराजमानानून-साहसोत्तुंग कीर्त्यंगनालिंगित निजभुजोपार्ज्जितविजयलक्ष्मीनिवा-सवक्ष[:*]स्थलरुं

१३ भुवनपराक्रमोन्नत वासुदेवखण्डळीमूळभद्रवंशोद्भवरुं। भगवती-लब्धवरप्रसादरुं। तावु कादि सोलदरुं। मरुवक्कमारिगळुं। पर-स्त्रीपर–

१४ धनवर्ज्जितरुं चतुःषष्टिकळेगळोळ् प्रवींणरप्पुदरिं। ब्रह्मनन्नरुं। चक्रमुळ्ळुदरिं। नारायणनन्नरुं। दृष्टियोळ्नोडि कोल्वुदरिं। काळाग्निरुद्रनन्नरुं को–

१५ न्दरनूरसि कोल्वुदरिं। परशुरामनन्नरुं। तुळिदु कोल्वो(ल्वु)दरिं मदान्धगन्धसिन्धुरदन्नरुं। गिरिदुर्ग्गमं मरेवोक्करं तेगेदु कोल्वेडे-योळ् सिंहदन्नरुं

१६ पाताळमं पोक्करं कोल्वेडेयोळ् वासुगियन्नरुं आकाशडोळिद्दरं कोल्वेडेयोळ्गरुत्मनन्नरुं। पेंपिनल् पृथ्वियन्नरुं बिण्पिनल् कुलगि–

१७ रियन्नरुं। गुण्पिनल्महासमुद्रदन्नरुं। उद्योगडल् रामनन्नरुं। परा-क्रमदोळ् पार्त्थनन्नरुं। शौचदोळ् गांगेयनन्नरुं। साहसदोळ्भीम-नन्न–

१८ रुं। धर्म्मदल् धर्म्मपुत्रनन्नरुं। ज्ञानदल्सहदेवनन्नरुं। भोगद-लिंद्रनन्नरुं। त्यागदल्कर्ण्णनन्नरुं। तेजदलादित्यनन्नरुं। अहिच्छ-त्रमेनिसुवय्यवोळेपुरप–

१९ रमेश्वररुमप्पयनूर्व्वस्वामिगळुं गवरेयरुं। गात्रियरुं। सेट्टियरुं। सेट्टिगुत्तरुं। गामण्डरुं। गामण्डस्वामिगळुं। बीर–

२० रुं। बि(बी)रवणिगरुं। कोल्लापुरद बिलपाण[१]सेट्टियुं। गोविन्द-सेट्टियुं। कोमर अण्णमय्यनुं। मिरिंजेय बिज्जसेट्टियुं। बोप्पिसे–

२१ ट्टियुं। गण्डरादित्यदेवर राजश्रेष्ठि वेसपय्यसेट्टियरुं। आ मण्डळे-श्वरन बीडिन बम्मिसेट्टियुं। कुंडिपट्टणदादित्यगृह–

---

१ येथे बार्नेटने 'बिल्हण–' पाठ सुचविला आहे.

२२ द सासनिगं हेग्गडे रावसेट्टियुं । चौधोरे बोप्पिसेट्टियुं । तोरंबगेय प्रभु कन्नपय्यसेट्टियुं । मयिसिगेय काजगारु चौधो–
२३ रे गोरविसेट्टियुं । बळेयवट्टनड(द) शान्तिसेट्टियुं । अय्यवोळेय-नूर्व्वर सिंगं हालियसेट्टियुं । कवडेगोल्लद प्रभु खप्परय्यना–
२४ धि(दि)यागि समस्तदेशं नेरेदु । शकवर्षद सासिरदय्वत्तेंटनेय राक्षससंवत्सरद कार्त्तिकबहुळ पंचमी सोमवारदंदु श्रीमूलसंघ–
२५ देसी(शी)यगणपुस्तकगच्छद कोल्लापुरद श्रीरूपनारायणबस-दियाचार्य्यरप्प श्रीश्रुतकीर्त्तित्रैविद्यदेवर कालं कर्चिच । धारापू-
२६ र्व्वकमागि कोट्टायमेन्तेन्दोडे अडके हेरिंगे अय्वत्तु । जवळक्किर्प्पत्तु । हसरकय्दु । एले हेरिंगे नूरु । तेलेवोरेंगेय्वत्तु । हसरकिर्प्प–
२७ त्तय्दु । तुप्पमेण्णेयेंबिवु कोडक्के सोल्लगे सिद्दिगेगरवानं संगडि-गोम्मर्मानं दूसिगवसरक्कम्मक्कसालेगं होंगे हणं । हत्ति मळवेग–
२८ य्वलं भण्डिय कुरुसेय मळवेगेरडु बीसिगे । जवळक्के पलं पत्तु । लंकरोक्कलल्लि आरु तिंगलगे मणेतिविगे मरवियेंबिवोंदक्कुं । वर्षक्के मं–
२९ चवोंदक्कुं । अल्लवरिसिनं शुण्ठि बेळ्ळुळ्ळि बजे भद्रमुस्तेयेंबिवु मोदलागि तूगि मारुव भण्डंगळ्गे हेरिंगयवलं जवळक्किप्पलं हस–
३० रकोप्पलं जीरगे मेळसु सासवियेंबिवु हेरिंगोम्मानं जवळक्करवनं हसरक्के सोल्लगे । उप्पु मादलागि हडि(दि)नेंटु धान्यं–
३१ गळ्गं भंडिगे कोळगवोंदु हेरिंगे मानवेरडु तलेवोरेंगोम्मर्मानं बाडु कायेंबिवु भंडिगे हत्तु तलेवोरेंगे नाल्कक्कुं । भण्डिगे दण्डिगे वों[दु]
३२ सेवेय्दु हूटेयेरडक्कं दण्डिगे वोंडु(दु) सेवेयेरडु हूविन हेडलिगेगे माले वोन्दु कुंबररल्लि हसरक्के मडके वोंदु ॥ इन्तीया–
३३ यमनळिदातांते[1] बाणराशिकुरुक्षेत्रादि गळोळ् पञ्चमहापातकमं माडिद फळमकुं ॥ ❋ ❋

---

१ ‘ दातंगे ’ वाचावे.

भाषांतर

(**श्लो. १**) सिद्धि असो ! अत्यंत गंभीर अशा स्याद्वादाने वैशिष्टय पावलेल्या त्रैलोक्यनाथ जिनाच्या धर्मोपदेशाचा जयजयकार असो !

(**ओ. १–५**) स्वस्ति ! पञ्चमहाशब्द प्राप्त करून घेतलेला महामण्डलेश्वर, नगरांमध्ये श्रेष्ठ अशा तगराचा अधिपति, श्रीशिलाहारनृपति, जीमूतवाहनाच्या कुलात उत्पन्न झालेला, सुवर्णगरुडध्वज असलेला, शत्रूंना केवळ सर्पच, आपल्या पित्याला सिंहासारखा, विरोधी सामन्तांचा उच्छेद करणारा भैरव, शत्रूरूपी गजांना सिंहासारखा, धनुर्धाऱ्यांत आदित्य, स्वरूपांत नारायण, कलियुगातील विक्रमादित्य, शनिवारी (देखील) आपल्या कार्यांत सिद्धि मिळविणारा, श्रीमहालक्ष्मीचा वरप्रसाद मिळविणारा असा महामण्डलेश्वर **श्रीगंडरादित्यदेव वळवाड** येथील स्थायी शिबिरात सुखसंवाद करीत राज्य करीत असताना–

(**ओ. ५–११**) त्याच्या पदकमलांचा आश्रित, ज्याने पञ्चमहाशब्द प्राप्त करून घेतले आहेत असा महासामन्त, विजयलक्ष्मीचा प्रियकर, शत्रुसामंतांच्या स्त्रियांचा सीमन्त (केशविभाग) नष्ट करणारा, वीरपुरुषांच्या गणिकांचा प्रिय भुजंग (प्रियकर), विरोधी मांडलिकरूपी मेघांचा विलय करणारा वायु, **नागलदेवीचा** गन्धहस्ती, शत्रुसामन्तांचा कर्दनकाळ, मुख्य मांडलिकांना गोपालासारखा, बंडखोर सामन्तरूपी तारकासुराला शूर कार्त्तिकेयासारखा, मांडलिकांना भगवान् शिवासारखा, **तोंड** देशाच्या सामन्तरूपी कमलसमूहांचा उच्छेद करणारा मदोन्मत्त हत्ती, **गण्डरादित्य** नृपतीचा उजवा दक्ष बाहु, याचकांची इच्छापूर्ति करणारा चिन्तामणि, सामन्तशिरोमणि, जिनपदकमलावरील भृंग, सदाचरणाचा रत्नाकर, इतरांना अन्न, संरक्षण, औषध आणि (धार्मिक) ज्ञान देण्यात आनंद मानणारा, पद्मावतीदेवीचा वरप्रसाद प्राप्त झालेला अशा महासामन्त **श्रीनिम्बदेवरस** याने **कवडेगोळळ** येथील बाजारातील मुद्‌गोडेमध्ये बांधलेल्या मंदिरातील श्रीपार्श्वनाथाच्या अष्टोपचार पूजेकरिता, तसेच त्या देवळाच्या दुरुस्तीकरिता आणि तेथे राहत असलेल्या मुनींच्या अन्नसंतर्पणाकरिता–

(**ओ. ११–२४**) स्वस्ति ! समस्त जगात विख्यात अशा पाचशे वीरपुरुषांच्या शासनाचे अनुसरण करून ज्यांनी अनेक गुणगण संपादन केले आहेत; सत्यवादित्व, विशुद्ध आचरण, सुंदर वर्तन, नीति, सौजन्य आणि (व्यापाराचे) ज्ञान या **वीरबळंजाच्या** आचारधर्माच्या परिपालनाने जे गुणी झाले आहेत; आपल्या गिरियुक्त ध्वजाच्या योगे जे शोभत आहेत; स्वतःच्या अमोघ साहसाने श्रेष्ठ झाले आहेत; स्वतःच्या बाहुबलाने प्राप्त करून घेतलेली विजयलक्ष्मी ज्यांच्या वक्षःस्थलावर वास करीत आहे; जे वासुदेव, खण्डलि आणि मूळभद्र यांच्या वंशांत जन्मले आहेत; जे

आपल्या शौर्याने अखिल जगतात श्रेष्ठता पावले आहेत; ज्यांना भगवतीचा वर प्राप्त झाला आहे; जे युद्धात अजिंक्य असतात; जे आपल्या शत्रूंचा उच्छेद करतात; जे परस्त्री आणि परधन वर्ज्य मानतात; ज ब्रह्मदेवाप्रमाणे चौसष्ट कलांत निपुण, नारायणाप्रमाणे चक्रधारण (पक्षीं, संघव्यवस्था) करणारे, स्वतःच्या कटाक्षाने शत्रूंना जाळून टाकणाऱ्या कालाग्निरुद्रासारखे, आपल्या शस्त्रांनी घातकांना हुडकून काढून त्यांचा नाश करणाऱ्या परशुरामासारखे, आपल्या विरोधकांना पायदळी तुडविणाऱ्या मदान्ध हत्तीसारखे; गिरिकन्दरात आश्रय घेणाऱ्या शत्रूंचा नाश करणाऱ्या सिंहासारखे; पातालात आश्रय घेणाऱ्यांचा नाश करणाऱ्या वासुकीसारखे; आकाशात उड्डाण करणाऱ्यांचा उच्छेद करणाऱ्या गरुडासारखे; माहात्म्यांत पृथ्वीसारखे; गुरुत्वात पर्वतश्रेष्ठांसारखे; गांभीर्यात महासमुद्रासारखे; उद्योगित्वात रामासारखे; शौर्यात अर्जुनासारखे, शुद्धाचरणात भीष्मासारखे; साहसिकत्वात भीमासारखे; धार्मिकत्वात युधिष्ठिरासारखे; विज्ञानात सहदेवासारखे; भोक्तृत्वात इंद्रासारखे; दातृत्वात कर्णासारखे; तेजस्वीपणात सूर्यासारखे; **अहिच्छत्र** नावाने प्रसिद्ध अशा **अय्यावोळे** नगराचे अधिपति – पांचशे स्वामी, गवरे, गात्रिगे, सेट्टि, सेट्टिगुत्त, गामण्ड, गामण्डस्वामी, वीरपुरुष, शूर श्रेष्ठी–**कोल्हापुरचे** बिल्पणसेट्टि आणि गोविंदसेट्टि, **मिरिंजेचे** कोमर अन्नमय्य, बिज्जसेट्टि, आणि बोप्पिसेट्टि, **गण्डरादित्याचा** राजश्रेष्ठी वेसपय्य सेट्टि, मण्डलेश्वराचा (निंबदेवरसाचा) गृहाधिकारी बम्मिसेट्टि, **कुंडिपट्टणातील** आदित्यमंदिराचा शासनाधिकारी रावसेट्टि, चौधोरे बप्पिसेट्टि, **तोरम्बगेचा** प्रमुख कन्नपैयसेट्टि, **मयिसिगेचा** महापौर चौधोरे गोरविसेट्टि, **बळेयवट्टनाचा** शांतिसेट्टि, पाचशे व्यापाऱ्यांतील सिंह हालियसेट्टि, **कवडेगोल्लाचा** महापौर खपरय्य आणि सर्व देशांचे प्रतिनिधि हे एकत्र जमून–

(ओ. २४–२५) **शक संवत् १०५८, राक्षस संवत्सर, कार्त्तिककृष्ण पञ्चमी, सोमवार** या दिवशी **कोल्हापुरच्या** सुप्रसिद्ध **रूपनारायण बसदीचा** आचार्य, मूलसंघातील देशीय गणाच्या पुस्तकगच्छाचा आचार्य **श्रीश्रुतकीर्तित्रैविद्यदेव** याचे पादप्रक्षालन करून उदक सोडून खालील कर दिले आहेत :–

(ओ. २६–३२) पूर्ण ओझ्यावर पन्नास, अर्ध्या ओझ्यावर वीस, हसरावर पाच सुपाऱ्या; डोक्यावरून आणलेल्या ओझ्यावर पन्नास, हसरावर पंचवीस विड्याची पाने; तुपाच्या आणि तेलाच्या प्रत्येक घड्यावर एक सोळ्ळगे[1], प्रत्येक सिद्दिगेवर[2]

---

१ सोळ्ळगे हे एक माप आहे – कुडव किंवा बळ्ळ याच्या चतुर्थांश (बार्नेट).

२ सिद्दिगे किंवा सिद्दे म्हणजे चामड्याची बाटली किंवा सुक्या जिनसाचे माप. ‘सिद्दे’ हे ३६, ३३ किंवा २८ तोळ्यांचे असते (बार्नेट).

अर्धा मण; प्रत्येक संगडीवर[1] एक मण; कापड व्यापाऱ्यांच्या आणि सोनारांच्या दुकानांत विकल्या जाणाऱ्या मालाच्या किंमतीच्या प्रत्येक होंगावर (सोन्याच्या नाण्यावर) एक पळ; कापडाच्या प्रत्येक मळवेवर पाच पळ; गाडीतून आणलेल्या करुसेच्या प्रत्येक मळवेवर दोन बिसिगे – अर्धे ओझे असल्यास दहा पळ; सुताराच्या प्रत्येक घरातून सहा महिन्यांत एक स्टूल, एक त्रिपद आणि एक मरवि, आणि दर वर्षी एक खाट; वजनाने विकल्या जाणाऱ्या जिनसांच्या बाबतीत डोक्यावर आणलेल्या आले, हळद, सुंठ, लसूण, बजे, भद्रमुस्ते यांच्या प्रत्येक ओझ्यामागे पाच पळ आणि अर्ध्या ओझ्यावर दोन पळ; प्रत्येक हसऱ्यावर एक पळ; जिरे, काळी मिरी, मोहरी यांच्या प्रत्येक ओझ्यावर एक मण, अर्ध्या ओझ्यावर अर्धा मण प्रत्येक हसरावर एक सोळ्ळगे; मीठ आणि त्यासारखे पदार्थ, तसेच अठरा प्रकारची धान्ये यांच्या प्रत्येक गाडीभर मालावर एक कोळगे; एका ओझ्यावर दोन मण आणि डोक्यावरून आणलेल्या भारावर एक मण; सुक्या आणि ताज्या फळांच्या प्रत्येक गाडीभर मालावर दहा (फळे) आणि डोकीवरून आणलेल्या प्रत्येक भारावर चार (फळे); गाडीभर आवळ्यांवर एक दंडिगे, आणि पाच आवळे; हूटेच्या प्रत्येक जोडीवर एक दंडिगे आणि दोन आवळे; फुलांच्या प्रत्येक टोपलीवर एक हार; कुंभारांच्या प्रत्येक दुकानांतून एक मडके.

(ओ. ३२–३३) यानंतर शापाशीर्वादात्मक वचन येते.

क्र. ५०

कोल्हापूर येथील शेषशायी देवालय लेख :

हा लेख **कोल्हापूर** येथे श्रीमहालक्ष्मीच्या आवारातील **शेषशायीच्या देवालयाच्या तुळयांवर** कोरला आहे. त्याचा उल्लेख सन १९४५–४६ च्या रिपोर्ट ऑन इंडियन एपिग्राफी, पृ. ४०, वर अत्यंत संक्षिप्त रीतीने आला आहे. त्याचा छाप, वाचन व भाषांतर मुख्य एपिग्राफिस्ट डॉ. जी. एस्. गै यांनी मला पाठविले, त्यांवरून तो येथे संपादिला आहे. ग्रॅहॅमने याचा कोरीव लेख क्र. १९–२१ असा निर्देश केला आहे, पण तो त्याला वाचता आला नव्हता, पुढे दाखविल्या-प्रमाणे प्रस्तुत लेख सध्या ज्याचे शेषशायीच्या देवालयात परिवर्तन झाले आहे अश्या जैन तीर्थंकर आदिनाथ याच्या बसदीच्या पांच तुळ्यांवर कोरला आहे. त्यांची पहिली ओळ बाह्य मंडपाच्या मोठ्या व लांबलचक **तुळईवर** कोरली

---

१ संगडि हे दान सिद्दिगेच्या मापाचे असावे (बार्नेट).

असून इतर चार मुख्य मंडपाच्या वर्तुळाकार छताखालच्या अष्टकोणी आश्रयभागाच्या आठ लहान तुळयांपैकी एक एक तुळई सोडून **चार तुळयांवर** तीर्थंकरांच्या पंक्तीखाली कोरल्या आहेत.

अक्षरवटिका कन्नड लिपीची आणि **भाषा** जुनी कन्नड आहे.

विषय – प्रस्तुत लेख **शिलाहारनृपति गंडरादित्य** याच्या काळचा दिसतो. कारण त्याच्या पहिल्या ओळीत त्याच्याकरिता **आदिनाथ तीर्थंकराच्या** कृपेची प्रार्थना केली आहे. इतर लेखांतील त्याची काही बिरुदे, उ० 'शौचगांगेय', 'रूपनारायण', येथे आली आहेत. तशीच त्याची 'महामण्डलेश्वर' पदवी येथे उल्लेखिली आहे.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश **गंडरादित्याच्या निंबदेव** नामक सामन्ताने (कोल्हापूर येथे) **आदिजिन तीर्थंकराचे चैत्यागार** बांधले, हे नमूद करण्याचा आहे. हे चैत्यागार (मंदिर) अत्यंत विशाल व सुंदर होते. त्याला त्याच्या दोन्ही बाजूंनी बांधलेल्या व्यापाऱ्यांच्या हवेलींनी आणि गणिकांच्या हर्म्यांनी, तसेच उंच मानस्तंभाने शोभा आणली होती, असे म्हटले आहे.

हे वर्णन सध्याच्या बसक्या लहान शेषशायी देवालयाला लागू पडत नाही. याच्या उलट, ज्यांवर प्रस्तुत लेख कोरला आहे ती मोठी तुळई व सभामंडपाचे सबंध वर्तुळाकार छतच इतर ठिकाणांहून काढून जसेच्या तसे सध्याच्या ठिकाणी उभारले असणे शक्य वाटत नाही. याच परिसरातील दुसऱ्या एका (नवग्रहाच्या) देवळाच्या मंडपाच्या एका खांबावरील कोरीव लेखात दुसऱ्या एका जैन वसतीचा उल्लेख आहे. त्यावरून महालक्ष्मीच्या जवळच्या परिसरात जैन मंदिरे उभारली होती, असे दिसते. कोल्हापूर हिंदू तसेच जैन धर्मांत पवित्र तीर्थ गणले गेले होते. म्हणून वेरूळच्या लेण्यांप्रमाणे तेथे हिंदू मंदिरे व जैन वसत्या जवळ जवळ उभारल्या असल्या तर नवल नाही. तेव्हा प्रस्तुत लेखातील जैन चैत्यागाराचे वर्णन बरेचसे काल्पनिक मानले पाहिजे. कालान्तराने त्या चैत्यागाराचे परिवर्तन सध्याच्या शेषशायी मंदिरात झालेले दिसते.

प्रस्तुत लेखात कालाचा उल्लेख नाही तसाच ऐतिहासिक घटनांचाहि नाही. पण यात शिलाहारांच्या एका मांडलिक वंशाविषयी महत्त्वाची माहिती मिळते. आदिनाथाचे मंदिर ज्याने बांधले तो **निंबदेव** आणि कोल्हापूरच्या शुक्रवार वेशीजवळ पार्श्वनाथ वसति बांधणारा **निंबरस**[१] हे एकच होत. तो **कोंडकुंद अन्वयाच्या कुलचन्द्राचा** शिष्य **माघनन्दिमुनि** याचा श्रावक अनुयायी होता.

---

१ तेरदाळ शिलालेखात रूपनारायण बसदी कोल्लापुरच्या निंबदेवाने बांधली होती, असे स्पष्ट म्हटले आहे. (इं. अॅं., व्हॉ. १४, पृ. १४ इ.)

ही माहिती तत्कालीन कांही अन्य लेखांतूनहि[१] मिळते, पण त्याशिवाय निंबदेवा-विषयी आणखीहि इतरत्र अप्राप्य अशी माहिती प्रस्तुत लेखातून मिळते. निंबदेव हा **नाकरस** आणि **चम्पकाम्बिके** यांचा पुत्र होता. त्याला **भिल्लरस** आणि **कावरस** असे दोन बंधु होते. निंबदेवाने शिलाहारांच्या अनेक युद्धात भाग घेऊन विजय मिळविले होते. म्हणून त्याला '**नागलदेवीचा** गन्धगज' म्हटले आहे. ही गण्डरादित्याची माता असावी. ह्या निंबदेवरूपी गजाला शत्रुनृपतींचे विशाल सैन्यरूपी भक्ष्य लागते आणि तो शत्रूच्या दग्ध नगरीतील धूलियुक्त भूमीवर पहुडतो, असे त्याचे आलंकारिक वर्णन या लेखात आले आहे.

प्रस्तुत लेखात **गण्डरादित्याच्या कर्णादेवी** नामक राणीचाहि उल्लेख आला आहे. ती शिलाहारांच्या **नाकिराज** नामक अन्य सामंताची कन्या होती. **नाकरस** आणि **नाकिराज** यांच्या शिवाय प्रस्तुत लेखात **नागार्जुन**[३] नामक दुसऱ्या एका मांडलिकाचा 'सामन्तेन्द्र' म्हणून उल्लेख आला आहे.

प्रस्तुत लेखाचा लेखक **बरेवरादित्य** हा होता. तो उत्कृष्ट कवि असून मदनासारखा होता, असे म्हटले आहे.

या लेखात कालनिर्देश नाही. पण तो गंडरादित्याच्या काळचा असल्यामुळे ख्रिस्तोत्तर बाराव्या शतकाच्या प्रथमार्धातील असावा.

ओळ **वाचन**[४]

तुळई पहिली : बाहेरची बाजू

१ श्रीयुवतीलताललितकळ्पमहामहिजंगे शौचगांगेयधराधिपंगे खच-
रेंद्रकुळप्रभवंगे रूपना[।*]रायणदेवभूपतिगे गण्डरदेवनृपंगे
रूपनारायणदेवनादिजिननादवेमाळ्कभिवांच्छितार्थमं ॥[१॥*]
मनुसूत्रं निजसूत्र-

---

१ इं. अँ., व्हॉ. १४, पृ. २५.

२ नागलदेवीचा उल्लेख हेर्ले शिलालेख (शक संवत् १०४०) आणि कोल्हापूर शिलालेख (शक संवत् १०५८) मध्येहि येतो. या दुसऱ्या लेखात येथल्या प्रमाणे निंबदेवाला 'नागलदेवीचा गन्धहस्ती' म्हटले आहे.

३ शेषशायी देवालयाच्या मंडपाच्या पूर्वेच्या बाजूत नागार्जुनाच्या विजयांचे वर्णन करणारा लेख बसविला होता असे ग्रॅहॅम्‌च्या लेखावरून कळते. ती शिलाहि निंबरसाने बांधलेल्या चैत्यागारास लावलेली असावी. ती सध्या तेथे आढळत नाही.

४ डॉ. जी. एस्. गै यांनी पाठविलेल्या छापावरून. ५ वृत्त – उत्पलमाले.

२ वीमनसिजाकारन्निजाकारमेंबिनितल्[सु]त्तलळुंबवंबरचरप्रस्तुत्य जीमूतवा[।*]हनवंशं निजवंशमेंदोडे बळिक्कीगण्डरादित्यदेवन सन्मार्ग्गद रूपिनन्वयदुदात्तख्याति सामान्यवे[१]।।[२।।*] श्रीमं-(म)न्महामण्डलेश्वरं गण्डरादित्यदेव विजयी भव ।

तुळई दुसरी

३ एळेमाविं बनवब्जदिं तिळिगोळं माणिक्यदिं मंडनावळिताराधिपनिं नभं शुभदवागिर्प्पंतिरिर्द्दत्तु नि[।*]र्म्मळवीगळ् कुळचंद्रदेव-चरणांभोजातसेवाविनिश्चळसैद्धान्तिकमाघनन्दिमुनियिं श्रीकोंड-कुंदान्वयं ।।[३।।*] परमजिनं दय्वं नाकरसं पति तनगे [तन–]

४ यरुद्घयशर्भि[।*]ल्लरसं निंबरसं कावरसरेनल् चंपकांबिकेयना-र्प्पोल्वर्[२] ।।[४।।*] आवरसियरुं गण्डरदेवन सति नाकिराजना-त्मजेगर्ह[।*]द्देवपदभक्ते कण्णदेविगे सरिदोरे समानवेनादपरे ।।[५।।*] बरेवरादित्यं सुकवि मकरध्वजं वाचक वाचव्य...

तुळई तिसरी

५ परनरपाळभुंभुकबळं कबळं परिदग्धविद्विषत्पुरमदेधूळि सेज्जर-मुदात्तयशं जयडिण्डिमं मनो[।*]हरतरवीरलक्ष्मियये करेणुवोला-गिरे योग्यसाय्ताधीश्वरगृहपट्टवर्द्धनके नागलदेविय गन्धवा[रणं[३]] ।।[६।।*] ⏑ ⏑ – – ⏑ ⏑

६ विद्दियो तेऱ्येयो मेण्मेय्सालवो नाडऱ्डगरं पूण्कगे काढुवित्तुविरि़ुदुं निन्नंते सत्कीर्त्तिग [।।*] र्त्थिगनागिर्प्पुदु जीय बाप्पचलरें सामन्त-केदार नाकिग सामन्तललाम नाकरस सामंतेंन्द्र नागार्जुन[४] ।। [७।।*] ⏑ ⏑ – – ⏑ ⏑

---

१ या व पुढच्या श्लोकाचे वृत्त – मत्तेभविक्रीडित.
२ या व पुढच्या श्लोकाचे वृत्त – कंद.
३ वृत्त – चम्पकमाले.
४ या व पुढच्या दोन श्लोकांचे वृत्त – मत्तेभविक्रीडित.

तुळई चौथी

७ सहायनिवने जगद्दरिद्रविद्रावणं निले माताडुवने तोडळ्गेडेगुडं चारित्रसंपन्नने [।*] कलिकालक्कोऱेगैट्टिदं शुचिये गंगासूनु गंभीरने गेलेवंदं [ज]ळराशियिं पिरियरास्सर्मितनिबंबर ।।[८।।*] धरेयेल्लं जिननाथमंदिरमयं तद्देशवेल्लं जिनेश्वररादि–

८ ⏑–⏑–⏑ मयमुद्यद्ग्राममेल्लं मनो[।*]हर सज्जैनमयं परिग्रहमदेल्लं तत्वसम्पत्पदार्थरसावेषमयंगळागे नेगळदं श्रीनिंबदेवोत्तमं ।। [९।।*] नंबुगे विनेयजनदमनंबुगे दानं चतुर्व्विधं यतिपतिग[।*]-ळ्गिम्बागे नेगळे नेगळ्दं किं बहुना सकळगुणकदंबं निंबं[1] ।। [१०।।*]

तुळई पाचवी

९ वरवैश्याबाटदिंदिक्कॅलदोळेसेव वारांगनागेहदिं विस्तरमानस्तंभदिं माडदिनेसेव वितानप्रतानोल्लसन्मं[।*]दिरं चेंबोन्नोळंदंबडेद पडिर्गाळिंदिंद्रनिंदादितीर्त्थेश्वरचैत्यागारमं माडिसिदनसदळं रंजिसल् निंबदेवं[2]।।[११।।*] सदमळकीर्त्ति निंबरसनार्जिजतपुण्यद पुंजदंतिरिर्द्दुदु जिनमंदिरं कळशविट्ट वोलिर्द्दुदु हेम्र्मेगत्यपू[।*]र्व्वद कळधौत–

१० रम्यकळशं पडिगिं पडियेल्लं नोडिबेडिदर्ग्गे बरंगुडळ्नेऱेदु निदवु पुत्तळि नृत्यशालेयोळ्[3]।।[१२।।*] नवमंदारवितानं भुवनदोळतिसेव्यूवेंदु शक्रं बन्दा[।*]दिवमं मऱेदिर्द्दं ताण्डवमं मेऱेवं वितानकुसुहागृ(ग्रि)मदोळ्[4]।।[१३।।*] सरसति पेण्बरिजं बिट्टु रूढिवेत्तिग बरेवरादित्यन कय्वेरगिन कंटदोळिर्द्दक्षरपदमं पडेदु पिरिय सिरियं मेऱेवळ् [।।]

---

१ वृत्त – कामदा. २ वृत्त – महास्रग्धरा.

३ वृत्त – मत्तेभविक्रीडित. ४ वृत्त – कंद.

भाषांतर

(श्लोक १) नारायणदेवाचे प्रत्यक्ष रूप असलेल्या आदिजिनाच्या नामाचा गंभीर घोष लक्ष्मीदेवीरूपी लतेशी विलास करणारा कल्पवृक्ष, सदाचारात भीष्मासारखा, विद्याधरवंशी, स्वरूपात नारायणासारखा नृपति **गंडरादित्य** याचे मनोरथ पूर्ण करो !

(श्लो. २) मनूचे धर्मशास्त्रनियम हेच त्याचें नियम, मदनाचे रूप हेच त्याचे रूप, सर्वत्र ज्याच्या माहात्म्याची प्रशंसा होत आहे असा जीमूतवाहनाचा वंश हाच त्याचा वंश हे लक्षात घेतल्यावर या **गण्डरादित्य** नृपतीची सत्कीर्ति, रूप आणि वंश सामान्य आहेत असे म्हणता येईल काय ?

(ओ. २) हे श्रीमान् महामण्डलेश्वर **गण्डरादित्य** नृपते विजयी हो !

(श्लो. ३) ज्याप्रमाणे एखादे उद्यान कोमल अशा आम्रवृक्षाने, स्वच्छ जलाशय कमलाने, अलंकार माणकाने, आकाश चंद्राने, सुशोभित होते त्याप्रमाणे हा **कोंडकुन्दान्वय, कुलचन्द्रदेवाच्या** पदकमलाची सेवा केल्याने ज्याची धर्मश्रद्धा निश्चळ झाली आहे अशा **मेघनन्दि** मुनीच्या योगे, शोभिवंत झाला आहे.

(श्लो. ४) जिचा देव जिनश्रेष्ठ आहे, जिचा पति **नाकिरस** आणि पुत्र विशाल कीर्तीचे **भिल्लरस, निम्बरस** आणि **कावरस** आहेत अशा **चम्पकाम्बिकेशी** कोण तुलना करू शकेल ?

(श्लो. ५.) **नाकिराजाची** कन्या आणि **गण्डरदेवाची** पत्नी अर्हद्देवाची भक्त **कर्णादेवी** हिची कोण बरोबरी करू शकेल ?

(ओ. ५) **बेरवरादित्य** हा उत्कृष्ट कवि, मदनासारखा, वाचक आणि वाचनीय यांत . . .

(श्लो. ६) **नागलदेवीचा** गन्धहस्ती, शत्रुराजांची मोठी सेना हे ज्याचे खाद्य आहे, शत्रूच्या दग्ध नगरीतील धुळीची जमीन ही ज्याची शय्या आहे, ज्याची कीर्ति हाच डिंडिम आहे आणि जो मनोहर अशा वीरलक्ष्मीचा जणू अवतार आहे असा (निंबरस) आपल्या सम्राटाचा राजहस्ती होण्यास लायक झाला.

(श्लो. ७) हे सामन्ताधिपति **नाकिराज,** सामन्तश्रेष्ठ **नाकरस** आणि सामन्तेंद्र **नागार्जुन** ! तुम्ही व्याज, करभार, आणि लोकांना दिलेल्या अभिवचनांची पूर्ति यांयोगे सत्कीर्तीला लायक झाला आहा !

(श्लो. ८) सामन्त **निंबापेक्षा** कोण श्रेष्ठ आहे ? तो सर्व जगाच्या दारिद्र्याला पलायन करावयास लावतो, तो वचनाचा दृढ आहे, तो असत्याला थारा देत नाही, तो सच्छील आहे, त्याने कलियुगाला पायबंद घातला आहे, तो विशुद्धाचरणी आहे, तो शुचित्वात भीष्माला आणि गांभीर्यात सागराला मागे टाकतो.

(श्लो. ९) त्याने सर्व भूमि जिननाथाच्या मंदिरानी भरून टाकली, त्याने सर्व देश जिनेश्वराच्या उत्कृष्ट..., सर्व उत्कृष्ट ग्राम सज्जन प्रियभाषणी जैनांनी भरून टाकले आणि आपणाभोवतालचा सर्व परिसर जैनतत्त्वाचे शब्द, अर्थ आणि सार यांनी परिपूर्ण केला आहे. **निंबदेव** असा उत्कृष्ट आहे.

(श्लो. १०) **निंबाविषयी** आणखी काय म्हणावे ? तो सर्व सद्‌गुणांचा समुच्चय आहे, त्याच्या विश्वसनीयतेमुळे तो सर्वांना प्रिय आहे आणि आपल्या चतुर्विध दानाने तो मुनींचा आश्रयदाता आहे.

(श्लो. ११) **निम्बदेवाने** इंद्राकडून (हे) **आदितीर्थेश्वराचे** विशाल, महान्, शोभिवंत असे **चैत्यागार** बांधविले. ते दोन्ही बाजूंच्या उत्कृष्ट व्यापाऱ्यांच्या हवेलींनी, गणिकांच्या निवासस्थानांनी, विशाल मानस्तम्भाने आणि सुवर्णजडित द्वाराच्या योगे सुशोभित दिसणाऱ्या अनेकमजली गृहाने अत्यंत मनोरम दिसत आहे.

(श्लो. १२) ते जिनमंदिर विशुद्धकीर्ति **निम्बदेवाची** जणू काय पुण्य-राशिच आहे. त्याचा अप्रतिम आणि सुंदर सुवर्णकलश त्याच्या थोरपणाचा कळस आहे. आणि त्याच्या नृत्यागारात अनेक मूर्ति आहेत त्या प्रेक्षक याचकांना वर देण्याकरिता जणू काय उभ्या आहेत.

(श्लो. १३) हा नूतन आणि विशाल मन्दर वृक्ष पृथ्वीवर अत्यन्त पूजनीय आहे असे वाटून इन्द्र आपले नन्दनवन टाकून खाली आला आहे आणि उत्कृष्ट आणि विशाल कुमुदांवर नृत्य करीत आहे.

(श्लो. १४) आपले स्त्रीरूप टाकून देऊन आता सरस्वती **बरेवरादित्याच्या** कुशल लेखणीत निवास करीत आहे. त्याच्याकडून शब्द व अक्षरे प्राप्त झाल्यामुळे ती आता अत्यंत उज्ज्वल दिसत आहे.

क्रमांक ५१

गंडरादित्याचा जुगल येथील खंडित शिलालेख

या लेखाची **शिला** मैसूर प्रदेशाच्या बेळगाव जिल्ह्यातील **जुगल** येथे पंचायत कचेरीत ठेवली होती. त्याची अत्यंत संक्षिप्त माहिती अॅन्युअल रिपोर्ट ऑन इंडियन एपिग्राफी, सन १९५३–५४, क्र. १७८, पृ. ३५ वर दिली आहे. त्याचे संपादन मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून येथे केले आहे.

ही शिला म्हणजे सुमारे २ मीटर रुंद अशा मूळ शिलेचा उजवीकडचा लहानसा तुकडा आहे. मूळ शिलेची उंची सांगता येत नाही.

अक्षरवटिका कन्नड लिपीची आणि **भाषा** आरंभीच्या राजवंशावलीविषयक भागात संस्कृत आणि नंतरच्या राजबिरुदावलीत कन्नड आहे. आरंभीचा मंगल-श्लोक शिवस्तुतिपर होता. नंतरच्या वंशावलीचे श्लोक इतर ताम्रपटांतल्याप्रमाणे आहेत. नंतरची बिरुदे **गंडरादित्याची** दिसतात. त्या राजाचे नाव मात्र अवशिष्ट भागात आले नाही; काल आणि लेखाचा उद्देशविषयक भाग नष्ट झाला आहे.

प्रस्तुत लेखाने आपल्या ऐतिहासिक ज्ञानात मुळीच भर पडत नाही. फक्त तो बेळगाव जिल्ह्यात सापडला असल्यामुळे त्यावरून **गंडरादित्याचा** अंमल त्या प्रदेशापर्यंत चालू होता एवढे अनुमान करता येते.

ओळ **वाचन**[1]

१ . . . . [।*] ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ – ⏑ – – ⏑ –, ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ – ⏑ – – ⏑ – । ⏑ ⏑ – ⏑ – ⏑ ⏑ ⏑ – ⏑ – – ⏑ –, ⏑ ⏑ रं स्थळस्थितभुजंगहारो हरः[2]।।[१।।*] आसीद्विद्याधरः पूर्व्वं ना–

२ [म्ना जीमूतवाहनः । परार्थं जीवितं येन गरुडाय निवेदितम्[3] ।। २ ।। शिलाहाराख्यवंशोयं तगरेश्वरभूभृताम् । तद्वंशे जतिगो नाम जातो भूभृच्छि*]खामणिः ।।[३।।*] स्वस्तिश्रीजतिगक्षितीशतनयो नायिम्मनामा नृ–

३ [पः पुत्रस्तस्य च चन्द्रराट् पृथुयशास्तस्यापि सूनुः किल । संजातो जतिगो जगज्जननुतः श्रीमांश्च तन्नन्दनो गोंकल्लो भुवि भूमिपालतिलकस्तस्याप्यभूदग्रजः[4] ।। ४ ।। गूहले*]शोथ तद्भ्राता कीर्तिराजोनुजोस्य च । चन्द्रादित्यस्ततस्तस्य चक्रे राज्यम–

४ [कण्टकम्[5] ।। ५ ।।* श्रीमद्गोंकलभूमिपालतनयः श्रीमारसिंहो नृपस्तत्सूनुर्नृपमौलिलालितपदश्रीगूहलाख्यो नृपः । तद्भ्राता भुवि भोजदेवनृपतिर्वैरीभपंचाननश्चक्रे राज्य*]मखण्डितं पृथुयशा लंकेशतुल्यः किल[6] ।।[६।।*] तस्यानुजो ध–

---

१ मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून.

२ वृत्त – पथ्या. ३ श्लोक २ व ३ चे वृत्त – अनुष्टुभ्.

४ वृत्त – शार्दूलविक्रीडित. ५ वृत्त – अनुष्टुभ्. ६ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

५ [र्म्मधरो धरित्र्यां दधार वर्णानखिलान्स्वधर्मे । धैर्याग्रधुर्यो धनदो धनानां श्रीगण्डरादित्य इति प्रसिद्धः[1] ॥ ७ ॥ तुलापुरुषदानादि-षोडशक्रतुकारकः । शौचगाङ्गेयकीर्त्येकनिलयः स्वगुणै*]र्भुवि[2] ॥ [८॥*] स्वस्ति समधिगतपंचमहाशब्दमहामण्डळेश्वरं ।

६ [तगरपुरवराधीश्वरश्रीशिळाहारनरेन्द्रजीमूतवाहनान्वयप्रसूतसुव-र्णगरुडध्वजमरुवंकसर्पअयनसिंहोरिमंडळिकभैरवविद्विष्टगजकंठी-रवइडुवरा*]दित्यं रूपनारायणं[3] . . . .

क्र. ५२

विजयादित्याचा मिरज शिलालेख : शक संवत् १०६५ आणि १०६६

प्रस्तुत लेखाची **शिला मिरज** येथील किल्ल्याच्या वेशीत बसविलेली आढळली होती. या लेखाचा फोटोग्राफ पालि, संस्कृत अँड ओल्ड् कॅनरीज इन्स्क्रिप्शन्स्, क्र. ९६, मध्ये प्रसिद्ध झाला होता. या लेखाचे संपादन एल्. डी. बार्नेटने एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. १९, पृ. ३५ इ. वर केले आहे. मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून तो येथे संपादिला आहे. ही शिला आता कोल्हापूरच्या टाउनहॉला-मधील संग्रहालयात ठेवली आहे.

वर्णन – या शिलेचा वरचा भाग त्रिकोणाकृति असून त्यात मध्यभागी बैठकीवर मांडलेले शिवलिंग, डावीकडे नंदी, वरच्या बाजूस सूर्य आणि चंद्र कोरले आहेत. त्याखाली प्रस्तुत लेख आहे.

अक्षरवटिका जुन्या कन्नड लिपीची आणि **भाषा** जुनी कन्नड आहे.

विषय – प्रस्तुत लेख महामण्डलेश्वर **विजयादित्य** याच्या कारकीर्दीतील आहे. त्यात तो राजा **वळिवाड** येथील स्थायी शिबिरातून राज्य करीत असल्याचे सांगितले आहे. तेव्हा तो कोल्हापूरच्या शिलाहारवंशातील होता यात संशय नाही.

---

१ वृत्त – उपजाति. २ वृत्त – अनुष्टुभ्.

३ यानंतरचा भाग फुटून नष्ट झाला आहे.

प्रस्तुत लेखाचा **उद्देश** खालील घटना नमूद करण्याचा आहे :–

वीरबणंज या व्यापारी संघाचे काही प्रमुख व्यापारी – जे **मिरिंजे, बागे, दोनिकोड, तोळकले, कुण्डिलि** आणि **सेडंबाळ** येथील रहिवासी होते ते– **पिरियुगवारद, सिरिगुप्प, जुगुलकोप्प** इत्यादि विभागांच्या साधारण सभेत एकत्र जमले आणि त्यांनी (सेडंबाळ येथील बाजारात) विकल्या जाणाऱ्या सुपारी, तेल, तूप इत्यादि पदार्थांवरचे विशिष्ट कर **सेडंबाळचा** महाप्रभु **मादिराजय्य** याने बांधलेल्या देवालयात प्रतिष्ठापिलेल्या **माधवेश्वराला** दान दिले. तसेच तेथील प्रमुख व्यापाऱ्यांनी स्वतःची रोख किंवा पदार्थरूपाची दाने जाहीर केली. शिवाय त्या नगरातील रहिवाश्यांनी तसेच व्यापारी श्रेण्यांनी, कुंभारांनी, सोनारांनी व चांभारांनी चैत्रातील उत्सव आणि दीपावलि प्रसंगी पूर्वोक्त देवाच्या पूजादिकां-करिता आपापली दाने दिली.

ही दाने **शक संवत् १०६५, दुंदुभि संवत्सर, भाद्रपद शुद्ध षष्ठी, शुक्रवार,** रोजी भरणाऱ्या शुक्रवार बाजाराच्या सभेत जाहीर झाली होती. कोल्हापूरच्या इतर काही लेखातल्याप्रमाणे प्रस्तुत लेखातील **शकवर्ष वर्तमान** मानले पाहिजे तरच ते दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे येणाऱ्या दुंदुभि संवत्सराशी जुळेल. पूर्वोक्त तिथि शुक्रवार, २८ ऑगष्ट सन ११४२ रोजी पडते.

प्रस्तुत लेखात **विजयादित्याचे मिरिंजे विषयातील** कांही अधिकारी– महाप्रधान आणि शुल्काध्यक्ष **भायिपय्य नायक,** आणि बाजाराचे प्रमुख **माळपय्य नायक** – यांनी **सेडम्बाळ** येथे **माधवेश्वराच्या** पूजार्चनेकरिता आणि त्या देव-ळाला जोडून असलेल्या मठातील मुनींच्या अन्नसंतर्पणाकरिता दिलेल्या दानांचाहि उल्लेख आहे. ही दाने **सेडम्बाळ** गावाच्या कांही भागातील तेली, धान्यव्यापारी,

---

१ बार्नेटने ही तिथि शक संवत् १०६५, भाद्रपद शुद्ध २, शुक्रवार, अशी वाचली आणि ती वाराशी जुळत नाही असे म्हटले; कारण ती सोमवारी (२४ ऑगष्ट सन ११४२) पडते, शुक्रवारी पडत नाही. पण त्यापूर्वी फ्लीटने दाखविले होते की तिथीचा अंक मागाहून २ चा ६ करण्यात आलेला दिसतो. हा अंक ओ. ४७ मधील ६ च्या अंकासारखा आहे. दुरुस्त केलेली तिथि भाद्रपद शुक्ल षष्ठी, शुक्रवार, तारीख २८ ऑगष्ट सन ११४२ रोजी सूर्योदयानंतर २२ घटिका ५५ पळांनी संपली (इं. अँ., व्हॉ. १९, पृ. ३१७). तिथीचे हे दुरुस्त केलेले वाचन कीलहॉर्नने आपल्या इन्स्क्रिप्शन्स् ऑफ सदर्न इंडिया, क्र. ३२२, पृ. ५८ मध्ये स्वीकारले आहे. असे असता बार्नेटने चुकीचे वाचन का दिले समजत नाही.

सुपाऱ्यांचे व्यापारी इत्यादिकांच्या दुकानांवर बसविलेल्या करांच्या रूपाने होती. हे कर वसूल करणाऱ्यांनी आपापल्या वसूलीतून कांही भाग द्यावयाचा होता. ही दाने **सोवराशि** सिद्धान्तिदेवाला पादप्रक्षालन करून देण्यात आली होती. त्याच्या नावावरून हा मुनि पाशुपत पंथाचा दिसतो.

ही दुसरी दाने **शक संवत् १०६६, रुधिरोद्गारी संवत्सर, माघ कृष्ण चतुर्दशी – शिवरात्रि, गुरुवार,** या दिवशी देण्यात आली होती. हे शक वर्ष पूर्वोक्त वर्षाप्रमाणे **वर्तमान** मानले पाहिजे तरच ते दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे रुधिरोद्गारी संवत्सराशी जुळेल. या मितीची इंग्रजी तारीख गुरुवार, २० जानेवारी सन ११४४ येते. त्या दिवशी माघ कृष्ण चतुर्दशी मध्यम मानाने सूर्योदयानंतर १२ तास ५१ मिनिटांनी लागली. त्या दिवशी ती सूर्योदयी नव्हती तरी शिवरात्रीला आवश्यक असल्याप्रमाणे ती मध्यरात्री होती म्हणून तिचा गुरुवाराशी संबध जोडला आहे.

प्रस्तुत लेखात मागील लेखातल्याप्रमाणे **वीरबणंज** या व्यापारी संघाचे वर्णन आले आहे. तो मूळचा **अहिच्छत्राचा** असून त्याला '**अय्यावोळेपुर-परमेश्वर**' म्हटले आहे. हे अहिच्छत्र अर्थातच उत्तर भारतातील उत्तर पांचाळ राज्याच्या राजधानीचे तन्नामक नगर नसून दक्षिणेतील अय्यावोळेच होय. या संघाचे सभासद विविध देशांतील आठ प्रांतांचे प्रतिनिधि होते. तसेच ते बत्तीस समुद्र-किनाऱ्यावरची स्थाने, अठरा नगरे आणि चौसष्ट घटिकास्थाने यांचे रहिवासी होते. या स्थलांचा नामनिर्देश मात्र कोठेहि आढळत नाही.

स्थलनिश्चय – अहिच्छत्र आणि **अय्यावोळे** यांची चर्चा मागे केली आहे. **मिरिंजे** हे सध्याचे मिरज होय. बार्नेटने म्हटल्याप्रमाणे **बागे** हे 'तर्दवाडी-सहस्र' या विभागातील 'बागडगे' किंवा 'बागेनाडु–सत्तर' अथवा 'बागे पन्नास' असावे. **दोणिकोड** हे कोल्हापूर जिल्ह्याच्या गडहिंग्लज तालुक्यातील दोनेवाडी,

---

१ बहुधा या कारणामुळेच जरी प्रस्तुत शिलालेखातील दाने सेडम्बाळ येथील बाजारात विकल्या जाणाऱ्या जिनसांवरील कररूपाने तेथील देवाच्या पूजाअर्चे-करिता दिली होती तरी ती नमूद करणारी शिला मिरजेस ठेवली होती.

२ शिवरात्रीच्या निश्चित काळाविषयी विविध मते आहेत. कोणी ती तिथि प्रदोषकाळी तर कोणी ती मध्यरात्रीच्या पूर्वी व नंतर असावी असे म्हणतात. निर्णयसिंधु, पृ. १५७. प्रस्तुत लेखातील शिवरात्रीची तिथि गुरुवारी १२ तास ५१ मिनिटांनी लागत असल्यामुळे ती वरील दोन्ही मतांनुसार त्या दिवशी पडली होती, हे स्पष्ट दिसते.

आणि **तोळकले** हे सोलापूर जिल्ह्याच्या अक्कलकोट तालुक्यातील तोलनूर असावे. **कुंडिलि** हा इतरत्र उल्लेखिलेला कुण्डिदेश असावा. त्यात बेळगाव जिल्ह्याचा काही भाग अंतर्भूत होत होता. **सेडम्बाळ** हे बेळगाव जिल्ह्याच्या अथणी तालुक्यातील शेडबाळ होय. **पिरियुगवार** (किंवा हिरियुगवार) हे कर्नाटक प्रदेशाच्या चितळदुर्ग जिल्ह्यातील हिरियुर असावे. **सिरिगुप्प** हे बेळगाव जिल्ह्यातील शिरगुप्पि आणि **जुगुलकोप्प** हे अथणी तालुक्यातील सध्याचे जुगल होय

ओळ **वाचन**[1]

१ सिद्धम्[2][।*] स्वस्ति [।*] समस्तभुवनविख्यातपंचशतवीरशासन-लब्धानेकगुण[गणा]–

२ लंकृत सत्यशौचाचारचारुचरित्रनयविनयविज्ञान वीरबणंज-[धर्म्मप्र–]

३ तिपाळनविशुध्ध[3] गुड्डध्वजविराजितानूनसाहसोत्तुंग कीर्त्यंगना-लिंगित [निज]–

४ भुजविजयलक्ष्मि(क्ष्मी)निवासवक्ष[:*]स्थल भुवनपराक्रमोन्नत वासुदे[वख–]

५ ण्डलीमूळभद्रवंशोद्भवरुं द्वात्रिंशद्वेंळावुरमुमष्टादशपट्टणमु[म्म.रु]–

६ वत्तनाल्कु घटिकास्थानमुं नानादेशाभ्यंतरदेंटु नाड पदिनऱुवरु गव–

७ रेगरुं गात्रिगरुं सेट्टियरुं सेट्टिगुत्तरुं बच्चरुं बळेगाऱरुं गंधिगरुं गावुण्डरुं गा[वुण्ड]–

८ स्वामिगळुंमरसुगळुंमरसुमक्कळुं मंकरुं मंकमऱे वरुं बिरुदरुं बि(बी)-रवणिगरुं बारिकरुं [बा]–

९ रिकजनहस्तरुं सासिदरेळ्नूऱ गवऱेगळुमहिच्छत्रविनिर्ग्गतरुमय्या-वळेपु[रपर]–

१० मेश्वररु(रुं) श्रीभगवतीदेवि(वी)लब्धवरप्रसादाद्यनेकनामांक-माळाविराजितरु[मप्प]

---

१ मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून.

२ चिह्नाने प्रदर्शित. ३ 'विशुद्ध –' वाचावे.

११ श्रीमदय्नूर्व्व[र्*]स्वामिगळुं समस्तभल्लुंकिदंडहस्तरुं मुम्मुरिदंडमुं [मु–]

१२ ख्यवागियेळ्वत्तेच्छ्रासिरद प्रभु पृथ्विसेट्टि मिरि(रिं)जेय बोप्पण-य्यराजश्रेष्ठि म–

१३ हावड्डव्यवहारि वेसपय्यसेट्टियरुं समयसमुद्धरणसोवण[सेट्टि]–

१४ यरुं बागेय मूलिग चिक्कचवुंडसेट्टियुं दोणिकोड मुम्मुरिदंड द..

१५ वसेट्टियुं जयसिंगद तोळकलेय सिरियमसेट्टियुं नाड पेर्ग्गड हेम्म-सेट्टि[युं]

१६ कुंडिलिय सेट्टिगुत्त मल्लसेट्टियुं कुवर लक्कसेट्टियुं निगळद केति-सेट्टियुं [सेडं]–

१७ बाळ बोंदलब्बेय सूरसेट्टियुं आकेतसेट्टियुं चवुडसेट्टि अल्लिय कोप्पसेट्टि..

१८ य होल्लसेट्टि पिरियुगुवारद तळ सिरिगुप्पेय तळ जुगुळकोप्पद तळ ..

१९ गेय तळ यिंतु समस्ततळमुख्यवागि सेंडबाळलु महानाडागी(गि) नेर[दु शक]–

२० वर्ष १०६५नेय दुंदुभिसंवत्सरद भाद्रपदशुध्ध(द्ध) ६[1] शुक्रवार-दंदु सेडंबाळ

२१ महाप्रभु मादिराजय्यं माडिसिद श्रीमाधवेश्वरदेवरंगभोगक्के [आयूर]–

२२ लु सु(शु)क्रवारद संतेयं माडि बिट्टायमेन्ते(न्तें)दोडे मारि̤द अडकेय [जव]–

२३ ळक्कडकेयिर्प्पत्तु हसुंबेगडके हन्नेरडू कत्तेय हेर्ऱिगिर्प्पत्तय्दु को ..[2]

---

१ आरंभी ही तिथी '२' अशी लिहिली होती, ती नंतर '६' अशी दुरुस्त करण्यात आली.

२ बार्नेटने येथे 'कोणन' वाचावे असे सुचविले आहे.

२४ एत्तिन जवळमं बिरिचिदल्लियडकेयय्वत्तु मारुगोंडवरल्लि होंगे-यड[केयि]–

२५ प्पत्तु हेरिंगे एले नूरैवत्तु एण्णेय कोडक्के सोळसवेरडु तुप्पद कोडक्के सो[ळस–]

२६ वेरडु भंडिगोडक्के एण्णे मानवोंदु धान्यवर्गक्के कोणन हेरिं[गे*] मानवा[.रु]

२७ एत्तिन हेरिंगे बळ्ळवोंदु कत्तेय हेरिंगे मानवेरडु हसरक्के मान-वोंदलु

२८ सट्टुगवोंदु वोट्टिलिंगे कोळगवोंदु हत्तिय हसरदल्लि देवर सोड-रिंगे बत्ति–

२९ गे संडगेवत्ति वोंदु [।*]सेट्टिगुत्तं तन्न बिट्टायमॆंतेंदोडे हसुंबेयनिक्कु–

३० वल्ली हसेय जवळि गंधरबट्टलु ओंदु गोंटु विचारगेय्दवरल्लि मुद्रापणं हों–

३१ गे हागमरन भंडि मारिं(रिं)दळ्ळि मेलुदक्कोंदु भंडियलु मारि़द धान्यवर्गक्के को–

३२ ळगवोंदु [।*]चयित्रद पर्व्वक्के पुरवर्गद प्रजेगळुं मिथुनक्के बिट्ट हाग–

३३ वोंदु दीपावळिय पर्व्वदलु बेळगुव सोडरेण्णेगे उ(ऊ)रोळगण सेणिगरु

३४ तम्म मनेगळिगे मनेयलोंदु हागवोंदु बिट्ट हागवोंदु कुंबारु़र हस[र*]

३५ क्के मडके वोंदु अक्कसाले बम्मोजहळ्ळदिं मूड होंगे हण्णविन पारिखा–

३६ यदोळगे देवर्गे बिट्ट अड्डवोंदु संम्मगारु़रल्लि अरु़ंदिगळिगे कुडुव पाद–

३७ रक्षे तोडोंदु मेदरल्लि संतेगे कुडुव मोऱनु वोंदु मादेगरल्लि अरु़ंदिगळि–

३८ गे कुडुव मिळि वोंदु [।*] यिंती सा(शा)सनमर्य्यादेयं किडिसि-दात(तं) गंगेप्रयागेवा-

३९ रणाशिकुरुक्षेत्रदलु सायिर कपिलेयं कोंद महापातकमनेय्दु-

४० व आदित्यतीर्त्थंगळल्लि तन्न पिरिव मगनं कोंदु अवन कपाल-दलुंड म-

४१ हादोषमनेय्दुव ॥ ✻ ✻ ॥ स्वस्ति श्रीमन्महामंडळेश्वरं

४२ विजयादित्यदेवरसरु वळवाडद नेलेविडिनलु सुखसंकथावि-

४३ नोदर्दि राज्यं गेय्वुत्तमिरलु तत्पादपद्मोपजीविगळप्प महाप्रधा-

४४ नं सुंकवेर्ग्गडे भायिपय्यनायकरु मिरिंजेनाड केणिकारुं मा-

४५ ळपय्यनायकरन्तिर्व्वरु सेडम्बाळ प्रभु सामन्त मादिराजय्यं

४६ गळु माडिसिद श्रीमाधवेश्वरदेवरंगभोगक्कल्लिय तपोधनराहार-दानक्कं स(श)कव-

४७ र्ष १०६६नेय रुधिरोद्गारिसंवत्सरद माघबहुल १४ वड्डवार-दंदु शिवरात्रे(त्रि)-

४८ य पर्व्वनिमित्तवागिया देवर मठदाचार्य्य श्रीमतु सोविरासि(शि)-सिद्धा[1]न्तिदेवर का-

४९ लं कर्च्चि धारापूर्व्वकं माडि कोट्ट संकमेन्तेन्दोडा सेडंबाळ मुन्दण हळ्ळदिं मूड पर-

५० वर्ग्गवोळगागि कट्टिदंगडिगळ्गं तेल्लिगरु पसरिगरु भक्तहट्टिगं वोक्कलुदेरे प-

५१ रिहार मत्तं सन्तेय वोळगण कोडदण्णेयेलेय हरुगळ पोम्म किरु-

५२ कुळ धान्यवर्ग्गंगळ मोट्टेय सुंकवोळगागि अर्द्धादान अल्लि अंतर-वट्टदिं तीवि-

५३ द एत्तिन अडकेय हेरिंगे मेलडके नूरय्वत्तु आठाणान्त-

---

१ 'द्धा' मधील 'ध्' हे प्रथम गळलेले अक्षर नंतर लहान आकारात कोरले आहे.

५४ रदलु नडव सुंकिगरु सौप(व)र्ण्णक्के तिर्गळिगे वोंदु बेळेयं कुडु-
वरीन्ती
५५ धर्म्ममं सधर्म्मदिं प्रतिपाळिसिदर्ग्गे गंगेवारणासिकुरुक्षेत्रदलु सा-
५६ सिर कविलेय कोडुं कोळगुमं पोन्नलु कट्टिसि सासिर्व्व ब्राह्मण-
५७ रिगे कोट्ट फलमक्कु मत्तमिदनलिडं(दं)गे गंगायमुनेगळेरडऱ
५८ संगमदोळगण्णपुण्यवरतीर्त्थस्थानंगळोळिळ्द तपोधनर गोब्राह्म-
५९ णरनळिहनिन्तिदनळिद ॥

भाषांतर

सिद्धि असो ! स्वस्ति !

पाचशे स्वामींमध्ये प्रमुख, सर्व भल्लुकिदंड आणि मुम्मुरिदंड धारण करणारे, सर्व जगात प्रसिद्ध अशा पाचशे वीरांच्या शासनाचे परिपालन केल्यामुळे प्राप्त झालेल्या सद्‌गुणांनी भूषित, सत्यवादित्व, विशुद्ध आचरण, प्रिय वर्तन, नीति, सौजन्य आणि (व्यापाराचे) ज्ञान, तसेच **वीरबणंज** धर्माचे अनुशीलन यामुळे सद्‌गुणसंपन्न झालेले, गिरियुक्त ध्वजाने विराजमान, अमाप साहसवृत्तींने श्रेष्ठ झालेले, कीर्तिदेवीने आलिंगित, बाहुबलाने प्राप्त करून घेतलेल्या विजयलक्ष्मीने ज्यांच्या वक्ष:स्थलाचा आश्रय घेतला आहे असे, सर्व जगात पराक्रमाने श्रेष्ठ **वासुदेव खण्डलि** आणि **मूळभद्र** यांच्या वंशात जन्म घेतलेले, बत्तीस किनाऱ्यावरची पत्तने, अठरा नगरे आणि चौसष्ट घटिकास्थाने[1] यांचे निवासी, सोळा गवरेग, गात्रिग, सेट्टि, सेट्टिगुत्त, बच्च, बांगड्या विकणारे, गन्धी, जिल्हाप्रमुख आणि त्यांमध्ये मुख्य, गावुंड आणि गावुंडश्रेष्ठ, राजे, राजकुमार, मंक, मंकमेरेव, बिरुदधारी, वीरव्यवहारी, बारिक, बारिकांचे प्रतिनिधि,[2] एक हजार सातशे गवरे, नाना देशांतील आठ विभागांचे प्रतिनिधि, जे **अहिच्छत्राचे** निवासी आहेत आणि **अय्यावोळे** नगराचे अधिपति आहेत, ज्यांनी भगवती देवीचा वरप्रसाद प्राप्त करून घेतला आहे – अशांचे प्रतिनिधि – सत्तर हजार (देशांचा) प्रमुख **पृथिवीसेट्टी, मिरिंजेचा वोप्पणय्य**, राजश्रेष्ठी, महाव्यापारी **वेसपेय्य सेट्टी**, परंपरागत रूढींचा उद्धर्ता **सोवणसेट्टी, बागे** गावाचा **मूलिगे, चिक्क चवुण्डसेट्टि,**

---

१ घटिकास्थान हे सभागृह असे. कीलहॉर्नने दाखविले आहे की बहुधा राजेलोकांनी विद्वान् व पूज्य लोकांकरिता स्थापिलेली ही स्थाने असत. इं. अँ., व्हॉ. ८, पृ. २१.

२ बार्नेटने 'बारिकजनहस्तरु' याचा असा अर्थ केला आहे.

दोनिकोड्डुचा मुम्मुरिदण्डधारी **द. बसेट्टि, तोळकलेचा जयसिंगद सिरियम-सेट्टी,** देशमुख **हेमसेट्टी, कुंडिलीच्या** सेट्टींमध्ये अग्रगण्य **मल्लसेट्टी, कुवरलक्कसेट्टी, निगळदकेति सेट्टी, सेडम्बाळच्या बोंदलब्बेचे** पुत्र **सूरसेट्टी, आकेतसेट्टी** आणि **चवुडसेट्टी,** तेथील **कोप्पसेट्टी** (आणि) **होल्लसेट्टी**-यांनी **पिरियुगवार, सिरिगुप्प** जिल्हा, **जुगलकोप्प** जिल्हा आणि या जिल्ह्यांचे प्रतिनिधि म्हणून **शक संवत् १०६५, दुन्दुभि संवत्सर, भाद्रपद शुक्ल ६ शुक्रवार** या रोजी शुक्रवार बाजारात जमून **सेडम्बाळ**चा महाप्रभु **मादिराजय्य** याने बांधलेल्या देवालयातील **माधवेश्वराला** पूजाअर्चेकरिता खालील दाने दिली–

(बाजारात) विकलेल्या सुपाऱ्यांच्या अर्ध्या ओझ्यावर वीस सुपाऱ्या; पडशी-तील सुपाऱ्यांवर बारा; गाढवावर लादून आणलेल्या ओझ्यावर पंचवीस (सुपाऱ्या); बैलाच्या अर्ध्या ओझ्यावर पन्नास सुपाऱ्या; विकत घेणाऱ्या गिऱ्हाइकां-कडून प्रत्येक **होंगा**वर (सुवर्ण नाण्यावर) वीस सुपाऱ्या; प्रत्येक ओझ्यावर एकशे पन्नास विड्याची पाने; तेलाच्या प्रत्येक घड्यावर दोन **सोळस**; तुपाच्या प्रत्येक घड्यावर दोन **सोळस**[२]; गाडीभर तेलाच्या ओझ्यावर एक मण तेल; विविध प्रकारच्या धान्यांच्या एका रेड्याच्या ओझ्यावर सहा मण; तीच बैलावर वाहून आणली असल्यास एक **बळ्ळ**[१]; गाढवाच्या ओझ्यावर दोन मण; हसरातील प्रत्येक मणावर पळीभर आणि जास्त मालावर (राशीवर)[३] एक **कोळगे**; कापसाच्या प्रत्येक **हसरा**वर देवाच्या दीपांकरिता वातींचे एक **संडगे**.

(ओ. २९–३२) सेट्टिगुत्तांनीहि खालील दाने दिली – मालाची एक पडशी खाली उतरल्यावर एक चादर व गंधाची वाटी; आहत पण नाणी तपासणाऱ्यां-कडून प्रत्येक **होंगा**वर एक **हग**[४] नाणे; उत्तम गाडीच्या विक्रीवर एक उत्कृष्ट प्रतीची काठी; नाना प्रतीच्या धान्यांच्या प्रत्येक गाडीमागे एक **कोळगे**.

(ओ. ३२–३८) चैत्रातील उत्सवाकरिता (या) नगरातील लोकांनी प्रत्येक विवाहांच्या प्रसंगी एक **हग** (नाणे) द्यावयाचे; दिवाळीतील दिव्यांकरिता (या) नगरातील व्यापारी संघाच्या सभासदांनी दर घरी एक **हग** द्यावयाचे; कुंभाराच्या प्रत्येक दुकानाने एक मातीचा घडा द्यावयाचा; प्रत्येक **होंगाचा**[५] कस लावताना सोनारानी देवाला एक अड्ड द्यावयाचा; चांभारांनी सहा सहा महिन्यांनी एक चप्पलजोडी द्यावयाची; प्रत्येक जत्रेच्या प्रसंगी बुरुडांनी एक **मोरू** द्यावयाचा; मोचींनी दर सहा महिन्यांत एक चामड्याची पट्टी द्यावयाची.

---

१ बळ्ळ हे चार मणांचे माप असे (बार्नेट).

२ सोळस म्हणजे १६ मण (बार्नेट). ३ ओट्ट म्हणजे रास (बार्नेट).

४ हग हे एक चतुर्थांश पणाच्या किंमतीचे नाणे होते.

५ होंग (होन) हे सोन्याचे नाणे होते.

(ओ. ३८–४१) शेवटी हे येथे शासन समाप्त झाले. जो हे मोडेल त्याला गंगेच्या काठी, प्रयाग, वाराणसी आणि कुरुक्षेत्र येथे हजार गायींच्या हत्येचे पातक लागेल. त्याला आदित्यक्षेत्री स्वतःच्या ज्येष्ठ पुत्राची हत्या करून डोक्याच्या कवटीतून भक्षण करण्याचे महापातक लागेल.

(ओ. ४१–४३) स्वस्ति ! महामंडलेश्वर **विजयादित्यदेव वळवाड** येथील आपल्या कायमच्या शिबिरात सुखसंवादाने राज्य करीत असता––

(ओ. ४३–४९) **सेडम्बाळ**चा महाप्रभु **मादिराजय्य** याने बांधलेल्या देवालयातील **माधवेश्वरा**च्या पूजाअर्चेकरिता आणि त्याच्या मठातील मुनींच्या अन्नसंतर्पणाकरिता त्या मठाचा अधिपति **सोवराशि सिद्धान्तिदेव** याचे पादप्रक्षालन करून आणि उदक सोडून त्या राजाच्या पदकमलांचे आश्रित महाप्रधान आणि महाशुल्काधिकारी **भायिपय्य नायक** आणि **मिरिंजे** येथील बाजारांचे अधीक्षक **माळपय्य नायक** यांनी पुढील कर **शक संवत् १०६६, रुधिरोद्गारी संवत्सर, माघ कृष्ण चतुर्दशी, गुरुवारी, शिवरात्रीच्या** पर्वणीस दिले :–

(ओ. ४९–५४) **सेडम्बाळ**च्या पूर्वेस वाहणाऱ्या ओहळाच्या पूर्वेस बांधलेल्या दुकानांवर तेली आणि दुकानदार यांनी धान्यबाजारात घरपट्टीशिवाय एक तेलाचा घडा, विड्याच्या पानांच्या ओझ्यावर एक **पोम्म**, तसेच (इतर) किरकोळ कर, नाना प्रकारच्या अन्नधान्यांच्या पोत्यांवर जकातीसहित कराचा अर्धा भाग आणि खच्चून भरलेल्या सुपाऱ्यांच्या बैलावरून नेलेल्या प्रत्येक ओझ्यावर दीडशे चांगल्या सुपाऱ्या; महसूल कचेरीतील शुल्काधिकाऱ्यांनी प्रत्येक महिन्यास (आपल्या पगारातील) प्रत्येक **सुवर्ण नाण्यावर** त्याचा अष्टमांश भाग.

(यानंतर हे दान मोडणाऱ्यांच्या व पाळणाऱ्यांच्या बाबतीत नेहमीचे शापाशीर्वादवचन आले आहे.)

क्र. ५३

विजयादित्याचा कोल्हापूर शिलालेख : शक संवत् १०६५

या लेखाची **शिळा कोल्हापूरच्या** शुक्रवार वेशीजवळील जैन मंदिराच्या आवारात ठेवली आहे[१].

१ Graham, *Kolhapur*, p. 358; *Ep. Ind.*, Vol. III, pp. 207 f.

या शिलेच्या अग्रभागी मांडी घालून संमुख बसलेली जिनाची आकृति, डावीकडे गाय व वासरू, उजवीकडे एक वाकडी तलवार आणि त्या सर्वांवर डावीकडे सूर्य आणि उजवीकडे चंद्र कोरले आहेत.

अक्षरवटिका जुन्या कन्नड लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे. तीत कांही कन्नड राजबिरुदे व शब्द आले आहेत.

विषय – प्रस्तुत लेख **शिलाहारनृपति विजयादित्य** याच्या काळचा आहे. त्याची **वंशावळ** शिलाहारांच्या इतर लेखांतल्याप्रमाणेच आहे. पण तिचा विशेष हा की तीत प्रथम **जतिग** आणि **मारसिंह** यांच्या **सर्व** मुलांची नावे येथे दिली आहेत. **जतिगाला गोंकल, गूवल, कीर्तिराज** आणि **चन्द्रादित्य** असे चार पुत्र होते. गोंकलाचा पुत्र **मारसिंह** याला **गूवल, गंगदेव, बल्लाळदेव, भोज** आणि **गंडरादित्य** असे पाच पुत्र होते, असे येथे सांगितले आहे. **विजयादित्य** हा गण्डरादित्याचा प्रिय पुत्र होता, असेहि म्हटले आहे. त्याने ' महामंडलेश्वर ' पदवी धारण केली होती. इतर शिलाहारांसारखी त्यानेही बिरुदे घेतली होती, पण त्याशिवाय ' नीतिविजितचारायण ' आणि ' सहजकस्तुरिकामोद ' ही नवीन होती.

कालनिर्देश – प्रस्तुत लेखाचा काल **गत शक संवत् १०६५, दुंदुभि संवत्सर, माघ पौर्णिमा, सोमवार, चन्द्रग्रहण** असा दिला आहे. प्रस्तुत लेखातील शकवर्ष 'गत' म्हटले असले तरी ते वर्तमान मानले तरच त्याला दाक्षिणात्य पद्धतीने दुंदुभि संवत्सर जुळते[१]. यातील मितीची इंग्रजी तारीख १ फेब्रुवारी सन ११४२ येते. त्या दिवशी चंद्रग्रहण होते. कोल्हापूरच्या शिलाहारांच्या लेखातील चार वर्तमान शकवर्षांपैकी हे एक आहे.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश **विजयादित्य** राजाने आपल्या **वळवाड** येथील स्थायी शिबिरात सामन्त **कामदेव** याचा ताम्बूलधारी सेवक **वासुदेव** याने बांधलेल्या मंदिरातील **पार्श्वनाथ तीर्थंकराची** अष्टविधोपचारांनी पूजा, मंदिराची दुरुस्ती आणि मठातील मुनींना अन्नसंतर्पण याकरिता **आजिरगे** खोल्लाच्या **हाविण हेरिळिगे** गावातील **कुंडी** देशातील मापाने एक चतुर्थांश निवर्तन जमीन आणि १२ (चौरस) हाताचे घर दान दिले, हे नमूद करण्याचा होता. हा **वासुदेव क्षुल्लकपुर** येथील रूपनारायण जैन मंदिराचा आचार्य[२], **मूलसंघाच्या**

---

१ गत शक वर्ष १०६५ मध्ये माघ पौर्णिमेस चंद्रग्रहण होते, पण वार शनिवार होता. शिवाय दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे संवत्सर रुधिरोद्गारी नव्हते.

२ तेरदाळ आणि श्रवणबेळगोळ येथील शिलालेखांतहि माघनन्दिसिद्धान्तदेव कोल्हापूरच्या रूपनारायण मंदिराचा भट्टारक होता असे म्हटले आहे.

देशीय गणातील पुस्तकगच्छाचा प्रमुख **माघनन्दिसिद्धान्तदेव** याचा शिष्य होता. हे दान पूर्वोक्त माघनन्दिसिद्धान्तदेवाचा शिष्य **माणिक्यनन्दिपण्डित** याचे पादप्रक्षालन करून देण्यात आले होते. तो बहुधा रूपनारायण जैन मंदिराचा त्यावेळी भट्टाचार्य होता. म्हणून प्रस्तुत शिलालेख तेथे ठेवलेला दिसतो.

शेवटच्या कन्नड श्लोकात भगवान् जिन अमात्य **मेघनन्दी** आणि सामन्त **कामदेव** यांची स्तुती आहे.

स्थलनिश्चय – वळवाडाच्या स्थानाची चर्चा मागे केली आहे. दान दिलेले गाव ज्या आजिरगे **खोल्लात** होते त्याचे मुख्य ठिकाण **आजिरगे** हे कोल्हापूर जिल्ह्याच्या **आजरे** महालातील आजरे होय. **हाविण-हेरिलिगे** हे संयुक्त स्थलनाम दिसते. **हेरिलिगे** हे त्याच जिल्ह्याच्या चांदवड तालुक्यातील चांदवडच्या दक्षिणेस सहा मैलांवरचे हेरे असावे. त्याचे जोड गाव मात्र सध्या जवळपास दिसत नाही. **क्षुल्लकपुर** हे कोल्हापुराचे जुने नाव होते.

ओळ

वाचन[१]

१ **श्रीमत्परमगंभीरस्याद्वादामोघलांछनम् [।*] जीया[त्*] त्रैलोक्य-नाथस्य शासनं जिनशासनं(नम्)[२] ॥ * ॥ * [॥१॥*]**

२ **स्वस्ति श्रीर्ज्जयश्चाभ्युदयश्च ॥ जयत्यमलनानार्थप्रतिपत्तिप्रद-र्शकं(कम्) [।*] अर्हत-**

३ **˘ पुरुदेवस्य शासनं मोहशासनं(नम्) ॥[२॥*] स्वस्ति[।*] श्रीशिळाहारमहाक्षत्रियान्वये वित्र-**

४ **स्ताशेषरिपुप्रततिर्ज्जतिगो नाम नरेंद्रोभूत् । तस्य सूनवो गोंकलो गोवल:**

५ **कीर्तिराजश्चन्द्रादित्यश्चेति चत्वारः । तत्र गोंकलभूतळपतेर्म्मार-सिंहो नाम नन्दनः । तस्य तनुजाः गूवलो**

६ **गंगदेवः बल्लाळदेवः भोजदेवः गण्डरादित्यदे[व]श्चेति पंच । तेषु धार्म्मिकधर्म्मजस्य वैरिका-**

७ **न्तावैधव्यदीक्षागुरोः सकळदर्शनचक्षुषः श्रीमद्गण्डरादित्यदेवस्य प्रियतनयः । श्रीशिळा-**

---

१ प्रमुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून.

२ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

८ स्वस्ति समधिगतपंचमहाशब्दमहामण्डळेश्वरः ।[1] तगरपुरवराधी-
श्वरः । श्रीशिळा–

९ हारनरेन्द्रः निजविलासविजितदेवेन्द्रः जीमूतवाहनान्वयप्रसूतः ।
शौर्य्यविख्यातः ।

१० सुवर्ण्णगरुडध्वजः युवतीजनमकरध्वजः निर्द्दळितरिपुमण्डलिक-
दर्प्पः । मरुवंकसर्प्पः ।

११ अय्यनसिंगः । सकळगुणतुंगः । रिपुमंडळी (ळि) कभैरवः । विद्वि-
ष्टगजकण्ठीरवः ।

१२ इडुवरादित्यः । कलियुगविक्रमादित्यः । रूपनारायणः । नीति-
विजितचा–

१३ रायणः । गिरिदुर्ग्गलंघनः । विहितविरोधिवंघनः । शनिवारसिद्धिः ।
धर्म्मैकबुद्धिः । महा–

१४ लक्ष्मीदेवीलब्धवरप्रसादः । सहजकस्तुरिकामोदः । एवमादिना-
मावली–

१५ विराजमानश्रीमद्विजयादित्यदेवः । वळवाडस्थिरशिबिरे सुखसंक-
थाविनोदेन राज्यं कु–

१६ र्व्वाणः । शकवर्षेषु पंचषष्टयुत्तरसहस्रप्रमितेष्वतीतेषु प्रवर्त्तमान-
दुं–

१७ दुभिसंवत्सरमाघमासपौर्ण्णमास्यां सोमवारे । सोमग्रहणपर्व्व-
निमि–

१८ त्तमाजिरगेखोल्लानुगतहाविनहेरिळगे ग्रामे । सामन्तकामदेवस्य
हडप–

१९ वळेन श्रीमूलसंघदेशीयगणपुस्तगच्छाधिपतेः क्षुल्लकपुरश्रीरूप-
नारायणजि–

---

१ ओ. ८–२१ मधील विरामचिह्ने निरर्थक आहेत.

२० नालयाचार्य्यस्य श्रीमन्माघनन्दिसिद्धान्तदेवस्य प्रियच्छात्रे(त्त्रे)ण। सकळगुणरत्नपात्रेण ।

२१ जिनपदपद्मभृंगेण । विप्रकुलसमुत्तुंगरंगेण । स्वीकृतसद्भावेन । वासुदेवेन ।

२२ कारितायाः वसतेः श्रीपार्श्वनाथदेवस्याष्टविधार्च्चनार्त्थं तच्चैत्यालयखण्ड–

२३ स्फुटितजीर्ण्णोद्धारार्त्थं ।[1] तत्रत्ययतीनांमाहार[2]दानार्त्थं च । तत्रैव ग्रामे

२४ कुण्डिदण्डेन निवर्त्तनचतुर्त्थभोगप्रमितं क्षेत्रं । द्वादशहस्तसम्मितं गृहनिवेशनं

२५ च । तन्माघनन्दिसिद्धान्तदेवशिष्याणां माणिक्यनन्दिपण्डितदेवानां । पादौ प्रक्षाल्य धारापू–

२६ र्व्वकं सर्वनमस्यं सर्व्वबाधापरिहारमाचन्द्रार्क्कतारं सशासनं दत्तवान् ।।

२७ तदागामिभि । रस्मद्वंश्यै । रन्यैश्च । राजभि । रात्मसुखपुण्ययशस्सन्ततिवृद्धिमभिलिप्सुभिः । स्व–

२८ दत्तिर्निर्व्विशेषं प्रतिपादनीयमिति ।। शान्तरसक्के ताने नेलेयाद

२९ जिनप्रभु तन्न दैव । मश्रान्त[3]गुणक्के ताने नेलेयाद तपोनिधि माघनन्दिसैद्धान्तिक–

३० योगि तन्न गुरु । तन्नाधिपं विभु कामदेवसामंतनिदुत्तमत्वमिदु

३१ पुण्य मिदुन्नति वासुदेवेन[4] ।।

---

१ या आणि पुढील कांही ओळीतील विरामचिन्हे निरर्थक आहेत.
२ 'यतीनामाहार–' वाचावे.
३ 'दैवमश्रान्त–' वाचावे. ४ वृत्त – उत्पलमालिका.

क्र. ५४

विजयादित्याचा बामणी शिलालेख : शक संवत् १०७३

या लेखाची **शिला** कोल्हापूर जिल्ह्याच्या कागल तालुक्यातील कागलच्या नैर्ऋत्येस पांच मैलांवरच्या **बामणी** गावातील जैनमन्दिराच्या दरवाजाजवळ होती[१] ती आता कोल्हापूरच्या रूपनारायण जैनमन्दिराच्या आवारात ठेवली आहे.

वर्णन – या शिलेच्या अग्रभागी मध्ये पद्मासनस्थ जिन, त्याच्या मागे सात फण्यांचा नाग, डावीकडे गाय व वासरू, उजवीकडे वाकडी तरवार आणि या सर्वांवर डावीकडे सूर्य आणि उजवीकडे चन्द्र कोरले आहेत. त्याखाली प्रस्तुत लेख कोरला आहे.

अक्षरवटिका जुन्या कन्नड लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे. पण ओ. ४३ च्या कांही भागांत आणि ओ. ४४ ह्यांमध्ये कन्नड भाषेचा उपयोग केलेला आहे.

विषय – प्रस्तुत लेख **शिलाहार** नृपति **विजयादित्य** याच्या काळचा आहे. त्यात त्याची **वंशावळ** इतर कोल्हापूरच्या शिलाहारांच्या लेखांतल्याप्रमाणेच दिली आहे पण तीत सरळ रेषेतील गादीवर आलेल्या पूर्वजांचीच नावे दिली आहेत. त्यांच्या भावांची नावे गाळली आहेत. याला अपवाद फक्त प्रथम गूवलाचा आहे. विजयादित्याची बिरुदे इतर ताम्रपटांतल्यापेक्षा कमी आहेत.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश **विजयादित्याने** आपला मुक्काम **वळवाड** येथे असताना पार्श्वनाथाच्या वसतीतील देवांची पूजा, मंदिराची दुरुस्ती आणि तेथील मुनींना अन्नसन्तर्पण यांकरिता **[प]णतुरगेगोल्ल** विषयातील **मडलूर** गावी **कुंडि** देशातील मापाने एक चतुर्थांश निवर्तन जमीन, ३० **स्तंभ** मापाचो फुलबाग आणि १२ (चौरस) हस्तांचे घर आपला मातुल सामन्त **लक्ष्मण** याच्या विनंतीवरून त्याच्या कुलाच्या पुण्योपार्जनाकरिता दान दिली, हे नमूद करण्याचा होता. ही वसति (मंदिर) **लणगमय्य** आणि **चन्ध.. व्वा** यांचा पुत्र, आणि **पुन्नकव्वेचा** पति **चोधोरे कामगावुंड** याने बांधली होती. हे दान **माघनन्दिसिद्धान्तदेवाचा** शिष्य **अर्हन्नन्दिसिद्धान्तदेव** याचे पादप्रक्षालन करून दिले होते. प्रस्तुत लेखात हा **माघनन्दिसिद्धान्तदेव कुन्दकुन्दान्वयाचा** आचार्य आणि **कुलचन्द्र** मुनीचा शिष्य होता ही नवीन माहिती मिळते.

---

१ Graham — *Kolhāpur*, p. 381; *Ep. Ind.*, Vol. III, pp. 211 f.

कालनिर्देश – प्रस्तुत लेखाचा काल **गत शक संवत् १०७३, प्रमोद संवत्सर, भाद्रपद पौर्णिमा, शुक्रवार, चन्द्रग्रहण** असा दिला आहे. यातील शकवर्षाला, 'गत' असे म्हटले असले तरी त्या वर्षाला वार आणि संवत्सर जुळत नाहीत. पण हे वर्ष 'वर्तमान' मानल्यास ती जुळतात. वर्तमान शक १०७३ मध्ये संवत्सर प्रमोद होते, भाद्रपद पौर्णिमा शुक्रवारी होती आणि त्या तिथीस चंद्रग्रहणहि होते. त्याची इंग्रजी तारीख ८ सप्टेंबर सन ११५० येते.

शेवटच्या दोन ओळी **कन्नड भाषेत** आहेत. त्यांत प्रस्तुत लेख **अभिनन्ददेवाचा** शिष्य आणि सुवर्णकार **बम्योज** याचा पुत्र **गोव्योज** याने कोरला, असे म्हटले आहे.

स्थलनिश्चय – **पणतुरगे** हे कोल्हापूरच्या नैर्ऋत्य दिशेस १४ मैलांवरचे पणुत्रे असावे, हे दीक्षितांनी दाखविले आहे. त्यांनी **मडलूर** हे पणुत्र्याच्या पश्चिमेस ३ मैलांवरचे मंदूर असावे असे म्हटले आहे,[१] पण ते मला महाराष्ट्राच्या गावांच्या वर्णक्रमीत सापडले नाही. मडलूर हे कोल्हापूर जिल्ह्याच्या भूदरगड तालुक्यातील मडूर असावे. ते गारगोटीच्या उत्तरेस सुमारे चार मैलांवर आहे.

वाचन[२]

१ **स्वस्ति ।। जयत्यमलनानार्थप्रतिपत्तिप्रदर्शकं(कम्) । अर्हत ऽ-पुरुदेव-**

२ **स्य शासनं मोहशासनं(नम्)[३]।।[१।।*] श्रीशिळाहारवंशे जतिगो नाम [क्षि]-**

३ **तीशस्संजातस्तपुत्रौ गोंकलगूवलौ । तत्र गोंकलस्य सू[नू]-**

४ **र्म्मारसिंहदेवस्तदपत्यं गण्डरादित्यदेवस्तस्य नन्दनः ।[४] समधिग-**

५ **तपंचमहाशब्दमहामण्ड[ले]श्वरः । तगरपुर-**

६ **वराधीश्वरः श्रीशिळाहारवंशस(न)रेन्द्रः ।। जीमूतवाहना-**

७ **न्वयप्रसूतः । सुवर्ण्णगरुडध्वजः । मरुवक्कसर्प्पः । अय्यनसिं-**

---

१ *Ep. Ind.*, Vol. XXIX, pp. 14 - 15.

२ मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून.

३ वृत्त – अनुष्टुभ्.

४ हा आणि यासारखे पुढील कांही ओळींतील दंड निरर्थक आहेत.

८ गः । रिपुमंडळिकभैरवः । विद्विष्ट[ग]जकण्ठीरवः । इडुवरादित्यः ।

९ कलियुगविक्रमादित्यः । रूपनारायणः । गिरिदुर्ग्गलंघनः । श–

१० निवारसिद्धि(द्धिः) । श्रीमहालक्ष्मीलब्धवरप्रसाद इत्यादिनामावळिविराजमानः

११ श्रीमद्विजयादित्यदेवः । वळवाडस्थिरशिबिरे सुखसंकथावि–

१२ नोदेन विजयराज्यं कुर्व्वन् । शकवर्षेषु त्रिसप्तत्युत्तरसह–

१३ स्रप्रमितेष्वतीतेषु अंकतोपि १०७३ प्रवर्त्तमानप्रमोदसंव[त्स]–

१४ र[1]भाद्रपदपौर्ण्णमासी शुक्रवारे सोमग्रहणपर्व्वनिमि[त्तं]. .

१५ णतुरगे[2]गोळ्ळानुगतमडलूरग्रामे सणगमय्यचंध. .

१६ व्वयोः पुत्रेण । पुन्नकब्बाया ~ पत्या जन्तगावुण्डहेम्म–

१७ गावुण्डयो ~ पित्रा चोधोरेकामगावुण्डेन कारितायाः

१८ श्रीपार्श्वनाथवसतेर्द्देवानामष्टवि[धा]र्च्चन[3]निमित्तं । वसतेः ख–

१९ ण्डस्फुटितजीर्ण्णोध्धा(द्धा)रार्त्थं । तत्र स्थितयतीनामाहार–

२० दानार्त्थं च तस्मिन्नेव ग्रामे कुंडिदेशदण्डेन निव–

२१ र्त्तनचतुर्त्थभागप्रमितक्षेत्रं । तेनैव दण्डेन त्रिं–

२२ शत्स्तंभप्रमाणपुष्पवाटीं । द्वादशहस्तप्रमाण–

२३ गृहनिवेशनं च स राजा निजमातुललक्ष्मणसामन्तविज्ञा–

२४ पनेन तस्यैव गोत्रदानार्त्थं श्रीमूलसंघदेशीयग–

२५ णपुस्तकगच्छक्षुल्लकपुरश्रीरूपनारायणचैत्याल–

२६ यस्याचार्य्यः ।। श्रीमाघनन्दिसिद्धान्तदेवो विश्वमही–

२७ स्तुतः । कुलचंद्रमुनेः शिष्यः कुन्दकुन्दान्वयां–

२८ शुमान्[4] ।।[२।।*] अपि च । रोदोमण्डळमङ्ग किं स्ववपुषा[5]

---

१ 'संवत्सरे भाद्रपदपौर्ण्णमास्यां शुक्रवारे' वाचावे.

२ कीलहॉर्नने –णवु[क]गे असे संशयाने वाचले होते. दीक्षितांचे वाचन वर दिले आहे. पणतुरगे याचा उल्लेख द्वितीय भोजाच्या कोल्हापुर शिलालेखात (क्र. ५८) आला आहे.

३ प्रथमतः '–र्च्चण' कोरले होते. ४ वृत्त– अनुष्टुभ्.

५ प्रथम 'वपुउषा' कोरले होते.

२९ व्याप्नोति शक्रद्विपः किं क्षीरांबुधिरावृणोति भुवनं गंगांबु

३० किं वेष्टते । स्त्यानोयं प्रियसुस्थिरः समरुचर्तिक सांद्रचंद्रात-

३१ पो यत्कीर्त्यैत्थमभूद्वितर्कणमसौ श्रीमाघनन्दी जयेत्[१] ॥[३॥*] त-

३२ न्मुनींद्रस्यांतेवासिनामर्हन्नन्दिसिद्धान्तदेवानां पादौ

३३ प्रक्षाल्य धारापूर्व्वकं सर्व्वनमस्यं सर्व्वबाधापरिहारमाचं-

३४ द्रार्क्कतारं सशा[स*]नं दत्तवान् ॥ ❊ ॥ स्वदत्तां परदत्तां वा यो हरेत वसु-

३५ न्धरां(राम्) । षष्टिं वर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः[२] ॥[४॥*] न विषं विषमि-

३६ त्याहुर्द्देवस्वं विषमुच्यते । विषमेकाकिनं हन्ति देवस्वं पु-

३७ त्रपौत्रकं(कम्) ॥[५॥*] अपि च ॥ सवत्सां कपिलां शस्त्र्या हत्वास्या

३८ मांसशोणिते । गंगायां सोत्ति यो गृह्णात्यमूं धर्म्मोर्व्वरां

३९ नरः ॥[६॥*] तत्पातक[३]फलेनासौ यावच्चन्द्रदिवाकरं(रम्) । तावद्घोरतरं दुःख-

४० मश्नुते नरकावनौ ॥[७॥*] अन्यच्च ॥ ❊ ॥ मातुस्सार्द्द्रकपालेन सोत्ति मा-

४१ तंगवेश्मसु [।*] श्वमांसं भिक्षया लब्धं गये(?)यो[४] धर्म्मभूहरः ॥ ❊ ॥[८॥*]

४२ भद्रमस्तु जिनशासनाय ।।[५] संपद्यतां प्रतिविधानहेतवे । अन्य-

४३ वादिमदहस्तिमस्तकस्फाटनाय घटने पटीयसे[६] ॥ ❊ ॥ अक्क-साले बं-

४४ म्योजनपुत्र । अभिनंददेवर गुड्ड गोव्योजन खडरणे ॥ ❊ ❊ ❊

---

१ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

२ श्लो. ४ ते ८ चे वृत्त – अनुष्टुभ्.

३ 'पातक' यांतील 'त' हे अक्षर प्रथम गळले होते. ते नंतर ओळीच्यावर कोरले आहे.

४ 'गयायां' वाचावे.

५ हे विरामचिह्न निरर्थक आहे.

६ वृत्त – रथोद्धता.

क्र. ५५

विजयादित्याच्या काळचा शेडबाळ शिलालेख : शक संवत् १०७८

या लेखाची **शिला** विजापूर जिल्ह्याच्या अथणी तालुक्यातील **शेडबाळ** गावी बसवण्णा मंदिराला लावली आहे[१]

वर्णन– या शिळेवरील कोरलेल्या भागाची रुंदी ५०.८० कि. मी. आणि उंची ३१.७५ कि. मी. आहे. हा लेख बराच खराब झाला आहे. ६ ते १० ओळींच्या अखेरीची कांही अक्षरे नष्ट झाली आहेत. शिवाय १ ते ६ ओळीत पडलेल्या भेगेने कांही अक्षरे खराब झाली आहेत आणि इतर कांही आता अस्पष्ट झाली आहेत. तथापि प्रस्तुत लेखाचा अर्थ लावण्यात फारशी अडचण येत नाही.

अक्षरवटिका जुन्या कन्नड लिपीची आहे. **भाषा** पहिल्या तेवीस ओळीत आणि चौवीसच्या कांही भागात **कन्नड** आणि शेवटच्या शापाशीर्वादात्मक श्लोकात संस्कृत आहे.

विषय – प्रस्तुत लेख कोल्हापूरचा **शिलाहारनृपति विजयादित्य** याच्या काळचा आहे. त्याची बिरुदे इतर लेखांतल्याप्रमाणे आहेत. लेखाचा उद्देश पूर्वोक्त विजयादित्य **वळवाड** येथून राज्य करीत असता **नागोज** सोनार आणि **रेवगा-उंड** यांनी पदार्थांच्या किंमतीवरील कांही कर स्थानिक **श्रेणींना** दिले होते, हे नमूद करण्याचा होता. तसेच त्या ठिकाणी झालेल्या विवाहांच्या प्रसंगी विकलेल्या कापडांच्या किंमतीवर दर **होन्नूला** एक **वीस** असा कर त्याच श्रेणींना ठरवून दिला होता. या करांचे उत्पन्न स्थानिक श्रेणींच्या सल्ल्याने **रेवगाउंडाने** तेथील बसदी आणि (हिंदु) मंदिर यांना समभागांत विभागून द्यावयाचे होते.

कालनिर्देश – प्रस्तुत लेखाचा काल **शक संवत् १०७८, श्रीमुख संवत्सर, चैत्र शुक्ल ५, आदित्यवार** असा उल्लिखिला आहे. १०७८ हे वर्ष चुकीने १०७५ बद्दल कोरलेले दिसते; कारण प्रस्तुत लेखात उल्लेखिलेले **श्रीमुख**

---

१ Kundangar, *Inscriptions in Northern Karnāṭaka* and *the Kolhāpur State*, No 34; *An. Rep. and. Epi. for* 1953-54, No. 187, p. 36.

संवत्सर दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे गत शक संवत्सर १०७५ लाच येते. ही दुरुस्ती केल्यास लेखातील मिति आदित्यवारी (१ मे सन ११५३ रोजी) पडते.[१]

स्थलनिश्चय – प्रस्तुत लेखात वळवाड या एकाच स्थलाचा निर्देश आहे. त्याची चर्चा मागे केली आहे.[२]

ओळ **वाचन**[३]

१ [सिद्धम्[४]] स्वस्ति । स[५]मधिगतपंचमा(म)हास(श)ब्दमहाम–
२ [ण्ड]ळेश्वरतगरपुरवराधीश्वरं श्रीसि(शि)ळा–
३ हा[रन]रेंद्र जीमूतवाहनान्वय–
४ प्रसूत सुवर्ण्णगरुडध्वज वीरमकरध्वज म–
५ रुवंकसर्प रूपकंदर्प्प [इडु]वरादि–
६ त्य सौ(शौ)चगांगेय अय्यनसिंघ सा..[६]
७ त्तुंग वैरीभकंटी(ठी)रव महालक्ष्मीदेवीलब्ध[वरप्र–]
८ साद समस्तनामावळीसहित श्रीम[न्महा*]–
९ मण्डळेश्वर विजयादित्यदेवरसरु वळ[वा]–
१० डद नेलेवीडनलु सुखसंकथावि[नो]–
११ ददिं राज्यं गेय्युत्तमिरलु स(श)कवर्षं १०७८ श्रीमु–
१२ खसं[व]त्सर चैत्र सु(शु)ध्ध(द्ध) ५ आदित्यवारदंदु से–
१३ णिग कोत्तळिगळुं अक्कसाले नागोजं होंगे वीस

---

१ कुन्दनगारांनी या लेखाची मिति 'शक १०७५, चैत्र प्रथम पक्ष, पंचमी' अशी वाचून तिची इंग्रजी तारीख व वार सोमवार, २२ मार्च किंवा शनिवार ८ मार्च असे दिले आहेत. इतर विशेष दिले नसल्याने ते पडताळून पाहता येत नाहीत असेहि त्यांनी म्हटले आहे. पण ओ. १२ मध्ये 'आदित्यवारदन्दु' असा स्पष्ट उल्लेख आहे. येथील तिथि वाराशी जुळते, हे वर सांगितले आहेच.

२ या लेखाचे वाचन व भाषांतर मुख्य एपिग्राफिस्ट डॉ. जी. एस्. गै यांनी केले आहे. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

३ मुख्य एपिग्राफिस्टनी पुरविलेल्या छापावरून. ४ चिह्नाने प्रदर्शित.

५ 'स' हे अक्षर ओळीच्या वर कोरलेले आहे.

६ 'साहसो–' वाचावे.

१४ दलेक्कदिं कोट्टदवणायमना कोत्तळिगळ्माडिसि–
१५ दबसदिदेवाल्यक्के मूलिग एंट्टु हिट्टु सा(शा)सनंग–
१६ ळरि्ये अक्कसाले नागोजनुं[1] रेवगाउ(वु)ण्डरुं
१७ समस्तकोत्तिळिगं धारापूर्व्वकं माडिकोट्टदव[2]णायं
१८ होंगे वीसं लेक्कदायम रेवगाउ(वु)ण्डं कोत्तळिमुख्य–
१९ मागेत्ति ब[स]दिगं देगुलक्कं समानवागिप–
२० च्चुकुड्डवुदु मत्तं केरियोळु हरॆहोय्द
२१ मदुवेगे चिन्न[क]रियमदुवेगे हाग
२२ सेणिग सीरेगे विळस[वि]क्किद सीरेगे होंगे वी–
२३ स लेक्कदिं तिरुवुदु [तेरु]व[नु]क्रमदिं पच्चु
२४ कुडुवुदु ॥ * ॥ स्वदत्तं(त्तां) परदत्तं(त्तां) वा यो हरे–
२५ ति(त) वसुंधरां(राम्) [।*] स(ष)ष्टिव्वर्षसहश्रा(स्रा)णि
विष्टा(ष्ठा)यां
२६ जायते क्रि(कृ)मिः[3] ॥

भाषांतर

सिद्धि असो ! स्वस्ति !

ज्याने पंच महाशब्द प्राप्त करून घेतले आहेत, महामण्डलेश्वर, तगर या श्रेष्ठ नगराचा अधीश्वर, **शिलाहारनृपति,** जीमूतवाहनाच्या वंशात जन्मलेला सुवर्ण गरुडध्वज असलेला, वीरांमध्ये मदनासारखा, शत्रुसैन्यांना सापासारखा, रूपात मदनासारखा, धनुर्धरांत आदित्यासारखा, शुद्धाचरणात भीष्मासारखा, आपल्या पित्याला सिंहासारखा, साहसांत श्रेष्ठ असलेला, शत्रुरूपी हत्तींना सिंहासारखा, महालक्ष्मीचा वरप्रसाद प्राप्त झालेला इत्यादि सर्व बिरुदे असलेला श्रीमन्महामण्डलेश्वर **विजयादित्यदेव वळवाड** येथील शिबिरात सुखसंवादाने आपले मनोविनोदन करीत राज्य करीत असता–

---

१ ‘गो’ हे अक्षर ओळीच्या खाली लिहिले आहे.

२ ‘व’ चा वक्राकार भाग हा लहान आकारात ओळीच्या वर कोरलेला आहे.

३ वृत्त – अनुष्टुभ्.

(ओ. ११–२०) शकवर्ष १०७८ (१०७५), **श्रीमुख संवत्सर चैत्र शुद्ध ५, आदित्यवार** रोजी–

सोनार **नागोज** आणि **रेवगाउंड** यांनी उदक सोडून मूलिग, एंट्टुहिट्टु (श्रेणी) आणि राज्यसरकार यांस कळवून सर्व समितीवर सोपविले आहे की व्यापाऱ्यांच्या श्रेणींच्या समितींनी आणि **नागोज** सोनाराने दिलेले **दवणाय** (निश्चित कराचे उत्पन्न) दर **होन्नूवर** एक **वीस** या दराने मिळालेले त्या समितींनी बांधलेल्या बसदीत व देवळात वाटून द्यावे. हे **दवणाय**–दर **होन्नूवर** एक **वीस – रेवगाउंडाने** समितींच्या सल्ल्याने बसदी आणि मंदिर यांमध्ये समभागाने वाटून द्यावे.

(ओ. २०–२४) रस्त्यात तसेच चिन्नकरीत तसेच वाद्य वाजवून केलेल्या प्रत्येक विवाहप्रसंगी व्यापाऱ्यांच्या श्रेणींनी विकलेल्या प्रत्येक कापडावर एक **हग** आणि .... कपड्याच्या किंमतीवर दर **होन्नू**मागे एक **वीस** द्यावा. त्या उत्पन्नाची योग्य वाटणी बसदी आणि मंदिर यांत व्हावी.

(यानंतर शापाशीर्वादात्मक श्लोक आला आहे.)

क्र. ५६

विजयादित्याचा जुगल येथील खंडित शिलालेख

प्रस्तुत लेखाची **शिला** कर्नाटक राज्याच्या बेळगाव जिल्ह्यातील **जुगल** गावी एका गृहस्थाच्या घराजवळ आढळली होती. या लेखाचा अगदी संक्षिप्त परिचय अॅन्युअल रिपोर्ट ऑन् इंडियन एपिग्राफी, सन १९५३–५४, क्र. १७९, पृ. ८५ मध्ये दिला होता. मुख्य एपिग्राफिस्ट यांनी पाठविलेल्या छापावरून तो येथे संपादिला आहे.[1]

वर्णन – प्रस्तुत **शिला** मूळच्या शिलेचा अगदी लहानसा (३६ कि. मी. रुंदीचा) तुकडा आहे. तिचा खालचा भाग नष्ट झाल्यामुळे तिची मूळची उंची सांगता येत नाही.

अक्षरवटिका कन्नड लिपीची आणि **भाषा** कन्नड आहे.

विषय – प्रस्तुत लेख कोल्हापूरच्या **शिलाहारनृपति विजयादित्य** याच्या काळचा आहे. त्याची बिरुदे इतर लेखांतल्या प्रमाणे आहेत. तो **वळवाड** येथील

---

१ प्रस्तुत लेखात विजयादित्याची केवळ बिरुदे आली असल्यामुळे आणि त्यांचे भाषांतर मागील लेखाच्या भाषांतरात दिले असल्यामुळे ते पुनः येथे दिले नाही.

शिबिरात सुखसंवादात मनोविनोदन करीत राज्य करीत असलेला असा वर्णिला आहे. नंतरचा भाग नष्ट झाल्यामुळे या लेखाचा उद्देश, काळ वगैरे विशेष नष्ट झाले आहेत. त्यामुळे या लेखाने आपल्या लेखात कांहीच भर पडत नाही. तथापि या लेखावरून विजापूर जिल्ह्याचा कांही भाग विजयादित्याच्या काळात शिलाहारांच्या राज्यात मोडत असे, असे अनुमान करता येते.[1]

ओळ **वाचन**

१ सिद्धम् । स्वस्ति [।*] समधिगतपंचमहाशब्दमहा[मण्ड]–
२ ळेस्व(श्व)रतगरपुरपरमेश्वरश्रीशि–
३ ळाहारनरेंद्रजीमूतवाहनान्व–
४ यप्रसूतं सुवर्ण्णगरुडध्वजं मरु–
५ वक्कसर्पं अय्यनसिंगं रिपुमंडळिक–
६ भैरवं रिपुविद्विष्टगजकण्ठीरवं इडु–
७ वरादित्यं रूपनाराय[णं] शौचगांगेयं
८ स(श)निवारसिध्धि(द्धि) गिरिदुर्गलंघनकलियु–
९ गविक्रमादित्य श्रीमहालक्ष्मीदेवीलब्धवर–
१० प्रसाद इत्यादि नामावळिविराजित श्रीमद्–
११ [वि]जयादित्यदेवरसरु वळवाडद नेले[वे]–
१२ डिनलु दुष्टनिग्र[ह*] सि(शि)ष्टप्रतिपाळणपुर–
१३ [स्स]रं सुक(ख)संकथाविनोददिं राज्यं गेयुत्त[मि]
१४ रे . . . .

क्र. ५७

विजयादित्याच्या काळचा खिद्रापूर शिलालेख

प्रस्तुत लेख कोल्हापूर जिल्ह्याच्या शिरोळ तालुक्यातील **खिद्रापुर** गावी कोप्पेश्वर मंदिराच्या बाहेरच्या भिंतीला लावलेल्या ब्रॅकेटच्या मूर्तीखाली कोरला आहे.[1]

---

१ Kundangar, *Inscriptions in Northern Karnāṭaka and Kolhāpur State*, No. 25.

हा लेख १०६.६८ कि. मी. रुंद आणि २५.४० कि. मी. उंच आहे. तो सुस्थितीत आहे.

अक्षरवटिका कन्नड लिपीची आणि **भाषा** कन्नड आहे.

विषय – प्रस्तुत लेखाच्या दुसऱ्या ओळीत '**विजय**' नामक अवनिपतीचे (राजाचे) नाव आले आहे. तो कोल्हापूरचा शिलाहारनृपति विजयादित्य होय. या लेखामध्ये त्या राजाचा **दंडनायक** (सेनापति) **बोप्पण** याचे वर्णन आले आहे. तो शत्रूंचा कर्दनकाळ आणि त्या राजाच्या शत्रूंचा निःपात करणाऱ्या त्याच्या वीरांमध्ये श्रेष्ठ आहे, असे म्हटले आहे.

हा लेख खिद्रापूरजवळ झालेल्या घनघोर युद्धात **बोप्पण दण्डनायकाने** महान् विजय संपादन केल्यावर कोरला असावा. त्याचा शत्रु कलचुरि बिज्जल असावा असे इतरत्र दाखविले आहे.[1]

ओळ

वाचन[2]

१ **श्रीहरिगे गरुतुमनन्ते मदनारिगे षण्मुखनन्ते रावणासुहरनप्प राघव–**

२ **न्रिपंगे मरुत्सुतनन्ते वैरिभीकर विजयावनिपतिगे संगरदो–**

३ **ळु रिपुमारणक्रियापरिणतियल्लि सुभटाग्रणि बो–**

४ **प्पणदण्डनायकन्न ॥**

भाषांतर

हरीला (विष्णूला) गरुडाप्रमाणे, मदनारीला (शंकराला) षण्मुखाप्रमाणे, रामाला मरुत्सुता(हनुमाना)प्रमाणे **विजय** राजाला शत्रूंना भयभीत करणारा, युद्धात (शत्रूंचा) निःपात करण्यात निपुण अशा वीर पुरुषांत श्रेष्ठ असा **बोप्पण दण्डनायक** आहे.

---

१ प्रस्तुत लेखाचे वाचन व भाषांतर या बद्दल मी डॉ. जी. एस्. गै यांचा ऋणी आहे.

२ मुख्य एपिग्राफिस्ट यांनी पाठविलेल्या छापावरून.

क्र. ५८

द्वितीय भोजाचा कोल्हापूर शिलालेख : शक संवत् ११०४

या लेखाची **शिला** कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या आवारातील श्री. पंडितरावांच्या घराचा पाया खणत असता सापडली होती. ती आता कोल्हापूरच्या टाउन हॉल मध्ये ठेवली आहे.[1]

ही शिला ४½ फू. रुंद आणि २½ फू. उंच आहे. तिच्या अग्रभागी मध्ये मंगल कलश, डावीकडे गाय व तिचे वासरु, उजवीकडे वाकडी तरवार आणि या सर्वांवर सूर्य व चंद्र यांच्या आकृति कोरल्या आहेत. प्रस्तुत लेखाचा कांही भाग अस्पष्ट झाला आहे, आणि कांही अक्षरे इतर काही भाग फुटल्यामुळे नष्ट झाली आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे.

विषय – प्रस्तुत लेख कोल्हापूरचा **शिलाहार नृपति द्वितीय भोज** याच्या काळचा आहे. त्याची वंशावळ इतर लेखांतल्या प्रमाणेच बहुतांशी आहे; पण कांही ठिकाणी थोडा फरक आहे. येथे **मारसिंहाचे** चार पुत्र पुढील क्रमाने दिले आहेत: **गूवल**, (प्रथम) **भोज**, त्याचा **धाकटा भाऊ बल्लाळ** आणि त्याचा **धाकटा भाऊ गंडरादित्य.** ताळले ताम्रपटातहि (प्रथम) भोज हा गूवलाचा धाकटा भाऊ होता, हे स्पष्टपणे सांगितले आहे, पण विजयादित्याच्या कोल्हापूर शिलालेखात मारसिंहाच्या मुलांची नावे पुढील क्रमाने दिली आहेत:– गूवल, गंगदेव, बल्लाळदेव, भोजदेव आणि गंडरादित्य. बामणी लेखांत तर सरळ रेषेत नसलेले बहुतेक पूर्वज गाळले आहेत.

प्रस्तुत लेखातील राज्यकर्ता भोज याने कोल्हापूरच्या शिलाहारांच्या लेखांत आढळणारी बरीचशी बिरुदे धारण केलेली दिसतात; पण कांही – उ. 'परनारीसहोदर,' 'शरणागतवज्रपंजर'[2] आणि 'कलियुगयुधिष्ठिर', नवीन आहेत. त्याने 'महामण्डलेश्वर' पदवी धारण केली होती.

---

१ पूर्वी ती हरिहरेश्वराच्या मंदिराला लावली होती आणि तिची पूजा केली जात असे, असे दीक्षितांच्या वर्णनावरून दिसते. तिच्यावरची अनेक अक्षरे पाण्याने खराब झाली आहेत. ए. इं., व्हॉ. २९, पृ. १३ इ.

२ हे बिरुद उत्तर कोकणच्या शिलाहारांच्या लेखांत आढळते. विजयादित्याने त्या शाखेच्या प्रथम अपरादित्याला राज्य परत मिळविण्याकरिता मदत केल्यावर कोल्हापुरच्या शिलाहारांनी ते धारण केले असावे.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश भोजाने **वळवाड** येथील आपल्या शिबिरात असताना आपल्या राज्याच्या वृद्धचर्थ पुढील दाने दिली हे नमूद करण्याचा होता– (१) सहवासी ब्राह्मण **लोकण नायक** याने बांधलेल्या **उमामहेश्वराच्या मठाच्या** धान्यागाराकरिता एक घर; (२) त्या मठात राहणाऱ्या चार ब्राह्मणांकरिता–दोन **सहवासी आदित्यभट्ट** आणि **जनार्दनभट्ट**[४], आणि दोन **करहाट ब्राह्मण प्रभाकर घैसास** आणि **वासियण घैसास**, अशा प्रकारे चार ब्राह्मणांस चार धवलगृहे, (३) देवाच्या पूजेकरिता फुलबाग, (४) ब्राह्मणांच्या भोजनाकरिता **पणतुरगे** गोल्लाच्या **सेलेयवाड** गावातील एक शेत आणि **पंडरनन्त** गावातील एक घर, (५) देवाच्या पंचोपचार पूजेकरिता आणि मठाच्या सुस्थितीकरिता **एडेनाडच्या** दंडाने मोजलेले २२५ **वप्रकाचे** शेत, १२ (चौरस) हात प्रमाणाचे घर आणि दुसरे एक · · · निवर्तनांचे शेत आणि १२ (चौरस) हाताचे घर. हे शेवटचे शेत लोकण नायकाने **नेमण** आणि **लक्ष्मण** यांच्याकडून विकत घेऊन दिले होते.

कालनिर्देश – ह्या लेखाचा काळ **गत शक संवत् ११०५, शुभकृत् संवत्सर, पुष्यशुक्ल चतुर्थी, मंगळवार, उत्तरायण संक्रान्ति,** असा दिला आहे पण हे निर्देश जुळत नाहीत. शक संवत् ११०४, पुष्यशुक्ल चतुर्थी मंगळवारी· (३० नौव्हेंबर सन ११·८२) सूर्योदयानंतर बारा तास होती खरी, पण उत्तरायण संक्रान्ति त्यानंतर कित्येक दिवसांनी २५ डिसेंबर सन ११८२ या दिवशी झाली· म्हणन हा कालनिर्देश सर्वस्वी बरोबर नाही.

स्थलनिश्चय – **पणतुरगे** हे कोल्हापूरच्या नैर्ऋत्य दिशेवरचे १४ मैलावरचे पणुत्रे होय हे दीक्षितांनी दाखविले आहे. **सेलेयवाड** हे धामनी नदीच्या काठचे शेळोषी असावे. **पण्डरनन्त** हे पणतुरगेच्या जवळपास असले पाहिजे असे त्याच्या वर्णनावरून दिसते, पण त्या भागात तशा नावाचे गाव आढळत नाही.

---

३ या शाखेच्या इतर कांही लेखात 'कलियुगविक्रमादित्य' असे बिरुद आढळते.

४ हा बहुधा पुढील लेखांत उल्लेखिलेल्या लक्ष्मीधरभट्टाचा पिता असावा.

५ दीक्षितांनी इंडियन एफेमेरिस, व्हॉ. ३, चा हवाला देऊन ही तारीख १ डिसेंबर सन ११८२ अशी दिली आहे. पण त्या दिवशी प्रस्तुत लेखात उल्लेखिल्याप्रमाणे मंगळवार नसून बुधवार होता. दीक्षितांनी कालनिर्देश सांगताना 'मंगळवार' गाळला आहे.

ओळ **वाचन**[1]

१ सिद्धम्[2]: । स्वस्ति श्री[:।*] जयत्या[विष्कृतं विष्णोर्व्वाराहं क्षो]भिताण्णर्वं(वम्) । दक्षिणोन्नतदंष्ट्राग्रविश्रां(श्रां)तभुवनं वपुः[3] ॥[१॥*]

२ आशी(सी)द्विद्याधरः पूर्वं ना[म्ना जीमूतवाहनः । परार्थं जी]-वितं येन गरुडाय निवेदितं(तम्) ।[।२॥*] शिलाहाराख्यवं-

३ शोयं । तगरेश्वरभूभृतां(ताम्) [। तद्वंशे जतिगो राजाऽजनि भूभृ][च्छि]खामणिः ।[।३॥*] स्वस्ति श्रीजतिगक्षितीस(श)-तनयो ना-

४ यिमनामा नृपः । पुत्रस्तस्य [च चंद्रराट् पृथुयशास्तस्यापि सूनुः] किल । संजातो जतिगो जगज्जननुतः श्रीमां[श्च]

५ तंनं(तन्नं)दनो गोंकल्लो भुवि [भूमिपालतनयः श्रीमारसिंहो नृपः][4] [।।४॥*] तत्सुनुर्नृपमौलिलालितपद[:*] श्रीगूवलाक्षो-(ख्यो) नृप[:*] । तद्भ्राता भुवि

६ भोजदेवनृपतिः वैरी[भपंचाननश्चक्रे राज्यमखंडितं पृथु]यशा लंकेशतुल्यः किल ।[।५॥*] यश्चा[त्मना] कृतनिरन्तर[दु]-

७ र्गवर्ग्गो गोविंदकोंगज ᵕ – ᵕ ᵕ – ᵕ – – [।*] – – ᵕ ᵕ ᵕ ᵕ ᵕ – ᵕ ᵕ – ᵕ – –, – – ᵕ – ᵕ ᵕ त्रिविक्रम – ᵕ – –[5] [॥६॥*]

८ ॥ तस्यानुजातो विदित[प्रतापो बल्लाळदेव[6]क्षि]तिपस्सदैव । श्रीकामिनीनां विनतावनीशो दिक्प्रांततापः प्रथि[तप्र]-

९ तापः[7] ।[।७॥*] तस्यानुजो धर्म्म[धरो धरित्र्यां दधार] धर्म्मा-नखिलान्स्वधर्म्मे । धैर्य्याग्रधुर्यो धनदो धनानां श्रीगंडरादित्य इति

---

१ प्रमुख एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून. २ चिह्नाने प्रदर्शित.
३ श्लोक १ ते ३ चे वृत्त – अनुष्टुभ्.
४ श्लोक ४ व ५ चे वृत्त – शार्दूलविक्रीडित. ५ वृत्त – वसन्ततिलका.
६ कंसातील अक्षरे इतर कोरीव लेखांमधून घेतली आहेत.
७ श्लो. ७ व ८ चे वृत्त – उपजाति.

१० प्रसिद्धः ।[।८।।*] दीनानाथदरिद्रदुःखविकलव्याकीर्ण्णनाना-
विधः(ध)प्राणित्राणपरायण[:*] प्रतिदिनं गुप्ताख्यदानेन
यः । यः

११ कृष्णाजिनधेनुभूम्युभयतोमुक्षा(ख्या)दिदानप्रदः [।*] स(श)-
श्वद्धर्म्ममतिप्रवीणहृदयो भूदेवकल्पद्रुमः[१] ।[।९।।*] तुलापुरुष-
दाना[दिषोड–]

१२ शक्रतुकारकः । सौ(शौ)चगांगेयकीर्त्ते(र्त्ये)कनिलयः स्वगुणै-
र्भुवि[२] ।[।१०।।*] तंनं(तन्नं)दन(नः) प्रबलमांड(ड)लिक-
द्विपेंद्र[पंचाननो]जनि जगत्त्रितयैकवीरः ।

१३ प्रत्यर्थिपार्थिवललाटतटस्थपादपीठस्फुटोज्व(ज्ज्व)लयशो(शा)वि-
जयार्क्कदेवः[३] ।[।११।।*] दानाय द्रविणार्जनं जनपरित्राणाय
वीरव्रतं [सत्या]–

१४ य पृ(प्रि)यभाषणं हरिपदध्यानाय चेतस्थितिः[४] । संप[त्ति]-
सु(स्सु)मनोविपद्वि[हतये यस्य प्रकामं] कविः [।*] कः स(श)-
क्तः प्रविविच्य तस्य विज[यादित्य]–

१५ स्य वक्तु(क्तुं) गुणाः(णान्)[५] ।[।१२।।*] जयति विजयसूनु-
र्वैरि[नी]हारभानुर्निज ⏑ ⏑ ⏑ ⏑ – – – ⏑ वल्लीलवित्रः [।*]
विभवविजयशक्रः खंडिताराति–

१६ चक्रो वरनृपकृत[से]वो भूपतिर्भोजदेवः[६] ।[।१३।।*] रामो यथा
– ⏑ ⏑ – ⏑ – –, – – ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ – –[।*] –⏑– –
⏑ ⏑

१७ – ⏑ – –, देवेन तेनाजनि भोजराज्ये[७] ।।[१४।।*] स्वस्ति
समधिगतपंच[महाशब्द]महामंडलेश्वरसिलारकुलवंसो(शो)द्भव-
. . . . . .

---

१ वृत्त – शार्दूलविक्रीडित. २ वृत्त – अनुष्टुभ्. ३ वृत्त – वसन्ततिलका.
४ 'चेत' नंतरचा विसर्ग पाणिनिसूत्र ८, ३, ८६ वरच्या वार्त्तिकानुसार गाळला आहे.
५ वृत्त – शार्दूलविक्रीडित. ६ वृत्त – मालिनी.
७ वृत्त – उपजाति.

१८ गेय[1]परनारीसहोदरशरणागतवज्रपंजरकलियुगयुधिष्ठिर-
[सहज*]विद्याधरश्रीमहालक्ष्मि(क्ष्मी)देवीलब्धवरप्रसाद-
[श्रीतगर]-

१९ पुरवराधीश्वरो(र) इत्यादिसमस्तराजावलीविराजित[:*] श्री-
मन्महामंडलेश्वरो(र:) श्रीभोजदेवो वलवाडसिवि(शिबि)[रे
सुखसं]-

२० कथाविनोदेन राज्यं कुर्व्वाण[:] शक[नृपकाला]दारभ्य वर्षेषु
चतुरुत्तरशताधिकसहस्रेषु निवृत्तेषु वर्त्तमानशुभकृ[त्संवत्स]-

२१ [रांतर्ग्गतपुष्य]सु(शु)द्धचतुर्थ्यां भौम[2]...[रु]त्तरायणसंक्रमण-
पर्व्वणि निजराज्याभिवृद्धये श्रीमत्कोल्लापुरमहालक्ष्मि(क्ष्मी)-
दे-

२२ वालयाभ्यन्तरे पश्चिमद्वारोत्तर . . . सहवासिलोकणनायकेन
अमृतेश्वरमूर्त्युमामहेश्वरार्थं व्रा(ब्रा)ह्मणभोजनार्थं च कारित-
[स्य]

२३ मठस्य कोष्ठागारार्थं तद्दे . . . मठस्याभ्यंतरे नै[यि]रित्य-
(नैर्ऋत्य)दिशो भागे द्वादशहस्तप्रमाणं गृहमेकं तन्मठनिवि-
[ष्टसह]-

२४ वास्यादित्यभट्टजनार्दनभट्ट[करहाटप्रभा]करघैसासवासियणघैसासे-
त्येवं[प्रमुखव्रा(ब्रा)ह्मणेभ्यो... पुरवर्ग्गदक्षिणदि]-

२५ ....[3] धवलगृहचतुष्टयं.... पूजार्थं..... पूर्वे(र्वस्यां)
दिशि पुष्पवाटकमेकं तस्यैव [देवस्य] पूजार्थं व्रा(ब्रा)ह्मण-
[भोज][ना-*]

२६ र्थं च पणुतुरगगोल्लांतर्ग्गतसेलेयवाडग्रामसीमाभ्यंतरमुत्तरदिग्भागे
..पंचाशद[4]धिकं च चतु:[शत]-

---

१ 'वैरिपन्नगवैनतेयशौचगांगेय' वाचावे.

२ '-वासरे भानो-' वाचावे.

३ या ठिकाणी दीक्षितांनी '-शो ग्रामे' अशी अक्षरे वाचावी, असे सुचविले आहे. पण ती संभवनीय दिसत नाहीत; कारण त्या गावाचे नाव येथे असले पाहिजे. ४ दीक्षितांनी हा शब्द वाचला नाही, पण ही अक्षरे स्पष्ट आहेत.

२७ क्षेत्रं तत्प्रतिव(ब)द्धं पंडरंन[न्त]द्ग्रामाभ्यन्तरे द्वादशहस्तप्रमाण-
गृहमेकं एतत्सर्व्वं पूर्व्वोक्त.. शासनसहितं [धा]-

२८ रापूर्व्वकं सर्व्वम(न)मस्य(स्यं) सर्व्ववा(बा)धापरिहारं राज-
कीयानामनंगुलिप्रेक्षणीयमाचंद्राक्र्क ....[1][त]स्यैव देवस्य
[पंचोप]-

२९ चारपूजार्थं तन्मठखंडस्फुटितजीर्णोद्धारार्थं [त]दीयव्रा(ब्रा)ह्मण-
भोजनार्थं च एडेनाड.....

३० [त]द्देशद(दं)डेन पंचविंशत्यधिकद्विस(श)तवप्रकं क्षेत्रं द्वादश-
हस्तविस्तीर्ण्णं निवेशनं च.. प्रतिव(ब)द्ध...

३१ निवर्त्तनं क्षेत्रं द्वादशहस्तविस्तीर्ण्णं निवेशनं च अरुवणसहितं
अष्टभोगतेजसाम्यसहितं [काश्यप]सगोत्रस्य उद्ध[वा]-

३२ र्यस्य पौत्राभ्यां महत्तरमाधवार्यस्य पुत्राभ्यां नेम[ण]लक्ष्मण-
योर्द्दत्तान्तेनैव लोकणनायकेन सर्वनम-

३३ स्यसर्वबाधापरिहारं सर्व्वायविशु[द्धं] [शासन]सहितं दानक्रयेन-
(ण) गृहीतं आचंद्राक्र्कतारस्थिरं दत्तं(त्तम्) ।। छ ।।

३४ [ब]हुभिर्व्वसुधा दत्ता राजभिस्सगरा[दिभिः ।*] [यस्य यस्य य-]
दा भूमिस्त[स्य] तस्य तदा फलं(लम्)[2] ।[।१५।।*]मद्वंशजा-
[ः*] परमहीप-

३५ तिवंशजा वा पापादपेतमनसो भुवि भू[मिपालाः । ये पालयन्ति
म*]म धर्म्ममिमं समग्रं तेषामयं विरचितोजंलिरेष मू[र्ध्नि][3] ।।
[१६।।*]

३७ सामान्ये(न्यो)यं धर्म्मसेतुर्नृपाणां काले का[ले पालनीयो]
भवद्भिः । सर्व्वान्ये(ने)तान्भाविना(नः) पार्थिवेन्द्रान् भूयो भूयो
याचते राम-

---

१ 'चन्द्रावर्कतारकं दत्तवान् ।' वाचावे. २ वृत्त – अनुष्टुभ्.
३ वृत्त – वसन्ततिलका.

३७ भद्रः[1]॥[१७॥*] दानं वा पालनं वापि दाना[त्*] श्रेयोनुपालनं(नम्) । दानात्स्वर्गमवाप्नोति पालनादच्युतं पदं(दम्)[2]॥ [१८॥*] स्वदत्तां परदत्तां वा यो हरे-

३८ त वसुंधरां(राम्) । षष्टिवर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥[१९॥*] सभिष[क्श्वास]युक्तेपि क्षणक्षय(यि)णि जीविते । [।*] यो द्विजादाहरे[त्कोपि]

३९ तस्यावीचीक्षया(यो)क्षयः ॥[२०॥*] अपुत्रिकद्रव्यसहवासि- . . . तत्र . लोकीं ।

क्रमांक ५९

द्वितीय भोजाचा कोल्हापूर शिलालेख : शक संवत् १११२–१११५

या लेखाची शिला कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या आवारातील अनन्ताचार्य पंडितराव यांच्या घराला लावलेली आढळली होती.[3] ती आता कोल्हापूरच्या टाऊन हॉलमध्ये ठेवली आहे.

वर्णन – या शिलेवरचा लेख २ फू. ३½ इं. रुंद आणि २ फूट २½ इं. उंच इतक्या जागेत कोरला आहे. लेखाच्या २३ ओळींपैकी पहिल्या १४ ओळी बऱ्या स्थितीत आहेत, पण खालच्या ओळी उन्हापावसामुळे किंवा इतर कारणांनी खराब झाल्या आहेत. त्यामुळे त्यांचे वाचन किंवा अर्थ करणे अशक्य होते. डॉ. कीलहॉर्नने हा लेख ए. इं., व्हॉ. ३, पृ. २१३ इ. मध्ये संपादिला होता. त्याच्या वेळीहि या लेखातील कांही अक्षरे अस्पष्ट झाली होती. ती ग्रॅहॅमच्या यथादृष्ट प्रतीवरून वाचली आहेत. कीलहॉर्नच्या काळानंतर या लेखाच्या डाव्या बाजूचा एक मोठा तुकडा भग्न होऊन आता नष्ट झाला आहे. तसेच ओ. ६ व ७ मध्ये एक भेग उत्पन्न झाल्यामुळे आणखी कांही अक्षरे आता नष्ट झाली आहेत. तथापि मुख्य

---

१ वृत्त –शालिनी. २ या व पुढील श्लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

३ Graham, *Kolhāpur*, p 398; *Ep. Ind.*, Vol. III, pp. 213 f.

एपिग्राफिस्टना त्याचा मूळचा छाप मिळाल्यामुळे त्यावरून येथील वाचन दिले आहे. कोल्हापूर येथील शिलालेख एक संग्रहालय स्थापून त्यांत जपून ठेवणे अवश्य आहे.

प्रस्तुत शिलेच्या अग्रभागी डावीकडे गाय व तिचे वासरू आणि उजवीकडे वाकडी तरवार आणि त्यांच्यावर डावीकडे सूर्य आणि उजवीकडे चंद्र कोरले आहेत.

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे.

विषय – प्रस्तुत लेख महामण्डलेश्वर **वीरभोजदेव** याच्या काळचा आहे. हा कोल्हापूरच्या शिलाहार वंशातील द्वितीय भोज होय. या वंशाच्या इतर कोरीव लेखांतल्याप्रमाणे प्रस्तुत लेखात त्याची बिरुदे उल्लेखिली नाहीत. फक्त तो **प्रनालक दुर्गात** सुखसंकथाविनोदात आपले राज्य करोत असता प्रस्तुत लेखातील दाने दिली होती, असे म्हटले आहे.

उद्देश – प्रस्तुत लेखाचा उद्देश पूर्वोक्त भोज राजाने आणि कांही खाजगी व्यक्तींनी (कोल्हापूरच्या) कांही ब्राह्मणांस दिलेली दाने नमूद करण्याचा होता. ती अशी–(१) **सहवासी ब्राह्मण लोकण नायक** याने बांधलेल्या (कोल्हापूर येथील) मठात राहणाऱ्या **चार ब्राह्मणांस–आदित्यनाथ** आणि **लक्ष्मीधरभट्ट** हे दोन **सहवासी** ब्राह्मण आणि **प्रभाकर घैसास** आणि **वासियण घैसास** हे दोन करहाटक (कऱ्हाडे) ब्राह्मण यांस – भोज राजाने दिलेले **एडेनाड** विषयाच्या **कोप्परवाड** गावातील एडेनाड मधील मोजणीमापाने ५५० वप्यकांचे शालिखल्ल (भातशेत), सभोवतालच्या खडवळा (अंगणा) सहित एक घर यांचे दान. याचे उद्देश **अमृतेश्वराच्या उमामहेश्वर** मूर्तीची पंचोपचार पूजा, सहवासी ब्राह्मणांना अन्नसंतर्पण, महालक्ष्मी देवीला त्रिकाल नैवेद्य आणि मठाची दुरुस्ती हे होते. पूर्वोक्त शेताच्या सीमा सांगताना **तीरवाडबीडाहून पन्नाले दुर्गाला** जाणाऱ्या मार्गाचा उल्लेख आला आहे.

कालनिश्चय – हे दान **भोज राजाने गत शक संवत् १११२, साधारण संवत्सर, पौष कृष्ण द्वादशीस, मंगळवारी** झालेल्या **उत्तरायण संक्रान्तीस** दिले होते. ही तिथि बरोबर जुळते. दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे गत शक १११२ ला साधारण संवत्सर येते. पूर्वोक्त तिथि मंगळवारी (२५ डिसेंबर सन ११९०)

---

१ 'खडवलक' आणि सोमेश्वराच्या रानवड शिलालेखातील (क्र. ३८, ओ. ८) 'खंडपला' एकच असावे. ते दान दिलेल्या घराच्या संदर्भात येते आणि त्याचा अर्थ 'घराचे अंगण' हा असावा. ते 'खेटकवलय' (खेडेगावाच्या सभोवतालचा भाग) यापासून निघाले असावे.

सूर्योदयानंतर १९ तास ७ मिनिटे होती, आणि उत्तरायण किंवा मकरसंक्रान्ति सूर्योदयानंतर १४ तास २ मिनिटांनी झाली होती.

प्रस्तुत लेखात उल्लेखिलेले दुसरे दान पूर्वोक्त **लोकण नायका**चा पुत्र **कालियण नायक** याने पूर्वोक्त ब्राह्मणांस आपल्या मातेने[1] प्रतिष्ठापिलेल्या अन्नसत्रात केले होते. ते **वालुरगेखोल्ला**च्या **पौव** नामक अग्रहार ग्रामाच्या महाजनांनी मिळवून दिलेले कांही **खद्दिय** भूमीचे होते. त्यामध्ये एक उत्कृष्ट निवर्तन आणि एक कनिष्ठ निवर्तन मिळून झालेली अर्धी वृत्ति, तसेच खडवलका-सहित अर्धे उत्तम घर आणि मध्यम घर यांचा समावेश होता. हे दान **गत शक १११४, परिधावी संवत्सर, आश्विन** (**शुक्ल**) **प्रतिपदा, शुक्रवार** रोजी दिले होते. ही तिथि मात्र पूर्णपणे जुळत नाही. दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे गत शक १११४ ला परिधावी संवत्सर येते खरे, पण आश्विन शुक्ल प्रतिपदा (श्रीमहालक्ष्मीच्या नवरात्राचा आरंभ दिन) बुधवारी (९ सप्टेंबर सन ११९२ रोजी) पडते, प्रस्तुत लेखात म्हटल्याप्रमाणे, शुक्रवारी नाही.

तिसरे दान पूर्वोक्त **कालियण नायका**ने सध्या नाव अस्पष्ट झालेल्या गावा-तील भूमीचे दिले होते. ती भूमि सामवेदी **सोमेश्वरभट्टा**ची नात **मायिं-कौवा** हिच्या वृत्तीतील होती. या दानाचा उद्देश वेदाध्ययनाकरिता स्थापिलेल्या पाठशाळेतील विद्यार्थ्यांचा योगक्षेम हा होता. या दानाचा काल सांगताना **शक संवताचा अंक** अनवधानाने गळला आहे. हे दान **प्रमादी संवत्सरी फाल्गुन शुक्ल पंचमीस, शुक्रवारी** दिले होते. दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे प्रमादी संवत्सर गत शक ११११५ ला येते. पिल्लेच्या जंत्रीप्रमाणे, फाल्गुन शुक्ल पंचमी रविवार (तारीख २७ फेब्रुवारी सन ११९४) रोजी पडते, शुक्रवारी नाही. तेव्हा ही तिथिहि जुळत नाही.[2]

स्थलनिश्चय – कीलहॉर्नने **तीरवाडबीड** कोल्हापूरच्या नैर्ऋत्येस ७½ मैलांवरचे बिडे असावे, असे म्हटले होते, पण ते गाव कोल्हापूरच्या बावडा महा-लातील **तिरवडे** असणे जास्त शक्य आहे. **कोप्परवाड** हे कोल्हापूरच्या पश्चिमेस सुमारे सात मैलांवरचे कोपरडे असावे. ते प्रस्तुत लेखात म्हटल्याप्रमाणे **पन्नाले-दुर्गाला** (पन्हाळा किल्ल्याला) जाणाऱ्या मार्गावर आहे. **पौव** हे अग्रहार गाव

१ 'स्वमातुः पोमकौवायाः' हे शब्द ग्रॅहॅमच्या यथादृष्ट प्रतीत स्पष्ट दिसतात.

२ कीलहॉर्नने म्हटले आहे की ही तिथि शुक्रवार, २८ फेब्रुवारी सन ११९४ या दिवशी होती आणि म्हणून हा कालनिर्देश जुळतो, पण ते चूक दिसते. २८ फेब्रुवारी सन ११९४ चा वार सोमवार होता, शुक्रवार नव्हता. त्या दिवशीची तिथि शक संवत् १११५, फाल्गुन शुक्ल षष्ठी होती.

पन्हाळे महालातील कोल्हापूरच्या सुमारे १२ मैल उत्तरेचे पोहळे असावे. **तालुरगेखोल्ल** हे शेजारच्या हातकणगले तालुक्यातील तराळे असावे. **प्रनालक** किंवा **पन्नाले दुर्ग** हा सध्याचा कोल्हापूरच्या वायव्येस सुमारे ११ मैलांवरचा पन्हाळा किल्ला होय.

ओळ	वाचन[१]
१	स्वस्ति [।*] श्रीमहामण्डलेश्वरो वीरभोजदेवः[२] प्रनालकदुर्ग्गशिबिरे सुखसंकथाविनोदे–
२	न राज्यं कुर्वाणः शकनृपकालादारभ्य वर्षेषु द्वादशोत्तरशताधिकसहस्रेषु निवृत्तेषु वर्त्तमानसा–
३	धारणसंवत्सरान्तर्ग्गतपुष्यबहुलद्वादश्यां भौमवारे भानोरुत्तरायणसंक्रमणपर्व्वणि निजराज्या–
४	भिवृद्धये सहवासिलोकणनायकेन कारितस्य मठस्य अमृतेश्वरमूर्त्युमामहेश्वरदेवस्य पंचोपचा–
५	रपूजार्थं सहवासिब्राह्मणभोजनार्थं श्रीमहालक्ष्मि(क्ष्मी)देव्यास्त्रिकालनैवेद्यपरि[चा]लार्थं[३] तन्मठखण्डस्फुटि–
६	तजीर्ण्णोद्धारार्थं एडेनाडांन्तर्ग्गत[४] कोप्परवाडग्रामसीमाभ्यंन्तरे[५] पूर्व्वदिग्भागे तीरवाडबीडात् पन्नालेदुर्ग्गगामि–
७	नो मार्ग्गात् पूर्व्वतः करंदक्षे[त्रं तत्पूर्व्वतः ।[६] क्षे]त्रपालदेवेनोपलक्षितायाः रिक्ततटाकपाल्याः उत्तरतः
८	करंजमालात्पश्चिमतः । देसिलेयचेंडिकेयवृत्तिक्षेत्र[करं]जक्षेत्रयोर्द्दक्षिणतः । एवं चतुःसीमाभ्यन्तरे ए–
९	डेनाडदंडमानेन वप्यकानां पंचाशदधिकं पंचशतं शालिखल्लक्षेत्रं तत्प्रतिबद्धं तद्ग्रामाभ्यन्तरे द्वादश–

---

१ मुख्य एपिग्राफिस्टनी पाठविलेल्या छापावरून.

२ प्रथम ‘ देवो ’ असे कोरले होते, नंतर ‘ देवः ’ असे दुरुस्त केले.

३ ‘ परिचालनार्थं ’ वाचावे.

४ ‘ एडेनाडान्तर्गत ’ वाचावे.

५ ‘ भ्यन्तरे ’ वाचावे.

६ हा आणि पुढील ८–१० ओळीतील दंड हे अनावश्यक आहेत.

१० हस्तप्रमाणं निवेशनं तत्प्रतिबद्धं खडवलकं च ।। एतत्सर्व्वं तन्मठ-
निविष्टसहवास्यादित्यभ–

११ ट्टलक्ष्मीधरभट्टकरहाटकप्रभाकरघैसासवासियणघैसासेत्येवंनिविष्ट-
ब्राह्मणचतुष्टयहस्ते शा–

१२ सनसहितं धारापूर्व्वकं सर्वनमस्यं सर्व्वबाधापरिहारं सर्व्वायविशुद्धं
राजकीयानामनंगुलिप्रेक्षणीय[1]–

१३ माचंद्रार्क्कस्थिरं दत्तवान् ।। अन्यच्च ।। शकनृपकालादारभ्य
वर्षेषु चतुर्द्दशोत्तरशताधिकसहस्रेषु निवृत्ते–

१४ षु वर्त्तमानपरिधाविसंवत्सरांतर्ग्गताश्विज(न)शुद्धपतिपदि शुक्र-
वारे तस्यैव सहवासिलोकणनाय–

१५ कस्य पुत्रः कालियणनायकः स्व[मातुः पोमकौवायाः][2] सत्रे-
(त्त्रे) ब्राह्मणभोजनार्थं तालुरगेखोल्लांन्तर्ग्गत[3]अ–

१६ ग्रहारपौवग्रामसीमाभ्यंतरे पूर्व्वदिग्भागे तद्ग्राममहाजनैर्द्दानक्रयेण
गृही[तं] खद्दि[यं ?] लखुमणघै–

१७ सासस्य वृत्तिमध्ये उत्तमनिवर्त्त[नमेकं कनिष्ठनि]वर्त्तनमेक-
[मेवम]र्द्धा [वृ]त्तिः तत्प्रतिबद्धं उ[त्त]मगृहस्यार्द्धं मध्यमगृ–

१८ हमेकं तत्प्रतिबद्धं खडवलकं ए . . . . . जन. .स्ता. .[4] दान-
क्रयेण गृहीत्वा पू[र्व्वो]क्तनिविष्टब्राह्मणचतु–

१९ ष्टयहस्ते धारापूर्व्वकं सर्वबाधाप[रिहारं] सर्व्वायविशुद्धं [आचं]-
द्रार्क्कस्थिरं दत्तवान् ।। अन्यच्च ।। प्रमादिसंवत्सरान्त–

२० र्गतफाल्गुनशुद्धपंचम्यां शुक्रवारे. . . . .[5] ग्रामसीमा-
भ्यंन्तरे[6] पूर्व्वदिग्भागे छंदोगसोमेश्वरभट्टस्य

---

१ या ठिकाणी ' अनंगुलिप्रक्षेपणीयम् ' विवक्षित आहे.

२ चौकोनी कंसातील अक्षरे आता अस्पष्ट झाली आहेत. ती ग्रॅहॅमच्या यथादृष्ट प्रतीवरून वाचली आहेत. ३ ' खोल्लान्तर्गत– ' वाचावे.

४ 'एतत्सर्वं तद्ग्राममहाजनहस्तात् ' असे ग्रॅहॅमच्या यथादृष्ट प्रतीवरून वाचता येते.

५ ' तस्मिन्नेव अग्रहारपौव– ' असे ग्रॅहॅमच्या यथादृष्ट प्रतीवरून वाचावे.

६ ' सीमाभ्यन्तरे ' वाचावे.

२१ दौहित्र्या मायिकौवायाः वृत्ते[1] ....[स ए]व कालि-
यणनायकः वेदाध्ययन[खो ?]डका-
२२ च्छात्र(त्रा)भोजनार्थं तस्याः सका[शाद्दानक्रयेण] गृहीत्वा
पू[र्व्वोक्तनि]विष्टब्राह्मणचतुष्टयस्य हस्ते धारापूर्व्वकं सर्व्वबा-
२३ धापरिहारं सर्व्वायविशुद्धमाचंद्रार्क्कस्थिरं दत्तवान् ॥ छ ॥

क्र. ६०

द्वितीय भोजाचे कशेळी दानपत्र : शक संवत् १११३

ह्या दानपत्राचा **ताम्रपट** सातार्‍याच्या एका ब्राह्मणापाशी मिळाला होता. तो मुंबईच्या टेलर साहेबाकडे पाठविला गेला. त्याने त्याचे नागरी लिपीत पंक्त्यनुसार वाचन व इंग्रजी भाषांतर ही ट्रॅन्झॅक्शन्स् ऑफ दि लिटररी सोसायटी ऑफ् बाँबे, व्हॉ ३ (१८३३, पुनर्मुद्रित १८७७) मध्ये प्रसिद्ध केली. सध्या हा ताम्रपट रत्नागिरी जिल्ह्याच्या राजापुर तालुक्यातील **कशेळी** गावी कनकादित्याच्या (सूर्य देवाच्या) मंदिराच्या विश्वस्तांच्या ताब्यात आहे असे कळते.[2]

वर्णन – पुढे दाखविल्याप्रमाणे प्रस्तुत ताम्रपटावर कोल्हापूरच्या **द्वितीय भोज** या **शिलाहार** नृपतीचे दानपत्र कोरले आहे. त्याचे १२½ इ. लांब आणि ८¾ इं. रुंद असे तीन पत्रे आहेत. ते एका कडीत अडकवले असून तिला गरुडमुद्रा जोडली आहे. पहिल्या पत्र्याच्या बाहेरील बाजूवर गाय व तिचे वासरू, त्यांच्या समोर वाकडी तरवार आणि वर सूर्य व चंद्र यांच्या आकृति कोरल्या आहेत. सूर्याच्या आकृतीजवळ 'देवप्रद' कोरले आहे.[3] पहिल्या पत्र्याची आतील बाजू, दुसरा पत्रा आणि तिसऱ्याची आतील बाजू यांवर द्वितीय भोजाचा संस्कृत लेख कोरला होता. त्याच्या प्रकाशित प्रतीवरून हा लेख सुस्थितीत आहे, असे दिसते. तिसऱ्या पत्र्याच्या बाहेरच्या बाजूवर नंतरचा मराठी लेख कोरला आहे. तो बराच खराब झाला आहे. त्याची चर्चा पुढे करू. प्रस्तुत ताम्रपट मला उपलब्ध न

१ 'वृत्तेरुत्तमभूमेः निवर्त्तनस्योत्तरार्द्धम्' वाचावे. ग्रॅहॅमची यथादृष्ट प्रत पाहा.
२ भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, शक १८३५; मराठी संशोधन पत्रिका, व्हॉ. ६, पृ. १४ इ; प्राचीन मराठी कोरीव लेख, पृ. १९३ इ.
३ प्रा. म. को. ले., पृ. १९३.

झाल्यामुळे टेलर साहेबाने पंक्तिवार प्रसिद्ध केलेल्या प्रतीवरून त्याचे वाचन दिले आहे [1]

अक्षरवटिका नागरी लिपीची आणि **भाषा** संस्कृत आहे. आरंभीच्या गंडरादित्यापर्यंतच्या वंशावळीतील बहुतेक श्लोक त्या शिलाहार राजाच्या शक संवत् १०४८ च्या ताम्रपटातल्याप्रमाणे आहेत. नंतरचे त्याचा पुत्र विजयादित्य याच्या वर्णनपर दोन श्लोक यापूर्वीच्या लेखात आलेले आहेत, पण त्यापुढील त्याच्या विजयाचे वर्णन करणारा श्लोक १३, आणि त्याचा पुत्र तत्कालीन राजा द्वितीय भोज याच्या वर्णनपर श्लोक १४ व १५ हे नवीन आहेत.

विषय – हा लेख कोल्हापूरचा **शिलाहार नृपति द्वितीय भोज** याच्या काळचा आहे. त्याची **वंशावळ** इतर लेखातल्याप्रमाणेच दिली आहे. पण त्याचा पिता **विजयादित्य** याच्या वर्णनात त्याने **स्थानकाच्या** (ठाण्याच्या) आणि **गोव्याच्या राजांना** त्यांची गादी मिळवून दिली आणि **बिज्जणाला** चक्रवर्तिपद प्राप्त करून घेण्यास साहाय्य केले, असे म्हटले आहे. प्रस्तुत ताम्रपटाचा कोरक्या **वामीयण** हा विप्र (ब्राह्मण) होता, हे लक्षणीय आहे.

उद्देश – प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश **द्वितीय भोजाने गण्डरादित्य कुमाराच्या** विनंतीवरून आणि त्याच्या अभ्युदयार्थ कोकणातील **अट्टविर** (विषयातील) **कशेळी ग्राम** बारा ब्राह्मणांच्या प्रतिदिन भोजनाकरिता दान दिला, हे नमूद करण्याचा होता. हे दान देताना राजाचा मुक्काम **पद्मनाल दुर्गात**[2] होता. दानाची **तिथि गत शकसंवत् १११३, विरोधिकृत् संवत्सर, आषाढ शुक्ल चतुर्थी, गुरुवार** ही असून प्रसंग **दक्षिणायन संक्रान्तीचा** होता. ही तिथि पूर्णपणे जुळते. गत शक १११३ ला दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे विरोधिकृत् संवत्सर होते. त्यातील आषाढ शुक्ल चतुर्थी गुरुवारी (तारीख २७ जून सन ११९१ रोजी) सूर्योदयानंतर १७ तास ४५ मिनिटे होती. दक्षिणायन संक्रान्ति त्या दिवशी सूर्योदयानंतर ३ तास ५० मिनिटांनी झाली होती.

स्थलनिश्चय – **पद्मनालदुर्ग** हे पन्हाळा किल्ल्याचे प्राचीन नाव होय. इतरत्र ते 'प्रणालक' असे आढळते. **कशेळीने** आपले प्राचीन नाम अद्यापपर्यंत अपरिणत रूपाने राखले आहे. **अट्टविर** हे सध्याचे आडिवरे, कशेळीच्या दक्षिणेस दोन मैलांवर आहे. **स्थानक** आणि **गोवा** यांची स्थाने मागे दाखविली आहेत.

---

१ ह्या प्रतीत अनेक ठिकाणी अनुस्वार गाळले आहेत आणि मूळातील अक्षरांचे वाचन बरोबर केले नाही. तथापि ही प्रत मूळाबरहुकुम आहे असे गृहीत धरून मी दुरुस्त्या सुचविल्या आहेत.

२ याला क्र. ५९, ओ. ६ मध्ये 'पन्नाले' म्हटले आहे.

मराठी लेख – पूर्वी सांगितल्याप्रमाणे प्रस्तुत ताम्रपटाच्या तिसऱ्या पत्र्याच्या बाहेरच्या बाजूवर **मराठी लेख** कोरला आहे. त्याच्या पहिल्या आठ ओळी बहुतांशी अस्पष्ट झाल्या आहेत.[१] त्या लेखाचा उद्देश हे नमूद करण्याचा दिसतो की **शिलाहारवंशी हरिपालदेवाच्या** कारकीर्दीत **रमणस मंडलिक** आणि **जाखण मंडलिक** यांनी कनकादित्याच्या मंदिराचा जीर्णोद्धार करून काही दान भागवत **माधवभट्ट** यास शक संवत् **१२०१, प्रमाथी संवत्सर, भाद्रपद कृष्ण अष्टमीस, बुधवारी, कन्यासंक्रान्तीच्या** पर्वणीस दिले. ही तिथि पूर्णपणे जुळत नाही. शक संवत् १२०१ ला प्रमाथी संवत्सर होते खरे, पण पूर्वोक्त तिथि गुरुवारी (३१ ऑगष्ट सन १२७९ रोजी) होती, यात म्हटल्याप्रमाणे बुधवारी नव्हती. कन्या संक्रान्ति दोन दिवस अगोदर (२९ ऑगष्ट सन १२७९ ला) झाली होती. तेव्हा ही तिथि थोडी अनियमित आहे.

दुसरी गोष्ट अशी की त्या काळी उत्तर किंवा दक्षिण कोकणात हरिपालदेव नामक शिलाहार राजा राज्य करीत होता, याला पुरावा नाही. कोकणात एक हरिपालदेव राज्य करीत होता खरा, पण तो त्यापूर्वी १२५ वर्षे. त्याचा शेवटचा ज्ञात लेख शक १०७६ चा आहे.[२] तेव्हा हा मराठी लेख बनावट आहे, यात संशय नाही. असे दिसते की सन १२७९ मध्ये कनकादित्याच्या मंदिराच्या जीर्णोद्धार प्रसंगी हा लेख कोरविण्यात आला. त्या वेळी शिलाहारांच्या सर्व शाखा अस्तंगत झाल्या होत्या. पण प्रस्तुत ताम्रपटावरील खरा लेख नागरी लिपीत लिहिला असल्यामुळे दक्षिण कोकणात पूर्वी शिलाहारांचे राज्य होते हे लोकांस माहित झाले होते, हरिपालदेवाची स्मृतिहि नष्ट झाली नव्हती. म्हणून तो शक संवत् १२०१ मध्ये कशेळी येथे राज्य करीत होता, असे गृहीत धरून येथील मराठी लेख कोरविलेला दिसतो. तो बनावट असल्याने प्रस्तुत ग्रंथात घेतला नाही.

ओळ **वाचन**[३]

पहिला पत्रा

१ **स्वस्ति [।*] श्रीः । जयत्याविष्क(ष्कृ)तं विष्णोर्वाराहं क्षोभितार्णवं(वम्) । दक्षिणोन्नतदंष्ट्राग्रविश्रांतभुवनं वपुः**[४] **।। १ ।।**

---

१ प्रा. म. को. ले. मधील प्रतिमा ४३ पाहा.

२ क्र. २७ पाहा.

३ ट्रँझॅक्शन्स् ऑफ दि लिटररी सोसायटी ऑफ बॉंबे, व्हॉ. ३ (१८७७) च्या पृ. ४१८ व ४१९ मधील छापावरून.

४ या व पुढील दोन श्लोकांचे वृत्त – अनुष्टुभ्.

२ आसीद्विद्याधरः पूर्व्वं नाम्ना जीमूतवाहनः [।*] परार्थं जीवितं
येन गरुडाय निवेदितं(तम्) ।। २ ।। शिलाहाराख्यवंशोयं त-

३ गरेश्वरभूभृतां(तम्) ।। तद्वंशे जतिगो राजाजनि भूभृच्छिखा-
मणिः ।। ३ ।। स्वस्ति श्रीजतिगक्षितीशतनयो नायि-

४ म्मनाम्ना नृपः पुत्रत(स्त)स्य च च(चं)द्रराट् पृथुयशास्तस्यापि
सूनुः किल । संजातो जतिगो जगज्जननुतः श्री-

५ मांश्च तन्नंदनो गो(गों)कल्लो भुवि भूमिपालतिलकस्तस्याप्यभू-
दादितः[1] ।। ४ ।। गूवलेशोथ तद्भ्राता की-

६ र्तिराजोनुजोस्य च ।। चंद्रादित्य इति ख्यातश्चक्रे राज्यमकंटकं-
(कम्)[2] ।। ५ ।। श्रीमद्गो(द्गों)कलभूमिपालतन-

७ यः श्रीमारसि(सिं)हो नृपः(प)स्तत्सूनुनृ(र्नृ)पमौलिलालितपदः
श्रीगोवलाख्यो नृपः ।। तद्भ्राता भुवि भोज-

८ देवनृपतिर्वैरीभपंचाननश्चक्रे राज्यमखंडितं पृथुयेशा(यशा) लंके-
शतुल्यं किल ।। ६ ।। तस्यानुजातो विदि-

९ तप्रतापो बल्लालदेवः क्षितिपः सदैव ।। श्रीकामिनीशो विनता-
वनीशो दिक्प्रांतरूढप्रथितप्रतापः ।।[4]

१० ।। ७ ।। तस्यानुजो धर्मधरो धरित्र्यां दधार वर्णानखिलान्स्व-
धर्मैः[5] ।। धैर्याग्रधुर्यो धनदो धनानां श्रीगंडरादित्य

११ इति प्रसिद्धः[6] ।। ८ ।। दीनानाथदरिद्रदुःखविकलव्याकीर्णनाना-
विधप्राणित्राणपरायणः प्रतिदिनं गुप्ताख्यदानेन य[:*] ।।

---

१ '–दग्रजः' वाचावे. वृत्त – शार्दूलविक्रीडित. २ वृत्त – अनुष्टुभ्.

३ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

४ वृत्त – इंद्रवज्रा. हा श्लोक द्वितीय भोजाच्या कोल्हापूर शिलालेखात (क्र. ५८) आला आहे.

५ कोल्हापूर ताम्रपटात (क्र. ४८) 'स्वधर्मे' असा पाठ आहे. तो यापेक्षा बरा आहे.

६ वृत्त – उपजाति.

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१२ यः कृष्णाजिनधेनुभूम्युभयतोमुख्यादिदानप्रदः शब्दब्रह्ममति[१]-
प्रवीणहृदयो भूदेवकल्पद्रुमः[२] ।। ९ ।। तुला-

१३ पुरुषदानादिषोडशक्रतुलाकारकः[३] ।। शौचगांगेयकीर्त्ये(र्त्यै)क-
निलयः स्वगुणैर्भुवि[४] ।। १० ।। तन्न(त्नं)दनः प्रबल-

१४ मा(मां)डलिकद्विपेंद्रपंचाननोजनि जगत्त्रितयैकवीरः ।। प्रत्यर्थि-
पार्थिवललाटतटस्थ(स्व)पादपीठस्फुटोज्व(ज्ज्व)ल-

१५ यशा विजयार्कदेवः[५] ।। ११ ।। दानाय द्रविणार्जनं जनपरित्रा-
णाय वीरव्रतं सत्याय प्रियभाषणं हरिपदध्या-

१६ नाय चेतस्थितिः[६] ।। संपत्तिः सुमनोविपद्विहतये यस्य प्रकाम-
(मं) कविः कः शक्तः प्रविविच्य तस्य विजयादित्यस्य व-

१७ क्तुं गुणान्[७] ।। १२ ।। येन स्थानकमंडले तदधिपा भ्रष्टाः
पुनः स्थापिता गोवायां परिनष्टभूमिपतयः सुस्थापिता-

१८ स्तेजसा ।। यत्सख्येन च चक्रवर्तिपदवीं प्रापातुलो वीक्षणः[८]
सोभूच्छ्रीविजयार्कदेवनृपतिर्वैरीभकंठीरवः ।। १३ ।। तन्नं-

१९ दनः सकलदिक्तटवर्तिकीर्त्तिभ्रू(र्भ्रू)भंगमात्रपरिसाधितवैरिवर्ग्गः ।।
विश्वंभराभरधुरीणभुजः सदैव विभ्राजते नृपवरो

२० भुवि भोजदेवः[९] ।। १४ ।। संग्रामांगणभैरवः क्षितिभुजां स(सं)-
हारभेरि(री)रवः कीर्त्याक्रांतजगत्र(त्त्र)यस्तनुभृतां निघू(र्धू)त-
तापत्रयः ।। श्रीरत्ना-

---

१ कोल्हापुर ताम्रपटात 'शश्वद्ब्रह्ममति-' असा पाठ आहे.

२ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

३ 'क्रतुकारकः' असे शक ११०४ च्या शिलालेखातल्याप्रमाणे वाचावे.

४ वृत्त – अनुष्टुभ्.

५ हा श्लोक द्वितीय भोजाच्या कोल्हापूर शिलालेखात (क्र. ५८) आला आहे. वृत्त – वसन्ततिलका.

६ 'चेतः' मधील विसर्ग पाणिनि ८, ३, ३६ वरील वार्त्तिकानुसार लुप्त झाला आहे. ७ या व पुढील श्लोकाचे वृत्त – शार्दूलविक्रीडित.

८ 'विज्जणः' वाचावे. ९ वृत्त – वसन्ततिलका.

२१ प्रियनंदनः परिजनानंदैकसंक्रंदनः प्राप्ताशेषमहीतलः स जयतां
श्रीभोजरत्नाचलः[1] ।। १५ ।। स्वस्ति समधिगतपंचमहाशब्दमहा–

२२ मंडलेश्वरतगरपुरवराधीश्वरजगज (ज्ज) नमनोनुरागसागरप्रवर्ध-
नशरच (च्चं) द्रश्रीशिलाहारनरेंद्रविद्वज्जनमनोरथफलप्रदपारि-
जातजी–

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

२३ मूतवाहनान्वयप्रसूतविरोधिधराधीशवंशगहनदहनधूमध्वजसुवर्ण-
गरुडध्वजरिपुमदेभविदलनोत्कंठकंठीरवमां–

२४ डलिकभैरवविद्विष्टमंडलीकपन्नगवैनतेयशौ (शौ) चगांगेययुवतिजन-
मनःस (सं) मोहनाभिनवकंदर्पमरुबक (वंक) सर्पक्षत्रि–

२५ यशिखामणिश्रीविजयादित्यद (दे) व[:*] नंशिग[2]साहा (ह) सोत्तुंग-
अरिनृपालराज्यलक्ष्मीसमाकर्षणमंत्रसिद्धिश–

२६ निवारसि[द्धि]सकलशास्त्रपारावारपरायणसकलजगतीजनस्तु-
[त*]नृपेंदुत्यइंदुवारादित्य[3]जयपताकापवन–

२७ विघटितारातिसेनाघनगिरिदुर्गलंघनउत्ध (द्धृ) तधराधीशकुलशि-
खरी (रि) कुलिशकलिगजांकुशलंक (के) शवीरलक्ष्मी–

२८ लतालंबनप्रचंडभुजदंडमंडलीकजवदंडमंडलीकनरवारसिंगमंडलीक-
वेश्याभुजंगबलवदरिचतुरंगसंघट्टवैरी (रि) घरट्टअरसा–

२९ सवारिमदनमहेश्वरप्रतापलंकेश्वरमंडलीकगंडपेंडारएकांगवीरशर-
णायातभूभृन्निवहरक्षणसमुद्रपरबलविलयकाग्नि–

३० रुद्रसुगीतकृतिचातुर्यहर्षितशिवांतरंगप्रशस्तवस्तुकविताप्रसंगविवि-
धधम (र्म) निर्माणनित्यप्रमोदश्रीमा (म) हालक्ष्मीदेवि (वी) लब्ध-
वर–

३१ प्रसादादिसमस्तराजावलिविराजितश्रीमन्महाम(मं)डलेश्वरश्रीभा-
(भो) जदेवः पद्मनालदुगे (र्गे) सुखसंकथाविनोदेन राज्यं कुर्वाणः
शकवर्षेषु

---

१ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

२ कुतापुर दानपत्रातल्या (क्र. ६२) प्रमाणे ‘ नृसिंह ’ वाचावे.

३ ‘ इडुवरादित्य ’ वाचावे.

३२ सत्रयोदशशताधिकसहस्त्रे(स्त्रे)षु १११३ गतेषु वर्तमानविरोधि-कृत(त्)संवत्सरे आषाड(ढ)शु[द्ध]चतुर्थ्यां बृहस्पतिवारे दक्षिणायनस(सं)क्रम–

३३ णपर्वनिमित्तं कुमारगंडरादित्यविज्ञापनेन तस्यां(स्या)भ्युदयार्थं अट्टविरकोंकणमध्यवर्तिकशेलिग्रामे(मं) प्रतिदिनं द्वादशब्रा–

तिसरा पत्रा

३४ ह्मणभोजनार्थं तत्रामपिंडादानद्रव्यं सर्वं(वं) तत्रत्यगोविंदभट्-(ट्ट)हस्ते धारापूर्व्वकं सर्वनमस्यं सर्वबाधापरिहारं राज–

३५ कीयानामनंगुलिप्रेक्षणीय[1]माचंद्रार्कं प्रादात् ॥ तस्य ग्रामस्य सीमा ॥ पूर्वस्यां दिशि कुरलनामनदी ॥ दक्षिण–

३६ स्यां दिशि सां[दु]रनामशुष्कस्रोतः ॥ पश्चिमस्यां दिशि सरित्पतिः ॥ उत्तरस्यां दिशि केखंडिकाख्यक्षुद्रशुष्कस्त्रो(स्रो)तः ॥

३७ अंबेवरिकस्थितपूगीवृक्षसमूहपर्यंतं सीमा ॥ बहुभिर्वसुधा दत्ता राजभिः सगरादिभिः ॥ यस्य यस्य यदा भूमि–

३८ स्तस्य तस्य तदा फलं(लम्)[2] ॥ १ ॥ मद्वंशजाः परमहीपतिवंशजा वा पापादपेतमनसो भुवि भूमिपालाः ॥ ये पालयंति मम ध–

३९ र्ममिमं समग्रं तेभ्यो मया विरचितोंजलिरेषमूर्ध्नि[3] ॥ २ ॥ स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुंधरां(राम्) ॥ षष्टिवर्षसहस्राणि वि–

४० ष्ठायां जायते क्रि(कृ)मिः[4] ॥ ३ ॥ षष्टिवर्षसहस्राणि स्वगे(र्गे) तिष्ठति भूमिदः ॥ आच्छेत्ता चानुमंता च तान्येव नरके वसेत् ॥ ४ ॥

४१ अतिदानं तु सर्वेषां भूमिदानमिहोच्यते । अचला ह्यक्षया भूमिः सवा(र्वा)न्कामान्प्रयच्छति ॥ ५ ॥ सुवण(र्णं) रजतं ताम्रं म–

---

१ '–प्रक्षेपणीय' असे वाचावे. २ वृत्त – अनुष्टुभ्.
३ वृत्त – वसन्ततिलका. ४ श्लो. ३ ते ७ चे वृत्त – अनुष्टुभ्.

४२ णिमुक्ताफलानि च ॥ सर्वमेतन्महाप्राज्ञो ददाति वसुधां ददत् ॥ ६ ॥ भर्तुर्नि(निः)श्रेयसे युक्ताः संग्रामाभिमुखे हताः

४३ [यां] गतिं नाप्नुवंतीह भूमिदाय(या)दवाप्नुयुः ॥७॥ सामान्योयं धर्मसेतुर्नराणां काले काले पालनीयो भवद्भिः ॥

४४ सर्वानेतान्भाविनः पार्थिवेंद्रान्भूयो भूयो याचते रामभद्रः[1] ॥८॥ उत्कंटितं विप्रवामीयेणेन [।*] मंगल(लं) मा(म)हाश्रीः ॥

प्रथम परिशिष्ट

शिलाहारांचे आणखी कांही कोरीव लेख

क्र. ६१

छित्तराजाचा भोइघर ताम्रपट : शक संवत् ९४६

प्रस्तुत **ताम्रपट** पूर्वीच्या जंजिरा संस्थानातील (सध्याच्या कुलाबा जिल्ह्याच्या मुरुड महालातील) **भोइघर** या गावी तेथील पढिक विद्वान् श्री. नातू यांना आपल्या वाडीत खणत असता सापडला होता. त्याच्याबरोबर कांही नाणीहि सापडली होती, असे कळते. नंतर तो ताम्रपट मुरुड येथील अधिकाऱ्याकडे पाठविला गेला, पण पुढे त्याचे काय झाले ते समजले नाही. ताम्रपट पाठविण्यापूर्वी श्री. नातू यांनी तो वाचला होता, पण कोकणात कागदाचे दुर्भिक्ष असते म्हणून की काय, त्यांनी त्याचे वाचन लेखनिविष्ट न करता मुखोद्‌गत केले होते. नंतर कांही वर्षांनी जंजिरा संस्थानचे सरन्यायाधीश श्री. राजाध्यक्ष हे भोइघर येथे गेले असता श्री. नातूंनी प्रस्तुत ताम्रपट पाठ म्हणून दाखविला. तेव्हा त्याचे वाचन श्री. राजाध्यक्ष यांनी लिहून घेऊन ते मुंबईचे प्रा. ह. दा. वेलणकर यांच्याकडे पाठविले. तेच डॉ. मो. गं. दीक्षित यांनी आपल्या 'महाराष्ट्रातील कांही प्राचीन ताम्रपट व शिलालेख' या पुस्तकात (पृ. ३२-४५) जसेच्या तसे देऊन त्याची चर्चा केली आहे. श्री. नातू यांच्या विस्मरणामुळे प्रस्तुत ताम्रपटाच्या वाचनात

---

१ वृत्त – शालिनी.

अनेक चुका झाल्या आहेत, कांही भाग गळला आहे तर कांही मागे पुढे झाला आहे. तथापि त्यांना उत्तर कोंकणच्या शिलाहारांच्या कोरीव लेखांविषयी यत्किंचितहि माहिती नसताही त्यांनी प्रस्तुत ताम्रपटाचा बराचसा भाग बरोबर म्हणून दाखवला ही आश्चर्याची गोष्ट आहे. विशेष उल्लेखनीय गोष्ट ही की त्यातील एक दोन श्लोक व पद्मला हे राणीचे नाव त्या वेळापर्यंत कोणासहि माहीत नव्हते तरी ते त्यांच्या वाचनात आले आहे. तेव्हा इतर भागहि बराचसा बरोबर असावा, असे अनुमान करता येते. प्रस्तुत ताम्रपट आता अनुपलब्ध असल्यामुळे श्री. नातू यांचे वाचन बरेचसे यथातथ्य मानून इतर कोरीव लेखांच्या साहाय्याने त्याचा पूर्वापर भाग जुळवून ते येथे दिले आहे. कारण त्यातील काही माहिती नवीन व इतरत्र अप्राप्य अशी आहे.

विषय – प्रस्तुत ताम्रपटाचे पत्रे शिलाहारांच्या इतर सामान्य ताम्रपटांप्रमाणे तीन, व त्याची **लिपी** नागरी असावी. **भाषा** संस्कृत आहे. आरंभी इतर ताम्रपटांतल्याप्रमाणे उत्तर कोंकणच्या शिलाहारांची वंशावळ, आरंभापासून हा ताम्रपट देणाऱ्या छित्तराजापर्यंत आली असावी. पण तीतील पुल्लशक्ति, द्वितीय कपर्दी, वप्पुवन्न, अपराजित आणि द्वितीय वज्जड यांच्या वर्णनपर श्लोक गळले आहेत. बाकीच्या श्लोकांचा थोडा फार भाग शिल्लक आहे. त्यावरून इतर कोरीव लेखांच्या साहाय्याने ते श्लोक पूर्ण करून येथे दिले आहेत. नंतरचा भाग बराचसा आला आहे. हा ताम्रपट **शक संवत् ९४६** चा म्हणजे छित्तराजाच्या कारकीर्दीतील कालक्रमाने पहिला आहे. त्याची मिति **शक संवत् ९४६, भाद्रपद वद्य १३** अशी दिली आहे. तिची इंग्रजी तारीख ३ सप्टेंबर ई. स. १०२४ अशी येते. प्रस्तुत ताम्रपटात वार, नक्षत्र वगैरेंचा उल्लेख नसल्यामुळे ही तिथि पडताळून पाहता येत नाही.

प्रस्तुत ताम्रपटात महामण्डलेश्वर **छित्तराजा**ची बिरुदे व वर्णन त्याच्या इतर ताम्रपटांतल्याप्रमाणेच आले आहे. यांत त्याचा महामात्य **नागणैय,** सर्वाधिकारी **दादपैय** आणि मंत्री **संगलैय व तिक्पैय** यांचा उल्लेख आला आहे. पण छित्तराजाच्या इतर ताम्रपटांत नागणैय व दद्दपैय यांखेरीज इतर मंत्र्यांची नावे येत नाहीत. शेवटी भांडागारसेन महाकवि **नागलैय** याचा पुतण्या **जोउपैय** याने महाराज्ञी **पद्मलदेवी** हिच्या सांगण्यावरून राजाच्या अनुज्ञेने प्रस्तुत दानपत्र लिहिले असा निर्देश आहे. नागलैय आणि जोउपैय यांचा उल्लेख इतर अनेक ताम्रपटांत येतो, तसा पद्मलदेवीचाहि मुम्मुणिराजाच्या दिवेआगर[१]

१ क्र. १६, ओ. १२. ही पद्मलदेवी क्र. १४, ओ. ५५ मध्ये उल्लेखिलेल्या मुम्मुणि राजाच्या पट्टमहाराज्ञी पद्मैदेवीहून भिन्न होती.

ताम्रपटात येतो. डॉ. दीक्षित यांनी ती छित्तराजाची राणी होती असे म्हटले आहे, पण दिवेआगर ताम्रपटांतील तिच्या उल्लेखावरून ती या तीन भावांची माता आणि द्वितीय वज्जडाची पत्नी होती, असे दिसते.

प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश **चिपळूण**[1] येथील **करहाटक** (कऱ्हाडे) ब्राह्मणांच्या **करदांड** आणि **कोलपल्लिका** गांवांच्या आरामांतील (फळबागांतील) वृक्षांसंबंधी व्यवस्था (नियम) घालून देणे हा होता. अशा ताम्रपटांना 'व्यवस्थापत्र' अशी संज्ञा असे. प्रस्तुत ताम्रपटात म्हटले आहे की फळबागांतील शंभर पोफळींवर[2] चार द्रम्म कर असावा. या बागांमध्ये तसेच गावाबाहेरच्या रानात नारळ, फणस, चंपक, चिंचा आणि आम्र यांचा अन्तर्भाव आहे, असे समजावे. (त्यांवर कर आकारला जाणार नव्हता असे दिसते); पण सुरामंडवृक्ष (मोहाची झाडे) मात्र फळबागांत असोत वा त्यांच्या बाहेर असोत ते सरकारी मालकीचे समजावे.[3] तसेच फळभागांच्या विक्रीच्या प्रसंगी व्यापाऱ्यांना शेकडा तीन (त्रिक शत) असा विक्रीकर द्यावा लागेल. सामान्यत: फळबागांतील पोफळींवर जास्त कर द्यावा लागत असावा, पण राजमाता पद्मला देवीच्या इच्छेवरून तेथील सच्छील धार्मिक ब्राह्मणांना या दोन गांवांतील पोफळींवर कमी कर आकारला जावा, अशी ही व्यवस्था दिसते. प्रस्तुत ताम्रपटात भूमिदान नसल्याने इतर ताम्रपटांतल्याप्रमाणे शेवटी भूमिदानविषयक शापाशीर्वादात्मक श्लोक आले नाहीत.

स्थलनिश्चय - **चिपळूण** हे रत्नागिरी जिल्ह्यात अद्यापि प्राचीन नावाने ज्ञात आहे. **करहाट** हे सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड होय. तेथील अनेक विद्वान् ब्राह्मण कोंकणात आलेले दिसतात. प्रस्तुत ताम्रपट मिळाल्यावर ते ब्राह्मण भोईघर येथे राहावयास गेले असावे. कारण प्रस्तुत ताम्रपटात निर्दिष्ट केलेली दान दिलेली गावे

---

१ या काळी चिपळूण येथे बहुधा शिलाहारांच्या दक्षिण कोकणातील शाखेचा अंमल होता असे दिसते. प्रस्तुत ताम्रपट भोइघर येथे सापडला होता व त्यांत निर्दिष्ट केलेली गावे भोइघरच्या जवळपास सापडतात. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटांत विवक्षित असलेले ब्राह्मण भोइघरचे असावे. चिपळूणचा उल्लेख चुकीचा दिसतो.

२ 'पूगीफलशतं प्रति द्रम्मचतुष्टयम्' याचा अर्थ शंभर पोपळांवर चार द्रम्म असा होईल. पण असा कर असंभवनीय आहे. शंभर पूगीवृक्षांवर (पोपळीच्या झाडांवर) चार द्रम्म कर विवक्षित असावा.

३ इतर प्राचीन ताम्रपटांतील दानातहि या वृक्षांचा अपवाद केला आहे; कारण त्यापासून मद्य काढता येते. त्यातून राज्याला मोठे उत्पन्न येत असे.

भोइघरच्या जवळ आढळतात. कदाचित् चिपळूण गावाचा उल्लेख चुकीचा असेल. करदांड हे मुरुड महालातील दांडे उर्फ नांदगाव असावे. ते ताम्रपट जेथे सापडला त्या भोइघर गावाच्या दक्षिणेस चार मैलांवर आहे. कोलपल्लिका हे भोइघरच्या उत्तरेस एक मैलावरचे सध्याचे कोलमांडले असावे. 'कोलवली' या नावाचे गाव डहाणू तालुक्यात आहे, पण ते फार दूर आहे.

वाचन[1]

सिद्धम् । जयश्चाभ्युदयश्च ।
लभते सर्वकार्येषु पूजया गणना यकः ।
विघ्नं निघ्नन् स वः पायादपायाद्गणनायकः[2] ।
स वः पातु शिवो नित्यं यन्मौलौ भाति जाह्नवी ।
सुमेरुशिखरोद्गच्छदच्छचन्द्रकलोपमा ।।
यो देवः स्वयमेव मूर्ध्नि विहितां धत्ते हिमांशोः कला-
मत्यन्तोज्ज्वलबालकेतकशिखारेखास्थितिं बिभ्रतीम् ।
व्यालाधीशपिनद्धपिंगलजटाजूटाटवीमण्डितो
भूयाद्वः स सदा प्रकाशितवरः क्षेमंकरः शङ्करः[3] ।।
जीमूतकेतुतनयो नियतं दयालु-
र्जीमूतवाहन इति त्रिजगत्प्रसिद्धः ।
देहं निजं तृणमिवाकलयन्परार्थे
यो रक्षति स्म गरुडात्खलु शंखचूडम्[4] ।।
तस्यान्वये निखिलभूपतिमौलिलग्न-
रत्नद्युतिच्छुरितनिर्मलपादपीठः ।

---

१ हे वाचन श्री. नातू यांनी म्हणून दाखविलेल्या आणि मो. गं. दीक्षितांनी प्रकाशित केलेल्या प्रस्तुत ताम्रपटाच्या वाचनावरून इतर ताम्रपटांच्या साहाय्याने जुळवून दिले आहे. इतर ताम्रपटांतून घेतलेला भाग चौकोनी कंसात दिला आहे. कांही ठिकाणी पाठ गाळला किंवा दुरुस्त केला असून त्याची कारणे दिली आहेत.

२ पहिल्या दोन श्लोकांचे वृत्त – अनुष्टुभ्.

३ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

४ या आणि पुढील श्लोकाचे वृत्त – वसंततिलका.

श्रीसाहसाङ्क इव साहसिकः कपर्दी
शीलारवंशतिलको नृपतिर्बभूव[१] ॥

* * *

[तस्माज्जातस्तनूजो रजनिकर इवानन्दिताशेषलोकः
श्लाघ्यः श्रीझंझराजो दिवसकर इव ध्वस्तनिःशेषदोषः ।
शम्भोर्यो द्वादशापि व्यरचयदचिरात्कीर्तनानि स्वनाम्ना
सोपानानीव मन्ये प्रणततनुभृतां[२]] स्वर्गमार्गोद्यतानाम्[३] ॥
भ्राता तत्र ततस्ततोज्ज्वलयशोराशिप्रकाशीकृता–
शेषक्ष्मावलयो बली बलवतां श्रीगोग्गिराजोभवत् ।
चापाकर्षणकर्मणि प्रवणतां यस्मिन्गते भूपतौ
भीष्मद्रोणपृथासुतप्रभृतयश्चित्ते चमत्कारिताः[४] ॥
[तस्माद्विस्मयकारिहारिचरितप्रख्यातकीर्तेः सुतः]
श्रीमान्वज्जडदेवभूपतिरभूद्भूचक्रचूडामणिः ।
[दोर्दण्डैकबलेन यस्य सहसा संग्रामरंगागणे
राज्यश्रीः स्वयमेत्य वक्षसि रतिं चक्रे मुरारेरिव[५]]

* * *

शरणागतसामन्ता अपरेऽपि हि जगति रक्षिता येन ।
स जयति यथार्थनामा शरणागतवज्रपंजरो वीरः[६] ॥
अनवरतकनकदानैर्जगदिदमाच्छादितं सदा येन ।
तेन त्रिभुवनमध्ये त्यागजगज्झम्पनामाऽभूत्[७] ॥

---

१ यानंतर पुल्लशक्ति, लघुकपर्दी (द्वितीय कपर्दी) आणि वप्पुवन्न यांच्या विषयी इतर ताम्रपटांत आलेले श्लोक गळले आहेत.

२ क्र. ११, ओ. १३–१५. ३ वृत्त – स्रग्धरा.

४ या व पुढील श्लोकाचे वृत्त – शार्दूलविक्रीडित.

५ क्र. १५ ओ. १६–१७. यानंतर अपराजितविषयक श्लोक गळला आहे.

६ वृत्त – आर्या. ७ वृत्त – आर्या.

[येन स्वागतमागताय विहितं गोम्माय नानाविधं]
येनैवैयपदेवनाम्नि चलितं राज्यं स्थिरं कारितम् ।
भिल्लमाम्मणसंबुवक्षितिभुजां दत्तं च येनाभयं
तस्य श्रीबिरुदंक[रामनृपतेरन्यत्किमावर्ण्यते[1] ॥]
श्रीमानभूत्तदनु वज्जडदेवनामा
भूपालमस्तकमणिस्तनयो नयज्ञः ।
अद्यापि यस्य चरितानि जनाः समस्ता
रोमाञ्चकञ्चुकितगात्रलताः स्मरन्ति[2] ॥
[तद्भ्राताथ ततोऽरिकेसरिनृपो जातः सतां संमतो
दृप्ताराातिकुलाचलैकदलने दम्भोलिलीलां दधत् ।
गत्वा शैशव एव सैन्यसहितो दृष्ट्वा च सोमेश्वरं
तस्याग्रे[3]] पितुराज्ञया जगदलं यः कीलयित्वागतः[4] ॥
तद्भ्रातृजो वज्जडदेवसूनुः [श्रीछित्तराजो नृपतिर्बभूव ।
सीलारवंशः शिशुनापि येन नीतः परामुन्नतिमुन्नतेन[5] ॥]

अथ स्वकीयपुण्योदयात्समधिगतपञ्चमहाशब्दमहासामन्ताधिपतितगरपुरपरमेश्वरशीलारनरेन्द्रसहज[विद्याधर][सुवर्ण]गरुडध्वज[6]त्यागजगज्झम्पिनन्निसमुद्र[कलिगजां]कुश[7] जीमूतवाहनान्वयप्रसूतप्रभृति[समस्तराजावली]समलङ्कृतमहामण्डलेश्वरश्रीछित्तपैयदेवराजो निजभुजोपार्जितानेकमण्डलसमेतपुरीप्रमुखचतुर्दशग्रामशतीसमन्वितसमस्तकोंकणभुवं समनुशासति तथैतत्प्रसादात्स-

---

१ क्र. ८, ओ. २०–२२. वृत्त – शार्दूलविक्रीडित.
२ वृत्त – वसन्ततिलका. ३ क्र. ११, ओ. २३–२५.
४ वृत्त – शार्दूलविक्रीडित.
५ क्र. ९, ओ. १४–१६. वृत्त – अनुष्टुभ्.
६ नातू यांच्या पाठात 'सहजगरुडध्वज' आहे, त्यांत 'सहजविद्याधर आणि 'सुवर्णगरुडध्वज' या दोन बिरुदांचा मिलाफ झाला आहे.
७ नातूंच्या पाठात गजांकुश आहे त्याचा नीट अर्थ लागत नाही. येथे इतर ताम्रपटांतल्याप्रमाणे खरा पाठ 'कलिगजांकुश' असावा. क्र. ६० ओ. २७ पाहा.

मस्तराज्यचिन्ताभारं समुद्वहति महामात्ये श्रीनागणैये[1] सर्वाधिकारि[णि] प्रभुश्रीदादपैये[2] श्रीसंगलैयश्रीतिक्कपैय[प्रभृति]पञ्चप्रधानजनप्रत्यक्षं पाणाडविषयान्तःपातिकरदाण्डकोलपल्लिकाग्रामद्वयनिवासिनां चिपळूणस्थकरहाटककोटणक्रम[विद्]इत्यादीनां यजनयाजनाध्ययनाध्यापनादिषट्कर्मनिरतानां क्रतुक्रियाकाण्डशौण्डानां महाब्राह्मणानामारामभूमौ[3] शासनस्थित्या व्यवस्थापनमभिप्रयच्छति यथा । आकलितसकलसंसारासारत्वेन धर्माधर्मविचारचारुमतिना मया समस्ताभ्युदयभागिनीमहाराज्ञीश्रीपद्मलदेव्यादेशेन पंचप्रधानानुमत्या महाजनप्रमुख[समक्षं][4] प्राग्लिखितकरदाण्डकोल्लपल्लिकाग्रामद्वयानुवर्तिनां समस्तारामाणां फलप्रविष्टानां पूगीफलशतं प्रति[5] द्रम्मचतुष्टयं विधाय भूमौ[6] [व्यवस्था] विहिता । सा च पूर्वप्रसिद्धया. . . व्यावहारिकाः(कैः) चतुःपरिष्कृता भूमौ देया । अध्यरण्यं च आरामाभ्यन्तरवर्तिनो नारिकेलपनसचंपकसहकारादिवृक्षाः अभ्यन्तरीकृताः [।*] सुरामंडवृक्षश्चाभ्यन्तरवर्ती बाह्यो वा राजकीय एव । तस्योन्मूल[न]च्छेदादिकं केनापि न करणीयम् । तथा ग्रामीणतृणकाष्ठादिकमानयतां विप्राणां [प्रतिषेधः][7] न करणीयः । इति धर्माधर्मविचारचतुरमुनिवचनान्यवधार्य क्रोधलोभाभिभूतेन

---

१ 'नागणैय' याच्या पूर्वी 'महामात्यश्रीराजगुरुमहामहोपाध्यायरामपंडित असे शब्द आहेत. नागणैय हा छित्तराजाच्या काळी महामात्य होता, पण 'महामहोपाध्याय' सारख्या पदव्या त्या काळी प्रचलित नव्हत्या. म्हणून 'महामात्य' नंतरचे शब्द गाळले आहेत.

२ याचे नाव इतरत्र 'दद्धपैय' असे येते. क्र. १३, ओ. ४० पाहा.

३ नातूंच्या पाठात 'आरामगुमौ' आहे. दीक्षित 'गुम' याचा अर्थ 'एक कर' असा घेतात. 'गुमौ' हे 'भूमौ'चे चुकीचे रूप दिसते.

४ नातूंच्या पाठात 'महाजनप्रमुखमानानाम्' आहे. ते अर्थातच अशुद्ध आहे.

५ 'पूगीफलवृक्षशतं प्रति' किंवा 'पूगीवृक्षशतं प्रति' असे येथे विवक्षित असावे. शंभर पोफळांवर चार द्रम्म कर असणे शक्य नाही.

६ नातू यांच्या पाठात 'गुमौ' आहे. 'आरामभूमिविषयक' असा अर्थ दिसतो.

७ नातूंच्या पाठात 'खखा न करणीया' असे आहे.

लिखितमर्यादा नोल्लंघनीया । अत्र विषये अन्यथा न करणीया । अन्यच्च व्यवस्थाचारः फलितपंचाशत्पूगप्रमाणं पूगफलगणनायां गणनीयम् । क्रयमायातस्यारामस्य क्रयार्थं द्रव्यस्य त्रिकशतेन विक्रयभाव्यं ग्राह्यम् । यथा चैतदेवं तथा [शासन]पत्रदाता लेखकहस्तेन स्वमतमारोपयति । यथा मतं मम महामण्डलेश्वरश्रीछित्तपैयदेवराजस्य महामण्डलेश्वरश्रीमद्वज्जडदेवराजसूनोर्यदत्र लिखितम् । लिखितं चैतत् संवत् ९४६, भाद्रपद वदि १३ मया श्रीमद्राजानुज्ञया श्रीपद्मलदेवीनियमाद् भाण्डागारसेनमहाकविश्रीनागलैयभ्रातृसुतेन जोउपैयेन । यदत्रोनाक्षरमधिकाक्षरं वा तत्सर्वं प्रमाणम् । उत्कीर्णं ताम्रपटे वेदपैयसुत[1]धारप्पैय्यैनेति ॥

क्र. ६२

द्वितीय भोजाचे कुतापूर दानपत्र : शक संवत् १११३

याची आणि मागील कशेळी (क्र. ६०) दानपत्राची अशा दोन नकली मुंबईस दोघा गुर्जरकुलोत्पन्न वैदिकांनी कै. वि. का. राजवाडे यांच्या स्वाधीन केल्या होत्या. त्या त्यांनी प्रभात मासिकात, वर्ष २, अंक ४ ते ७ (१९०७), पृ. १ ते ५ मध्ये प्रसिद्ध केल्या. मागील (क्र. ६० च्या) दानपत्राचा ताम्रपट कशेळी (ता. राजापूर) येथे अद्यापि विद्यमान आहे, पण प्रस्तुत नकलेचा मूळ ताम्रपट मात्र आता उपलब्ध नाही. म्हणून राजवाड्यांच्या नकलेवरून तो येथे संपादिला आहे. तो मूळचा कोणत्या गावातील याची माहिती नाही.

वर्णन – हा **ताम्रपट** उपलब्ध नसल्याने त्याची लांबी, रुंदी, असल्यास त्याची मुद्रा, लेखनपद्धति याविषयी कांहीच माहिती नाही. **भाषा** संस्कृत आहे. यातील आरंभीचा राजप्रशस्तिपर भाग व त्यानंतर दानपत्राचा प्रास्ताविक भाग कशेळी ताम्रपटातल्याप्रमाणे आहे. फक्त श्लो. ४ व ५ मध्ये फरक आहे. तो पुढे वाचनात दाखविला आहे. मूळ ताम्रपट उपलब्ध न झाल्यामुळे त्याचे वाचन पंक्तिवार देणे शक्य नाही.

---

१ नातूंच्या पाठात ‘ दैदप्पैय ’ आहे. याचे नाव अरिकेसरीच्या ठाणे ताम्रपटात (क्र. ८, पृ. ६४) ‘ वेदपैय ’ असे आले आहे.

विषय – हा ताम्रपट कोल्हापूरचा **शिलाहार नृपति द्वितीय भोज** याचा आहे. त्याची वंशावळ व पूर्वजांचे वर्णन कशेळी दानपत्रातल्या प्रमाणे आहे त्याची बिरुदेहि तीच आहेत. यात कोरक्याचे नाव आले नाही.

उद्देश – प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश शिलाहार नृपति **द्वितीय भोज** हा **पद्मनाल** दुर्गात सुखसंवादात मनोविनोदाने राज्य करीत असता त्याने **गत शक संवत् १११३, विरोधकृत् संवत्सर, मार्गशीर्ष मास, अमावास्येस, बुधवारी,** झालेल्या **सूर्यग्रहणाच्या** प्रसंगी गुर्जर उपनामाच्या काश्यप, आवसार आणि नैध्रुव हे प्रवर असलेल्या नैध्रुवगोत्री गोविंद भट्टवर्धन[1] नामक धर्माधिकारी ब्राह्मणाला आपल्या राजपुरोहिताच्या समक्ष एका विशिष्ट मध्यप्रदेशाच्या **कुतापुर** गावातील तीस निवर्तन जमीन आणि त्या प्रदेशातील प्रत्येक गावातून एक **रजतनिष्क** (रुप्याचे नाणे, द्रम्म) ही दान दिली हे नमूद करण्याचा होता. हे कुतापुर गाव ज्या मध्यप्रदेशात होते त्याच्या चतु:सीमा सांगताना **मंचालगिरी**तून निघून समुद्रास मिळणारी नदी, तिच्या दक्षिणेस **मारिच गिरी**तून निघून समुद्राला मिळणारी **गंगा,** सह्याद्रीचा पायथा आणि समुद्रकिनारा यांचा उल्लेख केला आहे. धर्माधिकाऱ्याची कर्तव्ये सांगताना इष्टापूर्तव्रत, प्रायश्चित्त, ज्योतिष, पुराण, न्यायाधीशकर्म आणि राष्ट्रधर्मनिरीक्षण इत्यादि अष्ट धर्मांचा उल्लेख आला आहे. या सर्वांचे महत्त्व सांगणारे श्लोक नंतर घातले आहेत.

कालनिर्णय – कशेळी दानपत्राप्रमाणे प्रस्तुत दानपत्रहि गत शक संवत्सर १११३, विरोधकृत् संवत्सरातच दिले होते. संवत्सराचा उल्लेख दाक्षिणात्य पद्धतीने जुळतो, हे मागे सांगितले आहे. त्या वर्षी अमान्त मार्गशीर्ष अमावास्येला बुधवारी सूर्यग्रहण होते, तेव्हा ही तिथि बरोबर जुळते, तिची इंग्रजी तारीख १८ डिसेंबर सन ११९१ आहे.

स्थलनिश्चय – **पद्मनाल दुर्ग** म्हणजे कोल्हापूरजवळचा पन्हाळगड. दान दिलेल्या गावाच्या सीमा सांगताना सह्याद्रीतून उगम पावून समुद्राला मिळणाऱ्या नद्यांचा निर्देश आला आहे त्यावरून ते गाव कोकणात होते हे निश्चित. त्यांपैकी पहिली नदी **मंचालगिरी**तून निघाली होती असा उल्लेख आहे. हा मंचालगिरि म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यातील माचाळ पर्वत आणि त्यात उगम पावलेली नदी मुचकुंदी होय. दुसरी नदी तिच्या दक्षिणेस (याम्ये) **मारिचगिरी**तून उगम पावली होती. तिला गंगा म्हटले आहे. या मारिचगिरीचा पत्ता लागत नाही. कदाचित् ही राजापूर जवळची नदी असेल. तसे असल्यास दान दिलेली जमीन ज्या गावात होती ते **कुतापुर** या दोन नद्यांमध्ये शोधले पाहिजे. तसे गाव या

१ येथील खरा पाठ 'पट्टवर्धन' असावा. हे उपनाम तत्कालीन यादवांच्या ताम्रपटांत येते.

भागात आढळत नाही. तथापि मागील कशेळी दानपत्राचा ताम्रपट राजापूर तालुक्यातील होय हे मागे दाखविले आहे. हे दोन्ही ताम्रपट एकाच ब्राह्मणाच्या कुळात होते असल्यास कुतापुर हेहि राजापूर तालुक्यातच होते असे अनुमान करण्यास हरकत नाही.

वाचन[1]

॥ जयत्याविष्कृतं विष्णोर्वाराहं क्षोभितार्णवं(वम्) ।
दक्षिणोन्नतदंष्ट्राग्रविश्रान्तभुवनं वपुः[2] ॥ १ ॥
आसीद्विद्याधरः पूर्वं नाम्ना जीमूतवाहनः ।
परार्थं जीवितं येन गरुडाय निवेदितम् ॥ २ ॥
शिलाहाराख्यवंशोयं तगरेश्वरभूभृतां(ताम्) ।
तद्वंशे जतिगो राजाजनि भूभृच्छिखामणिः ॥ ३ ॥
स्वस्ति श्रीजतिगक्षितीशतनयो नायिम्मनामा नृपः
पुत्रस्तस्य च चंद्रराट् पृथुयशास्तस्यापि सूनुः किल ।
संजातो जतिगो जगज्जननुतः श्रीमांश्च तन्नंदनो
गोंकल्लो भुवि भूमिपालतनयः[3] श्रीमारसिंहो नृपः[4] ॥ ४ ॥
तत्सूनुर्नृपमौलिलालितपदः श्रीगूवलाख्यो नृपः
तद्भ्राता भुवि भोजराजनृपतिर्वैरीभपंचानन–
श्चक्रे राज्यमकंटकं पृथुयशा लंकेशतुल्यं किल[5] ॥ ६ ॥
तस्यानुजातो विदितप्रतापो बल्लालदेवः क्षितिपः सदैव ।
श्रीकामिनीशो विनताऽवनीशो दिक्प्रान्तरूढ प्रथितप्रतापः[6] ॥ ७ ॥
तस्यानुजो धर्मधरो धरित्र्यां दधार वर्णानखिलान्स्वधर्मे ।
धर्माग्र्यधुर्यो धनदोऽधनानां श्रीगंडरादित्य इति प्रसिद्धः[7] ॥ ८ ॥

---

१ प्रभात, वर्ष २, अंक ४ ते ७ (१९०७), पृ. १ ते ५.
२ या व पुढील दोन श्लोकांचे वृत्त – अनुष्टुभ्.
३ यापुढील या पादाचा भाग (श्लो. ४) आणि नंतरचा पूर्ण श्लोक (श्लो. ५) व पुढील पहिल्या पादाच्या आरंभीचा कांही भाग (श्लो. ६) गळले आहेत. क्र. ६०, ओ ५–७ पाहा.
४ वृत्त – शार्दूलविक्रीडित. ५ वृत्त – शार्दूलविक्रीडित.
६ वृत्त – इन्द्रवज्रा. ७ वृत्त – उपजाति.

दीनानाथदरिद्रदु:खविकलव्याकीर्णनानाविध-
प्राणित्राणपरायणः प्रतिदिनं गुप्ताख्यदानेन यः ।
यः कृष्णाजिनधेनुभूम्युभयतोमुख्यादिदानप्रदः
शश्वद्ब्रह्ममतिप्रवीणहृदयो भूदेवकल्पद्रुमः[१] ।। ९ ।।

तुलापुरुषदानादिषोडशक्रतुकारकः ।
शौर्यगांगेयकीर्त्यैकनिलयः स्वगुणैर्भुवि[२] ।। १० ।।

तन्नंदनः प्रबलमंडलिकद्विपेंद्र-
पंचाननोजनि जगत्त्रितयैकवीरः ।
प्रत्यर्थिपार्थिवललाटतटस्थपाद-
पीठास्पदोज्ज्वलयशा विजयार्कदेवः[३] ।। ११ ।।

दानाय द्रविणार्जनं जनपरित्राणाय वीरव्रतं
सत्याय प्रियभाषणं हरिपदध्यानाय चेतःस्थितिं(तिम्) ।
संपत्तिः सुमनोविपद्विहतये यस्य प्रकामं कविः
कः शक्तः प्रविविच्य तस्य विजयादित्यस्य वक्तुं गुणान्[४] ।।१२।।

येन स्थानकमंडले तदधिपा भ्रष्टाः पुनः स्थापिता
गोवायां परिनष्टभूमिपतयः सुस्थापितास्तेजसा ।
यत्सख्येन च चक्रवर्तिपदवीमावाप यो बिज्जणः
सो वुद्धी(सोभूच्छ्री)विजयांकदेवनृपतिर्वैरीभपंचाननः ।। १३ ।।

तन्नंदनः सकलदिक्तटवर्तिकीर्ति-
र्भ्रूभंगमात्रचपलाइ(यि)तवैरिवर्गः ।
विश्वंभराभरधुरीणभुजः सदैव
विभ्राजते नृपवरो भुवि भोजदेवः[५] ।। १४ ।।

संग्रामांगणभैरवः क्षितिभुजां संहारभेरीरवः
कीर्त्याक्रांतजगत्त्रयस्तनुभृतां निर्धूततापत्रयः ।

---

१ वृत्त – शार्दूलविक्रीडित. २ वृत्त – अनुष्टुभ्.
३ वृत्त – वसन्ततिलका.
४ या व पुढील श्लोकाचे वृत्त – शार्दूलविक्रीडित.
५ वृत्त – वसन्ततिलका.

श्रीरत्नाप्रियनंदनः परिजनानंदैकसंक्रंदनः
प्राप्ताशेषमहीतलः स जयति श्रीभोजरत्नाचलः[१] ॥ १५ ॥

स्वस्ति । श्रीसमधिगतपंचमहाशब्दमहामंडलेश्वरतगरपुरवराधीश्वरजगज्जनमनोनुरागसागरप्रवर्धनशरच्चंद्रश्रीशिलाहारनरेन्द्रविद्वज्जनमनोरथफलप्रदपारिजातजीमूतान्वयप्रसूतविरोधिधराधीशवंशगहनदहनधूमध्वजसुवर्णगरुडध्वजरिपुमदवदिभविदारणोत्कंठकंठीरवमंडलीकभैरवविद्विष्टमंडलीकपन्नगवैनतेयशौचगांगेययुवतिजनमनःसंमोहनाभिनवकंदर्पमरुवंकसर्व (र्प) सर्वक्षत्रियशिखामणिश्रीविजयादित्यदेवनृपसिंहसाहसा (सो) त्तुंगारिनृपतिराज्यसमाकर्षणमंत्रसिद्धिशनिवारसिद्धिसकलास्त्र[२]पारावारपरायणरूपनारायणसकलजगति (ती) जनस्तुत्यतटापताकोपवनविद्याहितारातिसना[३]-गिरिदुर्गलंघनोद्धतधराधीशकुलशिखरिकुलिशारिमदांकुशवीरलक्ष्मीलताप्रलंबनप्रचंडभुजदंडमंडलिकजवदंडमंडलिकनरनारसिंहमंडलिकवेश्याभुजंगबलवीर[४]चतुरंगसंघट्टवैरिसंघ[५]अरसासवादि[६]-मदनमहेश्वरप्रतापलंकेश्वरमंडलिकगंडपेंडारएकांगवीरशरणायातभूभृन्निवहरक्षणसमुद्रपरबलविलयकालाग्निरुद्रसुगीतकृत (ति) चातुर्यहर्षितशिवांतरंगप्रशस्तवस्तुकविताप्रभंगविविधधर्मनिर्माणनित्यप्रमोदश्रीमहालक्ष्मीदेवीलब्धवरप्रसादादिसमस्तराजावलीविराजितश्रीमन्महामंडलेश्वरश्रीभोजदेवो गिरिनिलयपद्मनालदुर्गे सुखसंकथाविनोदेन राज्यं कुर्वाणः शकवर्षेषु सत्रयोदशशताधिकसहस्रेषु गतेषु १११३ वर्तमानविरोधकृत्संवत्सरे मार्गशीर्षमासि अमावास्यायां तिथौ सौम्यवासरे सूर्योपरागे धा[रा*]पूर्वक (कम्) उद-

---

१ वृत्त – शार्दुलविक्रीडित.

२ कशेळी ताम्रपटातल्याप्रमाणे ' सकलशास्त्र– ' वाचावे.

३ ' जयपताकापवनविघटितारातिसेना ' असे कशेळी ताम्रपटातल्याप्रमाणे वाचावे.

४ ' बलवदरि ' वाचावे. ५ ' वैरिघरट्ट ' वाचावे.

६ कशेळी ताम्रपटात ' अरसासवारि ' असा पाठ आहे.

धितटवर्तिकोंकणदेशे काश्यपावतार[1]नैध्रुवेतित्रिप्रवरोपेतनैध्रुवगोत्रोत्पन्नगुर्जरसमुपाभिदा(धा)नगोविंदभट्टवर्धन[2]हस्ते, इष्टापूर्त्तंव्रतं प्रायश्चित्तं ज्योतिषमेव च । पुराणं प्राड्विवाकत्वं राष्ट्रधर्मनिरीक्षणं(णम्)[3] । अष्टधर्मस्य तत्व(त्त्व)ज्ञो नृपेणाधिकृतश्च यः । धर्माधिकारी विप्रेशो ब्रह्मदंडप्रभुर्हि सः । इत्येवंकृतसीमां तत्र संचालगिरिप्रसूतापगा समुद्रगामिनी तद्याम्ये मारिचगिरिप्रसूतापगा समुद्रगामिनी गंगांतःसह्यपादसिंधुपादसिंधुर्वतिमध्यदेशं तन्निर्वाहोपयोगि धर्मशास्त्रे संग्रहार्थं राजा(ज)पुरोहितसंनिध(धौ) कुतापुरग्रामे त्रिंशन्निवर्तनपरिमाणा भूमिः प्रतिग्रामं रजतनिष्कं च राजकीयानामनंगुलिप्रेक्षणीयं[4] प्रादात् । आचंद्रार्कमहीधरान्वयभृतां आ ब्रह्मणः शासनाद्युष्मन्नैध्रुवगोत्रगुर्जरभुवां भूदेवपूज्यात्मनां(नाम्) । आचारादिषु देशमान्यपदवी वर्वर्ति लोकोत्तरा कश्चिल्लंघयितुं च तां परिदृढीभूयाद्विधिस्तं दहेत्[5] ॥ १ ॥ श्रुतिस्मृतिपुराणानां धर्मशास्त्रार्थकोविदे । पार्थिवो याति निरयमकुर्वन् धर्मपालकं(नम्)[6] ॥ २ ॥ धर्मशास्त्रार्थकुशलं पुराणस्य च चिंतकं(कम्) । धर्माधिकारिणं कुर्याद्राजा दद्याद्धनं बहु ॥ ३ ॥ अप्रदीपा तथा रात्रिरनादित्यं यथा नभः । तथाऽसांवत्सरो राजा भ्रमत्यंध इवाध्वनि ॥ ४ ॥ धर्मशास्त्रं पुरस्कृत्य प्राड्विवाकमते स्थितः । समाहितमतिः पश्येद्व्यवहाराननुक्रमात् ॥ ५ ॥ वसुधा बहुभिर्दत्ता राजभिः सगरादिभिः । यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फलं(लम्)॥६॥ उपयोगिपदार्थानामन्येषामपि लब्धये । ग्रामं वा विपुलां भूमिं यो दद्याच्छ्रद्धयान्वितः ॥ ६ ॥ स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुंधरां(राम्) । षष्टिवर्षसहस्राणि विष्ठायां जायते क्रि(कृ)मिः ॥ ८ ॥ षष्टिवर्षसहस्राणि स्वर्गे

---

१ 'काश्यपावसार–' वाचावे.

२ 'पट्टवर्धन' असा पाठ विवक्षित असेल.

३ या व पुढील लोकाचे वृत्त – अनुष्टुभ्.

४ 'प्रक्षेपणीयम्' वाचावे. ५ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

६ या व पुढील श्लोकांचे वृत्त – अनुष्टुभ्.

तिष्ठति भूमिदः । आच्छेत्ता चानुमंता च तान्येव नरके वसेत् ॥९॥ अतिदानं च सर्वेषां भूमिदानमिहोच्यते । अचला ह्यक्षया भूमिः । . . . . . . न्प्रयच्छति[1] ॥ १० ॥ सुवर्णं रजतं वापि मणिमुक्ताफलानि च । सर्वमे[2] . . . . . ददाति वसुधां ददत् ॥ ११ ॥ भर्तुर्निःश्रेयसे युक्ताः संग्रामाभिमुखे हताः । . . . तीह[3] भूमिदा यदवाप्नुयुः ॥ १२ ॥ पतंत्यश्रूणि रुदतां दीनानामव . . . । . . . हृते[4] क्षेत्रे हन्युः स्त्रीपुरुषं कृतं(तम्)[5] ॥ १३ ॥ मद्वंशजाः परमहीपति[6] . . . । . . . तमनसो भुवि भूमिपालाः । ये पालयंति मन धर्म[7] . . . । . . . विरचितोंजलिरेष मूर्ध्नि ॥१४॥ सामान्योयं धर्मसेतुर्नृपाणां । . . . [8]पालनीयो महद्भिः । सर्वानेतान् भाविनः पार्थिवेन्द्रान्[9] । . . . द्रः ॥ १५ ॥

श्रीः ॥ श्रीः ॥

---

१ 'सर्वान् कामान् प्रयच्छति' वाचावे.

२ 'सर्वमेतत्महाप्राज्ञो' वाचावे.

३ 'तां गतिं नाप्नुवन्तीह' वाचावे.

४ 'सीदताम् । ब्राह्मणानां' वाचावे.

५ 'हन्ति त्रैपुरुषं कुलम्' वाचावे.

६ '–वंशजा वा पापादपेतमनसो' वाचावे.

७ 'मिमं समग्रं तेषामयं' वाचावे.

८ 'काले काले' वाचावे. ९ 'भूयो भूयो याचते रामभद्रः' वाचावे.

द्वितीय परिशिष्ट

क्र. ६३

यादव नृपति सिंघणाचा खिद्रापूर शिलालेख : शक संवत् ११३६

या लेखाची **शिला खिद्रापूर** येथील कोप्पेश्वर देवालयाच्या सभामंडपाच्या दक्षिण द्वाराजवळ बाहेरच्या बाजूस लावली आहे.[१] ती ५ फू. ३ इं. उंच आणि २ फू. ३½ इं. रुंद असून तिच्या शिरोभागी कोल्हापूरच्या शिलाहारांच्या शिलालेखांतल्याप्रमाणे, मध्ये शिवलिंग आणि पुजारी, उजव्या बाजूस तरवार, डाव्या बाजूस सवत्स गाय आणि त्यांवर चंद्र आणि सूर्य यांच्या आकृति कोरल्या आहेत. त्याखाली प्रस्तुत लेख कोरला आहे.

या लेखाची **अक्षरवटिका** नागरी आणि **भाषा** संस्कृत आहे.

विषय – या लेखाचा उद्देश **यादव नृपति सिंघणदेव** याने **देवगिरीत** असताना **कृष्णवेणी** आणि **कुवेणी** यांच्या संगमावरील देवालयातील स्वयंभू श्रीकोप्पेश्वर देवाचे अंगभोग[२] आणि रंगभोग[३] यांकरिता **कूडलकृष्णवेणी** आणि **भेणसी** नद्यांच्या संगमाजवळचे **मिरिंजि** देशातील **कूडलदामवाड** गाव दान दिला, हे नमूद करण्याचा होता. पुढे लेखात म्हटले आहे की यापूर्वी **जुगुल** आणि **सिरिगुप्प** हे दोन गाव श्रीकोप्पेश्वराला दिले होते त्यांचा उपयोग त्याच्या देवालयाच्या जीर्णोद्धाराकरिता करावा.[४]

---

१ हे गाव संकेश्वर स्वामी शंकराचार्यांच्या इनामगावांपैकी होते, असे फ्लीटने म्हटले आहे. या ठिकाणी कृष्णा नदी पश्चिमवाहिनी झाली आहे. म्हणून या स्थानाला विशेष पवित्रता आली आहे.

२ अंगभोग म्हणजे पूजाअर्चा, नैवेद्य वगैरे.

३ रंगभोग म्हणजे कीर्तन, नृत्य, वाद्यवादन वगैरे.

४ या ग्रंथाच्या इतिहास खंडात दाखविल्याप्रमाणे हे मंदिर बांधण्यास शिलाहार नृपति विजयादित्य याच्या काळात सुरवात झाली असावी. नंतर द्वितीय भोजाच्या काळी सिंघणाने शिलाहारांचा उच्छेद केल्यामुळे ते अपूर्ण राहिलेले दिसते. त्याच स्थितीत ते अद्यापि आहे. त्याच्या डागडुजीकरिता पूर्वी दान दिलेल्या दोन गावांच्या उत्पन्नाचा विनियोग करावा असा सिंघणाने आदेश दिला. पण ते पूर्ण करण्याची काही योजना त्याने केली नाही. केवळ गर्भगृहावरचे साधे चुनेगच्ची शिखर नंतर बांधले गेले असावे. ते या मंदिराच्या भव्यतेशी आणि सौंदर्याशी पूर्णपणे विसंगत आहे. सभामंडपावर शिखर नाही आणि त्या पुढील तथाकथित ‘स्वर्गमंडपा’चे छतहि पूर्ण झाले नाही.

कालनिर्णय – प्रस्तुत दानाची मिति **शक संवत् ११३६, श्रीमुख संवत्सर, चैत्र** महिन्यातील **सूर्यग्रहण, सोमवार,** अशी दिली आहे. कोल्हापूरच्या इतर कांही कोरीव लेखांतल्याप्रमाणे हे शक वर्ष 'वर्तमान' मानले पाहिजे, तरच ते दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे श्रीमुख संवत्सराशी जुळेल. त्या वर्षी चैत्र अमावास्येस सूर्यग्रहण होते व वार सोमवार होता. त्याची इंग्रजी तारीख २३ एप्रील, सन १२१३ अशी येते.[१] हे ग्रहण भारतात दिसण्यासारखे होते हे कीलहॉर्नने दाखविले आहे.

स्थलनिश्चय – **देवगिरि** ही यादवांची राजधानी, सध्याचे दौलताबाद. **मिरिंजि** हे सध्याचे मिरज होय. दान दिलेले **कूडलदामवाड** कुरुंदवाड असावे असे फ्लीटने म्हटले होते. पण ते सध्याचे मिरज तालुक्यांतील कुंडलापूर असणे जास्त संभवनीय आहे. **जुगुळ** आणि **सिरगुप्पि** ही गावे सध्या कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांत आढळत नाहीत. जुगल गाव बेळगाव जिल्ह्याच्या अथणी तालुक्यात आहे, पण ते फार दूर आहे. सांगली जिल्ह्यात सिरहट्टी गाव आहे ते कदाचित् प्राचीन सिरगुप्पी असेल.

ओळ **वाचन**[२]

१ श्री[:*] [॥*] नमस्तुंगशिरश्चुंबिचंद्रचामरचारवे [।*] त्रैलोक्य–
२ नगरारंभमूलस्तंभाय शंभवे[३] **।[।१॥*] धर्मः सुस्थिरतामु–**
३ पैतु जगतामानंददायी सदा वृद्धिं चाभिनवांतरेण
४ भवतां कोप्पेश्वरस्याभितः । स्थानं स्वोर्जितमूर्जितं च
५ बहुना कालेन लब्ध्वाधुना श्रीमद्धीमदुदारसारचतुरायुष्मन्म–

---

१ फ्लीटने या लेखाचे इंग्रजी वर्ष १२२४–२५ असे दिले आहे, पण ते चूक आहे. शक ११३६ ला भव संवत्सर होते, त्याच्या पूर्वीच्या ११३५ ला श्रीमुख संवत्सर होते हे मात्र त्याने दाखविले आहे. *J. B. B. R. A. S.*, Vol. XIII, pp. 2 and 9. फ्लीटने हा लेख संपादिला तेव्हा त्याला ज्योतिषाचे ज्ञान नव्हते. म्हणून त्याने इंग्रजी तारीख दिली नाही, किंवा या तिथीस सूर्यग्रहण होते काय हेहि पडताळून पाहिले नाही. पुढे तो चांगला ज्योतिषज्ञ झाला. कीलहॉर्नने याची पूर्वोक्त बरोबर तारीख दिली आहे. *Inscriptions of Southern India*, No. 339.

२ *J. B. B. R. A. S.*, Vol. XII (Old Ed.), pp. 1 f.

३ वृत्त – अनुष्टुभ्.

६ हापूरुषान्[1] ॥[२॥*] भूदेवाशीरमृतात्मवृष्ट्याप्यायितोयमन-
वरतं(तम्)

७ । अंकुरतात्पल्लवतात्कुसुमतु फलतात्सुधर्मकल्पतरुः ॥[३॥*]

८ स्वस्ति श्रीशकवर्षे ११३६ श्रीमुखसंवत्सरे चैत्रे सूर्य्यपर्ब(र्व)णि
सोमदि-

९ ने श्रीमद्देवगिरावधिष्ठित(तः) समस्तभुवनाश्रय(यः) श्रीपृथ्वी-
वल्लभ(भो) महाराजा-

१० धिराज(जः) परमेश्वर(रो) द्वारवतीपुरवराधीश्वर(रो) वि-
ष्णुवंशोद्भव(वो)

११ यादवकुलकलिकाविकासभास्कर(रः) समस्तअ(स्ता)रि-

१२ रायजगजंप इत्येवमादिसमस्तराजावलीसमलंकृत(तः) श्रीम-

१३ त्प्रतापचक्रवर्तिश्रीमहाराजश्रीसिंघणदेवः शासनपत्रं प्रय-

१४ च्छति । यथा । कूडलकृष्णवेणीभेणसीनद्योः संगमे मिरिंजिदेश-

१५ मध्ये च तिष्ठमानं[3] कूडलदामवाडग्रामं सवृक्षमालाकुलं क्षेत्रस्थ-

१६ लवाटसहितं नवनिधानसंयुक्तं चतुराघाटोपेतं स्वसीमापर्यन्तं

१७ श्रीमत्कृष्णवेणीकुवेणीनदीसंगमात्(संगमे) श्रीमदाद्यस्वयंभुवे

१८ श्रीकोप्पेश्वरदेवाय सकलांगभोगरंगभोगपरिमलपरिपू-

१९ रणार्थं अष्टविधार्चननिमित्तं शासनोदकेन प्रदत्तवान् ॥ अस्य

२० ग्रामस्योत्पंन[4]द्रव्येण सकलस्थानपतिभिः श्रीमद्देवका-

२१ र्यं सर्ब(र्व)मपि अंगभोगपूजादिप्रभृतिकं [क]रणीयं(यम्) ।

२२ अन्यच्च जुगुलसिरिगुप्पग्रामद्वये यत्पूर्ब(र्वे)ण विद्यते तदेव
जीर्णो-

---

१ वृत्त - शार्दूलविक्रीडित.
२ वृत्त - आर्या. ३ 'तिष्ठन्तं' वाचावे.
४ '-स्योत्पन्न-' वाचावे.

२३ द्वारीकृत्य श्रीसिंघणदेवः श्रीकोप्पेश्वरदेवाय प्रदत्तवान् ॥

२४ आनंदामृतसागरस्य भरणे यः पूर्णचंद्रायते यः कार्प-

२५ ण्यतमस्ततेश्च हरणे मार्तंडतां ढौकते । यश्चायं हृदये निवे-

२६ शितहरे(रिः) क्षीराब्धिना स्पर्धते तस्य श्रीभुजवल्लरी विजयते सिंहा-

२७ ह्वपृथ्वीपतेः[१] ॥[४॥*] रिपुभूमिपालभालस्थलनिहितं क्षालय-यन्रणेषु चकास्ति ।

२८ गजगलगलितमदांबुप्रवाहतोसौ जगयी[२] सिंहनृपः[३] ॥[५॥*] मंगलं(लम्) ॥

---

१ वृत्त – शार्दूलविक्रीडित.

२ 'जयति' वाचावे. ३ वृत्त – गीति (अनियमित).

सूची

[खालील सूचीतील शब्दांपुढील आरंभीचे कंसविरहित अंक खंड २ मधील पृष्ठांचे आणि नंतरचे काटकोनाकृति कंसातील अंक खंड १ मधील पृष्ठांचे समजावे. नृ. = नृपति आणि शु. = शुद्धिपत्रातील शुद्ध पाठ.]

आ

घ

च

भ

म

शुद्धिपत्र

लेखकाचे हृद्गत

पृ.	ओ.	अशुद्ध	शुद्ध
सोळा	२३	पुर्वार्द्ध	पूर्वार्द्ध

(पुढील शुद्धिपत्रात चौकोनी कंसातील पृष्ठांक खंड १ चे व तद्विरहित पृष्ठांक खंड २ चे समजावे.)

खंड १

पृ.	ओ.	अशुद्ध	शुद्ध
[१९]	१४–१५	अपरार्क (सु. १११०–११४०)	अपरार्क (सु. १११०–११३९)
[१९]	१७–१८	हरिपालदेव (सु. ११३८–११५०)	हरिपालदेव (सु. ११३९-११५५)
[२६]	६	(सु. सन १०२०-१०६०)	(सु. सन १०२०-१०५०)
[३१]	१०	छित्तुक–	छित्तुक्क–
[५६]	१६	(सन ११२८)	(सन ११२६)
[५६]	२२	कोल्हापूर	हेर्ले
[५७]	१३	द्वितीय	तृतीय
[५८]	२१	सोमेश्वर	सोमदेव
[६०]	६	सोमेश्वर	सोमदेव
[८३]	२०	पुस्तकसंघाच्या	पुस्तकगच्छाच्या

खंड २

पृ.	ओ.	अशुद्ध	शुद्ध
५	शीर्षक	७९५	७७५
५	६	७९५	७७५
७	शीर्षक	७९५	७७५
११	१४	सालाणक	सालणक
११	१६	वकोला	वखोला

पृ.	ओ.	अशुद्ध	शुद्ध
१३	१४	सालाणक	सालणक
१३	१५	वखोली	वखोला
१३	२६	सालाणक	सालणक
१४	१३	–स्मज्जग–	–स्माज्जग–
२३	९ व २६	पूणक	पुणक
४५	११	शुक्ल	वद्य
४५	१३	शुक्ल	वद्य
४५	२५	लोणद	लोनाड
७७	६	भव	भाव
७७	१४	विज्ञानचोली	विज्ञानीचोली
९०	१३	कारियल	कोरियल
९०	२५	कोरियला	कोरियल
९६	२	कारियल	कोरियल
१००	३२	कुडप	कुडव
१०४	११	निरंजानि	निरंजनानि
११४	२०	व्रा(ब्रा)ह्म-	व्रा(ब्रा)ह्मण-
१३१	१८	माम्वणि-	माम्वाणि-
१३३	शीर्षक व ओ. ५	१००९	१००३
१४३	शीर्षक व ओ. १४	१०४८	१०४९
१४४	१	छित्तुक	छित्तुक्क
१५६	१४	चांडिजा	चंडिजा
१५७	४	चांडिजा	चंडिजा
१९४	१३	दर्भावती	दर्भवती
२०४	६	बोपगाव	बोपग्राम
२११	१४	चांदिजे	चांडिजे
२११	१६	पोरुत्थ	पोरुथ
२१६	१३	सीलार	शिलार
२२३	१२	वदङ्गुल	वडङ्गुल
२४३	१३	खिळिगिळि	खिळिगिळ
२५१	२९	सजयपल्ली	सजयापल्ली
२५३	२	केसरी	कासारी
२६७	१२	वळिवाड	वळवाड

पृ.	ओ.	अशुद्ध	शुद्ध
२६६	१६	बगुबतहेरिळिगे	बगुवन–हेरिळगे
२६७	११	वगुबण हेरिळिगे	बगुवन–हेरिळगे
२७२	२३	वल्लिवाड	वल्लवाड
२८०	७	–गेपुत्तमिरे	गेय्युत्तमिरे
२८०	२१	कवडेळ्ळगोद	कवडेगोळ्ळद
२८२	१३	कुरुसेय	करुसेय
२८५	४	बिसिगे	बीसिगे
२८५	शेवटची	सिद्दिगेच्या	दोन सिद्दिगेच्या
२९०	१४	मेघनन्दि	माघनन्दी
२९३	२२	वळिवाड	वळवाड
२९४	३	दोनिकोड	दोणिकोड
२९४	४	पिरियुगवारद	पिरियुगवार
३०१	१	दोनिकोडुचा	दोणिकोडचा
३०१	२१	हग	हाग
३०१	२४-२५-३२	हग	हाग
३०३ ३०४	२५ ९	हाविण हेरिळिगे	हाविन हेरिळगे
३०४	५	मेघनन्दी	माघनन्दी
३०४	१०	हेरिळिगे	हेरिळगे
३११	४	विजापूर	बेळगाव
३१४	११	हग	हाग
३१८ ३२१	५ १८	करहाट	करहाटक
३२४	१५	आदित्यनाथ	आदित्यभट्ट
३५०	१९	भवतां	भजतां
		स्वोर्जित–	स्वोचित–

डॉ. मिराशी यांचे इतर संशोधनपर ग्रंथ

English

1. Inscriptions of the Kalachuri-Chedi Era (*Corpus Inscriptionum Indicarum*, Vol. IV).
2. Inscriptions of the Vākāṭakas (*C. I. I.*, Vol. V).
3. Inscriptions of the Śilāhāras (*C. I. I.*, Vol. VI) (in press).
4. Studies in Indology, Vol. I.
5. Studies in Indology, Vol. II.
6. Studies in Indology, Vol. III.
7. Studies in Indology, Vol. IV.
8. Literary and Historical Studies (in press).
9. Kalidāsa : His Date, Life and Works. *
10. Bhavabhūti : His Date, Life and Works.

मराठी

११ कालिदास
१२ संशोधनमुक्तावलि, सर १
१३ संशोधनमुक्तावलि, सर २
१४ संशोधनमुक्तावलि, सर ३
१५ संशोधनमुक्तावलि, सर ४
१६ संशोधनमुक्तावलि, सर ५
१७ संशोधनमुक्तावलि, सर ६
१८ वाकाटक नृपति आणि त्यांचा काल
१९ कलचुरि नृपति आणि त्यांचा काल
२० मेघदूतातील रामगिरि अर्थात रामटेक

उडिया

२१ कालिदास

हिंदी

२२ कालिदास
२३ भवभूति
२४ मेघदूत में रामगिरि अर्थात् रामटेक
२५ कलचुरि नरेश और उनका काल
२६ वाकाटक राजवंश का इतिहास तथा अभिलेख

कन्नड


२७ कालिदास (संकलित) (मैसूर विद्यापीठ)
२८ भवभूति (संकलित) (मैसूर विद्यापीठ)

* In collaboration with Prof. N. R. Navlekar.

प्लेट क्र. १, आकृति क्र. १ : **धाराशिव लेण्यातील पार्श्वनाथमूर्ति**



प्लेट क्र. १, आकृति क्र. २




' तगर ' नगराचे नाणे

पुढील बाजू मागील बाजू


प्लेट क्र. १, आकृति क्र. ३



छित्तराजाचे द्रम्म नाणे



प्लेट क्र. २, आकृति क्र. ४
अंबरनाथ येथील शिवमंदिर
(भारतीय शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सौजन्याने)



प्लेट क्र. ३, आकृति क्र. ५

काली (अंबरनाथ देवालय)

(भारतीय शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सौजन्याने)



प्लेट क्र. ४, आकृति क्र. ६

ब्रम्हदेव (अंबरनाथ देवालय)


(भारतीय शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सौजन्याने)



प्लेट क्र. ५, आकृति क्र. ७
चंडिका (अंबरनाथ देवालय)
(भारतीय शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सौजन्याने)




प्लेट क्र. ६, आकृति क्र. ८
विष्णु (अंबरनाथ देवालय)
(भारतीय शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सौजन्याने)



प्लेट क्र. ७, आकृति क्र. ९

जानपद स्त्री (अंबरनाथ देवालय)


(भारतीय शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सौजन्याने)




प्लेट क्र. ८, आकृति क्र. १०

कोप्पेश्वर मंदिर (खिद्रापूर)


[संपादक, सकाळ (पुणे), यांच्या सौजन्याने]




प्लेट क्र. ९, आकृति क्र. ११
अपूर्ण सभामंडप, कोप्पेश्वर मंदिर (खिद्रापूर)
[संपादक, सकाळ (पुणे), यांच्या सौजन्याने]



प्लेट क्र. १०, आकृति क्र. १२
अपूर्ण सभामंडपाचा अन्तर्भाग (कोप्पेश्वर मंदिर, खिद्रापूर)
[संपादक, सकाळ (पुणे), यांच्या सौजन्याने]



प्लेट क्र. ११, आकृति क्र. १३
कोप्पेश्वर मंदिराच्या जंघेला लावलेले हत्ती व नंदी
(आता भग्न झालेले)



प्लेट क्र. १२, आकृति क्र. १४
शिवलिंग (कोप्पेश्वर मंदिर, खिद्रापूर)
[संपादक, सकाळ (पुणे) यांच्या सौजन्याने]





प्लेट क्र. १३

आकृति क्र. १५, **नर्तक्या**

आकृति क्र. १६, **राजपुरुष**

[संपादक, सकाळ (पुणे), यांच्या सौजन्याने]



प्लेट क्र. १४, आकृति क्र. १७

सरस्वती (कोप्पेश्वर मंदिर, खिद्रापूर)

[संपादक, सकाळ (पुणे), यांच्या सौजन्याने]



प्लेट क्र. १५, आकृति क्र. १८

नर्तकी आणि कुमार (कोप्पेश्वर मंदिर, खिद्रापूर)

[संपादक, सकाळ (पुणे), यांच्या सौजन्याने]






प्लेट क्र. १६

आकृति क्र. १९
महावराहाची भग्नमूर्ति (खिद्रापूर)
[संपादक, सकाळ (पुणे),
यांच्या सौजन्याने]

आकृति क्र. २०
ब्रम्हदेव (सोपारा)
[भारतीय शासनाच्या पुरातत्त्व
विभागाच्या सौजन्याने]




प्लेट क्र. १७, आकृति क्र. २१

रूपनारायण (जैन) मंदिर (कोल्हापूर)




प्लेट क्र. १८, आकृति क्र. २२

रूपनारायण (जैन) मंदिराच्या सभामंडपातील एक खांब




प्लेट क्र. १९, आकृति क्र. २३

पार्श्वनाथ (रूपनारायण मंदिर, कोल्हापूर)




प्लेट क्र. २०, आकृति क्र. २४
बाहुबलि (रूपनारायण मंदिर, कोल्हापूर)



प्लेट क्र. २१, आकृति क्र. २५

जैन मंदिर (खिद्रापूर)

(संपादक, सकाळ, पुणे, यांच्या सौजन्याने)




प्लेट क्र. २२, आकृति क्र. २६
श्रीधर (जोंधळीबाग, ठाणे)
[विश्वस्त, प्रिन्स् ऑफ् वेल्स् म्यूझियम् (मुंबई), यांच्या सौजन्याने]



प्लेट क्र. २३, आकृति क्र. २७
महिषासुरमर्दिनी (ठाणे)
[विश्वस्त, प्रिन्स् ऑफ् वेल्स् म्यूझियम् (मुंबई), यांच्या सौजन्याने]



प्लेट क्र. २४, आकृति क्र. २८
कार्त्तिकेय (विन्ध्यवासिनी लेणे, चिपळूण)
[विश्वस्त, प्रिन्स् ऑफ् वेल्स् म्यूझियम् (मुंबई), यांच्या सौजन्याने]




प्लेट क्र. २५, आकृति क्र. २९

शिलाहारकालीन नागरी लिपी

(अपराजिताचा जंजिरा ताम्रपट (क्र. २) : दुसरा पत्रा, पहिली बाजू)

(भारतीय शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सौजन्याने)




प्लेट क्र. २६, आकृति क्र. ३०

शिलाहारकालीन कन्नड लिपी

(गंडरादित्याचा शक संवत् १०३७ चा ताम्रपट, पहिला पत्रा)

(भारतीय शासनाच्या पुरातत्व विभागाच्या सौजन्याने)




प्लेट क्र. २७, आकृति क्र. ३१


शिलाहारांच्या ताम्रपटाची मुद्रा

(क्र. ९, छित्तराजाचा भांडुप ताम्रपट)


(भारतीय शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सौजन्याने)



प्लेट क्र. २८, आकृति क्र. ३२ - भूमिमान चित्र क्र. १ : अंबरनाथ येथील शिवमंदिर



प्लेट क्र.२९, आकृति क्र.३३ - भूमिमान चित्र क्र.२ : कोल्हापूर येथील रूपनारायण जैन मंदि



प्रमाण :- 10 0 10 20 30 40 Feet

प्लेट क्र.३१, आकृति क्र. ३५-भूमिमान चित्र क्र.४: खिद्रापूर येथील कोप्पेश्वर मंदिर